ती० कै० वासुदेव वामनशास्त्री खरे यांच्या स्मरणार्थ
प्रसिद्ध केलेला-ग्रंथ तिसरा.

# मराठी राज्याचा उत्तरार्ध

## खंड पहिला

[ स. १७६१ पासून-स. १७७३ आगष्ट अखेर. ]

माधवराव बल्लाळ व नारायणराव बल्लाळ
या पेशव्यांच्या कारकीर्दी

या पुस्तकांत ऐतिहासिक-लेख-संग्रहाच्या पहिल्या चार भागांतील उताऱ्यांचा समावेश करण्यांत आला आहे व इतरत्र उपलब्ध होणाऱ्या नवीन माहितीचीही त्यांत भर घातली आहे.

संपादकः-- यशवंत वासुदेवशास्त्री खरे, मिरज.

शके १[illegible] ]          [ सन १[illegible]

किंमत १ रुपाया आठ आणे
[खर्च निराळा पडेल. ]

बल्लाळ

मराठी. रियासत

उत्तरार्ध

वी० कै० वासुदेव वामनशास्त्री खरे यांच्या स्मरणार्थ
प्रसिद्ध केलेला-ग्रंथ तिसरा.

# मराठी राज्याचा उत्तरार्ध

## खंड पहिला

( स. १७६१ जाने.-स. १७७२ आगष्टअखेर. )

माधवराव बल्लाळ व नारायणराव बल्लाळ
या पेशव्यांच्या कारकीर्दी.

या पुस्तकांत ऐतिहासिक-लेख-संग्रहाच्या पहिल्या चार भागांतील प्रस्तावनांचा समावेश करण्यांत आला आहे व इतरत्र उपलब्ध होणाऱ्या नवीन माहितीचीही त्यांत भर घातली आहे.

संपादक-यशवंत वासुदेवशास्त्री खरे, मिरज.

शके १८४९. ) ( सन १९२७.

किंमत १ रुपाया आठ आणे.

( टपालखर्च निराळा पडेल. )

# अनुक्रमणिका.

## थोरले माधवराव पेशवे यांची कारकीर्द-


| | |
|---|---|
| | पृष्ठ |
| प्रकरण पहिलें—पानिपतानंतरची अंदाधुंदी. | १-२० |
| प्रकरण दुसरें—मोंगलाशीं लढाई. | २१-५० |
| प्रकरण तिसरें—हैदरअल्लीवर पहिली स्वारी. | ५०-१०६ |
| प्रकरण चौथें —१ घरगुती बखेडे. २ प्रतिनिधींचा दंगा<br>३ भोसल्यावर पहिली स्वांरी.<br>४ दादासाहेबांची उत्तरप्रांतीं स्वांरी. | १०६-११४ |
| प्रकरण पांचवें—हैदरअल्लीवर दुसरी स्वांरी. | ११४-१३५ |
| प्रकरण सहावें—१ दादासाहेबांची हिंदुस्थानांत स्वांरी.<br>२ आनंदवल्लीची स्वांरी.<br>३ तोतया प्रकरण.<br>४ घोडपची स्वांरी. | १३५-१५८ |
| प्रकरण सातवें—नागपूरकर भोसल्यांवर स्वांरी. | १५८-१७२ |
| प्रकरण आठवें—हैदरअल्लीवर तिसरी स्वांरी. | १७२-२३२ |
| प्रकरण नववें—हिंदुस्थान प्रांतीं दुसरी स्वारी. | २३२-२४६ |
| प्रकरण दहावें—पेशव्यांचें दुखणें व मृत्यु. | २४६-२५२ |
| प्रकरण अकरावें—नारायणराव पेशव्यांची कारकीर्द. | २५३-२७० |
| महत्वाच्या व्यक्ति व स्थळें यांची सूची. | २७१-२७७ |

श्रीमन्महाराज क्षत्रियकुलावतंस

लेफ्टेनंट कर्नल

## सर श्रीराजारामछत्रपति

[ जी. सी. आय् ई. ]

सरकार राज्य करवीर

यांचे चरणसेवेशीं

हें पुस्तक

**अत्यंत भक्तिपूर्वक**

अर्पण केलें आहे.

यशवंत वासुदेवशास्त्री खरे.

# संपादकीय चार शब्द.

पानिपतानंतरच्या मराठी इतिहासाबद्दल ऐतिहासिक-लेख-संग्रह हा एकच प्रमाणभूत ग्रंथ समजला जातो. या संग्रहाच्या पहिल्या अंकाच्या प्रारंभीं ता. १६ मे १८९७ रोजीं ती० कै० वासुदेवशास्त्री खरे यानीं आपल्या उद्योगासंबंधीं उल्लेख केला आहे तो असा--

"ज्यांनीं रामेश्वरापासून अटकेपर्यंत भगवा झेंडा नाचविला, ज्यांनीं रोहिले, पठाण, शीख, रजपूत, रांगडे इत्यादि शूर लोकांच्या फौजा शेंकडों वेळां लढाईत गांठून मारून तुडवून धुळीस मिळविल्या, दूरदूरच्या मानी व प्रतापी राजांचीं सिंहासनें ज्यांच्या विजयदुंदुभीच्या नादानें दर वर्षास हादरूं लागत, त्या महाराष्ट्रवीरांनीं काय काय पराक्रम केले ते लिहून ठेवण्याचें कामसुद्धां आम्हांपैकीं कोणाच्या हातून अजून झालें नाहीं. तें काम कित्येक इंग्रज ग्रंथकारांनीं केलें आहे! त्या इंग्रज ग्रंथकारांनीं दिलेली माहिती बस्स असून ती खरी आहे, हीच समजूत इंग्रजी अंमल सुरू झाल्यापासून आम्हांपैकीं सुशिक्षित म्हणविणाऱ्यांच्या मनांत बहुत वर्षे वसत होती. खरें पाहिलें तर, सदरहू इंग्रज ग्रंथकारांनीं आपले इतिहास इंग्रजांसाठीं लिहिले असल्यामुळें त्यांतून आह्मांविषयीं माहिती त्रोटक असावयाची व तींत जिंकलेल्या लोकांची बाजू पुढें न येतां फक्त जिंकणाऱ्यांचीच बाजू दाखविलेली असावयाची, हें कोणाही विचारी मनुष्याच्या लक्षांत येण्याजोगें आहे. 'काव्येतिहाससंग्रहांत' जेव्हां निरनिराळ्या बखरी व अत्यंत महत्वाचे कागदपत्र छापून प्रसिद्ध झाले, तेव्हां आमच्या लोकांचा वर निर्दिष्ट केलेला ग्रह फिरला, व मराठी इतिहासाचें आस्थेनें पर्यालोचन करण्याची इच्छा बऱ्याच लोकांच्या मनांत जागृत झाली. दुर्दैवानें काव्येतिहास-संग्रह बंद पडला, तथापि त्या वेळेपासून तेंच काम पुढें सुरू ठेवण्याविषयीं मधून मधून प्रयत्न कित्येकदां झाले व हल्लींही होत आहेत, परंतु तें काम जितक्या नेटानें, आस्थेनें व व्यवस्थेनें व्हावयास पाहिजे तितकें तें होत नाहीं, ही गोष्ट निर्विवाद आहे.

बखरी व दंतकथा यांचा इतिहासास उपयोग फार थोडा आहे. मराठी इतिहासाचा खरा पाया तत्कालीन पत्रव्यवहारावर रचिला असला पाहिजे. तो पत्रव्यवहार हातीं लागल्याशिवाय ज्या काळाचा इतिहास लिहावयाचा, त्याकाळीं लोकांची सामाजिक व राजकीय स्थिति बरोबर कशी होती, हें कधीं कळावयाचें नाहीं. परंतु असले जुने पत्रव्यवहार अनेक स्थळीं हिंडून धुंडाळण्याचें काम फार दगदगीचें व खर्चाचें आहे. शिवाय तें एक दोघांनीं कितीही खटपट केली तरी सिद्धीस जाणारें नव्हे. पण आतां या कामीं हेळसांड केल्यास पुढें तें करण्याचें कारणच राहणार नाहीं! कारण कीं, इंग्रजी राज्यांत तर असले महत्वाचे कागद लुप्तप्राय झालेच आहेत. नेटिव्ह संस्थानांत ते जेथें कोठें थोडेबहुत राहिले तेथेंही त्यांजविषयीं अनास्थाच दिसून येते. जुन्या कागदांची हल्लीं किंमतच नाहींशी झाल्यामुळें त्यांपैकीं किती गहाळ झाले, किती कसरीनें खाल्ले, किती पावसानें भिजून कुजले, याविषयीं कोणी फिकीर बाळगीत असे-लसें दिसत नाहीं! एखादा अडाणी अंमलदार भेटला कीं शेकडों रुमाल 'बी लिस्टांत' ओढले जाऊन, त्यांचा कुट्टा होण्याची मात्र भीति आहे! व असा प्रकार घडून आल्याचीं उदाहरणेंही आहेत.

असल्या या बहुमोल व दिवसेंदिवस दुर्मिळ होत जाणाऱ्या कागदांचा कांहीं जीर्णोद्धार आपल्या हातून होईल तर पहावा, या हेतूनें आम्हीं कित्येक वर्षे अश्रांत परिश्रम करून मिरज, कुरुंदवाड व मुख्यत्वें मिरज-मळा येथील चिटणीशी दप्तरें त्या त्या संस्थानांच्या मुख्य अधिकाऱ्यांच्या परवानगीनें तपासून पाहिलीं व त्यांतून ऐतिहासिक महत्वाचें उत्तम उत्तम कागद निवडून काढून त्यांच्या नकला करून घेतल्या. शिवाय पुणें, जमाखिंडी व दुसऱ्याही कित्येक स्थळांहून आम्हीं पुष्कळ कागद मिळवून आणले आहेत; व अजूनही तो उद्योग जारीनें सुरू ठेविला आहे. तथापि सात आठ वर्षेपर्यंत पुरेल इतकी सामग्री आपल्याजवळ जमली आहे, अशी खातरी झाल्यावरून, आतां जमलेला संग्रह छापून लोक-सेवेस सादर करावा असें वाटलें, व त्यावरून तो 'ऐतिहासिक-लेख-संग्रह' या मासिक पुस्तकाच्या रूपानें दर महिन्यास थोडा थोडा

छापून प्रसिद्ध करण्याचें योजिलें आहे.

पटवर्धन सरदारांची चलती इ. स. १७६० पासून १८०० पर्यंत चाळीस वर्षें विशेष होती. तितक्या अवधींत पेशव्यांनीं जितक्या स्वाऱ्या केल्या तितक्या सर्वांत पटवर्धन प्रमुख होते. प्रत्येक लढाईत अघाडीचा मान त्यांचा असे, व या चाळीस वर्षांच्या अवधींत त्यांच्या घराण्यापैकीं पांच पंचवीस पुरुष समरांगणांत पतन पावले आहेत. प्रत्येक स्वारींत सैन्याच्या हालचाली, वेढे, लुटालुटी, लढाया, छापे, पाठलाग, फितूर वगैरे जे जे प्रकार झाले, त्या सर्वांचें त्या त्या स्वारींतील सरदारांनीं व कारकुनांनीं इत्थंभूत वर्तमान मिरजेस लिहून कळविलेलें आहे. पटवर्धनांच्या कुळांत गोपाळराव व परशुरामभाऊ हे धुरंधर योद्धे होऊन गेले. त्यांनीं मोठमोठ्या आणीबाणीच्या वेळीं लिहिलेलीं हजारों पत्रें आम्हांस उपलब्ध झालीं आहेत इतकेंच नाहीं, तर वामनराव, नीळकंठराव, कोन्हेरराव, रघुनाथराव, पुरुषोत्तमराव, पांडुरंगराव वगैरे पटवर्धनांची, तशींच नानासाहेबापासून रावबाजीपर्यंत सर्व पेशवे, सखारामबापू, मोरोबा व नाना फडनवीस, गोविंद शिवराम, आपा बळवंत, त्रिंबकरावमामा, नारो शंकर, विठ्ठल शिवदेव, महादजी शिंदे, तुकोजी होळकर, घायगुडे, रास्ते, करवीर राजमंडळाचे सरदार, हैदरअल्ली, निजामअल्ली, नागपूरचे भोंसले, गायकवाड, मुरारराव घोरपडे व दुसऱ्या अनेक इतिहासप्रसिद्ध पुरुषांचीं पत्रें आम्हास पटवर्धनांच्या दप्तरांत मिळालीं आहेत. परशुरामभाऊ, नाना फडनवीस व हरीपंत फडके या त्रिकूटाच्या अनेकविध कारस्थानांचीं व त्यांपैकीं त्या दोघां सरदारांचीं स्वाऱ्यांतील स्वहस्तलिखित अशीं तीं साग्र व सुसंगत मजकुरांचीं पत्रें वाचूं लागलें म्हणजे त्या थोर पुरुषांनीं स्वदेशासाठीं कशा हालअपेष्टा भोगिल्या, कसे पराक्रम केले, मोठमोठ्या संकटांतून कसा बचाव करून घेतला, या सर्व गोष्टींचें हुबेहुब चित्र डोळ्यापुढें उभें राहून वाचक तल्लीन होऊन जातो, व हल्लींच्या काळाचा त्यास विसर पडून तो त्या पत्र लिहिणारांच्या सुखदुःखांचा विभागी होतो! सारांश काय कीं, ज्यांनीं कारस्थानें लढविलीं व पराक्रम केले व पाहिले, त्यांनीच लिहिलेला हा पेशवाईचा

चाळीस वर्षांचा लांबचलांब इतिहास, आम्ही प्रस्तुत मासिक पुस्तकाच्या द्वारें प्रसिद्धीस आणीत आहों!"

पहिलीं तीन वर्षें हा संग्रह मासिक रूपानें बाहेर पडत होता. नंतर स. १९०० सालापासून सहाशें पृष्ठांचा एक भाग याप्रमाणें तो भागशः प्रसिद्ध होत आहे. आतांपर्यंत तेरा भाग प्रसिद्ध झाले असून त्यांतून स. १७६० ते स. १८०२ जूनपर्यंत हकीगत आली आहे आणि सुमारें साडेसहा हजार पत्रें छापून निघालीं आहेत. हीं सर्वच पत्रें तत्कालीन राजकीय व सामाजिक परिस्थितीवर अपूर्व प्रकाश पाडणारीं आहेत, इतकेंच नव्हे, तर तीं अत्यंत मनोवेधकही आहेत. स्वानुभवाचें लिखाण नेहमीं सरळ, प्रेमळ व हृदयस्पर्शी असतें. ज्यांनीं मराठी इतिहास घडविला किंवा प्रत्यक्ष पाहिला, त्यांनींच तो या पत्रांमधून लिहून ठेवला आहे, त्यामुळें लेखकांच्या सुख-दुःखांच्या संवेदना वाचकांवर आपोआपच संक्रांत होत जातात यांत काय आश्चर्य!

ऐ. ले. संग्रहानंतर या कालासंबंधें आणखींही बरींच साधनें प्रकाशित झालीं आहेत. त्यांमध्यें कै. रा. ब. पारसनीस यांचें मेणवली दप्तर व महेश्वर दरबारचीं बातमीपत्रें आणि भा. इ. स. मंडळाचें चंद्रचूड दप्तर यांनाच अग्रस्थान दिलें पाहिजे. अलीबहाद्दराचें दप्तर नवीनच उपलब्ध झालें आहे व तें अजून अप्रकाशित आहे. चंद्रचूड दप्तरही अजून बहुतांशीं अप्रकाशितच आहे. हीं दोन्हीं दप्तरें प्रकाशित होतील तेव्हां मराठ्यांच्या उत्तरेकडील राजकारणावर बहुत प्रकाश पडेल. या दप्तरांमधून नाना फडनवीस, महादजी शिंदे, अहिल्याबाई, तुकोजी होळकर व अलीबहाद्दर या प्रसिद्ध पंचायतनाबद्दल नवीन बरीच माहिती मिळण्याजोगी आहे. परंतु या माहितींत एक मोठेंच वैगुण्य राहणार आहे. तें हेंच कीं या दप्तरांमधून पेशवाई दरबाराची किंवा मराठ्यांच्या दक्षिणेकडील राजकारणाचा उल्लेख सांपडण्याचा संभव अगदींच थोडा आहे. शिवाय वर दिलेल्या पंचायतनाबद्दलही जी माहिती उपलब्ध होईल तीपैकीं बहुतेक भाग आपसांतील द्वेष व भांडणें यांच्या तपशिलांनींच अडविला जाणार आहे असा तर्क वाटतो! एकंदरींत पानिपतोत्तर इतिहासासंबंधीं

ऐ. ले. संग्रहाचा अग्रपूजेचा मान तसाच अबाधित कायम राहणार असाच आजमितीस रंग दिसतो.

इतिहाससंशोधनदृष्टया आणि वाङ्मयदृष्ट्या ऐ. ले. संग्रहाचें महत्व मोठें आहेच. तथापि त्याचा लौकिक इतका सर्वमान्य होण्यास आणखी एक गोष्ट कारणीभूत झाली आहे. ती गोष्ट म्हणजे त्यांतील प्रस्तावना ही होय. संग्रहांतील सर्व पत्रें प्रकरणवारीनें छापिलेलीं असून प्रत्येक प्रकरणाचे प्रारंभीं एक विस्तृत प्रस्तावना लिहिलेली असते. या प्रस्तावनांमधून प्रकरणांत आलेल्या पत्रांचा गोषवारा दिलेला असतो आणि शिवाय त्यांतील हकीगती आणि व्यक्ति यांचे पूर्वापर संबंध, त्यांतील राजकारणाचे सूक्ष्म धागेदोरे, त्यांतील पुराव्याची ग्राह्याग्राह्यता वगैरे गोष्टींविषयींही व्यवस्थित प्रपंच केलेला असतो. भाषाशैली, विवेचनपद्धति, बाह्यतः परस्परविरुद्ध किंवा समांतर रेषेनें घडणाऱ्या गोष्टींचें नीट आकलन करून आणि अनेक भानगडीच्या गुतागुंती नीट सोडवून त्यांतील राजकारणाचें सूत्र अचूक निवडून काढणें, या सर्व बाबतींत कै० तीर्थरूपांच्या लिखणांत एक प्रकारचें वैशिष्ट्य आहे. शिवाय मराठी इतिहासाबद्दल त्यांची दृष्टि इतकी समरस, सूक्ष्मग्राही आणि सर्वगामी होती कीं, त्यांनीं काढलेलीं अनुमानें आणि स्वीकारलेलीं धोरणें यांत आतां फरक पडण्याचा संभव फारच थोडा आहे. या प्रस्तावना लिहितांना कै० तीर्थरूपानीं अत्यंत व्यापक दृष्टि ठेवलेली होती. या त्यांच्या व्यापक दृष्टीचें उत्कृष्ठ उदाहरण म्हणजे या पुस्तकांतील नववें प्रकरण— हिंदुस्थान प्रांतीं दुसरी स्वारी--हें होय. ऐ. ले. संग्रहाशिवाय इतरत्र उपलब्ध होणारी सर्व माहितीही जमेस धरून त्या त्या प्रकरणाची प्रस्तावना लिहावी अशी त्यांची वहिवाट होती, आणि त्यामुळेंच या प्रस्तावनांना स्वतंत्र इतिहासाचें स्वरूप प्राप्त झालें आहे.

ऐ. ले. संग्रहाचे जुने भाग आतां दुर्मिळ झाले आहेत आणि त्या भागांचें पुनर्मुद्रण होणें जवळ जवळ अशक्यप्रायच दिसतें. अशा स्थितींत त्यांतील प्रस्तावना तरी स्वतंत्र पुस्तकरूपानें छापवाव्या, म्हणजे कै० तीर्थरूपानी लिहून ठेवलेला पानिपतोत्तर काळाचा इतिहास वाचकांस

वाचावयास सांपडेल, अशा इतिहासप्रेमी मित्रांकडून वारंवार सूचना मिळा-ल्यामुळें पहिल्या चार भागांतील प्रस्तावना एकत्र करून हें पुस्तक आम्ही तयार केलें आहें. सर्व प्रस्तावना होतां होईतों आम्ही जशाच्या तशाच छापिल्या आहेत आणि टीपा व इंग्रजी तारखा याही जागजागीं काळजी-पूर्वक घातल्या आहेत. महत्त्वाच्या व्यक्ति व स्थळें यांची सूची शेवटीं जोडली आहे ती अभ्यासकांना चांगली उपयोगी पडेल. पुढील भागां-तील प्रस्तवनाही अशाच खंडशः प्रसिद्ध करण्याचा आमचा विचार आहे.

मराठ्यांच्या नर्मदेपलीकडील राजकारणाचे उल्लेख ऐ. ले. संग्रहांत तारतम्यानें थोडे सांपडतात. इतिहास संशोधनाच्या इतर उद्योगामुळें ही माहिती आतां बरीच उपलब्ध झाली आहे. हें पुस्तक तयार करतांना मात्र आम्हांला ही गोष्ट विशेषशी जाणवली नाहीं. कारण या पुस्तकांत ज्या कालखंडाचा इतिहास छापला गेला आहे, त्यासंबंधीं यांत नसलेली नवीन माहिती आतांपर्यंत फारशी कोठें छापलेलीच नाहीं. सवाई रावसाहेब यांच्या कारकीर्दीचा खंड छापवितांना मात्र आम्हांला या माहितीचा भरपूर उपयोग करून घ्यावा लागणार आहे.

या पुस्तकांत माधवराव बल्लाळ आणि नारायणराव बल्लाळ या पेश-व्यांच्या कारकीर्दींचा समावेश करण्यांत आलेला आहे पानिपतानंतर मराठी राज्याचे शत्रु बळावले, आणि मराठ्यांचें कर्तृत्व व दानत यांचा ऱ्हास होत जाऊन त्या राष्ट्राची वाढ खुंटली, त्यामुळें पानिपतोत्तर काळ हा मराठी रियासतीचा ऱ्हासकाळ होय अशी सार्वत्रिक समजूत आहे आणि तीच बरोबर आहे असें आम्हास वाटतें. सबब या प्रस्तावना-खंडांना आम्ही ' मराठी राज्याचा उत्तरार्ध ' असें नांव दिलें आहे.

हें पुस्तक छापवितांना ' श्रीसिद्धेश्वर प्रेस ' चे उत्साही मालक रा. वासुदेव नारायण ठकार यांची आम्हाला अतिशय मदत झाली आहे. व आमच्या उद्योगाविषयींच्या त्यांच्या ममत्वाबद्दल आम्हीं ऋणी आहों.

कै० तीर्थरूपांचा आत्मा या अल्प सेवेनें संतोष पावो.

मिरज,<br>ता. २१।८।२७.

यशवंत वासुदेव खरे.

# मराठी राज्याचा उत्तरार्ध-खंड १

[ सन १७६१ जाने. ते सन १७७२ आगष्ट अखेर. ]

# माधवराव बल्लाळ ऊर्फ रावसाहेब पेशवे यांची कारकीर्द.

## प्रकरण १ लें--पानिपतानंतरची अंदाधुंदी.

थोडासा पूर्ववृत्तांत—स. १७६० या सालीं मोंगलावर स्वारी झाली. उदगीर येथें मोंगलाचा पूर्ण पराजय होऊन त्यानें बासष्ट लक्ष रुपये उत्पन्नाचा मुलूख पेशव्यांस दिला. तह झाला तेव्हां पेशव्यांची स्वारी नगरच्या मुक्कामीं होती. वरील तहांत दौलताबाद मोंगलानें पेशव्यांस दिली. परंतु तेथील किल्लेदार किल्ला मराठ्यांच्या हवालीं करण्यास कबूल नव्हता. सबब गोपाळराव पटवर्धनांची श्रीमंतांनीं दौलताबाद घेण्यासाठीं रवानगी केली. त्यानें जाऊन त्या किल्ल्यास शह देण्याचें सोडून किल्लेदाराशीं कांहीं पैका घेऊन किल्ला हवालीं करण्याविषयीं बोलणें लाविलें. तेव्हां तो किल्लेदार शेफारून भलभलत्या मागण्या करूं लागला. नानासाहेब पेशव्यांस गोपाळरावाचें करणें बिलकुल आवडलें नाहीं. त्यांनीं त्यास लिहिलें कीं, तुम्ही राजकारणाच्या भानगडींत न पडतां किल्ल्यांत अन्नपाणी न जाईल अशी तजवीज करा, व सक्तीनें वेढ्याचें काम चालू करा. अशी सक्तीची ताकीद

---

१ ऐतिहासिक-लेख-संग्रह भाग पहिला पृ. १-२७८ यावर निरनिराळ्यां प्रकरणांचे जागजागीं लहान लहान सारांश लिहिलेले आहेत ते सर्व या प्रकरणांत एकत्र केले आहेत. पूर्वापर संबंध आणि कथानुसंधान यांच्या सोईसाठीं मात्र आम्ही त्यांत थोडेबहुत फेरफार केले आहेत.

मिळाल्यावर गोपाळरावानें शहरपेन्ह्यावर हल्ला करून तो घेतला व किल्ल्यासही मोर्चे बसविले. तेव्हां किल्लेदारानें घाबरून दौलताबाद त्याच्या स्वाधीन केली.

उत्तर हिंदुस्थानांत अबदालीनें शिंद्यांच्या फौजेवर येऊन छापा घातला. तेथें युद्ध होऊन दत्ताजी शिंदे मारला गेला व शिंद्यांच्या फौजेचीही धूळधाण झाली. होळकराच्या फौजेपैकीं पांच सहा हजार लोक घेऊन शेटीबा खराडे अघाडीस होता. त्याजवरही अबदालीनें अकस्मात् येऊन छापा घातला. तेथें शेटीबा मारला गेला व त्याबरोबरचे लोकही बहुत मारले गेले. हीं वर्तमानें दक्षिणेंत येऊन थडकलीं. मग विश्वासरावास बरोबर घेऊन भाऊसाहेब पानिपतच्या स्वारीस निघाले. जातांना बऱ्हाणपुरांत ठाणें घालून ते माळव्यांतून खेचीवाड्यांत गेले. तेथून चमेलीपार होळकर होता त्यास मिळवून घेऊन दिल्लीस गेले. तेथें गिलच्यांची चार हजार फौज होती ती मारून व दिल्ली घेऊन पर्जन्यकाळानिमित्त त्यांनीं छावणी तेथेंच केली.

पावसाळा संपल्यावर अबदाली यमुना उतरून आला. भाऊसाहेबांनीं सारें लष्कर पानिपतचे मुक्कामीं उतरविलें. अबदालीही समीप येऊन उतरला. दोहीं पक्षीं मोठमोठीं युद्धें झालीं. भाऊसाहेबांच्या लष्करांतून पुण्यास बातम्या व पत्रें येत, त्याजवरून आतां त्या लष्कराची धडगत दिसत नाहीं असें समजून नानासाहेब तीस चाळीस हजार फौजेसह उत्तरेस जावयास निघाले. निजामअल्ली फौज जमा करून दंगा करण्याचे बेतांत होता. त्यास जरबेंत ठेवण्यासाठीं श्रीमंतांनीं रघुनाथराव दादांची मोंगलांच्या रोंखावर रवानगी केली. हा हेतु अंतःस्थ होता. बाह्यात्कारें तर हिंदुस्थानचे स्वारीस बरोबर येण्याकरितां निजामाशीं बोलून त्यास घेऊन यावें, म्हणून दादासाहेब निघाले होते. त्यांच्या फौजेंत जाऊन मिळण्याकरितां पेशव्यांची गोपाळरावास ताकीद असतांही तो दादासाहेबांकडे गेला नाहीं. पण पुढें नानासाहेब उत्तरेस जावयास निघाले तेव्हां तो त्यांजबरोबर तिकडे गेला.

---

१ पन्हा = रक्षण करणारा. शहरपन्हा = शहरची तटाची भिंत.

उत्तरेकडील वर्तमानें निजामाच्या कानीं येत होतींच. दादासाहेब समीप आले तेव्हां तो त्यांबरोबर हिंदुस्थानांत जाण्याचें बोलणें मुळींच सोडून देऊन उडवाउडवीच्या गोष्टी सांगूं लागला. तेव्हां दादासाहेब क्रुद्ध होऊन निजामावर चालून गेले. परंतु त्यानें तोंड चुकवून लढाई करण्याचें टाळिलें. उभयपक्षीं किरकोळ झटापटी मात्र झाल्या. दादांच्या या स्वारीला कागदोपत्रीं 'मेदकची स्वारी' असें नांव आढळतें.

तिकडे ता. १४ जाने. १७६१ रोजीं पानिपतावर मराठे व गिलचे यांमध्यें शेवटचा घनघोर रणसंग्राम होऊन त्यांत भाऊसाहेब व विश्वासराव हे ठार पडले व हजारों मराठ्यांची कत्तल उडाली. नानासाहेब पेशव्यांची स्वारी नर्मदेपलीकडे माळवा प्रांतांत शिरोंज भेलशापर्यंत जाते तोंच त्यांना या पराजयाचें वर्तमान कळलें कीं, 'दोन मोत्यें गळालीं, सत्तावीस मोहरा सांडल्या आणि रुपये व खुर्दा किती नाहींसा झाला याचा पत्ताच नाहीं!, ही भयकर बातमी ऐकून पेशव्यांच्या जिवास धक्का बसला आणि त्यांस क्षयाची व्यथा जडली ते परत निघून हळू हळू पुण्यास आले आणि तेथें ता. २६ जून रोजीं या दुखण्यानेंच त्या प्रतापशाली पेशव्यांचा अंत झाला.

कारकीर्दीची सुरवात—पानिपतचा पराजय आणि पेशव्यांचा आजार यांच्या बातम्या ऐकून दादांनीं नीळकंठराव पटवर्धनांस निजामाच्या तोंडावर ठेविलें आणि ते घाईघाईनें पुण्यास आले. बाळाजी बाजीराव यांच्या मरणानंतर चोविसाव्या दिवशींच छत्रपतींनीं माधवरावांस पेशवाईचीं वस्त्रें दिलीं. माधवरावांचें वय त्यावेळीं अवघें सोळा वर्षांचें होतें. पेशव्यांच्या घराण्यांत आतां रघुनाथरावदादा हे एकटेच बुड्डुक शिल्लक राहिले होते. पेशवे अल्पवयी असल्यामुळें सर्व राज्यकारभार अर्थात् दादांच्या तंत्रानें चालूं लागला. पानिपतच्या पराजयामुळें मोडकळीस आलेलें मराठी राष्ट्र पुनः ऊर्जितावस्थेला आणणें, हें अत्यंत अवघड कार्य आतां दादांस करावयाचें होतें. परंतु दादा त्या कामाला अगदींच नालायख होते. ते मिजासी वर्तनाचे, हलक्या कानाचे आणि उल्लू स्वभावाचे होते. कोणत्याही गोष्टीचा पाचपोंच त्यांस बिलकुल नव्हता. सर्व गोष्टी ते जवळच्या

शागीर्द लोकांच्या सल्ल्याप्रमाणेंच करीत असत ! पेशव्यांचे वृद्ध कारभारी सखारामबापू बोकील यांचें मात्र त्यांवर बरेंच वजन होतें. परंतु बापूंचा स्वभाव मतलबी व स्वार्थी असल्यामुळें राज्यरक्षणापेक्षां स्वार्थसाधनच त्यांस जास्त प्रिय वाटत होतें. दादांचा भोळसर आणि आढ्यतेखोर स्वभाव आणि बापूंचा कावेबाज मुत्सद्दीपणा, या गोष्टींचा प्रत्यय पेशव्यांच्या मनास एका प्रकरणामुळें चांगलाच पटला. तो प्रकार असा—

मोंगलांची स्वारी–पानिपतच्या पराजयाचें वर्तमान कळतांच निजामानें सैन्याची जमवाजमव सुरू करून उदगीरच्या लढाईत गेलेला मुलूख परत मिळविण्याचा निश्चय केला. त्यानें जाधवराव, उदाजी चव्हाण व लाला ब्रिजदास यांस पेशव्यांच्या मुलखावर स्वारीस पाठविलें. त्यांनीं मलिखेड सरकार, आळंद, गुंजोटी, चितापूर वगैरे सरहद्दीवरील महाल व अक्कलकोट परगणा हे ही लुटून फस्त केले. मोंगल बेदरास लढाईची तयारी करीत आहे हें ऐकून दादासाहेबांनींही आपल्या सर्व सरदारांस फौज जमविण्याच्या ताकिदी केल्या. पावसाळा संपल्यावर आक्टोबर महिन्यांत

सन १७६१ } निजामअल्ली स्वार, पायदळ व तोफखाना असें सर्व सामान तयार करून पन्नास साठ हजार फौजेनिशीं पुण्याचा रोंख

धरून चालून आला. त्याच्या मुकाबल्याकरितां रघुनाथरावदादा व माधवराव पेशवे हे स्वतः स्वारीवर नमूद झाले. मराठ्यांची फौज जमत चालली होती. तिनें शत्रूस जागोजाग अडविण्याचा यत्न केला, परंतु तो तीस न जुमानतां लढाया घेत घेत पुढें बेधडक चाल करून येऊं लागला. नोव्हेंबर महिन्यांत मराठ्यांची फौज सत्तर ऐंशी हजारपर्यंत जमा झाली, व मोंगल जसजसा पुण्याजवळ येऊं लागला तसतशी मराठ्यांच्या बाजूनें निकराचीं युद्धें होऊं लागलीं. मराठ्यांच्या या विरोधाचा शत्रूच्या चढाईवर विशेषसा परिणाम होऊं शकला नाहीं. निजाम मारामार करीत तसाच पुढें चाल करून पुण्यानजीक उरळी येथें मुक्कामास आला.

या स्वारींत मोंगलानें टोकें क्षेत्राचा विध्वंस केला. त्यामुळें त्याच्या फौजेंत मराठे सरदार होते ते नाखूष व लढाईविषयीं उदासीन झाले. त्यापैकीं रामचंद्रराव जाधव आपल्या फौजेसह पेशव्यांकडे निघून आला. पेशव्यांची

फौज ही मोगलांच्या निदान दीडपटीनें अधिक होती. इतकें असूनही रघुनाथरावाच्या हांतून मोंगलांचें पारिपत्य व्हावें तसें झालें नाहीं. याचें कारण, सरदार व फौज यांवर छाप बसवून त्यांच्या हातून कामें करून घेण्याचें जें सेनापतीचें खरें कौशल्य तें त्याच्या अंगीं जितकें पाहिजे तितकें नव्हतें. दुसरें कारण, ब्राह्मण सरदार व मुत्सद्दी यांत देशस्थ व कोंकणस्थ असे दोन तट पडून त्यांमध्यें तंटे सुरू झाले होते. हे तंटे मोडून सर्वांचें एकचित्त करण्याची हातोटी दादांस साधली नाहीं. निरनिराळ्या सरदारांनीं आपण होऊन काय लढाई केली ती केली. मराठ्यांत एकजूट नव्हती म्हणूनच मोंगलास पुण्यापर्यंत पल्ला मारतां आला.

मोंगल उरळीच्या मुक्कामास आला तेव्हां मात्र मराठ्यांनीं त्यासभोंवतीं गराडा घालून आणि हल्ले करकरून त्यास अगदीं जर्जर केलें. तेव्हां त्यानें तहाचें बोलणें लाविलें. त्या वेळीं बाबूजी नाईक बारामतीकर, गोपाळराव पटवर्धन, रामचंद्रराव जाधवराव इत्यादि सरदारांचें म्हणणें पडलें कीं, या प्रसंगीं मोंगल आयता हातीं सांपडला आहे तर याचा समूळ नाश करावा. तहच करणें झाला तर निदान त्याजपासून पुष्कळ मुलूख तरी घ्यावा. परंतु त्यांचें म्हणणें न ऐकतां दादासाहेब व सखारामबापू यांनीं तह ठरविला त्यांत उलट २७ लक्षांचा मुलूख मोंगलासच परत दिला! सखारामबापू कपटी व लोभी मुत्सद्दी होता. हा दरबारांत एकटाच देशस्थ मुत्सद्दी— आणि तोही दिवाणगिरीच्या मुख्याधिकारावर असल्यामुळें— दुसरे कोंकणस्थ सरदार व मुत्सद्दी त्रिंबकराव मामा, बाबूराव फडणीस, गोपाळराव पटवर्धन, बाबूजी नाईक, रास्ते वगैरे होते ते त्याचा द्वेष करीत असत. माधवराव बल्लाळ उर्फ रावसाहेब पेशवे व त्यांची आई गोपिकाबाई यांसही बापूच्या कृत्रिमाविषयीं शंका आलेली होतीच. रघुनाथरावदादा यांनीं पेशवे लहान आहेत तों राज्याचा सर्व कारभार मुखत्यारीनें चालवावा, असें जरी ठरलें होतें तरी वर निर्दिष्ट केलेली सर्व मंडळी त्यांच्या हातांत फार दिवस अधिकार टिकूं देणारी नव्हती. दादांनीं हें सर्व आधींच ओळखून मोंगलाशीं मैत्री करून त्याच्या जोरावर वेळ पडेल तेव्हां आपल्या प्रतिस्पर्ध्यांस चिरडून टाकावें,

ही दुष्ट इच्छा केली. त्यांस ही मसलत शिकविणारा सखारामबापू. या दोघांनीं मोंगलांशीं युद्ध चाललें असतां हलगर्जीपणाचें व कपटाचें वर्तन केलें, तेव्हांच हा त्यांचा हेतु सरदार व मुत्सद्दी यांनीं ताडिला होता. मुलूख देऊन तह करण्याचा प्रकार दादा व बापू यानीं घडवून आणिला तेव्हां लष्करांत फारच गवगवा झाला. मोंगल परत गेल्यावर बाबूजी नाईकानें साफ सांगिलें कीं, सखारामपंत जेथपर्यंत दिवाणगिरीच्या जागीं असेल तेथपर्यंत आपण मुळींच नोकरी करणार नाहीं. इतकें सांगून तो आपल्या फौजेसह लष्करांतून निघून चालता झाला. गोपाळराव पटवर्धनानें दादा व बापू यांस तगादा लाविला कीं, फौज ठेवण्याबद्दल मला आजपर्यंत कर्ज झालें आहे त्याचा निकाल करून द्या, आणि कबूल केल्याप्रमाणें मिरज माझ्या हवालीं करून द्या. त्याचप्रमाणें आणखी कित्येक सरदारांनीं आपआपलीं कामें करून देण्याविषयीं तगादा लाविला, तेव्हां दादा आपला मुख्य अधिकार सोडून देऊन रागावून स्वस्थ घरीं बसून राहिले व बापूनींही दिवाणगिरीचा राजीनामा दिला. मग गोपिकाबाईनें असें ठरविलें कीं, त्रिंबकरावमामा पेठे व बाबूराव फडणीस यांनीं दिवाणगिरीचें काम करावें, व दादांनीं या दोघां दिवाणांस सल्लामसलत देत जावी. तें दादांनीं मान्य केल्यासारखें दाखविलें. नंतर दक्षिणप्रांतीं स्वारी करण्याचा निश्चय ठरला. पटवर्धनांस मिरज द्यावी, व सोंदें, बिदनूर वगैरे संस्थानिकांकडून खंडणी वसूल करावी, या इराद्यानें दादा व रावसाहेब पेशवे हे लष्कर घेऊन निघाले. तों त्रिंबकरावमामा व फडणीस यांस बापू व दादा यांविषयीं भय उत्पन्न होऊन ते लष्करांतून परत आले. नंतर गोपिकाबाईनें त्यांस पुनः धीर देऊन बाबूरावास पुण्यास ठेविलें व मामास पेशव्यांच्या फौजेस जाऊन मिळण्याविषयीं आज्ञा केली. मामा तिकडे जाईतों लष्कर कृष्णातीरास जाऊन पोंचलें होतें व मिरज पटवर्धनांचे हवालीं करण्यांत आली होती. नंतर त्रिंबकराव व पेशवे हे सारी फौज घेऊन कर्नाटकाकडे चालले. बापू व दादा हे मात्र लष्करांतून फुटून पुण्यास परत आले.

स. १७६२ जाने.—जून

कर्नाटकची स्वारी--पानिपतच्या पराजयामुळें मराठ्यांच्या राज्यांत चोहोंकडे दंगेखोर संस्थानिक प्रबळ होऊन बखेडे करूं लागले. त्या सर्वांत हैदरअल्ली प्रमुख होय. त्यानें म्हैसुरच्या राजास कैदेंत ठेवून त्याचें सारें राज्य बळकाविलें होतेंच. मराठ्यांचा कर्नाटकांत मुलूख होता तो ताब्यांत घेण्यासाठीं सन १७६१ च्या जून महिन्यांत तो फौज तयार करून शिरें प्रांतीं आला. त्यास अदवानीचा नबाब व निजामअल्लीचा भाऊ बसालत जंग हाही येऊन मिळाला. नंतर त्या दोघांनीं शिरें, होसकोटें, बाळापूर वगैरे मराठ्यांचा मुलूख घेतला. मग बसालतजंग अदवानीस निघून गेला, तरी हैदराची मोहीम सुरून होती. त्याचा मुराराव घोरपडे गुत्तीकर याशीं तंटा उपस्थित होऊन त्याच्या राज्यावर त्यानें स्वारी केली व त्याचीं कांहीं ठाणीं घेऊन व मुलूख लुटून त्यास जर्जर केलें. हैदराच्या या धामधुमीचा बंदोबस्त करण्याकरितांच पेशव्यांची स्वारी आतां कर्नाटकांत उतरली होती. शत्रूनें घेतलेलीं ठाणीं पुनः काबीज करीत आणि ठिकठिकाणच्या संस्थानिकांकडून खंडण्या घेत घेत पेशवे तुंगभद्रेपर्यंत गेले. तेथून म्हैसूर राज्यांत शिरून हैदराचें पारिपत्य करावें असा त्यांचा विचार होता. परंतु पुण्यांत गोपिकाबाई व रघुनाथरावदादा यांचें भांडण उघडपणें सुरू झालें त्यामुळें पेशव्यांस ही कर्नाटकची मोहिम तशीच अर्धवट सोडून पुण्यास परत यावें लागलें. ( स. १७६२ जून )

भाऊबंदीची भयंकर तेढ— पेशवे पुण्यास परत आल्यानंतर हें भांडण ज्यास्तच भडकत चाललें. याच संधींत मल्हारराव होळकर हाही देशीं आला होता. त्याला आपल्या बाजूस ओढण्याविषयीं गोपिकाबाई व दादा या दोघांचेही प्रयत्न सुरू होते. कोंकणस्थ मुत्सद्दी व सरदार यांस सखारामबापू कारभारांत नको होता. दादांच्या हुकमतींत सारें राज्य चालावें व आपला पुत्र माधवराव यानें गादीचा मालक असूनही निर्माल्यवत् होऊन रहावें, ही गोष्ट गोपिकाबाईस कधीं आवडण्याजोगी नव्हती हें उघडच आहे. तिनें कोंकणस्थ सरदार व मुत्सद्दी यांच्या नादीं लागून दादा व बापू यांचें महत्त्व अगदीं नाहींसें करण्याचा प्रयत्न चालविला. माधवराव पेशव्यांस या गृहकलहाचा तिटकारा आला होता. परंतु ते वयानें लहान असून

सर्व सत्ता त्यांची आई व तिचे कारभारी यांच्या हातीं असल्यामुळें त्यांचें कांहींच चालेना. भांडणें होतां होतां भाद्रपद महिन्यांत एके दिवशीं दादासाहेब रुसून पुण्याजवळ वडगांव आहे तेथें जाऊन राहिले. तेथें गोपिकाबाई, माधवराव, बाबूराव फडणीस, त्रिंबकराव पेठे, गोपाळराव पटवर्धन, मल्हारराव होळकर यांनीं जाऊन त्यांस समजावून परत आणण्याची खटपट केली. परंतु तीस यश न येतां ते वडगांवाहून निघून प्रथम अहंमदनगराकडे जाण्याचा रोख दाखवून गोदावरीच्या तीरीं गेले. सखारामबापूनें आज कित्येक महिने जो व्यूह गुप्तपणें रचिला होता, त्याचा कांहीं भाग आतां दृष्टोत्पत्तीस येऊं लागला. दादाबरोबर आबा पुरंदरे, महिपतराव चिटणीस, कृष्णराव पारसनीस व रामचंद्र गणेश कानडे हे गेलेच होते. विठ्ठल शिवदेव विंचूरकर, नारो शंकर राजेबहादर, अंताजी माणकेश्वराचा पुत्र व दुसरे कांहीं देशस्थ सरदार यांनीं बापूंच्या सांगण्यावरून सैन्य जमविण्याची सुरवात केली. ही तयारी त्यांनीं दादासाहेबांकडून मोठमोठ्या जहागीरी व इनामें यांच्या सनदा मिळल्या तेव्हां केली. बापू पुण्यांत राहिले होते ते आंता दादांस जाऊन मिळाले. लढाईवर प्रसंग येतो असें पाहून इकडे गोपिकाबाईच्या कारभाऱ्यांनींही फौजा जमविण्याची सिद्धता केली. मल्हारराव होळकर, रायाजी पवार, रामचंद्र जाधवराव, पिराजीनाईक निंबाळकर या सरदारांनीं माधवरावाच्या पक्षास न सोडण्याचें वचन दिलें. परंतु होळकर व जाधव हे लढाईस वरकरणी उत्सुकता दाखवीत, आंतून त्यांचा ओढा प्रतिपक्षाकडे होता. विसाजीपंत बिनीवाले याचीही तीच स्थिति. आनंदराव रास्ते, तात्या घोरपडे, नरसिंगराव धायगुडे इतके मात्र माधवराव पेशव्यांचा पक्ष स्वीकारण्यांत मनापासून पुढारी होते. त्या सर्वांजवळ फौजेची तयारी तादृश नसल्यामुळें त्यांची सर्व भिस्त गोपाळराव पटवर्धनावर होती. तो व त्याचें घराणें मात्र दादा व बापू यांचा पक्का द्वेष करणारें होतें! तेव्हां या प्रसंगीं लढाईची तयारी करण्यास गोपाळरावाकडून बिलकूल कसूर होणार नाहीं हें गोपिकाबाईस व दरबारांतील लोकांस माहीत होतें. गोपाळराव स्वतः व नीळकंठराव, वामनराव, परशुराम भाऊ, कोन्हेरराव, नारायणराव, मोरोबा आबा, विनायकराव, धोंडो-

बादादा हे सर्व पटवर्धन सरदार यावेळीं पुण्यास युद्धाची तयारी करण्यांत तत्पर होते. सर्वांस हरएक गोष्टींत मसलत सांगणारा व युद्धसामुग्री व सैन्य जमा करून पुण्याकडे रवाना करण्यांत मदत करणारा गोविंद हरि मिरजेस होता.

पुण्यांत बाबूराव फडणीस व लिंबकरावमामा या दोघांनीं हुजरात दहा बारा हजार जमा करण्याची व्यवस्था केली होती. शिवाय होळकर वगैरे सरदारांची पथकें. गोपाळराव पटवर्धनांच्या तिन्ही पथकांतील आठ हजार फौजेस नालेबंदी मिळून दसरा झाल्याबरोबर पुण्यास निघून येण्याविषयीं ताकीद झाली होती. परंतु तितकी फौज पुण्यास वेळेवर जाऊन पोचली नाहीं. व कित्येक सरदार तर घरींच बसून राहिले. यावरून बापूचा फितूर पटवर्धनांच्या फौजेंतही त्यावेळीं शिरला होता, असा तर्क करण्यास जागा आहे. पटवर्धनांची फौज वेळेवर हजर न होण्याचें दुसरें एक कारण चमत्कारिक आहे व त्यावरून फलज्योतिषाचा राजकीय गोष्टींवर त्या काळीं केव्हां केव्हां किती विलक्षण परिणाम घडून येत होता हें दिसून येतें. दादासाहेबांची फौज जमा होत असून ती कार्तिक महिन्यांत पुण्याकडे चाल करून येणार असें पाहून पेशव्यानीं गोपाळरावास पुढें शत्रूच्या मुकाबल्यास जाण्याविषयीं हुकूम केला. परंतु गोपाळरावास त्या व पुढील महिन्यांत ग्रह प्रतिकूळ होते हें गोविंद हरीस माहीत असल्यामुळें त्यानें मिरजेहून फौज पाठविण्याची मुद्दाम दिरंगाई केली ! त्यांत त्याचा हेतु इतकाच होता कीं, फौज न गेली म्हणजे तरी गोपाळराव शत्रूची गांठ घेण्याकरितां पुढें जाण्यास धजणार नाहीं.

१ वार्षिक वेतनापैकीं एक चतुर्थांश किंवा फार तर तिजाई रक्कम शिलेदारांस आगाऊ देण्यांत येत असे तिला 'नालबंदी' म्हणत. बाकीची रक्कम लष्करांत हजर झाल्यावर दर आठवड्यास ठराविक हप्त्यानें देण्यांत येई. या हप्त्यांस 'रोजमुरे' म्हणत. पेशवाईत शिलेदारांस घोडें माणूस पाहून दोनशे पासून तीनशेपर्यंत पगार मिळे. मुख्य सरदारास त्याचा लौकिक व दर्जा लक्षांत घेऊन पांचशें रुपयांपासून लक्षावधि रुपयापर्यंत पगार देण्यांत येई. या सरदारांच्या पगारांस 'जातजैनात' किंवा नुसतें 'तैनात' असें नांव होतें. शिंदे व होळकर यांची जाततैनात प्रत्येकीं तीन लक्ष रुपये होती.

पुण्यांत पेशव्यांचें सैन्य जेव्हां बरेंच जमत चाललें तेव्हां दादासाहेबां-च्यानें त्या सैन्याशीं लढवणार नाहीं, असें पाहून सखारामबापूनें आपल्या पक्षाचा जय व्हावा म्हणून दोन उपाय योजिले. एक पेशव्यांच्या फौजेंत फितूर उत्पन्न करण्याचा व दुसरा मोंगलाची फौज कुमकेस आणण्याचा. दादांनीं स्वतः औरंगाबादेस जाऊन मोंगलाची फौज मदतीस आणली. त्या फौजेवर विठ्ठल सुंदर व मुरादखान हे मुख्य सरदार होते. मागाहून निजामअल्लीही आणखी फौज घेऊन आला. दादांनीं मोंगलाईतून परत येतांना पैठण क्षेत्र लुटून फस्त केलें! त्यांची कांहीं फौज घेऊन अंताजी माणकेश्वराचा पुत्र सातांऱ्यास आला. तेथें महाराजांच्या व किल्ल्याच्या रक्षणार्थ पुण्याच्या दरबारांतून गोविंदराव गोळे या नांवाचा गृहस्थ पूर्वीच पाठविण्यांत आला होता. दादांची फौज तेथें आलेली पाहून पेशव्यानीं प्रथम कोन्हेरराव व मागून मोरोबा आबा या पटवर्धन सरदारांस गोळ्याची कुमक करण्याचा हुकूम केला.

मोंगलांची फौज मदतीस आणिल्यानंतर दादा पुण्याच्या रोखें कूच करून चालून आले. इकडे माधवराव पेशवेही आपले सरदार व सर्व फौज घेऊन मुकाबल्यास निघाले. दोन्ही फौजांची घोडनदीवर गांठ पडली व लढाई झाली. तींत दादांच्या फौजेनें प्रथम हल्ला केला तो पेश-व्यांनीं मोठ्या शर्थीनें परत फिरविला. नंतर समेट होण्याचें बोलणें सुरू झालें. परंतु दादासाहेबांचा एकच आग्रह कीं, पेशव्यांनीं आपले कारभारी व सरदार दूर करून हस्तगत व्हावें. पेशव्यांची फौज थोडी असल्यामुळें दादांपुढें आपला निभाव लागणार नाहीं हें त्यांस माहीत होतें, व घरां-तल्या घरांत कलह माजविण्यापेक्षां चुलत्याच्या स्वाधीन व्हावें हेंच बरें, असा त्यांचा अभिप्राय होता. परंतु त्यांचे सरदार व कारभारी यांनीं

स. १७६२ नोव्हें. ७ — आणखी लढाई करण्याचा हिय्या केला. कार्तिक व० षष्ठी रविवार या दिवशीं घोडनदीची लढाई झाली. पुढें चार दिवस तेथेंच मुक्काम होता. पांचवे दिवशीं शुक्रवारीं पेशव्यांची फौज मागें हटत आळेगांवपर्यंत आली. तों मागून दादा सडया फौजेनिशीं पाठलाग करीत आले. पुन्हां आळेगांव

मुक्कामीं सायंकाळच्या प्रहर दिवसापासून अस्तमानपर्यंत निकराचें युद्ध झालें. आपल्या फौजेचा पराजय होतोसें पाहून पेशवे अठरा वर्षांचे वयाचे असतांही त्यांनीं स्वतः सैन्याचे पुढारी होऊन पराक्रम व मेहनत बहुत केली. त्याचप्रमाणें पिराजीनाईक निंबाळकर व पटवर्धन मंडळी जिवावर उदार होऊन शेवटपर्यंत झुंजत होती. पटवर्धनांपैकीं नीळकंठरावास गोळीची जखम लागली, नारायणरावास तरवारेची जखम लागली व भास्करपंतास डोक्यावर वार लागला. या लढाईत पटवर्धनांचे अडीचशें घोडे पडले. व लोकही बहुत मेले. पेशव्यांच्या फौजेंत बापूनें आधींच फितूर पेरून ठेवला होता. त्या फितुरी सरदारांनीं या आणीबाणीच्या वेळीं पळ काढिला ! नंतर पेशव्यांचा पराजय होऊन त्यांच्या सैन्याचाही धीर सुटला. ते रातोरात भीमा पार होऊन अलीकडे आले तों दुसरे दिवशीं शनवारीं पुनः दादांनीं त्वरेनें येऊन त्यांस गांठिलें. साऱ्या फौजेस दोन दिवसांचा उपास. तोफांचे बैल थकले. बहुतेक सरदार आपापली फौज घेऊन पळून गेले. स्वतः पेशव्यांची प्रकृतिही ज्वरामुळें हैराण. अशा या स्थितींत पेशव्यानीं जवळ काय सरदार राहिले होते त्यांस विचारलें कीं, पुढें काय करावें ? तेव्हां सर्वांनीं सांगितलें कीं, आतां दादाशीं समेट करून त्यांच्या स्वाधीन व्हावें. हीच मसलत कायम ठरली, तेव्हां गोपाळराव आपल्या फौजेसह मिरजेकडे निघून आला. बाबूराव फडणीस आधींच पळून बारामतीस गेला होता. तेथें आतां लिंबकरावमामाही गेला. बाकी फौजेसह पेशवे लक्ष्मणराव रास्त्यांच्या विद्यमानें दादांचे स्वाधीन झाले. सर्व राज्याचा मुख्य अधिकार पुनः दादा व बापू यांस प्राप्त होऊन त्यांच्या सांगण्याबाहेर पेशव्यांनीं काडीमात्र वागूं नये असें ठरलें. इतकें होईतों निजामअल्ली येऊन पोंचला. त्याची व दादांची भेट होऊन त्यानें कुमक केल्याबद्दल त्यास एकावन लक्षांचा मुलूख द्यावयाचा करार होता, त्यापैकीं कांहीं देण्यांत आला. आतां आपलें काम झालेंसें पाहून दादांनीं बाकीचा मुलूख त्यास दिला नाहीं.

मोंगलाची फौज परत गेल्यावर स्वपक्षीयांस बक्षीस देण्याचें व पुतण्याच्या लोकांस शिक्षा करण्याचें काम झपाट्यानें सुरू झालें. गोपिकाबाई

सिंहगडावर होती ती रास्त्यांच्या सांगण्यावरून खालीं पुण्यांत येऊन राहिली. ती शनवारवाड्यांत रहात होती तेथें व पेशव्यांच्या डेऱ्याभोंवतीं गारद्यांचे पहारे बसले. बाबूराव फडणीसांच्या घराण्याकडून फडणिशी निघून ती चिंतो विठ्ठल रायरीकर यांस देण्यांत आली. नाना फडनवीस व दादा यांच्या द्वेषास खरोखर प्रारंभ येथपासूनच झाला. भवानराव प्रतिनिधींचें पद आपला अल्पवयी पुत्र भास्करराव याच्या नांवें सातारच्या महाराजांकडून करून घेऊन त्याची मुतालिकी दादानीं नारो शंकरास दिली. त्यायोगें भवानराव व त्याचा मुतालीक गमाजीबावा यांचा व दादांचा अर्थात् द्वेष पडला. पुरंदर व सिंहगड हे किल्ले पुरंदऱ्यांस मिळाले. विठ्ठलराव विंचूरकर यांस न्यायाधिशीचें पद व फार मोठी जहागीर मिळाली. बाबूराव फडणीस व त्रिंबकराव मामा हे बारामतीस बाबूजी नाईकाच्या घरीं होते तेही दादांच्या लवकरच हातीं सांपडले. इतकें झाल्यावर दादांची वक्रदृष्टि पटवर्धनांकडे वळली.

पटवर्धनांवर गहजब — पेशवे व दादासाहेब यांच्या भेटी होण्यापूर्वीच गोपाळराव आपल्या फौजेसह निघून मिरजेकडे दरमजल कूच करून आला हें पूर्वी सांगितलेंच आहे. तिकडे पेशवे, गोपिकाबाई, नारायणराव, पार्वतीबाई, सगुणाबाई ( विश्वासरावाची बायको ) हीं सर्व दादासाहेबांच्या ताब्यांत आलीं. माजी कारभारी बाबूराव व त्रिंबकराव हेही त्यांच्या हस्तगत झाले. रास्ते, बाबूजीनाईक, पिराजीनाईक यांनीं होईल त्या रीतीनें त्यांशीं समेट करून घेतला. होळकर व जाधवराव व इतर लहानथोर सरदार यांचा ओढा प्रथमपासून दादाकडेच होता. तेव्हां आतां राहतां राहिले पटवर्धन. दादा व बापू यांचें व आपलें अत्यंत वैर, ते आतां यशस्वी झाले आहेत, सर्व पेशवाई त्यांच्या हातीं आली आहे, तेव्हां ते आता आपलें सर्व सामर्थ्य आमचा निःपात करण्याच्या कामीं खर्च करतील, हें पटवर्धनांस कळूनच चुकलें होतें. तथापि गेल्या तीन वर्षांत पटवर्धनांस पंचवीस लक्ष रुपये कर्ज काढून फौज ठेवावी लागली. त्या रकमेची फेड करून त्यांशीं सलोख्यानें वागण्याचा दादा व बापू यांनीं मनसुबा केला असता तर तो सिद्दीस न जाता असें नाहीं. परंतु त्यांनीं पूर्व-

वैरास अनुसरून पटवर्धनांवर सूडच उगविण्याचा निश्चय केला, व गोविंद हरीस पत्र लिहिलें कीं, 'गोपाळराव इकडून पळून त्या प्रांतीं गेले आहेत. ते तिकडे जाऊन कांहीं दंगाधोपा करतील तर कामास पडणार नाहीं. तुम्हांकडे मिरजेचा किल्ला व सरंजामांचा[1] मुलूख, ठाणीं, गड, कोट, पागा, हत्ती वगैरे सरकारी दौलत आहे ती इकडून जो मनुष्य पाठविण्यांत येईल त्याच्या हवालीं बिनतकरार करावी. या राज्यांत रहावयाचें असल्यास बखेडे न करितां सांपूं त्या ठिकाणीं रहावें.' याप्रमाणें पत्र येतांच पटवर्धनही बिथरले. पुढें काय करावें, कसें वागावें, ही त्यांस एवढा वेळ पंचाईत पडली होती तिचा निकाल होऊन तेही कलहास प्रवृत्त झाले. कांहीं झालें तरी मिरज दादांच्या हवालीं करावयाची नाहीं हा त्यांनीं निश्चय केला. आपलीं मुलें माणसें एखाद्या सुस्थळीं कोणाच्या तरी आसऱ्यास ठेवावीं, गोविंद हरीनें मिरजेंत राहून किल्ला झुंजवावा व गोपाळरावानें फौज घेऊन मुलखावर पोट भरावें, याप्रमाणें त्यांची मसलत ठरली. मुलें माणसें ठेवण्याबद्दल त्यांस स्थळ पाहिजे होतें त्याबद्दल त्यानीं करवीरकर राणी जिजाबाई, विशाळगडकर प्रतिनिधि, कित्तूरकर देसाई, मनोळीकर शिंदे यांस विचारून पाहिलें, परंतु पेशव्यांच्या भयानें त्यांस कोणीच आसरा देईना. हैदरअलीकडेही त्यांनीं राजकारण करून पाहिलें, परंतु तेंही सिद्धीस गेलें नाहीं. तेव्हां शेवटीं त्यांनीं आयते वेळीं कुटुंबाचीं माणसें मिरज व कुरुंदवाड येथून काढून, बंकापूर म्हणून कर्नाटकांत सावनुराजवळ त्यांजकडे एक ठाणें होतें त्याठिकाणीं नेऊन ठेवलीं. तेथें त्रिंबक हरी जाऊन राहिला. माधवराव कृष्ण ( गोविंद हरी यांचा पुतण्या ) सिदापूरच्या ठाण्यांत येऊन राहिला. त्याचा थोरला भाऊ पुरुषोत्तम कृष्ण ( दाजी ) व भास्कर हरी हे गोविंद हरीजवळ मिरजेंत येऊन राहिले. नीळकंठराव जखमी असल्यानें त्यास मिरजेंतून हालवितां येईना. बाकीचे सरदार नारायणराव, वामनराव, परशुरामभाऊ, कोन्हेरराव वगैरे व फौज बरोबर घेऊन गोपाळराव मिरजेपासून कांहीं अंतरावर तळ देऊन राहिला.

१ सरंजाम = फौजेच्या खर्चासाठी तोडून दिलेला मुलूख.

दादांची फौज मिरजेस वेढा घालणार व बहुत दिवस युद्ध चालणार हें जाणून गोविंद हरीनें किल्ल्यांत धान्य, लांकूड व दारूगोळा वगैरे सर्व सामान भरलें. कर्नाटकी प्यादे[1] व शिलेदार[2] व उत्तम उत्तम बरकंदाज

---

१ पायदळांतील शिपाई. २ स्वतःचें घोडें व हत्यार बाळगून लढणारा तो शिलेदार. दुसऱ्याचें घोडें व हत्यारें घेऊन भाडोत्री लढणारा तो राऊत. मराठी लष्करांत सर्व भरणा घोडेस्वारांचाच असे त्यामुळें फौज म्हणजे घोडेस्वारांची फौज असा अर्थ घ्यावयाचा. मराठे लोक पायदळाला अगदींच क्षुद्र समजत असत. पायदळांत प्यादे, हेटकरी, व गाडदी असे भेद असत. प्यादे बहुतेक कर्नाटकी असत. हेटकऱ्यांत मावळप्रांतांतल्या मराठ्यांचाच मुख्यत्वें भरणा असे. हेटकरी हे उत्तम बरकंदाज [ बंदुकीनें लढणारे ] असत. गाडद्यांत मुख्य भरणा शीख, रजपूत, जाठ, पठाण वगैरे परदेशीयांचा असे. पायदळाचें मुख्य काम किल्ले, कोट, ठाणीं, सरकारी कोठी व जामदारखाना यांचें रक्षण करण्याचें. मैदानी लढाईंत पायदळाचा उपयोग मराठे लोक फार क्वचित् प्रसंगीं करीत. दिवसास पांचपन्नास मैलांची सहज मजल मारणारें आणि शत्रूवर वायुवेगानें तुटून पडणारें घोडदळ हें पायदळापेक्षां सर्वस्वी श्रेष्ठ आहे ही मराठ्यांची समजूत चुकीची नव्हती. हैदराचें पायदळ मराठे घोडेस्वारांनीं वेळोवेळ कसें तुडवून टाकिलें हें वाचकांस पुढें या पुस्तकांत वाचावयास मिळणारच आहे. पेशवाईअखेर इंग्रजांचें कवाइती पायदळ व सुधारलेली युद्धसामुग्री यांशीं गांठ पडतांच मात्र घोडेस्वारांची ही श्रेष्ठतेची घमेंड बरीच कमी झाली. तोंपर्यंत मराठी लष्करांत शिलेदारांचेंच प्राबल्य असे. शिलेदार हे अब्रूदार व नामांकित घराण्यांपैकीं असत. शिलेदारांत सर्वांत जास्त भरणा मराठ्यांचा असे. त्याच्या खालोखाल मुसलमानांचा असे. ब्राह्मण, शेणवी, परभू या जातीचे लोकही शिलेदारांचा पेषा स्वीकारीत. पानिपतावर मराठे व गिलचे यांचें धर्मयुद्ध झालें असें कांहीं लेखकांचें ह्मणणें आहे, परंतु तें बरोबर नाहीं. मराठी लष्करांत कमींत कमी एकचतुर्थांश भरणा मुसलमान शिपायांचा होता तर उलटपक्षीं गिलच्यांच्या लष्करांतही पुष्कळ हिंदु शिपाई होते; एकट्या सुजाउद्दौलाच्या लष्करांत सव्वीस हजार हिंदु लढाऊ गोसावी होते. असो, शिलेदारांपैकीं नामांकित असतील त्यांस 'एकांडे' असें ह्मणत. या एकांड्यापैकीं कांहीं पुढें 'पथके' बनत. पथक्या म्हणजे पुष्कळ स्वार पदरीं बाळगणारा सरदार. पथक्यांत इतलाखी व सरंजामी असे दोन भेद असत. फौजेच्या खर्चासाठीं सरकारी पोत्यांतून [ पोतें=खजिना ] नक्त नेमणूक ज्यांना मिळे ते इतलाखी. फौजेच्या खर्चासाठीं ज्यांना स्वतंत्र मुलूख तोडून दिलेला असे ते सरंजामी. शिंदे, होळकर,

असे लोक किल्ल्याच्या रक्षणार्थ ठेवून घेतले.

इकडे दादासाहेब व निजाम यांच्या भेटी होऊन मोंगल परत गेल्यानं- नंतर दादांचें लष्कर दक्षिणप्रांतीं यावयास निघालें. दादांबरोबर यावेळीं चाळीस हजार फौज होती. मल्हारराव होळकर हा चांदवडास जाऊन राहिला. रामचंद्रराव जाधव पंढरपूर मंगळवेढें या पटवर्धनांचा तालुक्यांत येऊन खंडण्या घेत फिरूं लागला. महादजी शिंदे हाही आपल्या सर- दारीच्या कामाबद्दल यावेळीं पेशव्यांच्या लष्कराबरोबरच फिरत होता.

स. १७६२ जून–दिसें } विठ्ठल शिवदेव विंचूरकर, नारो शंकर राजेबहा- दूर, खंडेराव दरेकर सरलष्कर, आबा पुरंदरे, रामचंद्र गणेश कानडे, विसाजी कृष्ण बिनीवाले हे सरदार व सखाराम बापू हे दादांच्या स्वारीबरोबर होते. खुद्द पेशवेही स्वारींत होतेच. गेल्या वर्षीची स्वारी पटवर्धनांस मिरज देण्याकरितां होती व यंदाची त्यांपासून तो किल्ला घेण्याकरितां होती! मिरज काबीज झाल्यावर हें सारें लष्कर पटवर्धनांचा मुलूख ताब्यांत घेण्याकरितां व हैदरअल्लीचें पारिपत्य करण्या- करितां कर्नाटकांत जावयाचें होतें.

खरोखर, आपणावर संकट कोठून व केव्हां येणार हें ओळखण्याच्या कामांत त्या काळची रयत धूर्त असली पाहिजे! दादा ज्या दिवशीं रुसून पुण्यांतून निघून गेले त्याच दिवसापासून धनाढ्य लोकांनीं मिरजेंतून आपली माणसें व पैसा लांबविण्याची सुरवात केली! आळेगांवच्या लढाईतून जखमी होऊन ज्या दिवशीं सायंकाळीं नीळकंठराव मिरजेस आला त्याच रात्रीं 'मिरज फुटली,' सर्व प्रकारचे लोक वाट फुटेल तिकडे धूम पळत सुटले! तीन रात्रींत व दोन दिवसांत सारें मिरज शहर खलास होऊन गेलें!

श्रीमंतांचें लष्कर कांहीं दिवस साताऱ्यास मुक्काम करून तेथून श्रीक्षेत्र माहुलीवरून येत येत रामापूर कमळापूर पावेतों आलें. तों गोपाळराव आपली पांच सात हजार फौज होती ती घेऊन मिरजेच्या दक्षिणेस पंचवीस मैलांवर कुडची श्रीकृष्णातीर येथें जाऊन राहिला. श्रीमंत मिरजेस आल्या

पटवर्धन वगैरे सरदार माधवराव रावसाहेब पेशव्यांच्या कारकीर्दीत सरंजामी बनले. त्यापूर्वी त्यांची पथकें हुजुरातीच होतीं.

वर प्रथम गोपाळरावानें किल्ला आपणाकडेच राहूं देण्याविषयीं दादांस विनंतीपत्र पाठविलें. परंतु त्यांच्या मनांत किल्ला हरएक प्रकारें घ्यावयाचा असल्यामुळें त्यांनीं गोपाळरावास कपटानें सांगून पाठविलें कीं, तूर्त तुम्ही स्वस्थपणानें कृष्णातिरीं रहा. तुमच्या विनंतीचा विचार करून कांहीं तड जोड काढतां येईल. इकडे गोविंद हरीशीं त्यांनीं बोलणें लाविलें कीं, तुमच्या कर्जाची तीन वर्षांत फेड करूं. परंतु तुम्ही आत्तांच्या आत्तां किल्ला हवालीं केला पाहिजे! हें बोलणें त्यानें अर्थातच साफ नाकारिलें. तेव्हां बलात्कारानें किल्ला घेण्याचा निश्चय होऊन किल्यास फौजेचा वेढा बसला व मोर्चे सुरू झाले. मोर्चे सुरू होण्याचा आधीं दोन दिवस दादांनीं आबा पुरंदऱ्याबरोबर दहा हजार फौज देऊन त्यास गोपाळरावास 'लुटण्याकरितां' पाठविलें होतें. त्यानें गोपाळरावास जमाखिंडीजवळ गांठिलें तेथें घटकाभर लढाई होऊन गोपाळरावाचा पूर्ण पराजय झाला आणि त्याचें सबंध लष्कर लुटलें गेलें. त्या गर्दींत तो व नारायणराव पन्नास पाऊणशें स्वारांनिशीं निजामअल्लीकडे पळून गेले व वामनराव, परशुरामभाऊ व दुसरे पटवर्धन सरदार यादवाडाकडे पळून गेले. याप्रमाणें विजयी झाल्यावर आबा पुरंदरे पटवर्धनांचीं कर्नाटकांत ठाणीं होतीं तीं काबीज करीत चालला. ही बातमी पेशव्यांच्या लष्करांत येतांच किल्यांतील लोकांची या पराजयानें हिंमत खचली असेल असें समजून श्रीमंतांनीं किल्याबाहेर 'जिमी' म्हणून चौकी होती ती हल्ला करून घेण्याचा यत्न केला. परंतु तेथें गोविंद हरीचा पुतण्या पुरुषोत्तमराव दाजी यानें मर्दुमी करून हल्ला माघारा फिरविला. तेथें चार घटका तुमुल युद्ध झालें. त्यांत पेशव्यांकडील पन्नास पाऊणशें माणूस ठार व दोनतीनशेंपर्यंत जखमी झालें. नंतर आपल्या हातून जिमीचें नेहमीं रक्षण होणार नाहीं, असें समजून किल्लेकरी ती चौकी सोडून देऊन व खंदकावर पूल होता तो जाळून किल्यांत गेले.

मिरजेच्या किल्याभोंवतीं तिही बाजूंनीं सखल प्रदेश असल्यामुळें शत्रूचा मारा त्या बाजूंनीं चालत नाहीं. एक उत्तरेकडून व उत्तर व पूर्व यांच्या मधील कोपऱ्याकडून मारा करण्यास जागा आहेत. या प्रसंगीं त्याच बाजूंनीं किल्ला काबीज करण्याचा पेशव्यांचा सर्व एलगार चालत होता.

एकंदर मोर्चे तेरा चवदा होते. त्यांत विंचूरकर, नारो शंकर, विसाजी कृष्ण व रामचंद्रराव जाधव यांचे मोर्चे भारी होते. मोठमोठाले उंच धक्के बांधून त्यांजवर तोफा, गरनाळा व जेजाला चढवून त्यांचा सारखा भडिमार किल्ल्यावर चालू ठेवण्यांत आला होता. किल्लेकरीहि हिंमतीनें व आवेशानें झुंजत होते. यामुळें एक एक पाऊल पुढें टाकण्यास पेशव्यांच्या फौजेस महा प्रयास पडत.

गोपाळराव मोंगलाकडे गेल्याचें पूर्वी लिहिलेंच आहे. तेथें विठ्ठल सुंदर ( मोंगलाचा दिवाण ) व खासा निजामअल्ली यांनीं गोपाळरावाचा बहुमान करून त्यास आश्वासन दिलें कीं, तुझ्या कुमकेस फौज देऊन मिरजेचा वेढा उठविण्याकरितां तुझी रवानगी लवकरच करतों. त्यावरून गोपाळरावही मिरजेस पत्रें पाठवूं लागला कीं, आम्ही जलदीनें फौज घेऊन तुमच्या कुमकेकरितां येत आहों. आम्ही येईपर्यंत किल्ला हरप्रयत्नानें रक्षावा. त्यावरून किल्ल्यांतील लोकांस दुप्पट हुरूप चढला. त्यांनीं निराश न होण्याचीं दुसरींही कांहीं चमत्कारिक कारणें होतीं, त्यांचा उल्लेख येथें केला पाहिजे. गोविंद हरीची ज्यांच्या ठायीं निस्सीम भक्ति, असे कोणी स्वामी वेढा बसण्यापूर्वीं दोन दिवस किल्ल्यांत येऊन राहिले होते. तुमचें अरिष्ट निरसन करण्याकरितां मी आलों आहें असें ते सांगत. लढाई करण्याविषयीं ते किल्लेकऱ्यांस हिंमत देत व बुद्धिवाद सांगत! वेढा उठावा म्हणून देवास संकट घालण्याकरितां सदरहू स्वामी निरशन उपोषणें करीत होते! त्याशिवाय 'ग्रामाधिपति' पीर, नरसोबा, ग्रामदैवत म्हसोबा हे सर्व आपणांस अनुकूल आहेत असा किल्ल्यांतील लोकांचा बळकट ग्रह झाला होता! गोविंद हरीच्या पत्रांत याविषयीं जागोजाग उल्लेख आहेत व तो दर पत्रांत लिहितो कीं, 'बाहेरून तोफा, गरनाळा, जेजाला, बाण, बंदुका यांच्या माराची सारखी वृष्टि होत आहे, परंतु किल्ल्याभोंवतीं श्रीपंढरीनाथाचें सुदर्शन चक्र फिरत असल्यामुळें आंत कोणास इजा होत नाहीं!' हे विचार वाचून ते लिहिणाऱ्याच्या देवभोळेपणाबद्दल आमच्या वाचकांस हसूं येईल हें आम्हांस ठाऊक आहे. पण त्यांनीं असा विचार करावा कीं, अशा या देवभोळेपणाच्या बळावर हजार बाराशे लोकांस

पन्नास हजार फौजेशीं सव्वा महिनापर्यंत टक्कर मारतां आली! पौष शु० त्रयोदशीस किल्यास मोर्चे बसले, ते खंदकाच्या पाळीवर येण्यास चवदा दिवस लागले. तेथें मोर्चे येतांच दुसरे दिवशीं म्हणजे पौष वद्य द्वादशीस रात्रीं किल्ल्यांतील लोक बाहेर पडून मोर्च्यांवर तुटून पडले व हिलाल चंद्रजोती लावून त्यांच्या उजेडांत शेपन्नास माणूस कापून काढून पुन्हां सुरक्षितपणें किल्ल्यांत परत गेले! त्यानंतर तीन दिवसांनीं पुनः तोच प्रकार झाला. नंतर रावसाहेब पेशवे स्वतः दर रात्रीस मोर्च्यांत येऊन बसूं लागले व त्यामुळें सर्व सरदारही लाजून दररोज आपापल्या मोर्च्यांत राहूं लागले. त्यानंतर किल्लेकरी पुनः मोर्चांवर आले नाहींत.

२९ दिसें. १७६२

भवानराव प्रतिनिधि व त्याचा मुतालीक गमाजी यमाजी, गोपाळराव पटवर्धन, नरसिंगराव घायगुडे, पिराजी नाईक निंबाळकर, वगैरे अनेक मराठे सरदार दादासाहेबांवर रुष्ट होऊन आतां मोंगलांस पूर्णपणें अनुकूल झाले. जानोजी भोसल्याचेंही निजामाकडे सूत्र लागलें होतेंच; परंतु पेशव्याशीं कलह करण्याचा त्याचा अद्यापि निश्चय ठरला नव्हता. त्यामुळें गोपाळरावाच्या मदतीस कबूल केल्याप्रमाणें त्यानें फौज दिली नाहीं. तो पेशव्यांस बदकावणीचे निरोप मात्र पाठवी, पण त्याचें लष्कर मिरजेकडे न येतां उलट दक्षिणेस रायचुराकडे दरमजल चाललें होतें. कुमक करण्याविषयीं जानोजी भोसल्याची गोपाळरावानें विनवणी केली, पण तिचाही यावेळीं उपयोग झाला नाहीं. त्यानंतरही गोपाळरावाची मिरजेस 'एवढा माघ महिना कसें तरी करून दम धरा, तों फौज घेऊन तुमची मुक्तता करण्यास येतों,' अशा अर्थाचीं पत्रें येतच होतीं. पण किल्ल्यांतील लोकांस त्यांजकडून मदत मिळण्याची आशा राहिली नाहीं. तथापि ते निराश न होतां पूर्वीप्रमाणेंच उत्साहानें व आवेशानें लढत होते. किल्ल्याच्या रक्षणाची सर्व व्यवस्था पुरुषोतमराव दाजी व भास्कर हरि यांची होती. त्यांवर देखरेख खुद्द गोविंद हरीची असे.

इकडे बाहेरील लोकांचेही किल्ला घेण्याचे प्रयत्न अव्याहत चालू होते. ते तोफा मारून किल्ल्याच्या तटबंदीची भिंत जागोजाग पाडीत व किल्ले-

करी त्याच रात्रीं तेथें नवी भिंत बांधून काढीत! गोविंद हरि लिहितो कीं, " तमाम डेरे राहुट्या फाडून पिशव्या करून आंत माती भरून त्यांजवरी पाणी ओतून भिजवून पिशव्या लाविल्या. त्यांजवर तोफेचे गोळ्यांचा काट चालत नाहीं." श्रीमंतांच्या फौजेपैकीं शेपन्नास माणूस आंतील गोळ्यांनीं दररोज मरत होतें. तथापि त्यांचे मोर्चे खंदकावर येऊन पोचले. तेव्हां त्यांनीं खंदक उतरून किल्ल्याच्या एका बुरुजास तीन सुरुंग लाविले. परंतु त्यापैकीं दोन व्यर्थ गेले. एक मात्र उडाला, परंतु त्यानें बाहेरीलच माणूस फार मेले; नंतर उत्तरेच्या बाजूस एक बुरूज आहे तेथें नारो शंकराचा मोर्चा होता, त्या बुरूजास सुरुंग खोदण्यास सुरवात झाली. तें काम पूर्ण होतें न होतें तों आंतूनही सुरुंग तयार करून तो आपल्या सुरुंगास आणून मिळवून आपला सुरुंग व्यर्थ करण्याची किल्लेकऱ्यांची खटपट सुरू असल्याचा सुगावा श्रीमंतांस लागला; तेव्हां माघ वद्य प्रतिपदेस त्या सुरुंगास बत्ती देऊन बुरूज उडवावा व त्या गर्दींत हल्ला करावा असा मनसबा ठरला. त्याप्रमाणें त्या सुरुंगास बत्ती देण्यांत येऊन हल्लाही झाला. सर्वांपुढें निशाण व त्यामागें श्रीमंतांची अंबारी होती. हल्ला मोठ्या निकराचा झाला. पण आंतील लोकही तयारच होते. त्यानीं जिवावर उदार होऊन अशा शौर्यानें युद्ध केलें कीं, बाहेरील दोन-तीनशें माणूस ठार व जखमी होऊन हाही हल्ला माघारा फिरला! श्रीमंत दादासाहेब हतप्रभ होऊन गोटास परत आले. त्या रात्रीं त्यानीं रागानें व दुःखानें उपवास ठोकला.

त्या रात्रीं किल्ल्यांत जाधव मंडळी शंभर असामी शिलेदार होते ते व इतर शिलेदार व शिबंदीचे बहुतेक प्यादे यानीं गोविंद हरीकडे येऊन त्यास सांगितलें कीं," या उपरी तुम्ही काय करणें तें करा. आपण झुजत नाहीं! म्हणोन बोलून गेले. तमाम एकसरले ( एक झाले. ) कोणाचें म्हणून नांव घ्यावें! आजी सव्वा महिना झुज भांडण होत होतें. श्रीनें कोणे गोष्टीची कमी केली नाहीं. मुख्य मानाजी घाटगे, नाथाजी जाधव लिंगोजी जाधव, सुलतानजी जाधव, समस्त जाधव मंडळी होते.—शंभर

एकसरले आणि आजीं सोमवारीं श्रीमंतांस ( दादांस ) सांगोन पाठवून करवून ( फौजेचा तयारी करवून ) आणविलें. आम्ही पदर पसरला. दाढी बोटीं धरलें, परंतु ( या फितुरी लोकांनीं ) ऐकिलें नाहीं! राणोजी पवार, यशवंत राऊ लिगाडे देखील एक मंडळी झाली. चांडाळांनीं घर बुडविलें!! श्रीमंत तयार होऊन येतांच [ते] बोलले कीं, शरण ( आल्याचें ) निशाण तुम्ही पाल्रवा, नाहीं तर आम्ही पालवितों! म्हणोन पालविलें." इतका प्रकार होतांच गोविंद हरीचा निरुपाय झाला आणि त्यानें दुसरे दिवशीं श्रीमंताशीं तहाचें बोलणें लाविलें. दोहीं पक्षीं शर्तीं ठरतील त्या बरोबर अंमलांत याव्या याविषयीं विठलराव विंचूरकर व नारो शंकर जामीन झाले. नंतर असें ठरलें कीं, गोविंद हरीनें मिरज श्रीमंतांच्या हवालीं करावी. ज्या सावकारांचें कर्ज पटवर्धनानीं देणें होतें त्या सावकारांच्या कर्जाचा निकाल पेशव्यांनीं करावा. इतःपर याबद्दल पटवर्धनांस तसदी न लागावी. कागवाड व कुरुंदवाड हीं ठाणीं पूर्वीप्रमाणें पटवर्धनांकडेच असावीं. गोविंद हरीनें आपली चीजवस्त व मुलेंमाणसें घेऊन मंगळवेढ्याकडे जाऊन रहावें. याप्रमाणें ठराव झाला, तेव्हां पेशवे सरकारचें निशाण घेऊन विंचूरकर व खंडेराव दरेकर सरलष्कर यांचे पन्नास लोक किल्ल्यांत येऊन चांदबुरुजावर उभे राहिले. नंतर गोविंद हरि आपलें सर्व लटलें किल्याबाहेर काढून विजापूर वेशीबाहेर मुक्काम करून राहिला व तेथून दहा बारा दिवसांनीं मंगळवेढ्याकडे कूच करून गेला. त्याबरोबर शिवाजी विठल विंचूरकर पांचशें स्वारानिशीं पोंचवावयास गेला होता. मिरजेस नारो कोन्हेर यास किल्लेदार नेमून श्रीमंत माघ वद्य षष्टीस कूच करून मिरजेहून आठ कोसांवर कृष्णातीरीं येडूर मांजरी येथें गेले.

१ फेब्रु. १७६३

आपल्या पुतण्याच्या पक्षाच्या लोकांवर हा जो सूड घेण्याचा निकर्ष दादांनीं आरंभिला त्याचा परिणाम 'मोंगलाची स्वारी' हा होय. या स्वारीची सांगोपांग माहिती पुढील प्रकरणीं देण्यांत येणार आहे.

# मोंगलाशीं लढाई.

( सन १७६३ मार्च ते सप्टेंबर अखेर )

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें भवानराव प्रतिनिधि, गमाजी यमाजी, पिराजी नाईक निंबाळकर व गोपाळराव पटवर्धन हे मराठे सरदार जेव्हां मोंगलास जाऊन मिळाले, तेव्हां पेशव्यांशीं बिघाड करून त्यांस जिंकावें, त्यांचें स्वातंत्र्य हिरावून घ्यावें, निदान त्यांच्या राज्यापैकीं बराचसा मुलूख आपल्या ताब्यांत आणावा असे विचार मोंगलाच्या मनांत घोळूं लागले. त्याचा दिवाण विठ्ठल सुंदर यानेंही त्यास पेशव्यांशीं बिघाड करण्याचीच सल्ला दिली. गमाजीबावाचें साताऱ्या राजमंडळांत फार वजन होतें. त्यानें मोंगलास सांगितलें कीं, तुम्ही साताऱ्यास चला म्हणजे एका प्रहरांत तेथील राजा व किल्ला तुमच्या हवालीं करून देतों, त्या प्रांतांतील किल्लेही तुम्हांस मिळवून देतों व शिवाय वीस लक्ष रुपये खंडणी गोळा करून देतों ! राजा हातीं आल्यावर जानोजी भोंसल्यास तुम्हीं साताऱ्याच्या गादीवर बसवावें व मर्जीस येईल त्यांस पेशवे, सेनापति, सचीव वगैरे पदें व सरदार यांचीं पदें वांटून द्यावीं ! इतकें नुसतें बोलून, दाखवून तो थांबला नाहीं. तो स्वतः जानोजी भोंसल्याकडे जाऊन त्यास फौजेसह घेऊन आला. जानोजीच्या मनांत मराठी राज्याचा मालक व 'हिंदुपद बादशहा' होण्याची दुराशा गमाजीनें भरवून दिली. तो मोंगलाच्या लष्करांत आल्यावर राजे विठ्ठल सुंदर व खुद्द निजामअल्ली यांनींही त्यास छत्रपतीचे सिंहासनावर बसविण्याचें कबूल केलें. भोंसले व मोंगल यांमध्यें 'साठचाळिशीचा' तह झाला; ह्मणजे जितका नवीन मुलूख व खंडणीचा पैका मिळेल त्याच्या दहा वांटण्या व्हाव्या व त्यां पैकीं सहा मोंगलानें घ्याव्या व चार भोंसल्यानें घ्याव्या. नंतर पेशव्यांशीं लढाई करण्याचा पक्का निश्चय होऊन मोंगल चोहोंकडून फौज गोळा करूं लागला. पटवर्धन व प्रतिनिधि वगैरे इकडून गेलेल्या सरदारांस त्यांच्या पूर्वीच्या जहागिरी प्राप्त करून देण्याचें मोंगलानें कबूल केलें इतकेंच नाहीं, तर नवीन जहागिरी व किल्ले

हक व मानमरातब देण्याविषयीं त्यांस कराराच्या यादी लिहून दिल्या. हर तऱ्हेनें ही लढाई संपेपर्यंत या मराठे सरदारांनीं आपणास चिकटून रहावें असा बंदोबस्त करण्यांत त्यानें कमी केलें नाहीं. त्या योगानें आजपर्यंत न बिथरलेल्या घाटगे, घोरपडे, पाटणकर, पवार वगैरे शेंकडों जुन्या घराण्यांतील पुरुषांच्या चित्तांत महत्त्वाकांक्षा उत्पन्न होऊन त्यांपैकीं प्रत्येक घराण्यांतील एक भाऊ पेशव्यांकडे तर दुसरा मोंगलांकडे याप्रमाणें स्थिति झाली. मराठी राज्यांत ज्याला ज्याला ह्मणून भाऊबंदकीच्या व वतनाच्या तंट्यांत आपणासारखा निकाल व्हावासें वाटत होतें, ज्याला ज्याला खासगी द्वेषामुळें आपल्या प्रतिस्पर्ध्यांवर सूड उगवावयाचे होते, असे सर्व लोक आतां मोंगलास जाऊन मिळाले. त्या योगानें लवकरच त्याजवळ प्रचंड सैन्य जमा झालें. तो सान्या लष्करासह पूर्वी रायचुराकडे चालला होता, पण आतां तो रोंख फिरवून पेशव्यांवर स्वारी करण्याच्या उद्देशानें भीमानदीच्या तीरातीरानेंच तो परत सोलापूर जिल्ह्याकडे येऊं लागला. त्यानें पेशव्यांस निरोप पाठविला कीं, प्रतिनिधि व त्यांचे मुतालीक, गोपाळराव पटवर्धन, व पिराजी नाईक निंबाळकर यांच्या जहागिरी व किल्ले तुम्हीं घेतले आहेत ते त्यांचे त्यांस द्यावे, जानोजी भोंसल्यास आणखी नवीन जहागीर द्यावी, भीमेअलीकडे जितकें तुमचें राज्य आहे तें सारें तुम्ही आम्हांस द्यावें, शिवाय तुमच्या राज्यांतील कित्येक बळकट किल्ले आहेत ते आमच्या हवालीं करावे, व आम्हीं नेमूं तो कारभारी करून त्याच्या सल्लामसलतीनें राज्यकारभार चालवीत जावा. इतकें तुम्हीं करीत असाल तर तुमचें आमचें सख्य राहील. तसें करावयाचें तुमच्या मनांत नसल्यास, आम्हीं तुम्हांवर चालून येतच आहों. आम्हीं म्हणतों त्याप्रमाणें तुम्हांस करावयास लावूं.

मोंगलाच्या मनांत बिघाड करावयाचा आहे हें पेशव्यांस यापूर्वीच कळून चुकलें होतें. मिरजेस वेढा पडला होता, त्याच वेळीं त्याचे धमकावणीचे निरोपांवर निरोप व पत्रांवर पत्रें येत होतीं. पण तो कर्नाटकांत दरमजल जात आहे ही बातमी त्यांस लागली तेव्हां, यंदा तरी बिघाड करणें त्याच्या हातून होत नाहीं असें त्यांस साहजिकच वाटलें. मिरज हातीं

आल्यावर ते साऱ्या लष्करचा तेथून तळ हालवून कृष्णातीरीं येड्रूर मांजरी येथें गेले व पुढें कर्नाटकांत हैदरअल्लीच्या दंग्याचा बंदोबस्त करण्यासाठीं त्यांस स्वारी करावयाची होती त्या उद्योगास लागले. इतक्यांत जानोजी

फेब्रु. } भोंसले मोंगलास येऊन मिळाल्याची बातमी आली. म्हणून आणखी बातमी आली कीं, मोंगल आपल्या साऱ्या सैन्यासह महाराष्ट्रावर स्वारी करण्यासाठीं रायचूर दुआबापर्यंत गेलेला परत फिरला. शेवटीं वर सांगितल्याप्रमाणें मोंगलाचा पराकाष्ठेच्या उद्दामपणाचा निरोप आला. तेव्हां आतां या गोष्टीचा विचार करणें त्यांस जरूरच पडलें.

हा मोठा आणीबाणीचा प्रसंग होता. पेशवाईचें स्वातंत्र्य, किंबहुना सारी पेशवाईच, जमीनदोस्त होण्याचा मोठा बिकट प्रसंग येऊन ठेपला होता. परंतु या प्रसंगाचें महत्व ओळखून दादासाहेबांच्या व पेशव्यांच्या पक्षाचे सरदार व मुत्सद्दी तत्काल एकचित्त झाले. त्यांचीं आपआपसांतील भांडणें व द्वेष लयास गेले. मोंगलांचें हरप्रयत्नानें निवारण करून राष्ट्राचें स्वातंत्र्य व अब्रू कायम राखावी हाच सर्वांस निजध्यास लागला. त्यांनीं या बिकट प्रसंगीं जें मसलतीचें धोरण बांधिलें, तें वर सांगितलेल्या त्यांच्या सर्व प्रकारें स्तुत्य मनोरथास पूर्ण करावयास योग्य होतें. तो 'अर्वाचीन कौ-

फेब्रु. } टिल्य' सखारामबापू या सर्व मसलतींत प्रमुख होता व त्याचें शिंदे होळकरांपासून तों लहानसान पथक्यापर्यंत सर्वांवर पराकाष्ठेचें वजन होतें. दादासाहेब व माधवराव पेशवे यांनीं व नारो शंकर व विंचूरकर वगैरे सरदारांनीं त्यानें सुचविलेल्या उपायांचा अंगीकार करण्याचें कबूल केलें. मग सर्वानुमतें असें ठरलें कीं, मोंगलाची या प्रसंगीं लाख फौज युद्धास तयार होऊन आपणावर चाल करून येत आहे. तिला पायदळ व तोफखाना यांचें जबरदस्त पाठबळ आहे. आपली पंचवीस हजार मराठी फौज सध्यां त्याजकडे फितूर होऊन गेली आहे. यावेळीं त्याच्या समोर उभें राहून लढण्यांत आपला परिणाम लागणार नाहीं. याकरितां या प्रसंगीं 'गनिमी काव्या'नें लढाई करून मोंगलास हारीस आणावें. तो आपल्या राज्यांत येण्याआधीं आपणच त्याच्या व भोंसल्याच्या राज्यांत शिरून धुमाकूळ मांडावा, म्हणजे त्यास आपल्या पाठीवर येणें भागच

आहे. येणेंकरून आपल्या राज्याचें रक्षण होईल व त्याचा मुलूख लुटीमुळें व दोही लष्करांच्या पायमल्लीमुळें उध्वस्त होईल. येऊन जाऊन त्याच्या तोफांचा व पायदळाचा वचक बाळगावयाचा, पण पायदळ, तोफखाना, बाजार व बुणगें इतकें लटांबर घेऊन मोंगल चाल करील तर त्याच्यानें आपल्यास कधींच गांठवणार नाहीं. जर तो पायदळ व तोफखाना मागें ठेवून सड्या स्वारीनें गांठावयास आला तर आपण वेलाशक त्याजवर उलटून तुटून पडून त्याच्या सैन्याचा संहार करावा. या ' गनिमी काव्याच्या ' लढाईंत बहुत वर्षांचा अनुभवी व वाकबगार शूर सरदार मल्हारराव होळकर या वेळीं चांदवड येथें होता. त्यास आणावयाकरितां विठ्ठल शिवदेव विंचूरकर गेला व होळकरास औरंगाबादेकडे घेऊन यावें व आपणहि तूर्त तिकडेच जावें या प्रमाणें पेशव्यांच्या दरबारीं पक्का निश्चय झाला. दमाजी गायकवाडाची फौज मिरजेस वेढा पडण्यापूर्वींच पेशव्यांच्या लष्करास येऊन मिळाली होती, परंतु तो स्वतः अद्यापि गुजराथेंतच होता असें वाटतें. बहुधां त्यास लवकर निघून येण्याविषयीं या वेळींच बोलावणें गेलें असावें. कारण, यापुढें महिना पंधरा दिवस लोटले नाहींत तोंच, स्वारींतील सरदारांत त्याचेंही नांव नमूद केलेलें कित्येक पत्रांत आढळतें. पटवर्धनांची जहागीर दादासाहेबांनीं गोपाळराव बऱ्यास दिली होती, ती ताब्यांत घेण्यासाठीं त्याचे बंधू कृष्णराव व लक्ष्मणपंत हे कर्नाटकांत गेले. नरसिंगराव उद्धव नांवाचा एक सरदार होता, त्याचीही पेशव्यानीं तिकडेच रवानगी केली व मल्हार भिकाजी रास्ते यांस बागलकोटाकडे पाठविलें. एकंदरींत मिरजेपासून तुंगभद्रेपर्यंत पेशव्यांनीं सात हजार फौज ठेविली होती तितकी त्या प्रांतीं पेशव्यांचा अंमल कायम राखण्यास समर्थ होती. बाकीची अजमासें पंचेचाळीस हजार फौज घेऊन श्रीमंत कृष्णातीर सोडून पुनः मिरजेस आले. तेथें जड जड तोफा वगैरे सामान होतें तें त्यांनीं किल्ल्यांत ठेवून दिलें. फक्त दहा तोफा बरोबर ठेविल्या. नंतर ते रोज बारा चवदा कोसांच्या मजला करीत रहिमतपुरावरून साल्प्यांचा घांट उतरून तेथून नगरच्या रोखें जाऊन पुढें औरंगाबादेस गेले. मिरजेपासून ही त्यांची चवदावी मजल होती ! त्या शहरचे परे त्यानीं जाळून

लुटून फस्त केले व शहरच्या कोटांवर ही हल्ला केला. तो हल्ला शहरवाल्यानीं मारून काढिला. नंतर हे पुनः दुसरा हल्ला करीत होते तों आंत मुरादखान सुभेदार होता त्याजकडून वकील आला व त्यानें दोन लक्ष रुपये देऊन पेशव्यांशीं तह करून घेतला.

इकडे निजामअल्ली भीमेच्या पाण्यानें पुण्याचा रोंख धरून येत होता, त्यानेंही पेशवे औरंगाबादेकडे गेले असें वर्तमान येतांच तो रोंख सोडून तिकडेच चाल केली. तो आपणापासून पांच सात मजलींवर आल्याची वर्दी येतांच मुरादखानानें वर सांगितल्याप्रमाणें दोन लक्ष रुपये दिले, तेवढ्यावरच तृप्ति मानून ते तेथून निघाले ते दरमजल वऱ्हाडाकडे जानोजी भोंसल्यांचा मुलूख लुटण्याकरितां चालले. औरंगाबादेस मुक्काम असतां
मार्च } एका मारेकऱ्यानें दादासाहेबांचा खून करण्याचा यत्न केला, परंतु तो सफळ झाला नाहीं. त्यानें वार करून त्यांस जखमी केलें, तोंच आसपासचे लोक धांवून आले व त्यानीं त्या मारेकऱ्यास पकडलें. तो मारेकरी गारदी होता. त्यानें स्पष्ट सांगितलें कीं, रामचंद्रराव जाधव यांच्या सांगण्यावरून आपण हें कर्म केलें! या गोष्टीचा छडा लागतां लागतां असें कळून आलें कीं, हा जाधव मोंगलाकडे फितुरी झाला आहे! त्यानें पूर्वी पंढरपुरक्षेत्र लुटलें होतें व हल्लींही मिरजेहून औरंगाबादेस येत असतां त्यानें वाटेंत रहिमतपुर, फलटण व दुसरे शेंकडों गांव लुटले होते. त्यानंतर त्यानें दादासाहेबांवर हा मारेकरी घातल्याचा त्याजवर आरोप आला. परंतु तो फितुरी आहे ही पक्की खात्री औरंगाबादेहून लष्करानें ज्या दिवशीं कूच व्हावयाचें त्या दिवशीं झाली! लष्कर निघालें तेव्हां तो कांहीं केल्या जागा सोडीना. श्रीमंतानीं शेवटीं बलात्कारानें त्यास कूच करावयास लाविलें. वाट चालतां चालतां श्रीमंतानीं व त्यांचे सरदारांनीं विचार केला कीं, हा रामचंद्रराव जाधवासारखा विश्वासघातकी सोबती उपयोगाचा नाहीं. याचें पारिपत्यच केलें पाहिजे. नंतर श्रीमंतांचे आज्ञेवरून बाबूजीनाईक व आबापुरंदरे यानीं जाधवाच्या फौजेवर हल्ला करून तिची दाणादाण केली व त्यांस कैद करून दौलताबादेच्या किल्ल्यांत अडकावून ठेविलें. नंतर वऱ्हाड प्रांताकडे लष्कर चालू झालें. यानंतर नरसिंगराव घायगुडे व सदाशिव राम-

चंद्र व बाबूराव फडणीस व मोरोबा फडणीस हे मोंगलाकडे पळून गेले.

मल्हारराव होळकरास आणण्याकरितां विठ्ठलराव विंचूरकर गेले होते. परंतु एका बोलावण्यावरून येणारा तो नव्हता! दादासाहेब व सखारामबापू यांनीं गेल्या चार सहा महिन्यांत ज्या कांहीं गोष्टी केल्या त्या सर्वच त्यास आवडण्यासारख्या होत्या असें नाहीं. अलीकडे त्यांनीं त्याची पूर्वीप्रमाणें मनापासून यथास्थित विचारपूसही केल्याचें दिसून येत नाहीं. आतां त्यावांचून त्यांचें अडलें, तेव्हां मात्र त्यांनीं त्यास बोलावण्यावर बोलावणीं पाठवावयाचा उपक्रम केला. मग त्यानें तरी त्यांजकडून विनवण्या कां करून घेऊं नये? पहिल्यानें विंचूरकर आले, मागाहून दादासाहेबांच्या विश्वासांतील दोन कारकून आले. तिसऱ्या खेपेस स्वतः सखारामबापू आले. तथापि तो निघेना! शेवटीं खुद्द रावसाहेब पेशव्यांसच दादासाहेबांनीं होळकरास आणावयास लष्करांतून पाठवून दिलें, तेव्हां त्यानें एकदाची जागा सोडिली. पण निघण्याआधीं त्यानें नवीन दहा लक्ष रुपयांची जहागीर आपणांस देण्याविषयीं पेशव्यांपासून करार करून घेतला तेव्हां कूच केलें! होळकर येऊन मिळाला तों पेशव्यांचें सैन्य वऱ्हाडांत शिरून लुटालूट करीत मलकापूरपर्यंत गेलें होतें.

मोंगल औरंगाबादेस येऊन उतरतो तोंच जानोजी भोंसल्यानें टकळी काविलो कीं, मी तुम्हांस येऊन मिळालों म्हणून श्रीमंत माझ्या मुलखाचा लुटून सत्यनाश करीत आहेत. याकरितां तुम्हीं आम्हीं मिळून त्यांचा पुनः पाठलाग करूं या! तें मोंगलानें कबूल केलें व थोडे दिवस आपल्या फौजेस विश्रांति देऊन ते दोघेही वऱ्हाडाकडे सपाट्यानें मजल करीत चालले. त्यांच्या तोफा, डेरे, बाजारबुणगे व पायदळ हें सारें मोठ्या आयासानें उंदेरीचा घांट चढून वर गेलें मात्र, तों पेशव्यांच्या फौजेनें आतां आपण मोंगलांवर नीट चालून जाऊन त्याशीं निकरानें युद्ध करणार अशी हूल दाखवून त्या बाजूस कांहीं मजल चाल केली. ही वार्ता मोंगलांस कळतांच त्यानेंही काय मागें राहिलें होतें तेंही सैन्य घांटावर आणून लढाईची तयारी केली व तो पेशव्यांच्या फौजेची वाट पहात बसला. परंतु ती कसची लढत्ये! मोंगलांच्या लष्करासमीप येऊन ही अकस्मात् जी

झुकाटली ती नीट फर्दापुरचे घांटानें खालीं उतरून पुन: औरंगाबादेच्या चोकांडीस बसली! पेशव्यांनीं आपणांस फसविलें हें पाहून मोंगल क्रुद्ध होऊन आल्या वाटेनेंच परत धापा देत घाईघाईनें परत आला. तों ते औरंगाबादेहून निघून नागतळयाचा घांट उतरून करमाळें उजवें टाकून सोलापूर तुळजापुराकडे गेले!

इतकें झालें तेव्हां मोंगलाचे डोळे उघडले. मराठे धांवूं लागले तर त्यांचा पाठलाग आपल्या हातून होणें शक्य नाहीं हें आतां त्यास कळून चुकलें. मग भोंसले वगैरे मराठे सरदारानीं त्यास सल्ला दिला कीं, तुमच्या राज्याचा नाश करण्याकरितां पेशव्यानीं ज्या पद्धतीचा अंगीकार केला आहे तीच पद्धति त्यांच्या राज्याचा नाश करण्याकरितां तुम्हीं कां स्वीकारीत नाहीं! ते जर तुमच्या मुलखांत लुटालूट करीत फिरत आहेत तर तुम्हींही त्यांच्या मुलखांत जाऊन तसेंच करा! त्यांस आपल्या मुलखाची आस्था असली तर ते टाकोटाक तुमच्या पाठीवर येतील. तेणेंकरून तुमच्या राज्यावरचें अरिष्ट टळेल व त्यांशी लढण्याची जी तुमची इच्छा आहे ती तृप्त होईल. न आले तर त्यांचा मुलूख स्वस्थपणें जाळा, लुटा किंवा काबीज करा! ही युक्ति मोंगलास मानवली व तो औरंगाबादेहून आपल्या प्रचंड सेनेसह अहमदनगराकडे येऊं लागला. पण त्याच्या इच्छेप्रमाणें एप्रिल पेशवे मात्र त्यास गांठावयाकरितां व आपल्या राज्याचें संरक्षण करण्याकरितां आले नाहींत! मोंगल पुण्याचा विध्वंस करण्याकरितां निघाला म्हणून तेही त्याची राजधानी भागानगर [हैदराबाद] जमीनदोस्त करण्याकरितां चालले. तुळजापुराहून ते यादगिरीस जाऊन तेथून बेदरास गेले. तेथें त्यानीं आपल्या सैन्याचे तीन विभाग केले. एका भागावर मुख्य दादासाहेब व रावसाहेब पेशवे, दुसऱ्यावर नारो शंकर व मल्हारराव होळकर, तिसऱ्यावर बाबूजी नाईक, बाबूराव हरि व रामचंद्र गणेश. याप्रमाणें या तीन फौजा एकमेकांपासून वीस पंचवीस कोसांच्या अंतरावर राहून स्वाऱ्या करीत करीत बेदरापासून भागानगरपर्यंत त्यानीं सारा प्रांत लुटून जाळून बेचिराख केला!

- या पूर्वीच गमाजीबावानें आपला धनी भवानराव प्रतिनिधि याची

जहागीर व किल्ले काबीज केले होते व नारो शंकराचा अंमल उठवून प्रतिनिधीचा पुन: अंमल बसविला होता. पेशव्यांची स्वारी सोलापुराकडे आली तेव्हां अक्कलकोटास त्रिंबक हरि वगैरे पटवर्धनांच्या कुटुंबाचीं माणसें होतीं तीं पळून नळदुर्ग किल्ल्याचे आश्रयास गेलीं. गोविंद हरि मंगळवेढ्यांत होता त्यानें श्रीमंतांची स्वारी तेथें आल्यास मिरजेप्रमाणें तेंही ठाणें निकरानें झुजविण्याची तयारी केली. पंचमहालांत निजामअल्लीचा भाऊ मीरमोंगल व त्याचा दिवाण मीर आबास यानीं सोलापुर प्रांतीं लुटण्याचा व जाळण्याचा प्रळय केला. बर्वे व नरसिंगराव उद्धव धारवाडाकडे गेले होते ते परत कोल्हापुराकडे येऊन कोल्हापुरकर व कागलकर घाटगे यांमध्यें लढाई चालली होती तींत कोल्हापुरकरांस मिळाले. या व दुसऱ्या अशा शेंकडो गोष्टी या वर्षी घडून आल्या, त्यांची विशेष हकीगत येथें देण्याचें कारण नाहीं. त्या सर्व स्थानिक महत्वाच्या आहेत व त्या त्या प्रांतांची तत्कालीन स्थिति दाखविण्यास उपयोगी आहेत एवढेंच. दक्षिणेंत मोठीं राज्यें पेशवाई व मोंगलाई. या दोन राज्यांत राहणाऱ्या कोट्यावधि गरीब रयतेची बाताहत, दैना व संहार करण्याकरितां प्रत्यक्ष कलीनेंच मोंगल व पेशवे या जबरदस्त राजांच्या मनांत संचार केला होता व सारा दक्षिण देश हें एक प्रचंड समरांगण त्यांसाठीं तयार केलें होतें. तेथें त्या दोघांची झोंबाझोंबी चालू होती व त्यांच्या पायांखालीं असंख्य अनाथ रयत तुडविली जात होती. त्यांच्या त्या झोंबाझोंबीचे काय परिणाम होत गेले हें सांगितलें म्हणजे झालें. त्या उभयतांच्या बाजूच्या बालमल्लांच्या ज्या कोनाकोपऱ्यांत झटापटी चालल्या होत्या, त्यांकडे किती लक्ष्य द्यावें !

मोंगलानेंही पेशव्यांप्रमाणेंच आपल्या सैन्याचे तीन विभाग केले. एक विभाग दहा हजार सैन्याचा. त्यावर मुख्य सरदार राजे विनायकदास. दुसराही विभाग दहा हजारांचा. त्यावर मुख्य सरदार गमाजीबाबा. विठ्ठल सुंदर यास त्यानें नाशीक, जुन्नर प्रांतीं मुलखाची जप्ती करून खंडणी गोळा करण्यास पाठविलें, तसेंच काम गमाजीबावाकडे सोंपवून त्यास वाताऱ्याकडे रवाना केलें. बाकीचें लष्कर व भोंसले, घायगुडे, पटवर्धन वगैरे मराठे सरदार यांस बरोबर घेऊन मोंगलानें कूच केलें व थेट पुण्याचा रोख धरिला.

एवढा वेळ लढाईची सारी धामधूम काय ती मोंगलाच्या व भोंसल्याच्या मुलखांत चालली होती, त्यामुळें पुणें प्रांतीं जिकडे तिकडे शांतता होती. नाहीं म्हणावयास सिंहगडावर कांहीं फितूर झाला होता, पण तो उघडकीस येऊन फितवेखोरांचें यथास्थित पारिपत्य झालें. सचिवांचा किल्ला राजगड, येथेंही जंजिऱ्याच्या हबशाकडून कांहीं फितूर झाला होता, त्याचा यथायोग्य बंदोबस्त झाला. याखेरीज पुणें प्रांतीं कांहीं गडबड झाली नव्हती. पण आतां मोंगल दरमजल चालून येत असल्याच्या बातम्या जेव्हां पुणेंकरांच्या कानीं पडूं लागल्या तेव्हां त्यांची जी त्रेधा उडाली ती कांहीं पुसूं नये ! जितकी जिनगी बरोबर नेववेल तितकी घेऊन ज्यांस जिकडे वाट फुटली तिकडे ते पळून गेले. कोणी तारेणा, लोहगड, राजमाची वगैरे घांटबंधारीच्या किल्ल्याच्या आश्रयास गेले. कोणी मावळांत जाऊन जागोजाग दडून बसले. कोणी घांट उतरून तळकोंकणांत भटकूं लागले. कांहीं मुंबईस इंग्रजाच्या आश्रयास जाऊन राहिले, पेशवे सरकारचा जवाहीरखाना व कुटुंबांतील माणसें पुरंदरावर गेलीं. बाकीचे कारखाने त्या किल्ल्याच्या पायथ्यास सासवड येथें राहिले. मोंगलानें पुण्यांतील अधिकारी नारो आपाजी तुळसीबागवाले व पुण्याचे देशमुख व देशपांडे यांस व खुद्द गोपिकाबाईस पत्रें पाठविलीं कीं, तुम्हीं बरे गोष्टीनें पुण्याच्या खंडणीची रक्कम आम्हीं सांगूं ती लवकर पाठवून द्या. नाहीं तर आम्हीं पुणें उध्वस्त केल्याशिवाय सोडणार नाहीं. गोपिकाबाईनें मोंगलास साफ उत्तर पाठविलें कीं, तुमचे वैरी भागानगर प्रांतीं गेले आहेत तिकडे जाऊन तुमचा त्यांचा काय तंटा असेल त्याचा निकाल करून घ्या. आम्हीं तुम्हांस खंडणी देणार नाहीं. पुण्याचें तुम्हांस काय वाटेल तें करा ! नारो आपाजीनें विचार केला कीं, मोंगल खंडणी मागतो ती दिली तरी त्याचें बेकैदी लष्कर पुण्यास उपसर्ग दिल्याशिवाय राहणार नाहीं. त्यांतून पैसेवाले लोक होते ते येथून गेलेच आहेत. चार गोरगरिबें राहिलीं आहेत त्यांचें मोंगल झाला तरी काय करणार ! तर आतां खंडणीविषयीं त्यास उडवाउडवीचीं उत्तरें देऊन काय परिणाम होतो तो पहावा. पण त्यास हें कळलें नाहीं कीं, इकडील घरभेदे सरदार तिकडे मिळाले आहेत,

त्यांच्या माहितगारीनें मोंगल जेथें जेथें पैका मिळण्याचें संधान असेल तेथें तेथें अचानक जाऊन छापे घालील !

विनायकदास नाशिकाकडे गेला होता त्यानें तें शहर लुटून जाळून फस्त केलें व लाखों रुपये खंडणी मिळविली. नंतर तो तेथून लुटालूट करीत जुन्नरास आला. त्या शहरचीही नाशिकाप्रमाणेंच दुर्दशा उडाली. मग त्याचें लष्कर मावळांत जिकडे तिकडे पसरलें. त्यानें लुटिल्याशिवाय तिकडील एकही गांव सोडिला नाहीं. आंबेगांव शेडाणीपर्यंत याप्रमाणें लूट झाली. मे. } जेथें जेथें म्हणून द्रव्याचा सुगावा लागेल तेथें तेथें नेमके छापे पडत, यामुळें पुण्यांतून पळून गेलेले पुष्कळ लोक नागवले गेले. लोहगडच्या पायथ्यास पुण्याचे पुष्कळ लोक आपापल्या कुटुंबांसुद्धां राहिले होते. त्यांवर मोंगलाचा छापा पडला, तेव्हां वीस लक्ष रुपयांची जिनगी लुटली गेली ! त्या लोकांत नाना फडणीस होता. त्याचें सर्व वित्त लुटलें जाऊन त्यास एक वस्त्रानिशीं लोहगडावर पळून जावें लागलें ! सिंहगडच्या पायथ्यास पेशवे सरकारचे जामदारखाना वगैरे कारखाने होते ते भोसल्याकडील रघोजी करांड्यानें येऊन लुटून नेले. सिंहगडच्या व पुरंदरच्या घेऱ्यांत जितके गांव होते तितके सर्व लुटले गेले. मोंगल पुण्यास आला तेव्हां त्यानें शहरचे वाडे खणून काढण्याचा व जाळण्याचा आपला निश्चय प्रदर्शित केला. त्या वेळीं ते वाडे वांचवावे म्हणून गोपाळराव पटवर्धनाच्या मध्यस्थीनें नारो आपाजीनें मोंगलाशीं तह केला कीं, पुणें व पुरंदरचे पायथ्याचे गांव मोंगलानें रक्षण करावे व साडेतीन लक्ष रुपये घेऊन प्रांतांतून आपली फौज उठवून न्यावी. याप्रमाणें तह ठरला व खंडणीपैकीं कांहीं रक्कम मोंगलाच्या पदरांतही पडली. त्यामुळें नारो आपाजी आतां आपण निर्भय झालों असें समजून बेसावध राहिला. त्याचा परिणाम असा झाला कीं, मोंगलानें खंडणी घ्यावयाची ती घेऊन शिवाय यथास्थित लूटही केली ! पेशव्यांनीं भागानगरच्या पेठा मारिल्या व त्या शहरापासून खंडणी घेतली व बेदरशहर जाळून टाकिलें या बातम्या त्यास नुकत्याच कळल्या होत्या. त्यानें या अपमानाचा व नुकसानीचा सूड पुण्यावर उगविण्याचा निश्चय केला. त्यानें तोफखान्यांतून तोफा नेल्या व फरासखाना वगैरे

लुटिला, शहरांतील सर्व देवळांतून जितक्या म्हणून मूर्ति सांपडल्या तितक्या मुद्दाम छिन्नविच्छिन्न केल्या, मोठमोठाल्या कित्येक हवेल्या पाडून टाकिल्या व कित्येक पेठाच्या पेठा जाळून टाकिल्या. "तोफखान्याचे पानशांचे वाड्यास आग लागली ती नागझरीस येऊन मिळाली." पर्वतीचा विध्वंस झाला. येथें सरकारी वाडा व "चाळीस हजार ब्राह्मणांस निवाऱ्यास बसावयाच्या" धर्मशाळा होत्या त्या जळून गेल्या. शेवटीं त्याचा तोच कंटाळून पुण्याहून परत औरंगाबादेकडे जावयास निघाला. गमाजीबावा साताऱ्याकडे गेला होता तोही आतां मोंगलांस येऊन मिळाला. तो त्या प्रांतींचा चांगला माहितगार असल्यामुळें त्यानें वांई, भोर व नीरथडीचे एकंदर गांव लुटून खूब पैका गोळा केला होता. पावसाळा समीप असल्यामुळें महाराष्ट्रांतच छावणी करून रहावें असें मोंगलाच्या मनांत आलें होतें. परंतु अनेक कारणांमुळें तो बेत रहित होऊन तो आतां आपल्या मुलखाकडे परत येत होता. छावणी बेदरास करावी कीं औरंगाबादेस करावी याविषयीं त्याचा निश्चय अद्यापिही झाला नव्हता.

इकडे पेशव्यांचें सैन्य साऱ्या मोंगलाईभर धिंगाणा घालीत होतें त्यामुळें त्या राज्यावर पुरी साडेसाती ओढवली होती. मराठ्यांचें सैन्य शत्रूच्या मुलखांत शिरलें म्हणजे नेहमींच लुटालूट करी, पण त्या लुटालुटींत कांहीं निर्बंध होते. परंतु या स्वारींत मात्र त्यांनीं लुटण्याची व जाळण्याची पराकाष्ठा केली व क्रोडो रुपये गोळा केले. या खेपेस लुटण्यापेक्षां नासाडी करण्याकडेच त्यांचें विशेष लक्ष होतें. पुण्याची मोंगलानें काय दुर्दशा
मे केली हें दादासाहेबांच्या कानीं येतांच त्यांस पराकाष्ठेचा राग आला व जेथें मोंगल असेल तेथें जाऊन त्यास गांठून त्याशीं युद्ध करावें, हें त्यांच्या डोक्यांत वारें भरलें! अजून मोंगलाशीं युद्ध करण्याची वेळ आली नाहीं असें सखारामबापूनें व होळकर व गायकवाड वगैरे सरदारांनीं त्यांस पुष्कळ सांगून पाहिलें पण व्यर्थ! सखारामबापूस त्यांनीं शिव्यांची लाखोली वाहिली व 'तूं गबर झाला आहेस म्हणून मला पळावयाचा सल्ला देत आलास! पण मी कांहीं आतां स्वस्थ बसणार नाहीं. मरून गेलों तर बेहत्तर, पण आतां मोंगलाशीं लढाईच करणार; असें

त्यानीं त्यास साफ सांगितलें. मल्हारराव होळकर व दमाजी गायकवाड यांनीं युद्धाचा निषेध केला, तेव्हां ते त्यांस म्हणाले कीं, 'तुम्हां सर्वांचीं शानें व हिंमतमर्दानपणा काय आहे तो मला ठाऊक आहे! पानपतावर भाऊसाहेबांस टाकून आलेत ते तुम्हींच ना?' याच प्रकारची जेव्हां बाकीच्या सरदारांचीही पूजा होऊं लागली तेव्हां ते सारेच कचेरींतून निमूटपणें उठून गेले. दादासाहेबांच्या मर्जीतला एक देव्या म्हणून शागीर्द होता त्याची जेव्हां सखारामबापूनें विनवणी केली तेव्हां त्यानें मात्र युद्धाची इतक्यांत उतावळी न करण्याविषयीं दादासाहेबांचें मन वळविलें!

मोंगलाच्या पुण्यावरील स्वारीस जें एवढें मोठें यश आलें तें इकडून रुसून गेलेले मराठे सरदार त्यास मिळाले होते त्यांच्या मसलतीचें व खटपटीचें श्रेय होय; ही गोष्ट आतां पेशव्यांच्या सरदारांच्या व मुत्सद्दी लोकांच्या मनावर पूर्णपणें ठसली. या रुसलेल्या सरदारांची समजूत करून त्यांस परत आणावें म्हणजे मोंगल सहजच हलका पडेल व त्याशीं युद्ध केल्यास आपणास हटकून जय येईल ही सर्वांची खात्री झाली. पण रुसलेल्या सरदारांची समजूत कशी होते? सखारामबापूंची व खुद्द दादासाहेबांची सुद्धां त्या सरदारांजवळ अगदींच पत नव्हती. तेव्हां तुम्हांकडून घेतलेल्या जहागिरी, किल्ले व अधिकार तुमचे तुम्हांस परत देतों, तुम्हीं मोंगलास सोडून इकडे या; असें जरी त्या दोघांनीं अगदीं जीव तोडतोडून सांगितलें असतें तरी सुद्धां तें त्यांस खरें वाटलें नसतें! तेव्हां सरदारांची समजूत करून त्यांस मोंगलांच्या कटांतून फोडून इकडे आणण्याचें काम सर्व सरदारांनीं मल्हारराव होळकराच्या गळ्यांत घातलें. आणि खरें पाहिलें तर त्या इतका जुना व वजनदार सरदार सान्या राष्ट्रांत कोणीच राहिला नव्हता. तेव्हां हें काम झालें तर त्याच्याच हातून होण्याजोगें होतें. आपल्या मदतीशिवाय पेशव्यांचें पदोपदीं नडतें असें पाहून या स्वारींत त्यानेंही आपला हात यथेच्छ उगवून घेण्यास मागें पुढें पाहिलें नाहीं! चांदवडाहून निघतेवेळींच त्यानें दहा लक्षांच्या जहागिरीचा करार करून घेतला होता. त्यानंतर वेळोवेळ अडअडून त्यानें आजपर्यंत पंचवीस लक्षांचा मुलूख आपणास जहा-

जून-जुलै

गीर देण्याविषयीं पेशव्यांपासून यादी करार करून घेतल्या होत्या! असो. रुसलेल्या सरदारांत बलिष्ठ म्हटला तर एक जानोजी भोंसले. त्याचें राज्य, सैन्य, पराक्रम व दरारा हीं सर्वच मोठीं होतीं. मुख्यत्वें त्याच्याच मदती-मुळें मोंगलाचें पारडें जड होऊन बसलें होतें. त्यास वश करण्यासाठीं सामादि चतुर्विध उपयांची योजना सुरू झाली. साम व दाम हे उपाय करून पहाण्याचें पेशव्यांनीं होळकरावर सोपविलें आणि त्याच्या त्या प्रय-त्नांस लवकर यश यावें म्हणून त्यानीं दंड व भेद हेही उपाय योजिले. ते असे कीं, हिंदुस्थानांत महादजी शिंदे होता त्यास तिकडून वऱ्हाडांत शिरून लुटालूट करण्याचा त्यांनीं हुकूम पाठविला. तो हुकूम पोंचतांच शिंद्याची स्वारी राजपुतान्यांत होती ती दरमजल उज्जनीअलीकडे येऊन तिनें थेट वऱ्हाडचाच रोंख धरिला. शिवाय जानोजीचा भाऊ मुधोजी यास पेशव्यांनीं सांगून पाठविलें कीं, तूं आम्हांकडे येशील तर जानोजीचें सेनासाहेब सुभ्याचें पद व जहागीर आम्हीं तुला देतों! या गोष्टींचा सुगावा जानोजी भोंसल्यास लागतांच त्याचें मन चिंताक्रांत झालें. मोंग-लाशीं सख्य केल्यापासून आपला काय काय फायदा झाला याविषयीं तो विचार करूं लागला. तेव्हां त्यास असें दिसून आलें कीं, नफा होण्याऐ-वजीं आपला मुलूख लुटला गेल्यामुळें आपली नुकसानी मात्र पुष्कळ झाली आहे. त्यांत त्याच्या व इतर मराठे सरदारांच्या मनास विशेष लाग-ण्यासारखी गोष्ट ही होती कीं, पुणें जाळल्यापासून मोंगलास व त्याचा दिवाण विठ्ठल सुंदर यास आपण कृतकृत्य झालोंसें वाटूं लागलें होतें व ते आतां त्यांची पूर्वींप्रमाणें विचारपूस करीनासे झाले होते! मोंगलाच्या साहाय्यानें पेशवाई बुडवून आपणच मराठी राज्याचे कर्ते मालक होऊं ही त्यास आतां आशा राहिली नव्हती. अशा स्थितींत होळकराकडून जेव्हां त्याजकडे समेट करून घेण्याविषयीं बोलणें सुरू झालें, तेव्हां त्यानें तें कांहीं शर्तींवर मान्य केलें. अलीकडे मोंगलापासून घेतलेल्या मुलखापैकीं बत्तीस लक्षांचा मुलूख आपणास मिळावा व आपणाबरोबर इतर मराठे सरदारांचीही समजूत करावी. या त्याच्या शर्ती होत्या, त्या श्रीमंतांनीं कबूल केल्या. नंतर भोंसल्यानें सांगून पाठविलें कीं, तुम्हीं मोंगलांच्या

पाठीमागें पंचवीस कोसांवर यावें म्हणजे मी कांहीं तरी निमित्तानें रुसून मोंगलापासून दूर राहतों. नंतर तुम्हीं त्याजवर दौड करून यावें व त्याचा संहार करावा.

बाकीच्या सरदारांकडे हें समेटाचें बोलणें निरनिराळ्या द्वारांनीं सुरू होऊन ते निघून येण्यास कबूल झाले होते. भवानराव प्रतिनिधीकडे त्याची जहागीर श्रीमंतांनीं पुनः कायम केली. दादासाहेबांनीं आपला पुत्र भास्करराव यास प्रतिनिधि केलें होतें. पण तो वारल्यामुळें प्रतिनिधीचें पद पुनः ज्याचें त्यास देण्यास कांहीं कोणाची हरकत नव्हती. प्रतिनिधीची मुतालिकी ही नारो शंकराकडून निघून गमाजीबावास पूर्ववत् मिळाली. चिंतोपंत रायरीकराची फडणिशी दूर होऊन ती पुनः बाबूराव फडणिसांच्या घराण्याकडे पूर्वीप्रमाणें चालवावयाचें दादासाहेबांनीं कबूल केलें. नरसिंगराव घायगुडे व पिराजी नाईक निंबाळकर यांचीही समजूत झाली. या एकंदर समजुतीच्या प्रकरणीं होळकर प्रमुखपणानें बोलत होता व श्रीमंतांनीं कबूल केलेल्या गोष्टी पूर्णपणें अमलांत येतील याविषयीं त्यानेंच हमी घेतली होती. पटवर्धनांसही त्याची हमी मिळाली होतीच. तथापि त्याशिवाय त्यांनीं विठ्ठल शिवदेव विंचूरकर व नारो शंकर या दोघांस पेशव्यांच्या तर्फे जामीन होण्यास सांगितलें त्याप्रमाणें ते झाले.

इतकें होईतों पावसाळ्यास सुरुवात होऊन आषाढ महिना अर्धा होऊन गेला. त्या अवधींत मोंगलाईंत लुटीकरितां जिकडे तिकडे पांगलेली मराठी फौज देशीं जाण्याच्या निमित्तानें एकत्र झाली. मोंगलाचा भाऊ व अदवानीचा जहागिरदार बसालतजंग याजकडे होळकरानें फितुराचें सूत्र लाविलें होतें. गंगोबा तात्या बसालतजंगाकडे त्यास श्रीमंतांचे भेटीस घेऊन येण्याकरितां गेले होते. तें राजकारण सिद्ध होऊन बसालतजंगाची व श्रीमंतांची पंचमहालांत चितापूर येथें भेट झाली व जरूर पडेल तर बसालतजंगानें श्रीमंतांचे कुमकेस यावें, मोंगलाची कुमक करूं नये, याप्रमाणें करार होऊन तो निरोप घेऊन गेला. पर्जन्याचे दिवस मुलुखगिरीचे नव्हत. त्या दिवसांत फौजेस विश्रांति मिळावयाची व ती दसऱ्यानंतर पुनः जमावयाची; हा प्रघात प्राचीनकाळापासून चालत आला आहे.

त्यांस अनुसरून श्रीमंतांनीं बऱ्याच सैन्यास निरोप दिला. सुमारें वीस पासून पंचवीस हजारपर्यंत सैन्य मात्र त्यांजवळ राहिलें होतें. मोंगल छावणीकरितां बेदरास येणार हें ऐकून त्यांनींही अहमदनगरास जाऊन दोन महिने विश्रांति घेऊन घोडीं माणसें ताजीं तवानीं करून सारी फौज पुनः गोळा करून मोंगलावर स्वारी करावी असा मनसबा ठरविला व नगरच्या रोखें पंचमहालांतून कूच केलें. इतक्यांत मोंगलास काय वाटलें असेल तें असो, त्यानें बेदरचा रोख सोडून औरंगाबादेचा रस्ता धरिला. श्रीमंतांच्या फौजेस निरोप होत आहेसें पाहून त्यानेंही आपल्या फौजेस रजा देण्याची सुरवात केली. पटवर्धन मंडळी, पिराजीनाईक निंबाळकर, नरसिंगराव घायगुडे व बाबूराव फडणीस मोंगलाचा निरोप घेऊन व दसरा झाल्याबरोबर आणखी फौज घेऊन येतों अशी त्यास थाप देऊन मंगळवेढ्याकडे यावयास निघाले.

मोंगल औरंगाबादेस जात आहे, हा गोदावरी उतरूं लागला नाहीं तोंच यास सत्वर येऊन गांठावें, याप्रमाणें जानोजी भोंसल्याचा इशारा येतांच श्रीमंत नगरचा रोख सोडून बिडाकडे जलदीजलदीनें आले व त्या शहरापासून त्यांनीं एक लक्ष बारा हजार रुपये खंडणी घेतली. मोंगलाचे पिछाडीपासून ते एक दोन मजलींचे अंतरावर येऊन ठेपले हें वर्तमान येतांच जानोजी भोंसले व भवानराव प्रतिनिधि व गमाजीबावा हे पूर्वसंकेताप्रमाणें मोंगलावर रुसून त्याचें लष्कर सोडून गोदावरीच्या तीरातीरानेंच पूर्वेस दहाबारा कोसपर्यंत दूर गेले.

मोंगलानें पुणें जाळल्याबद्दल दादासाहेब अत्यंत संतप्त झाले होते. त्यांस गेल्या दोन तीन महिन्यांत मोंगलावर सूड कसा घ्यावयास सांपडेल या विचारापलीकडे दुसरें कांहीं दिसत न हतें. त्यांचा लढाईचा आवेश आंवरतां आंवरतां होळकरास व सखारामबापूस पुरे पुरे झालें होतें. त्यांची ती हौस तृप्त होण्याचा समय जवळ येऊन ठेपला. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, शत्रूची फौज लढाईच्या निश्चयानें समीप आलेली पाहून मोंगल अगदीं हारला. मग भोंसले वगैरे सरदारांनीं त्यास दगा दिल्याचें दिसून आल्यामुळें त्याच्या मनाची अशी दैना झाली कीं काय नकळे! खरें

पाहिलें तर त्याचें सैन्य, फितुरी मराठे सरदार गेल्यावरही श्रीमंतांचे सैन्या-इतकें होतें. किंबहुना तोफा व गारदी यांची जय्यत तयारी असल्यामुळें तो आपल्या शत्रूपेक्षां अधिक सामर्थ्यवान् होता. असें असतां पलायनावांचून त्यास तरणोपाय दिसला नाहीं! तो गोदावरी तीरीं राक्षसभुवन येथें गेला व नदीस पूर आलेला असतांही अर्धी फौज, बहुतेक तोफा, बुणगें, बाजार यांसह नावांवरून जलदीजलदीनें पार झाला. मागें दक्षिण तीरास बाकीची फौज घेऊन विठ्ठल सुंदर राहिला.

श्रीमंत जलदीजलदीनें कूच करून राक्षसभुवनापासून आठ कोसांवर आषाढ वद्य अमावास्येच्या दिवशीं आले, तों मोंगल गोदापार झाल्याची बातमी आली. विठ्ठल सुंदर याच्या सैन्याचा तपास आणवितां त्यांस असें कळलें कीं, आठ दहा तोफा, पांच सात हजार गारदी व दहापासून पंधरा हजारपर्यंत निवडक स्वार इतकें तें सैन्य असून त्यांत खुद्द विठ्ठल सुंदर, राजे विनायकदास, राजे गोपाळसिंग, नबाब इस्मायलखान इलिचपुरकर, उदाजी पवार, मालोजी घोरपडे, मुरादखान, जोत्याजी घाटगे वगैरे सरदार आहेत. जलदी करून युद्धप्रसंग केल्यास बरें, नाहींतर हेंही सैन्य गोदापार होऊं पहात आहे, असें कळतांच युद्धाचा निश्चय होऊन मध्यरात्रीं श्रीमंतांचें सैन्य तयार झालें व आठ कोसांची मजल करून श्रावण शुद्ध प्रतिपदेस सूर्योदयानंतर मोंगलाच्या सैन्याशीं त्यानें गांठ घातली. आबा पुरंदरे व हुजूर पागेचे सरदार अघाडीस होते, त्यांजवर मोंगलाच्या फौजेनें तोफा सुरू केल्या, तों त्याच्या लष्करांत दारूखान्यास आग लागून घोटाळा झाला. त्या संधींत आबा पुरंदरे व विठ्ठल शिवदेव विंचूरकर यानीं वेगानें हल्ला केला व शत्रूच्या अघाडीस मोर्चा होता तो उधळून आंत प्रवेश केला,

१० आगष्ट.

तों मागून खुद्द दादासाहेबही सैन्याची एक टोळी घेऊन मारामार करीत आंत शिरले. त्यावेळीं मोठ्या निकरानें युद्ध होऊं लागलें व त्यांत मराठ्यांची सरशी होण्याचा रंग दिसूं लागला. इतक्यांत विठ्ठल सुंदर यानें आपल्या फौजेंतील निवडक लोकांनिशीं आवेशानें हल्ले करून पुरंदरे व विंचूरकर यांस मोठ्या शर्थीनें हुसकून लाविलें. नंतर सारें मोंगलाचें सैन्य

मध्यभागीं सांपडलेल्या दादासाहेबांवर चोंहोंकडून तुटून पडलें. त्या प्रसंगीं दादासाहेबांनीं बहुत पराक्रम करून कांहीं वेळ आपला बचाव केला. परंतु शेवटीं ते शत्रूच्या हातीं लागण्याचा अजमास दिसूं लागला व मराठी सैन्यांत चोंहोंकडे हाहाकार उडून गेला. अशा या आणीबाणीच्या वेळीं पेशव्यांनीं दादासाहेबांकडे कुमक पाठवून त्यांस शत्रूच्या परिघांतून सोडवून आणिलें. नंतर पुनः दादासाहेब व होळकर वगैरे सरदार यांनीं सैन्याच्या निरनिराळ्या टोळ्या करून शत्रूवर एकाच वेळीं चोंहोंकडून हल्ल्यांवर हल्ले केले. सर्व समरांगणावर पेशव्यांची दृष्टि असे. जेथें उणें पडेल तेथें तें भरून काढण्यासाठीं ते वेळोवेळीं कुमक पाठवीत. प्रत्येक टोळीच्या पाठीवर उभें राहून तीस उत्तेजन द्यावें व जो पराक्रम करील त्यास तत्काल बक्षीस द्यावें, याप्रमाणें करीत आपल्या फौजेंतून ते सारखे हिंडत होते. असा ज्या फौजेचा धनी, व दादासाहेब, मल्हारराव होळकर, दमाजी गायकवाड, विठ्ठलराव विंचूरकर यांसारखे शेंकडों युद्धांत विजयश्री संपादन केलेले योद्धे जीचे अग्रणी, त्या फौजेस यश आलें यांत नवल तें काय! विठ्ठल सुंदर आपल्या सैन्यास मोठ्या अकलेनें व शौर्यानें झुजवीत असतांही त्याचा पूर्ण पराजय होऊन तो मारला गेला. विनायकदास व गोपाळसिंग हेही पडले. पांच हजार पठाणांची टोळी दोन प्रहरपर्यंत मराठ्यांचे हल्ले शर्थीनें परत हटवीत होती, ती शेवटीं सर्वच जागच्याजागीं कापली गेली. बहुतेक फौजेचा संहारच झाला म्हणावयास हरकत नाहीं; कारण फारच थोड्या लोकांस पळून जातां आलें. शत्रूच्या तोफा, हत्ती, घोडे, डेरे राहुट्या वगैरे सर्व लुटलें गेलें. मुरादखान, बाजीराव पाटणकर, उदाजी पवार, बापूराव जंगी, अजमखान इचलकरंजीकर, महमद गाजेखान, मालोजी घोरपडे इत्यादि बेवीस सरदार जखमी होऊन कैद झाले. मोंगल उत्तर तीरास होता त्यानें प्रथम तिकडून मराठ्यांवर तोफा सुरू केल्या होत्या, परंतु त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. दक्षिण तीरीं आपल्या सैन्याचा नाश होत असलेला त्यास निमूटपणें पाहात बसणें भाग पडलें. सायंकाळपर्यंत त्यानें कसा तरी दम काढिला, पण रात्र पडतांच तोफा व डेरे वगैरे जड सामान तळावर जागच्याजागींच टाकून तो औरंगाबादेस पळून गेला!

राक्षसभुवनच्या लढाईसंबंधानें, पे.ले, संग्रहांत नं०. ३३३पासून एकंदर दहा पत्रें छापिलीं आहेत. नं० ३३३ चें पत्र लढाई झाल्याबरोबर लिहिलें आहे. त्यांत-मोंगलाच्या फौजेचा पराजय झाला व आमची फत्ते झाली इतकाच मजकूर आहे व नं०, ३३४ ची यादी त्याच वेळीं लिहिलेली आहे तींत तीन सरदार मोंगलाचे मारिले व तीन धरून आणिले एवढाच तपशील आहे. यावरून हें पत्र व यादी पेशव्यानीं लिहिली त्यावेळीं पाठलागास गुंतलेली त्यांची फौज अद्यापि गोटास परत आलेली नव्हती व लढाईचे परिणाम काय काय झाले याची इत्थंभूत हकीगत त्या वेळीं त्यांस कळली नव्हती व तशी ती त्यांस कळण्याचा मार्गही नव्हता. नंतरचीं पत्रें कांहीं दुसरे व तिसरे व चवथे दिवशीं व त्यानंतरचीं लिहिलेलीं आहेत. त्यांत मुख्य मुख्य गोष्टी जरी त्याच लिहिलेल्या आहेत तरी बारीक सारीक हकीगत प्रत्येक पत्रांत कांहीं तरी नवीन आहेच. सर्व पत्रांतून एकंदर इत्यर्थ निघतो तो हा—बाजार बुणग्यासह निजामअली गोदावरी उतरून गेल्यानंतर मागें दक्षिणतीरीं दहा पंधरा हजार फौज व गारदी व तोफखाना घेऊन विठ्ठल सुंदर राहिला होता त्यावर पेशव्यांचें सैन्य येऊन पडलें. चार सहा घटका निकराचें युद्ध होऊन मोंगलाचा मोड झाला. विठ्ठल सुंदर, विनायकदास व खंदारचा राजा हे मारले गेले व उदाजी पवार, जोत्याजी घाटगे, मालोजी घोरपडे, बाबूराव जंगी, माधवराव व रघुपतराव पिंगळे, बाबूराव जाधव, दहाजी सुपेकर, जयापा जाधव, बाजीराव पाटणकर, शिवराव पवार, हणमंतराव निंबाळकराचा पुत्र, मुरादखान, अजमखान पठाण अलजपूरकर, महमद गाजेखान, मीरमुस्साखान हे सोळा सरदार पाडाव सांपडले. शिवाय मोंगलाच्या कमींत कमी वीस तोफा व पंधरा हत्ती, घोडे, उंटें, बैल, डेरे राहुट्या वगैरे सर्व सामान मराठ्यांच्या हातीं सांपडलें. डफ् साहेबाच्या इतिहासांत मोंगलानीं मराठ्यांशीं दोन दिवसपर्यंत निकरानें टक्कर दिल्याचें लिहिलें आहे तें चूक आहे हें खुद पेशव्यांचीं पत्रें वाचिलीं असता कळून येईल. या लढाईचा शेवट प्रहर दोन प्रहरांत झाला असला पाहिजे, नं० ३३७ च्या पत्रांत तर चार सहा घटका मातबर लढाई झाल्याचें व लिहिलें आहे. पे. ले. 'संग्रहां'त या लढाईविषयींची माहिती आली

आहे तिजपेक्षां इतर ग्रंथांत कांहीं अधिक माहिती आली आहे, यास्तव त्या त्या ग्रंथांतून या खालीं उतारे दिले आहेत.

"मोंगलांची फौज औरंगाबादेकडे चालली असतां रघुनाथराव कांहीं मजली त्यांच्या पिछाडीवर आला. गोदावरीवर येतांच कांहीं फौजेनिशीं निजामअल्ली पार उतरून गेला व बाजार बुणगें पार होईतों त्यानें बाकीच्या फौजेसह दिवाण विठ्ठल सुंदर यास दक्षिणतीरीं ठेविलें. इतक्यांत दिवाणानें आपणास फौजेच्या खर्चाकरितां पैका द्यावयाचा तो पैका दिला नाहीं, असें मिष करून जानोजी भोंसले मोंगलाच्या लष्करांतून निघून कांहीं अंतरावर जाऊन उतरला. ती खूण पोंचतांच रघुनाथराव झपाट्यानें चाल करून मोंगलावर हल्ला करिता झाला. तेथें तुमुल युद्ध होऊन मोंगल बेसुमार मारले गेले व त्यांचा पूर्ण पराजय झाला. मारिले गेलेल्या सरदारांत विठ्ठल सुंदर होता. मोंगलांनीं दोन दिवसपर्यंत निकरानें युद्ध चालविलें होतें. प्रत्येक हल्ल्यांत रघुनाथराव पुढारी असे. एकदां तर तो शत्रूच्या फौजेंत एकटाच सांपडला होता. पण पुतण्याकडून कुमक येईपर्यंत तो निकरानें लढत होता व त्याचा सोबती सखाराम हरि हा त्याजवळ होता तोही शौर्यानें लढत होता, या मुळें त्याचा बचाव झाला. त्या तरुण (माधवराव) पेशव्यानें या युद्धांत स्वतः फार पराक्रम केला. त्यानें आपल्या चुलत्यास व हल्ल्याच्या निरनिराळ्या जागीं योग्य वेळीं जशी पाहिजे तशी कुमक केली यामुळें व त्याच्या शौर्यामुळें त्याची वाहवा विशेषच झाली. या युद्धांत दोहीं पक्षीं फार मोठें नुकसान झालें व असें सांगतात कीं, या प्रसंगीं मोंगलांचे दहा हजार लोक मारिले गेले. दमाजी गायकवाडाच्या हाताखालच्या एका टोळीपैकीं कोणी विठ्ठल सुंदर यास वार करून ठार मारिलें. परंतु मरण्यापूर्वीं त्यास गोळीची जखम त्याच्याच फौजेपैकीं कोणाच्या हातून चुकून झाली होती. त्याचा प्रतिस्पर्धी मुरादखान यानेंच कोणाकडून तरी त्यास जखमी करविलें असा त्याजवर आरोप आहे तो निर्मूल दिसतो. होळकराच्या फौजेंत भिल्लांची टोळी होती तिनें विठ्ठल सुंदराचें डोकें कापून तें भाल्यास टोंचून लष्करांतून मिरविलें."

ग्रांटडफचा इतिहास.

" चार घटका रात्र असतां जलदी करून नवाबाच्या फौजेचें कुच होऊन गंगा उतरून चालिले. रघुनाथराव दादासाहेब यांजकडून फौजेची तयारी जाहली. परंतु दादासाहेबांस नेम अर्घ्यप्रदानाचा, सबब विलंब लागला. इतक्यांत नवाबाकडून फौज तयार होऊन मुकाबल्यास आली. व विठल सुंदर राजेबहादर पिछाडीस, फौज गंगा आडून उतरून पलीकडे जावें तों त्यांचे अडचणीचे संधींत अघाडीस नबाब जातीनें होते त्यांजवर न जातां राजे बहादर याजवर काबूची वेळ पाहून दादासाहेब चाल करून आले. यांशीं गांठ पडली व लढाई राक्षसभुवनचे मुक्कामीं मातबर जाहली. दादासाहेबांकडील फौजेशीं जंग भारी होऊन शेवटीं राजेबहादर यांणीं हत्ती पळवून दादासाहेबांचे हत्तीस टक्कर दिली. सबब दादासाहेबांचा हत्ती कच्चा पडून माघारी पळाला. राजे बहादरांचे हत्तीनें दादासाहेबांचें हत्तीचें शेंपूट दांतांत धरून टकरा मारित चालला. हें पाहून मल्हारजी होळकर व फौज व महादजी नाईक निंबाळकर जमावानिशीं दरम्यान येऊन आपला हत्ती चालविला. जवामर्दी विशेष करून उभयतांचे हत्तीची लगट तोडिली. तेव्हां दादासाहेबांस फुरसत पडून लढाई मातबर झाली. शेवटीं महादाजी नाईक निंबाळकर यांचेकडील वकिलानीं (!) राजेबहादरांस गांठून मारिलें दोन्हीकडील हौदे एकदम खालीं जाहले. याजवरून नबाबानीं शिकस्त खाऊन पंतप्रधानांस यश आलें" —नागपूरकर भोंसल्यांची बखर.

" मोंगल व भोंसले राक्षसभुवनास गंगातीरीं गेले. श्रीमंत आषाढ वद्य पक्षीं मादलमोहीचे घांटावर येऊन पोंचले. दुसरे दिवशीं श्रावण शुद्ध प्रतिपदेस कूच होऊन मुकाबला व्हावा तों भोंसले व प्रतिनिधि मोरो बाबूराव (फडणीस) यांची राजकारणें येऊन ते निराळे राहिले. मोंगल रात्रीं गंगापार गेला. दिवाण विठ्ठल सुंदर फौजेसुद्धां ऐलतीरीं असतां सदाशिव रामचंद्र वगैरे त्याजवळ होते. तों सरकार फौज व उभयतां श्रीमंत चालून गेले. अघाडीस नीलकंठ महादेव व महिपतराव चिटणीस व महादजी शितोळे मांजरीकर व माधवराव नरसी हुजूर पागे व नारो कोन्हेर व दादो पोतनीस वडगांवकर गेले. तों नबाबाचे दारूस व बाणांस आग लागून बाण उडाले. त्या संधींत नीलकंठ महादेव यांजकडील हरी गोपाळ व विठ्ठल

शिवदेव यांजकडील फौजेनें तोंड लाविलें. तों श्रीमंत येऊन पोंचले. नीळकंठ महादेव वगैरे मोर्चा उधळून आंत गेले. मागाहून श्रीमंत रघुनाथ बाजीराव यांचा हौदा येतांच दरम्यान कमरग्यांत विठ्ठल सुंदर व विनायकदास व इस्मायलखान पठाण अलजपूरचा सुभा असे पांच हजार फौजेनिशीं हौद्यावर येऊन हौदा माघारा फिरविला. हौदा पुढें, मागें पठाणांची फौज चालली. सरकार फौजेचा मोड जाहला. तों ईश्वरी कौतुक—त्यांचे लोकांत बार सुटून तो विठ्ठल सुंदरास लागला. ते लोक उभे राहिले. पुढें मल्हारजी होळकर जंबुरे पसरून होता त्याची शिल्लक झाली. यामुळें विठ्ठल सुंदर सात अंबाऱ्या फौजसुद्धां उभा राहिला. श्रीमंतांचा हौदा निघाला. तों श्रीमंत माधवराव बल्लाळ प्रधान घोड्यावर होते ते एकीकडे उभे राहून विठ्ठल सुंदर याच्या अंबाऱ्या उभ्या राहिल्या होत्या त्यांजवर भले लोकांस पाठवून तंटा झुज घातलें. बाबूजी नाईक व महादजी गाइकवाड श्रीमंतांस पहात आले त्यांस त्यांजवर पाठविलें. तेव्हां श्रीमंतांजवळ भगवंतराव बारवकर व महादजी शितोळे व कृष्णाजीराव पारसनीस व नारो कोन्हेर व रंगो मल्हार व भिकाजी नाईक कोल्टकर असतां महादजी शितोळे यानीं ' सात अंबारींतील अंबारी मारितों ' ह्मणोन बोलले. तेव्हां करार— मांजरीगांव व हत्ती व दोनशें राउतांची सरदारी वांचून आल्यास द्यावी—हा करार श्रीमंतीं केला. तेव्हां महादजी शितोळे व नारो कोन्हेर व रंगो कोन्हेर व भिकाजी नाईक तसेंच झुजावर गेले. महादजी शितोळे यांणीं अंबारी मारिली. तिवर्गांनीं ( हत्ताच्या ) तटास भोंसकून माघारे आले. माधवराव नरसी पागे बहिरीचे शिंगीवर बसले असतां झिलींत सत्तावीस जखमा लागल्या आणि घोडी मेली. तटाचें झुज पडलें. नबाबानीं गंगेनलीकडून तोफांचा मार केला. तीन प्रहर दिवस आला. अकरा कोस मजल चालून येऊन लढाई होत असतां आभाळ येऊन पर्जन्य पडला. अंधकार जाहला. पठाणानीं घोड्यांच्या कुचा मारिल्या. भिजत उभे राहिले. तेव्हां माधवराव बल्लाळ प्रधान चालून आले. पठाण लुटून घेतले. विनायकदास ठार पडले. तीन कोस मुर्दे पडून रण जाहलें. तेव्हां विठ्ठल सुंदरास गोळी लागली होती. त्याचा मुर्दा हत्तीवरून लोटून दिला.

वें होळकराकडील गिलच्यानीं पाहिलें. धांवून येऊन गळा कापून भाल्या-वर घातलें. श्रीमंतांची शहाजणें वाजलीं. अस्मानी फत्ते झाली. सदाशिव रामचंद्र व शहाजी सुपेकर वगैरे घोड्यावर बसून गंगा पार गेले. कित्येक बुडाले. सरकारची फत्ते झाली. विठ्ठल सुंदर याचे अंबारींत बसून उभयतां श्रीमंत बसून गवेराई घोंडराईवर मुक्काम गेले. पर्जन्य उघडला. उष्ण पडलें. गंगेस पूर होता. बावीस उमराव अंबारीनिशीं धरिले. विठ्ठल सुंदर व पठाण व मराठी फौज तीस हजार बुडविली."

—पंतप्रधान यांची शकावली–मुंबई प्रत.

"राक्षसभुवनचे लढाईंत मोंगळ याची फौज खासा मोंगल व विठ्ठल सुंदर कारभारी व इकडून सरकारची फौज व श्रीमंत दादासाहेब व श्रीमंत माधवराव साहेब याप्रमाणें जे समयीं लढाईस प्रारंभ झाला ते समयीं तोफखाना इकडील व तिकडील सुरू जाहला. याप्रमाणें लढाई चालली. तिकडील मोंगलांचे कारभारी विठ्ठल सुंदर याणीं साडे तीनशे हौदे तिर-दाजीचे तयार करून तिरंदाजीचा मार केला. खासा निजामअली जनान-खान्यासुद्धां लढाई पासोन एक कोसावर होते अशी लढाई होत असतां विठ्ठल सुंदर याणीं तिरंदाजीच्या हौद्यांचे हत्ती आपल्या तोफखान्याच्या पुढें घातले. तें मोंगल याणीं दुर्बिणींतून पाहिले आणि बोलिले जे, लढाई बिघडली. आतां मोड होतो. असें म्हणून जनानखाना सांभाळून मागें सरों लागले. तो विठ्ठल सुंदर यवनी भाषेनें आपल्या लोकांस म्हणों लागले कीं, 'पहातां काय! पेशवे यांचा (दादासाहेबांचा) हत्ती असाच वळवा! असें म्हणतांच त्यांच्या फौजेनें श्रीमंतांच्या अंबारीवरच गर्दी केली. ते समयीं श्रीमंतांचे खवासखान्यांतील चवरीबारदार होता तो गोळी लागून उडाला. हें पहातांच दादासाहेब यांस धीर पुरेनासा होऊन बाबा महात यास बोलले कीं, हत्ती बसीव. त्याणें उत्तर केलें कीं, महाराज, हा हत्ती बसविण्याची वेळ नव्हे. जर हत्ती बसविला तर आतां लढाई बिघ-डेल. याप्रमाणें बोलतांच श्रीमंत पुढें सरोन त्याच्या गळ्यास धरून बोलले जे, अरे, मला मारितोस कीं काय! मी घोड्यावर बसणार. याप्रमाणें बोल-तांच फौजदार यांणीं हत्ती बसविला. तो गनीम याणीं येऊन हत्ती वेढिला.

इकडील फौज, हत्ती, बसवितांच, बेदिल जाहली. तों शत्रूनीं श्रीमंतांचा हत्ती वसाव वळिला, हें श्रीमंत माधवराव साहेब यानीं पाहिलें. ते दादासाहेबांच्या नजर कैदेंत होते. त्यांच्या रखवाळीस हुजरातचे मानकरी खासा पांचशें असामी होते ते सारे घोड्यावर बसून तयारच होते. त्यांस श्रीमंत रावसाहेब बोलले कीं, अहो पहातां काय! शत्रूनें दादासाहेबांचा हत्ती वाळिला आणि तुह्मी उगीच बसतां! तेव्हां मानकरी बोलले कीं, आमची चाकरी पहाणारा धनी कोण आहे! श्रीमंत बोलिले जे, मी धनी नव्हे कीं काय! तेव्हां मानकरी बोलिले कीं, आपण ज्यास हाटकून मारावयास सांगाल त्यास मारूं; परंतु जें मारूं तें स्वामीनीं बक्षीस द्यावें लागेल, ते समयीं श्रीमंतांनीं आज्ञा केली कीं, विठल सुंदर याचे हत्तीवरील महात भाल्यानें जाऊन मारावा. तेव्हां महादजी शितोळे बोलले कीं, दहा हजारांचा गांव व बसता हत्ती घेईन. तेव्हां श्रीमंतांनीं कबूल केलें. नंतर महादजी शितोळे यानीं घोड्यास पेड केली आणि शत्रूच्या फौजेंत शिरले. जाऊन विठ्ठल सुंदर याचा महात भाल्यानें ठार मारिला आणि येऊन श्रीमंतांस मुजरा केला. नंतर श्रीमंतांनीं अकली व मांजरी हे दहा हजारांचे गांव इनाम दिले ते अद्यापि शितोळे यांजकडे चालत आहेत."

—हरिवंशाची बखर.

या युद्धांत मराठ्यांस जें यश आलें तें पुष्कळ अंशीं खुद्द पेशव्यांच्या[1] शौर्याचें व मेहनतीचें फळ होय. त्यांचें शौर्य, धोरण, व्यवस्थितपणा व सर्व लोकांवर त्यांचें बसत चाललेलें वजन हीं यावेळीं उत्तम प्रकारें दृष्टोत्पत्तीस आलीं. दादासाहेब इतके अनुभवी व पराक्रमी असून तेही या उदयास येणाऱ्या तरुण सेनानायकापुढें फिके पडले. त्यांनीं प्रांजलपणानें गोपिकाबाईस लिहून कळविलें आहे कीं, "चिरंजीव रायानीं यंदा मेहनतींत व शिपाईगिरींत कमी केली नाहीं. आम्हापेक्षां अधिक जाहले. इतके दिवस त्यांनीं लढाई देखिली नव्हती. पहिली लढाई पाहिली, त्यांत सर्व प्रकारें तरतूद अधिक केली. ह्यांचा पुढें कर्तेपणाचा भरंवसा आम्हांस आला. सांप्रत कारभार चिरंजीवच करीत आहेत." दादासाहेबांनीं लिहिलें यांत

1. खुद्द पेशवे ज्यावर बसतात तो.

कांहीं खोटें नव्हतें. खरोखरच यावेळीं पेशव्यांच्या मर्जीप्रमाणें सखारामबापू कारभार चालवीत होता. कोणच्याही गोष्टींत दादासाहेबांच्या मनाचा कल कसा आहे इकडे लक्ष्य न देतां तो पेशव्यांची मात्र कृपा व विश्वास संपादन करण्यासाठीं अधिक अधिक झटत होता.

मोंगल औरंगाबादेस गेला. त्याचा पाठलाग करणें गोदावरीस पूर आलेला असल्यामुळें अशक्य झालें होतें. नदीचें पाणी ओसरून उतार होण्यास आठचार दिवसांचा अवकाश होता. तेथपर्यंत मराठ्यांचें लष्कर पैठणासमोर दक्षिणतीरीं राहिलें होतें. त्या अवधींत मराठे सरदार मोंगलाच्या सैन्यांतून यापूर्वींच निघून आले होते ते एक एक येऊन भेटले. शिराजी नाईक यापूर्वींच होळकराच्या विद्यमानें भेटला होता. जानोजी भोंसल्यास आणावयाकरितां सखारामबापू गेला होता. तोही आला. तेव्हां होळकरानें त्याची व श्रीमंतांची भेट करविली. भोंसल्याबरोबरच प्रतिनिधि व गमाजीबाबाही आले. पटवर्धन मंडळीस आणावयाकरितां नारो शंकर मंगळवेढ्यास आला होता. ते त्याच्याच विद्यमानें श्रावण शुद्ध चतुर्दशीचे दिवशीं पैठणचेच मुक्कामीं भेटले. आबा पुरंदरे व खुद्द दादासाहेब व रावसाहेब पेशवे व दुसरे लहानमोठे सरदार त्यांस सामोरे गेले होते. पटवर्धनांशीं आतां दादासाहेबांची वागणूक अगदीं निष्कपटपणाची होती. पण बाबूराव फडणिसाच्या घराण्याकडे पुनः फडणिशी देण्याचें पटवर्धनांस दादासाहेबांनीं वचन दिलें होतें तें पुरें करण्याविषयीं जेव्हां गोपाळरावानें आग्रह धरिला तेव्हां दादासाहेब व सखारामबापू ह्मणूं लागले कीं, फडणिशीच्या दरकाचें सर्व उत्पन्न आम्हीं सरकारांत घेऊं व त्यांस सालिना नक्त एक लक्ष रुपये देऊं. तेवढे घेऊन त्यांनीं पूर्वींप्रमाणें आपलें फडणिशीचें काम करीत जावें. शेवटीं गोपाळरावानें व खुद्द पेशव्यांनीं अगदीं नेट धरिला तेव्हां दोघांनींही आढेवेढे घेण्याचें सोडिलें. नंतर दादासाहेबांनीं नाना फडणिसांस बोलावून आणून फडणिशीचीं वस्त्रें दिलीं व 'खासें कलमदान व कीर्दीचा रुमाल' त्यांच्या हवालीं केला.

गोदावरीचें पाणी उतरूं लागतांच होळकर व भोंसले प्रथम पलीकडे उत्तर तीरास गेले. मागून तीन दिवसांत मराठ्यांचें सर्व लष्कर नदीपार

होऊन लागलेंच औरंगाबादेकडे चालूं झालें. मोंगल तोफा व डेरे वगैरे सामान टाकून पळाला होता, तें सर्व सामान मराठ्यांच्या आयतेंच हातीं लागलें. लष्करची अघाडी भोंसल्याकडे नेमिली होती. त्यानें एके दिवशीं श्रीमंतांस मेजवानी करून पुण्याहून लुटून नेलेल्या तोफा त्यांस नजर केल्या व अशीरगड त्यास द्यावयाचा करार होता त्या किल्ल्याबद्दलची मागणी त्यानें आपण होऊन सोडून दिली.

मुरादखान लढाईंत पाडाव होऊन मराठ्यांकडे सांपडला होता, त्यासच त्यांनीं मोंगलाकडे तहाचें बोलणें ठरविण्याकरितां पाठविलें होतें व त्याबरोबर मोंगलास असाही निरोप पाठविला होता कीं, एक कोटी दहा लक्ष रुपये उत्पन्नाचें राज्य व खंदार, अंतूर व आवसें हे तीन किल्ले तुम्हीं आम्हांस द्याल तर तह होईल. या मागण्या जबर आहेत, हें मुरादखानानें निघतेसमयींच सांगितलें होतें व मोंगलानेंही त्याचप्रमाणें इतकें राज्य व किल्ले आपण देणार नाहीं, असें साफ उत्तर दिलें. त्यानें दहा हजार फौज जमा केली होती व आणखीही नवी फौज तो चाकरीस ठेवीतच होता. याप्रमाणें त्यानें लढाई देण्याचा आव घातला होता परंतु तो आंतून फार घाबरला होता. तो पेशव्यांच्या वकिलाजवळ हिंमतीच्या गोष्टी सांगे, पण केव्हां केव्हां असेंही बोलून दाखवी की, पेशव्यांनीं यावेळीं मजवर मेहरनजर केली तर मीही पुढें त्यांच्या उपयोगी पडेन!

मराठ्यांचें लष्कर औरंगाबादेस आल्याबरोबर त्यानें तटबंदीवर हल्ला केला पण यावेळीं शहरवाल्यांनीं मर्दुमीनें लढून हल्ला माघारा फिरविला. नंतर असें एकाएकीं हें शहर हातीं येण्याजोगें नाहीं हें समजून मराठ्यांनीं शहरास वेढा देऊन मोर्चेबंदी केली व तोफांनीं तटाची भिंत पाडावयाचा उद्योग सुरू केला. त्यांच्या या मेहनतीस सध्यां तरी यश येण्याचा संभव फारच कमी होता. मराठे शिलेदार म्हटले म्हणजे अर्धे शेतकरी व अर्धे शिपाई. आठ महिनेपर्यंत ते आपल्या सरदारांमागून रामेश्वरापासून हिमालयापर्यंत पाहिजे त्या मुलखांत जावयाचे, पण पावसाळा आला म्हणजे ते कोणाचे कोण नव्हत! ते आपली शेतीभाती करण्यासाठीं व चार महिने आपल्या मुलीमाणसांत स्वस्थपणानें विश्रांति घेण्यासाठीं घरोघर निघून

यावयाचेंच. त्यांतून यंदा तर मोंगलानें देशीं येऊन दंगा केलेला असल्या-
सप्टेंबर } मुळें प्रांतचे प्रांत उध्वस्त झाले होते व लाखों शिलेदारांचीं कुटुंबें निराश्रित होऊन उपाशीं मरत होतीं. यामुळें शिले-
दारांच्या झुंडी सरदारांच्या हुकुमाची वाट न पाहतां मृगशीतळाईच्या आधींपासूनच देशाकडे दररोज निघून चालल्या होत्या. राक्षसभुवनचे लढाईपर्यंत सरदारांनीं कसें तरी करून वीस हजारपर्यंत फौज थांबवून धरिली होती; तींतूनही कमी होतां होतां आतां सारे चवदा हजार लोक राहिले होते. यांत भोंसल्याच्या फौजेची नवीन भर पडली होती तिचीही गणती झाली. याप्रमाणें कमी झालेल्या फौजेची पुनः पन्नास साठ हजार पर्यंत संख्या वाढण्यास निदान तीन महिने अवकाश होता. कर्नाटक हैदरअल्लीनें पूर्ण ग्रासिलें होतें, त्याचें पारिपत्य करण्याकरितां त्यावर स्वारी करावयाचें आतां मराठ्यांस भाग पडलें होतें, परंतु मोंगलाशीं तह झाल्या-खेरीज हैदरावर स्वारी होण्याचा संभवच नव्हता. सध्यां आपली फौज कमी झाली असल्यामुळें औरंगाबाद आपणास घेववणार नाहीं व हैदर-अल्लीवर स्वारी करावयाची तिच्या तयारीसाठीं आपणास फुरसत मिळाली पाहिजे, ती मोंगलाशीं तह झाल्याखेरीज मिळणार नाहीं; तेव्हां आतां कसेंही करून तह ठरवून घ्यावा. असा पेशव्यानीं निश्चय केला मोंगलही तहाविषयीं आतुरच होता. उभय पक्षीं अशी स्थिति असल्यामुळें तह तत्काळ व्हावयाचा. परंतु मोंगलाच्या तर्फे मुरादखान व पेशव्यांच्या तर्फे कृष्णराव बल्लाळ व गंगाधर यशवंत चंद्रचूड हे वकील होते त्यांच्या कावे-बाजपणामुळें तहाचें घोंगडें आणखी महिनापंधरा दिवस भिजत पडलें. पेशव्यांच्या वकिलांस मोंगलाकडून कांहीं इनाम उपटावयाचें होतें व मुरा-दखान तर पेशव्यांच्या द्रव्यानें पूर्वीपासूनच लांचावलेला होता. या तिघांनीं मिळून एकदां या व एकदां त्या पक्षास चढी देऊन तहाचा निकाल कांहीं दिवस लांबविला. शेवटीं एकदांचा तह ठरला. त्यांत मोंगलानें मराठ्यांस ब्यायशीं लक्षांची जहागीर देण्याचा करार झाला. उदगीरच्या तहांत मोंगलाकडून मिळालेली बासष्ट लक्षांची जहागीर नानासाहेब पेशवे परंतु पावल्यानंतर आजपर्यंत त्यानें बहुतेक परत हिसकून घेतली होती.

ती सर्व परत मिळावी इतकेंच नाहीं, तर आणखी अठेचाळीस लक्षांची जहागीर [ एकंदर एक कोटि दहा लक्षांची ] आपणांस मोंगलानें द्यावी हें मराठ्यांचें प्रथमचें मागणें होतें. त्यापैकीं आतांच्या तहांत बासष्ट लक्षांची त्यांची त्यांस परत मिळाली व नवीन सारी वीस लक्षांची मिळाली. तह झाल्यावर मराठ्यांचें लष्कर भाद्रपद वद्यांत परत फिरलें. कबूल केल्याप्रमाणें बत्तीस लक्ष उत्पन्नाच्या जहागिरीच्या सनदा देऊन जानोजी भोंसल्यास श्रीमंतांनीं निरोप दिला. महादजी शिंदे वऱ्हाडवर स्वारी करण्यासाठीं निघाला होता हें पूर्वीं लिहिलेंच आहे. भोंसल्याचा व आमचा आतां समेट झाला असल्यामुळें त्याच्या राज्यावर स्वारी करण्याचें कारण राहिलें नाहीं. तुम्हीं जलदीनें दक्षिणेंत निघून यावें, म्हणजे सरकारची मोंगलाशीं लढाई होणार आहे तींत तुमचा फार उपयोग होईल; अशी पेशव्यांची त्यास ताकीद गेल्यामुळें तो दरमजल कूच करीत सहा हजार फौजेनिशीं समीप येऊन ठेपला होता. दादासाहेब आपणाकडून सरदारी काढून दुसऱ्या कोणास देणार आहेत, अशी वार्ता या सुमारास त्याच्या कानीं पडल्यामुळें त्यानें पेशव्यांस निरोप पाठविला कीं, माझ्या सरदारींत कांहीं घालमेल करण्याचा सरकारचा विचार आहे म्हणून ऐकण्यांत येत आहे; तसें असल्यास आपण भेटीस येत नाहीं. आल्या वाटेनें असेच हिंदुस्थानांत परत जातों. शिंद्याच्या सरदारी प्रकरणीं दादासाहेबांची कांहीं अशा तऱ्हेची मसलत असली तरी पेशव्यांस ती पसंत पडण्यासारखी नव्हती. ते आतां -लकाच्या नात्यानें स्वतंत्र वागूं लागले होते व महादजी शिंद्याविषयीं त्यांचा नेहमीं अनुकूल ग्रह असे. त्यांनीं तत्काल कृष्णराव बल्लाळ याजबरोबर बेलभंडार व शपथपत्र देऊन त्यास शिंद्याकडे पाठविलें व तुमची सरदारी तुम्हांकडेच सरकारांतून कायम राखिली जाईल असा निरोप पाठविला. नंतर शिंदे भेटीस आले, तेव्हां श्रीमंतांनीं त्याचा यथायोग्य मान, सन्मान व गौरव केला.

गेल्या वर्षीं याच दिवसांत पेशवाईची दिवाणगिरी आपल्या हातीं यावी म्हणून सखारामबापूनें दादासाहेबांस चिथावून दिलें होतें व फौज जमा करण्याकरितां विंचूरकर व नारो शंकर यांस ते मागतील तितका

मुलूख जहागीर दिला होता. शिवाय या स्वारींत होळकरास हीं तीस पसतीस लक्षांचा मुलूख द्यावा लागला होता. एकंदर गेल्या आश्विन पासून या आश्विनापर्यंत भोंसले, होळकर, विंचूरकर, नारो शंकर व इतर लहानसान सरदार यांस एकंदर एक कोटीवर उत्पन्नाचा खुद्द पेशव्यांच्या अंमलाखालचा मुलूख जहागीर म्हणून तोडून द्यावा लागला होता व त्यामुळें त्यांचें सामर्थ्यही अर्थात् कमी झालें होतें. हे सारे खेळ सखारामबापूच्या लोभी स्वभावाचे! त्यानें जर दिवाणगिरीची हांव धरिली नसती तर चुलते पुतण्यांत युद्ध कां होतें? पटवर्धन वगैरे सरदारांवर जर त्यानें करडी नजर केली नसती तर तें मोंगलाकडे कशास केले असते? व पुढें मोंगलांचें अरिष्ट राज्यावर येऊन आदळलें तेव्हां तें निवारण करण्यासाठीं सरदारांच्या मनधरण्या कशास कराव्या लागल्या? कोट्यवधि बिचारी अनाथ रयत धुळीस कां मिळती? हें साऱ्या अपेशाचें खापर साडेतीन शहाण्यांत वरिष्ट गणिलेल्या सखारामबापूच्या माथीं फोडणें अगदीं न्याय्य आहे!

असो, केलेलें कर्म शक्य तितकें निस्तरावें व त्या योगानें पेशवे व गोपिकाबाई यांची मर्जी सुप्रसन्न करावी ही वांछा सखारामबापूच्या मनांत अलीकडे उत्पन्न झाली होती. भोंसल्याकडे मुलूख गेला तो गेलाच. पण होळकर, विंचूरकर व नारो शंकर यांस नवीन दिलेल्या जहागिरीपैकीं चौथाई सरकारांत परत घ्यावी, ही त्यानें मसलत केली. तो सांगेल त्याप्रमाणें वागण्यास दादासाहेब केव्हांही तयार असत, आणि पेशव्यांसही बापूची मसलत इष्टच होती, याप्रमाणें दरबारचें एकमत्य झाल्यावर त्याप्रमाणें त्यांनीं सरदाराजवळ गोष्ट काढिली, तेव्हां होळकर बिथरून दळ हालवून निघून जाऊं लागला. त्याची समजुत करितां करितां पेशवे व त्यांचे दिवाण यांस पुरे पुरेसें झालें. विंचूरकर व नारो शंकर यांवर तर हा केवळ जुल्मच होता. गतवर्षीं सखारामबापूस जरूर लागली, तेव्हां त्यानें या दोघांच्या हातां पायां पडून त्यांजकडून पंचवीस हजार फौजेची उभारणी करविली. ही फौज जमा करण्यास त्यांस सावकारांकडून अपरंपार कर्ज काढावें लागलें. त्या कर्जास तारण सरकारांतून नवीन मिळालेली

जहागीर; तिजपैकीं चौथाई परत दिल्यावर कर्ज फेडणें त्यांस किती अवघड होतें! त्यांनीं व होळकरानें फारच गवगवा केला. कायगांवचे मुक्कामीं सहा दिवस हाच घोळ पडला होता. शेवटीं तिघांत जड प्रकरण होळकर आजोबा याची कबुली झाल्यावर विंचूरकर व नारो शंकरही कबूल झाले. बाबूजी नाईक बारामतीकरही याच सुमारास कांहीं जहागिरीच्याच प्रकरणीं पेशव्यांवर रुसून लष्करांतून निघून गेला. त्याची समजूत कशी काय झाली, किंवा झालीच नाहीं याचा उल्लेख आम्हांस सांपडला नाहीं.

पटवर्धनं येऊन भेटल्याबरोबर त्यांचा चोवीस लक्षांचा सरंजाम व मिरजेचा किल्ला त्यांस परत मिळावयाचा, पण दादासाहेबांनीं व सखारामबापूनें त्यांच्या कामांत आडेवेढे घेण्याचें व अडचणी उत्पन्न करण्याचें अद्यापि सोडून दिलें नव्हतें! परंतु गोपाळरावानें आपला तापटपणा यावेळीं टाकून दिला होता. सबुरी-सबुरीनें वागून आपलें काम करून घेण्याकडे त्याचें लक्ष्य होतें. त्यामुळें त्यास मिरजेची सनद पुनः मिळाली व तीबरोबरच पुणतांबें, अष्टें, तासगांव, शहापूर, बागेवाडी, संपगांव, जमखिंडी, यादवाड, हुबळी नवलगुंद, बंकापूर, लक्ष्मेश्वर इत्यादि महाल व ठाणीं यांच्याही सनदा त्यास पुनः मिळाल्या. जहागीर हातीं येते तों पटवर्धनांवर दुसरें अरिष्ट आलें. तें असें कीं, हैदरअल्लीनें तुंगभद्रेच्या आसपासच्या बंकापुर, नवलगुंद, हुबळी, लक्ष्मेश्वर वगैरे तालुक्यांत बलात्कारानें अंमल बसविला होता व मेघश्यामराव कृष्ण पटवर्धन याचा लढाईत पराजय करून त्यास कैद करून नेलें होतें! एकदां सनदा हातीं पडल्यावर दरबारच्या वेधांतून गोपाळराव मुक्त झाला व हैदराच्या ताब्यांत गेलेला आपला मुलूख व बंधु सोडवून घेण्यास काय उपाय करावे हा विचार करण्यास त्यास फुरसत मिळाली.

---

१ 'मोंगलांशीं लढाई' ही प्रस्तावना ऐ. ले. सं. भाग पहिला पृ. २७९-३०२ यांवर छापलेली आहे. राक्षसभुवनाच्या लढाईसंबंधें निरनिराळ्या ग्रंथांतील माहिती एकत्र जुळवून ती माहिती ऐ. ले. संग्रह भाग दुसरा पृ. ५७६-५८१ यांवर छापलेली आहे. सदर माहिती व मूळ प्रस्तावना यांचा या प्रकरणांत समावेश करण्यांत आला आहे.

पुण्याकडे परत येत असतां गायकवाड, होळकर, शिंदे, पटवर्धन, विंचूरकर, नारो शंकर, घायगुडे व इतर सरदार श्रीमंतांचा निरोप घेऊन आपापल्या ठिकाणांस निघून गेले व बाकीच्या फौजेसह श्रीमंत दादासाहेब व रावसाहेब आश्विन वद्यांत पुण्यांस दाखल झाले.

---

# प्रकरण तिसरें.

## हैदरअल्लीवर पहिली स्वारी.

### ( स. १७६४ जाने.–स. १७६५ जून अखेर )

पहिल्या प्रकरणांत हैदरअल्लीच्या दंग्यासंबंधानें थोडासा उल्लेख आलेला आहेच. चालू प्रकरणांतील मजकूर नीट समजण्याकरितां आणि त्यांतील व्यक्ति व स्थळें यांचे राजकीय दृष्टया पूर्वापरसंबंध कळण्याकरितां हैदराचा थोडासा पूर्ववृत्तांत व त्याचे मराठ्यांशीं आजपर्यंत वेळोवेळ कसे संबंध येत गेले हें आम्ही येथें संक्षेपानें नमूद करतों.

हैदर हा म्हैसूरकरांच्या पायदळांत एक नाईक होता. त्याचा आजा महंमदअल्ली व बाप फत्तेमहंमद व मामा इब्राईमसाहेब व थोरला भाऊ शहाबाज हे सर्व त्याच्यापूर्वी प्याद्यांचे नाईकच होते. म्हैसूरचा राजा चिक्क कृष्णराज हा अल्पवयी असल्यामुळें सर्व राज्यकारभार देवराज व नंदराज

---

१ के० तांबेहपांनीं "हैदरअल्लीवर पहिली स्वारी" या प्रकरणाचे दोन भाग केले होते. हे दोन्ही भाग ऐ. ले. सं. भाग दुसरा पृ० ६३५–७५८ यांवर छापलेले आहेत पहिला भाग सुमारें पाऊणशें पृष्ठांचा असून त्यांत कर्नाटक प्रांताचा इतिहास, शहाजी महाराजांपासून वेळोवेळ त्या प्रांतावर झालेल्या मराठ्यांच्या स्वाऱ्या, स. १७६४ पर्यंतचें हैदराचें चरित्र वगैरे मजकुराचा समावेश झालेला आहे. सबंध प्रकरण विविध माहितीनें भरलेलें आणि अत्यंत मनोरंजक आहे, परंतु त्यांतील मजकुराचा 'हैदरअल्लीवर पहिली स्वारी' या प्रकरणाशीं किंवा मराठी राज्याच्या उत्तरार्धाच्या इतिहासाशीं फारसा संबंध येत नाहीं. सबब हातीं घेतलेल्या विषयास उपयोगी पडेल एवढाच मजकूर आम्ही या पहिल्या भागापैकीं निराळा काढून तो या प्रकरणाच्या प्रारंभीं छापला आहे. दुसऱ्या भागांत (ऐ. ले. संग्रह भाग दुसरा पृ० ७०८–७५८ ) या स्वारीची सविस्तर हकीगत आली आहे. आणि तो भाग मात्र आम्ही जसाचा तसाच छापला आहे.

या दोघां भावांनीं आटोपिला होता. म्हैसूर राज्यांत त्यावेळीं सर्वाधिकारी प्रधान आणि दळवाई अशा तीन मंत्र्यांचें एक मंत्रीमंडळ असे. त्यांपैकीं सर्वाधिकारी हाच राजाचा मुख्य कारभारी असे. प्रधानाचें काम राजाजवळ राहून सल्लामसलत देण्याचें असे. आणि दळवाई हा सैन्यावरचा मुख्य अधिकारी असे. वडील भाऊ देवराज याजकडे सर्वाधिकाऱ्याचा मान होता. बाकीच्या दोन प्रधानांचीं कामें धाकटा नंदराज हा एकटाच पहात असे. या नंदराजाचा हैदरावर अतिशय लोभ होता. म्हैसूरकरांनीं केलेल्या प्रत्येक मोहिमेंत हैदराची स्वारी हजर असे. चोऱ्या, लुटालूट आणि खोटे हिशेब या साधनांचा बेमुर्वत उपयोग करून हैदरानें अमूप द्रव्य मिळविलें आणि त्या द्रव्याच्या जोरावर कवाइती पायदळ व जय्यत तोफखाना जवळ बाळगून तो म्हैसूरराज्यांत लवकरच एक अव्वल दर्जाचा सरदार होऊन बसला! नंदराजाचा हैदरावर इतका जबर विश्वास होता कीं, त्याजविरुद्ध कोणी कसलीही कागाळी नेली तरी तो तिकडे लक्षच देत नसे! सन १७५५ च्या सुमारास नंदराजानें हैदरास दिंदिगलचा सुभेदार नेमिलें.

स. १७५७ या सालीं नानासाहेब व भाऊसाहेब साठ हजार फौजेसह कर्नाटकच्या स्वारीस निघाले. तिकडे गेल्यावर त्यांस मुरारराव घोरपडे गुत्तीकर सहा हजार फौजेनिशीं येऊन मिळाला. त्या वर्षाच्या मार्च महिन्यांत त्यांनीं म्हैसूरच्या राजधानीस म्हणजे श्रीरंगपट्टणास शह दिला व नंदराजाजवळ खंडणीबद्दल ते बेसुमार पैका मागूं लागले. नंदराजानें खंडणी माफ होण्याबद्दल किंवा निदान थोडी रक्कम घेण्याबद्दल फार विनवणी केली. परंतु त्यांनीं तें कांहीं एक न ऐकतां श्रीरंगपट्टणास वेढा बसविला, आणि बातेऱ्या बांधून तीस तोफांचा मारा त्या शहरावर सुरू केला. नंदराजानेंही पुष्कळ हिंमतीनें टक्कर दिली. परंतु त्याचा कांहीं उपाय चालेनासा होऊन तें शहर काबीज होण्याच्या बेतास आलें. इतक्यांत एके दिवशीं असें झालें कीं, त्या शहरांत श्रीरंगाचें देवालय प्रसिद्ध आहे त्याच्या शिखरास बाहेरील तोफेचा गोळा लागून शिखर मोडलें, व त्याच-वेळीं बाहेरच्या बातेऱ्यांतही एक तोफ फुटून कित्येक गोलंदाज ठार झाले.

तेव्हां उभयपक्षीं हा अपशकून झाला असें समजण्यांत येऊन तहाचें बोलणें पुनः सुरू झालें. त्यांत बत्तीस लक्ष रु. खंडणी घेऊन वेढा उठविण्याचें मराठ्यांनीं कबूल केलें. नंदराजानें रोख कायतें पांच लक्ष रु. दिले. बाकी रकमेच्या फेडीकरितां त्यानें म्हैसुरराज्यापैकीं उत्तम सुपीक चौदा परगणे मराठ्यांकडे लावून दिले. त्या परगण्यांचीं नांवें-१ नागमंगल २ २ बेळूर. ३ किकेरी. ४ चेनरायपट्टण. ५ कडूर. ६ बाणावर. ७ यकनहळ्ळी. ८ होनवल्ली. ९ तुरुविकेरे. १० कंदीकेरे. ११ चिक्कनायकनहळ्ळी. १२ कडबा. १३ केसूर. १४ हुलियारदुर्ग या नांवें हीं पुस्तकांत पुनः पुनः यावयाचीं आहेत. असो, पेशव्यांनीं या चौदा परगण्यांत वसुलाकरितां कमाविसदार नेमून व त्यांच्या रक्षणाकरितां थोडीशी फौज ठेवून शिरें प्रांतावर स्वारी केली. शिरें, होसकोटें, बाळापूर, कोलार व बेंगरूळ हे परगणे एकमेकांस लगत असून ते शिवकालीन स्वराज्यापैकीं होते. अर्थात ते ताब्यांत घेणें श्रीमंतांस इष्टच होतें. कर्नाटकांत अर्काट, शिरें, कडपा, कर्नूळ व सावनूर येथील नवाब बरेच सामर्थ्यवान् होते. त्यापैकीं शिऱ्याच्या नवाबाचें राज्य अलीकडे अगदीं मोडकळीस आलें होतें व त्याचा बहुतेक भाग कडप्प्याच्या नवाबानें बळकाविला होता. या घराण्यांतील शेवटचा नवाब दिलावरखान मरण पावल्यावर त्याचा जांवई मीर फैजुल्लाखान तेथील गादीवर बसला होता. पेशव्यांनीं या शिरें प्रांतावर स्वारी करून सर्व राज्य खालसा केलें, तेव्हां या मीरफैजुल्लास निर्वाहाकरितां थोडीशी जहागीर लावून दिली. त्या प्रांतींच्या स्वराज्यापैकीं बेंगरूळ म्हैसूरकरांनीं घेतलें होतें व बाकीचीं ठाणीं व परगणे कडप्प्याच्या नवाबाच्या ताब्यांत होते. तो नवाब अलीकडे मराठ्यांशीं उन्मत्तपणानें वागत होता. इतर संस्थानिकांप्रमाणें त्यानें या स्वारींत खंडणी दिली नव्हती. त्या नवाबाचें पारिपत्य करणें, अर्काटच्या नवाबापासून खंडणी वसूल करणें. आणि तिकडील सर्व स्वराज्य ताब्यांत आणणें हीं तीन कामें फार जरूरीचीं होतीं, परंतु पावसाळा जवळ आल्यामुळें बरीच फौज कर्नाटकांत छावणीस ठेवून श्रीमंत परत आले. छावणीस ठेवलेल्या फौजेवर बळवंतराव मेहेंदळे हा मुख्य सरदार होता. पावसाळा सुरू झाल्यावर कडप्प्याच्या नवाबानें सावनूर व कर्नूल येथील पठाण नवाब, मुरार-

राव घोरपडे गुत्तीकर व त्या देशींचे चित्रदुर्गकर वगैरे पाळेगार यांशीं राजकारण लावून त्यांस आपणाकडे मिळवून घेतलें. मद्रासकर इंग्रजां-सही त्यानें आपल्या कुमकेस बोलाविलें. या सर्वांचा असा बेत होता कीं, मराठ्यांची फौज बुडवून त्यांच्या खंडणीचे जूं मानेवरून झुगारून द्यावें! परंतु जेव्हां बळवंतरावाची व कडप्याच्या नवाबाची लढाई जुंपली तेव्हां त्याच्या सोबत्यापैकीं कोणीच कुमकेस आलें नाहीं. शेवटीं त्या नवाबाचें व बळवंतरावाचें ता० २४ सप्टेंबर (१७५७) रोजीं कडपें शहराजवळ भयंकर युद्ध झालें. त्यांत मराठ्यांचा जय होऊन कडप्याचा नवाब मारला गेला व हजारों पठाणांची कत्तल उडाली. राजधानी कडपें शहर तत्काल मराठयांच्या हातीं लागलें तें त्यांनीं लुटून फस्त केलें. कडप्याचा नवाब मरण पावल्यावर त्याचा वारस अबदुल नबीखान म्हणून होता, तो जरी हिंमतीनें लढत होता, तरी त्याचें अर्धे राज्य मराठयांनीं घेतलेंच. यापूर्वीच अर्काटच्या नवाबाजवळ बळवंतरावानें खंडणीची मागणी केली होती. त्या प्रसंगीं त्या नवाबानें पुष्कळ आढेवेढे घेतले, व त्याचे साथी मद्रासकर इंग्रज यांनींही खंडणी माफ होण्याविषयीं फार खटपट केली. परंतु तें सारें निष्फळ होऊन शेवटीं अर्काटचा नवाब महंमदअल्ली यास साडेचार लक्ष रु. खंडणी द्यावी लागली.

नंदराजानें चौदा परगणे मराठ्यांच्या ताब्यांत दिले ही गोष्ट हैदरास बिलकूल पसंत पडली नाहीं. मराठे व कडपेंकर यांचें युद्ध जुंपलें आहे असें पाहून त्यानें नंदराजास मसलत दिली कीं, 'तूं मराठ्यांस खंडणी काय म्हणून दिलीस? मला जर दिंदिगलाहून बोलावून आणितास तर मी फौजेसह येऊन त्यांचा धुव्वा उडवून दिला असता! असो. झाली ती गोष्ट झाली. अजून तरी त्यांच्या ताब्यांत चौदा परगणे दिले आहत ते हिसकून घे. पुण्याहून मराठ्यांची फौज पावसाळा संपेपर्यंत कांहीं इकडे येत नाहीं. मेहेंदळे इकडे आहे तो कडपेंकरांशीं लढण्यांत गुंतला आहे. यावेळीं हें कार्य साधण्याजोगें आहे.' नंदराजास ही मसलत पसंत पडली, आणि त्यानें तत्काळ त्या परगण्यांतून मराठ्यांस हुसकून लावून तेथें बळजबरीनें आपला अंमल बसविला.

म्हैसूरकरांच्या आगळिकीबद्दल त्यांचें पारिपत्य करण्यास बळवंतराव मेहेंदळ्यास फुरसत सांपडली नाहीं. कारण पावसाळा संपेतों कडपेकराशीं झुंजण्यांत व त्याचें अर्धे राज्य ताब्यांत घेण्यांत त्याचा तो काळ निघून गेला. या सुमारास बिदनूर संस्थानांत झोटिंग बादशाही सुरू झाली होती. तें संस्थान पादाक्रांत करण्याचा नानासाहेब पेशव्यांचा फार दिवसांचा मनोदय होता, तो सिद्धीस नेण्याकरितां त्यांजकडून मेहेंदळ्यास हुकूम आला होता, तोही अमलांत आणणें त्याजकडून झालें नाहीं. या वेळीं महाराष्ट्रांत पेशव्यांनीं दोन फौजा तयार केल्या होत्या. एक दहा हजार लोकांची फौज विश्वासराव–पेशव्यांचा ज्येष्ठ पुत्र–व दत्ताजी शिंदे यांच्या हाताखालीं गोदावरीच्या तीरीं मोहिमेवर गुंतली होती. दुसरी तितकीच फौज गोपाळराव पटवर्धनांच्या हाताखालीं तयार होती. या दोहोंपैकीं एक फौज कर्नाटकांत जाऊन बळवंतरावास मिळावी, व नंतर त्यानें पावसाळा संपल्यावर म्हैसुरावर स्वारी करून नंदराजाचें पारिपत्य करावें, असा श्रीमंतांनीं संकेत ठरविला होता. परंतु मोंगलाईत याच वेळीं कांहीं राजकारण उपस्थित झाल्यामुळें कर्नाटकांत नवी फौज येण्याचें बाजूस राहून उलट मेहेंदळ्यासच कर्नाटकांतील सर्व कामें अर्धवट टाकून महाराष्ट्रांत परत यावें लागलें. यावेळीं जर म्हैसुरावर स्वारी होती, व बिदनूरची मसलत साधली असती तर हैदराचा अभ्युदय होण्याचा मुळींच संभव नव्हता. परंतु त्याचें दैव बलवत्तर असल्यामुळें तसा योग जमून आला नाहीं.

लवकरच मराठ्यांची आपणावर स्वारी होईल, व ते पूर्वी आपल्या ताब्यांत होते तितके परगणे परत घेतल्याशिवाय कधीं स्वस्थ बसावयाचे नाहींत, असें नंदराजास वाटलेंच होतें. त्याप्रमाणें स. १७५९ च्या प्रारंभीं मराठ्यांची फौज म्हैसुरावर पुनः चालून आली. या फौजेवर गोपाळराव पटवर्धन हा मुख्य सरदार होता. ही फौज येतांच तिनें आधीं चवदा परगण्यांत पुनः अंमल बसविला. नंतर ती आग्नेयीस सावंतीदुर्ग उजवें टाकून बेंगरुळावर चालून गेली. जातांच त्या शहरास तिनें वेढा घातला. याच फौजेपैकीं पायदळाची एक निवडक टोळी कोणास न कळत दाट जंगलां-

तून पश्चिमेकडे येऊन तिनें चेनापट्टणचा किल्ला अकस्मात् हल्ला करून घेतला. हा किल्ला पट्टणच्या पूर्वेस चाळीस मैलांवर आहे.

या मराठ्यांच्या परचक्राचें निवारण करण्याचें सामर्थ्य म्हैसूर दरबारांत त्यावेळीं हैदरास मात्र होतें, आणि त्यानेंही तें काम हौसेनें पत्करिलें. युद्ध सुरू करण्यापूर्वीं श्रीरंगपट्टणच्या पूर्वेस मादूर व मालवल्ली हे दोन किल्ले आहेत, त्यांचा प्रथम हैदरानें उत्तम बंदोबस्त केला. हे दोन्ही किल्ले बेंगरूळ व श्रीरंगपट्टण यांच्या वाटेवर आहेत. मादूरपासून चेनापट्टण फक्त तेरा मैल अंतरावर आहे. मादूरच्या किल्ल्यांत लतीफअल्ली बेग म्हणून एक शूर सरदार हैदरानें ठेविला होता. त्या लतीफानें चेनापट्टणचा किल्ला मराठ्यांपासून घेण्याची मसलत योजिली. शत्रूस नानाप्रकारच्या हुलकावण्या दाखवून एक रात्रीं हळूच चेनापट्टणास फौज नेऊन उजाडतां उजाडतां शिड्या लावून तो किल्ला त्यानें घेतला! चेनापट्टण काबीज होतांच हैदरानें आपलें सारें सैन्य तेथें गोळा केलें. शत्रूच्या मुलुखांत मोहीम करण्याची मराठ्यांची अशी तऱ्हा होती कीं, त्यांच्या सैन्याच्या लहान लहान टोळ्या साऱ्या प्रांतभर पसरत व लुटालूट आणि जाळपोळ एकदांच चोंहींकडे सुरू करून रहिवासी लोकांस व शत्रूच्या फौजेस अगदीं भेदरून सोडीत. त्यांची लढण्याची शिस्त अशा तऱ्हेची होती कीं, तिच्या योगानें कसलेही पराक्रमी व बलाढ्य शत्रु मैदानांत त्यांच्या तावडींत सांपडले म्हणजे बहुधां सुरक्षितपणें सुटत नसत. पण त्यांसही हैदरनाईक हा पक्का वस्ताद शत्रु भेटला! पुढें त्यांशीं त्याचे जे अनेक युद्धप्रसंग झाले, त्यांत त्यानें दाखविलेल्या कावेबाजपणाचा मासला या पहिल्याच प्रसंगीं गोपाळरावांच्या दृष्टीस पडला आणि त्यावरून त्याची तत्काळ खात्री झाली कीं, हा साधारण शत्रू नव्हे! जेथें घोडेस्वारांचा कांहीं इलाज चालण्याजोगा नाहीं, अशी अडचणीची जागा पाहून हैदर तेथें सैन्याचा तळ घाली, व त्या स्थळाभोंवतीं खंदक खणून व जागोजाग बातेऱ्या बांधून त्यांवर अव्वल तोफखाना तयार ठेवी. अशा या त्याच्या छावणीवर घोडेस्वारांचा एल्गार काय चालणार! या कामास पायदळ व तोफखाना पाहिजे. तो मराठे प्रत्येक स्वारींत बरोबर बाळगीत नसत.

आपण मैदानांत सांपडलों तर मराठे घोडेस्वार आपला फन्ना पाडतील हें हैदरास पक्कें माहीत होतें. सबब दिवसा तो आपली फौज मैदानांत मुळींच नेत नसे. रात्रीं मात्र लांबलांब मजली करून, आणि पायदळ व तोफखाना यांचा भरपूर सरंजाम बरोबर घेऊन, तो पहांटेस साखरझोंपेच्या वेळीं शत्रूवर अकस्मात् छापे घाली. त्या देशच्या वाटा व जागा त्यास सर्व माहीत असल्यामुळें तो मायावी राक्षसाप्रमाणें भलत्याच ठिकाणीं दिवसाही अचानक प्रकट होई, व शत्रूची नासाडी करून पुनः आपल्या जंगलांतील छावणींत दडून बसे. अशा या शत्रूशीं गोपाळरावानें आपलें विशेष नुकसान होऊं न देतां तीन महिने सामना केला. पण या लढाई-पासून दोहों पक्षांपैकीं एकाचाही विशेष फायदा होत नव्हता. शेवटीं दोघांसही युद्धाचा कंटाळा येऊन त्यांमध्यें तहाचें बोलणें सुरू झालें. त्यांत असें ठरलें कीं, रोख बत्तीस लक्ष रुपये घेऊन मराठ्यांनीं चौदा परगण्या-वरचा हक्क सोडावा व प्रांतांतून निघून जावें. हा ठराव होतांच हैदरानें नंदराजास निकड लाविली कीं, कसेंही करून या रकमेचा भरणा तावड-तोब करावा, म्हणजे मराठ्यांची ब्याद राज्यांतून घालवून देतों. पण नंद-राजाजवळ तरी पैसा कोठचा असणार! त्यानें मारूनमुटकून कसेंतरी सोळा लाख रुपये जमाविले आणि बाकीची रकम तुम्हींच कसेंतरी करून उभी करा असा राजाचा व नंदराजाचा हैदरास निरोप आला. मरा-ठ्यांच्या लष्करांत जे सावकार होते त्यांनीं हैदराच्या सांगण्यावरून सोळा लाखांची भरती गोपाळरावास जागच्या जागीं करून दिली! यावरून शत्रूच्या छावणींतसुद्धां हैदराची इभ्रत किती वाढली होती हें लक्षांत येईल. एवढी मात्र अट त्या सावकारांनीं घातली होती कीं, चवदा परगणे मरा-ठ्यांच्या ताब्यांतून सुटले म्हणजे ते हैदरानें आपल्या ताब्यांत घेऊन त्यांच्या वसुलांतून आमच्या रकमेची फेड करावी. ते परगणे बळकाविण्यास हैद-रासही कांहीं निमित्त पाहिजेच होतें, व बहुधां त्याच्याच इशाऱ्यावरून सावकारांनीं ही अट घातली असावी. त्यानें त्या परगण्यांत आपले लोक पाठवून तत्काळ अंमल बसविला आणि बत्तीस लक्ष रुपये घेऊन मराठी फौज म्हैसूर सोडून निघून गेली. पूर्वी नंदराजानें नानासाहेब पेशव्याशीं

तह ठरविला, त्यांत त्यानें मराठ्यांस बत्तीस लक्ष रुपये खंडणी देण्याचा करार ठरविला होता. तो करार गोपाळरावानें या स्वारींत पुरा करून घेतला इतकेंच. हैदराचें विशेष पारिपत्य त्याला या मोहिमेंत करतां आलें नाहीं. कर्नल विल्क याच्या लिहिण्यांत या मोहिमेंत हैदराचीच सरशी झाली असा अभिप्राय आहे. "हैदरानें तुमचें स्वरूप नेलें" असें नानासाहेब पेशव्यानीं गोपाळरावास खिजविल्याचा उल्लेख ऐ. ले. सं. नं. २४ च्या पत्रांत आहे, तो क. विल्क याच्या लिहिण्यास बळकटी आणतो. पण आपण हारीस आलों हें गोपाळराव बिलकूल कबूल करीत नाहीं. 'आम्हांकडून हैदरास चांगली तंबी पोचल्याशिवाय कांहीं त्यानें आम्हांस खंडणी दिली नाहीं हा गोपाळरावाचा त्या पत्रांतील मुद्दा अगदीं खरा आहे. आपला आतां कांहीं एक उपाय चालत नाहीं, अशी पक्की खात्री झाल्याशिवाय नुसत्या अवडंबरास भिऊन कोणास खंडणी बिंडणी देणारा मनुष्य हैदरनाईक नव्हता!

असो, याप्रमाणें पराक्रम केल्यावर हैदराचा म्हैसूर दरबारांत फारच बोलबाला झाला. दिंदिगल, कोईमतूर, बंगलोर व नुकतेच आलेले चवदा परगणे मिळून आतांपर्यंत त्यानें जवळ जवळ निम्मे राज्य हाताखालीं घातलेंच होतें. बाकी राहिलें होतें तेंही त्याच्या हातीं लागण्याचें निश्चित झाल्यासारखेंच होतें! देवराज यापूर्वींच मरण पावला होता. नंदराजास वाटे कीं, आपण हैदरास प्यादाचा फर्जी बनविला आहे, त्याअर्थी तो आपले उपकार स्मरून आपल्या आशेबाहेर तिलमात्र जाणार नाहीं. परंतु हा त्याचा भ्रम होता! कृतज्ञता व इमानीपणा या सद्गुणांची राजकारणांत मातीमोल किंमत मानली जाते. हें त्या बिचाऱ्याच्या लक्षांत आलें नाहीं. त्याजपासून जितका फायदा मिळवितां येण्याजोगा होता तितका हैदरानें करून घेतला असल्यामुळें, आतां तो त्याला दृष्टीससुद्धां नकोसा झाला होता! हैदराचा खंडेराव नांवाचा एक मराठा ब्राम्हण दिवाण होता. आजपर्यंत हैदरानें ज्या ज्या मसलती केल्या त्या सर्वांत त्याला या खंडेरावाचें अतिशय साह्य झालें होतें. नंदराजाचा हैदरावर जसा अलोट विश्वास होता तसा हैदराचा खंडेरावावर हाता. या आपल्या दिवाणाच्या

मार्फत हैदरानें राजाला फूस देऊन त्यांजकडून नंदराजाला राजधानींतून हांकून लावविलें. नंदराजाकडे सर्वाधिकाऱ्याची पोकळ पदवी मात्र मेहेरबानीनें कायम ठेवण्यांत आली. 'दळवाई'चा म्हणजे सेनापतीचा अधिकार हैदरानें स्वतःकडे घेतला आणि खंडेराव राजाचा प्रधान बनला. म्हैसूर दरबारची हीही घटना फार दिवस चालली नाहीं. हैदर हा सर्वच राज्य गिळंकृत करण्यास टपला आहे, हें लक्षांत येऊन राजा शेवटीं पस्ता-
स. १७६० व्यांत पडला आणि त्यानें खंडेरावाची मनधरणी करून त्याला आपल्याकडे वळवून घेतलें. नंतर राजा व खंडेराव यांचीं हैदराविरुद्ध गुप्त कारस्थानें सुरू झालीं. याचवेळीं विसाजीपंत बिनीवाले आणि गोपाळराव पटवर्धन यांच्या हाताखालीं एक मोठी मराठी फौज बाळापूर, देवनहळ्ळी या प्रांतांत खंडण्या घेत फिरत होती. राजा व खंडेराव यांनीं विसाजीपंतांशीं फार गुप्तपणें राजकारण सुरू केलें व त्यास कांहीं पैका देऊन वश करून घेतलें. मग असा संकेत ठरला कीं, ता. १२ आगष्ट रोजीं गोपाळरावानें फौजेसह श्रीरंगपट्टणास जाऊन पोचावें आणि त्या दिवशीं त्यानें व खंडेरावानें मिळून हैदरावर हल्ला करून त्याचा फडशा पाडावा! हैदराची सर्व फौज यावेळीं मखदुमअली नांवाच्या सरदाराच्या हाताखालीं अर्काटप्रांतीं फ्रेंचांच्या कुमकेस गेली होती व तो स्वतः पांच चार हजार फौजेसह बेसावधपणें पट्टणाजवळ कावेरीच्या तीरीं तळ देऊन राहिला होता. पावसाळ्यामुळें कावेरीचें पाणी पुष्कळच फुगलें होतें, त्यामुळें त्याला एकाएकीं कोठें पळूनही जातां येण्याजोगें नव्हतें. अशा या बिकट प्रसंगीं खंडेराव व गोपाळराव यांचा हैदरावर हल्ला होता तर त्याचा खात्रीनें नाश झाला असता, परंतु तसा योग जुळून आला नाहीं. आगाऊ ठरल्याप्रमाणें ठरल्या तारखेस खंडेरावानें हैदराच्या छावणीवर तोफांचा भडिमार सुरू केला. परंतु कांहीं अडचणीमुळें गोपाळरावास यावयास थोडासा उशीर लागल्यामुळें हल्ला करण्याचें काम दुसरे दिवसावर तहकूब राहिलें. कसाही बिकट प्रसंगीं न डगमगणें हा हैदरामध्यें मोठाच गुण होता. त्यानें दिवसभर शरण आल्याचें सोंग आणून खंडेरावाशीं समेटाचें बोलणें लाविलें आणि रात्रीं नावेंतून हळूच कावेरीपार होऊन

बेंगरूळास पलायन केलें! तेथें पोंचल्याबरोबर त्यानें नवीन फौज ठेवण्यास सुरवात केली आणि त्याच्या सूचनेवरून मखदुमअल्ली हाही अर्काट प्रांतांतून परत फिरून बेंगरूळाकडे येऊं लागला. या मखदुमअल्लीची वाट अडविण्याकरितां गोपाळराव पंधरा हजार फौजेसह कडपनाथाच्या घाटाखालीं उतरला आणि शत्रूच्या फौजेस बिलगला. गोपाळरावाचा पाठपुरावा करण्याकरितां विसाजीपंत स्वतः घाटमाथ्यावर तळ देऊन राहिला.

मखदुमअल्लीच्या व मराठ्यांच्या दररोज निकरानें लढाया होत असतांही तो शूर सरदार आपलें सारें लष्कर व बाजारबुनगें संभाळून बेंगरूळापासून चोवीस मैलावर येऊन पोंचला. तेथें मात्र त्याचे सर्व उपाय थकले. मराठ्यांनीं चोहोंकडून गराडा घातल्यामुळें त्याच्यानें पुढें पाऊल टाकवेनासें झालें, व त्यांच्या वारंवार होणाऱ्या हल्ल्यांनीं त्याचें लष्कर अगदीं हैराण झालें. ही त्याची दुर्दशा पाहून हैदरानें बेंगरूळाहून मीरफैजुल्लाबरोबर चार हजार फौज व पांच तोफा त्याच्या कुमकेस पाठविल्या, पण मराठ्यांनीं वाटेंतच ही कुमकेस येणारी फौज बुडवून लुटून फस्त केली. आतां मात्र मखदुमअल्लीनें सर्व फौजेसह मराठ्यांच्या स्वाधीन होण्याचा प्रसंग येऊन ठेपला. तसें झालें असतें तर, हैदराची पुनः भरभराट होण्याचा संभव अगदीं नष्टच झाला असता, पण याही वेळीं हैदरास त्याच्या नशीबानें चांगलाच हात दिला. त्यानें मराठ्यांशीं बरेच दिवस तहाचें बोलणें लाविलें होतें तिकडे आजपर्यंत त्यांनीं लक्ष दिलें नाहीं. आणि आतां मखदुमअल्लीचें सारें लष्कर त्यांच्या हातीं लागल्यासारखें झालें होतें, तरीही ते आतां हैदरापासून बारा महाल प्रांत व रोख तीन लक्ष रुपये घेऊन स्वदेशीं परत जावयास कबूल झाले! ही वार्ता ऐकतांच हैदराच्या पोटांत हर्ष मावेनासा झाला. पण हें असें कां व्हावें हा मात्र त्यास कांहीं केल्या उमज पडेना. तथापि विशेष चिकित्सा न करितां त्यानें तीन लाख रुपये रोख दिले व बारा महालही स्वाधीन करण्याचें कबूल केलें. इतका प्रकार होतांच मराठे घाईघाईनें स्वदेशीं परत आले.

पानिपतच्या पराजयामुळेंच मराठ्यांनीं इतक्या घाईघाईनें कर्नाटकांतून पाय काढिला ही गोष्ट हैदराच्या लवकरच लक्षांत आली. पानिपतानंतर

मराठमंडळांत जी यादवी माजली तिचा हैदरानें चांगलाच फायदा घेतला. कर्नाटकाकडे मराठ्यांची पाठ वळतांच त्यानें नंदराज, खंडेराव व राजा चिक्कृष्णराज या तिघांसहि कैदेंत ठेवून म्हैसूरचें राज्य बळकाविलें आणि नंतर शिरें प्रांत व तुंगभद्रेपलीकडील इतर स्वराज्याचा मुलूख त्यानें मराठ्यांपासून हिसकून घेतला. कडपें, कर्नूल, अर्काट, सावनूर येथील नबाब आणि रायदुर्ग, हरपनहळ्ळी, चितदुर्ग, सोंधें वगैरे त्या प्रांतींचे हिंदु संस्थानिक यांजवर स्वाऱ्या घालघालून त्यानें कोट्यवधि रुपये खंडणी वसूल केली. बाळापुरचें संस्थान त्यानें बहुतेक खालसा केलें, आणि बिदनूरचें संस्थान तर त्यानें अजीबाद बुडविलें. गुत्तीकर मुरारराव घोरपडे सेनापति यांचा कर्नाटकांत अतिशय वचक होता, परंतु हैदरानें एकाच स्वारींत या सेनापतींची चांगलीच रग जिरविली. स. १७६३ सालीं हैदर तुंगभद्रा उतरून उत्तरतीरास आला आणि त्यानें विजापूर व धारवाड या जिल्ह्यांस वेध लाविला. लक्ष्मेश्वर तालुक्यांत गोपाळरावाचा चुलत बंधु मेघश्यामराव हा फौजेसह होता, त्याचा हैदरानें एका लढाईत पराजय करून त्याला कैद केलें आणि नंतर गदग, नवलगुंद, श्रीमंतगड, हुलीगड, कलघटगी वगैरे नामांकित ठाणीं भराभर काबीज केलीं. जाळपोळ, लुटालूट आणि कत्तल या साधनांचा उपयोग हैदर आपल्या स्वारींत निर्दयपणानें एवढ्या मोठ्या प्रमाणावर करी कीं, त्याची फौज जवळपास आली असतां मोठमोठे संस्थानिकसुद्धां भीतीनें लटलटां कांपूं लागत! स. १७६३ च्या अखेरीस धारवाडचा नामांकित किल्लाही मराठ्यांच्या हातीं पडला. याप्रमाणें क्रमाक्रमानें त्याच्या स्वाऱ्या वर्धा, मलप्रभा, आणि घटप्रभा या नद्या ओलांडून जवळ जवळ कृष्णातीरापर्यंत येऊं लागल्या! घाटाखालीं सारा कारवार जिल्हा त्याच्या हातीं लागल्यामुळें गोवेंकर फिरंगी, वाडीचे सावंत व विजयदुर्गचा पेशव्यांचा सुभेदार यांस आतां हें अरिष्ट आपणावर येतें कीं काय, अशी जबरदस्त धास्ती पडली!

स. १७६४ पर्यंत हैदर व मराठे यांचे संबंध कसकसे येत गेले याच आतांपर्यंत वर्णन करण्यांत आलें आहे, त्यावरून तो कसा मनुष्य होता हें ध्यानांत येण्याजोगें आहे. तो धूर्त, साहसी, कपटी व शूर होता, इत-

केंच नव्हे, तर सैन्याच्या रचनेची शिस्त ठरविण्यांत, जमाबंदीची व्यवस्था करण्यांत, शिपायांवर कदर राखण्यांत, माणसाची पारख करण्यांत त्याचा अगदीं हातखंडा असे. त्याला उर्दू, कानडी व मराठी या तिनी भाषा उत्तम रीतीनें बोलतां येत असत. त्याचीं धार्मिक मतें अत्यंत उदार होतीं. त्याची स्मरणशक्ति आश्चर्यकारक होती. त्यास दया माया मात्र बिलकूल नव्हती. त्यानें बातम्या ठेवण्याचें खातें अगदीं पूर्ण दशेला नेलें होतें. तो पायदळाचा उत्तम सरदार होता इतकेंच नव्हे, तर घोडेस्वारांच्या 'गनिमी काव्यांत' सुद्धां तो चांगला वाकबगार होता. इंग्रजाशीं लढतांना तो त्यांना गनिमी काव्यानें बेजार करी आणि मराठ्यांशीं लढतांना मात्र तो इंग्रजांच्या पायदळी युद्धपद्धतीचा अंगीकार करीत असे! अशा या बलिष्ठ आणि हरदमख्याली शत्रूशीं रावसाहेब पेशव्यांस आतां सामना करावयाचा होता आणि त्या पेशव्यांच्या वयास अजून वीस वर्षेंही पुरीं झालीं नव्हतीं! पेशव्यांनीं आपलें काम कसें पार पाडिलें हेंच आतां सांगावयाचें.

हैदरअल्लीवर पहिली स्वारी—मोंगलावर स्वारी करून परत आल्यावर रावसाहेब पुण्यास विश्रांति न घेतां तसेच डेरेदाखल झाले. " हैदरअल्लीवर जी स्वारी व्हावयाची तींत मुख्य अधिकार आपला असावा असा दादासाहेबांचा आग्रह होता, परंतु सखारामबापूनें सांगितलें कीं, मुख्य अधिकार रावसाहेबांसच असावा हें योग्य आहे. हें बोलणें दादासाहेबास न रुचल्यामुळें ते रागावून नाशिकास निघून गेले," असें डफसाहेब लिहितो, परंतु तें खरें नाहीं. शरीर अशक्त झाल्यामुळें व शीण आल्यामुळें मोंगलाची मोहीम चालली असतांच दादासाहेब वारंवार बोलून दाखवीत असत कीं, एवढी मोहीम झाली म्हणजे रावसाहेबांकडे सर्व कारभार सोंपवून देऊन आपण स्नानसंध्या करण्याकरितां कोठें गोदावरीतीरीं जाऊन राहणार. [पहा ऐ. ले. सं. नं. ३५० व ३५८] रावसाहेबांनीं या स्वारीस निघतांना चुलत्यास बरोबर येण्याविषयीं फार आग्रह केला, परंतु विश्रांति घेण्याचा त्यांचा विचार पक्का ठरला असल्यामुळें ते रावसाहेबांचा मुखासमाधानानं निरोप घेऊन नाशिकास गेले. त्यांबरोबर गोविंद शिवराम खासगीवाले,

स. १७६३ सप्टेंबर ते स. १७६४ जाने. अखेर

त्रिंबकराव मामा, आबा पुरंदरे, चितो विठ्ठल रायरीकर गेले. गोपिकाबाई नाशिकासच होती. पुण्यांत नारायणरावसाहेब, रमाबाई (ही पेशव्यांची पत्नी) व पार्वतीबाई व कुटुंबाची इतर बायका मंडळी राहिली. त्यांचा सांभाळ करणें, सर्व कारखान्यांवर देखरेख करणें व स्वारीत दारूगोळा, तोफा व दुसरें जें कांहीं सामान लागेल तें पुरवणें हीं जबाबदारीचीं कामें रावसाहेबांनीं नानाफडणिसांवर सोंपविलीं होतीं. नानांचें वय त्यावेळीं पंचविशीच्या सुमारें होतें. इतक्या लहान वयांतही शहाणपण, उद्योग इमान व टापटीप हे नानांचे गुण श्रीमंतांच्या दृष्टोत्पत्तीस आले, म्हणूनच त्यांनीं त्यावर घरचा सर्व कारभार सोंपवून दिला असावा हें उघड आहे. पेशव्यांबरोबर मुख्य कारभारी सखारामबापू व मुत्सद्यांपैकीं कृष्णराव बल्लाळ काळे हे स्वारीत होते. आबा पुरंदरे जरी नाशिकास दादासाहेबांबरोबर गेले होते तरी त्यांचें पथक हरी गोपाळ याजबरोबर स्वारींत होतें. पौष महिन्यांत श्रीमंत स्वारीस निघाले, ते नाह्यावीचा घांट चढून सातारा प्रांतीं शंभुमहादेवाचें स्थान आहे त्या रोखें चालले. विठ्ठलराव विंचूरकर व नारो शंकर यांस पूर्वीं हिंदुस्थानांत पाठविण्याचा श्रीमंतानीं बेत केला होता, तो आतां रहित करून त्यांस प्रस्तुतच्या मोहिमेकरितां आपापल्या पथकांसह लवकर निघून येण्याविषयीं त्यानीं हुकूम केला. त्यावरून विंचूरकर पथकापैकीं जमले होते तेवढेच लोक घेऊन आले. मोंगलाशीं लढाई नुकतीच संपली होती व शिलेदार लोक घरोघर निघून गेले होते ते पुनः जमण्यास दोन तीन महिने निदान अवकाश होता. तोंपर्यंत दक्षिण महाराष्ट्रांत हिंडून बारीक सारीक कामें आटपून घ्यावीं व फौजेच्या खर्चाकरितां कांहीं पैका मिळवावा, फौज जमल्यावर धारवाडाकडे जाऊन हैदराशीं गांठ घालावी, असा श्रीमंतांचा मनसुबा ठरला होता. त्याप्रमाणें ते शंभुमहादेवास जाऊन तेथून नाझऱ्यांवरून चिकोडीकडे चालले होते; तों पटवर्धनांच्या कारकुनांनीं येऊन विनंति केली कीं, या मार्गें लष्कर गेलें तर आमचा मुलूख तुडविला जाईल. त्यावरून तो रस्ता टाकून श्रीमंत मत प्रांतीं गेले.

नुकताच जो मोंगलाशीं तह झाला होता त्यांत इंडी, तांबें, आलमलें,

बागेवाडी, अबजलपूर, होतीं, हे महाराष्ट्राच्या आग्नेय सीमेवरचे परगणे पेशव्यांस मिळाले होते. त्या परगण्यांत अंमल बसविण्यासाठीं पेशव्यांनीं गोपाळरावास पाठविलें होतें. विठ्ठलराव विंचूरकराची नेमणूक कागलचें ठाणें घेण्यासाठीं झाली होती, त्याचें कारण असें—कोल्हापुरची राणी जिजाबाई हिनें शेषो नारायण रहकर म्हणून हुकेरीचा मामलेदार होता, त्यापासून कांहीं कर्ज काढिलें होतें व त्याच्या फेडीकरितां चिकोडी मनोळी व कागल हे तीन तालुके त्याजकडे लावून दिले होते. परंतु या तीनही ठिकाणीं राणीचा अंमल आजपर्यंत नांवाचा मात्र होता, तोही नाहींसा होऊन त्या ठिकाणच्या जमीदारांनीं राणीची मालकी साफ नाकबूल केली व शेषो नारायणाचा अंमल मुळींच बसूं दिला नाहीं. चिकोडीचा देसाई बराच सामर्थ्यवान् होता. कागलांत घाटगे पूर्वींपासूनच बळावले होते. मनोळीस शिंदे होते तेही फौजबंद असून शिवाय त्यांस पटवर्धनांचा आश्रय होता. या तिघांचें पारिपत्य करण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें, राणीचे तीन तालुके हातांतून गेले व शेषोपंताचा पैका बुडाला. त्यांत घाटगे व शिंदे यांवर राणीचा फारच राग झाला होता. तिन्हीं ठाणीं घेऊन देण्याविषयीं शेषोपंताची पुण्याच्या दरबारीं बरेच दिवस खटपट चालली होती. याविषयीं राणीची तर पेशव्यांजवळ इतकी सक्तीची रदबदली होती कीं, तुमचीं ठाणीं घेऊन तुमच्या हवालीं करून देईन अशी पेशव्यांनीं राणीजवळ शपथ वाहिली होती, व देवावरच्या तुळशी उचलून दिल्या होत्या! शपथेप्रमाणें करून दाखविण्यास गेल्या तीन वर्षांत त्यांस केव्हांच फुरसत झाली नाहीं. यंदा मात्र कर्नाटकांत जातां जातां राणीस ठाणीं घेऊन देण्याचें त्यांनीं ठरविलें होतें, व त्याबद्दल असा करार झाला होता कीं, ठाणीं हातीं आल्यावर शेषोपंतानें तीन लाख व राणीनें चार लाख रुपये फौजेच्या खर्चाकरितां पेशव्यांस द्यावे. या ठरावाप्रमाणें कागल घेण्यासाठीं या शके १६८५ सालच्या माघ महिन्यांत विठ्ठलराव विंचूरकरांची रवानगी झाली होती. विंचूरकर व गोपाळराव दोहींकडे दोन कामांवर गुंतले होते, ते परत येईपर्यंत स्वारीच्या पुढील मसलती ठरविण्याचें रहित करून रावसाहेब जत प्रांतीं तूर्त बसले होते.

अतेकडे डफळे व पोळ यांनीं गेल्या चार वर्षांत बराच बंडावा माज-विला होता, त्यांवर जरब बसवून रावसाहेबांनीं तो प्रांत आपले मामा रास्ते यांस जहागीर दिला. नंतर स्वारी विजापुरास गेली. उदगीरच्या
स. १७६४ } तहांत किंवा त्यापूर्वी मोंगलाकडून पेशव्यांस विजापूर
फेब्रु. } मिळालेलें होतें. परंतु त्या ठिकाणीं चव्हाणांचें प्राबल्य होतें, व ते चव्हाण मोंगलांचा आश्रय करून त्यांची जहागीर खाऊन त्याच्या सैन्यांत चाकरी करीत. या चव्हाणांस हुसकून लावण्यास गेल्या-पांच वर्षांत पेशव्यांस फुरसत मिळाली नव्हती. या प्रसंगीं रावसाहेबांनीं चव्हाणांचा बंदोबस्त करून विजापुरांत आपलें ठाणें बसविलें. याच ठिकाणीं नारो शंकर येऊन मिळाला.

नंतर लष्कर विजापुराहून परत फिरून पुनः कृष्णातीरीं येडूर मांजरी येथें आलें. चिकोडी तालुक्याचीं नागरमनोळीसुद्धां सर्व ठाणीं फौज जातांच भराभर कैलास आलीं आणि रावसाहेबांनीं तीं शेषोपंताच्या हवालीं केलीं. कागल व कोगनोळी विंचूरकरांनीं घेतली होती व ते लष्क-रास मिळण्याकरितां परत निघाले होते. एक मनोळीचें ठाणें मात्र घेऊन राणीस कराराप्रमाणें द्यावयाचें होतें. तें धारवाडाकडे जाण्याच्या वाटेवरच होतें, व फौजही संकेताप्रमाणें जमत चालली होती. फाल्गुन महिन्यांत सुरुवात झाल्यामुळें मुलुखगिरीचे आतां चैत्र व वैशाख हे दोनच महिने काय ते राहिले होते. या सर्व गोष्टींचा विचार करून व गोपाळराव व विंचूरकर यांस जलदीनें निघून येण्याविषयीं ताकीद करून रावसाहेब जलदी जलदीनें मनाळीकडे चालले. तिकडे जाण्यास वाटेंत एक मोठी बारी लागत्ये. ही बारी पाच्छापुरापासून निसरगीपर्यंत वीस बेवीस मैल आहे. हिला पूर्वी पेशवाईत 'मनोळीची बारी' असें ह्मणत असत. या बारीचा रस्ता अरुंद व खडकाळ असल्यामुळें लष्कर जाण्या येण्यास फारच अड-चणीचा होता व सर्व बारीभर किर्र झाडी पसरली होती. बारीच्या अली-
मार्च } कडे बंटमुरीचें ठाणें आहे, तें घेऊन घोडगिरीवरून बारी पार
} होऊन हॉगलच्या ओढ्यावर रावसाहेब एक दिवस मुक्काम करून राहिले. तो गांव मनोळीकरांचा असल्यामुळें तोफा लावून लुटून

फस्त करण्यांत आला. तेथून मुरगोडास जाऊन स्वारी मनोळीस दाखल झाली. तेथें कृष्णाबाई शिंदे होती, तिनें किल्ला झुजविण्याची हिंमत धरिली, त्यामुळें तत्काळ किल्यास मोर्चे बसले, व चारच दिवसांत किल्याच्या खंदकापर्यंत मोर्चे गेले. आतां हल्ला करून किल्ला घ्यावा, इतक्यांत पटवर्धनांच्या मध्यस्थीनें कृष्णाबाई शरण येऊन तिनें पेशव्यांच्या हवालीं किल्ला केला, व तो त्यांनीं शेषोपंताच्या ताब्यांत दिला. इतकें होई तों फाल्गुन महिना समाप्त झाला.

स्वारीस निघून रावसाहेबांस जवळ जवळ तीन महिने झाले होते. इतका त्यांचा काल सैन्य जमा करण्यांत व स्वारीच्या पुढील तरतुदी करण्यांत गेला. त्याबरोबर सखारामबापू कारभारी होता. तेव्हां अपयश येण्याची भीति नव्हतीच. सतरा वर्षांपूर्वीं हाच सखारामबापू सदाशिवराव भाऊसाहेबांचा कारभारी होऊन सावनूरच्या स्वारीस आला होता. भाऊसाहेबांचें वय त्यावेळीं सत्रा वर्षांचे होतें तरी त्यांस उत्तम रीतीची सल्ला मसलत देऊन व सर्व प्रकारची यथायोग्य व्यवस्था राखून बापूनें भाऊसाहेबांची स्वारी यशस्वी केली. हिंदुस्थानांत व गुजराथेंत दादासाहेबांच्या जितक्या स्वाऱ्या झाल्या त्या सर्वांत सखारामबापू कारभारी असे. या स्वाऱ्यांत पैक्याची अतोनात उधळपट्टी होई व सखारामबापू स्वतः पैका खात असे हें जरी खरें आहे, तथापि इतकें कबूल करणें भाग आहे कीं, दादासाहेबांची दर स्वारींत जी फत्ते होत असे, तिचें श्रेय शिंदे होळकरांचे पराक्रम व बापूचें शहाणपण यांत सारखें वांटून देणें योग्य आहे. बापूइतका जुना, अनुभवी, केलेला संवरलेला मुत्सद्दी आतां कोणी राहिला नव्हता, व या स्वारींतसुद्धां त्याच्या अकलेचा रावसाहेबांस फार उपयोग झाला असला पाहिजे हें स्पष्ट आहे.

रावसाहेबांनीं अशी मसलत योजिली होती कीं, यंदा मुलुखगिरीचे दिवस आतां थोडे राहिले, याकरितां तूर्त धारवाड व भोंवतालचीं ठाणीं घ्यावीं. हैदरनाईक तीस चाळीस लक्ष रुपये खंडणी देईल तर बंकापूर, सोंधें व बिदनूर त्याजकडेच राहूं द्यावीं. तूर्त तह करून परत जावें. दसरा झाल्यावर पुनः स्वारी करून त्याचें पुरतें पारिपत्य करावें. हैदर खंडणी

देण्यास मुळींच कबूल नसेल तर छावणी करून त्याची पुरती खोड मोडल्याशिवाय परत जाऊं नये. सध्यां त्यांच्या सैन्यांत विंचूरकर, नारो शंकर, सखारामबापू, धोंडो दत्तात्रय, नरसिंगराव धायगुडे, आनंदराव गोपाळ, आनंदराव रास्ते, विसाजी कृष्ण बिनीवाले, रामचंद्र गणेश, घोरपडे इचलकरंजीकर, महिपतराव कवडे, शहाजी भापकर, शहाजीराजे अक्कलकोटकर, आबा पुरंदरे, इतक्यांचीं पथकें बरोबर असून घोरपडे व पुरंदरे यांशिवाय सर्व सरदार आपापल्या पथकांबरोबर स्वतःच आले होते. पटवर्धनांपैकीं गोपाळराव, परशुरामभाऊ, नीलकंठराव, कोन्हेरराव, वामनराव, मोरोबा आबा, नारायणराव व धोंडोपंत आणि यादवाडकर पटवर्धनांपैकीं अंताजी विठ्ठल हे स्वारींत होते व सर्वांची मिळून सहासात हजार फौज होती. श्रीमंतांनीं या मोहिमेस पंधरा हजार हुजरात नेमिली होती, ती आणि वर सांगितलेल्या सर्व जहागिरदारांची मिळून एकंदर चाळीस हजार फौज जमली होती. शिवाय गारदी दीड हजार व तोफा वीस होत्या. गारद्यांची संचणी अजून चालू होती व पावसाळ्याच्या सुमारास त्यांचा भरणा सहा सात हजारांवर झाला असावा. याशिवाय आरब व मावळे व हेटकरी या जातींचें पायदळही कित्येक हजार पुढें जसजसें कारण पडलें तसतसें चाकरीस ठेवण्यांत आलें. आणखी तोफा व दारूगोळा वगैरे सामान पुण्याहून येतच होतें. श्रीमंतांची स्वारी समीप आली म्हणजे त्यांस येऊन मिळावें असा सावनूरकर नबाबाचा मनोदय होता व त्यानें पांच सहा हजार फौज जमा केली होती. लष्कर तुंगभद्रेवर दाखल झाल्यावर तिकडून चार हजार निवडक फौजेसह मुरारराव घोरपडे येऊन मिळणार होता. सावनूरकर व मुरारराव आल्यावर मराठ्यांचें सैन्य स्वार पायदळ मिळून सत्तर हजारपर्यंत जमा झालें. शिवाय कित्येक हजार पेंढारी होते त्यांची गणना वरील संख्येंत केली नाहीं. या स्वारींतील कोणत्याच लढाईंत पेशव्यांस एवढी सारी फौज लढण्याकरितां उभी करितां आली नाहीं, हें वाचकांनीं ध्यानांत ठेवलें पाहिजे. दहाबारा हजार लोक पाळीपाळीनें छावणी राखण्याकरितां रहात. सुमारें तितकेच लोक चोहोंकडून कही म्हणजे धान्य व वैरण गोळा करून सांभाळून आणण्यांत

गुंतलेले असत. कित्येक पथकें मुलूख सांभाळण्याकरितां जागोजाग ठेवण्यांत आलीं होतीं. कित्येक टोळ्या ठाणीं घेण्यांत गुंतल्या होत्या. ठाणीं काबीज झाल्यावर त्यांत ठेवण्याकरितां गारदी वगैरे पायदळाचे लोक नेमून द्यावे लागत. कांहीं तोफा किल्ले घेण्याच्या मात्र उपयोगी अशा मोठमोठाल्या होत्या. कांहीं जलद् माराच्या व जलदीनें नेतां येण्याजोग्या फक्त स्वारीच्या उपयोगाच्या होत्या. पेशव्यांबरोबर लढती फौज म्हटली तर तीस हजार स्वार, पांचचार हजार गारदी व अरब, आणि वीसपर्यंत तोफा इतकीच असे. यांपैकीं जरूर असेल तितके लोक लढाईच्या कामावर रहात व बाकीचे ठाणीं घेण्याच्या कामास लागत. नेहमी बरोबर असणाऱ्या फौजेची संख्या वाढवावी लागली तर दुसऱ्या कामांवर असलेले स्वार व पायदळ आणून भरती करावी लागे. हैदरासारख्या जबरदस्त शत्रूशीं लढावयाचा प्रसंग पडल्यामुळें रावसाहेबांस इतकी तरतूद करावी लागली. त्याच्या लष्करांत काय चाललें आहे याची बातमी त्यांस हरहमेशा मिळत होती व तिला अनुसरूनच त्यांनीं विचार करून आपले बेत पक्के केले होते. आतां इतक्या अवधींत हैदरअल्लीच्या काय मसलती चालल्या होत्या हें पाहूं.

आपणावर मराठ्यांची स्वारी होण्याचें आतां टळत नाहीं असें पाहून हैदरानेंही आपल्या मुलखाचा बंदोबस्त केला. श्रीरंगपट्टणचा व तेथील राजाचा बंदोबस्त त्यानें मखदूमअल्लीवर सोंपविला होता. शिरें प्रांतीं दंगेधोपे होऊं लागल्यामुळें तिकडील बंदोबस्त राखण्याकरितां त्यानें आपला मेहुणा मीररेझा यास पाठविलें होतें. चिकबाळापुरचा पाळेगार व त्याचा मित्र मुरारराव घोरपडे यांशीं या वेळीं या मीररेझाची लढाई सुरू होती. मीरफैजुल्ला दहा पंधरा हजार फौजेसह धारवाडप्रांतीं राहिला हाता व खासा हैदरअल्ली तीस हजार गारदी, बारा हजार स्वार, स्वारींच्या पन्नास तोफा, व कानडी प्यादे सुमारें वीस हजार, इतक्या सामानाशीं बिदनुरास राहिला होता.

सोंधे संस्थानावर हैदराचें सैन्य चालून गेलें तेव्हां तेथील देसाई पळून पोर्तुगीज लोकांच्या आश्रयास गेला, तथापि त्या संस्थानावर हैदराचा

एकाएकी पुरता अंमल बसला नाहीं. तेथील ठाणीं घेण्यांत त्याची फौज गुतली असतां पेशव्यांची स्वारी पुण्याहून निघून कर्नाटकाकडे येऊं लागली. तेणेंकरून सोंधेकरांस धीर आला म्हणा, किंवा दंगा करण्याविषयीं खुद्द पेशव्याकडूनच त्यांस प्रोत्साहन मिळालें होतें म्हणा, त्यांनीं एकदम चोहोंकडे बंडावा सुरू केला. तो बंडावा मोडण्यासाठीं हैदरानें बिदनुराहून लालखान नामक सरदारास पाठविलें. सोंधेकरांस बिदनुराहून पळून गेलेले पूर्वींच्या राज्यांतील कित्येक अधिकारी सामील झाले होते. गोंवेंकर पोर्तुगीज व मलबारांतील नायमार (नायर) यांचेंही त्यांस चांगलें पाठबळ होतें. लालखान बाणावशीच्या घांटानें सोंध्याकडे येत आहे ही बातमी राखून सोंधेकर त्या घांटांत दबा धरून बसले व तो येतांच त्यांनीं त्याजवर तुटून पडून त्याच्या सैन्याचा संहार केला.

हें पराजयाचें वर्तमान हैदरास कळतांच त्यानें धारवाड प्रांतीं मीरफैजुल्ला होता त्यास तावडतोब सोंध्यावर रवाना केलें. त्यानें जातांच देसायास पुनः हुसकून लावून प्रांतांत अंमल बसविला, आणि शिवेश्वर, सदाशिवगड व अंकोला हे किल्ले घेऊन खेलगड नांवाचा एक मजबूत किल्ला होता त्यास वेढा घातला. तेथें निकराचें झुज होत असतां पेशव्यांच्या आज्ञेवरून त्यांच्या आरमारावरील सरदार रुद्राजीराव धुळप हा दोन तीनशें मचवे व कांहीं मोठमोठीं लढाऊ जहाजें घेऊन होनावरच्या बंदरास आला. त्याजजवळ आठ दहा हजार पायदळही होतें. तें जमिनीवर उतरून त्यानें होनावरचा किल्ला व बंदर व भोंवतालचीं कित्येक ठाणीं काबीज केलीं. होनावरच्या बंदरांत हैदराचेंही आरमार होतें, परंतु त्याचा मराठ्यांच्या आरमारापुढें कांहीं यत्न चालला नाहीं. धुळपास बिदनूरकर व सोंधेकर व नायमार लोक तात्काळ मिळाले व त्या प्रांतीं त्याची सलाबत बसत चालली व हैदराचा अंमल उठत चालला. अशा बिकट प्रसंगीं मीरफैजुल्लास घांटाखालीं ठेवणें अवश्य असतांही हैदरानें त्यास टाकोटाक सर्व फौजेसह बिदनुरास बोलावून नेलें! तो जातांच सोंधेकरांनीं आपलें सर्व राज्य पुनः जिंकून घेतलें.

मराठ्यांची फौज मनोळीपर्यंत आल्याचें वर्तमान हैदरास कळलें व

तिची जय्यत तयारी असल्याचें ऐकून त्याच्या मनाची चलबिचल झाली. मराठ्यांशीं कृष्णानदीवर येऊन झुंजण्याची त्याची घमेंड आतां राहिली नाहीं. सर्व सरदारांस त्यानें बिदनुरास बोलावून नेऊन त्यांच्या सल्ल्यानें मसलत ठरविली कीं, मराठ्यांसमोर मैदानांत उभें राहून लढण्याचें धाडस न करितां जंगलाचा व डोंगराचा आश्रय करून आपण रहावें व तेथून फौजेच्या टोळ्याटोळ्यांनीं मराठ्यांवर छापे घालावे. आपण बिकट जाग्या वर छावणी करून राहणार, तेव्हां अशा छावणीवर मराठ्यांची नुसत्या घोडेस्वारांची फौज येऊन काय करणार ? पायदळ व तोफखाना त्यांजवळ म्हणण्यासारखा नाहीं. येऊन जाऊन मुलूखगिरीचे आतां दोन महिने राहिले आहेत. इतक्या अवकाशांत बंकापूर व धारवाड यांसारखीं मुख्य मुख्य ठाणीं आहेत तेवढीं हरप्रयत्नानें राखावीं. बारीक सारीक ठाणीं शत्रूकडे गेलीं तरी चिंता नाहीं. पावसाळा सुरू झाला म्हणजे मराठ्यांस परत जाणें भागच आहे. या प्रांतीं त्यांची छावणी होणें अशक्य आहे. ते परत गेल्यावर सारा मुलूख आपलाच आहे. झालेली नुकसानी भरून काढूं. दुसरा झाल्यावर ते पुनः चालून येतील तर त्या वेळचें त्या वेळेस पहातां येईल ! याप्रमाणें हैदराची मसलत होती. त्याच्या सैन्याचें वर जें आम्हीं वर्णन केलें आहे तें मराठी कागदपत्र पाहून स्थूलमानानें लिहिलें आहे. या स्वारींत पेशवे व हैदर याच्या सैन्यासंबंधें कर्नल विल्क यानें मजकूर लिहिला आहे तो असा—

रटेहळ्ळी येथें हैदरानें छावणी दिली होती, तेव्हां त्याजवळ वीस हजार स्वार, वीस हजार गारदी व वीस हजार बरकदाज प्यादे इतकें सैन्य होतें. त्याचा तोफखानाही चांगला होता. तोफा किती व कोणत्या तऱ्हेच्या होत्या हें जरी सांगतां येत नाहीं, तरी पण मला वाटतें कीं, या वेळीं त्याजवळ स्वारीच्या तोफा पंचवीस असाव्या. मराठे, रजपूत व मुसलमान या जातींचे घोडेस्वार पेशव्यांजवळ होते, त्यांची एकंदर संख्या साठ हजार धरिलेली आहे. हैदराचेही घोडेस्वार असलेच होते, पण वर सांगितल्याप्रमाणें हैदराच्या एका स्वारांस पेशव्यांचे तीन स्वार, याप्रमाणें उभयपक्षांत अंतर होतें. ही संख्या उगीच कांहीं तरी फुगवून सांगितल्या-

प्रमाणें जरी असली तरी निदान तीस पासून चाळीस हजारपर्यंत पेशव्यांजवळ स्वार होते हें खरें आहे. घोडेस्वारांप्रमाणेंच पेशव्यांजवळ पायदळ व तोफा शत्रूपेक्षां दुपटीनें किंवा तिपटीनें अधिक होत्या. पेशव्याचे गारदी हैदराच्या गारद्यापेक्षां सामर्थ्यानें व शौर्यानें श्रेष्ठ होते, पण त्यांची कवाइतीची तयारी तितकी चांगली नव्हती. कवाईत न शिकलेलें उभय पक्षांचें जें पायदळ होतें, त्यांत पेशव्यांजवळ आरब बरकंदाज होते ते हैदराच्या बरकंदाज प्याद्यापेक्षां फारच चांगले होते परंतु बर्चीवाले मराठे प्यादे हैदराच्या लष्करांत चित्रदुर्गकराचे तसलेच प्यादे होते त्यापेक्षां अगदीं कनिष्ठ प्रतीचे होते.

विल्कच्या या लिहिण्यासंबंधानें आम्हांस इतकेंच सांगावयाचें आहे कीं, हैदरापेक्षां पेशव्यांजवळ तोफा आणि पायदळ अधिक होतें असें तो लिहितो तें मुळींच खरें नाहीं. हें सामान त्याजवळ अगदीं जुजबी होतें व नुसत्या तोफखान्यानें किंवा पायदळानें जर लढाईचा निकाल लागावयाचा असता तर, हैदरास जय मिळाल्याशिवाय राहताना. दुसरें असें कीं, हैदराच्या फौजेची गणना जी त्यानें केली आहे तींत त्याचे धारवाड प्रांतीं ठाण्या ठाण्यांनीं पांच चार हजार उत्तम लोक होते, ते व मीरफैजुल्लाबरोबरचे आठ दहा हजार लोक धरिलेले नाहींत. असो. मराठ्यांशीं पुढें कशी कशी लढाई करावयाची ही मसलत ठरविल्यावर हैदरानें मीरफैजुल्लास पेशव्यांच्या तोंडावर धारवाडाजवळ ठेविलें व आपण ही वर सांगितल्याप्रमाणें साठ हजार फौजेसह बिदनूराहून निघून तुंगभद्रेच्या आसपास अनवडी येथें छावणी देऊन राहिला.

एप्रिल महिन्यांत मीरफैजुल्लानें गोपाळराव पटवर्धनाचा पराजय करून त्याची फार नासाडी केली असें कर्नल विल्क लिहितो, पण ही गोष्ट खरी असण्याचा संभव दिसत नाहीं. यासंबंधें त्याचें लिहिणें असें आहे,—" कृष्णेच्या उत्तरेस मिरज म्हणून किल्ला आहे, तेथील मराठा सरदार गोपाळराव याच्या कुमकेस पेशव्यानें बरीच फौज पाठवून त्यास हुकूम केला कीं, तूं कृष्णा उतरून थोरली फौज येईपर्यंत शत्रूस अडवून धर. गोपाळरावानें मीरफैजुल्लापेक्षां आपली फौज अधिक आहे, असें

पाहून त्याशीं लढाई करण्याचा निश्चय केला. पण त्या दोघांत एप्रिल महिन्यांत जी लढाई झाली तींत गोपाळरावाचा पराजय होऊन त्याची फार नासाडी झाली." पेशव्यांच्या बातमींत मीरफैजुल्लाची फौज पांच सहा हजार पायदळ, चार हजार स्वार व सोळा तोफा इतकी होती. (पहा ऐ.लें. सं.नंबर४१५) तेव्हां यापेक्षां अधिक फौज विल्कच्या लिहिण्याप्रमाणें गोपाळरावाजवळ असावयास पाहिजे; पण तशी ती या स्वारींत केव्हांही नव्हती. दुसरें असें कीं, ही लढाई एप्रिल महिन्यांत झाली असल्याचें कर्नल विल्क लिहितो, व पुढच्याच महिन्यांत (मेमध्यें) थोरल्या लष्करासह पेशव्यांची स्वारी धारवाडाकडे आल्याचें कळवितो, हेंही खोटें आहे. कारण, एप्रिलांतच मुळीं पेशव्यांनीं हुबळी घेतली, सावनूरकरांची भेट घेतली व तुंगभद्रेकडे कूच केलें. तेव्हां हें सारेंच लिहिणें असंबद्ध असून यास आधार म्हटला तर मीरफैजुल्लाची पटवर्धनांच्या एखाद्या बारीक सारीक टोळीशीं यापूर्वी कधीं लहानशी चकमक झाली असेल. आणि तिचें वर्णन कोणी मिथ्यानें सदरहू साहेबाजवळ फुगवून सांगितलें असेल! या वर्षाच्या एप्रिलांत किंवा कोणच्याही महिन्यांत गोपाळरावाची व मीरफैजुल्लाची लढाई झालेली नाहीं हेंच खरें; कारण, तशी लढाई होऊन पटवर्धनांची 'फार नासाडी' झाली असती तर त्याबद्दल कांहीं दाखला त्यांच्या दप्तरांत सांपडावा कीं नाहीं! पण या बाबतींत आम्हांस कोठेंच कांहीं उल्लेख केलेलासुद्धां दृष्टीस पडला नाहीं. विल्कची चूक झाली ती झालीच, पण डफसाहेबानींही विशेष चौकशी न करितां तोच मजकूर आपल्याही पुस्तकांत उतरून घेतला!

श० १६८८ च्या चैत्रांत रावसाहेब पेशवे मनोळीहून सर्व सैन्यासह कूच करून धारवाडकडे येऊं लागले, तेव्हां मीरफैजुल्ला मागें हटत हटत सावनूरच्या दक्षिणेस दहा कोसांवर हनगल म्हणून गांव आहे तेथपर्यंत गेला. तेथें त्यानें छावणी तयार केली. तिच्या दोन बाजूंस दोन तळीं व पिछाडीस झाडी असून पुढच्या तोंडीं खंदक खणिलेला होता व बातेऱ्या बांधिलेल्या असून त्यांवर तोफा ठेविलेल्या होत्या. मराठे अगदीं जवळ आले तेव्हां याही छावणींत राहणें धोक्याचें वाटल्यामुळें तो अनव-

डीस हैदर होता त्यास जाऊन मिळाला. रावसाहेबांनीं धारवाडासमीप येऊन मुक्काम केला, तो किल्ला फार बळकट असून त्यांत हैदराचें लढाऊ सामान व शिबंदी भरपूर होती. मुख्य किल्लेदार खुद्द मीरफैजुल्याचा भाऊ होता. हा किल्ला घेण्याच्या भरीस पडलों तर बहुत काळ येथेंच खर्च होऊन मोहिमेचे दिवस निघून जातील व पुढील मनसबे तसेच राहतील; असा विचार करून रावसाहेब हुबळीस गेले. तेथें नवी व जुनी हुबळी अशीं दोन ठाणीं होतीं. दोन्हीं ठाणीं भक्कमच होतीं, पण त्यांत जुन्या हुबळीचा बंदोबस्त विशेष चांगला होता. तेथें हसनअल्लीखान नामक शूर किल्लेदार होता व तुळजोपंत म्हणून एक ब्राह्मण अधिकारी होता. हैदरानें तुंगभद्रेच्या उत्तरेस मराठ्यांचें जितकें राज्य घेतलें होतें, तें सर्व तुळजोपंताच्या हवालीं केलेलें होतें. हाच त्या सर्व मुलखाचा वसूल घेऊन हैदरास देत असे. नव्या हुबळीस गोपाळरावानें वेढा घालून तें ठाणें लवकरच काबीज केलें. जुन्या हुबळीवर पेशव्यांच्या फौजेनें हल्ला केला, तेव्हां किल्लेकऱ्यांनीं तो मारून काढिला. त्या प्रसंगीं पेशव्यांचे पांचपन्नास लोक ठार झाले व तीनचारशें जखमी झाले. घनसिंग म्हणून पेशव्यांच्या लोकांतला एक शूर शिपाई होता तो याच ठिकाणीं पडला, व रामचंद्र गणेश या प्रख्यात सरदाराच्या मनगटास गोळीची जखम लागली. दुसरे दिवशीं किल्लेकरी शरण आले व नव्या हुबळींतही पेशव्यांचें ठाणें बसलें. तेथें हसनअल्लीखान व तुळजोपंत सांपडले त्यांस कैद करून कोपळच्या किल्यावर पाठवून देण्यांत आलें. तेथून रावसाहेब निघून सांवशी व कुंदगोळ यांमध्यें ओढा आहे त्या ठिकाणीं मुक्कामास उतरले. तीं दोन्हीं ठाणीं गोपाळरावानें हस्तगत केलीं. विसाजी नारायण व नरसिंगराव धायगुडे यानीं जाऊन गदग घेतलें. नवलगुंद, बेहट्टी, मुळगुंद, जालिहाळ व इतर पुष्कळ ठाणीं थोडक्याच दिवसांत हातीं आलीं.

एप्रोल

नंतर रावसाहेबांची स्वारी चैत्र शु० १४ स सावनुरास गेली, व त्या शहरा पासून दोन कोसांवर तळ देऊन राहिली. तेथील नबाब अबदुल हकीमखान याचें हैदरानें सर्वस्व लुटून घेतल्यामुळें त्याची इतकी हला-

स्ती होती कीं, त्याजवळ हत्ती होता तो रोडका होता, ह्मणून आधीं एक चांगला हत्ती श्रीमंतानीं त्याजकडे पाठवून दिला, व त्यावर बसून नबाबाची स्वारी भेटीस आली! त्यास आणावयास विंचूरकर व नारो शंकर गेले होते. श्रीमंतही दुसऱ्या दिवशीं नबाबाच्या भेटीस सावनुरांत गेले होते. नबाबानें त्यांस मेजवानी करून त्यांचा बहुत सन्मान केला. तिसरे दिवशीं नबाब पुनः भेटीस आला, तेव्हां श्रीमंतांनीं त्यास हत्ती, घोडे, शिरपेंच व त्याच्या दोन मुलांस पदकें दिलीं. त्याप्रसंगीं पुढें मसलत कशी करावी यासंबंधें बाटाघाट झाली. तो नबाब हैदरास फार भीत असे. आपण मराठ्यांस मिळालों याबद्दल हैदरास फार संताप आला आहे, व तो केव्हां अकस्मात् झडप घालून दगा करील याचा नेम नाहीं, हें त्यास कळून चुकलें होतें. त्याच्या राजधानीशेजारीं बंकापुरास हैदराचें ठाणें होतें हें त्यास मोठें शल्य झालें होतें. सदरहू ठाणें आधीं काबीज करून तेथून शत्रूचा नायनाट करावा, ह्मणजे आपण काळजींतून मुक्त होऊं; असें नबाबाचें पेशव्यांजवळ बोलणें पडलें. परंतु ही मसलत ऐकून पेशव्यांचा परिणाम लागला नसता. त्यांस शत्रूचें जलदीनें पारिपत्य करून मोहीम शेवटास नेण्याकरितां दूरवर नजर फेंकून मसलत योजणें जरूर होतें. त्यानीं विचार केला कीं, जोंपर्यंत शत्रु झाडी धरून बसल्यामुळें त्याचें पारिपत्य आपल्या हातून झालें नाहीं, तोंपर्यंत आपण कितीही ठाणीं घेतलीं तरी तीं आपलीं झालींच असें ह्मणतां येत नाहीं. कारण कीं, आपण दूर गेलों ह्मणजे शत्रु पुनः येऊन तीं ठाणीं घेण्यास चुकणार नाहीं. असें झालें म्हणजे घेतलेला मुलूख पुनः त्याच्या हातीं जाणार. नंतर पुनः आपण येऊन ठाणीं व मुलूख घ्यावा, पुनः त्यानें घ्यावा, असें हें किती दिवस चालणार! या करितां कसें ही करून तो झाडींत दडून बसला आहे त्यास मैदानांत ओढून आणिलें पाहिजे. असा विचार करून त्यांणीं मसलत योजिली कीं, तूर्त सर्व गोष्टी बाजूस ठेवून आपण थेट तुंगभद्रापार चित्रदुर्ग व हरपनहळ्ळी या मुलखांत जावें व तेथून खंडणी वसूल करून शत्रूकडे गेलेल्या त्या दोघा संस्थानिकांस साधल्यास आपणाकडे मिळवून घ्यावें. हैदराच्या पिछाडीस जाऊन तिकडील मुलूख उद्वस्त करावा, आणि

गुत्तीहून मुरारराव घोरपडे चार हजार फौजेसह आपणाकडे येत आहे, त्याच्या येण्याचा मार्ग सुलभ करून द्यावा. आपण दूर गेल्याची हुलकावणी दाखविल्यामुळें हैदर मैदानांत येऊन ठाण्यांस उपद्रव देऊं लागेल तर आपण तावडतोब दौड करून परत येऊन त्यास गांठावें व त्याच्या सैन्याचा संहार करावा. तसें तो न करील तर फौजेचें चार दिवस पोट भरून कांहीं ऐवज खंडणीचा मिळेल तर तेंही इष्टच आहे. श्रीमंतांस ऐवजाची तरतूद करण्याचें मोठेंच संकट येऊन पडलें होतें. त्यांची घोडे-स्वारांची बहुतेक फौज होती ती निरनिराळ्या जहागीरदारांनीं आणिलेली होती. तिजबद्दल त्यांवर पैक्याचें जोखीम नव्हतें. हुजरातीपैकीं कांहीं फौज मात्र त्यानीं स्वतः ठेविलेली होती तिची ही नालबंदीच्या रूपानें अर्धे वेतन आगाऊ मिळाल्यामुळें समजूत झालेली होती. पैक्याबद्दल तिचा कांहीं तूर्त तगादा नव्हता. पण गारदी व तोफखाना व इतर कारखाने व शागिर्दपेशा वगैरे जातखर्च यांचे रोजमुरे दरमहाचे ठरावून दिलेले होते. तो ऐवज आमच्या अजमासें दहा बारा लक्षांचा होत होता, तो त्यांस महिनेमहा उभा करणें प्राप्त होतें. ते पुण्यास नाना फडणिसांकडे व नाशिकास दादासाहेबांकडे वारंवार पत्रें पाठवीत कीं, कसेंहीकरून कांहीं द्रव्य स्वारींत पाठवून द्या. पण त्यांचा खर्चच भागवितां भागवितां त्यांस पुरे झालें होतं, तेव्हां तिकडून मदत होण्याचा मार्ग खुंटला होता. एतावता द्रव्य मिळविण्यासाठीं तरी त्यांस ही मसलत करणें जरूर पडलें होतें. ही मसलत पक्की ठरलीसें पाहून सावनूरकरानें श्रीमंतांस विचारिलें कीं, तुम्हीं तर मला सोडून दूर चाललां, पण तुम्हीं गेल्यावर इकडे हैदर येऊन माझा गळा दाबील त्याची वाट काय ? तो नबाब श्रीमंताच्या पदरीं पडला होता तेव्हां त्याचें संरक्षण करणें त्यांस भागच होतें. त्यांनीं त्याचे पांचशें स्वार व एक पुत्र यांस समागमें स्वारीबरोबर घेऊन त्या नबाबास सावनुरास जाण्यास निरोप दिला. तूर्त त्याच्या रक्षणाकरितां महिपतराव कवडे, धोंडो दत्तात्रय व महिपतराव चिटणीस या सरदारांचीं तीन पथकें मिळून दोन हजार स्वार श्रीमंतांनीं सावनुरास पाठविले, व गोपाळराव पटवर्धन शिरहट्टीस वेढा घालून बसला होता, त्यासही तें काम झाल्याबरोबर कोठें

दुसऱ्या स्थळास न गुंततां थेट सावनुरास जाऊन राहण्याविषयीं ताकीद केली. शिरहट्टी हस्तगत होवो अगर न होवो, आम्ही परत येईतोंपर्यंत जेणेंकरून सावनूरकरास हैदराचा उपद्रव न होईल ती तजवीज तुम्हीं करावी, आणि हैदर मैदानांत उतरतो असें दृष्टीस पडतांच आम्हांस तातडतोब लिहून कळवावें, अशी त्यांची गोपाळरावास ताकीद होती.

याप्रमाणें बंदोबस्त करून रावसाहेब करजगीस गेले; व तुंगभद्रा पार होऊन हावनुरावरून चित्रदुर्गाकडे चालले. ही बातमी हैदरास कळतांच तो स्वार, पायदळ व तोफखाना वगैरे जय्यत तयारी करून अनवडीची छावणी सोडून सावनुरकराच्या राज्यांत रटेहळ्ळी येथें आला, व तेथें छावणी करून आसपास निधास्तपणें फौज घेऊन घिरट्या घालूं लागला. तो बंकापुरापासून पांच कोसांवर आल्याची बातमी सावनुराहून व इतर ठिकाणांहून आठ दहा दिवस लोटले नाहींत तोंच रावसाहेबांकडे आली. त्याच क्षणीं त्यांनीं लष्कर त्वरेनें परत फिरविलें; शिरहट्टीचा वेढा उठवून निघून येण्याविषयीं गोपाळरावास लिहिलें, आणि लष्कराच्या कांहीं टोळ्या इकडे तिकडे गुंतल्या होत्या त्याही एकत्र जमा केल्या. चैत्र वद्य अमावास्येच्या सुमारास रावसाहेब सावनुरच्या आसपास आले, तों त्यांजवळ चाळीस हजार फौज जमली. नंतर वैशाख शुद्ध द्वितीयेस त्यांनीं विठ्ठलराव विंचूरकर व गोपाळराव पटवर्धन यांस हैदर कोठें आहे, त्याच्या छावणीचा बंदोबस्त कसा काय आहे, त्याची फौज किती आहे ही बातमी आणण्याचा हुकुम केला. त्याप्रमाणें ते आठ नऊ हजार घोडेस्वार बरोबर घेऊन हैदराचा तपास काढीत चालले.

रटेहळ्ळीस हैदरानें येऊन छावणी केल्याचें पूर्वी लिहिलें आहे. ती छावणी राखण्याचें काम मीरफैजुल्लावर सोंपवून तो पंचवीस हजार निवडक गारदी व पंचवीस तोफा व कित्येक हजार स्वार बरोबर घेऊन बाहेर पडला तो तुंगा व भद्रा या नद्यांचा हरिहर येथें संगम होतो तेथपर्यंत आला. पेशवे तुंगभद्रापार झालेले असतांही एकाएकीं त्वरेनें परत फिरले व आतां ते आपल्या छावणीवर चाल करून येत आहेत अशी त्यास तेथें बातमी कळली. त्यावरून तोही झपाट्यानें मजल करीत रटे-

३ मे

हळ्ळीसमीप येऊन ठेपला. इतक्यांत पटवर्धन व विंचुरकर यांची फौज त्याच्या दृष्टीस पडली. ती पहातांच त्यानें विचार केला कीं; मराठ्यांची ही एवढी लहानशी फौज आगती आपण होऊन जवळ आली आहे. हिला लढाईस गुंतवून हळूहळू आपल्या छावणीकडे ओढीत आणावें, आणि एकीकडून आपण व दुसरीकडून मीरफैजुल्ला असें एकदम तुटून पडून ही सबंध फौजची फौज कापून काढावी! पण किती झालें तरी या 'गनिमी काव्या' मध्यें हैदर हा अजून कच्चा चेला होता. त्याला मराठे कसे दाद देतील? तो त्यांस ओढूं पहात होता, पण तेहि त्यास मैदानांत ओढून आणण्याकरितांच आले होते हें त्यांस काय टाऊक? दोघांची झटपट सुरू झाली आणि तींत हैदर अगदीं पक्का फसला. इकडे हैदरास युद्धांत गुंतवून गोपाळरावानें मागें रावसाहेब पांच कोसावर येऊन पोंचले होते त्यांस निरोप पाठविला कीं, आम्हीं शत्रूस मैदानांत आणीत आहों, तुम्हीं लौकर निघून यावें. हैदरावर मराठ्यांची फौज तुटून पडण्याचा आव दाखवी, स्वारां स्वारांची मिठी पडे, कांहीं गोळागोळी होई, बारीक बारीक हिरि[1]ऱ्या होत, तोफा मारीत तो पुढें चालून आला, म्हणजे हे मागें सरत. पुनः तो मागें हटूं लागला म्हणजे हे जाऊन त्यास भिलगत. तेव्हां त्यास धुडकावून लावण्याकरितां तो आणखी पुढें सरे. असें करितां करितां, बुणगें मागें राहून आपण तीन कोस पुढें मैदानांत आलों हें हैदरास कळलें सुद्धां नाहीं!

गोपाळरावाचा निरोप येतांच रावसाहेब सारी फौज घेऊन दौड करीत सायंकाळच्या चार घटका दिवसास समरांगणांत येऊन दाखल झाले. आज युद्धप्रसंग होईलच अशी त्यांची खात्री नव्हती, व अर्थात् तयारीहि नव्हती. इतक्या घाईनें येतां येतां त्यांनीं फक्त दोन तोफा बरोबर आणिल्या होत्या, त्यांचा शत्रूवर तात्काळ मारा सुरू झाला. एका घटकेपूर्वीं मराठ्यांची लहानशी फौज समोर दृष्टीस पडत होती, पण चोहोंकडे नजरेचा पल्ला पुरेपर्यंत कोसानकोस पसरलेलें व समुद्राच्या लाटाप्रमाणें उचंबळणारें हें घोडेस्वारांचें असंख्य सैन्य आतांच कोठून निर्माण झालें? असा हैदरास विचार पडून

१ हिरिरी—फिरकोळ हल्ला.

त्यास पराकाष्ठेची भीति वाटली, व तो छावणीकडे परत निघाला. शत्रूच्या फौजेनें लगट केली म्हणजे उभें राहून तोफाची मारगिरी करून त्यांस मागें सारावें व पुनः वाट चालूं लागावें, अशी त्यानें शिस्त धरिली. पण इतक्यांत रावसाहेबांनीं ही त्यास जखडून धरण्याची तजवीज केली. उजव्या बाजूस पटवर्धन, डावीकडे नारो शंकर, पिछाडीस विंचूरकर व तोंडावर हुजरातेसह खासा रावसाहेब राहिले व हल्ल्यावर हल्ले करून शत्रूस चोंहोंकडून त्यानीं कोंडून धरिलें. हैदराचे गोलंदाज फ्रेंच लोकांनीं तयार केलेले होते, त्याची दारू फार चांगली, व तोफाही जलद बाराच्या व लांब पल्ल्याच्या होत्या. पण त्यांची मारगिरी चोंहोंकडे पसरलेल्या व चळवळणाऱ्या मराठी सैन्यास फारशी हानिकारक झाली नाहीं. मराठ्यांच्या मात्र दोनच तोफा होत्या तरी त्यांचे गोळे हैदराच्या पलटणांच्या भरगच्च रांगांत जाऊन पडूं लागल्यामुळें त्याची अतोनात नासाडी झाली. पण हैदरही कांहीं सामान्य सेनापति नव्हता. इतकी दुर्दशा झाली, तरी त्यानें आपला बंदोबस्त विसकळीत होऊं दिला नाहीं व छावणीकडे जाण्याचा नेटही सोडिला नाहीं. आणखी प्रहर सहा घटका दिवस असता तर त्याचा कितपत निभाव लागता हें निराळें, पण रात्र जवळ येत चालल्यामुळें त्याच्या जिवास धीर आला होता. सूर्यास्ताच्या वेळीं शत्रूवर चोंहों कडून एकाच वेळीं हल्ला करण्याविषयीं रावसाहेबांनीं हुकूम केला. त्या बरोबर हुजरातेनें बेजरब चालून घेतलें, व तिकडून पटवर्धनांनींही हल्ला केला, परंतु बाकीच्या फौजेनें कुचरपणा केला. हा शेवटचा हल्ला सोशिला म्हणजे आजच्या प्रसंगांतून आपण निभावलों, असें मनांत आणून हैदरानें-ही सारें अवसान गोळा करून बंदुकांचा व अजालांचा भयंकर मारा केला व अशल्या निकडीच्या प्रसंगासाठीं एवढा वेळ तोफांत छरे भरून ठेविले होते, त्यांचीही याच वेळीं सरबत्ती केली. शिवाय त्याच्या सुदैवानें याच वेळीं सोसाट्याचा वारा सुटून धुळीचे लोट उठल्यामुळें हल्ला करणाऱ्यांस पुढें कांहीं दिसेनासें झालें. यामुळें हा हल्ला व्यर्थ झाला. हैदरास असेंच रात्रभर कोंडून धरावें असा गोपाळरावाचा सल्ला होता, परंतु तसें करणें शक्य आहे, असें रावसाहेबांस वाटलें नाहीं. त्यानीं सर्व फौज गोटास परत

नेली, व हैदरही आपल्या छावणींत सुखरूप जाऊन पोंचला.

याप्रमाणें ही रटेहळ्ळीची लढाई झाली. हींत मराठ्यांचें माणूस ठार व जखमी मिळून पांच पन्नासाच्या आंतच होतें. शेवटच्या हल्ल्यांत हुजरातीचे शंभर घोडे पडले व साऱ्या युद्धांत आणखीही कांहीं पडले असतील. एकंदरींत हें कांहीं म्हणण्याजोगें नुकसान नाहीं. हैदराचें मात्र नुकसान फार मोठें झालें. कारण त्यानें अतिश्रमानें कवाईत शिकवून तयार केलेले शेंकडों, किंबहुना हजारों गारदी या लढाईंत पडले असावे, असा विल्कच्या लिहिण्याचा रोंख दिसतो. या लढाईपासून हैदराच्या फौजेस मराठ्यांची दहशत बसली, एवढें मात्र निर्विवाद आहे.

दुसऱ्या दिवशीं रावसाहेब सर्व सैन्यासह रटेहळ्ळी समीप आले. तेव्हां त्यांचा तोफखाना आदले दिवशीं मागें राहिला होता तो आतां येऊन पोंचला होता. त्यांनीं त्या तोफखान्याचा मारा हैदराच्या छावणीवर करून त्याचें सारें लष्कर हालवून दिलें. तोही आपल्या बातेऱ्यांवरून तोफांचा मारा करूं लागला. याप्रमाणें दोन चार दिवस झालें. वैशाख शुद्ध सप्तमीच्या दिवशीं तो छावणी सोडून झाडींत शिरण्याकरितां निघाला असतां मराठ्यांनीं त्यास तोफांचा असा मार दिला कीं, त्यास घाईनें पुनः छावणींत शिरणें भाग पडलें. अष्टमीच्या दिवशीं सावनूरकर नबाब व मुराराव घोरपडे लष्करांत येऊन दाखल झाले. रावसाहेबांनीं मुरारावाचा बहुत सन्मान केला. आपला चुलत आजा संताजीराव घोरपडे सेनापति यानें असंख्य पराक्रम करून राज्यरक्षण केलें असतां राजाराम महाराजांनीं नाहक छळ करून त्यास ठार मारविलें; त्या संताजीरावाचें सेनापतीचें पद आतां तरी मला मिळावें, असें मुराररावाचें म्हणणें होतें तें मान्य करून रावसाहेबांनीं त्यास तें पद दिलें. त्या पदाची जहागीर गुजराथ प्रांत गायकवाडाकडे होता, तो मुराररावास मिळण्याचा मार्गच नव्हता, आणि या समयीं रावसाहेबांनीं कर्नाटकापैकींदिखील कांहीं नवीन जहागीर त्यास दिल्याचा कोठें उल्लेख आढळला नाहीं. तेव्हां मुराररावास जो हा सेनापतीचा किताब मिळाला, तो सांप्रतच्या सरकारानें कैलासवासी अलिजाबहादर जयाजीराव शिंदे यांस दिलेल्या 'कमांडर-इन्-चीफ्' च्या

किताबाप्रमाणें निव्वळ 'सन्मानार्थकच' होता! कदाचित् मुरारराव हा मोंगलाचा जहागीरदार असल्यामुळें आजपर्यंत पेशव्यांस खंडणी देण्यास पात्र होता, तेवढी खंडणी मात्र त्यास इतउत्तर माफ झाली असावी.

अनवडीस पूर्वी हैदराची छावणी होती तेथपासून रटेहळ्ळीपर्यंत दाट झाडी होती, व रस्ताही फार अडचणीचा होता. या झाडीस मासूरची बारी म्हणत असत. या बारींतून अनवडीकडून हैदराच्या लष्करास धान्य वगैरे सर्व सामानाचा पुरवठा होत होता. सावनूरकर व मुराररराव आल्यानंतर रावसाहेबांनीं असें ठरविलें कीं, मासुरची बारी रोखून तिकडून शत्रूस धान्य व वैरण मिळत असते ती बंद करावी, आणि त्याच्याच छावणींत त्यास चोंहोंकडून घेरा घालून तोफांचा मार देऊन जेरीस आणावें. हें ठरल्यावर दुसऱ्या दिवशीं विसाजी कृष्ण बिनीवाले यानें बारींत शिरून तिकडून हैदराची कही येत होती, तिजवर छापा घालून सामान लादलेलीं उंटें व तट्टें वळवून आणिली. तेव्हां हैदरानें विचार पाहिला कीं, आपल्या सैन्यांत दहशत बसली असल्यामुळें त्याच्या हातून पराक्रम तर कांहीं होत नाहीं. येथें रहावें तर फुकट मार खाऊन शिवाय उपाशी मरण्याची पाळी येणार. यापेक्षां तूर्त पलायन करणेंच श्रेयस्कर होय! असा विचार करून तो एका रात्रीं हळूच उठून साऱ्या लष्करासह बारीमध्यें दाट झाडी आहे तींत शिरला, आणि मायनहळ्ळी म्हणून मासुरापासून तीन कोसांवर स्थळ आहे तेथें त्यानें मुक्काम केला. तो छावणी सोडून गेल्यावर दुसऱ्या दिवशीं विंचूरकर, आबा पुरंदरे, बिनीवाले व सखारामबापू अशीं चार पथकें बारी ओलांडून मासुरापर्यंत गेलीं होतीं. तेथें झाडी अतिशय असल्यामुळें ते सरदार एका टेंकडीवर चढून हैदराचें लष्कर कोठें कसें राहिलें असावें याचा अजमास काढीत होते, इतक्यांत त्यानें लपत छपत भलत्याच वाटेनें अकस्मात् येऊन त्यांवर तुटून पडून त्यांस बारीपार हुसकून लाविलें! ते बेफाम नव्हते यामुळें बचावले, नाहीं तर त्यांचा नाश फारच झाला असता.

मायनहळ्ळी ही डोंगरांत दाट जंगलांतली जागा असल्यामुळें तेथें घोडेस्वारांचा कांहीं इलाज चालण्याजोगा नव्हता. आणि त्या घांटमाथ्याच्या

आसपासच्या भागीं आतां पर्जन्य पडूं लागल्यामुळें लष्कर फार हैराण झालें. वैरण कोठेंही मिळेना. धान्याची अतिशय महागाई झाली. यामुळें यंदां हैदराचें झालें इतकेंच पारिपत्य बस्स झालें, असें मानून तेथून लष्कर परत आणणें रावसाहेबांस प्राप्त झालें. परंतु पावसाळ्यांत या प्रांतींच छावणी करावी, कीं परत पुण्यास जावें; हा त्यांस मोठा विचार पडला. हैदरानें पंचवीस तीस लक्ष रुपये खंडणी दिली तर तूर्त पुरता तह करून पुण्यास जाण्याचा त्यांचा विचार पूर्वींच ठरला होता. परंतु हैदरास मोठी आशा ही होती कीं, मराठ्यांचें लष्कर छावणीस या प्रांतीं राहणार नाहीं. तें परत जाईल आणि मग पुनः सारा मुलूख आपलाच होईल. हैदर व पेशवे यांमध्यें जें हें युद्ध सुरूं झालें होतें, तिकडे साऱ्या दक्षिण हिंदुस्थानाचें लक्ष वेधलें होतें. हैदराच्या पराक्रमाविषयीं व शहाणपणाविषयीं आतां कोणास संशय उरला नव्हता. मराठे लोक त्यास भारी आहेत हेंही सर्वांस कबूल होतें. परंतु त्या लोकांचें पानपतच्या स्वारीपासून दैव फिरलें व त्यांचें साम्राज्य नष्ट झालें, अशीच हिंदुस्थानांतील इतर प्रांतांच्या लोकांची समजूत झाली होती. ही समजूत चुकीची आहे व आपल्या राष्ट्राचा जोम अजून पहिल्याप्रमाणेंच कायम आहे, हें जणूं काय सर्व लोकांस जाहीर करण्याकरितांच रावसाहेबांनीं पक्का निश्चय केला कीं, यंदां धारवाडच्या आसपास छावणीस रहावयाचें, आणि हैदराची पुरती खोड मोडल्याशिवाय परत म्हणून जावयाचें नाहीं.

हा निश्चय ठरल्यावर सारें लष्कर घेऊन रावसाहेब कुंदगोळापर्यंत परत आले. तेथें छावणीची व्यवस्था त्यांनीं केली. सावनूरच्या नबाबास धास्ती पडली होती कीं, या पावसाळ्यांत हैदर कांहीं आपला सूड घेतल्याशिवाय राहणार नाहीं. पेशवे छावणीस राहिले असताही त्यांच्या देखदेखत झाडीतून हैदरानें येऊन सावनूर घ्यावें ही गोष्ट त्यांस लांछनास्पदच होती व ती न होऊं देण्याची तजवीज करणें त्यांस अवश्य होतें. यासाठीं नबाबाची राजधानी राखण्याकरितां त्यांनीं एक हजार गारदी पाठविले व आणखी शिबंदी ठेवण्याकरितां त्या नबाबास पन्नास हजार रुपये दिले. सावनूरची कुमक वेळ पडल्यास करितां यावी म्हणून पटवर्धनांस या शहरापासून

दहा कोसांवर राहण्याचा त्यांनीं हुकूम दिला. इतकें झालें तरी नवाबास सावनुरास राहण्याची छाती झाली नाहीं. त्यानें आपली फौज मात्र सावनुरास पाठविली व आपण पेशव्यांबरोबर राहिला. लक्ष्मेश्वरास नारो शंकर राहिला. विंचूरकर, रास्ते व भोंसले नवलगुंदास राहिले. धारवाड प्रांतीं आतां हैदराच्या ताब्यांत मातबर अशीं तीन स्थळें राहिलीं होतीं. एक खुद्द धारवाड, दुसरें बंकापूर व तिसरें शिरहट्टी. या तिहींशिवाय पटवर्धनांच्या जहागिरीपैकीं श्रीमंतगड, येळवंती, व आणखीही कांहीं बारीक सारीक ठाणीं शत्रूच्या ताब्यांत होतीं. पैकीं बंकापुराला आणि सावनुराला गांठ होती. बाकीच्या ठाण्यांतील लोकांनीं बाहेर पडून मुलखास उपद्रव देऊं नये व हैदराची त्यांस कुमक पोंचूं नये, म्हणून त्या त्या रोखानें फौजेच्या टोळ्या रावसाहेबांनीं उतरविल्या. पावसाळा जवळ आला म्हणजे शिलेदार लोक, कोणाचें कांहीं एक न ऐकतां लष्कर सोडून घरीं यावयाचेच. त्याप्रमाणें याही मोहिमेंत प्रत्येक पथकांतले कांहीं लोक घरीं गेले. वर सांगितल्याप्रमाणें मुलखाच्या बंदोबस्ताकरितां फौजेची वांटणी करून काय दहा बारा हजार लोक राहिले तेवढेच बरोबर घेऊन रावसाहेब पूर्वेस मुद्गल सरकारांत [ सरकार म्हणजे जिल्हा ] व गदवालाकडे खंडणी जमा करण्याकरितां चालले. पावसाळ्यांतसुद्धां एका जागीं बसून विश्रांति घेण्यास त्यांस फुरसत मिळेना!

पेशवे छावणीस राहिले यामुळें हैदराची निराशा झाली, तथापि त्यांच्या मुलखास व सैन्यास हरएक यत्न करून चैन पडूं द्यावयाचें नाहीं, असा त्यानें निश्चय केला. सावनुरकरावर त्याचा किती रोष होता, हें व तो नवाब त्यास किती भीत असे, हें मागें सांगितलेंच आहे. सावनुरापासून तीन कोसांवर बंकापुर आहे तें ठाणें हैदराचें होतें, व तेथें त्याची दोन

जून. तीन हजार मराठे घोडेस्वारांची टोळी होती व कांहीं गारदीही होते. तेथें लालामिय्या नांवाच्या सरदाराबरोबर आणखी तीन हजार गारदी व कांहीं तोफा पाठवून त्यास त्यानें हुकूम केला कीं, तूं नेहमीं बंकापुरास राहून सावनुरास उपद्रव देत जा. त्यावरून तो मिय्यां स्वार, पायदळ व तोफा घेऊन येऊन नित्य सावनुरासभोंवतीं घिरट्या

घाली, त्या शहरावर तोफा मारी, गुरें वळवून नेई व शहराबाहेर कोणी लोक सांपडले तर त्यांस लुटून मारून टाकी. सावनूर व बंकापूर यामध्यें त्यानें एक चौकी बसविली होती. व त्याचे टेहळणीचे स्वांर व गारदी यानीं असा पक्का बंदोबस्त केला कीं, सावनुरांत धान्य, वैरण व इतर जिन्नस जाण्याचें बंद होऊन तेथील लोकांस उपाशी तरी मरावें किंवा शत्रूच्या स्वाधीन व्हावें, याखेरीज मार्ग राहिला नाहीं. ही त्यांची दुर्दशा श्रीमंतांस कळली, तेव्हां ते नुकतेच मुद्गल सरकारांत जाण्याकरितां निघाले होते. सावनूरच्या बंदोबस्त राखण्याकरितां आतां कोणा सरदारांस पाठवावें ही त्यांस मोठी पंचाईत पडली. स्वारीचा सर्व कारभार सखारामबापूकडे होता. तो अलीकडे श्रीमंतांवर व पूर्वी त्यांच्या पक्षाकडे पटवर्धन वगैरे सरदार होते, त्यांवर फार रुष्ट झाला होता. याचें कारण असें कीं, दीड वर्षापूर्वी रावसाहेब दादासाहेबांची घोडनदीवर वगैरे लढाई होऊन रावसाहेब आपल्या चुलत्याच्या स्वाधीन झाले होते, व सर्व कारभार दादासाहेब व सखारामबापू यांनीं करावा, आपण ते सांगतील त्याप्रमाणें चालूं, याप्रमाणें त्यांनीं कबूल केलें होतें. त्या वेळीं सखारामबापूनें आपल्या पक्षाच्या लोकांस संतुष्ट व सामर्थ्यवान करण्याकरितां त्यांस जहागिरी वगैरे दिल्या होत्या. त्यांत आबा पुरंदऱ्यास पुरंदरचा किल्ला दिला होता. हा बळकट किल्ला पेशव्यांच्या खासगत बंदोबस्ताखालीं असावयाचा अशी पूर्वापार वहिवाट होती. त्यामुळें तो पुरंदऱ्यानें उपटलेला पाहातांच रावसाहेबांच्या पक्षाच्या लोकांनीं फार गवगवा केला होता आणि ती गोष्ट त्यांस फारच असह्य झाली होती. त्यांपैकीं एका कारकुनाच्या चिथावणीवरून या वर्षाच्या वैशाखांत पुरंदरावर जुने वतनदार गडकरी कोळी लोक होते, त्यांनीं पुरंदऱ्याच्या लोकांस किल्ल्याबाहेर हांकून लावून किल्ला बळकाविला व जाहीर केलें कीं, आम्ही पुरंदऱ्यांस किल्ला देत नाहीं. श्रीमंतांचा अंमल मात्र आम्हांस कबूल आहे. ही बातमी नाशिकास दादासाहेबांजवळ आबा पुरंदरे होता त्यांस कळतांच तो सासवडास येऊन फौज चाकरीस ठेऊं लागला. तो पुणें लुटणार आहे अशी बातमी पसरली होती! पुरंदर कोळ्यांनीं घेतला यांत पेशव्यांचें किंवा पटवर्धनांचें बिलकुल अंग नव्हतें.

परंतु सखारामबापूस संशय आला होता कीं, पेशव्यांनीं किंवा आपल्या प्रतिस्पर्ध्यांनींच हें कृत्य करविलें असावें. याकरितां तो कारभाराविषयीं उदासीन होऊन पेशव्यांबरोबर छावणींत राहण्याविषयीं कुरकुरच करीत होता. इकडे सावनुरास कोण सरदार पाठवावा याची दरबारांत वाटाघाट होऊं लागली, तेव्हां स्वपक्षीय विंचूरकर किंवा नारो शंकर यांस न पाठवितां पटवर्धनांस या धोक्याच्या कामगिरीवर पाठवावें असा बापूनें आग्रह धरिला. पटवर्धनांची बहुतेक फौज देशीं आली होती व काय जवळ होती ती त्यांच्या जहागिरींत हैदराचीं ठाणीं होतीं तीं घेण्यांत गुंतली होती. लालामियासारख्या शूर व खटपटी सरदारानें घेरलेलें सावनूर संभाळण्यापुरती त्यांजवळ फौज नव्हती व पैशाच्या बाजूनेंही सांप्रत त्यांची फार हलाखी होती. हें सर्व ठाऊक असूनही सखारामबापूचा आग्रह पटवर्धनांनींच सावनुरास जावें असा पडला. त्यांनीं जात नाहीं म्हटलें तर तुमचे असे हे उर्मट सरदार आमचें ऐकत नाहींत, तर आम्हांसही कारभार करावयाचा नाहीं.' याप्रमाणें रावसाहेबांशीं कांहीं तरी निमित्तानें भांडून कारभाराचा राजीनामा देऊन व सारें अपेश पटवर्धनांवर ठेवून पुण्यास निघून येण्याचा या स्वारीचा कावा होता. परंतु गोपाळराव पटवर्धन तरी हरईचा मनुष्य होता. त्यानें सावनुरास जाण्याचें कबूल केलें. वैरणीबद्दल प्रत्येक घोडेस्वारास दररोज चार आणे सावनूरकरांनीं द्यावे, पंधरा दिवसपर्यंत कसेंही झालें तरी आपण सावनूर सांभाळितों, पंधरा दिवस झाल्याबरोबर श्रीमंतांनीं मोबदला फौज सावनुरास पाठवून आपणांस सोडवावें, या प्रमाणें गोपाळरावाच्या शर्ती होत्या. त्या रावसाहेब व सखारामबापू यांनीं कबूल केल्या. त्याच्या फौजेचा तळ त्यावेळीं नवलगुंद येथें होता. येथें वामनराव, मोरोबा व माधवराव अण्णा यांस बुणग्यासह ठेवून नीलकंठराव, कोन्हेरराव, परशुरामभाऊ व नारायणराव यांसह सड्या स्वारीनें तो ज्येष्ठी पौर्णिमेच्या सुमारास सावनुरास आला. त्या वेळीं त्याबरोबर फक्त बाराशें स्वार होते! तेथें गेल्यावर तिसऱ्याच दिवशीं नीलकंठराव व नारायणराव स्वारांची एक टोळी घेऊन सावनुरांतून बाहेर पडले ते थेट लालामियाच्या चौकीवर चालून गेले व तीमधील दोन

तीनशें स्वार व गारदी कापून काढून त्यांनीं चौकीचा विध्वंस केला. पुनः एका प्रसंगीं बंकापुरच्या स्वारांची व पटवर्धनांची गांठ पडून लढाई झाली; तींत त्यानीं शत्रूच्या स्वारांस मोडून बंकापुरपर्यंत पिटाळीत नेलें व त्यांपैकीं पुष्कळांचे घोडे हिसकून घेतले. पटवर्धनांची फौज रोज सावनुरांतून बाहेर पडे व बंकापुरपर्यंत दौड करून येई व शत्रूचे लोक जे तावडींत सांपडत त्यांस लुटून मारून टाकी. असें होऊं लागतांच लढाईचें पारडें फिरून आजपर्यंत बंकापुरकरांची सरशी होती, ती नाईशी झाली. त्यांचा सावनुरास शह बसला होता, तो दूर होऊन उलट पटवर्धनांचाच त्यांस शह बसला. त्यांच्या कहीवर पटवर्धनांची वारंवार धाड येऊन कहीचीं घोडीं व उंटें त्यांच्या हातीं जाऊं लागलीं, व कहीबरोबरची फौजही लुटली व मारिली जाऊं लागली. त्यामुळें त्या ठाण्यांतील लोकांस बाहेर फिरकण्याची छाती होईना. धान्याचा व वैरणीचा दुष्काळ पडला. सर्व प्रकारें लालामियांच्या नांड्या आंखडल्यामुळें त्यानें आपल्या संकटाचें रडगाणें अनवडी येथें छावणी करून हैदर राहिला होता त्यास लिहून पाठविलें.

गोपाळरावाची व हैदराची जानपछान अलीकडे पांच सात वर्षांत चांगलीच झाली होती. एकमेकांचे डावपेंच एकमेकांस चांगले माहीत झाले होते. असें असूनही या वेळीं पुनः एकदां गोपाळरावाचा दग्यानें समूळ नाश करण्याचा हैदरानें संकल्प केला! तो पंधरा हजार गारदी, सहा हजार स्वार, व कांहीं तोफा घेऊन अनवडीहून निघाला तो सावनुरापासून दहा कोसांवर हनगल येथें आला. तेथें तीन चार मुक्काम करून इकडे तिकडे जाण्याच्या हुलकावण्या दाखवून ही स्वारी अकस्मात् एके दिवशीं संध्याकाळा सान्या फौजेसह कूच करून पहाटेच्या दीडप्रहर रात्रीस बंकापुरास आली, व तेथें चार सहा घटका विश्रांति घेऊन तेथून निघून सावनूर व बंकापुर यांमध्यें एक ओढा आहे तेथें मल्यां पहांटेस येऊन पोंचली! या ओढ्यांत त्यानें फौजेच्या दोन टोळ्या करून त्यांस दबा धरून बसविलें, आणि फक्त पांचशें स्वार मात्र ओढ्यापलीकडे कांहीं अंतरावर सावनूरच्या बाजूस उभे केले. पटवर्धनांची फौज हररोज सकाळीं

सावनुरांतून निघून बंकापुरच्या रानांत येऊन उभी राहत असे. त्याप्रमाणें ती आवडी येईल व आपले स्वार पाहतांच त्यांच्या पाठीस लागत या ओढ्यांत आपोआप येईल. वशी ती आली म्हणजे दोहींकडून एकदम दबा उठवून सारी फौजची फौज जिवंतच धरावी, असा हैदराचा कावा होता. पण असल्या काव्यानें गोपाळराव कसचा फसतो! त्यास ही सर्व बातमी कळली होती. त्यानें वेळवखत पडेल त्याप्रमाणें वागतां यावें म्हणून फौज तयार करून सावनुरांत ठेविली, व फक्त दीडशें स्वार बाहेर पाठवून दिले. त्या स्वारांस त्याची ताकीद होती कीं, तुम्हीं साधेल तर शत्रूच्या स्वारांस सावनुराकडे ओढून आणावें, पण ओढ्याकडे कांहीं झालें तरी जाऊं नये. टेहाळणी करीत दुरून दुरून फिरत असावें. त्याप्रमाणें हे स्वार ओढ्यापासून पाऊण कोसावर जाऊन उभे राहिले. यांनीं त्यांस व त्यांनीं यांस आपापल्या बाजूकडे ओढण्याचा पुष्कळ यत्न केला, पण जागा दोघां-नींही सोडिली नाहीं! रातभर जागून लांब मजल करून आलेला हैदर उपाशीं उन्हातान्हांत पंधरा हजार गारदी व सहा हजार स्वार घेऊन शत्रू आतां येतील, घटकेनें येतील, म्हणून आशेनें वाट पहात ओढ्यांतच संध्या-काळपर्यंत बसून खजील होऊन बंकापुरास परत गेला. त्या दिवशीं त्याच्या जिवास इतका त्रास झाला कीं, रात्रीं तो कोणाशीं एक शब्दही बोलला नाही व जेवला नाहीं!

आपण जाळें पसरलें होतें, त्यांत पटवर्धन सांपडले नाहींत म्हणून हैदरास इतका क्रोध आला होता कीं प्राण गेला तरी बेहेत्तर, पण आतां सावनूर काबीज करून जमीनदोस्त केल्याशिवाय राहणार नाहीं, असा त्यानें निश्चय केला आणि तो तडीस नेण्याची तयारीहि चालविली. ती पाहतांच सावनूरच्या लोकांत मोठी भीति व गडबड उत्पन्न होऊन जो तो पळून जाण्याच्या उद्योगास लागला. गोपाळराव पंधरा दिवसांच्या मुदतीनें तेथें आला होता, परंतु ती मुदत होऊन गेली तरी मोबदला फौज त्यास सोडविण्याकरितां यावयाची होती ती आली नाहीं. ठरल्याप्रमाणें साव-नूरकराकडून वैरणीचा पैकाही मिळाला नाहीं. सर्वप्रकारें गोपाळरावाची हलाखी होती, तरी आपल्या नांवालौकिकास अनुरूप असा पराक्रम

करून त्यानें इतके दिवस टिकाव धरिला. प्रस्तुत प्रसंगीं हैदराचा वेढा सावनुरास बसणार, असें पाहून तेथील लोक फारच घाबरून शहर सोडून जाण्याचा विचार करूं लागले, तेव्हां गोपाळराव नबाबाच्या वाड्याच्या सदरेस जाऊन बसला, आणि तमाम लोकांस बोलावून आणून धीर देऊन शहरच्या चौक्या त्यांस वांटून दिल्या व हैदराच्या फौजेशीं सावनूर निकरानें झुजविण्याची तयारी केली. त्यानें सर्वांस सांगितलें कीं, नबाबाची मुलें माणसें येथें आहेत, त्यांची जी गत होईल तीच माझीहि होईल. या संकटांत मी तुह्मांस सोडून कधीं जाणार नाहीं.

हैदर जेव्हां हनगलास आला, तेव्हांच त्याच्या मनांत सावनुरावर चालून यावयाचें आहे, असें गोपाळरावास वाटलें होतें. त्याप्रमाणें टाकोटाक रावसाहेबांकडे तें वर्तमान लिहून पाठविलें होतें. त्यावेळीं ते मुद्गल सरकारांत शिदनूर येथें होते. गोपाळरावाचें पत्र जातांच तें ठाणें काबीज करण्याकरितां तेवढा एक दिवस राहून दुसऱ्या दिवशीं आषाढ शु॥ षष्ठीस ते परत निघाले, ते आठ कोस मजल करून आले. विंचुरकर, रास्ते शहाजी भोंसले व नारो शंकर धारवाडच्या आसपास होते, त्यांस तावडतोब गोपाळरावाच्या कुमकेस जाण्याकरितां श्रीमंतांचा हुकूम झाला. त्यावरून नारो शंकर लक्ष्मेश्वराहून सावनुरास प्रथम आला. मागून दुसरे सरदारहि येऊन पोंचले. रावसाहेबहि लांब लांब मजली करीत सावनूरच्या रोखें येत होते. मराठ्यांची फौज किती त्वरेनें वाट चालून येते व चोहोंकडून एकत्र होऊन कशा शिताफीनें मैदानांत सांपडलेल्या शत्रूस घेरते हें हैदरास नुकतेंच कळलें होतें. त्यामुळें सावनुरास वेढा घालण्याचें राहूनच; पण आतां बंकापुरास ठरण्याचासुद्धां त्यांस दम निघेना. तो तेथून निघून पुनः जंगलांत शिरून अनवडीच्या छावणींत जाऊन दडून बसला !

रावसाहेब परत आल्यावर त्यांजकडे हैदरानें शामराव गोपाळ नांवाचा वकील पाठविला. त्या वकिलानें महादशेट बरिकर याच्या मार्फत श्रीमंतांची भेट घेऊन तहाचें बोलणें लाविलें. हें बोलणें महिना दीड महिना चाललें होतें. परंतु त्यापासून कांहीं निष्पन्न झालें नाहीं. पेशव्यांचा घेतलेला मुलूख सोडण्यास किंवा त्यांस खंडणी देऊन त्यांचें वर्चस्व कबूल करण्यास

हैदर कबूल नव्हता. त्याची लढाईची सुमखुम अजून जिरली नव्हती. त्यामुळें तहाचा घाट बनून आला नाहीं. तह ठरत नाहींसें पाहून भाद्रपदाच्या शुद्ध पक्षांत रावसाहेबांनीं धारवाडास वेढा घातला. यापूर्वीच सावनूरच्या संरक्षणाचें काम विंचूरकर, रास्ते व भोंसले यांजवर सोंपवून गोपाळराव धारवाडास रावसाहेबांच्या स्वारींत येऊन मिळाला होता. धारवाडास

सप्टेंबर } वेढा घातला असतां हैदर तेथील आपल्या लोकांस कुमक करण्याकरितां धडपड करील हें रावसाहेबांस माहीत असल्यामुळें त्यांनीं सुमारें पंधरा हजार घोडेस्वार गोपाळरावांबरोबर देऊन त्यास हैदराच्या तोंडावर टेहळणीकरितां ठेविलें. शत्रू दगेबाज असल्यामुळें गोपाळरावास त्याची बातमी फार दक्षपणानें ठेवावी लागे, व दररोज पंधरा वीस कोस तलावा करून यावें लागे. कित्येकदां दोन दोन मुक्काम त्याचे रानांतच पडत. याप्रमाणें मेहनत करून व सावधपणें बातमी राखून तो राहत असल्यामुळें धारवाडची कुमक करण्याविषयीं हैदराचें सामर्थ्य चालेनासें झालें. त्या किल्ल्यास मराठ्यांचा वेढा पडला, तेव्हां मीरफैजुल्लाचा भाऊ फजलअल्लीखान हा तेथें किल्लेदार होता, तो व त्याचे लोक वर सांगितल्याप्रमाणें हैदराकडून कुमक होण्याची आशा नसतांही हिमतीनें व कौशल्यानें किल्ला झुजवूं लागले.

मराठ्यांस चैन न पडूं न देण्याचा हैदराचा जो निश्चय होता, तो अद्यापि कायमच होता, व त्याअन्वयें त्याचे प्रयत्नही सतत सुरूच होते. पटवर्धनांच्या दक्षतेमुळें धारवाडाकडे येऊन गडबड करण्याचें जरी त्यास साधलें नाहीं, तरी मराठ्यांच्या मुलखांत शिरण्याचीं इतर द्वारें त्यास अगदींच बंद झाली होतीं असें नाहीं. विंचूरकर वगैरे सरदार सावनुरास राहिले होते. शत्रूच्या लहान सान टोळ्या ठाण्याठुण्यांवर येऊन घाले घालीत त्यांस हुसकून लावितां लावितां व त्यांचा पाठलाग करितां करितां ते बेजार झाले. शत्रूच्या हालचालीच्या दररोज नवीन नवीन बातम्या येत व नाना प्रकारच्या कंड्या पिकत. आज काय, हैदर अमक्या ठाण्यावर येणार, उद्यां अमुक शहर लुटणार, त्यानें अमुक दिवसां पुरेशा भाकरी करून आपल्या सैन्यांत वांटिल्या आहेत, त्याअर्थी सड्या स्वारीनें अमुक तालुका लुटण्याकरितां तो येणार

आहे, अशा बातम्या उठत असल्यामुळें सारा मुलूख गडबडून गेला होता.

वर्धा नदीच्या काठांवर सावनुरकराचें हावेरी म्हणून ठाणें होतें. तेथें त्याचे दोन अडीचशें प्यादे व मराठ्यांचे चारशें गारदी रखवालीकरितां ठेविलेले होते. त्या लोकांस हैदराच्या हेरांनीं भाद्रपद वद्य दशमीच्या दिवशीं सायंकाळीं शिंदी आणून विकिली. ती अतिशय स्वस्त मिळाली, म्हणून हावेरीकर पखालीच्या पखाली विकत घेऊन पिऊन पहाऱ्या पहाऱ्या-वर झिंगून पडले! त्याच रात्रीं हैदराकडील सरदार मीरफैजुल्ला व व्यंकट-राव बार्की यांनीं पांच हजार स्वार, सात आठ हजार गारदी व सोळा तोफा घेऊन नऊ कोसांची मजल करून उजाडतां उजाडतां हावेरीवर छापा घातला. ठाण्याचे दरवाजे मोकळेच होते. पहारेकऱ्यांपैकीं कोणी सावध झाले होते. कोणाची झिंगी अर्धवट उतरली होती. शत्रूंनीं येतांच पहारे-कऱ्यांच्या मुसक्या आंवळून गांवांत प्रवेश केला. तेव्हां कांहीं लोक पळा-ले व कांहीं गढींत शिरले. शत्रूनें पेठ लुटून गढीस तत्काळ मोर्चेबंदी केली. ही बातमी सकाळच्या प्रहर दिवसास सावनुरास आली. तेव्हां विठ्ठलराव विंचूरकर तसेच स्वार होऊन निघाले. तो पितृपक्षाचा पंधरवडा असल्यामुळें दोन्ही तिन्ही पथकांतील पुष्कळ शिलेदारांचीं 'पितरें' याव-याचीं होतीं व त्यानीं आपल्या जातभाईस जेवणाचीं आमंत्रणें केलेलीं होतीं. यामुळें विठ्ठलराव निघाला तेव्हां त्याच्या पथकाचे सर्व लोक बरोबर आले नाहींत. तथापि जितके आले तितक्यांसच बरोबर घेऊन रास्ते व भोंसले यांस ही लवकर निघण्याविषयीं सांगून पाठवून तो अतित्वरेनें हावे-रीस आला. सावनुराहून निघतांना त्यास बातमी लागली होती कीं,

२१ सपटें. शत्रूबरोबर सारे दोन हजार प्यादे व चारशें स्वार आहेत. परंतु आतां त्याच्या पहाण्यांत पांचपट सहापट सैन्य आलें! शिवाय तोफा होत्या त्या निराळ्याच. प्रारंभीं थोडी गोळागोळी झाल्यावर भोंसले व रास्ते आल्यानंतर काय करणें तें करावें; असा विचार करून विठ्ठलराव सरळ सरळ पावकोसपर्यंत गांवाच्या उजव्या बाजूस गेला. इत-क्यांत लक्ष्मणराव रास्ते व शहाजी भोंसलेही येऊन पोंचले. तरी अजून शत्रूपेक्षां या तिन्ही पथकांतील लोक निम्याहून कमी होते. रास्ते व भोंसले वर्धा नदी

उतरून हावेरीजवळ येतात न येतात तों त्या नदीस पूर येऊन मराठ्यांचा परत जाण्याचा मार्ग खुंटला. पुढें तर लढाईस तयार झालेला जबरदस्त शत्रू उभाच होता. अशा समयीं पुढें काय करावें या योजनेंत हे सरदार आहेत, तोंच एक हजार प्यादे व चार तोफा गढीच्या मोर्च्यांवर ठेवून बाकी सर्व फौजेसह शत्रू थेट चालून आला. तेव्हां मराठ्यांनींही त्याजवर हल्ला केला. परंतु शत्रूनें तोफा, बाण, व जेजाला यांचा असा भयंकर मारा केला कीं, मराठ्यांचीं पुष्कळ घोडीं व माणसें घायाळ होऊन त्यास मागें हटावें लागलें. तेव्हां शत्रूस अधिकच आवेश व उत्साह येऊन त्यानें पुनः आणखी चाल केली. ही चाल करितांना त्याचा बंदोबस्त कांहींसा विस्कळीत झालेला पाहून त्यावर मराठ्यांनीं पुनः वेगानें हल्ला केला व पुनः तुंबळ युद्ध सुरू झालें. या वेळीं मराठ्यांनीं एकंदर२ऊ हल्ले केले. त्यांत शेवटच्या हल्ल्यांत मराठ्यांचें ' दाट हत्यार लागलें, ' व त्यांनीं शत्रूस मोडून मारीत मारीत त्यांच्या तोफांत नेऊन घातलें. त्या वेळीं शत्रूच्या पायदळावर बंगस नांवाचा शूर सरदार होता, त्यानें 'घोड्यावरून उडी टाकिली व गारद्यांस थोपवून धरून त्यांस उत्तेजन देऊन पुनः मराठ्यांवर चाल करण्यास प्रवृत्त केलें. त्या समयीं जें निकराचें युद्ध झालें, त्यांत तो सरदार जरी पतन पावला तरी त्याचे अनुयायी निरुत्साह न होतां शौर्यानें लढले. मराठ्यांची फौज सकाळपासून उपाशी व लांबून चालून आलेली होती व शिवाय दुपटीनें अधिक अशा शत्रूशीं तिला दोन प्रहर युद्ध करावें लागलें होतें. यामुळें ती थकून संध्याकाळच्या वेळीं विश्रांति घेण्यासाठीं मागें सरली. शत्रूचाही लढाईचा दम बराच जिरला होता. त्यामुळें ते मराठ्यांच्या वाटेस न जातां परत गांवांत गेले. गढीस मोर्चे बसले होते, तींतील लोक कौलास आले. शत्रूनें हत्यारानिशीं त्यांस जाऊं दिलें व गढींत आपलें ठाणें बसविलें. रात्रभर दोन्ही फौजा जवळ जवळच उतरल्या होत्या. हैदराच्या सरदारांच्या मनांत हावेरी घेऊन पुढें धारवाडच्या कुमकेस जावयाचें होतें, परंतु या एकाच दिवसाच्या लढाईनें त्यांचा उत्साह भग्न होऊन ते गढी रिकामी टाकून सर्व फौजेसह परत गेले, आणि मराठे सरदारही नदीचें पाणी उतरतांच सावनुरास आले. ' या

लढाईंत ध्यानांत ठेवण्याजोगी विशेष गोष्ट ही आहे कीं, तो सत्तर वर्षांचा म्हातारा सरदार विठ्ठलराव विंचूरकर दहा कोसांची दौड करून दोन प्रहर पर्यंत निकराचें युद्ध करण्यास टिकला! त्यांत त्यास त्या दिवशीं एकादशीचें उपोषण होतें. सायंकाळपर्यंत स्नान करण्यासही वेळ मिळाला नाहीं, मग तोंडांत पाणी घालण्याचें नांव कशाला! अशीं हीं पहिल्या बाजीरावाच्या तालमींत तयार झालेलीं कणखर प्रकृतीचीं सरदारांचीं जुनीं खोडें होतीं!

इकडे दादासाहेब स्नानसंध्या करण्याकरितां म्हणून नाशिकास जाऊन राहिले होते, त्यांजकडील काय हालहवाल होती हें सांगितलें पाहिजे. पूर्वी नानासाहेब पेशव्यांच्या वेळीं ते कांहीं दिवस कारभारी होते, तेव्हां दोनप्रहरपर्यंत ते नाक धरून बसत असत; व सरकारी कामासंबंधें त्यांजकडे जाण्यायेण्याचा ज्यांस प्रसंग पडत असे त्यांची नेहमीं खोटी होत असे. एकंदरींत कर्मठपणाविषयीं लौकिक मिळविण्याकडे त्यांचा कल विशेष होता. रावसाहेब कर्नाटकच्या स्वारीस आग्रहानें बोलावित असतां तिकडे न जातां ज्या अर्थी ते स्नानसंध्येकरितां म्हणून मुद्दाम नाशिकास जाऊन बसले होते, त्या अर्थी त्या स्वधर्मविहित पुण्यकारक आचरणांतच त्यांचा कालक्षेप होत जाईल असें लोकांस वाटलें होतें. परंतु त्यांची बुद्धि क्षणभंगूर असल्यानें कोणचीही गोष्ट नियमितपणें त्यांच्या हातून तडीस जाणें अवघडच होतें. रावसाहेबांविषयीं खोट्या नाट्या गोष्टी सांगून त्यांचें मन कलुषित करावें, व त्या चुलते पुतण्यांत पुनः वैमनस्य उत्पन्न करून त्या योगानें आपला फायदा करून घ्यावा, अशी दुष्ट इच्छा बाळगणाऱ्या शागिर्द, कारकून व कारभारी वगैरे मंडळीचा घोळका नेहमीं त्यांभोंवती असे व त्यांच्या दुरुपदेशामुळें दादासाहेबांची चित्तवृत्ति वारंवार बिथरत असे. रावसाहेबांची आई गोपिकाबाई व त्रिंबकरावमामा पेठे व गोविंद शिवराम खासगीवाले हे जेव्हां रावसाहेबांचा कैवार घेऊन त्यांशीं बोलत तेव्हां त्यांच्या म्हणण्यासहि मनापासून होकार देण्यांत ते कमी करीत नसत! वेळेस जो जें सांगेल तें तेवढेंच खरें धरून अद्वातद्वा बडबडत सुटावें, अशी कांहीं त्यांची चमत्कारिक लहर असे. प्रथम प्रथम

स्नान संध्येचें अवडंबर माजवून त्यांनीं अग्निहोत्र देखील घेण्याची तयारी केली होती. पण " कुंडें घालून संकल्प करावा येथपर्यंत आलियावर ' हे फिरकीर आम्हांस पुरवणार नाहीं ' ऐसें म्हणून कुंडें गंगेंत टाकिलीं ! भट जमा जाहले होते, पालख्या घोडीं पाठवून आणिले होते, त्यांस निरोप दिला ! " कर्नाटकांत हैदराशीं झगडाझगड सुरू होती तींत आपला होतकरू पुतण्या स्वकुलास अनुरूप असें पराक्रम करून दाखवून मोडकळीस आलेलें आपलें राष्ट्र उजगारीस आणून त्याचा दरारा साऱ्या हिंदुस्थानावर पूर्वीप्रमाणें बसविण्यासाठीं अविश्रांत श्रम करीत होता, या गोष्टीबद्दल दादासाहेबांस कौतुक व आनंद वाटत असलाच पाहिजे. पण अशा या महत्वाच्या स्वारीचा पुढारीपणा न घेतां आपण निर्माल्यवत् होऊन एकीकडे बसून राहिलों असें वाटल्यामुळें शेंकडों घनघोर संग्रामांत तरवार गाजवून अटकेपर्यंत भगवा झेंडा फडकाविणाऱ्या दादासाहेबांस विषाद वाटणेंही साहजिकच होतें ! रावसाहेबांविषयीं क्रोधाचे व ईर्षेचे उद्गारही केव्हां केव्हां लहरी दादासाहेबांच्या तोंडून निघत व ते स्वारींत रावसाहेबांच्या कानावर जात. आपल्या संमतीनें सखारामबापूनें आबा पुरंदऱ्यास पुरंदर दिला असतां, रावसाहेबांकडील लोकांनीं तो त्यांजकडून काढून घेतला, हें कळतांच दादासाहेबांचें पित्त खूपच भडकलें होतें. परंतु रावसाहेब समंजस व दूरदर्शी असल्यामुळें कोणी असल्या गोष्टी त्यांजवळ काढिल्या म्हणजे ते इतकेंच म्हणत कीं, स्वारीहून परत गेल्यावर वडिलांच्या पायांवर डोकें ठेवून त्यांची मर्जी प्रसन्न करून घेऊं ! पण पुढें पुढें नाशिकच्या एकावर एक खबरा त्यांच्या कानीं पडूं लागल्या व तेथील रागरंग त्यांच्या लक्षांत येऊं लागला, तेव्हां दादासाहेबांविषयीं त्यांस काळजी उत्पन्न झाली. त्यांस नाशिकास राहूं द्यावें तर लुच्चे लोकांच्या नादीं लागून ते बंड उभारितील, व गृहकलहाच्या वणव्यानें पुनः पेट घेतल्यामुळें राज्याची राखरांगोळी होईल ही पहिली भीति ! त्यांस स्वारींत बोलवावें तर ते हैदराकडे फितूर होऊन साऱ्या मोहिमेची मसलत नासून टाकतील ही दुसरी भीति ! या अडचणींत रावसाहेबांस दुसरी अडचण पतकरणें बरें वाटलें. त्यांनीं दादासाहेबांस लिहून पाठविलें कीं, आपण फौ-

खेची तरतूद करून पावसाळा संपतांच या प्रांतीं यावें व ही मोहीम शेवटास नेण्याचें यश घ्यावें! पेशव्यांच्या घरचे बखेडे होते, हें लक्षांत न आणितां ग्रांटडफ लिहितो कीं, दादासाहेबांस बोलावून नेऊन त्यांवर मोहिमेचा सर्व भार टाकण्यांत पेशव्यांनीं राजनीतीच्या दृष्टीनें मोठी चूक केली. आम्हांस तसें वाटत नाहीं. उलट आम्ही असें म्हणतों कीं, लहान अनर्थ पतकरून त्यानीं मोठ्या अनर्थाचा प्रसंग टाळिला, हें फार शहाणपणाचें काम केलें. दादासाहेबांच्या मर्जीप्रमाणें कर्नाटकांत निघून येण्याविषयीं रावसाहेबांचें बोलावणें येतांच ते फौज जमाविण्याच्या उद्योगास लागले.

इकडे कर्नाटकांत धारवाडास पेशव्यांनीं वेढा घातला होता तेथें निकराचें युद्ध सुरूच होतें. भाद्रपद वद्य सप्तमीच्या दिवशीं तेथें एक बरीच मोठी लढाई झाली. नारो कोन्हेर एकबोटे नांवाच्या नामांकित एकांड्यानें पराक्रम केल्यामुळें रावसाहेबांनीं त्यास पालखीचीं वस्त्रें दिलीं. दोन महिनेपर्यंत धारवाडकरांनीं हिंमत धरून किल्ला झुजविला. परंतु शेवटीं त्यांचे प्रयत्न व्यर्थ होऊन ते जेरीस आले. रावसाहेबांनीं सुरुंग खोदून आंत दारूचे बुधले भरून त्यांस बत्ती देऊन किल्ल्याचे दोन बुरूज उडविले. तिसऱ्या बुरजाचीही तीच दशा करणार, तों किल्लेदार फजलअलीखान भयभीत होऊन कौलास आला. त्यानें गोपाळराव पटवर्धनांच्या विद्यमानें किल्ला हवालीं करण्याचें कबूल केलें. त्यावरून गोपाळराव आपल्या लष्करांतून सड्या स्वारीनें धारवाडास आला, व त्यानें किल्ल्यावरचे लोक उतरून तो पेशव्यांच्या हवालीं करून फजलअलीखानास सन्मानानें मीरफैजुल्लाकडे पोंचतें करून दिलें. धारवाडांत पेशवे सरकारचें ठाणें कार्तिक शुद्ध द्वादशीच्या दिवशीं बसलें. (५ नोव्हेंबर)

धारवाड काबीज केल्यावर रावसाहेब उगरगोळावरून मिश्रिकोटास गेले. तेथें कांहीं मुक्काम झाले. त्या अवधींत तुंगभद्रे अलीकडे हैदरानें घेतलेलीं जीं ठाणीं अजून त्याच्या ताब्यांत होतीं सर्व हस्तगत करण्यांत आलीं. एक बंकापूर मात्र त्याजकडे राहिलें. मिश्रिकोटच्या मुक्कामीं निरनिराळे मराठे सरदारांमार्फत हैदरानें रावसाहेबाशीं पुनः तहाचा संदर्भ लाविला, परंतु याही वेळीं तो निष्फळ झाला, रावसाहेब मिश्रिकोटाहून निघून

बंकापुर व सावनूरच्या मध्यें ओढ्यावर तळ देऊन राहिले. बहुशः त्यांचा बेत बंकापुरास वेढा घालावयाचा असावा. तसें नसतें तर ते तिकडे जातेचना. परंतु बंकापुर घेण्याचा बेत तूर्त तहकूब करावा व अनवडीस हैदर छावणी करून राहिला होता त्याचें आधीं पारिपत्य करावें, असें सर्व सरदारांचें मत पडल्यावरून रावसाहेबांनीं तिकडे कूच केलें. पावसाळा संपल्यावर केव्हां तरी आपणास त्या जंगलांत जाऊन हैदराशीं गांठ घालावी लागेल हें त्यांस ठाऊक होतें, व त्यासाठीं गारदी व तोफखाना जमविण्याची त्यांनीं यथास्थित तरतूद केली होती. नानाफडणिसानें पुण्याहून शिसें व दारू व गोळे पाठविल्याचे उल्लेख गोविंद हरीच्या पत्रांत आहेत. त्यावरून पहातां आश्विन महिन्यांत एकंदर चारशेंसाठ बैल, दारू गोळी मिरजेवरून धारवाडाकडे गेली होती. आणखीही इतर मार्गांनीं व इतर स्थळांहून सामानाचा पुरवठा झाला असलाच पाहिजे. कर्नल विल्कच्या लिहिण्यांत गेल्या पावसाळ्यांत रावसाहेबांनीं जंगली रस्ते चोखाळणारे व झाडें तोडणारे लोकांच्या जमातीही तयार केल्या होत्या, तेव्हां इतकी तयारी करून जे ते निघाले होते, ते हैदराची चांगली खोड मोडून स्वारीचा कांहीं तरी सोक्षमोक्ष केल्याखेरीज परत येणार नव्हते हें उघड आहे. विशेषेंकरून दादासाहेब येऊन पोंचण्याच्या आधीं हैदराशीं मातबर लढाई व्हावी अशा इच्छेनें त्यांनीं ही इतकी जलदी चालविली होती.

अनवडीस जातां जातां मार्गशीर्ष शुद्ध चतुर्थीच्या दिवशीं हनुगळास मुक्काम झाला तेथें हैदराचें ठाणें होतें, तें तोफा लावून त्याच दिवशीं सायंकाळीं काबीज करण्यांत आलें. पंचमीच्या दिवशीं तेथेंच मुक्काम झाला. षष्ठीस सारें लष्कर वर्धानदीच्या अलीकडे एक कोस येऊन पोंचलें. नदीच्या पलीकडे हैदराची चौकी होती. मराठी लष्कराच्या अघाडीस विंचूरकर व पटवर्धन होते, त्यांनीं नदीपार जाऊन त्या चौकीवर हल्ला करून ती उधळून लाविली व शत्रूचे पाऊणशें घोडे हिरावून घेतले. सप्तमीस प्रातःकाळीं लष्कर नदीच्या अलीकडच्या तीरीं येऊन राहिलें. तेथून हैदराची छावणी साडेतीन कोसांवर होती. तिच्या दोहीं बाजूंस बिकट रानें होतीं, त्यांची टेहाळणी करण्यासाठीं रावसाहेबांनी पटवर्धन व विंचूरकरे

पूर्वेस व नारो शंकर, रास्ते, भोंसले व मुरारराव यांस पश्चिमेस पाठवून दिलें. पूर्वेकडे पटवर्धनांनीं एक टेंकडी पाहून ठेविली होती. त्या टेंकडीवरून हैदराची छावणी चांगली दिसत होती, तीवरून तोफांचा मार केल्यास लागू पडण्याजोगा होता. ती जागा सखारामबापूंनेंहि जाऊन पसंत केली. सायंकाळच्या मुक्कामाकरितां लष्कर आणखी एक कोस पश्चिमेकडे येऊन नदीतीरींच राहिलें. त्या रात्रीं हैदराकडील लोकांनीं जवळ येऊन लष्करावर बाण सोडिले व हजार दोन हजार बारहि केले. परंतु लष्कर सावध असल्यामुळें कांहीं गलबल किंवा अव्यवस्था झाली नाहीं. तितक्या रात्रीं विंचूरकर, पटवर्धन व रास्ते आपापल्या पथकासह गोटांतून बाहेर पडून नदीपार गेले, तेव्हां शत्रूचे लोक आले होते ते पळून गेले. दुसऱ्या दिवशीं म्हणजे मार्गशीर्ष शुद्ध अष्टमीस स्वतः रावसाहेब तोफखाना

३० नोव्हेंबर. घेऊन आदल्या दिवशींच्या संकेताप्रमाणें त्या टेंकडीच्या पायथ्याशीं येऊन त्यानीं टेंकडीवर तोफा चढविल्या. टेंकडीपासून हैदराच्या छावणीपर्यंत दाट जंगल लागलें होतें. तिकडून शत्रू येईल म्हणून विंचूरकर, पटवर्धन व मुरारराव घोरपडे यांस त्यांनीं जंगलाच्या तोंडावर ठेविलें आणि कांहीं हुजरात होती ती घेऊन आपण टेंकडीच्या पायथ्याशीं उभे राहिले. इतकें झाल्यावर टेंकडीवरून हैदराच्या छावणीवर चार घटकापर्यंत तोफांचा भडिमार केला. तोफा लांब पल्याच्या होत्या व आगाही मान्याची फार उत्तम होती. यामुळें शत्रूच्या छावणींत गोळ्यांचा वर्षाव होऊन त्याची अतोनात नासाडी झाली व त्याचें सारें लष्कर गलबलून गेलें. तोफांचा मार अगदीं सोसवेनासा भयंकर होऊं लागला, तेव्हां अशा आणीबाणीच्या वेळीं कांहीं अचाट पराक्रम करून दाखवून आपल्या लोकांची हिंमत वाढवावी, शत्रूवर छाप पाडावी, व आपला संहार करणाऱ्या त्या मराठ्यांच्या तोफा टेंकडीवर हल्ला करून हिसकून घ्याव्या, अशी हैदरास बुद्धि झाली! त्याचीं पलटणें अव्वल व दुय्यम अशीं दोन प्रकारचीं होतीं. त्यापैकीं अव्वल पलटणांतले शेलके माणूस पांच सात हजार गारदी, हजार पंधराशें निवडक स्वार व पांच तोफा इतकें सामान घेऊन व छावणीच्या बाजेऱ्यां-

जवळ मीरफैजुल्लास ठेऊन तो झाडींतून आला. झाडीच्या तोंडाशीं येईपर्यंत तो कोणासच दिसला नाहीं, आणि तो जो अकस्मात् प्रकट झाला तो तोफांची सरबत्ती करूं लागला. गारद्यांचीं पलटणेंही त्वरेनें जथून उभीं राहिलीं व त्यांनीं बंदुकांचा मारा पराकाष्ठेचा भयंकर केला. हा सर्व मारा झाडीच्या तोंडावर मुरारराव घोरपडे उभा होता त्याजवर पडला. त्याच्या कुमकेस विंचूरकर व पटवर्धन होते, त्यांनीं शत्रूवर हल्ल्यावर हल्ले केले. परंतु त्याच्या आगीच्या मारापुढें त्यांचें कांहीं चालेनासें झालें. त्यांची फौज पळून गेली, तरी मुरारराव ' सेनापति ' त्याच जाग्यावर ठांसून उभा राहिला. हैदराच्या गारद्याप्रमाणें त्याचे गारदी उत्तम होते, पण ते थोडे होते. त्या गारद्या गारद्यांचें निकराचें झुज लागलें. शत्रूच्या तोफांचा व गारद्यांचा वगैरे सर्व मार आतां एकट्या मुराररावावर पडला, तरी तितकाही मार सोसून हैदरानें बहुतेक त्यास ग्रासिलें असतांही तो तिलप्राय न डगमगतां झुजतच होता. लढाईचें हें सर्व वर्तमान रावसाहेब टेंकडीच्या पायथ्याशीं होते, त्यांस कळतांच ते त्याक्षणीं घोड्यावर स्वार होऊन हुजरातेसह धांवून आले. क्षणार्धांत तेथील स्थिति त्यांच्या लक्षांत येऊन चुकली. त्याबरोबर पुढें निशाणाचा हत्ती व खुले हत्ती घालून हुजरातेसह त्यांनीं शत्रूवर बेजरब चाल्हून घेतलें ! गारद्यांत घोडयांचीं तोंडें शिरकतांच रावसाहेब मारामार करीत शत्रूच्या व्यूहांत शिरले व तेथपासून गारद्यांची कत्तल होण्यास सुरवात झाली. तितक्यांत घोरपडे व विंचूरकर, व पटवर्धन यांनींही एकदम हल्ला केला. त्यामुळें हैदर हतवीर्य होऊन फौजेसह पळूं लागला. त्यावेळीं त्याचे हजार बाराशें गारदी व पांच सातशें स्वार जागच्या जागींच ठार झाले. दोन हजारपर्यंत गारदी जखमी झाले व पांच सातशें पाडाव सांपडले. कांहीं थोडे लोक मोठ्या कष्टानें जीव बचावून पळून गेले त्यांत हैदर होता! मराठ्यांनीं झाडींत शिरून शत्रूचा पाठलाग केला, आणि त्याच्या पांचही तोफा व तीन हजार बंदुका व सातशें घोडे अशी लूट मिळवून आणिली.

यापुढें हैदरावर आणखी कांहीं स्वाऱ्या झाल्या पण रावसाहेबांच्या कर्तृत्वाचा व पराक्रमाचा या दिवसापसून त्यावर इतका कांहीं दरारा

बसलो की, कितीही सैन्य समागमें असलें तरी त्यानें म्हणून तें स्वतः ज्या फौजेंत असतील त्या फौजेशीं झुंजण्याचें धाडस केलें नाहीं, व त्यांच्या लष्करापासून वीस पंचवीस कोसांच्या टापूंत यापुढें कधीं तो फिरकला नाहीं!

ही लढाई झाल्यावर दुसरे दिवशीं रावसाहेबांनीं सारें लष्कर अनबडीस आणिलें. तेथें हैदराची छावणी एका टेंकडीच्या पायथ्यास होती. टेंकडीवर बातेऱ्या बांधून त्यांवर त्यानें तोफा ठेविलेल्या होत्या व छावणी भोंवतीं भिताड बांधून खंदकही तयार केला होता. तिहीं बाजूस गर्द झाडी कित्येक कोसपर्यंत लागली होती, व उत्तरेचें तोंड मोकळें होतें तिकडे एक ओढा होता. अशी ही फार बिकट जागा होती व हैदरास वाटत होतें, त्याप्रमाणें मराठ्यांनीं जर तिजवर हल्ला केला असता तर त्यांचा फार नाश झाला असता. परंतु त्यांचा बेत हैदरास छावणींतून बाहेर काढण्याचा नसून त्यास तेथेंच कोंडून उपाशीं मारण्याचा होता. त्या बेतास अनुसरून त्यांनीं त्या छावणीभोंवतीं गराडा घालून दररोज तोफांचा व बाणांचा मार देण्याचा क्रम सुरू केला. तेणेंकरून आधींच हतवीर्य झालेलें शत्रूचें लष्कर फारच हैराण झालें. बिदनुराकडून धान्याचा पुरवठा त्या लष्करास होत होता, तोही मराठ्यांनीं बंद केला. व त्यानें पळून जाऊं नये म्हणून झाडें तोडून रस्त्यांत आडवीं तिडवीं पाडून वाटा बंद करून टाकण्याची सुरुवात केली. हें पाहून हैदर फारच घाबरला व आतां छावणींत राहिलों तर आपली धडगत नाहीं असें ओळखून तो तोफा, पायदळ, स्वार, बाजारबुनग व डेरे राहुट्या वगैरे सर्व सामान घेऊन छावणी सोडून बिदनुराकडे निघाला. मराठ्यांची फौज जरी त्याच्या पाठीस निकरानें लागली होती, तरी त्या प्रदेशांत झाडी दाट असल्यामुळें पहिले दोन दिवस त्यांचा विशेष उपाय चालला नाहीं. पिछाडीवर त्यांचे वारंवार हल्ले होत असतांही हैदरानें आपलें लष्कर बऱ्याच व्यवस्थित रीतीनें चालविलें होतें. परंतु तिसऱ्या दिवशीं अमळ मोकळा प्रदेश लागतांच रावसाहेबांनीं आपल्या सैन्याचा एक भाग बिदनुरच्या वाटेवर हैदराच्या अघाडीस आणून उभा केला. तेव्हां त्यास लढाईस उभें राहणें भागच पडलें. त्यानें आपणाकडून होईल तितकी यत्न करून

लढाईसाठीं सैन्य शिस्तवार उभें केलें. परंतु मराठ्यांनीं चोंहोंकडून एकदम हल्ला केला. तेव्हां तें सारें सैन्य आसपासच्या झाडीचा आसरा धरण्यासाठीं धूम पळत सुटलें! त्यावेळीं एकसारखी कत्तल सुरू होऊन हैदराचे कित्येक हजार गारदी ठार झाले. पंचवीसशें स्वार व दहा हजार पायदळ इतक्यानिशीं तो बिदनुरास पळून गेला. बाकीची फौज बहुतेक मारली गेली व कांहीं झाडींत शिरली. हजारों घोडें, उंटें, बाजारबुणगें, तोफा, व बंदुका वगैरे हत्यारें--सारांश सबंध लष्करचें लष्कर--मराठ्यांच्या हातीं सांपडलें.

दसरा होतांच दादासाहेबही कर्नाटकांत येण्याकरितां नाशिकाहून निघाले. त्यांनीं तोफा व जेजाला यांचा सरंजाम पावसाळ्यांत बहुत प्रयत्न करून जमा केला होता. कांहीं करोल म्हणजे बंदुकवाले स्वारही चाकरीस ठेविले होते. सुमारें पांच सात हजार फौज त्यांजवळ जमली होती, ती घेऊन ते नाशिकहून टोंक्यास व तेथून पैठणास गेले. बरोबर पेशव्यांचे कनिष्ठ बंधु नारायणराव (ज्यांचा पुढें सुमेरसिंगानें खून केला ते) हे होते. बाबूजीनाईक बारामतीकर व आबा पुरंदरेही समागमें होते. पैकीं कृष्णेवर पोंचल्यानंतर बाबूजी नाईक परत आला. गायकवाड व भोंसले नागपूरकर यास दादासाहेबांनीं बोलाविलें होतें, परंतु भोंसल्याचें येणें झालें नाहीं व दमाजी गायकवाडानें स्वतः न येतां आपला पुत्र सयाजी गायकवाड यास फौज बरोबर देऊन पाठविलें होतें. दादासाहेब पैठणाहून निघाले ते सीना नदीच्या तीरास येऊन त्याच नदीच्या कांठानें कांहीं मजली आले. नंतर त्यांनीं बारशीं पानगांवाकडे जाऊन निंबाळकराच्या जहागिरींतून घांसदाणा म्हणून पावणे तीन लक्ष रुपये खंडणी घेतली व भिराजी नाईक निंबाळकर यास स्वारीबरोबर घेतलें. यापूर्वीं त्यांनीं मोंगलाशीं बोलणें लाविलें होतें कीं, महंमद मुरादखान, निंबाळकर, खंडागळे यांबरोबर पंचवीस तोफा व कांहीं फौज आमच्या कुमकेकरितां तुम्हीं पाठवावी. मोंगल आपली कुमक करील अशी दादासाहेबांस आशा होती व याकरितांच ते मोंगलाईच्या सरहद्दी सरहद्दीनें चाल करीत होते. परंतु या राजकारणापासून कांहीं निष्पन्न होत नाहीं असें पक्कें कळल्यावर

ते बारशी पानगांवाहून थेट पश्चिमेचा रोंख धरून नरसिंगपुर, पंढरपुर, सांगोलें व नाझरें या गांवांवरून मिरज प्रांतीं आले. दादासाहेबांच्या येण्यापासून काय काय अनर्थ होतात हें मागील दोन सालीं मिरज प्रांतीच्या लोकांस चांगलेंच कळलें होतें. यामुळें पुनः तेंच अरिष्ट उद्भवलेलें पाहून ते लोक फारच गडबडले. परंतु यंदा त्यांस उपद्रव देण्याचा त्यांचा हेतु मुळींच नसल्यानें व पटवर्धनांवर यंदा त्यांची मर्जी चांगली असल्यानें ते मिरजेकडे न येतां दक्षिणेकडे रामतीर्थास गेले, व तेथून त्यांनीं थेट तुंगभद्रेचाच रस्ता धरिला. तथापि लष्करच्या उपद्रवापासून अजिबात मुक्त होण्याचें मिरज प्रांतीच्या लोकांचें यंदाही सुदैव नव्हतें. दादासाहेबांचा तोफखाना घेऊन महिपतराव पानशे फलटण, विटें, भालवणी या वाटेनें मिरजेवरूनच गेला, त्यानें जातां जातां मनस्वी आवाडाव केली व लोकांस उपद्रव दिला. मागून सयाजी गायकवाडाची स्वारी लष्करास जाण्याकरितां याच वाटेनें गेली, तिनेंही कांहीं आगळीक केल्याशिवाय सोडिलें नाहीं.

दादासाहेबांनीं पंढरपूरच्या मुक्कामाहून गोविंद शिवराम खासगीवाले यास रावसाहेबांकडे पाठविलें होतें. खासगीवाल्याबरोबर दादासाहेबांनीं ज्या शर्ती सांगून पाठविल्या होत्या त्या रावसाहेबांनीं कबूल करून मोहिमेचा सर्व कारभार ते येतांच त्यांच्या हवालीं करण्याचें कबूल केलें होतें. हैदर बिदनुरास पळून गेल्यावर लढाईतून वांचलेली व चोंहोंकडे पांगलेली त्याची कांहीं फौज पुनः त्याजवळ जमा झाली. त्यानें मराठ्यांशीं पुनः तहाचें बोलणें सुरू केलें. परंतु याही खेपेस रावसाहेबांच्या मर्जीप्रमाणें तहाचीं कलमें ठरलीं नाहींत, सबब हैदरास आणखी जेरीस आणण्याचें काम पुनः चालू झालें. या वेळीं जीं ठाणीं काबीज करण्यांत आलीं, त्यांत होनहळ्ळीचें ठाणें फार मजबूत होतें. त्यांत हैदराचे रोहिले, पठाण, हबशी व गारदी मिळून साडेतीन हजार माणूस होतें. रावसाहेबांचे मोर्चे त्या ठाण्यास बसले तेव्हां कुमक करण्याच्या इराद्यानें बिदनुराहून निघून हैदर सहा कोसांवर आला होता. परंतु पुढें येण्याची त्यास हिंमत न झाल्यामुळें त्याच्या देखदेखत किल्लेकऱ्यांवर जरब बसवून रावसाहेबांनीं तें

ठाणें घेतलें. गेल्या चैत्र वैशाखांत चित्रदुर्ग वगैरे संस्थानांपासून खंडणी घेण्याकरितां रावसाहेबांनीं स्वारी केली होती, तेव्हां हैदरानें सावनुरावर चालून येण्याचा रोख दाखविल्यामुळें त्यांस परत यावें लागलें होतें. सध्यां दादासाहेब येईपर्यंत हैदराशीं चालू असलेलें युद्ध तहकूब करून ते या संस्थानिकांच्या मुलखांत खंडणी घेण्याकरितां कूच करून गेले. ते हरपनहळ्ळीपासून एक मजलीवर पोंचले असतां माघ शुद्ध षष्ठीच्या दिवशीं दादासाहेब व नारायणरावसाहेब थोरल्या लष्करास येऊन मिळाले. दुसऱ्या दिवशीं हरपनहळ्ळीस लष्कर पोंचलें, तेव्हां सर्व संस्थानिकांचे वकील हजर होऊन खंडण्या ठरल्या. त्यांत हरपनहळ्ळी व चित्रदुर्ग येथील संस्थानिकांनीं अनुक्रमें साडेतीन व साडेनऊ लक्ष रुपये देण्याचें गोपाळराव पटवर्धनाच्या विद्यमानें कबूल केलें. त्या रकमेच्या वसुलाची व्यवस्था शिरस्त्याप्रमाणें महादशेट वीरकर याजकडे सोंपविण्यांत आली. रायदुर्ग व बल्लारी येथील संस्थानिकांच्याही खंडणीचा ठराव याच प्रसंगीं झाला. नंतर हैदराचें पूर्ण पारिपत्य करण्यासाठीं बिदनुरावर चालून जाण्याची मसलत ठरून लष्कर परत फिरलें. ही मसलत पार पाडण्यापूर्वीं महाराष्ट्रांत कांहीं उलाढाली चालल्या होत्या त्यांचा बंदोबस्त करणें जरूर पडलें. पेशव्यांच्या फौजा दूर गेल्या आहेतसें पाहून मोंगलाकडील मराठे सरदार जगन्नाथ धोंडाजी व खंडागळे यांनीं नाशिक प्रांतीं येऊन कांहीं धामधूम केली, त्याबद्दलचा बंदोबस्त पेशव्यांनीं आपल्या वकिलाकडून मोंगलाची कानउघाडणी केल्यावरून परस्परच झाला. कोळ्यांच्या दंग्यामुळें पुणें प्रांतीं बरीच अस्वस्थता झाली होती, सबब सालपेंकर शिंदे, नरसिंगराव धायगुडे व आबा पुरंदरे यांची पथकें पुण्याच्या रक्षणार्थ परत पाठविण्यांत आलीं. मालवणच्या बंदरांत कोल्हापुरकरांचें आरमार होतें, त्यानें आज अनेक वर्षें इंग्रज व्यापाऱ्यांचीं गलबतें लुटण्याचा रोजगार आरंभिला होता. वाडीकर सावंतही संधि सांपडेल त्याप्रमाणें इंग्रजांचीं गलबतें लुटीत असत. या दोघांच्या उपद्रवामुळें इंग्रजांस आजपर्यंत फार नुकसान सोसावें लागलें होतें, सबब त्यांचीं खोड मोडण्यासाठीं त्यांनीं आरमार तयार करून व त्यावर फौज चढवून मालवणावर स्वारी केली. माघ शुद्ध सप्तमी-

त्या दिवशीं इंग्रजांनीं त्या किल्ल्यास वेढा घातला, व तोफांचा मारा सुरू केला. किल्लेकरीही तोफांची मारागिरी करीत होते. इतक्यांत किल्ल्यांतील दारूखान्यास अकस्मात् आग लागून तो उडाल्यामुळें आंतील लोकांनीं निरुत्साह होऊन इंग्रजांस किल्ला दिला. त्यानंतर वाडीकर सावंताचा किल्ला रेडी म्हणून होता त्यास वेढा घालून इंग्रजांनीं तोही किल्ला घेतला.

किल्ला कितीही मजबूत बांधिलेला असला तरी तो सांभाळणारे लोक जर नादान असतील तर त्या किल्ल्याची मजबुदी काय कामाची ? उलट-पक्षीं शूर लोकांनीं सांभाळिलेलें पडक्या भिंताडाचें गांवढेंसुद्धां एखाद्या वेळीं शत्रूस अजिंक्य होऊन बसतें. शिवाजी महाराजांनीं शेंकडों मजबूत किल्ले बांधिले होते, पण त्या त्या किल्ल्यांत ठेविलेल्या मावळे व हेटकरी लोकांच्या अद्भुत पराक्रमावर आणि किल्ले दुरुस्त व नेहमीं लढाईच्या तयारींत राखण्याच्या महाराजांनीं ज्या शिस्ती घालून दिल्या होत्या त्यांवर त्या किल्ल्यांची मजबुदी अवलंबून होती. आणि त्या किल्ल्यांचें नांव ऐकून शत्रूस दरारा वाटत असे हेंही योग्य होतें. महाराजांमागें मराठी राज्याचा मुख्य अधिकार ज्यांच्या हातीं आला त्यांनीं मावळे व हेटकरी लोकांस उत्तेजन देण्याचें सोडून दिलें, व महाराजांनीं घालून दिलेल्या शिस्तीही टाकून दिल्या. अर्थात् शिवाजी महाराजांनीं बांधलेल्या माल-वणासारख्या विख्यात जलदुर्गांचा लौकिकही प्रस्तुत काळीं केवळ पोक-ळपणाचा होता. या लौकिकाच्या भ्रमाचा भोंपळा जेव्हां एकाएकीं इंग्र-जांनीं फोडिला तेव्हां मराठे लोकांस पराकाष्ठेचें आश्चर्य वाटलें व क्रोधही आला. गोविंद हरि या किल्ल्यास 'शिवलंका' असें नांव देतो त्याव-रून शिवाजी महाराजांच्या कृतीविषयीं अद्यापिही महाराष्ट्रांत किती अभि-मान जागृत होता हें दिसून येतें. 'शिवलंका' म्हणजे शिवाजी महारा-जांनीं निर्मिलेलें लंकेसारखें समुद्रवेष्टित आणि दुर्धर्ष राक्षसांप्रमाणें बलाढ्य वीरांनीं सांभाळिलेलें व अतोनात संपत्तीनें भरलेलें असें हें लंकेच्या तोडीचें स्थळ होतें; असा त्याच्या लिहिण्याचा अभिप्राय आहे.

पुढच्या 'मोंगलाशीं लढाई,' या प्रकरणांत गोविंद हरीचीं पत्रें जितकीं विपुल आहेत तितकीं या प्रकरणांत नाहींत. तथापि जीं आहेत

तीं त्याच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणें मनोवेधक रीतीनें लिहिलेलीं व तत्कालीन स्थिति दाखविण्यास फार उपयोगी आहेत. त्यांत ऐतिहासिक महत्वाचे उल्लेख म्हटले तर भवानराव व भगवंतराव या दोन प्रतिनिधींत चालू असलेली झोंबाझोंबी, मोंगलाई सरहद्दीवर निंबाळकरांची आपआपसांत भांडणें, दादासाहेबांचें मिरज प्रांतीं आगमन, तोफखानेवाले पानशे यांचा उपद्रव, या संबंधाचे आहेत. कोल्हापुरास पंचगंगेच्या कांठीं श्रीशंकराचार्यांचा मठ आहे. त्या मठाच्या पटांगणांत त्या वेळच्या स्वामींनीं एक वृंदावन बांधिलें होतें व नदीकाठीं संन्यासी लोकांस राहण्याकरितां ओऱ्या बांधिल्या होत्या. त्याशेजारीं कोल्हापुरच्या जिजाबाई राणीनें आपल्या नवऱ्याची छत्री बांधविण्याची सुरुवात केली. त्या छत्रीभोंवतीं जें आवार बांधावेलें होतें, त्यांत स्वामीचें वृंदावन व नदीकांठच्या ओऱ्या राणीनें बलात्कारानें घेतल्या. स्वामींनीं पुष्कळ अट्टहास केला तरी तिनें त्यांचें म्हणणें ऐकिलें नाहीं. तुमच्या मठाच्या पटांगणांत वार्षिक ब्राह्मणभोजनें होतात तीं छत्रीच्या आवारांत व्हावीं, व संन्याशांनींही पाहिजे तर तेथें रहावें हें जिजाबाईचें म्हणणें होतें, पण शूद्राच्या स्मशानभूमींत या दोन्ही गोष्टी होऊं देणें स्वामींस किंवा त्या वेळच्या कोणाही ब्राह्मणास पसंत होण्याजोगें नव्हतें. राणीकडून आपणावर हा जुलूम होत असल्याविषयीं स्वामींनीं गोविंद हरीस पुनः पुनः पत्रें व निरोप पाठवून व एकदां मिरजेस स्वतः येऊन कळाविलें. त्यावरून गोविंद हरीनेंही गोपाळरावास वारंवार आग्रहपूर्वक लिहिलें आहे कीं, तुम्हीं रदबदल करून पेशव्यांकडून चांगलें खरमरीत विनंतीपत्र (ताकीदपत्र !) राणीस पाठवून आवार बांधण्याचें काम बंद पाडावें! रामराव देशपांडे चंदुरकर व नरसाप्पा गोसावी बिरनाळकर यांच्या खटल्यांविषयीं गोविंद हरीच्या पत्रांत वारंवार मजकूर आला आहे, तो वाचिला म्हणजे त्या वेळच्या पेशवाई दरबारच्या स्थितीची बरीच कल्पना करितां येईल. तात्या घोरपडे इचलकरंजीकर यास दुर्व्यसन लागलें होतें, व त्याची वागणूक बदफैलीची होती त्याविषयींही कांहीं मजकूर त्याच्या पत्रांत आहे. पावसाळ्यांत तो फार आजारी होता. आजार दूर व्हावा ह्मणून कृष्णा वारणा संगमावर (त्यावेळीं तेथें हरिपूर

गांव वसलेलें नव्हतें ) त्यानें तुला केली व पुढें शतरुद्रहि करविला. त्या-विषयी व इतर घरगुती मजकुरांचीं पत्रें ऐ. ल. संग्रहांत दिलीं आहेत, तीं वाचण्याजोगीं आहेत. एका पत्रांत तो भूकंप झाल्याविषयीं लिहितो. हा भूकंप शके १६८६ श्रावण शुद्ध प्रतिपदा रविवार या दिवशीं तिसऱ्या प्रहरीं झाला, व त्याचे धक्के नाशिक, पुणें, पैठण, राहुरी, पिंपळगांव, धोम, वांई, कऱ्हाड, पंढरपूर, वारणातीरचा प्रदेश, या ठिकाणीं म्हणजे बहुतेक महाराष्ट्रभर बसले.

सदाशिवराव भाऊसाहेब पानपतच्या गर्दींत नाहींसे झाले ते त्या प्रसिद्ध युद्धांत मरण पावले, याविषयीं त्या वेळच्या समंजस लोकांस शंका नव्हती, परंतु साधारण समजुतीच्या लाखों लोकांस वाटत असे कीं, भाऊसाहेब अद्यापि जिवंत आहेत. पानपतच्या स्वारीनंतर लवकरच भाऊसाहेब अमुक ठिकाणीं आले, अमक्याच्या दृष्टीस पडले, असल्या बातम्या दक्षिणेंत वारं-वार उठूं लागल्यामुळें लोकांत मोठी चळवळ उडून राहिली होती. असल्या गप्पांवर लोकांचा विश्वास किती जलद व पक्का बसत जातो हें जाणून श० १६८५ च्या आश्विनांत कांहीं लुच्चे लोकांनीं बुंदेलखंडांत भाऊसाहे-बांच्या नांवाचा एक तोतया उभा केला. त्याच्या खरेपणाबद्दल दक्षिणेंत तत्काळ गांवोगांव चर्चा सुरू होऊन मोठमोठ्या लोकांच्या मनाचीही अत्यंत चलबिचल झाली होती. सदरहू तोतयाविषयीं पुढें आम्हांस वारं-वार ल्याहावयाचें आहे, सबब यासंबंधें तूर्त इतकाच उल्लेख पुरे. आतां 'हैदरअल्लीवरची पहिली स्वारी' जी आजपर्यंत जारीनें सुरू होती, तिचा निकाल कसा काय झाला याविषयीं लिहूं.

रावसाहेब व दादासाहेब एकत्र झाल्यावर मोहिमेचीं सर्व सूत्रें दादा-साहेबांच्या हातीं गेलीं. प्रथम त्यांचा बेत असा होता कीं, विंचूरकर, नारो शंकर व कांहीं हुजरात मिळून दहा बारा हजार फौज श्रीरंगपट्टणा-कडे रवाना करावी, म्हणजे आपली राजधानी राखण्याकरितां हैदरास बिद-नूरची झाडी सोडून बाहेर पडावें लागेल. तसें झालें म्हणजे मैदानांत त्यास गांठून पारिपत्य करण्यास सोइवार पडेल. परंतु असें केलें असतां मोहिमेचें काम पुष्कळ दिवस पर्यंत चालून कदाचित् या वर्षीही पुनः

या प्रांतीं छावणी करावी लागेल, असा विचार होऊन शेवटीं सर्व फौजें-सह बिदनुरावरच चालून जाण्याची मसलत ठरली. नंतर सर्व लष्कर त्या
स.१७६५ } रोंखें चालू झालें, तेव्हां वाटेंत हरिहर व कुमसी ही ठाणीं
फेब्रु मार्च. } लागलीं तीं काबीज करण्यांत आलीं. आबा पुरंदरे व नारो शंकर यानीं जाऊन मासूरचें ठाणें घेतलें. नंतर अनंतपुरास सैन्याचा गराडा पडून पाऊण महिना युद्ध झालें. शेवटीं तेथील किल्लेकरी शरण येऊन त्यानीं किल्ला मराठ्यांच्या हवालीं करून दिला. नंतर दादासाहेबांनीं सैन्याच्या तीन टोळ्या करून तीन वाटांनीं बिदनुरावर एकदम चालून जाण्याची मसलत केली. त्या प्रमाणें व्यवस्था होऊन फौज झाडींत शिरून बिदनुरापासून दहा कोसांवर जाऊन पोंचली. इतकें झाल्यावर आपले सर्व उपाय आतां थकलेसें पाहून हैदरअल्ली मराठ्यांस शरण आला. त्याची या मोहिमेंत इतकी दुर्दशा झाली होती कीं, मराठे म्हणतील ती खंडणी व मागतील तो मुलूख देणें त्यास प्राप्तच होतें. परंतु दादासाहेबांच्या हातीं मोहिमेचीं सूत्रें आल्यापासून त्याच्या आशाबीजास थोडा अंकुर फुटला होता. त्यांचें या पूर्वींच्या तीन चार वर्षांचें चारित्र ध्यानांत घेऊन त्यानें असा अजमास बांधिला होता कीं, कांहीं लालूच दाखविल्यास दादासाहेब, त्यांचे अनुयायी व सखारामबापू व विंचूरकर व नारो शंकर आपणास अंतस्थ रीतीनें अनुकूळ होण्याजोगे आहेत. हा अजमास त्याचा खरा होता. पेशवाईचे जितके शत्रु तितक्या सर्वांशीं दादासाहेबांची गुप्तपणें मैत्री असावयाची! कां तर, पुतण्याशीं भांडणाचा प्रसंग आला तर या शत्रूंनीं आपणास कुमक करावी! याच हेतूनें त्यांनीं इ. स. १७६२ त निजामअल्लीस सत्तावीस लक्षांचा मुलूख दिला होता. राक्षसभुवनच्या लढाईनंतर म्हणजे इ. स. १७६३ च्या अखेरीस मोंगलाशीं दादासाहेबांस फूस देणाऱ्या मुत्सद्यांनीं जो तह करून घेतला त्यांत त्यावर जबर ओझें न बसवितां त्यास सांभाळून घेण्यांत आलें, यांतलें तरी बीज हेंच होय. आतां हैदराशीं होणाऱ्या तहाचा मासला असल्याच तऱ्हेचा व्हावयाचा होता. पण आतां रावसाहेब प्रौढदशेंत येऊन राज्याचा कारभार स्वतः पहाण्याजोगे झाले होते, दादासाहेब वगैरे मंडळीचे सर्व फंदच

आतां पूर्वीप्रमाणें त्यांनीं चालूं दिलें नसतें. तथापि या घरबुडव्या मंडळीनें हैदराचा आपल्या हातून होईल तितका फायदा या तहांत साधून दिला! या वेळेपासून हैदर व दादासाहेब यांचें जें एकदां सख्य जमलें तें पुढें कधीं बिघडलें नाहीं. तहाचें बोलणें पक्कें ठरविण्याकरितां दादासाहेबांनीं नारो शंकराव हैदराकडे पाठविलें होतें. त्यानें शर्ती ठरवून आणिल्या त्या ह्या—

१ उत्तर कर्नाटकपैकीं हैदरानें मराठयांचा जितका मुलूख घेतला होता तितका सर्व परत द्यावा, आणि पुनः त्यांच्या राज्यास कधीं उपसर्ग देऊं नये.

२ म्हैसुरच्या खंडणबिद्दल त्यानें मराठयांस बत्तीस लक्ष रुपये द्यावे.

३ यापुढें त्यानें सावनूरकर नबाव व मुरारराव घोरपडे यांस कधीं उपद्रव देऊं नये, आणि त्या दोघांचा मुलुख अद्यापि त्याच्या ताब्यांत कांहीं असेल तर तो त्यानें सोडून द्यावा.

या तीन कलमांची वाटाघाट होत असतां आढेवेढे घेण्याचें काम हैदरानें चालूं ठेविलेंच होतें. शेवटीं तो इतक्यावर आला कीं माझा मुलगा टिपूसुलतान यास श्रीमंतांनीं चाकरीस ठेवून बंकापुर व बसवापट्टण हीं दोन ठाणीं त्यास जहागीर द्यावीं. हें त्याचें मागणें मान्य करावयाचें दादासाहेबांच्या मनांत होतें, परंतु रावसाहेबांनीं साफ जबाब केला कीं, तुंगभद्रेच्या उत्तरेस बंकापुरासारखा बळकट किल्ला जर हैदराच्या हातीं ठेविला तर तो पुनः उत्पात करून या स्वारींत इतक्या श्रमानें आम्ही सोडीवलेलें राज्य पुनः हिसकून घेण्यास कमी करणार नाहीं. बसवापट्टण तर बिदनूरच्या राज्याची किल्ली आहे. तें राज्य आमच्या मांडलिकाचें असतां हैदरानें बळजबरीनें घेतलें आहे. तें प्रस्तुतच्या तहांत जरी तो परत देत नाहीं, तरी पुढें कधीं तें आम्हांस घ्यावयाचें असल्यास बसवापट्टण त्याच्या हातीं लागूं देणें चांगलें नाहीं. चुलते पुतण्यांचे याप्रमाणें

एप्रिल } भिन्न अभिप्राय पडले असतां सखारामबापूनें तडजोड काढिली कीं, हैदरापासून बंकापूर घ्यावें व बसवापट्टण त्याजकडे ठेवावें.

शेवटीं याचप्रमाणें निश्चय ठरून हैदराशीं तह झाला व त्यानें खंडणीची

रक्कम रोख दिली, आणि मेघश्यामराव पटवर्धन यास कैदेंतून सोडून दिलें. बंकापुर ताब्यांत घेण्यासाठीं विसाजी नारायण गेला होता, त्यानें तें ठाणें वैशाखाच्या पहिल्या पंधरवड्यांत हस्तगत करून घेतलें. बसवापट्टण पूर्वी पटवर्धनांच्या जहागिरींत होतें तें आतां हैदराकडे राहिलें. तें नुकसान भरून काढण्यासाठीं एक लक्ष त्रेसष्ट हजारांच्या भरतीचा तालुका त्यांस नवीन देण्याचें श्रीमंतांनीं कबूल केलें.

दादासाहेबांकडे जर मोहिमेची सर्व अखत्यारी दिलेली नसती तर मराठ्यांस अधिक फायदेशीर असा तह खचित झाला असता. बिदनूरचें राज्य घेण्याचा नानासाहेब पेशव्यांचा फार हेतु होता व त्याच धोरणानें त्या राज्यानजीकचे हरिहर व बसवापट्टण हे दोन तालुके त्यांनीं हाताखालीं घालून ठेविले होते. शिऱ्यांचा सुभा 'स्वराज्या' पैकीं असल्यामुळें तो सोडवून पुनः मराठी राज्यास जोडिल्याबद्दल त्यांस अभिमान वाटत असे. बापाचा बिदनूरचें राज्य घेण्याचा हेतू तडीस नेण्यांत किंवा त्यानें संपादिलेला शिऱ्यांचा सुभा सांभाळण्यांत रावसाहेबास केवढें भूषण वाटलें असतें! परंतु तें राज्य व तो सुभा हीं दोन्हीं हैदरानें जीं बळकाविलीं होतीं तीं किंवा त्यापैकीं कांहीं भाग तरी त्यानें परत दिल्याशिवाय त्यांशीं दादासाहेबांनीं तह करणें वाजवी नव्हतें. हा तह रावसाहेबांस किंवा त्यांच्या विश्वासांतल्या पटवर्धन वगैरे सरदारांस बिलकुल आवडला नाहीं. तथापि दादासाहेब मोहिमेवर आल्यास ते राज्याचें नुकसान करून देखील हैदरांशीं मैत्री करितील, हें माहीत असूनही ज्याअर्थी रावसाहेबांनीं त्यांस मुद्दाम बोलावून आणून त्यांच्या हातीं सर्व अखत्यार सोंपविला होता; त्याअर्थी त्यांनीं ठरविलेला तह मान्य करणें त्यांस भाग पडलें.

तह झाल्यावर सावनूरकर व घोरपडे यांस आपापल्या स्थळास जाण्यास निरोप मिळाला. नंतर पूर्वी चित्रदुर्ग वगैरे संस्थानांपासून जी खंडणी घ्यावयाचें ठरलें होतें, तिच्या वसुलाचें काम पार पाडण्याकरितां व हैदरापासून जिंकिलेल्या मुलखांत स्वस्थता राखण्याकरितां गोपाळराव पटवर्धनास दहा बारा हजार फौजेसह त्या प्रांतीं ठेवून तिवर्ग श्रीमंत सोंडूर

जून } येथें जाऊन कार्तिकस्वामीचें दर्शन घेऊन पुढें अनागोंदी, हंपी

विरूपाक्ष या रोखें कूच करून गेले व तेथून पंचमहालांत जाऊन तेथील खंडणी गोळा करून ज्येष्ठ महिन्याच्या अखेरीस पुण्यास दाखल झाले.

याच सुमारास निजामअल्लीनें बसालतजंगावर स्वारी करून त्यांस कर्नूल शहरांत कोंडून धरिलें. स. १७६१ त बसालतजंगानें हैदराकडून नजराणा घेऊन त्यास शिऱ्यांचा सुभा दिला व त्याजकडून आपणांस दक्षिणच्या सहा सुभ्यांचा सुभेदार म्हणवून घेतलें, हा काय तो निजामअल्लीचा त्यावर राग. या प्रसंगीं बसालतजंग शरण आल्यावरून त्याजकडे त्यानें अदवानीचें संस्थान पूर्वीप्रमाणें ठेविलें.[1] या स्वारीकरितां रावसाहेबांजवळ कुमक मागितल्यावरून त्यांनीं कांहीं फौज बाबूराव हरीबरोबर परस्पर कर्नाटकांतून निजामअल्लीकडे पाठविली होती.

---

## प्रकरण चौथें.

१ घरगुती बखेडे. २ प्रतिनिधींचा दंगा.
३ भोंसल्यावर पहिली स्वारी. ४ दादासाहेबांची उत्तर प्रांतीं स्वारी
( स. १७६५ जून — स. १७६६ जून अखेर. )

दादासाहेबासह पेशवे स्वारी करून पुण्यास परत येऊन आठ दिवस झाले नाहींत तोंच चुलते पुतण्यांत पुनः तंटा लागला. दादासाहेबांजवळ शागिर्दांचें लटांबर पुनः जमा होऊन त्यांच्या व कित्येक इतर लोकांच्या चिथावणीवरून त्यांनीं रावसाहेबांस स्पष्ट सांगितलें कीं, राज्यावर तुमचा आमचा सारखा हक्क आहे. निम्मे राज्य वांटून आम्हांस द्यावें. तेव्हां रावसाहेब बोलले कीं, "राज्य कोणाचें ? वांटून देणार कोण ? आमच्यानें वांटवत नाहीं. सर्व राज्य तुमचेंच आहे. आम्ही चार बारगीर तसे तुम्हांजवळ असों. सर्व तुम्ही करणें !" याप्रमाणें उत्तरें प्रत्युत्तरें होऊन दोघांत वैमनस्य उत्पन्न होण्यास प्रारंभ झाला. (स. १७६५ जून-दिसें.) त्याचा परिणाम राज्यकारभारावर तत्काळ होऊं लागला. तमाम परगण्यांचे मामलेदार हिशेब घेऊन आले होते ते पाहावयाचें कोणास सुचेना. पेश-

[1] ही प्रस्तावना ऐ. ले. सं. भाग ३ पृ. १००९–१०१७ यांवर छापिली आहे.

त्यांच्या घरांत दुही उत्पन्न झाली आहे हिचा परिणाम काय होईल न कळे या भीतीमुळें पुढील वर्षाच्या रसदे[1]चा पैका सरकारांत देण्यास मामलेदार कांकूं करूं लागले. सर्वांचीं चित्तें अस्वस्थ झालीं. असें कांहीं दिवस चालल्यानंतर रावसाहेब आपलें बिलकुल ऐकत नाहींतसें पाहून दादासाहेबांनीं ही वांटणी विषयींचा आग्रह सोडिला.

पुरंदरावरील कोळी लोकांचा बंदोबस्त करणें पेशव्यांस जरूर पडलें. कोळ्यांचें म्हणणें असें होतें कीं, आम्हीं आबा पुरंदऱ्याची हुकमत मानत नाहीं. सरकाराशीं आम्हीं बेइमानी करीत नाहीं व पूर्वीपासून सरकारच्या खासगीकडे आमचा किल्ला होता त्याप्रमाणें तो राहत असल्यास व वाडवडिलांपासून किल्ल्यावर आमची नोकरी आहे तशी कायम राहत असल्यास आम्ही किल्ला सरकारच्या हवालीं करूं. हें किल्लेकऱ्यांचें म्हणणें कबूल करावें तर दादासाहेब व आबा पुरंदरे या दोघांस राग येणार. न करावें तर किल्ल्यास वेढा घालून बलात्कारानें तो घेण्याचा प्रसंग येणार. अशी दोहों बाजूनींही अडचण होती. या प्रसंगीं दादासाहेब व आबा पुरंदरे या दोघांनींही हार खाल्ली व बनेल त्याप्रमाणें किल्लेकऱ्यांशीं समेट करण्याविषयीं पेशव्यांस सल्ला दिला. त्याप्रमाणें करण्याची पेशव्यांची मर्जी होतीच. त्यांनीं किल्लेकऱ्यांस त्यांच्या जाग्यावर कायम करण्याचें अभिवचन दिलें. तेव्हां त्यांनीं सरकारचें निशाण व त्याबरोबर पंचवीस शिलेदार, एक हवालदार, एक सरनोवत इतकीं सरकारांतून नेमून दिलेलीं माणसें किल्ल्यावर घेतलीं. पुढें लवकरच आबा पुरंदरे मरण पावल्यामुळें या तंट्याचें बीज नाहींसें झालें.

भवानराव प्रतिनिधि व त्याचा मुतालीक सदाशिव थमाजी उर्फ गमाजी बावा या दोघांनीं दोन वर्षांपूर्वी मोंगलाकडे जाऊन त्याची स्वारी पुण्यावर आणिली होती व राक्षसभुवनाच्या लढाईपूर्वी हे पेशव्यांस मि-

१ पेशवाईत मामलती मक्तयानें देण्यांत येत असत. मक्तयाची जी रक्कम ठरे ती पैकीं चौथाई किंवा तिजाई रक्कम मामलेदारास सरकारांत आगाऊ भरावी लागे, तिला ' रसद ' असें म्हणत. रसदेवर दरमहा दरशेकडा आठ आणे पासून एकोत्रापर्यंत जसा करार ठरेल त्याप्रमाणें व्याज सरकारांतून मिळे.

झाल्यावरून त्यानीं त्यांच्या जहागीरी त्यांस परत दिल्या होत्या हें वाचक विसरले नसतीलच. हे दोघेहि मोठे उपद्यापी व शूर असून सातारा प्रांतांचे कित्येक डोंगरी किल्ले त्यांच्या हातीं होते व राजमंडळांत त्यांचें वजन विशेष होतें शिवाय जानोजी भोंसल्याशीं त्यांचा निकट संबंध होता व अलीकडे पुरंदऱ्यांशींही त्यांचें सख्य जमलें होतें. या गोष्टी लक्ष्यांत आणून पेशव्यांनीं त्या दोघांसही पदच्युत केलें व भवानरावाचा चुलतबंधु भगवंतराव यास प्रतिनिधीचें पद देऊन त्याची मुतालिकी गमाजीचा चुलत बंधु वासुदेव अनंत यास दिली. त्यामुळें भवानराव व भगवंतराव यामध्यें वितुष्ट वाढून लढाईस सुरुवात झाली.

कर्नाटकांत हैदरअल्लीशीं युद्ध सुरू असतां मल्हारराव होळकर उत्तर प्रांतीं बखेडेखोर व लुटारू लोकांचें पारिपत्य करण्यांत गुंतला होता. अलीकडे अयोध्येचा नबाब सुजाउद्दौला व बंगाल्याचा नबाब मीर कासीम या दोघांचें इंग्रजांशीं युद्ध सुरू होतें व त्या दोघांचा इंग्रजांनीं पराजय केल्यामुळें त्यानीं मल्हाररावास आपल्या कुमकेस बोलाविलें. त्यावरून मल्हारराव सुजाच्या मुलखांत लढाई चालली होती तिकडे गेला व एके प्रसंगीं इंग्रजांची व त्याची गांठ पडून युद्ध झालें व त्यांत इंग्रजांचा पराजय झाला. हें फत्तेचें वर्तमान पुण्यास आलें तेव्हां सर्व लोकांस फार आनंद झाला. परंतु या आनंदाचा विरसही लवकरच व्हावयाचा होता. कारण एके रात्रीं होळकर बेसावध आहे असें पाहून इंग्रजांनीं त्यावर छापा घातला व त्याची फौज मोडून उधळून लाविली. इंग्रजांनीं त्याचा पाठलाग अशा निकडीनें केला कीं, यमुना उतरून अलीकडे येण्यास त्यास महत्प्रयास पडले.

महादजी शिंदे व महादाजी गोविंद हे सरदार माळव्यांत राहिले होते त्या दोघांत कांहीं चुरस उत्पन्न होऊन लढाई झाली व तींत महादाजी गोविंद मारला गेला व त्याची फौज शिंद्यानें लुटून फस्त केली. हें शिंद्याचें वर्तन पुण्याच्या दरबारीं बिलकूल पसंत पडलें नाहीं आणि पेशव्यांनीं शिंद्याची जहागीर जप्त केली. ही सरकारची जप्ती उठावितांना महादजी शिंद्यास महत्प्रयास पडले आणि पेशव्यांची मर्जी पुनः प्रसन्न

करून घेण्याकरितां त्यास पुष्कळसा द्रव्यदंड भरावा लागला. पानपतच्या लढाईनंतर उत्तर प्रांतीं रोहिले, पठाण, अयोध्येचा नवाब व इंग्रज या सर्वांनींच मराठ्यांचें वर्चस्व कमी करण्याचा व त्यांचा मुलुख बळकाविण्याचा उपक्रम आरंभिला होता. त्याचप्रमाणें माळव्याच्या उत्तर व वायव्य व पश्चिम सीमेवर रजपूत संस्थानिक व जाट व बुंदेलखंडांतील संस्थानिक यांनींही बंडाळी माजविली होती. या सर्वांचा बंदोबस्त करण्यास उत्तरेकडे मोठी फौज पाठविणें जरूर होतें. तिकडे नांव घेण्यासारखा सरदार एक मल्हारराव होळकर मात्र होता. पण अलीकडे इंग्रजांनीं पराजय केल्यामुळें व पुण्याहून त्यास फौजेची कुमक न पोंचल्यामुळे तो हलाखींत होता. महादजी शिंद्याची सरदारी पानिपतच्या गर्दीपासून मोडकळीस आलेली होती व ज्या पराक्रमाबद्दल व शहाणपणाबद्दल त्याची पुढें दिगंत कीर्ति झाली ते त्याचे गुण अद्यापि विकास पावले नव्हते. हिंदुस्थानांत फौज पाठविण्याविषयीं आज चार वर्षें होळकराचा तगादा लागला होता व शत्रूचा पराभव करण्यासाठीं नव्हे, तर आपलें राज्य राखण्यासाठीं तरी आतां तिकडे पावसाळा संपल्याबरोबर सैन्य पाठविण्याचा पेशव्यांनीं निश्चय केला व या सैन्याचें आधिपत्य स्वीकारण्याचें दादासाहेबांनीं कबूल केलें.

दक्षिण हिंदुस्थानांत हैदरअली, अर्काटचा नबाब महमदअली व मद्रासकर इंग्रज यांची जशी पेशव्यांशीं तशीच निजामअलीशीं स्पर्धा होती. यामुळें पुढील कारस्थानाचें बीजारोपण करण्यापूर्वीं निजामअलीशीं कायमचें सख्य करण्याचा पेशव्यांनीं यावेळीं जो घाट घातला तो सहज बनून आला. परस्परांनीं एकमेकांस मदत करावी, जो एकाचा शत्रू तो दुसऱ्याचा शत्रू या धोरणानें परस्पर वागणूक असावी, कर्नाटकच्या मोहिमा दोघांनीं मिळून कराव्या, हे तीन हेतु निजामअलीशीं कायमची मैत्री करण्यांत पेशवे बाह्यात्कारें पुढें आणीत. परंतु त्यांचा आंतला हेतु असा होता कीं, दादासाहेबांनीं बंड केलें तर मोंगल व नागपूरकर भोंसले यांचें त्यांस साहाय्य मिळून त्यांचें पारडें जड होईल; याकरितां मोंगलास आपणाकडे वळवून घेऊन भोंसल्यावर स्वारी करून त्यास बलहीन करावें.

मोंगलांच्या दरबारी मुरादखान नामक सरदार होता तो दादासाहेबांच्या प्रेमांतला होता व अर्थात् पेशव्यांस प्रतिकूळ होता. मागें घोडनदीवर चुलते पुतण्यांत युद्ध झालें तेव्हां मोंगलानें दादासाहेबांस मुरादखानाच्या सांगण्यावरून सैन्याची कुमक केली होती यावर्षी मोंगलाचा भाऊ बसालतजंग याजकडे कांहीं फितुराचे कागदपत्र खेळविल्यामुळें मोंगलानें मुरादखानाचा प्राण घेतला. हल्लीं सय्यदलष्करखान उर्फ रुक्नुद्दौला नांवाचा अनुभवी व हुशार मुत्सद्दी मोंगलाचा दिवाण झाला होता. त्याच्या द्वारें पेशवे व मोंगल यांमध्यें सख्य होऊन उभयतांनीं मिळून पावसाळा झाल्यावर भोंसल्यावर स्वारी करण्याचा बेत ठरला भोंसल्यावर, स्वारी करण्याच्या कामीं मोंगल अनुकूळ होण्याचीं कारणें अशीं होतीं कीं, राक्षसभुवनची लढाई झाली त्यावेळीं भोंसल्यानें विश्वासघात करून मोंगलास तोंडघशीं पाडून पेशव्यांचा पक्ष स्वीकारिला व त्यांपासून आपणांस मिळालेल्या मुलखापैकीं बत्तीस लक्षांचा मुलूख मिळविला ही गोष्ट मोंगलांच्या मनांत डांचत होती. शिवाय मोंगलाई मुलखांत घांसदाणा घेण्याचा भोंसल्याचा हक्क होता व वऱ्हाडांत त्याची मोंगलाशीं साठचाळिशीची वांटणी होती. या दोन्ही प्रकरणांत तो मोंगलाशीं नेहमीं आडदांडपणानें वागे. मोरो धोंडाजी नांवाचा मोंगल सरदार दोन हजार फौजेसह वऱ्हाडांत होता त्यावर नुकताच भोंसल्यानें छापा घालून ती फौज लुटून फस्त केली होती. पेशव्याच्या मनाचा दृढ निश्चय पाहून दादासाहेबांनींही या स्वारीस आढेवेढे न घेतां रुकार दिला. नंतर पेशव्यांचे बंधु नारायणराव यांस बरोबर घेऊन दादासाहेब पुण्याहून निघून सिंहगडास जाऊन नंतर नाशिकास गेले.

या चातुर्मास्यांत आपल्या राज्याचा बंदोबस्त करण्यांत पेशव्यांनीं विशेष लक्ष घातल्याचें दिसून येतें. कोंकणपट्टीच्या मामलेदारांचे हिशेब पाहून त्यांवर मखलाशी करण्याचें, त्या प्रांतींच्या व देशावरील महालोमहालींच्या मामलेदारांकडून रसदा घेण्याचें काम झपाट्यानें चाललें होतें. पागा, किल्ले व कारखाने यांची जमा काय, खर्च किती झाला, अफरातफर कशानें होते इत्यादि गोष्टींचा बारीक रीतीनें शोध करून हवाई काम-

द्वारावर वचक बसेल अशा रीतीनें बंदोबस्त करण्यांत येत होता. याच- संधींत कांही मामलत्यांच्या व किल्ल्यांच्या घालमेली करण्यांत आल्या. नग रचा किल्ला गणेश विठ्ठल वागमारे याजकडे होता त्याजकडून काढून नारो बाबाजी यांजकडे देण्यांत आला. अहमदाबादेचा सुभा गोपाळराव गणेश बर्वे यांजकडे होता तो त्यांजकडून निघून नागोराम याजकडे सोंप- विण्यांत आला. सातारा व वसई येथेंही नवीन अंमलदार पाठविण्याची वाटाघांट चालली होती. सिंहगड किल्ल्याची वहिवाट पूर्वीपासून खासगी- वाल्यांच्या घराण्याकडे असतां दादासाहेबांनीं ती त्यांजकडून काढून आपल्या वतीच्या मनुष्यास दिली होती. हल्लीं पुनः तो किल्ला खासगी- वाले यांच्या हवालीं करण्यांत आला.

कार्तिक शुद्ध तृतीया [ १७ अक्टोबर ] या दिवशीं रावसाहेब पुण्या- हून निघून वऱ्हाडच्या रोखें चालले. ते कायगांव टोंक्याच्या सुमारें जातात तों तिकडून मोंगलांचा दिवाण रुक्नुद्दौला सात आठ हजार फौजे- निशीं येऊन त्यांस भेटला. खासा मोंगल ही भागानगराहून निघण्याच्या तयारींत होता. परंतु तो येण्याची वाट न पाहतां हे उभयतां वऱ्हाडाकडे चालले. दादासाहेबही फौजेसह नाशिकाहून निघाले ते कूच दरकूच करीत कसबे भंडारी परगणे बाळापूर येथें रावसाहेबांस मिळाले. एवढ्या सैन्याशीं झुजण्यासारखी जानोजी भोंसल्याची तयारी नव्हती यामुळें, त्यानें दादासाहेबांमार्फत पेशव्यांशीं तहाचें बोलणें लाविलें. दोन वर्षांपूर्वीं भों- सल्यानें पेशव्यांपासून बत्तीस लक्षांचा मुलूख घेतला होता, त्यापैकीं फक्त आठ लक्षांचा त्याजकडे ठेवून बाकी चोवीस लक्षांचा परत घेऊन पेशव्यां- नीं तह केला. या चोवीस लक्षांपैकी नऊ लक्षांचा मुलूख आपणाकडे ठेवून बाकी पंधरा लक्षांचा त्यानीं मोंगलास देऊन टाकिला. हा मुलुख देऊन मोंगलाशीं कायमची दोस्ती करण्याचा इरादा पेशव्यांनीं दाखविला व या पुढें दक्षिण प्रांतीं मोहीम केव्हांही करणें झाली, तरी उभयतांनीं मिळून करावी व आपआपलें कार्य साधून घ्यावें असें या समयीं उभयपक्षीं ठरलें.

नंतर दादासाहेब पांच हजार हुजरात व कांहीं तोफा घेऊन हिंदु- स्थानच्या स्वारीस निघाले. त्यांबरोबर भोंसल्याची फौज पांच सात

हजार गेली तीत मुधोजी भोंसले हा सरदार होता. शिवाय विंचूरकर व न्यारो शंकर हे सरदार आपापल्या पथकांनिशी स्वारींत हजर होते. माळव्यांत गेल्यावर शिंदे, होळकर व पवार हे सरदार त्यांस मिळाले तेव्हां एकंदर फौजेचा जथ चाळीस हजारापर्यंत झाला.

भवानराव प्रतिनिधीस पेशव्यांनीं पदभ्रष्ट केल्यामुळें तो दंगा करण्याची संधि पहातच होता. पेशव्यांची स्वारी दूर गेलीसें पाहून त्यानें फौज जमवून भगवंतरावाशीं दावा आरंभिला. या दोघांच्या पुष्कळ झटापटी झाल्या. दोघेहि शूर व फौजबंद. दोघांकडेहि प्रांतातले दंगेखोर लोक मिळाले. वांई, सातारा, कऱ्हाड, पाटण, या मुलखांतले लोक दोघांच्या लुटीखालीं बेजार झाले. भवानरावाच्या बाजूस डफळे व पाळ मिळाले व त्याच्या फौजेचा जथ अधिक पडून त्याची सरशी होऊं लागली. पाटणापासून दीड कोसावर दातेगड किल्ला आहे तो भवानरावानें घेतला. शिवाय कडेगांव, कोळें, मसूर, चरेगांव हीं ठाणीं घेऊन खुद्द कऱ्हाडही काबीज केलें, व तो कृष्णा उतरून विटें माळवणीकडे तमाम खंडण्या घेत

स. १७६६ जाने.–जून } चालला. तों भगवंतरावानें मसुरास मोर्चे लावून ते पुनः सर केले. याप्रमाणें दंगा झालेला पेशव्यांच्या कानीं जाताच त्यांनीं बंदोबस्तासाठीं रामचंद्र गणेश या सरदाराची रवानगी केली. त्यानें पाठलाग करून भवानरावास गांठून त्याचा पूर्ण पराजय केला व त्यानें घेतलेली सर्व ठाणीं घेऊन तीं भगवंतरायाच्या हवालीं केलीं. तेव्हां निरुपाय होऊन भवानराव पेशव्यास शरण गेला. त्यानीं त्यास पटवर्धनांच्या मध्यस्थीवरून पन्नास हजार रुपयांची नक्त नेमणूक देऊन पुण्यांत ठेवून घेतलें व पुढें पांच लक्ष रुपये उत्पन्नाचा सरंजाम त्यास नेमून दिला.

भोंसल्याशीं तह होऊन दादासाहेबांची उत्तर प्रांतीं रवानगी झाल्यानंतर रावसाहेब परत फिरून पैठणाच्या सुमारें येऊन तेथेंच कांही दिवस तळ देऊन राहिले. तेथें निजामअल्लीची व त्यांची भेट झाली. तो निरोप घेऊन गेल्यावर ते फाल्गुनाच्या प्रारंभीं पुण्यास परत आले.

सर्व जाहागिरदारांपासून चौथाई सरंजाम परत घेण्याच्या बाबतींत

दोन वर्षांपूर्वी कित्येक सरदारांत असंतोष उत्पन्न झाला होता; त्याविषयीं मागें आम्हीं लिहिलेलें वाचकांस आठवत असेलच. त्यावेळीं बाबूजी नाईक बारामतीकर रुसून लष्करांतून निघून गेला होता. त्या दिवसापासून त्याचें पेशव्यांशीं वैमनस्य पडून तो त्यांच्या हुकुमास जुमानीनासा झाला. त्याच्या ताब्यांत सोलापुरचा किल्ला होता तो ताब्यांत घेण्यासाठीं पेशव्यांनीं विसाजी कृष्ण बिनिवाले यास पाठविलें; परंतु बाबूजी नाईकानें किल्ला देण्याचें साफ नाकारिलें. तेव्हां पेशव्यांनीं त्याचे चंदन व वंदन हे किल्ले घेतले व जहागीर व चीजवस्त जप्त करून मुलें-माणसें धरून प्रतिबंधांत ठेविलीं. तथापि अजूनही पटवर्धनांच्या मध्यस्थीनें त्यांचें बाबूजी नाईकाशीं सामोपचाराचें बोलणें सुरू होतें, व नायकाची चीजवस्त व मुलें माणसें त्यांनीं पटवर्धनांच्या मंगळवेढें या ठाण्यांत ठेविलीं होतीं.

दादासाहेब उत्तर हिंदुस्थानांत स्वारी करण्याकरितां निघाले ते दरकूच नर्मदापार होऊन माळव्यांत गेले, व तेथून खेचीवाड्यांत जाऊन तेथील संस्थानिकांनीं दंगा केला होता त्याचा बंदोबस्त करून बुंदेलखंडांत गेले. तेथून पुढें दिल्लीचा पादशहा, सुजाउद्दौला व रोहिले यांशीं राजकारण लावून तिकडे जाऊन पादशाहीचा बंदोबस्त करावयाचा हें एक काम, दुसरें भरतपुरकर जाट व इतर जाट संस्थानिक व राजपुतान्यांतील राजे मराठ्यांशीं वांकून वागत होते व शिरस्त्याप्रमाणें त्यांची खंडणी न देतां उलट त्यांचेंच राज्य बळकाविण्याच्या खटपटींत होते यांस ताळ्यावर आणणें हें दुसरें काम. या दोहोंपैकीं प्रथम कोणचें करावें ही वाटाघाट चालली असतां ज्याच्या बळावर या मसलती घडून यावयाच्या तो मल्हारराव होळकर ज्येष्ठ शुद्ध एकादशीस मरण पावला, त्यामुळें दादासाहेबांचे सर्व बेत विस्कळीत होऊन ते पर्जन्यकाळीं काल्पी येथें छावणी करून राहिले. (१८ जून)

आदल्या वर्षी कर्नाटकच्या स्वारीहून परत येतांना रावसाहेबांनीं गोपाळराव पटवर्धनास त्या प्रांतीं छावणीस ठेविलें होतें. आनंदराव रास्ते कडप्पे व कर्नूळ येथील नबाब व मुरारराव घोरपडे हे सर्व गोपाळरावाच्या कुमकेस श्रीमंतांच्या आज्ञेवरून आले होते. गोपाळरावानें पूर्वी ठराव

झाला होता त्याप्रमाणें हरपनहळ्ळी, चित्रदुर्ग, रायदुर्ग व बल्लारी वगैरे तमाम संस्थानांपासून खंडण्या वसूल करून तुंगभद्रातीरास येऊन अनागोंदी, कनकगिरी, केंचनगुड्ड या संस्थानांच्या खंडण्या घेतल्या. तेथून पंचमहालांत जाऊन चितापूर, यादगिरी, सुरापूर येथील खंडण्या घेऊन पावसाळा सुरू होण्यापूर्वींच तो मिरजेस येऊन दाखल झाला होता.

## प्रकरण पांचवें.

### हैदरअल्लीवर दुसरी स्वारी.

( स. १७६६ जून—१७६७ जूनपर्यंत. )

दरबारी कामें—रावसाहेब पेशवे यांचें आजपर्यंतचें चरित्र ज्यांनीं या पुस्तकांत वाचिलें असेल त्यांच्या ध्यानांत आलेंच असेल कीं, ते मूळचे तरतरीत, उद्योगी, चाणाक्ष व करारी स्वभावाचे असून त्यांचे ते गुण दिवसेंदिवस अधिकाधिक विकास पावत होते. एकच गोष्ट त्यांच्या उद्योगास वारंवार विघ्न आणणारी होती. ती गोष्ट अशी कीं, त्यांची प्रकृति वारंवार बिघडत असे. व्यायाम करण्याचा त्यांस अभ्यास लहानपणापासून होता, पण त्या योगानें त्यांचें शरीर निरोगी व स्वांच्या शिकाऱ्यांचे श्रम सहन करण्यास समर्थ व्हावें तसें झाल्याचें दिसून येत नाहीं. आणि त्यांच्या वयास नुकतीं बावीस वर्षें संपलीं नाहींत तों ही दशा! गोपिकाबाईनें या सालच्या एका पत्रांत त्यांस आग्रहपूर्वक लिहिलें होतें कीं, तालीम तुमच्या प्रकृतीस मानवत नाहीं, तर ती करण्याचें तुम्हीं सोडून द्यावें. त्यावर त्यांनीं उत्तर लिहिलें आहे कीं, "मला वडिलांच्या आज्ञेपेक्षां तालीम अधिक आहे कीं काय! तालीम सोडिली. हल्लीं नमस्कार मात्र घालीत असतों!" असो. तर असल्या तब्येतीचें तंत्र संभाळून रावसाहेबांचा राज्यकारभार काय चालेल तो चालेल असें होतें, तरी या वर्षाच्या पावसाळ्यांत झालेलीं दरबारी कामें पहातां तो राज्यकारभार कांहीं थोडा थोडका होत होता असें वाटत नाहीं. नाना फडणीस, मोरोबादादा फडणीस, महादाजीपंत गुरुजी, नारो आपाजी तुळशीबागवाले, हरीपंत फडके, रामाजीपंत बिट-

णीस, माधवराव जाधवराव, गोविंद शिवराम खासगीवाले, कृष्णराव बल्लाळ काळे, वगैरे दरबारी मंडळ जें त्यांभोंवतीं जमलें होतें त्यांत एकापेक्षां एक हुशार माणसें होतीं. त्यांच्या द्वारें महालोमहालांचे हिशेब पहाण्याचें व नवीन मामलती ठरवून देण्याचें काम गतवर्षाप्रमाणें ज्यारीनें चालले होतें. श्रीमंतांस लबाडी बिलकुल खपत नसे व ते स्वतः बुद्धिमान् असल्यामुळें कोणी त्यांच्या डोळ्यांत धूळ टाकण्याचा यत्न केला असतां तो पचतही नसे. आत असो कीं मर्जींतला असो; गुन्हेगार सांपडला कीं त्याची विटंबना केल्याशिवाय ते कधीं रहात नसत. बातमी राखण्याच्या कामांत त्यांची कमाल असे. लक्ष्मण कोन्हेर म्हणून गंगथडीचा मामलेदार होता त्यानें दरबारांतील कांहीं लोकांस पैसे चारून खोटे हिशेब सरकारांत गुदरले होते. परंतु रावसाहेबांनीं त्याच्या घरावर जप्ती नेऊन कचे कागद जप्त करून आणिले व त्यानें पावणेचार लक्ष रुपये मामलेदारींत खाल्ल्याचें शाबीत केलें! आरमाराच्या हिशेबांचा छडा लावितां त्यांतही अधिकाऱ्यांनीं पन्नास हजार रुपये खाल्ल्याचें उघडकीस आलें. तोफखान्याच्या हिशेबांत कांहीं लबाडी झालेली आहे, अशी कुणकुण लागल्यावरून तेथील रुमालही एकदम जप्त करण्यांत आले. पटवर्धनांच्या जहागिरीचे हिशेब समजावून देण्याकारितां गोपाळरावाचा चुलतभाऊ मोरो बल्लाळ उर्फ आबा हा त्यावेळी पुण्यास आला होता व पुढेंही तो 'हैदरअल्लीवरच्या दुसऱ्या स्वारींत पेशव्यांबरोबरच होता. त्यानें ही करडी अमदानी पाहून गोपाळरावास लिहून पाठविलें आहे कीं, "आतां कागदपत्रांस फार जपावें लागेल. तमाम रुमाल आणूं लागले. आम्हांकडील पत्रें वडिलीं निराळीं ठेवावीं. केवळ कलमदानांत न ठेवावीं !" "श्रीमंतांची मर्जी संपादून घ्यावी म्हणोन आज्ञा, ऐशास आम्हीं आपल्या तर्फेनें ममता संपादून घ्यावया चुकत नाहीं परंतु मर्जी फारच नाजुक झाली आहे !" "श्रीमंताची कामाची जलदी फार आहे. एकदां बोलाऊं गेल्यानें न आल्यास फारच रागें भरतात. कागद कोणी माघारे टाकिले तर फारच बेमर्जी होते. मग कोणाचेंहि ऐकत नाहींत. कानाचे अल्प फारच झाले आहेत यामुळें [ चुगल्या ] सांगणारेंहि फार झाले आहेत !"

अक्कलकोटकर शहाजी राजे भोंसले व त्यांचा दिवाण आपाजी रामगाडगीळ यांमध्यें वैमनस्य उत्पन्न होऊन दिवाणाकडून दिवाणगिरी काढण्याचें भोसलें यांच्या मनांत होतें व ते या कामीं पेशव्यास पन्नास हजार रुपये नजराणा द्यावयासही कबूल झाले होते. पण पेशव्यांनीं अप्पाजी राम याजकडेच दिवाणगिरी कायम ठेविली. श० १६८३ च्या माघांत पेशव्यांचे मुजुमदार नारायण नीलकंठ हे मृत्यु पावल्यावर दादासाहेबांनीं आपल्या कृपेंतला सरदार बाबूराव हरी परभू यास मुजुमदारी दिली होती व ही तुजकडून काढणार नाहीं अशी शपथही दिली होती. परंतु सखारामबापूचा आग्रह जुन्या मुजुमदारांस स्थापित करण्याविषयीं होता. पेशवे त्यास प्रतिकूळ नव्हते, परंतु बाबूरावास काढून दादासाहेबांच्या मनास विषाद आणावा हें त्यांस बरें दिसेना. दादासाहेबांची समजुत आपण कशीही करूं असें बापूनें आग्रहपूर्वक सांगितल्यावरून व इतर मोठमोठ्या मुत्सद्यांची मध्यस्थी पडल्यावरून जुन्या मुजुमदारांस श्रीमंतांनीं पुनः मुजुमदारी दिली व बाबूरावाचें समाधान करण्यासाठीं त्यास अहमदाबादेचा सुभा सांगण्याचें ठरविलें. चार वर्षांपूर्वी सर्व सरदारांपासून चौथाई सरंजाम सरकारांत परत घेण्याचा ठराव होऊन तो बहुतेक अमलांतही आला होता. रास्ते व पटवर्धन यांचा मात्र चौथाई सरंजाम घ्यावयाचा राहिला होता, त्यापैकीं यंदां रास्त्यांचा तर घेतलाच, पण पटवर्धनांनीं फारच जिकीर केल्यामुळें त्यांस मात्र माफी मिळाली.

मोंगलाशीं सख्य करण्यांत रावसाहेबांचे काय हेतु होते व याविषयीं त्यांनीं गेल्यावर्षीं किती खटपट केली होती. याबद्दल पूर्वीच्या प्रकरणांत उल्लेख आला आहेच. गतवर्षीं उभयतांच्या भेटी होऊन रुक्नुद्दौलाच्या मार्फत पक्कें ठरलें होतें कीं, इतःपर कर्नाटकांत किंवा अन्यत्र स्वाऱ्या करावयाच्या त्या मोंगल व मराठे यानीं मिळून कराव्या, आणि अडचणीच्या वेळीं परस्परांनीं एकमेकांस मदत करीत असावी. पण नेहमींच्या व्यवहारांत अकृत्रिम व निरिच्छपणाचें सख्य होऊं शकतें तसें राजेलोकांच्या व्यवहारांत असूं शकत नाहीं. ज्या वेळीं जेथें स्वार्थ साधन होण्यासारखें असेल त्यावेळीं तेथें त्यांची मैत्री बेमालूम जुळल्याप्रमाणें दिसून यावयाची,

परंतु दुसऱ्याशीं मैत्री केल्यानें अधिक स्वार्थ साधतो असें दिसून आल्याबरोबर पहिली मैत्री पार ढांसळून जाऊन तिचा मागमूसही रहावयाचा नाहीं! असल्या प्रकरणीं इमानप्रमाण व शपथ वगैरे प्रकार होत असतात ते सर्व दांभिकपणाचे होत!

हिंदुस्थानात पाऊल ठेवतांना इंग्रज लोकांनीं व्यापाऱ्यांचा वेष घेतला होता, तो यापूर्वीं कधींच टाकून देऊन अलीकडे त्यानीं राज्यसंपादनाची हांव धरिली होती. मात्र तें राज्य त्यांस लढाईच्या दगदगींत, खर्चांत व धोक्यांत न पडतां जितकें मिळेल तितकें अवश्य पाहिजे होतें. दोन टापूंवर त्यानीं फार दिवसांपासून नजर ठेविली होती. पैकीं मुंबई जवळचें साष्टी बेट एक. तें मराठ्यांच्या ताब्यांत होतें. दुसरा टापू म्हटला तर पूर्व समुद्राच्या किनाऱ्यावर 'उत्तर सरकारें' या नांवाखालीं मोडणारे मद्रासेस नजीक असे गंटूर, सिकाकोल, राजमहेंद्री वगैरे पांच परगणे होते तो होय. पैकीं साष्टीबद्दल इंग्रजांनीं अनेक वेळां मागणें केलें असून व तें मिळविण्यासाठीं पाहिजे तितकें द्रव्य खर्चण्यास ते तयार झाले असून मराठ्यांनीं त्यांचें मागणें नाकारिलें, म्हणून त्यांवर त्यांचा फारच राग झाला होता. शिवाय मराठे बलिष्ठ असल्यामुळें त्यांस बलहीन केल्याशिवाय राज्यसाधनाचे आपले पुढील बेत व्यर्थ होतील हें त्यांस पक्कें ठाऊक होतें. व त्यामुळेंच दुरून दुरून राजकारणें खेळवून इतर राजांकडून मराठ्यांचा पाडाव करविण्याविषयीं त्यांची खटपट सुरू होती. पूर्व समुद्राच्या किनाऱ्यावरील पांच परगणे जे वर सांगितले आहेत ते निजामअलीच्या राज्यांतले होते. ते परगणे आह्मांस मक्त्यानें द्या ह्मणून इंग्रज निजामअलीस सांगत होते. परंतु इंग्रजांचा पुढील कावा काय आहे हें निजामअलीस कळूं लागलें असल्यामुळें, किती ही मक्ता देण्यास तुम्ही कबूल झालां तरी माझे परगणे तुम्हांस द्यावयाचे नाहींत असें त्यानें त्यांस साफ सांगितलें. तो बऱ्या बोलानें ऐकत नाहींसें पाहून इंग्रजांनीं राजमहेंद्री परगणा बळजबरीनें ताब्यांत घेतला. त्या योगानें निजामअलीस फार क्रोध आला व आम्ही तुमचा मुलूख घेतला आहे हा स्वसंरक्षणासाठीं निरुपायानें घेतला आहे, तुमचें नुकसान करण्यासाठीं मुद्दाम घेतला असा अर्थ नोहीं;

असें जेव्हां इंग्रज त्यास गंभीरपणानें सांगूं लागले, तेव्हां त्याच्या क्रोधांत अधिकच भर पडली असेल यांत नवल नाहीं! परंतु त्याचें नांव जसें मोठें होतें तशी त्यामध्यें इंग्रजांवर स्वारी करून त्यांस पराजित करण्याची शक्ति नव्हती. त्याच्या मनांत हैदराचें पारिपत्य करावयाचें होतें पण तें करण्याचें सुद्धां त्यास सामर्थ्य नव्हतें. असला हा बिकट प्रसंग लक्षांत आणून गतवर्षी त्यानें पेशव्यांशीं कायमच्या दोस्तीचा तह केला होता. त्या तहाची बातमी इंग्रजांस कळतांच ते घाबरून गेले, व आतां मराठे व मोंगल मिळून मद्रासेवर स्वारी करणार अशी त्यांची खात्री झाली. मोंगल व मराठे यांशीं हैदराचें पक्कें वैर असून ते लवकरच त्यावर स्वारी करणार आहेत अशी प्रसिद्धि झाली असल्यामुळें तो आपला समदुःखी सोबती आहे असें समजून इंग्रजांनीं त्याशीं सख्य करण्याचें संधान लाविलें. तुम्हीं आम्हीं मिळून मोंगल व मराठे यांवर स्वारी करून त्यांस जेरीस आणूं या, यांत तुमचाही लाभ आणि आमचाही लाभ, अशा आशयाचें त्यांचें बोलणें होतें; परंतु हैदरानें तें कबूल केलें नाहीं.

अठराव्या शतकाच्या प्रारंभीं मोंगलांचें दक्षिणेंत साम्राज्य होतें, व त्यांची सत्ता अप्रतिहत चालत होती. पुढें लवकरच पेशव्यांच्या कर्तब-गारीनें मराठ्यांचा झपाट्यानें उत्कर्ष होत गेला व ते कांहीं दिवस या साम्राज्याचे भागीदार होऊन मोंगलास शिरजोर होऊन बसले. तें शतक अर्धें लोटून गेल्यावर फ्रेंच, इंग्रज व हैदर असे तीन नवीनच राजे उद-यास आले व तिघांनींही सामर्थ्याच्या बाबतींत मोंगलाच्या वरती नंबर पटकाविला. पैकीं फ्रेंचांचा इंग्रजांनीं उच्छेद केल्यामुळें दक्षिणेंत तूर्त मरा-ठ्यांचा पहिला नंबर, त्यांच्या खालीं हैदराचा, त्याच्या खालीं इंग्रजांचा व त्या खालीं मोंगलाचा, या प्रमाणें स्थिति होती. रावसाहेब पेशवे जिवंत होते तोपर्यंत त्यांनीं आपलें वर्चस्व नेहमीं कायम ठेविलें व बाकीच्या तीन राजांस कधीं वर मान करूं दिली नाहीं. ते मरण पावल्यावर मराठी साम्राज्यास उतरती कळा लागली. पुढें नाना फडणिसानें कारभार केला त्यांत त्याच्या अकलेची तारीफ करावयाची ती एवढ्यास करितां कीं, हैदर व टिपू व इंग्रज यांशीं त्यानें कशीबशी बरोबरी राखिली. पण इतकेंही

करण्यास त्यास फार फार प्रयास पडले! अठरावें शतक संपतें न संपतें तोंच इंग्रजांनीं टिपूस मारून त्याचें राज्य घेतलें व नाना फडणीस मेल्या-बरोबर मराठे व मोंगल या दोघांसही आपल्या जरबेखालीं दडपून टाकिलें. असो. तेथपर्यंत म्हणजे अठरावें शतक संपेपर्यंत या चार राजांचीं एक-मेकांत सख्यें व युद्धें सारखीं सुरू होतीं.

सत्राव्या शतकांत शिवाजी महाराजानीं विजापूर व गोवळकोंडा येथील सुलतान व दिल्लीचा बादशहा यांशीं ज्या रीतीची वागणूक ठेविली होती त्याच रीतीची वागणूक या काळीं हैदरानें इंग्रज, मोंगल व मराठे यांशीं ठेविली होती. त्याचें सख्य असें कोणाशींच नसून तो तिघांचाही मुलूख बळजबरीनें हाताखालीं घालूं पहात होता. त्यांत हल्लीं तो मराठ्यांस मात्र भीत असे, पण त्यांनीं स्वारी करून येऊन जबरदस्तीनें मान वांक-विलीच तर तितक्यापुरती खंडणी व मुलूख देऊन त्यांस वाटेस लावावें, आणि ते दूर गेल्यावर पुनः त्यांशीं धुंडाई सुरू करावी हा त्याचा क्रम चालत असे! मराठे व मोंगल यांस भिऊन तूर्तच्या प्रसंगीं इंग्रजानीं जेव्हां हैदराशीं सख्य करण्याचा पैगाम बांधिला, तेव्हां त्यानें ओळखिलें कीं, आपल्या कामासाठीं इंग्रज आपणाशीं मैत्री एवढ्यापुरती करूं इच्छि-तात; परंतु यांची ही मैत्री नेहमीं टिकणारी नव्हे, व जेव्हां आपणावर कांहीं आणीबाणीचा प्रसंग येईल त्या वेळीं इंग्रज आपणास कवडीइतकी मदत न करितां स्वस्थ तमाशा पहात बसणार. मग यांच्या या मैत्रीचा काय उपयोग!

हैदरानें झिडकारिल्यानंतर इंग्रज पुनः निजामअल्लीशीं सलोख्याचें बोलणें बोलूं लागले व निजामअल्लीनें तें कबूल करून त्यांशीं दोस्ती केली! या वेळीं या दोघांत जो तह झाला त्यांत असें ठरलें कीं, इंग्रजांनीं राजम-हेंद्री वगैरे परगणे घेतले आहेत ते त्यांजकडेच जहागीर म्हणून कायम रहावे व त्याबद्दल त्यांनीं दोन पलटणें व सहा तोफांसह निजाम सांगेल ती चाकरी हरहमेषा करीत जावी. शिवाय पावसाळा संपल्याबरोबर दोघांनीं आपापल्या फौजा गोळा करून हैदरावर स्वारी करून त्याचें राज्य वांटून घ्यावें. याप्रमाणें हा तह ठरला. निजामअल्लीचा हैदरावर स्वारी कर-

ऱ्याच्या बाबतींत मराठ्यांशीं नुकताच तह झालेला होता, परंतु आतां इंग्रजांची कुमक मिळाल्यामुळें त्यास मराठ्यांच्या दोस्तीची जरूरी राहिली नाहीं, तथापि हैदराचा उच्छेद होईपर्यंत मराठ्यांशीं वरकरणी सलोखा राखावा, व ती मसलत साधल्यावर मराठ्यांसही बुडवावें असा मोंगल व इंग्रज यांनीं गुप्त बेत केला होता. त्या बेतास अनुसरून निजामअल्लीनें पेशव्यांस निरोप पाठविला कीं, हैदरावर व इंग्रजांवर स्वारी करण्याचा तुमचा आमचा बेत ठरला होता, परंतु हल्लीं इंग्रजांचा व आमचा सलोखा झाला असल्यामुळें आतां इंग्रज व आपण दोघे मिळून हैदरावर मोहीम करूं व या मोहिमेंत जो फायदा होईल तो तिघे मिळून सारखा वांटून घेऊं.

असल्या भुलथापांनीं फसणारे रावसाहेब पेशवे नव्हते. नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दीपासून मोंगलानें नेहमीं आपल्या घोरणानें चालावें इकडे मराठ्यांचा विशेष कटाक्ष होता. मध्यें मोंगलाच्या राज्यांत फ्रेंच लोक शिरजोर झाले होते, त्यांचें उचाटन करण्यास त्यांस फार प्रयास पडले होते. हल्लीं मोंगलास पंधरा लक्षांचा मुलूख देऊन त्यांशीं पक्की दोस्ती केली असतांही त्यानें ज्या अर्थी इंग्रजांसारख्या परकी लोकांचा आश्रय केला आहे त्या अर्थीं त्या दोघांच्या एकीपासून पुढें आपणास धोका येण्याचा संभव आहे हें पेशव्यांनीं तत्काळ ओळखिलें. मोंगलाशीं उघडपणें वैर करण्याचा तो समय नव्हता व तसें करण्याचें कारणही नव्हतें. तथापि स्वतःच्या बळावर कोणाचीही पर्वा न करितां पाहिजे ती मसलत तडीस नेण्याचें आपल्यांत सामर्थ्य आहे हें कृतीनें दाखविण्याकरितां एकट्यानेंच हैदरावर मोहीम करण्याचा त्यांनीं निश्चय केला.

आदल्या वर्षीं पेशव्यांनीं मोठीशी मुलुखगिरी केली नव्हती. भोंसल्यावर स्वारी झाली तींत फार फौजेची जरूर पडली नाहीं. याकरितां त्यांनीं पटवर्धन व रास्ते वगैरे कर्नाटकच्या स्वारीस गुंतले होते त्यांखेरीज बाकीच्या जहागीरदारांस थोडी थोडी फौज ठेवावयास सांगून बाकी फौजेचा पैका सरकारांत भरण्याविषयीं ताकीद केली होती व त्याप्रमाणें पैकाही वसूल झाला होता. त्या पैक्याचा उपयोग रावसाहेबांनीं यंदांची फौज ठेवण्यांत केला. या स्वारीस त्यांनीं फौज नेमिली होती, तिचा अजमास—हुजरात

पागा व हुजूरचे सरंजामी मिळून पंधरा हजार, शिवाय थोरलीं पथकें पटवर्धन, रास्त, विनीवाले, सखारामबापू, महिपतराव चिटणीस, घायगुडे, अक्कलकोटकर भोंसले, मुधोळ व गजेंद्रगड येथील घोरपडे, कवडे, भापकर नरगुंदकर भावे, शिवाय काळे, मुळे, बावर, पायगुंडे, खंडो गोमाजी, जगताप, व आणखी कांहीं मिळून पंचवीस हजार, शिवाय मुरारराव घोरपडे पांच सहा हजार. ही सारी घोडेस्वारांची फौज होती. याखेरीज पायदळ व तोफखाना यांचें जुजवी सामान होतें. इतक्या फौजेवर आपली स्वारी फत्ते होईल ही त्यांची खाली होती व म्हणूनच त्यांनीं मुलुखगिरीचे दिवस फुकट न घालविता जलदी जलदीनें निघण्याची तयारी चालविली.

तिकडे हैदरानें चित्रदुर्ग वगैरे संस्थानापासून खंडणी घेण्याकरितां स्वारी केली होती. पुण्यापेक्षां कर्नाटकास मिरज जवळ असल्यामुळें तेथें फौज जमा होत आहे, ही बातमी ऐकून हैदरास दहशत पडेल; तो संस्थानांपासून खंडण्या न घेतां मराठ्यांची आपणावर खचित स्वारी होणार हें समजून त्यांची खंडणी चुकती करून देण्याच्या उद्योगासही लागेल, अशा उद्देशानें रावसाहेबांनीं गोपाळरावास लिहून पुनः पुनः ताकीद केली होती कीं, तुम्हीं दसऱ्यास डेरेदाखल झालेंच पाहिजे. त्याप्रमाणें गोपाळराव व परशुरामभाऊ दसऱ्यास मिरजेहून निघून आपली फौज जमा करीत करीत कित्तूराकडे कूच करून चालले. त्यांस आनंदराव रास्ते व नरगुंदकर भावे व दौलतराव घोरपडे गजेंद्रगडकर हेही लवकरच येऊन मिळाले.

स. १७६६ आक्टो.

इकडे पुण्यासही स्वारीची तयारी जारीनें सुरू झाली होती, ती पुरी झाल्यावर रावसाहेब आश्विन वद्य अष्टमीच्या दिवशीं डेरेदाखल झाले. डेरे मुंढव्यांस दिले होते व बाजार व बुनगें पुढें पाटसच्या मुक्कामीं पाठवून देण्यांत आलें होतें. मुंढव्यांसच दिपवाळी झाली व सिद्धटेक, जेजुरी, मोरेश्वर, थेऊर व कुरकुंभ येथील देवांचीं दर्शनें घेण्यांत बहुतेक कार्तिक मास गेला. या पांच देवांचीं दर्शनें घेणें यास 'पंचयात्रा' म्हणत असत. हीं सर्व स्थानें पुण्याच्या आसपास असल्यामुळें, डेरेदाखल झाल्यावर पंचयात्रा करण्यासाठीं हिकडून तिकडे हिंडण्यांत महिना मंहिना

दिवस सहज जात व त्या मुदतींत चोहोंकडून फौज येऊन मिळण्यास सोईचें होई. पंचथाला झाल्यावर रावसाहेब पाटस येथें गेले व तेथून सातार प्रांतीं महादेवाच्या रोखें कूच करून चालले. त्यांची स्त्री रमाबाई व बंधु नारायणराव हीं दोघेंही या स्वारीस बरोबर आलीं होतीं. मोरोबा दादा फडणीस, कृष्णराव बल्लाळ व हरिपंत फडके स्वारींत हजर होते. नाना फडणीस मात्र पुण्यास राहिला होता व श्रीमंत दूर गेल्यावर राज्य सांभाळण्याचें जोखीम त्याच्या जिवावर होतें. तें सांभाळून तेथून स्वारी-करितां जी जी तरतूद व्हावयाची ती ती करण्याचें काम त्यानें मागच्या-प्रमाणेंच याही खेपेस उत्तम रीतीनें बजाविलें. सखारामबापू मागें राहिला होता तो महादेवाच्या मुक्कामीं लष्करास येऊन मिळाला. नंतर रावसाहेब म्हसवड, नाझरें, सांगोलें, उटगी, उमदी या गांवांवरून विजापुर उजवें घालून सुरापुरच्या मुलखांत गेले. तेथील संस्थानिक बेरड जातीचा होता. व त्याच्या घराण्यास औरंगजेबाकडून 'बहिरी बहादर' असा किताब मिळाला होता. या बेरडानें खंडणी देण्याचें नाका-रिल्यामुळें रावसाहेबांनीं त्याचें जेटगी म्हणून ठाणें होतें तें हल्ला करून घेतलें व त्या गांवावर सत्तर हजार रुपये खंड बसविला. तेव्हां सुरापूरकर शुद्धीवर आला व एक लक्ष पांच हजार रुपये खंडणी देऊन त्यानें रावसाहेबास मार्गस्थ केलें.

नोव्हेंबर

बाबूजी नाईक सोलापूरचा किल्ला देण्यास कबूल नव्हता, सबब त्यास दरबेंत ठेवण्याकारितां कांहीं फौज सोलापुरच्या आसपास ठेवण्याचा रावसाहेबांचा विचार होता. परंतु गोविंद शिवराम खासगीवाले याच्या मध्यस्थीनें पुढें लवकरच तो किल्ला नाइकानें सरकारांत दिला. नंतर त्यास एक लक्ष पंच्यायशीं हजारांचा सरंजाम रावसाहेबांनीं दिला. त्यांत एक लक्षाचा त्यास जात सरंजाम म्हणून दिला व बाकी पंच्यायशीं हजारांत त्यानें अडीचशें स्वारांची पागा बाळगून सरकार चाकरी करीत जावी असा ठराव झाला.

रावसाहेब सुरापुराहून कुच करून कृष्णा उतरून गुडगुट्ट्यावरून तुंगभद्रेच्या रोखें चालले तों तिकडून गोपाळराव कित्तुरच्या देसायापासून

दिसेंबर } खंडणी घेऊन अनवाल, रामदुर्ग, नरगुंद या गांवांवरून गजेंद्रगड, कनकगिरी, शिदनूर, गुडगुंठ हें गांव उजव्या बाजूस टाकून थोरल्या लष्करासमीप येऊन पोंचला.

नंतर रावसाहेबानीं मनसबा केला कीं, जातां जातां रायचूर व मुद्गल या सरकारांतील तमाम परगण्यांची खंडणी घ्यावी व पाळेगार वगैरे लोकांस चांगलां जरब देऊन वर्षापेक्षां त्यांपासून अधिक खंडणी घ्यावी. या उद्देशास अनुसरून त्यांनीं गोपाळरावाकडे पांच तोफा व कांहीं जेजाला व बाणांचा सरंजाम पाठवून दिला. नंतर त्या दोन लष्करांनीं निरनिराळे दोन रस्ते धरून रायचूरच्या हद्दीवर येतांच खंडण्या घेण्याचें काम झपाट्यानें सुरू केलें. हरीराम नांवाच्या गृहस्थाकडे त्या प्रांतांतील कांहीं परगण्यांची मामलत नानासाहेब पेशव्यांनीं सांगितली होती, परंतु ते परगणे अलीकडे तिकडील पाळेगार लोक बळकावून बसले होते, हल्लीं गोपाळरावानें भोसकी व लिंगसुगूर वगैरे मातबर ठाणीं काबीज करून त्या

स. १७६७ } मामलेदाराचा पुनः अंमल बसवून दिला. एका बाजूनें नर-
जाने. } सिंगराव घायगुडे पांच सहा हजार फौज घेऊन गेला, त्यानें अरकूल, येलबर्गें, व दुसरीं कांहीं ठाणीं घेतलीं. कँचनगुडु, गदवाल, बल्लारी, शिदनुर, अदवानी, कर्नूळ, कनकगिरी, चित्रदुर्ग, देवदुर्ग, रायदुर्ग, इत्यादि लहान मोठ्या संस्थानांपासून रावसाहेबांनीं एक, दोन, तीन पांच लाखापर्यंत या खेपेस खंडण्या घेतल्या. मोठमोठे कसब्याचें गांव होते, त्या सर्वांपासून दहा हजारांपासून एक लाखापर्यंत खंडणी घेण्यांत आली. खंडण्या ठरविण्याचें काम गोपाळरावाकडे असे, परंतु रावसाहेब व सखारामबापू यांच्या मर्जीस तो ठराव आला तर खंडणीचा वसूल करण्याची तजवीज होई. नाहीं तर मर्जीप्रमाणें खंडणी न: देणाऱ्याचा गांव, परगणा किंवा संस्थान सरसकट जाळून लुटून बेचिराख करण्याचा क्रम सुरू होई! याप्रमाणें त्या प्रांतांत एक महिन्यांत पंचवीस लाख रुपये रावसाहेबांनीं जमा केले. यांत फडणीस, मुजुमदार, चिटणीस, पोतनीस, हरीपंत फडके व सखारामबापू यांच्या ' कारकुनी ' चा ऐवज धरिलेला नाहीं. त्याचा वसूल निराळा होत असून तो रोखीनें व्हावयाचा असे. हुंडी किंवा

सावकारी जामीनगत किंवा हप्त्याहप्त्यांनीं फेड सरकारी खंडणीची होई, परंतु ' कारकुनी 'च्या ऐवज तत्काळ रोख घेतला जाई !

त्या प्रांतीं केरूर नांवाचें लहानसें संस्थान आहे तें घेण्यासाठीं अदवानीचा नबाब बसालतजंग फार खटपट करीत होता. एकटयाच्यानें तें काम होईना म्हणून त्यानें मुरारराव घोरपडयास कुमकेस बोलाविलें. त्या दोघांनीं येऊन त्या ठाण्यास वेढा घातला असतां गांवकरांनीं रावसाहेबांची कुमक करण्याविषयीं प्रार्थना केली. त्यांनीं गोपाळरावास आज्ञा केली कीं, केरूरचा वेढा उठवून संस्थानिकास संकटांतून मुक्त करावें. गोपाळराव तत्काळ कूच करून केरूरच्या आसपास गेला व त्यानें बसालतजंग व घोरपडे यांस सांगितलें कीं, केरूर संस्थान सरकारचें आहे. तुम्ही वेढा उठवून चालतें व्हावें. तसें न कराल तर तुम्हांस शत्रू समजून मी तुमचें लष्कर लुटीन. त्याचें म्हणणें मान्य केल्यासारखें बसालतजंगानें दाखविलें, परंतु केरूरकराविषयीं त्याच्या मनांत फार क्रोध आला असल्यानें गोपाळरावास सलोखा करण्याच्या नादीं लावून त्यानें दगाबाजी करून केरूरावर हल्ला केला. परंतु ठाण्यांतील लोकांनीं तो हल्ला मारून काढिला व त्याचे ये दोडशें असामी ठार मारून पांचशेंपर्यंत जखमी केले. इकडे गोपाळरावास हा दगाबाजीचा प्रकार पाहून संताप आला व त्यानें दौड करून येऊन वेढा घालणाऱ्यांच्या कहीचीं घोडीं व तोफांचे बैल हिसकून घेतले. तेव्हां वेढा घालणारे खजील होऊन निघून जाण्यास कबूल झाले. नंतर बसालतजंगास अदवानीस पोंचवून मुरारराव गुत्तीस गेला व पूर्वी ठरल्याप्रमाणें पेशव्यांस येऊन मिळण्याकरितां सैन्याची सिद्धता करूं लागला.

देवदुर्गच्या मुक्कामीं रावसाहेबांनीं सर्व फौजेची गणती घेतली. प्रत्येक जहागिरदारानें घोडे माणूस उत्तम शेलकें हजर केलें असेल तर बरें, तसें नसेल तर जितकीं घोडीं व माणसें लढाईच्या कामास नालायख ठरतील तितक्यांचा दर असामीस तीनशें पावणे तीनशें रुपये जसा शेरा असेल त्याप्रमाणें पैका जहागिरीच्या उत्पन्नांतून कापून घेण्याचा परिपाठ होता. प्रस्तुतच्या प्रसंगीं फौजेच्या गणतीचा तपास करितां बारकाईनें

झाल्या याविषयीं गोपाळरावास मोरो बल्लाळ लिहितो कीं, ' गणत्या घ्यावयाची फार चौकशी ती पत्रीं कोठवर ल्याहावी ! परवां तमाम गोट-गणत्या घेतल्या. राजश्री रामचंद्र गणेश व ( महादाजीपंत ) गुरुजी व हरिपंत फडके मातबर ( गणती घ्यावयास ) पाठविले. समागमें खिजमतगार चोर बातमीस, येणेंप्रमाणें चौकशी करून पाठविले. त्यांस रा. नारो कोन्हेर जितकर भोंसल्याची ( अक्कलकोटकरांची ) गणती घ्यावयास गेले. चांगलीं घोडीं असतां बाईट म्हणून निमित्त घेऊन घसघस केली. तेव्हां त्यांनीं शंभर रुपये कबूल केले. ते रात्री घेतले. इतकें श्रीमंतांस कळलें. बोलावून आणून चौकशी केली. सेवट रुजवातीनें अंगीं लाविलें व पहिलें एक दुसरें निमित्त होतेंच. त्यास ढालाईत लावून लष्कराबाहेर लावून द्यावयाची आज्ञा जाहली. आज जाईल उद्यां जाईल. सालमजकुरीं चौकशीची सीमा आहे. नारो खंडेराव याजवरही पेंच येत होता परंतु त्यानें कांहीं घेतलें नव्हतें म्हणून पेंच वारला ! "

रावसाहेबांची स्वारी पुण्याहून निघण्यापूर्वी हैदराचा वकील पुणें दरबारांशीं तह करून घेण्याच्या बाबतींत बोलत होता. हैदरासारखे जबरदस्त मांडलिक असत, त्यांपासून वर्षास किती खंडणी घ्यावयाची ती रक्कम जरी ठरलेली असे, तरी ती रक्कम वेळेवर बिनतक्रार येत नसल्यामुळें स्वारी केल्याशिवाय निदान धाकदपटशा दाखवून दुप्पट चौपट रक्कम मागितल्याशिवाय कधीं ऐवजाचा वसूल होतच नसे. त्या वेळीं हैदराच्या वकिलास रावसाहेबांनीं सांगितलें होतें कीं, तुम्हीं मुरारराव स उपद्रव देऊं नये. अलीकडे तुम्हीं त्याचीं काय ठाणीं घेतलीं असतील तीं सोडावीं. सरकारचे संस्थानिक त्या प्रांतीं चित्रदुर्गकर, रायदुर्गकर वगैरे आहेत त्यांपासून खंडण्या घेऊं नयेत. कर्नाटक बालेघांटचा म्हणजे शिऱ्यांचा सुभा तुम्हीं बळकाविला आहे तो परत द्यावा, शिवाय गेल्या व चालू सालची मिळून पाऊण कोट रुपये खंडणी द्यावी. इतकें तुम्हांला कबूल होत असेल तर आम्ही स्वारी करण्याचा बेत रहित करितों. वकिलानें उत्तर केलें कीं, शिऱ्यांच्या सुभ्यावर खरा वारसा आमचा आहे आणि तो सुभा आम्ही तुम्हांस देणार नाहीं. तिकडील संस्थानें त्या सुभ्याच्या अंमलाखालीं पूर्वी-

घारपासून आहेत, तेव्हां त्यांजकडून आम्हीं खंडणी घेतों तें योग्यच आहे. मुरारराव आमचा शेजारी असून त्यापासून आम्हांला नेहमीं उपद्रव होतो, याकरितां त्यास जरबेंत ठेवण्यासाठीं आम्हीं त्याचीं ठाणीं घेतलीं आहेत तीं त्यास परत देतां येत नाहीत. शिऱ्यांचा सुभा व संस्थानिकांच्या खंडण्या व घोरपड्याचीं ठाणीं या तीन गोष्टींबद्दल आम्हीं जें वर्तन केलें आहे तें पेशवे सरकारांतून मंजूर होईल तर फार झालें तर आम्हीं बारा लक्ष रुपये खंडणी देऊं! परस्परांच्या बोलण्यांत इतकी तफावत पडूं लागल्यामुळें समेट होण्याची गोष्ट अर्थातच बाजूला राहून रावसाहेब स्वारी करण्याच्या तयारीस लागले. त्या वेळीं पुण्यासच अशी मसलत ठरली होती कीं, शिऱ्यांचा सुभा पुरातन 'स्वराज्या' पैकीं असून तो नानासाहेब पेशव्यांनीं जिंकिलेला असतांही पुन: हैदरानें बळकाविला आहे, तो यंदांच्या स्वारींत सबंध जिंकून घ्यावयाचा व त्यानें घोरपड्याचा मुलूख घेतला आहे तो ज्याचा त्यास परत देववावयाचा, व तिकडील संस्थानापासून खंडण्या घेण्याचा आपणास हक्क नाहीं व आपण त्या घेणार नाहीं, हेंही हैदराकडून कबूल करवावयाचें. इतक्या गोष्टी झाल्यावर त्यापासून पाऊण कोटी रुपये खंडणी घेण्याचें आपण बोललों आहों तितकीच घेण्याचा हेका न धरितां तो तीस पसतीस लक्षांपर्यंत देण्याचें कबूल करील; तरी तेवढी रक्कम घेऊन परत फिरावयाचें. या मसलतीस अनुसरून त्यांनीं ही स्वारी केली व एवढा वेळ वर्णिल्याप्रमाणें रायदुर्गापर्यंत फौज आणिली. रायदुर्ग हें स्थळ हैदराच्या राज्याच्या ईशान्य सरहद्दीवर आहे. येथपासून पुढें त्याचा मुलूख लागला.

मराठे, मोंगल व इंग्रज हे तिघेही आपणावर स्वारी करण्याच्या बेतांत आहेत हें हैदर जाणून होता. पैकीं मोंगल व इंग्रज यांस तो फारसा जुमानीत नव्हता. मराठ्यांस मात्र खंडणी दिल्याशिवाय ते परत जावयाचे नाहींत हें त्यास पक्कें माहीत होतें. परंतु आपण अगदीं हारीस आल्याशिवाय कोणास नम्र म्हणून व्हावयाचें नाहीं हा त्याचा नेहमीचा शिरस्ता असल्यामुळें मराठ्यांच्या टोळधाडीचें कसें निवारण करावें या विवंचनेंत तो पडला. मागच्या स्वारींत त्यांनीं आपली कशी कशी दुर्दशा उडविली हें ध्यानांत आणून त्यांशीं समोर बेऊन झुजावयाचें नाहीं हा त्यानें निश्चय

फेब्रुवारी } ठरविला व बेंगरूळ, बिदनूर व शिरें येथें उत्तम बंदोबस्त करून आपण सर्व फौजेसह श्रीरंगपट्टणांत राहिला. मराठ्यांच्या लष्कराची गति खुंटून त्यानें अन्नपाण्यावांचून तडफडून मरावें व त्यास परत जाणें भाग पडावें, या उद्देशानें त्यानें तळीं फोडून रिकामीं केलीं व विहिरींतून व ओढ्यांतून निवडुंग टाकून पाणी नासून टाकिलें, वैरणकाडी जाळून टाकिली, धान्याचा नाश केला व कांहीं जमिनींत पुरून टाकिलें. वाटेवरचीं गांवें व शहरें उठवून वस्ती व गुरेंढोरें दुसऱ्या प्रांतांत हांकून लावून शेंकडों कोसपर्यंत मुलूख अगदीं ओसाड करून टाकिला.

इतकी ही आटोकाट केलेली मेहनत व्यर्थ होऊन शेवटीं मराठ्यांचें लष्कर हैदराच्या मुलखांत शिरावयाचें तें शिरलेंच. त्यास कोणाच्याही हातून प्रतिबंध झाला नाहीं. त्याचा जाण्याचा मार्ग एकच नसे. आसपास पंचवीस कोस पर्यंत लष्कर पसरून निरनिराळ्या समांतर मार्गांनीं तें चाले. यामुळें कोठेंना कोठें तरी पाणी, धान्य व वैरण थोडीबहुत मिळे. नाहींच वैरण मिळाली तर घरावरचा कुचका केमळ, झाडाचा पाला व गवताच्या मुळ्या यांवरही जनावरांचा कांहीं दिवस तरी चरितार्थ चाले! लष्कर जेथें उतरेल त्याच्या जवळपासच्या गांवांतील घरें मोडून आणिलीं म्हणजे पाहिजे तितकें लांकुड फांटें! लष्करांतील कित्येक लोकांचा धान्य हुडकून काढण्याचा धंदाच होता. एक लांब लोखंडी गज बरोबर घेऊन ते चोंहीकडे हिंडत व गज जमिनींत मारून व त्याचा वास घेऊन अमुक ठिकाणीं धान्य पुरलें आहे असें ते नेमकें सांगत! शिवाय वणजारी लोक दूरदूरच्या ठिकाणांहून धान्य खरेदी करून मराठी लष्करास केव्हां केव्हां आणून पुरवीत. यामुळें या स्वारींत मराठ्यांचे बरेच हाल झाले व त्यांच्या लष्करांत महागाईही फार झाली, तथापि उपासमार अशी कधीं झाली नाहीं. श्रीमंतांची स्वारी रायदुर्गाहून निघाली ती हवग्रीवानदीच्या तीरा तीरानें थेट शिऱ्याचा रोख धरून चालली. त्या नदीस उन्हाळ्यांत पाणी मुळींच नसतें तथापि वाळवंटांत खणिलें असतां, जागोजाग थोडें थोडें पाणी सांपडतें त्यावरच लष्करचा निर्वाह चालला होता.

श्रीमंतांच्या आज्ञेवरून गोपाळराव थोरल्या लष्कराच्या अघाडीस किंवा

आसपास कांहीं मजलींवर रहात असे. त्याच्या विद्यमानें पेशव्यांशीं तह करून घेण्याच्या उद्देशानें हैदरानें करीमखान नांवाचा वकील त्याजकडे पाठविला. त्यावेळीं थोरलें लष्कर रायदुर्ग सोडून थोडेसें पुढें आलें होतें. पूर्वी पुण्यांत तह प्रकरणीं हैदराच्या वकिलास जो जबाब सांगण्यांत आला होता, तोच याही वेळीं गोपाळरावानें सांगितला. तें बोलणें त्यास पटलें नाहीं, म्हणून कांहीं दिवसांनीं तो थोरल्या लष्करांत जाऊन दाखल झाला. तेथेंही त्याची डाळ शिजेना. शेवटीं आतां स्वारी होण्याचें खास चुकत नाहींसें पाहून तो बोलूं लागला कीं, आपण घोरपड्याचा मुलुख परत देतों, संस्थानिकांच्या वाटेस कधीं जाणार नाहीं असें कबूल करितों, आतां खंडणी काय घेतां ती बोला. तेव्हां पेशव्यांनीं पाऊण कोटीची रक्कम पूर्वी सांगितली होती तींत पांच लक्ष कमी करून सत्तर लक्ष रुपये सांगितली. तेव्हां वकीलही पुण्यांत बारा लक्ष रुपये देईन म्हणून म्हणत होता तो आतां एकवीस लक्ष रुपये देतों, तुम्हीं परत चला, असें तो बोलूं लागला.

रावसाहेब माघ शुद्ध चतुर्दशीच्या दिवशीं शिऱ्यास पोंचले. ती त्या सुभ्याची मुख्य जागा असून हैदराचा मेहुणा मीररेझा त्या सुभ्याचा सुभेदार होता तोही तेथेंच रहात होता. याकरितां प्रथम शिरें घेण्याचा त्यांचा निश्चय होता. त्याजवळ आठ हजार गारदी, दोन हजार प्यादे दोन हजार स्वार इतकें सामान चांगलें निवडक असून तोफखानाही चांगला होता. त्या भरावर तो पेशव्यांशी झुजण्याकरितां खंदकाबाहेर लढाईच्या तयारीनें येऊन उभा राहिला, परंतु मैदानांत येऊन पेशव्यांशीं लढण्यांत जेथें हैदराचाही निभाव लागणें कठीण, तेथें मीररेझाच्यानें काय पराक्रम होणार ! श्रीमंतांनीं आल्याबरोबर त्यावर हल्ला केला, तेव्हां त्याच्या फौजेचा मोड होऊन तो मोठ्या प्रयासानें जीव बचावून किल्ल्यांत शिरला. त्याच्या हजारों शिपायांची कत्तल होऊन पांचशें घोडे व पांच तोफा मराठ्यांच्या हातीं लागल्या.

शिऱ्यांचा किल्ला मुळचाच बळकट असून हैदरानें तेथें उत्तम बंदोबस्त ठेविला होता. शिबंदी, धान्य, दारूगोळा व हरएक प्रकारचें इतर सामान याची कांहीं एक उणीव नव्हती. या किल्ल्यास रावसाहेबांनीं वेढा दिला,

तेव्हां त्यांच्या लष्करांत सारी सहा खंडी दारू शिल्लक होती! तथापि त्यांनीं रायदुर्ग व बल्लारी येथून दारू मिळविली व कांहीं तरतूद पुण्याहून नाना फडणिसानें आगाऊच केली होती, ही आयत्यावेळीं उपयोगीं पडली. नंतर किल्ला घेण्याचें काम नेटानें चालू झालें. माघ वद्य पंचमीच्या

फेब्रुवारी { दिवशीं मुरारराव घोरपडे आला व गोपाळरावही श्रीमंतांच्या आज्ञेवरून लष्करास येऊन मिळाला. मोर्चे खंदकापर्यंत येऊन पोंचले. मिराची कुमक हैदरानें करावी तर तो जो एकदां श्रीरंगपट्टणास दडून बसला तो तोंडसुद्धां बाहेर काढीना. अशा प्रसंगीं आधींच पराजय झाल्यामुळें नाउमेद व खट्टू झालेला मीरसाहेब गोपाळरावाच्या विद्यमानें कौल मागूं लागला. त्या वेळीं असें ठरलें कीं, मिरानें आपली चीजवस्त, मुलें माणसें व फौज यांसह किल्ला सोडून श्रीमंतांच्या लष्करांत येऊन रहावें. त्या सुभ्यापैकीं जितकीं ठाणीं त्याच्या ताब्यांत असतील तितकीं सारीं त्यानें श्रीमंतांच्या हवालीं करावीं. त्यास श्रीमंतांनीं गुरमकोंड्याचा परगणा व किल्ला जहागीर द्यावा व त्याबद्दल त्यानें दोन हजार स्वार बाळगून पेशवे सरकारची चाकरी करीत जावी. या शर्ती श्रीमंतांकडून अमलांत येतील याबद्दल गोपाळराव जामीन झाला, तेव्हां मीररेझा किल्ला सोडून मराठ्यांच्या लष्करांत येऊन उतरला व त्यांचें किल्ल्यावर निशाण लागलें.

शिरें हस्तगत झाल्यावर श्रीमंतांनीं गोपाळरावास पुनः वेगळें करून बाळापूर वगैरे ठाणीं घ्यावयास पाठविलें व आपणही कूच करून मद्‌गिरीस आले. तो किल्ला ज्या डोंगराच्या शिखरावर आहे तो डोंगर समुद्राच्या पृष्ठभागापासून चार हजार फूट उंचीवर आहे व त्यांत पाण्याचे झरे आहेत. किल्ल्यास पूर्वी मातीचा कोट होता परंतु हैदराच्या ताब्यांत हा किल्ला गेल्यानंतर त्यानें फारच भक्कम अशी तटबंदी तयार केली होती. इतक्या उंचीचा डोंगर असून त्याच्या तीन बाजूंनीं सरळ भिंतीप्रमाणें कडे तुटलेले आहेत. तिकडून शत्रूचा कांहींच इलाज चालण्याजोगा नाहीं. एक पूर्वेच्या बाजूनें मात्र वर जाण्यास पाउलवाट आहे. पण ती इतकी अवघड आहे कीं, जर जमीन कोरडी ठणठणीत असली तरच विजवर

पाऊल टिकावयाचें! असें सांगतात कीं, शत्रू आला म्हणजे किल्लेकरी या वाटेवर तेल ओतून ठेवीत असत! इतका हा बिकट किल्ला होता तरी श्रीमंतांनीं आल्याबरोबर दुसऱ्याच दिवशीं निकरानें हल्ला करून तो घेतला! तेथें बिदनूरची राणी व बिदनूरच्या राज्यावर वारसा सांगणारा तोतया हीं दोघें हैदरानें कैदेंत ठेविलीं होतीं तीं सांपडलीं. शिवाय कांहीं रोकड व बऱ्याच किंमतीचा माल सांपडला.

मदगिरी काबीज झाल्यावर श्रीमंतांनीं चेनरायदुर्गास वेढा घातला. फौजेच्या एका टोळीनें जाऊन मडकशिरें व दुसरीं कांहीं ठाणीं मुराररावापासून हैदरानें घेतलीं होतीं तीं घेऊन घोरपड्याच्या हवालीं केलीं. गोपाळरावानें दोड बाळापूर म्हणजे थोरलें बाळापुर यास घेरा दिला. मार्च } बाळापुराभोंवती कोठें दोन पुरुष, कोठें तीन पुरुष असा खोल खंदक होता व आंत दोन हजार शिपाई होते. परंतु गोपाळरावानें तोफांच्या मारानें तटबंदी पाडून हल्ल्याची तयारी केली, तेव्हां किल्लेकरी शरण येऊन त्यांनीं किल्ला हवालीं केला. नंतर त्यानें चिकबाळापुरास शह दिला व किल्ल्यावरून तोफांचा भडिमार चालला असतांही हल्ला करून शहर घेतलें व किल्ल्यास मोर्चे लाविले. तेव्हां आंतील लोक भयभीत होऊन शरण आले व तोही किल्ला त्याच्या हातीं आला. नंतर त्यानें मिडगेशी नांवाचा किल्ला सर केला. चिकबाळापुराभोंवते नंदिदुर्ग, इविकालदुर्ग वगैरे पहाडी किल्ले आहेत ते राजकारण करून किंवा जरब देऊन हातीं येण्याजोगे होते, परंतु बेंगरुळास हैदराची फौज बरीच जमली होती तिजपासून आपणास त्या डोंगराळ प्रदेशांत उपद्रव होईल असें मनांत आणून त्यानें तो बेत रहित केला व चिकबाळापुरच्या बंदोबस्ताकरितां आनंदराव रास्त्यांस ठेवून तो थोरल्या लष्करास येऊन मिळाला.

इकडे रावसाहेब चेनरायदुर्गास गराडा देऊन बसले होते तेथेंही मोर्चे खंदकास जाऊन भिडले होते. तटबंदीवर तोफांचा मारा चालला सुरू होता. त्या योगानें तट ढांसळून खिंडार पडलें, तेव्हां हल्ला करून तो मजबूत पहाडी किल्ला काबीज करण्यांत आला. मीररजा पटवर्धनांच्या विश्वासावर मराठी लष्करांत येऊन राहिला होता, त्याचा गोट लष्करांतील

बदमाष लोकांनीं लुटिला. तेणेंकरून रावसाहेबांस फार वाईट वाटलें व त्यांनीं लुटणाऱ्या लोकांचें पारिपत्य करून लुटींत गेलेली सर्व बस्तवानी त्याची त्यास मिळवून दिली. त्या प्रसंगाचें वर्णन मोरो बल्लाळानें असें केलें आहे.

"सायंकाळचें सहा घटका दिवसास श्रीमंत पोथी वाचीत डेऱ्यांत बसले होते. आम्ही हिशेबाच्या कामाकरितां गेलों होतों. राजश्री सखारामपंतही होते. तों एकाएकीं गडबड होऊन लष्करांतून पायउतार माणसें पिछाडीस हजारों जाऊं लागलीं. गडबड काय आहे म्हणून मनास आणितां 'मिराच्या लष्करावर हल्ला झाला, लष्कर लुटलें,' असें श्रीमंतांस कळतांच डेऱ्यांतून बाहेर येऊन तमाम पागेचे राऊत वगैरे ताकिदीस पाठवून दिले. राऊत जाऊन मिराच्या गोटांत पोंचत तों गोट लुटून फस्त केला. जवळ लष्कर मुराररावांचें होतें. ठिकाण कांहीं लागलें नाहीं. श्रीमंतांनीं लष्करच्या अडचिशें माणसांचे हात कान कापिले. केवळ रुद्रावतार जाहले. राग आंवरेना. याप्रमाणें या गोष्टीचें श्रीमंतांस कठिण वाटलें. मागाहून मिराच्या समाधानास बाळोजी पलांडे व कृष्णराव बल्लाळ पाठवून दिले. हे तेथें गेले. त्यांनीं सांगून पाठविलें जे, मिराच्या सलतनेपैकीं कांहीं बाकी राहिली नाहीं. अंगावर वस्त्र देखील नाहीं. असें सांगून पाठविलेवरून श्रीमंतांनीं वस्त्रें, भांडी, जेवणाचें साहित्य, मिठाई, ऐशी रातोरात पाठवून दिली. तमाम गोटांत ताकीद केली आणि बस्तभाव घोडीं, उंटें, हत्ती, बैलढोर तमाम जमा करून मिराकडे पाठवून दिलें. अद्यापि बरोबर पाठवीतच आहेत. श्रीमंतांनीं बहुत प्रकारें सामान व नक्त व जवाहीर वगैरे मीरास दिलें. आज तिसरे प्रहरीं श्रीमंत त्याच्या डेऱ्यास जात आहेत. मिराची ही खातरदास्त जाहली जे, सरकारांतून हे गोष्ट जाहली नाहीं. कोणी दुर्जनीं हें केलें."

मार्च.

मुराररावाचें व मीररेझाचें पूर्वीपासून वांकडे होतें, व त्यांचे गोट शेजारीं शेजारींच होते. त्यावरून मुराररावाच्या चिथावणीवरून त्याच्या गारद्यांनीं लष्करच्या लुचे लोकांस मिळवून घेऊन हें कर्म केलें असा श्रीमंतांस पक्का संशय आला होता व घोरपड्याचा गोट लुटून घेण्याचा त्यांनीं बेत केला

होता. परंतु सखारामबापूनें फारच आर्जव करून रदबदली केल्यावरून तो बेत राहिला.

चेनरायदुर्ग काबीज झाल्यावर देवनहळ्ळी, होसकोटें व कोलार हीं फार महत्वाचीं ठाणीं घेण्यांत आलीं. निरनिराळ्या टोळ्यांनीं बारीक सारीक ठाणीं घेतलीं व प्रांतांत सर्वत्र अंमल बसविला. एकंदर पंचवीस तीस लाख रुपये उत्पन्नाचा मुलूख या महिन्या दोन महिन्यांत पेशव्यांच्या राज्यास जोडिला गेला. नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दींत या प्रांतीं मराठ्यांचें जितकें राज्य होतें तितकें सर्व आतां पुनः त्यांच्या ताब्यांत आलें इतकेंच नव्हे, तर चिकबाळापूर, गुडिबंडा, नामगुंडल इत्यादि कांहीं नवीन स्थळेंही हातास लागलीं. या ठाण्यांतून रावसाहेबांनीं मुराररावाचे लोक शिबंदीकरितां ठेविले.

ज्या उद्देशानें ही स्वारी करण्यांत आली होती तो उद्देश आतां बहुतेक पूर्ण झालाच होता. घोरपड्याचा मुलूख व कर्नाटक बालेघांटचा म्हणजे शिऱ्यांचा सुभा हीं रावसाहेबांनीं हैदरापासून हिसकून घेतलींच होतीं. पेशव्याचे मांडलिक संस्थानिक त्या देशीं होते, त्यांस आपण उपद्रव देणार नाहीं, हें हैदरानें अलीकडे कबूल केलेंच होतें. एक त्याकडून काय खंडणी घ्यावयाची ती आली म्हणजे त्या प्रांतीं राहण्याचें पेशव्यांस कांहीं प्रयोजन नव्हतें. तें काम लवकर उरकून परत जावें असें त्यांच्या मनांत होतं, निजामअल्ली भागानगराहून निघून रायचुरावरून खंडण्या घेत घेत बल्लारीपर्यंत येऊन पोंचला होता. त्याचे सोबती मद्रासकर इंग्रज अद्यापि मद्रास सोडून बाहेर निघाले नव्हते. त्यानें एकट्यानेंच शत्रूच्या मुलुखांत शिरावें तर तो धीर त्यास होईना. याकरितां पेशव्यांस येऊन मिळण्याविषयीं तो फार आतुर झाला होता. परंतु त्याची मोहीम अद्यापि सुरू व्हावयाची होती व पेशव्यांची तर संपत आली होती. त्यांचा उद्देश असा होता कीं, आपलें काम झालें म्हणजे आपण परत यावें, मोंगल, इंग्रज व हैदर यांच्यामध्यें काय भानगडी असतील त्या त्यांच्या ते पाहून घेतील, आपणास त्यांत पडण्याचें कारण नाहीं. शिवाय मोंगल आपणाकडे आला म्हणजे त्यानें त्यांच्या कामास मदत केलेली नसूनही तो जिंकिलेल्या मुलखाची निदान

खंडणीची तरी, वांटणी मागणारच. तेव्हां असला हा सोबती पाहिजे कशाला ? असें मनांत आणून त्यांनीं मोंगलास निरोप पाठविला कीं, तुम्हीं येण्यापूर्वी कांहीं गोष्टींचा ठराव व्हावयाचा आहे. याकरितां आमच्या लष्करापासून चाळीस कोसांच्या अंतरानें राहून तुम्हीं रुक्नुद्दौला व शेरजंग यांस पुढें पाठवून द्यावें. त्यांचें आमचें बोलणें झाल्यावर मग तुम्हीं कूच करून यावें. शिरें, मदगिरी व दोन्हीं बाळापुरें घेतल्यानंतर हा निरोप गेला होता. त्यानंतर मोंगलानें कसें यावें, आल्यानंतर काय करावें, त्यास वांटणी किती मिळावी, इत्यादि गोष्टींची चर्चा करण्यांत मोंगलाच्या वकीलास गुंतवून इकडे रावसाहेबांनीं कोलार वगैरे आणखी परगणे व ठाणीं काबीज केलीं. मोंगलाशीं त्यांचें बोलणें सुरू झालें असून ते व मोंगल लवकरच एकत्र होणार हें ऐकून हैदर आतां पेशव्यांस म्हणूं लागला होता कीं, तुमचे सर्व मुद्दे मी कबूल करितों अठ्ठावीस लक्ष रुपये खंडणीही देतो. इतकें कबूल केल्यावर आतां तुम्हीही कृपा करून माझी एक गोष्ट ऐकावी. माझा मुलुख तुम्हीं घेतला आहे तो परत द्यावा. त्याबद्दल मी तुमची नोकरी बजाविण्यास तयार आहे. ती नोकरी अशी कीं, महमदअल्ली व इंग्रज यांवर तुम्हीं स्वारी करीत असाल तर त्या कामीं मी सर्व फौजेनिशीं कुमक करितों ! हें त्याचें बोलणें गोपाळरावाच्या विद्यमानें चाललें होतें व श्रीमंतांनीं तें कबूल करावें, याविषयीं गोपाळरावाचा बराच आग्रह होता असें दिसतें. परंतु त्या बोलण्यांत हैदराचा एक पेंच होता, तो असा कीं, इंग्रज आपणावर स्वारी करणार आहेत, त्या आधीच त्यांची व मराठ्यांची झोंबी लावून द्यावी म्हणजे दोघेही आपोआप दुर्बल होतील. त्यांत मराठ्यांचा मोड झाला तर त्यांत आपण कुमक करणारे म्हणजे अर्थात् दुय्यम दर्जाचे असल्यामुळें आपली अपकीर्ति फारशी नाहीं. शिवाय या योगानें दुर्बल झालेल्या मराठ्यांपासून आपला मुलूख हिसकून घेण्यासही सोईवार होईल. मराठ्यांची सरशी झाली तर बोलून चालून मुलूख परत देण्याची त्यांनीं बोलीच केली आहे, तेव्हां तो आपणास परत मिळेलच ! हा त्याचा अभिप्राय ओळखून पेशव्यांनीं त्यावर एक उलट पेंच केला. मोंगलाशीं व अर्थात् त्या द्वारें इंग्रजांशीं आपलें उत्तम रीतीचें ऐक्य असून

तिघांनीं मिळून हैदराचें पारिपत्य करण्याचा पूर्वींचा संकल्प अद्यापि कायम आहे, हें त्यास भासवावें म्हणून त्यांनीं सर्व फौजेनिशीं बेंगरुळाकडे कूच केलें व पुकारा केला कीं, आतां आपण निकरानें झुजून बेंगरुळ घेणार व मोंगल येऊन मिळाला म्हणजे श्रीरंगपट्टणही घेणार !

इतकें झाल्यावर हैदरानें पेशव्यांशीं ते सांगतील त्या शर्तींवर तह करण्याचें कबूल केलें. मग तह झाला त्यांत असें ठरलें कीं, नानासाहेबांच्या कारकीर्दींत जितका मुलूख मराठ्यांनीं जिंकिला होता तितका त्यांनीं ठेवून घ्यावा व त्याशिवाय हैदराचा नवीन मुलूख या स्वारींत घेतला असेल तो त्याचा त्यास परत द्यावा. कोलार ही जागा हैदराची जन्मभूमि असल्यामुळें व त्याच्या बापाची कबर तेथें असल्यामुळें त्यास विशेष प्रिय व पूज्य होती. तें ठाणें त्यास संतोषी करण्याकारितां मराठ्यांनीं परत द्यावें; परंतु खंडणीच्या सर्व रकमेची फेड होईपर्यंत तें तूर्त त्यांच्या ताब्यांत असावें. (एप्रिल—मे) हैदरानें संस्थानिकांच्या वाटेस जाऊं नये व मुराररावास उपद्रव देऊं नये. त्यानें मराठ्यांस तेत्तीस लक्ष रुपये खंडणी द्यावी. त्यापैकीं निम्मे हप्त्याहप्त्यांनीं द्यावी. मोंगलाची काय खंडणी देणें असेल ती हैदरानें द्यावी व त्यानें ती घेऊन परत जावें, हैदराच्या मुलूखावर स्वारी करूं नये, याविषयीं जर मराठे मोंगलाचें मन वळवितील तर आणखी चौदा लक्ष रुपये या मध्यस्थीबद्दल हैदरानें त्यांस द्यावे. या शर्तीं ठरून साडे सोळा लाख रुपये रोख घेऊन पेशवे सर्व लष्करासह परत फिरले व मोंगलास त्यांनीं सांगून पाठविलें कीं, स्वारी केल्याशिवायच

---

१ खंडणीसंबंधानें निरनिराळ्या ठिकाणीं उल्लेख आढळतात त्यांत तफावत हृष्टीस पडले ती अशी—गोपाळरावाच्या पत्रांत 'हैदरखान याची खंडणी सरकारचे ११ व मोगलाचे १४ एकूण पंचेचाळीस लाख घेतले' असें लिहिलें आहे. त्यानंतर सात दिवसांनीं खुद्द पेशव्यांनीं रामशास्त्र्यास पत्र लिहिलें आहे त्यांत 'हैदरखानाचा तह तेतीस लक्षांवर जाहला' असें लिहिलें आहे. ग्रांटडफ् ही रक्कम तीस लक्ष असल्याचें लिहितो. कर्नलविल्क व लुईराइस यांच्या लिहिण्यांत ही रक्कम पस्तीस लक्ष होती असें आहे. खंडणीची रक्कम सबंध फिटेपर्यंत मराठ्यांनी कोलार परगणा आपल्या ताब्यांत ठेविला होता. हें लिहिणें लुईराइस याचें आहे.

आमच्या मध्यस्थीवरून तुम्हांस हैदरअली खंडणी देत आहे ती घेऊन तुम्हीं माघारें फिरावें. परंतु मोंगलास हा मनसबा पसंत पडला नाहीं. त्याची सारी भिस्त तूर्त इंग्रजांच्या मदतीवर होती. इंग्रजही स्वारीची तयारी झपाट्यानें करीत होते. मराठ्यांस फसविण्याचा आपण बेत केला तो एकीकडेच राहून त्यांनींच आपणास फसविलें हें पाहून ते खजिल झाले होते. आपण तिघे मिळून हैदरावर स्वारी करण्याचा निश्चय झाला असून मराठ्यांनीं आधीं येऊन आपला हात उगवावा व कटांतून फुटून परत जावें हें योग्य नाहीं. तथापि जाणें असल्यास त्यांनीं मिळालेली खंडणी, लूट व मुलूख यांची वाटणी आम्हां दोघांस दिली पाहिजे, असें ते आतां बोलूं लागले. परंतु मराठ्यांनीं त्यांस मुळींच जुमानिलें नाहीं. एक मोंगल सरदार व एक इंग्रज अमलदार पेशव्यांकडे येऊन वांटणी देण्याविषयीं बोलूं लागले, तेव्हां दरबारांत खूब हशा पिकला !

याप्रमाणें या स्वारीचा शेवट होऊन रावसाहेब परत निघाले ते फौजेस निरोप देत देत ज्येष्ठाच्या प्रारंभीं पुण्यास येऊन पोंचले.

---

# प्रकरण सहावें

१ दादासाहेबांची हिंदुस्थानांत स्वारी. २ आनंदवल्लीची स्वारी.
३ तोतया प्रकरण. ४ धोडपची स्वारी.

( स. १७६६ जून—स. १७६८ जूनअखेर. )

दादासाहेब हिंदुस्थानच्या स्वारीस गेले होते तिकडे मल्हारराव होळकर मरण पावल्यावर त्यांच्यानें कोणचीही मसलत नेटानें पार पाडणें होईनासें झालें. मल्हाररावामागें त्याचा नातू मालीराव यास पेशव्यांनीं वस्त्रें दिलीं होतीं, त्या मालीरावाची फौज दादासाहेबांस सोडून माळव्यांत परत आली. गायकवाडही परत आले. मुधोजी भोंसले व. महादजी शिंदे

१ प्रकरण पांचवें व सहावें यांतील मजकूर अनुक्रमें ऐ. ले. संग्रह भाग तिसरा पृ. १०४१–११६४ व पृ. १२४१–१२६५ यांवर छापिलेला आहे.

स. १७६६ जून ते } मात्र बरोबर होते. त्यांत महादजीवर दादासाहे-
स. १७६७ जून } बांची मर्जी नव्हती. ही गैरमर्जी होण्यास काय कारण झालें होतें हें कळत नाहीं. महादजींवर पेशव्यांची कृपा होती हेंच कारण कदाचित् दादासाहेबांची गैरमर्जी होण्याचें असेल! शिंद्याची सरदारी योग्य वारस महादजी यास न देतां ती मानाजी शिंदे फांकडे यास देण्याचें दादासाहेबांच्या मनांत होतें तें पेशव्यांनीं तडीस जाऊं दिलें नाहीं, म्हणून त्यांनीं महादजीचा भाऊ केदारजी यास सरदारी पेशव्यांकडून देवविली व महादजीस त्याचा हस्तक नेमिलें. मानाजी शिंदे अगदीं दूरचा भाऊबंद असून त्याचा शिंद्याच्या सरदारीशीं अर्थाअर्थी संबंध कांहीं एक नव्हता. यामुळें महादजीस मागें सारून मानाजीस सरदारी देण्याची दादासाहेबांनीं गोष्ट काढितांच पेशव्यांनीं ती गोष्ट नाकारिली हें ठीकच झालें. परंतु महादजीप्रमाणेंच केदारजी हाही सरदारीचा वारस असल्यामुळें दादासाहेबांनीं केदारजीस सरदारी देण्याचा आग्रह धरिला, तेव्हां चुलत्याची मर्जी राखण्याकरितां पेशव्यांस तसें करणें योग्य दिसलें. या व्यवस्थेंत महादजी हस्तक होता तरी केदारजी भोळसर निरुपद्रवी असल्यामुळें वस्तुतः महादजीच्याच हातीं सरदारी आली होती.

यावेळीं हिंदुस्थानांत जाट व रोहिले हे मराठ्यांस मुख्य शत्रू होते. त्यांत जाटांपैकीं गोहदच्या राण्याचें पारिपत्य करणें दादासाहेबांस अत्यंत जरूरीचें होतें. थोरले बाजीराव पेशव्यांच्या कारकीर्दींत गोहदचा राणा उदयास आला होता व निरनिराळ्या स्वाऱ्यांत त्यानें उत्तम कामगिरी बजाविल्यामुळें त्यास त्या पेशव्याकडून गोहदचा किल्ला व परगणा जहागीर मिळाला होता. परंतु पानपतच्या स्वारीनंतर हा राणा स्वतंत्र झाला व त्यानें त्या प्रांतीं मराठ्यांचा बराच मुलूख बळकाविला. तो मुलूख सोडविण्याकरितां दादासाहेब गोहदेकडे गेले व तो राणा त्यांशीं मगरुरीनें बोलूं लागल्यामुळें त्यांनीं गोहदेस वेढा घातला. महादजी शिंद्याचा सल्ला गोहदेस वेढा न घालण्याविषयीं होता. परंतु तो न ऐकतां दादासाहेबांनीं मोर्चे दिले व तोफांची मारागिरी सुरू केली. महादजी आंतून गोहदकराकडे मिळाला असून दादासाहेबांची मसलत कैद करून

हाणून पाडण्याची तो खटपट करीत होता व त्यामुळें दादासाहेबांचा त्याजवर फार क्रोध झाला होता, इत्यादि हकिकत 'होळकराच्या कैफियतीं' त व नातूकृत महादजी शिंद्याच्या चरित्रांत आहे तिजविषयीं पटवर्धनी दप्तरांत कोठें दाखला मिळाला नाहीं. उलट या स्वारींत त्यानें फार चांगली फौज बाळगून प्रसंगविशेषीं मर्दुमी केल्याचा व दादासाहेबांनीं त्यास दहा लक्षांचा नवीन सरंजाम दिल्याचा उल्लेख आला आहे. गोहदकरांनीं मराठ्यांच्या लष्करांत फितूर केला होता हें खरें आहे, पण त्यांजकडे फितुरलेला सरदार महादजी नव्हता! खुद्द आपला कारभारी चिंतो विठ्ठल आंतून गोहदकरांस अनुकूल झाला होता व त्यामुळेंच आपली गोहद घेण्याची मसलत तडीस गेली नाहीं, असें दादासाहेबांनीं पुढें एका प्रसंगीं नानाफडणीसाशीं बोलून दाखविल्याचा उल्लेख पुढें या पुस्तकांत येणार आहे.

गोहदकरास त्या प्रांतींच्या राजेरजवाड्यांकडून कुमक मिळण्याची आशा होती व तो स्वतः फौजबंद शूर संस्थानिक होता, त्यामुळें आपल्या राजधानीचें रक्षण करण्याकरितां तो निकरानें झुजत होता व दादासाहेबही हट्टास पेटून गोहद घेतल्याशिवाय कधीं सोडणार नाहीं म्हणून मोर्चे चालविण्याची निकड करीत होते. परंतु कही बाहेर हिंडत असतां जाटांनीं छापा घालून हत्ती व घोडीं धरून नेल्यामुळें ती फिरण्याचें बंद होऊन दादासाहेबांच्या लष्करांत दाणा वैरणीची फारच महागाई झाली व पैक्याची तर इतकी ओढ झाली कीं, शेंकडा वीस रुपये व्याज कबूल करूनही कोठें पैसा मिळेना व रोजमुरे तटल्यामुळें लष्करच्या लोकांत रोज दंगे होऊं लागले. तें लष्कर सोडून होळकर व गायकवाड पूर्वींच आले होते. या वेळीं आणखी ही बरेच लोक दादासाहेबांच्या हुकुमास न जुमानितां निघून आले. अजमासें वीस हजार फौज राहिली तींत महादजी शिंद्याची दहा बारा हजार होती व ती चांगली निवडक होती. याप्रमाणें स्थिति असतां

स. १७६६ आक्टोबर-डिसें. } भरतपुरकर जाट चमेलीच्या पैलतीरीं पंधरा वीस हजार फौजेनिशीं येऊन उतरला. गोहदकरांची कुमक करण्याचा त्याचा बेत होता व चमेलीचें पाणी उतरतांच अलीकडे येण्याची

त्याची तयारी होती. आतां विलंब न करितां गोहदेवर निकरानें हल्ला करून किल्ला घेतलाच पाहिजे. तसें न करावें तर भरतपुरकर चमेलीअलीकडे आला म्हणजे आपणास वेढा उठवावा लागेल, असें समजून दादासाहेबानीं हल्ल्याची तयारी केली. तेव्हां शिंद्यानें सांगून पाठविलें कीं, " हल्ला करूं नये. मोर्चे कायम राखावे. सुरंग तयार झाले आहेत हे उडवून उपरांतिक हल्ला करावी. अथवा आंतील दम पाहून सलूख अगर हल्ला करावी. ते गोष्ट श्रीमंतानीं अमान्य करून हल्ला करविला. आपण खासा जाऊन मोर्चेंत बसले. लोकांस ताकीद बहुत केली, परंतु हल्ला नीट तरतुदेची न होय. तेव्हां हरी भिडे याजकरवीं निशाण खासें उपडून खांद्यावरी नेलें. खिजमतगार सरकारचे व खासबारदार व बोथाटीबारदार मात्र खंदकावर गेले. तेव्हां लोकही हल्लेस गेले. शिंदे व विठ्ठल शिवदेव व नारो शंकर वगैरे तमाम हल्ला जाहाली. नारो शंकराकडील व विंचूरकराकडील नामीं नामीं माणसें पडलीं. माणसें जायां फार जाहलीं. हल्ला माघारी फिरली. परंतु श्रीमंत निशाणें माघारीं येऊं न देत, तेव्हां आंतून लोक बाहेर निघाले. निशाणावर मार फार जाहला. हुक्केचा मार फार जाहला. निशाण जळलें. भाला मात्र अर्धा राहिला. निशाणाजवळ लोक खिजमतगार व खासबारदार व बोथाटीबारदार होते. त्यांतील दोनशें माणूस ठार झालें. तेव्हां निशाणें मागें सरलीं. तीन हल्ला एका मागें एक ऐशा केल्या. एक फिरली, दुसऱ्याने केली; दुसरी फिरली, तेव्हां तिसऱ्यानें केली, त्यानें फौजेंत दम राहिला नाही. हल्ला माघारी मोर्चांत आली. आंतील लोक निघोन शिंद्यांच्या मोर्चांपर्यंत आले. तेव्हां शिंदे यानीं अंगेजणी करून अडीचशें माणूस आंतील कापून काढून बाहेर निघाले होते ते गांवांत नेऊन घातले."

या प्रमाणें हल्ल्याची मसलत फसल्यामुळें दादासाहेबांचा फार हिरमोड झाला. परंतु वेढा उठविण्याचें त्यांच्या मानी स्वभावास पसंत पडेना

स. १७६७ } व तो बाट तर कांहीं केल्या शरण येईना! यामुळें वेढ्याचें
बाने. } काम पुढें बरेच दिवस रेंगाळत चाललें होतें. शेवटीं शिंद्याच्या मध्यस्थीनें पंधरा लक्ष रुपये खंडणी देण्याचा करार करून गोहदकरानें

दादासाहेबांची समजुत काढिली व वेढा उठविला.

भरतपूरकर जाट जवाहीरमल्ल चमेली पलीकडे अद्यापि तळ देऊन राहिलाच होता. रोहिले सरदारही यमुनेचे घांट रोखून लढाईच्या तयारीनें राहिले होते. अयोध्येचा नबाब सुजाउद्दौला व इंग्रज लोक यानींही मराठ्यांची स्वारी आपल्या मुलखावर होईल तर तिचा प्रतिकार करण्याची तरतूद केली होती. यामुळें चमेलीपार जाऊन दादासाहेबांस कांहीं फायदा होण्याजोगा नव्हता व तिकडे जाण्यासारखी त्यांची तयारीही नव्हती. यामुळें बुंदेलखंडांत बहिरो अनंत व विठ्ठल शिवदेव यांस बंदोबस्ताकरितां ठेवून व शिंद्यासही निरोप देऊन ते परत फिरले ते उज्जनीस आले.

गोहदेस वेढा पडला असतां आपली फार खराबी झाली व नामोहरम होऊन वेढा उठविण्याचा ही आपणास प्रसंग आला होता; तथापि असल्या संकटांतसुद्धां पेशव्यांनीं आपणांस फौज व पैका पाठवून मदत केली नाहीं ही गोष्ट दादासाहेबांस फारच विषम वाटली. हें वैषम्य वाढण्यास आणखीही एक कारण उत्पन्न झालें तें असें—

मल्हारराव होळकराचा नातू मालीराव यास पेशव्यांनीं सरदारीचीं वस्त्रें दिल्याचा नुकताच उल्लेख आला आहे. तो मालीराव यापूर्वीं कांहीं दिवस मरण पावला होता, व त्याच्या जहागिरीची व फौजेची व्यवस्था आपल्या लगामीं रहावी अशी दादासाहेबांस इच्छा उत्पन्न झाली होती. होळकरांचा फार दिवसांचा दिवाण गंगाधर यशवंत चंद्रचूड (उर्फ गंगोबा तात्या) हा दादासाहेबांचा कट्टा अभिमानी असून प्रत्येक मसलतींत त्याचें त्यांस पाठबळ असे. त्या दोघांनीं असें ठरविलें होतें कीं, मालीरावाची आई अहल्याबाई हिच्या मांडीवर होळकराच्या कुळांतलाच एखादा मूल दत्तक देऊन त्यास पेशव्यांकडून सरदारी देववावी व त्या मुलाच्या नांवानें गंगोबा तात्यानें जहागिरीचा व फौजेचा कुलकारभार पहावा. बाईच्या हातीं काडीइतकी सत्ता असूं नये. ही मसलत या दोघांनीं केली खरी, परंतु अहल्याबाई किती पाणीदार बायको आहे हें त्यांस माहीत नव्हतें! तिनें साफ सांगितलें कीं, जहागिरीची किंवा फौजेची काय व्यवस्था करावयाची ती माझी मी करीन. तेंव्हां गंगो-

(स. १७६७ मार्च—जून)

वा किंवा दादासाहेब यांस हात घालण्याचें कारण नाहीं. तिचें म्हणणें पेशव्यांस पसंत पडलें परंतु दादासाहेब आपला हेका सोडीनात. त्यांनीं बळजबरीनें आपलीच मसलत तडीस नेण्याची तयारी केली. त्या प्रसंगीं बाईनें दादासाहेबांस काय निरोप पाठविला तो सर्व प्रसिद्धच आहे. शेवटीं बाईचाच आग्रह तडीस गेला. मल्हाररावाच्या मर्जीतला त्याच्याच भाऊबंदापैकीं तुकोजी नांवाचा एक शूर सरदार होता. त्यास तिनें आपल्या फौजेवर मुख्य नेमिलें व गंगोबातात्यास दिवाणगिरीवरून काढून त्याजागीं नारो गणेश यास नेमिलें व जहागिरीचा सर्व बंदोबस्त आपल्या हातीं घेतला. ही सर्व व्यवस्था पेशव्यांच्या अनुमोदनानें झाली होती.

नारो शंकर हिंदुस्थानांत दादासाहेबांबरोबर गेला होता, त्याचें या स्वारींत बरेंच नुकसान दादासाहेबांच्या हातून झालें. कारण त्याकडे शिंद्याची दिवाणगिरी होती, ती दादासाहेबांनीं काढून घेतली. शिंद्याकडे त्याचें कर्ज येणें होतें तें आपणाकडे घेऊन त्याची तोड साडे तेरा लक्ष रुपयांवर करून ती रकम गायकवाडाच्या खंडणींतून हप्त्या हप्त्यानें फेडिली जावी असा ठराव केला. व नारो शंकराकडे झांशीचा सुभा होता, तो त्याजकडून काढून शिंद्यास दिला.

पेशव्यांविषयीं दादासाहेबांच्या मनांत वैषम्य उत्पन्न झाल्याचें मागें लिहिलेंच आहे. दादासाहेब दक्षिणेंत परत आल्याबरोबर पेशव्यांशीं विरोध करण्याचा त्यांचा बेत उघड उघड दिसून येऊं लागला. हैदराशीं कसा तरी लवकर तह करून पेशव्यांस स्वदेशीं परत येणें भाग पडलें होतें तें यामुळेंच. तथापि आपली ही घरगुती नाजूक अडचण हैदराच्या लक्षांत येऊं न देतां तहाच्या योगानें आपला जितका फायदा करून घ्यावयाचा होता तितका करून घेऊन ते परत देशी आले. तों इकडे दादासाहेबही आनंदवल्लीस आले होते, तेथें आठ पंधरा दिवस राहून डेरेदाखल झाले, व फौज जमा करूं लागले. राज्याची अर्धी वांटणी पुतण्यापासून घेण्याचा त्यांनीं आपला मनोदय पुनः प्रसिद्ध केला. दादासाहेबांची गांठ घेऊन त्यांस ताळ्यावर आणण्याचें पेशव्यांच्या मनांत होतें व ह्या भेटीचा योग जुळून आणण्याच्या खटपटीकरितां दादासाहेबांकडे

(स. १७६७ जुलै-आगष्ट)

शिष्टाईस जाण्याविषयीं त्यांनीं सखारामबापूस हुकूम केला. परंतु त्यास ठाऊक होतें कीं, ही चुलतेपुतण्यांची एकी झाली तरी ती फार दिवस टिकणार नाही. दोघेही धनीच असल्यामुळें एकाच्या हिताचें दुसऱ्याजवळ बोलल्यास त्यास राग येणार. एवंच, आपली खटपट व्यर्थ होऊन शेवटीं दोघांचाही आपणावर असंतोष होईल. हें सर्व मनांत आणून त्यानें आनंदवल्लीस जाण्याचें नाकारिलें. तेव्हां रावसाहेबांनीं गोविंद शिवराम खासगीवाले यास त्या कामावर पाठविलें. त्यानें आनंदवल्लीस जाऊन भेटीची बाटाघाट दादासाहेबांजवळ सुरू केली; परंतु रावसाहेब तुम्हांस धरून कैदेंत ठेवणार आहेत असें त्यांस कोणी कळविलें असल्यामुळें रावसाहेबांची भेट घेण्याविषयीं त्यांचें मन कचकरूं लागलें. शेवटीं गोविंद शिवराम यानें पुष्कळ प्रकारें खात्री केल्यावर त्यांनीं भेट घेण्याचें कबूल केलें व इकडून दादासाहेबांनीं कांहीं मजली पुढें जावें व तिकडून रावसाहेबांनीं यावें व दोघांच्या गांठी नगरच्या सुमारें पडाव्या असा बेत ठरला.

या बेतास अनुसरून रावसाहेब श्रावण वद्य पंचमीस डेरेदाखल होऊन बानवडीवर राहिले. गोपाळरावास त्यांनीं पत्र लिहिलें कीं, तुम्हीं इकडे आणण्यासाठीं तीन हजार फौजेची तरतूद करावी. फौज मागून आली तरी चालेल, परंतु तूर्त पांचशें निवडक स्वार घेऊन तुम्हीं तावडतोब निघून यावें. याचप्रमाणें आणखी तीन हजार फौज जमविण्याची

सपटेंबर

सोय रास्ते व विंचूरकर यांस ताकीद करून रावसाहेबांनीं केली. पुण्यास फौज जमत असल्याचें ऐकून दादासाहेबांनीं नगरच्या रोखें येण्याचा संकेत ठरला होता तो रहित करून गोदावरी उतरून, उत्तरेस अशीरगडाच्या आसऱ्यास जाण्याचा रोख दाखविला. तें पाहून दादासाहेबांच्या मनांत शंका व भय उत्पन्न झालें आहे, त्यांचें कसें निरसन करावें ही रावसाहेबांस मोठीच पंचाईत येऊन पडली. त्यावेळीं सखारामबापूनें सल्ला दिला कीं, पटवर्धनांची फौज परत टाकून देऊन आपण पुढें गेल्यास दादासाहेब निःशंकपणें भेट घेतील! तेंही त्यांनीं केलें असतें, परंतु गोपाळरावानें त्यांची एकांतीं गांठ घेऊन आपल्या फौजेस निरोप न देण्याविषयीं आग्रह धरिला; तेव्हां रावसाहेबांनीं त्यास

सांगितलें कीं, तुमची फौज भीमेच्या अलीकडच्या तीरीं असूं द्यावी व तुम्हीं खडे आम्हाबरोबर असावें. जरूर लागल्यास फौज आयत्यावेळीं आणवितां येईल. याप्रमाणें बेत ठरून गोपाळराव, नीलकंठराव व परशुरामभाऊ हे त्रिवर्ग पटवर्धन, विसाजी कृष्ण बिनीवाले, आनंदराव रास्ते नाना व मोरोबा फडणीस, हरीपंत फडके व इतर मुत्सद्दी मंडळी बरोबर घेऊन श्रीमंत थोडके लोकांनिशीं पुढें चालले. होतां होईल तों चुलत्याचें मन दुखवूं नये, गोड बोलून त्यांची समजूत करावी, याप्रमाणें श्रीमंतांचा इरादा मनापासून होता, परंतु त्यांजवळ चार शहाणे मुत्सद्दी व सरदार होते ते दादासाहेबांचा स्वभाव ओळखून होते. त्यांनीं पेशव्याजवळ सारखी टकळी लाविली होती कीं, दोहीं पक्षीं जरूर पडल्यास लढाईसुद्धां करावी म्हणून फौजेची जमवाजमव झाली असतां आतां तुम्ही दादासाहेबांचा पूर्ण विश्वास धरून थोडक्या लोकांनिशीं त्यांच्या भेटीस जातां ही गोष्ट राजनीतीस विरुद्ध आहे. दादासाहेबांकडील रागरंग कसा काय आहे, याविषयीं श्रीमंतांस वारंवार बातमी येत होती तीवरून व वरील मंडळींच्या उपदेशावरून त्यांचें मन फिरलें व इतउत्तर दादासाहेबांशीं व्यवहार करितांना सावधपणा व थोडा निष्ठुरपणा धरणेंच योग्य आहे असें त्यांस वाटून त्यांनीं पटवर्धनांची व इतर फौज मागें ठेविली होती ती बोलावून बरोबर घेतली व पुढें नाशिकच्या रोखें चाल केली. एकंदर दहा बारा हजार पर्यंत फौज जमली होती. दादासाहेब दारणा सांगवीवर राहिले होते व त्यांजवळ स्वार व गारदी मिळून पांच हजारांच्या आंत बाहेर जमाव होता. तेही पुतण्यास भेटण्याकरितां निघाले. उभय श्रीमंतांच्या गांठी

आक्टोबर } चिंचुरापासून सहा कोसांवर कुरडगांव म्हणून आहे तेथें पडल्यानंतर दोघेही आनंदवल्लीस आले. तेथें रावसाहेबांनीं स्पष्टपणें दादासाहेबांस विचारिलें कीं, तुमच्या मनांत दौलतीचा कारभार करणें असेल तर तसेंच करा. तसें मनांत नसेल तर तुम्हांस जहागीर दिली ती खाऊन स्वस्थ रहा. दोहोंतून एक गोष्ट तुम्ही पतकरिलीच पाहिजे. नेहमीं मनांत नानाप्रकारचे विकल्प आणून व लबाड लोकांच्या नादीं लागून राज्याची वांटणी मागणें वगैरे बखेडे करितां, सरदाऱ्यांत घालमेली करितां, हें

कामाचें नाहीं. तेव्हां दोहोंतून कोणची गोष्ट पतकरितां ती बोला. पुतण्याचा हा निर्भीडपणाचा प्रश्न ऐकून दादासाहेबांनीं ओळखिलें कीं, टाळाटाळ करण्याचा हा प्रसंग नव्हे. तंख्याचा कांहीं तरी शेवटचा निकाल लावण्याकरितां पुतण्या आलेला आहे व त्याच्या पाठीशीं जबरदस्त फौज उभी आहे. हा विचार करून त्यांनीं उत्तर दिलें कीं, तुमच्या राज्यकारभारांत पडण्याचें आम्हांस कांहीं प्रयोजन नाहीं. आम्हांस स्वारीसंबंधें पंचवीस लाख रुपये कर्ज झालें आहे, हें तुम्हीं वारा म्हणजे आम्हीं स्नानसंध्या करून घरीं स्वस्थ बसून राहूं. तें बोलणें पेशव्यांनीं कबूल केलें. व दिवाळीपर्यंत तुमच्या सावकारांची फेड करितों असा करार केला. नंतर सातारा, शिवनेरी, नगर व अशीरगड हे चार किल्ले दादासाहेबांच्या ताब्यांत होते त्यांच्या सोडचिठ्या रावसाहेबांनीं मागितल्या त्या दादासाहेबांनीं दिल्या. हे चारी किल्ले फार बळकट असल्याविषयीं पुरातन काळापासून फार प्रसिद्ध आहे. त्यांत अशीरगड, शिवनेरी व नगर हे मोंगलापासून नुकतेच घेतलेले होते व ते परत मिळविण्याविषयीं त्यास फार इच्छा होती. हे किल्ले देण्याचें कबूल केल्यास मोंगलाकडून दादासाहेबांस कुमक मिळण्याचा कदाचित संभव होता, व याचकरितां ते आपल्या ताब्यांत असले म्हणजे बरें असें रावसाहेबांस वाटणें साहजिकच होतें. सातारा ही महाराजांची राजधानीची जागा, तें संस्थानही इतउत्तर दादासाहेबांच्या हातीं ठेवणें सुरक्षित नाहीं असें रावसाहेबांस वाटलें. त्यांत नुकतीच भुमका उठली होती कीं, मागें महाराजांकडून आपल्या मुलासाठीं प्रतिनिधीचें पद दादासाहेबांनीं मिळविलें होतें, त्याप्रमाणें तें पुनः आपले नांवें करून घेण्यासाठीं ते साताऱ्यास जाण्याच्या बेतांत होते. सोडचिठ्या मिळाल्याप्रमाणें साताऱ्याखेरीज बाकी किल्ले बिनतकार पेशव्यांच्या हातीं आले परंतु साताऱ्यावर निशाण चढण्यास दिरंग लागला. त्यामुळें चुलत्यावर रुसून ते आनंदवल्लीहून निघून गंगापुरास आले. त्याचा कोप शांत करण्यासाठीं दादासाहेबांनीं पुष्कळ यत्न केला परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं सातारा आपल्या अंमलदारांच्या हवालीं

झाल्याचें वर्तमान आलें तेव्हां पेशव्यांचें मन स्वस्थ झालें. नंतर तुकोजी होळकर पेशव्यांस भेटण्याकरितां आनंदवल्लीस आला होता त्यास बरोबर घेऊन ते पुण्यास आले.

वर सांगितल्याप्रमाणें जी व्यवस्था झाली ती जरी दादासाहेबांच्या कबुलीवरूनच झाली होती तरी लवकरच त्यांस आपण हा काय वेडेपणा केला असें वाटूं लागलें व पेशव्यांशीं लढाई करून आपले बेत सिद्धीस नेण्याचा त्यांनीं पुनः निश्चय केला. पुनः त्यांचीं मोंगल व इंग्रज, भोंसले हैदर, वगैरेशीं कारस्थानें खेळूं लागलीं. त्यांच्या हालचालीकडे लक्ष देण्याचें तूर्त तहकुब करून आणखी एका फार दिवस धुमसत असलेल्या बखेड्याचा पेशव्यानीं निकाल लावला त्याविषयीं लिहूं.

पानपतच्या लढाईत पेशव्यांच्या कुळांतील विश्वासराव व भाऊसाहेब असे दोन पुरुष पडले. त्यांत विश्वासराव मरण पावल्याविषयीं कोणास शंका नव्हती. भाऊसाहेबांविषयीं मात्र कित्येक सामान्य समजुतीच्या मनुष्यांचा तर्क असा होता कीं, ते त्या घोर प्रसंगांतून जीव बचावून कोठें तरी गुप्तपणें राहिले असावे. ही समजुत खुद्द भाऊसाहेबांची स्त्री पार्वतीबाई हिची देखील असून ती अद्यापि सौभाग्याचीं चिन्हें धारण करीत होती. या भ्रमाचा लुच्चे लोकांनीं कित्येक वेळां फायदा घेऊन बखेडे उत्पन्न केले. पानपत होऊन साल आठ महिने झाले नाहींत तोंच महाराष्ट्रांत जिकडे तिकडे बातमी पसरली कीं, भाऊसाहेब अद्यापि जिवंत आहेत. मग काय विचारावें! जिकडे तिकडे पत्रें खेळूं लागलीं. काशिदांच्या जोड्या दक्षिणेंतून हिंदुस्थानांत व हिंदुस्थानांतून दक्षिणेंत जलदी जलदीनें खेपा घालूं लागल्या. नाना प्रकारचे तर्क रचण्यांत लोक दंग होऊन गेले. शेवटीं ती बातमी खोटी ठरली. पुनः असेंच एकदां वर्तमान उठलें. पुनः चळवळ होऊन शेवटीं लोकांस निराश व्हावें लागलें. तिसऱ्या खेपेस सन १७६३ च्या सुमारास माळव्यांत एक मनुष्य फौज जमवून मी भाऊसाहेब आहें असें सांगत दंगा करीत फिरूं लागला. परंतु मल्हारराव होळकरानें त्यास पकडून कैदेंत ठेविलें. इतके वेळां निराशा झाली तरी भाऊसाहेब जिवंत असल्याविषयीं लोकांच्या मनाचा जो एकदां बळ-

कट ग्रह झाला होता, तो कांहीं केल्या दूर होईना. पुनः आणखी एक भाऊसाहेब निर्माण होऊन लोकांच्या आशाबजिास जोमाचा अंकुर फुटला, परंतु थोडक्यांचे काळांत पूर्वीप्रमाणेंच हा आशांकुर दग्धप्राय होऊन गेला! ती हकिगत अशी—

बुंदेलखंडांत छत्रपूर शहराजवळ कनोल म्हणून गांव आहे. तेथें सुखलाल नांवाचा एक कनोजी ब्राह्मण रहात असे. त्याच्या बापाचें नांव रामानंद. आईचें अन्नपूर्णा. आजीचें मन्मथा. या ब्राह्मणाचा भाऊबंदांशीं वतनासंबंधें तंटा लागला होता. त्या तंट्याच्या योगानें त्रासून कोठें देशांतरास जावें अशा हेतूनें तो गांव सोडून निघाला तो नरवरास आला. वाटेच्या श्रमानें थकल्यामुळें घटकाभर विश्रांति घेण्यासाठीं तो तेथें एका वाण्याच्या दुकानापाशीं बसला. त्या घटकेच्या अवधींत त्याच्या पुढील आयुष्यक्रमांत केवढा विलक्षण फेरफार व्हावयाचा होता हें त्याच्या स्वप्नींही नव्हतें! तेथें तो बसला असतां, दोन तीन दक्षिणी मनुष्य सहज तेथें आले होते, ते त्यास पहातांच म्हणूं लागले कीं, तूं हुबेहुब भाऊसाहेबांसारखा दिसतोस. येथें दीनवाण्यासारखा कां बसलास? चल. तूं भाऊसाहेबच आहेस. तूं आमच्या म्हणण्याप्रमाणें वागशील तर तुला आम्ही पेशवाई मिळवून देऊं. सुखलाल हा बराच धाडसी व धूर्त मनुष्य होता. भाऊसाहेबांच्या व आपल्या चेहऱ्यांत इतकें विलक्षण साम्य आहे ही गोष्ट त्यास नवीनच कळली व तिजपासून होईल तितका फायदा करून घेण्याचा त्यानें निश्चय केला. त्या दिवसापासून तो आपण खरोखर भाऊसाहेब आहों असें सर्व लोकांस सांगूं लागला. लवकरच कांहीं लुच्चे लोक त्यास सामील होऊन त्यांनीं त्याचें स्तोम माजविलें. त्या शहरांत शंभुपुरीपंथाच्या गोसाव्यांचा मठ होता तेथील महंत व त्याचे चेले सुखलालास अनुकूल झाले. तेव्हांपासून तर हें खूळ फारच झपाट्यानें बळावत चाललें. महत्वाकांक्षी व स्वार्थसाधू हजारों लोक या तोतयाभोंवतीं गोळा झाले व त्यांनीं पुकारा केला कीं, पानपतच्या युद्धांत भाऊसाहेब नाहींसे झाले होते, ते गोसाव्याच्या वेषानें नरवरास प्रकट झाले आहेत! यापुढें जे बडे लोक या फंदांत मिळाले होते त्यांच्या वर्तनांत लबाडीचा किंवा भोळसटपणाचा किती अंश होता हें सां-

गतां येणें कठिण आहे. एवढें मात्र खरें आहे कीं, पेशवाईच्या सरदारांपैकीं कोणीं या तोतयावर विश्वास ठेविला नाहीं व एक पार्वतीबाईखेरीज हा खरोखर भाऊसाहेब असेल. असें पेशव्यांच्या कुटुंबांतील कोणी मनुष्यानें क्षणभरही मानिलें नाहीं.

नरवरापासून जवळच करेरा किल्ला आहे तेथें नारो शंकर राजेबहादर याचा पुतण्या विश्वासराव हा रहात होता. नारो शंकराकडे झांशी प्रांत होता व तिकडील बंदोबस्त राखण्याकरितां त्यानें आपल्या पुतण्यास फौजेसह नेहमीं करेऱ्यास ठेविलें होतें. त्या विश्वासरावास 'भाऊसाहेब प्रकट झाल्याची' बातमी लागतांच त्यानें नरवरास कारकून व स्वार पाठविलें. त्यांनीं भाऊसाहेबांस ओळखून त्यांच्या खरेपणाबद्दल विश्वासरावास लिहून कळविलें! तथापि आणखी चौकशी करण्याकरितां त्यानें चारशें स्वार बरोबर देऊन एक सामान्य प्रतीचा सरदार पाठविला. त्या सरदाराचीही भाऊसाहेब खरे असल्याबद्दल खात्री झाली! त्या सरदाराबरोबर तोतयानें विश्वासरावास सांगून पाठविलें कीं, लवकरच आमची स्वारी करेऱ्यास येणार आहे. त्यावेळीं तुम्हीं आह्मांस तीन कोस सामोरें येऊन किल्ल्यावर घेऊन जावें. त्याप्रमाणें अश्विन वद्य द्वितीयेस तोतयाची स्वारी करेऱ्यास गेली, तेव्हां विश्वासरावानें सामोरें येऊन समारंभानें त्यास किल्ल्यावर नेलें. हिंदुस्थानांतील प्रांतोप्रांतीं 'भाऊसाहेब' प्रकट झाल्याचें वर्तमान हं हं म्हणतां पसरलें. महालोमहालींचे कमाविसदार येऊन भेटले. ग्वाल्हेरीहून शिवाजीपंत मुजुमदार व आबाजीपंत चिटणीस व आणखी गृहस्थ पन्नास स्वार घेऊन भेटीस आले. त्यांजपासून तोतयानें पैका घेऊन फौज चाकरीस ठेविली. ग्वाल्हेरी, झांशी, भेलसें इत्यादि परगण्यांतील बहुतेक लोकांस हा खरोखर भाऊसाहेब असल्याविषयीं शंका राहिली नाहीं! करेऱ्याहून निघून तोतया दक्षिणेकडे येऊं लागला, तेव्हां एखाद्या मोठ्या सरदाराप्रमाणें किंबहुना खुद्द पेशव्यांप्रमाणें फौज, तोफा, गारदी, डेरे, राहुट्या, हत्ती, पालख्या, नौबती, निशाणें, बाजार, वगैरे सारा थाटमाट त्यानें बाळगिला होता. एवढा खर्च चालावयास पैका पाहिजे. तो पैका वाटेनें जे गांव लागत त्यांपासून तोतया जबर-

स. १७६३ आक्टोबर } दस्तीनें वसूल करी. भाऊसाहेब येत अस-
त्याची बातमी दक्षिणेंत झपाट्यानें पसरून लोकांत मोठी चळवळ उत्पन्न झाली. त्यावेळीं पेशव्यांची स्वारी हैदर-अल्लीवरच्या पहिल्या मोहिमेवर कर्नाटकांत गुंतली होती. त्यांच्या कुम-केस दादासाहेब चालले असतां, त्यांनीं निरा नरसिंगपूरच्या मुक्कामाहून महादजी शिंदे व महादाजी गोविंद यांस माळव्यांत पत्रें लिहून पाठविलीं होतीं कीं, भाऊसाहेब खरोखर असल्यास त्यांस घेऊन यावें. तोतया असेल तर त्याचें पारिपत्य करावें. या पत्रांचा पुढें काय परिणाम झाला हें कळत नाहीं. तथापि ऐ. ले. संग्रहांतील पत्रांमधून जे उल्लेख आले आहेत त्यांवरून लोकांत त्यावेळीं किती चळवळ उडून गेली होती हें उघड होतें. समशेर बहादुराच्या मेहुण्यानें हिंदुस्थानांतून पेशव्यांचे बंधु नारायणराव यांस फारशी पत्र पाठविलें होतें त्यांत भाऊ-साहेब खरे असल्याविषयींचाच मजकूर होता. एकानें लिहिलें होतें कीं, आपण भाऊसाहेबांच्या स्वारींत वीस दिवस होतों. ते खरोखरी भाऊ-साहेब आहेत याविषयीं आपली खात्री झाली! हिंदुस्थानांतून आणखीही कित्येक पत्रें आलीं त्यांत मजकूर "भाऊसाहेबांच्या तोंडावर जखम आहे. त्रिंबकेश्वरास येऊन डोईचे केंस काढावे, गोसाव्यांचा वेष टाकून द्यावा असा त्यांचा बेत आहे. समागमें फौज गोसावी दोन हजार व धोंडाजी पवार दोन हजार व भिल्ल कोळी दोन हजार याप्रमाणें आहे. देशची बोली बोलत नव्हते तीही बोलूं लागले." दोघा भिक्षुकांनीं खुद्द पार्वतीबाईस पत्र पाठविलें होतें कीं, 'भाऊसाहेब खरे. लवकरच येतील. आम्ही समागमेंच आहों.'' हिंदुस्थानांत जाधवांची पागा होती. शिवाय नारोशंकर, विंचुरकर व होळकर यांच्या फौजा तिकडे होत्या. त्या त्या सर्व फौजांतून दक्षिणेंत अशाच अर्थाचीं पत्रें येत होतीं. तोतयाचें खूळ दिवसेंदिवस जास्त जोरावत जाऊन पेशव्यांची स्वारी हैदरअल्लीवरची पहिली स्वारी करून परत आली तेव्हां तो तोतया फौजेसह नर्मदा व तापी उतरून खानदेशांत येऊन दंगा करीत फिरत होता. इतउत्तर त्याची उपेक्षा करणें अशक्य होतें. याकरितां पेश-

स. १७६५ आक्टोबर } त्यांनीं फौज पाठवून त्याचा पराजय करून त्यास पकडून धनगडच्या किल्ल्यावर कैदेंत ठेविलें होतें. त्या तोतयाची चौकशी होऊन खरेखोटेपणाविषयीं पक्की शहानिशा व्हावी असें बहुत लोकांचें म्हणणें पडलें. तोतया जनकोजी शिंदे कैदेंत होता त्याचीही आणखी एकदां चौकशी महादजी शिंद्यास सरदारांचीं वस्त्रें देण्यापूर्वी व्हावी असाही कित्येकांचा आग्रह पडला. त्यावरून दोघाही तोतयांस पेशव्यांनीं पुण्यास आणविलें. तेथें त्यांची चौकशी होऊन ते खोटे ठरल्यावरून त्यांस पुनः किल्ल्यांवर पाठविण्यांत आलें. त्यांत तोतया भाऊसाहेबास पूर्वी धनगड किल्ल्यावर ठेवण्यात आलें होतें, तेथें परत न पाठवितां त्यास पेशव्यांनीं आतां नगरच्या किल्ल्यावर ठेविलें.

हैदरअल्लीवरची दुसरी स्वारी करून पेशवे परत आल्यावर तिकडे कर्नाटकांत निजामअल्लीशीं हैदरानें सलोख्याचें बोलणें लावून त्यास अनुकूल करून घेतलें. निजामअल्लीनें इंग्रजांस सोडून हैदराचा पक्ष स्वीकारिला व त्याजपासून कांहीं पैका घेऊन कडपे व कर्नूळ येथील नवाब आपले ताबेदार होते त्यांचीं संस्थानें हैदराच्या ताब्यांत दिलीं ! नंतर हैदर निजामअल्लीच्या भेटीस आला, तेव्हां त्यानें आपण निजामअल्लीचे ताबेदार आहों हें प्रसिद्धपणें कबूल केलें व त्यापुढें एकशेंएक मोहरा नजर धरिली व टिपू सुलतान व मीर फैजुल्ला यानीं सात सात मोहरा नजर धरिली. नंतर निजामअल्ली परत भेटीकरितां हैदराच्या लष्करांत गेला तेव्हां हैदरानें पन्नास हजार रुपयांचा जबूतरा करून त्यास त्यावर बसविलें व हत्ती, घोडे, जवाहीर वगैरे मुबलक नजराणा दिला.

नंतर मोंगल व हैदर यांचीं लष्करें एकत्र होऊन अर्काटच्या नबाबाच्या मुलुखावर स्वारी करण्याकरितां घाट उतरून गेलीं. तेथें इंग्रजांनीं चालून येऊन दोन तीन लढायांत तोफांचा खूब मार देऊन या दोघांस पिटून लाविलें व यांच्या तोफा हिसकून घेतल्या व अशा निकडीनें त्यांचा पाठलाग केला कीं, घांट चढून परत येण्यास त्यांस फारच प्रयास पडले.

शके १६८९ सालचा दसरा झाल्याबरोबर पेशव्यांनीं गोपाळरावाबरोबर

पंचवीस हजार फौज देऊन त्यास कर्नाटकांत रवाना केलें. या स्वारींत बाबूजी नाईक बारामतीकर, आनंदराव रास्ते, इचलकरंजी व गजेंद्रगड येथील घोरपडे, विसाजीपंत बिनीवाले, नरगुंदकर भावे व इतर कित्येक सरदार यांचीं पथकें होतीं. ही फौज पाठविण्यांत पेशव्यांचे उद्देश होते ते १ दादासाहेब काय करितील हा भरंवसा नसल्यामुळें पुणें सोडून दूरदेशीं यंदां आपणास जातां येत नाहीं, याकरितां या फौजेनें इंग्रजांशीं लढण्यांत

स. १७६७ नोव्हें.-दिसें. गुंतलेल्या हैदराच्या मुलखांत उपद्रव देण्याची धास्ती घालावी ह्मणजे चालू सालची खंडणी त्यांजकडून वसूल होईल. २ हैदर व मोंगल एकत्र झाले आहेत, त्याअर्थी गेले स्वारींत जिंकून घेतलेला शिरें, बाळापुर वगैरे मुलुख मोंगलाच्या मदतीनें परत हिसकून घेण्याची कदाचित् हैदर खटपट करील तर तिचें निवारण करितां यावें. ३ दादासाहेब कांहीं गडबड न करितां स्वस्थपणें राहणार असें दिसून आलें, आणि इंग्रज, मोंगल व हैदर यांच्या भांडण्यांत पडून आपला कांहीं लाभ होतो असें दिसून आलें तर आगाऊ पाठविलेल्या गोपाळरावाच्या फौजेचा त्या कामीं उपयोग करून घेतां यावा. ४ तिकडील संस्थानांकडून मागील बाकी व चालू सालची खंडणी वसूल करावी.

यावेळीं पुण्यात अर्काटचा नबाब, मद्रासकर इंग्रज, मोंगल व हैदर या चौघांचेंही वकील पेशव्यांची मर्जी संपादण्याविषयीं झटत होते. मद्रासकरांनीं मुंबईच्या गव्हर्नरास लिहून त्यांजकडून मिस्तर मोस्तिन यांची पुण्यास रवानगी करविली होती. अर्काटकराकडून नागोजीराव नांवाचा वकील आला होता. मोंगलाकडून यारजंग व हैदराकडून रेजा अलीखान (अर्काटचा माजी नबाब चंदासाहेब याचा मुलगा) हे दोन गृहस्थ आले होते. इंग्रज व अर्काटकर यांचें ह्मणणें असें होतें की, पेशव्यांनीं आपणास हैदर व मोंगल यांशीं लढण्याच्या कामीं कुमक करावी. मराठ्यांविषयीं इंग्रजांच्या मनांत नेहमीं मत्सरबुद्धि वसत असे हें मागें सांगितलेंच आहे. त्यांच्याशीं मैत्री करून त्यांस आपल्या कूटांत ओढण्याचा सध्यां जो त्यांचा यत्न चालला होता तो इतक्याचकरितां कीं, त्यांनीं शत्रूस मदत करूं नये. शिवाय इंग्रजांजवळ घोडेस्वारांची फौज नव्हती. याकरितां ती मराठ्यां-

करून आपणास मिळाली तर आपण शत्रूचा चांगलाच समाचार घेऊं असें त्यांस वाटत होतें. पेशव्यांच्या मनांत फार दिवसांपासून सोंदे व बिदनूर हीं दोन संस्थानें हस्तगत करण्याची इच्छा आहे हें इंग्रजांस माहीत होतें. जर तुम्हीं आम्हांस मदत कराल व साष्टी आणि वसई हे दोन टापू आम्हांस द्याल, आणि दुसऱ्या कित्येक आमच्या बारीक सारीक फायद्याच्या बाबी आहेत त्या आम्हांस मिळवून द्याल, तर आपण चाळीस लक्ष रुपये उत्पन्नाचीं सोंदें व बिदनुर हीं संस्थानें हैदरापासून हिसकून घेण्यांत तुम्हांस उत्तम प्रकारें मदत करूं आणि जाट व रोहिले यांवर स्वारी करावयाची तुमची इच्छा असल्यासही तुम्हास कुमक करूं असा इंग्रजांच्या बोलण्याचा घाट होता. पेशवे आपणांस मिळत नसतील तर निदान शत्रूस तरी त्यांनीं मिळूं नये, व होतां होईल तों महाराष्ट्रांतून त्यांनीं हालूं नये याविषयीं ही खटपट त्यांनीं केली. दादासाहेब व पेशवे यांमध्यें वितुष्ट उत्पन्न झालें आहे ही गोष्ट सर्वत्र महशूरच होती. हें वितुष्ट अधिकच वाढविण्याचा इंग्रजांनीं यत्न केला व पेशव्यांस सांगितलें कीं, तुम्हीं आम्हाशीं विरोध कराल तर आम्हीं दादासाहेबांस मदत करूं व जानोजी भोंसले नागपुरकर तुम्हांशीं लढाई करावी या इराद्यानें आज दोन वर्षें आम्हांजवळ फौजेची कुमक मागत आहे त्यासही कुमक देऊं.

हैदर व मोंगल हेही इंग्रजाशीं लढण्याकरितां पेशव्यांजवळ कुमक मागत होते. परंतु ही कुमक मिळण्याची त्यांस आशा दिसेनाशी झाली तेव्हां हैदरानें पेशव्यांशीं बोलणें लाविलें कीं, इंग्रजाशीं लढाई करण्यांत मी गुंतलों असल्यानें माझें फार नुकसान होत आहे हें ध्यानांत आणून यंदाची खंडणी मला माफ करावी. तिजबद्दल गोपाळरावानें आमच्या मुलुखास उपद्रव देऊं नये. ही खंडणी माफ करण्याविषयीं मोंगलाचाही पेशव्यांस आग्रह पडला; परंतु पेशव्यांनीं खंडणी माफ करण्याचें कबूल केलें नाहीं, उलट मोंगलास त्यांनीं तगादा लाविला कीं, अदवानीचा नबाब बसालतजंग याजपासून साडेतीन लक्ष रुपये खंडणी घेण्याचा गतवर्षी आम्ही करार केला होता. ती खंडणी त्यानें दिली नाहीं, म्हणून त्याचीं कांहीं ठाणीं आम्हीं ताब्यांत घेतलीं होतीं; परंतु तुमचा दिवाण

रुकनुद्दवला यानें भीड घालून व खंडणीची जामिनगत पत्करून आम्हांकडून हीं ठाणीं बसालतजंगास परत देवविलीं. त्या जामिनगतीचा पैका अद्यापि आला नाहीं तो तुह्मीं आम्हांस द्यावा.

कर्नाटकांत इंग्रज, महमदअल्ली, हैदर व मोंगल यांमध्यें जें भांडण लागलें होतें त्यांत पडून आपला कांहीं तरी फायदा करून घ्यावा असें पेशव्यांच्या मनांत होतें, व गोपाळरावाची फौज पाठविण्यांत तोही एक हेतु होता हें उघड आहे. तथापि दिवसेंदिवस दादासाहेबांच्या चळवळीस बंडाचें स्वरूप येत चाललें. असें पाहून त्यांनीं गोपाळरावास ताकीद केली कीं तुमच्या फौजेची स्वदेशीं केव्हां जरूर लागेल त्याचा नेम नाहीं. याकरितां तुम्हीं तिकडील कलहापासून अलिप्त रहावें, व फाल्गुनापर्यंत तिकडे राहून तिकडील नीट बंदोबस्त करून नंतर परत फिरून महाराष्ट्राच्या लगत्यास यावें.

आनंदवल्लीच्या मुक्कामीं दादासाहेबांचें पंचवीस लाख रुपये कर्ज फेडण्याचें पेशव्यांनीं कबूल केलें होतें व त्याची दिवाळीपर्यंत मुदत केली होती. ती रक्कम वेळेवर न मिळाली तर तेंच निमित्त करून पेशव्यांशीं कलह करावा असा दादासाहेबांचा हेतु होता. परंतु सदर रक्कम जमा करण्याची पेशव्यांनींही फार खटपट केली. कर्नाटकच्या स्वारीस जीं पथकें गेलीं होतीं त्याखेरीज बाकीच्या सरंजामी लोकांस त्यांनीं ताकीद केली कीं, यंदां तुम्हीं फौज चाकरीस न ठेवितां सरंजामाचें जें उत्पन्न येईल तें सरकारांत भरावें. या उपायानें व सर्व सरदार लोकांवर कर्जपट्टी घालून त्यांनीं दादासाहेबांच्या कर्जाची रक्कम उभी केली.

२० आगष्ट स. १७६७ रोजीं विठ्ठल शिवदेव विंचुरकर मरण पावले. त्यांच्या सरदारीचीं वस्त्रें त्यांचा ज्येष्ठ पुत्र शिवाजी विठ्ठल यास श्रीमंतांकडून मिळालीं, तेव्हां त्यानें श्रीमंतांस पंधरा लक्ष आसष्ट हजार रुपये नजराणा दिला. शिंद्यांच्या सरदारीचीं वस्त्रें दादासाहेबांनीं केदारजी शिंद्यास दिलीं होतीं, व महादजीस त्याचा फक्त मुतालिक नेमिलें होतें. ती व्यवस्था पेशव्यांस पसंत न पडून त्यांनीं आतां केदारजीची सरदारी दूर करून ती महादजीस दिली व त्यापासून पांच लक्ष रुपये नजराणा घेण्याचें ठर-

विलें. महादजी त्यावेळीं उज्जनीस होता. त्याची दिवाणगिरी पूर्वी नारो शंकराकडे होती ती दादासाहेबांनीं दूर केल्याचा उल्लेख मागें आलाच आहे. हल्लीं ती दिवाणगिरी श्रीमंतांनीं बाजी नरसिंह नांवाच्या गृहस्थास दिली. व त्याबद्दल त्या पासूनही पांचलक्ष रुपये नजराणा घेतला. गंगाधर यशवंत चंद्रचुड उर्फ गंगोबा तात्या याजकडे होळकराची दिवाणगिरी फार दिवसांपासुन होती. परंतु तो अहल्याबाईस व तुकोजीस नकोसा झाला होता म्हणून पेशव्यांनीं अलीकडे त्याजकडून तें काम काढिलें होतें. गंगोबा तात्या हा दादासाहेबांचा पक्का अभिमानी व त्यांच्या मर्जीतला होता हें मनांत न आणितां पेशव्यांनीं शिंद्याची मुतालिकी त्याच्या एका मुलास सांगितली, दुसऱ्या मुलास त्याच सरदारीची फडणिशी सांगितली व तिसऱ्यास दरबारांत आपणाजवळ नेहमीं ठेवून घेतलें. हिंदुस्थान व माळवा वगैरे प्रांतींचीं दरबारीं कामेंही गंगोबा तात्यावर विश्वास ठेवून त्याच्या हातें घेण्याचा श्रीमंतानीं कांहीं दिवस उपक्रम चालविला. बाजी नरसिंह यास त्यांनीं शिंद्याची दिवाणगिरी दिली, ती तरी गंगोबा तात्याच्याच शिफारसी वरून होय.

आणखीही कित्येक कारभार पेशव्यांनीं या सुमारास केले त्या सर्वांचा कल वर लिहिलेल्या घडामोडींच्या धोरणावरच असून स्वपक्षास बळकटी आणण्याचा हेतु त्यावरुन स्पष्ट दिसून येण्याजोगा होता. सातारा, शिवनेरी व नगर हे किल्ले दादासाहेबांकडून हातीं आल्याबरोबर त्यानीं अनुक्रमें बजाबा पुरंदरे, नारो बाबाजी व उद्धव वीरेश्वर या आपल्या विश्वासांतील मनुष्यांच्या हवालीं ते किल्ले केले. विसाजी आपाजी आठवले हा पुढें बऱ्याच प्रसिद्धीस आलेला सरदार यावेळीं फडणिशीकडे कारकुनीवर होता त्यास बजाबाचा कारभारी नेमून साताऱ्यास पेशव्यांनीं ठेविलें होतें. आबा पुरंदऱ्यास दादासाहेबांनीं जहागिर पूर्वी दिली होती तींतून चार लक्षांची या वेळीं परत घेण्यांत आली. कित्येक जहागीरदारांच्या ताब्यांत सरकारी किल्ले होते त्यांपासून त्या किल्ल्यांबद्दल जामीनही याचवेळीं घेण्यांत आले. एकीकडून स्वपक्षाची बळकटी करण्याचा त्यांचा यत्न चालला होता तरी फौज फांटा त्यानीं आपणाजवळ अगदीं बाळगिला

नव्हता. केवळ दोनशें बारगीर जवळ बाळगून हुजूर पागा व उंटें व तोफ-खान्याचे बैल वगैरे चारणीस पाठवून पुण्यांत त्यांनीं मुगर्दी. सामसूम राखिलें होतें. त्यांत हेतु इतकाच होता कीं, आपण फौज बाळगावी तर दादासाहेबांस भय पडून तेही फौज जमवितील व उद्यांवर ढकललेला कुटुंबकलहाचा प्रसंग आजच उपस्थित होईल!

पावसाळा संपत आला तों, दादासाहेबांचा लढाई करण्याचा इरादा उघड दिसूं लागला. त्यांजवळ तोफा पुष्कळ होत्या. सध्या त्यांजवळ दोन हजार फौज जमली होती व आणखीही पुष्कळ फौजेस त्यांनीं नाल-बंदी दिली होती व बोलावणे गेल्याबरोबर तिनें येऊन हजर व्हावें अशी तजवीज केली होती. गायकवाड व भोंसले यांनीं ही त्यांस फौजेची कुमक देण्याविषयीं आश्वासन दिलें होतें. शिवाय कांहीं गोरे शिपाई, तोफा, दारू गोळा व गोलंदाज आपणाकडे पाठविण्याविषयीं मुंबईकर इंग्रजांशीं त्यांचें बोलणें सुरू होतें. त्यांच्या ताब्यांत अद्यापि तेरा चवदा लक्ष रुपये उत्पन्नाचा मुलूख होता त्याचा विस्तार हल्लींच्या नाशिक व नगर जिल्ह्यांत पसरला असून त्यांत कित्येक प्रसिद्ध व बळकट किल्ले होते. त्यांत त्रिंबक, घोडप, कावनई, अलंग, कुलंग व पट्टा हे मुख्य होते.

मागच्या स्वारींत दादासाहेबांनीं परत येतांनां हिंदुस्थान प्रांतीं बंदोबस्त राखण्याकरितां बाहिरो अनंत व विठ्ठलराव विंचुरकर यांस ठेविलें होतें असें मागें सांगितलेंच आहे. दादासाहेब इकडे आल्यानंतर गोहदकर जाटानें फौज जमा करून पेशव्यांच्या मुलुखावर स्वारी केली. त्या प्रसंगीं विंचु-रकर व बाहिरो अनंत यांनीं जाटावर चालून जाऊन त्याचा पराजय करून त्यास पुनः गोहदचा आसरा धरणें भाग पाडिलें. तथापि जाटाची खुम-खुम अजून मोडली नव्हती व अलीकडे महादजी शिंद्यांशीं त्याची लढाई होऊन तींत शिंद्याच्या कांहींसा पराजय झाल्यामुळें गोहदकरास अधिकच चेव आला होता. शिवाय गोहदकरापेक्षांही प्रबळ असा दुसरा एक शत्रू मराठ्यांस त्या प्रांतीं निर्माण झाला होता. तो भरतपुरचा जाट राजा जवा-हीरमल्ल हा होय. त्यानें मराठ्यांचें राज्य घेण्याचा इरादा धरून मारवा-डचा राजा विजयसिंग याशीं सख्य करून त्याची फौज मदतीस बोलाविली

होती. जुनागडचा राजा माधवसिंग व बुंदी व कोटा येथील राणेही या कटांत मिळावयास कबूल झाले होते. एकंदर या सर्वांची मिळून पन्नास हजार सेना समरांगणीं येण्यासारखी होती. मराठ्यांची तर तिकडे सर्व मिळून पंधरा सोळा हजार फौज होती व तिजकडून या परचक्राचें निवारण होणें अर्थातच अशक्य होतें. तो भरतपूरकर जाट तर म्हणे कीं, मराठ्यांस हिंदुस्थानांतून हुसकून लावून नर्मदा दक्षिणतीरास घालवीन तेव्हांच मी स्वस्थ बसेन! या मगरूर जाटाचें पारिपत्य करणें पेशव्यांस अत्यंत आवश्यक होतें व तुकोजी होळकर, शिवाजी विठ्ठल, नारो शंकर, व त्रिंबकराव शिवदेव यांस जाटावर स्वारी करण्यासाठीं हिंदुस्थानांत परत जाण्यास त्यानीं निरोप दिला होता. परंतु या स्वारीस आपली फौज पुरेशी होणार नाहीं याकरितां सरकारांतून आणखी फौजेची नेमणूक व्हावी असें ते सरदार म्हणूं लागले. पुढें दादासाहेबांच्या वागणुकीचा रोख पाहून पेशव्यांनीं जाटावर स्वारी करण्याचा मनसबा तहकूब केला व हिंदुस्थानच्या सरदारांस तूर्त दक्षिणेंतच राहून घेतलें. सुरतेपासून विजयदुर्गापर्यंत समुद्रकांठचे किल्ले पहावयास जाण्याचें यंदा पेशव्यांनीं ठरविलें होतें व कदाचित् जंजिऱ्यावर स्वारी करण्याचाही त्यांचा बेत असावासें वाटतें. परंतु वरील कारणांमुळें त्यांस हेही बेत तहकूब करावे लागले.

कर्नाटकांत गोपाळराव गेला होता त्यानें चित्रदुर्ग, रायदुर्ग, अनागोंदी येथील पाळेगारांपासून व अदवानी, कडपें व कर्नूळ येथील नबाबापासून खंडणी घेतली. या सर्वांनीं बिनतक्रार खंडणी दिली याचें कारण हैदर व मोंगल हे इंग्रजांशीं लढण्यांत गुंतल्यामुळें तिकडील लहान मोठ्या संस्थानिकांस कोठें राजकारण करण्यास जागा राहिली नव्हती, व त्यामुळें गोपाळराव म्हणेल त्याप्रमाणें वागणें त्यांस भागच पडलें. मदगिरी, बाळापूर वगैरे आदल्यावर्षीं जिंकिलेल्या प्रांतांत मराठ्यांची पंचवीस हजार फौज जमलेली पाहून हैदर व इंग्रज या दोघांसही काळजी उत्पन्न झाली होती. परंतु त्या दोघांच्याही वाटेस न जाण्याविषयीं पेशव्यांची गोपाळरावास ताकीद होती तीस अनुसरून तो फाल्गुन अखेरीपर्यंत तिकडे राहून खंडण्या घेत परत येऊं लागला. येतां येतां त्यानें फुलचेरीस (पांदेचेरीस) फ्रेंच

लोकांकडे खंडणी मागण्यासाठीं वकील पाठविला. यावेळीं इंग्रजांप्रमाणेंच फ्रेंचांसही पेशव्यांची मर्जी संपादणें जरूर वाटलें होतें, सबब त्यांनीं या प्रसंगी त्रिपथी, चंद्रगिरी व कित्तूर हीं ठाणीं पेशव्यांस देण्याचें कबूल केलें व चार लक्ष रुपये दरसाल खंडणी देण्याचा तहनामा करून दिला.

स. १७६८ जाने.—मार्च } शिवाय पेशव्यांस नजराणा म्हणून तीन हत्ती, कांहीं विलायती बखलाद व मलमल वगैरे जिन्नस बरोबर देऊन त्यांनीं आपला वकील गोपाळरावाच्या लष्करास पाठवून दिला. वैशाखाच्या प्रारंभीं गोपाळराव यादगिरी, सुरापूर, चितापूर, येथील खंडण्या घेऊन पंचमहालांत आला. तो मुलूख मोंगलाईचा असून तेथील चौथाईचा कित्येक वर्षांचा वसूल तुंबलेला होता. गोपाळरावाच्या फौजेनें या प्रांतांत चोहोंकडे धुमाकूळ उडवून दरोबस्त गावांपासून चौथाई व घांसदाणा घेतला. मंगथळ परगण्याच्या कमाविसदारांकडून चौथाई सरळपणानें आली नाहीं सबब त्या परगण्यांत जडवें म्हणून किल्ला होता त्याचे त्यानें सुरुंग लावून बुरुज उडविले व हल्ला करून किल्ला घेतला. इतकें झाल्यावर तो गुलबुर्ग्यास आला.

हैदराच्या संगतीस लागून मोंगल अर्काटावर स्वारी करण्याकरितां गेला तेव्हां त्यानें तेथील नबाब महमदअल्ली व त्याचे सोबती मद्रासकर इंग्रज यांस खंडणी देण्याविषयीं दरडावणीचा निरोप पाठविला होता. ती खंडणी देण्यास ते दोघे नाकबूल नव्हते, परंतु त्याचें प्रथमपासून मोंगलास सांगणें होतें कीं, आम्हीं तुम्हांस खंडणी देऊं, पण हैदराचा पक्ष सोडून तुम्हीं परत आपल्या मुलखांत गेलें पाहिजे. तें बोलणें न ऐकतां तो जेव्हां स्वारी करून आला तेव्हां इंग्रजांनीं चालून येऊन दोन तीन लढायांत त्याचा व हैदराचा पूर्ण पराजय करून त्या दोघांसही घांटावर पिटून लाविलें हें मागें सांगितलेंच आहे. त्या प्रसंगीं मोंगलांचे पांचचार हजार लोक मारिले गेले व त्याच्या तोफा व सारें बुनगें इंग्रजांनीं हिसकून घेतलें. नंतर लढाईनें इंग्रज वठणीस येण्याजोगे नाहींत असें पाहून मोंगलानें निश्चय केला कीं, आतां हैदरास सोडून अर्काटच्या नबाबाकडून सामोपचारानें काय खंडणी येईल ती घेऊन आपण स्वदेशास परत जावें. या हेतूस

अनुसरून त्यानें रामचंद्रराव जाधवाच्या मार्फत अर्काटवाल्याशीं समेटाचें बोलणें घातलें. नंतर असें ठरलें कीं, त्यांनीं मोंगलास पंधरा लक्ष रुपये द्यावे व इंग्रजांनीं त्याच्या तोफा व बुरुजें त्यास परत द्यावें. सदर रकम व आपलें तोफा वगैरे सामान घेऊन मोंगलानें परत जावें. त्या शर्ती अमलांत आल्यावरोबर हैदरास सोडून देऊन मोंगल भागानगरकडे परत येऊं लागला. कृष्णेअलीकडे आल्यानंतर त्यानें गोपाळरावास सांगून पाठविलें कीं, पेशवे सरकारचें व आमचें सख्य आहे. तुम्हीं आमच्या मुलखांत चोथाई घेतलीत हें यथापद्धतच झालें. त्याविषयीं आमची तकरार नाहीं. परंतु तुम्ही आमचा जडल्यांचा किल्ला घेतला आहे तो आमचा आम्हांस परत मिळावा. त्यावरून 'नबाब सरकारांत रुजू आहेत' असें समजून गोपाळरावानें किल्ला परत दिला.

चैत्र महिना संपल्यावरोबर दादासाहेब आनंदवल्लीहून निघून आपली फौज जमा करीत दारणासांगवीपर्यंत जाऊन तेथेंच तळ देऊन राहिले. चिंतो विठ्ठल रायरीकर त्यांचा कारभारी होता. शागिर्द मंडळीचा घोळकाही भोंवती पूर्वीप्रमाणेंच जमला होता. गंगोबा तात्यावर पेशव्यांनीं उपकार करून त्यास ममतेंत घेण्याचा यत्न केला होता तो फुकट जाऊन ती स्वारी आयत्यावेळीं दादासाहेबांकडे गेली. दमाजी गायकवाडानें आपला मुलगा गोविंदराव याजबरोबर कांहीं फौज दादासाहेबांकडे पाठविली. जानोजी भोंसल्याची फौजही याच उद्देशानें नागपुरास जमा होत होती. खुद्द दादासाहेबांजवळ आतां फौजेचा जमाव पंधरा हजारांवर जमला होता. पुढें मागें इंग्रजांची कुमक मिळण्याची त्यांस आशा होती. शिवाय आतां मोंगल कर्नाटकची मोहीम सोडून देशीं आला होता. त्याकडेही त्यांचें राजकारण लागलेंच होतें. तुम्हांस मुलगा नाहीं, मग तुम्ही राज्याची वांटणी काय म्हणून मागतां ? असें कोणी म्हणेल तर तसें म्हणण्यास कोणास जागा राहूं नये म्हणून कोंकणांतील भुसकुटे उपनांवाच्या ब्राह्मणाचा मुलगा त्यांनीं दत्तक घेतला व त्यांचें नांव अमृतराव ठेविलें.—मुलगा घेतल्याबद्दल संतोषाची साखर व वस्त्रें त्यांनीं पेशव्यांकडे पाठविलीं तीं त्यांनीं घेतलीं नाहींत हें सांगावयास नकोच !

याप्रमाणें कटुंब कलह टळावा ह्मणून पेशव्यानीं केलेली खटपट फुकट जाऊन शेवटीं तोच प्रसंग समीप येऊन ठेपला ! त्यांत भोंसल्याची फौज नागपुरास तयार झाली व मोंगलही देशीं परत आला. हीं वर्तमानें येतांच त्यांची खात्री झाली कीं, आतां दादासाहेबांची उपेक्षा करणें धोक्याचें आहे.

स.१७६८) याकरितां मोंगल व भोंसले त्यांस मिळाले नाहीत तोंच त्वरा

मे–जून. } करून त्यांच्या बंडाचा बीमोड करून टाकिला पाहिजे. असा विचार करून त्यांनीं गोपाळरावाची फौज गुलबुर्ग्याकडे होती ती तावडतोब बोलावून आणिली. तुकोजी होळकर अद्यापि दक्षिणेंतच होता त्याजवळ आठ हजार फौज होती. सरदारीचीं वस्त्रें घेण्याकरितां महादजी शिंदे उज्जनीहून आला होता तो अद्यापि चांभारगोंद्यास राहिला होता. त्यांजवळ पांच सात हजार फौज होती. या दोघां सरदारांस निकडीचीं बोलावणीं गेल्यामुळें तेही आपापल्या फौजेनिशीं येऊन हजर झाले. शिवाय विनीवाले, रामचंद्र गणेश, रास्ते, घायगुडे व हुजरातीकडील लोक मिळून पेशव्यांजवळ एकंदर चाळीस हजार फौज जमली. पुण्यास फौज जमत असल्याची बातमी ऐकून दादासाहेब दारणा सांगवीहून तळ हालवून उत्तरेस घोडप किल्ल्याच्या आश्रयास चालले. तेव्हां पेशवेही पुण्याहून निघून लांब लांब मजली करीत घोडपेकडे गेले. पेशवे जवळ आलेसें पाहून दादासाहेब पंचवीस हजार फौजेनिशीं पेशव्यांवर चालून आले. उभयपक्षीं एवढाल्या फौजा जमल्या होत्या तरी मातबर लढाई झाल्याचें दिसून येत नाहीं. जी थोडीशी लढाई झाली तींत दादासाहेबाच्या कारभाऱ्याचा भाऊ मोरो विठ्ठल रायरीकर ठार झाला. त्याबरोबर दादासाहेबाच्या फौजेनें पलायन केलें. नंतर दादासाहेब घोडपच्या किल्ल्यांत शिरलेसें पाहून पेशव्यानीं त्या किल्ल्यास गराडा घालून मोर्चेबंदीचें काम झपाट्यानें सुरू केलें. पेशवे आतां किल्ला घेतल्याशिवाय सोडीत नाहींतसें पाहून निरुपाय होऊन दादासाहेब सहकुटुंब किल्ल्याखालीं येऊन पेशव्यांच्या स्वाधीन झाले. नंतर दादासाहेबांच्या जहागिरीचा मुलूख हातीं येईतों रामचंद्र गणेश कृष्ण विनीवाले यांस तीन हजार फौजेसह नाशीक प्रांतीं ठेवून बाकीच्या सरदारांस निरोप देत देत पेशवे पुण्यास आले. पटवर्धनांस आठ ह-

आर स्वारांच्या बेगमीचा सरंजाम आजपर्यंत मिळाला नव्हता, कांहीं कमी होता; तो यावेळीं पेशव्यांनीं देऊन भरती करून दिली. दादासाहेबांस त्यांनीं शनिवार वाड्यांतच बंदोबस्तानें कैद करून ठेविलें होतें.

---

# प्रकरण सातवें

## नागपूरकर भोसल्यांवर दुसरी स्वारी.[1]

( स. १७६९ जाने.-जून अखेर. )

दादासाहेबांस घोडपेहून धरून आणिल्यानंतर त्यांच्या सांथी मंडळीचें पारिपत्य करण्याचा विचार सुरू झाला. गंगोबा तात्यावर पेशव्यांचा फारच रोष झाला होता. तो वेषांतर करून घोडपेहून पळून जात असतां होळकरांच्या लोकांनीं त्यास पकडून आणून पेशव्यांच्या हवालीं केलें. त्यांनीं त्याच्या पायांत बिडी ठोकून त्यास कैदेंत ठेविलें व दंडादाखल त्याजवळ अतोनात पैका मागितला. दमाजी गायकवाडानें आपला मुलगा गोविंदराव यास दादासाहेबांच्या कुमकेस पाठविलें होतें. यामुळें गायकवाडी दौलतीवर पेशव्यांची वक्रदृष्टि झालीच होती. तितक्यांत ता. १८ आगष्ट १७६८ रोजीं दमाजी गायकवाड मृत्यु पावला. त्यामुळें त्याच्या सरदारीचें बळ कमी करण्यास त्यांस आयतीच संधि सांपडली. दमाजीस गोविंदराव, सयाजी, फत्तेसिंग आणि माणिकजी असे चार मुलगे होते. पैकीं गोविंदराव यास दादासाहेबांची कुमक केल्याबद्दल पेशव्यांनीं पुण्यास कैदेंत ठेविलें होतें. दमाजी मरण पावतांच आपणास सरदारी देण्याविषयीं गोविंदरावानें पेशव्यास विनंती केली. परंतु याचवेळीं बडोद्यांत त्याचे तिघे बंधु होते त्यांनींही सरदारीवर वारसा सांगण्यास प्रारंभ केला. यांत खरा हक्क कोणाचा हें निश्चित करणें कठिणच होतें. सयाजी हा पहिल्या बायकोचा मुलगा होता, पण तो वेडसर असून शिवाय गोविंदरावापेक्षां वयानें

---

१ 'भोसल्यांवर दुसरी स्वारी' ही प्रस्तावना ए. ले. संग्रह भाग तिसरा पृ. १३२३-१३१८ यांवर छापलेली आहे.

धाकटा होता. गोविंदराव सर्वांत थोरला खरा, पण तो दुसऱ्या बायकोचा मुलगा होता. तेव्हां सरदारीवर हक्क पहिल्या बायकोच्या धाकट्या मुलाचा कीं, दुसऱ्या बायकोच्या थोरल्या मुलाचा ? या तंट्याचा मामूल वहिवाटीप्रमाणें निकाल करावा म्हटलें, तरी दोन्ही पक्षांस अनुकूल, अशीं उदाहरणें दाखवितां येण्याजोगीं होतीं ! सरदारीचें काम अकलेचें व शौर्याचें असल्यामुळें चौघांत जो शूर व शहाणा असेल त्यासच सरदारी द्यावी असें म्हणावें तर सर्व भावांत फत्तेसिंग हा शहाणा व शूर असून सरदारी चालविण्यास पूर्णपणें लायक होता व तो कोणच्याही भावापेक्षां अधिक नजराणा द्यावयास कबूल होता. बरेच दिवस चर्चा चालून शेवटीं पेशव्यांनीं गोविंदरावास सरदारीचीं वस्त्रें दिलीं. त्यावेळीं गोविंदरावानें करार लिहून दिला कीं, दादासाहेबांस कुमक केल्याबद्दल दंड तेवीस लक्ष, सरदारीच्या वस्त्रांबद्दल नजराणा एकवीस लक्ष, मागील वर्षांच्या खंडणीच्या बाकीपैकीं सवा पांच लक्ष, व इतर कांहीं किरकोळ मिळून एकंदर साडे पन्नास लक्ष रुपये पेशवे सरकारास देईन. शिवाय पेशवे सरकारच्या नोकरीकरितां मुलुखगिरी नसेल तेव्हां पुण्यास तीन हजार व मुलुखगिरी असेल तेव्हां स्वारींत चार हजार फौज हजर ठेवीत जाईन.

गायकवाडाचा तर याप्रमाणें बंदोबस्त झालाच. आतां दादासाहेबांच्या बंडांत सामील होऊं पहाणारा दुसरा सरदार जानोजी भोसले यावर स्वारी करून त्यास वठणीस आणण्याचें काम राहिलें. धोडपची स्वारी आटोपल्याबरोबरच तें काम पेशव्यांनीं करावें तर त्यांजवळ पुरेशी फौज तयार नव्हती व शिवाय त्यावेळीं पावसाळाही सुरू झाला होता. याकारितां तो बेत अंमळ लांबणीवर टाकणें त्यांस भाग पडलें. दादासाहेबांस कैद करून घेऊन

स. १७६८ जून–दिसें. } पुण्यास परत आल्याबरोबर त्यांनीं मोगल व हैदर यांशीं राजकारण सुरू केलें कीं, आपण तिघे एकत्र होऊन इंग्रजाची खोड मोडूं या ! हें राजकारण बाह्यात्कारी असल्यामुळें तें अगदीं राजरोस रीतीनें चालतें असून तें सर्व लोकांस माहीत झालें होतें, पण या एका कारस्थानांत पेशव्यांचे आंतले पेंच किती होते हें मात्र त्यावेळीं कोणास उमगलें नाहीं ! पेशव्यांची आपणावर कधीं तरी स्वारी

होणार आहे हें जानोजी पक्कें जाणून होता. परंतु वरील कारस्थानांचा गाजा-वाजा चोंहीकडे होऊं लागला तेव्हां त्यास साहजिकच वाटलें कीं, पेशवे आतां या प्रचंड स्वारीच्या उद्योगास लागले तेव्हां ते यंदां कांहीं आपणा-वर स्वारी करणार नाहींत. याच सुमारास पेशव्यांचें आरमार येऊन मुंबई-जवळ उतरलें. त्यामुळें इंग्रजांस संशय येऊन त्यानीं वसईचा सुभेदार रामाजीपंत यास स्पष्टपणें विचारिलें कीं, तुमचें आरमार येथें येण्याचें कारण काय? त्यानें उडवाउडवीचें उत्तर दिलें कीं, पोर्च्युगीज लोकांचीं दोन गलबतें या वाटेनें येणार आहेत तीं धरण्याकरितां आमचें आरमार तेथें राहिलें आहे! आपणाशीं बिघाड करण्याचा पेशव्यांचा हेतु आहे व हैदर आणि निजामअल्ली यांस आपणाकडे मिळवून घेण्याकरितां त्यांची खटपट सुरू आहे हें ऐकून इंग्रजांस दहशत पडली कीं, भोंसले व पेशवे यांचें युद्ध सुरू झालें आणि भोंसल्यास कुमक करण्याकरितां कलकत्त्याहून फौज पाठवावयाची झाली तर ती नागपुरास जाऊन पोंचण्यापूर्वींच मराठे मोंगल व हैदर यांच्या फौजा मद्रासेवर येतील. यामुळें पेशव्याशीं आम्हीं तुमच्या वाटेस जाणार नाहीं, तुम्हीं आमच्या वाटेस येऊं नये, अशा रीतीनें सलोख्याचें बोलणें करण्याकडे त्यांची प्रवृत्ति झाली. याप्रमाणें भोंसले व इंग्रज यांच्या डोळ्यांत पेशव्यांनीं चांगलीच धूळ फेंकली; पण हैदर मात्र फसला नाहीं. आपणास भोंसल्यावर स्वारी करावयाची अस-ल्यामुळें कर्नाटकांत जावयास फावणार नाहीं व गोपाळरावासही पाठवितां येणार नाहीं, याकरितां इंग्रजांशीं लढण्याकरितां कुमक देण्याचें आमिष दाखवून हैदरापासून सहजासहजीं खंडणी उकळावी असा पेशव्यांचा बेत होता तो साधला नाहीं इंग्रजांचें व हैदराचें जें हल्लीं युद्ध सुरू होतें त्यांत इंग्रजांची बरीच सरशी होत चालली होती. ह्यामुळें पेशवे आपल्या मदतीस येणार हें ऐकून प्रथम त्यास हर्ष झाला. पण ही मदत मिळण्या-पूर्वीं पेशव्यांस खंडणी दिली पाहिजे हें जेव्हां त्यास कळलें तेव्हां ही फक्त खंडणी वसूल करण्याकरितां हुलकावणी आहे हें त्यानें तत्काळ ताडिलें! तो पक्का लबाड, त्यानें उलट तत्काळ पुकारा केला, आतां आपण इंग्रजां-शीं समेट करणार व त्यांच्या मदतीनें मराठ्यांच्या मुलखावर स्वारी करणार!

दिवाळी झाल्यावर गोपाळरावास पेशव्यांनीं हुकूम पाठविला कीं, तुम्हीं आपली फौज घेऊन सुरापूर संस्थानावर मोहीम करावी. त्याप्रमाणें गोपाळराव तावडतोब सुरापुराकडे निघून गेला. श्रीमंतांशीं तह करण्याकरितां पुण्यांत भोंसल्याचे वकील खटपट करीत होते तीस कांहीं यश न येतां शेवटीं भोंसल्यावर स्वारी करावयाचा श्रीमंतांनीं निश्चय केला. कार्तिक महिन्यांतच ते डेरेदाखल होऊन जिकडे तिकडे स्वारींविषयींची चळवळ सुरू झाली. फौजा जमूं लागल्या. तोफखाना, गारदी व आरब यांची संचणी होऊं लागली. यापूर्वींच उत्तर हिंदुस्थानांत शिंदे-होळकरांबरोबर जाण्याकरितां श्रीमंतांनीं रामचंद्र गणेश याची फौजेसह रवानगी केली होती. तो कांहीं मजली गेला न गेला तोंच श्रीमंतांचा परत येण्याविषयीं निकडीनें निरोप गेल्यामुळें तो परत आला. सुरापुरची मोहिम सोडून येण्याविषयीं गोपाळरावासही याचप्रमाणें निरोप गेल्यामुळें तोही आला.

सर्व तयारी झाल्यावर पौष महिन्याच्या प्रारंभीं रावसाहेब पुण्याहून निघून नगरावरून औरंगाबादेकडे गेले. मागें इ. स. १७६६ त भोंसल्यावर स्वारी झाली तेव्हां पेशव्यांच्या मदतीस मोंगलानें फौज धाडिली होती व त्याप्रमाणें याही खेपेस त्यानें फौज पाठविण्याचें कबूल केलें होतें.

स. १७६९ जाने. } त्या संकेतास अनुसरून मोंगलाचा दिवाण रुक्नुद्दौला व रामचंद्रराव जाधव सात आठ हजार फौज घेऊन तिकडून आले. पिराजीनाईक निंबाळकरही येऊन मिळाला. एकंदर फौजेचा समुदाय साठ हजारांपर्यंत पेशव्यांजवळ जमला. मग ते वाशीमच्या घांटानें वऱ्हाडांत शिरून भोंसल्याच्या मुलखाची जप्ती करूं लागले. जानोजी भोंसल्यास मुधोजी, साबाजी, व बिंबाजी असे आणखी तिघे भाऊ होते 'सेनासाहेब सुभा' हें पद व जहागिरीचा मुख्य अधिकार जानोजीकडे होता. मुधोजीस 'सेनाधुरंधर' असा किताब मिळालेला होता. या चौघा भावांची आपआपसांत नित्य भांडणें होत व बाकीच्या तिघांस कह्यांत ठेवण्यास जानोजीस फार प्रयास पडत असत. परंतु यावेळीं या चौघांही

भावांत ऐकमत्य होऊन सर्वांनीं जानोजीच्या आज्ञेप्रमाणें चालावें असा त्यांचा आपआपसांत निश्चय ठरला होता. जानोजी फौजेसह नागपुराबाहेर उतरला होता त्यास पेशवे वऱ्हाडांत आल्याची बातमी कळतांच तो गाविलगडास गेला व तेथें आपलीं मुलें माणसें व जड सामान सर्व ठेवून रामटेकास आला. तो घोरणी व शूर सरदार होता. त्यानें विचार पाहिला कीं, पेशव्यांबरोबर गारदी व तोफखाना वगैरे लटांबर बरेंच आहे व त्यांच्या मदतीस मोंगलाची फौज आली आहे तीही अव्यवस्थित असून तिनें बुणगें व तोफा वगैरे सामान बरोबर बरेंच आणिलें आहे. एवढ्या सेनेशीं समोर लढून आपला निभाव लागणार नाहीं. याकरितां 'गनिमी काव्या' नें लढाई केली तरच कांहीं बचाव होईल. गनिमी कावा म्हणजे काय हें मागें अनेक वेळां सांगण्यांत आलेंच आहे. पेशव्यांस या रीतीनें लढण्याचें शिक्षण इ. स. १७६३ सालीं, मोंगलाशीं लढाई चालली होती त्या वेळीं मिळालें होतें. त्यावेळचे त्यांचे शिक्षक मल्हारराव होळकर, दमाजी गायकवाड व विठ्ठलराव विंचूरकर हे आतां मयत झाले होते. दादासाहेब कैदेंत होते व सखारामबापूचा अधिकार काढून घेऊन पेशव्यांनीं आतां मोरोबादादा फडणीस यास दिवाणगिरीवर नेमिलें होतें. सारांश भोंसल्याशीं गनिमी काव्यानें लढण्याचें बिकट काम आतां त्यांस पार पाडावयाचें होतें व अशा कामीं अनुभव असलेल्या सरदारांची त्यांच्या फौजेंत वाण होती.

वऱ्हाडांत पेशवे व मोंगल यांचा जेथें जेथें मुलूख होता तेथें तेथें भोंसल्याचे देशमुखी व घांसदाणा वगैरे हक्क होते, ते आतां सर्व जप्त करण्यांत आले. शिवाय जहागीर व इनामें म्हणून त्याच्या ताब्यांत जो मुलूख होता तोही हस्तगत करण्यांत आला. इतकें झाल्यावर पेशवे वर्धा नदी उतरून तिच्या उत्तरेकडील मुलूख ताब्यांत घेत चालले. वाटेंत अमळनेरचा किल्ला लागला तो घेऊन ते थेट नागपुरास गेले. तेथें जानोजी नव्हता, यामुळें त्यांनीं तें शहर स्वस्थपणानें लुटून फस्त केलें. तेथून कोळा कोसांवर मंडारें म्हणून भुईकोट होता तोही त्यांनीं घेतला. नंतर सर्व लष्कर चांद्यास गेलें. तो किल्ला फारच बळकट असून आंत मोंठ-

त्यांचा किल्लेदार महिपतराव परभू म्हणून होता त्यानें तें स्थळ निकरानें लढविण्याचा निश्चय केला होता. पेशव्यांचा वेढा चांद्यास बसतो असें पाहून जानोजीही किल्ल्यास कुमक करण्याच्या इराद्यानें चांद्याकडे आला. त्यानें आपल्या लष्करच्या कहीकवाडांस वगैरे उपद्रव देऊं नये म्हणून त्याच्या तोंडावर पेशव्यांनीं ह्या किल्ल्यापासून नऊ कोसांवर गोपाळरावास ठेविलें व मोर्चे चालविण्याचें काम जारीनें सुरू केलें. पंचगव्हाण येथें भोसल्यांचे सरदार नरहरपंत रिसबूड व बापु करांडा असे दोघे उतरले होते, त्यांवर गोपाळरावानें आनंदराव गोपाळ व नरसिंगराव घायगुडे व बाळाजीपंत चप्रे यांस पाठविलें. उभयपक्षीं बारा चौदा घटका लढाई होऊन भोसल्यांच्या फौजेचा पूर्ण पराजय होऊन तिची दाणादाण झाली. नरहरपंत ठार पडला व करांडा पंचवीस स्वारांनिशीं पळून गेला. चांद्याहून पेशव्यांच्या लष्करापैकीं निरनिराळ्या टोळ्यांनीं जाऊन भोसल्यांच्या राज्यापैकीं उघडा मुलुख होता त्यापैकीं बराच ताब्यांत घेतला होता व कांहीं किल्ले व कांहीं ठाणींही घेतलीं होतीं. जानोजीस समोर येऊन लढण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें तो झुकांड्या देत हिंडत होता. सांप्रत पेशव्यांनीं असा बेत योजला होता कीं, गारदी, तोफखाना व कित्येक हजार स्वार मिळून एक फौजेचा स्वतंत्र भाग करावा. दुसरा भाग सुमारें चाळीस हजार घोडेस्वारांचा करावा. या दुसऱ्या फौजेजवळ बुणगें वगैरे कांहीं सामान नसावें. ती सर्व सडी असावी व तिनें नेहमी भोसल्यांचा पाठलाग करीत असावें. पहिल्या फौजेंत आपण राहून किल्ले व ठाणीं घ्यावीं. दुसरी फौज कोणा तरी सरदाराच्या हवालीं करून त्यास भोसल्याचा पाठलाग करण्याच्या कामावर पाठवावें, किंवा तें काम आपण हातीं घ्यावें व पहिल्या फौजेंत कोणा तरी सरदारास ठेवून किल्ले घेण्याचें काम त्याजवर सोंपवावें. हा जो पेशव्यांनीं बेत केला होता तो जर सिद्धीस जाता, तर भोसल्याचें सबंध राज्य अगदीं थोड्या दिवसांत खालसा झालें असतें. परंतु जानोजी भोसल्यानें या वेळीं अशी एक मसलत योजिली कीं, तिच्या योगानें पेशव्यांचा बेत विस्कळित होऊन तूर्तापुरता तरी त्याच्या राज्याचा बचाव झाला.

पेशवे व मोंगल यांचास गराडा देऊन बसले होते हें मागें सांगितलेंच आहे. जानोजीनें विचार केला कीं, त्या किल्ल्याच्या बचावाकरितां आपल्या हातून कांहीं यत्न होण्याजोगा नाहीं व पेशव्यांनीं राज्य घेतलें आहे व घेत आहेत तें सोडविणें अशक्य दिसतें. समोर येऊन लढण्या-चेंही आपणास सामर्थ्य नाहीं, तर आतां आपण पेशवे व मोंगल यांच्या मुलखावर स्वारी करावी म्हणजे आपल्या पाठीस लागत ते तिकडे येतील व लढाईचा हंगामा पडल्यामुळें मुलखाची पायमल्ली व्हावयाची ती त्यांच्या मुलखाची होईल. असा बेत करून आपण येथेंच आहों, असें शत्रूस भास विण्याकरितां बुणगें व डेरे राहुट्या वगैरे सामान व कांहीं फौज त्यानें तळावरच ठेविली व निवडक पंधरा हजार घोडेस्वार बरोबर घेऊन लांब लांब मजली करीत तो माहूरच्या रोखें निघाला.

फेब्रुवारी

ती बातमी पेशव्यांस कळतांच त्यांनीं रामचंद्र गणेश व गोपाळराव पटवर्धन यांजबरोबर पंचवीस हजार फौज देऊन त्यांस टाकोटाक भोंसल्याच्या पाठीवर पाठविलें. तों चोहोंकडून वर्तमानें येऊं लागलीं कीं, भोंसल्याचा बेत पुण्यास जाऊन तें शहर लुटून जाळून फस्त करावें व दादासाहेबांस कैदेंतून सोडवून मागच्याप्रमाणें पुनः त्यांजकडून उपद्व्याप करवावा असा आहे. हीं वर्तमानें ऐकून पेशव्यांचें मन चिंताक्रांत झालें व बारीक दृष्टीनें पहातां ही केवळ भुमका नसून जानोजीनें बऱ्याच खोल बुद्धीनें रचलेलें हें कारस्थान आहे असें त्यांस दिसून आलें. मोंगलाची फौज घेऊन रुक्नुद्दौला व रामचंद्रराव जाधव मदतीस आले होते त्यांत जाध-वाशीं भोंसल्याचें आंतून सूत्र असल्याचें आतां त्यांच्या नजरेस येऊं लागलें. भोंसले व प्रतिनिधि पूर्वी पासून ऋणानुबंधी, ते एकत्र झाल्यावर सातारचें राजमंडल त्यांस निःसंशय अनुकूल होणार, दादासाहेब कैदेंतून सुटले तर मग शत्रूचें पारडें फारच जड होणार, मग आपणाकडे हल्लीं आहेत त्यांतून सुद्धां कांहीं सरदार तिकडे जाऊन मिळावयास कमी करणार नाहींत. मोंगलांचाही कांहीं नेम लागत नाहीं. कदाचित् इंग्रजसुद्धां या फंदास अनुकूल व्हावयाचे, अशा नानाप्रकारच्या शंका पेशव्यांच्या मनांत आल्या असल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं, असें त्या वेळची स्थिति मनांत

आणिली असतां कोणासही कळेल. शिवाय आणखी एक अशी गोष्ट होती कीं, चालू मोहीम परशत्रूवर नसून आपणापैकींच एका मोठ्या सरदारावर झालेली आहे ही गोष्ट मराठे सरदारांस फारशी प्रिय नव्हती; यामुळें आपण स्वतः हजर असल्याशिवाय भोंसल्याचा पाठलाग करण्याच्या कामीं सरदारांच्या हातून झटून उद्योग होणार नाहीं, असेंही पेशव्यास वाटलें असावें. जानोजीच्या पाठलागाकरितां गोपाळराव व रामचंद्र गणेश यांची रवानगी झाली होतीच. ते जाऊन थोडेसे दिवस झाले नाहींत तोंच, चांद्याचा वेढा उठवून व वऱ्हाडच्या बंदोबस्ताकरितां थोडीशी फौज ठेवून बाकी सर्व लष्करासह पेशवे झपाट्यानें मजला मारीत औरंगाबादेकडे येऊं लागले. जानोजी पुण्यावर येणार ही बातमी कळतांच त्यांनीं नाना फडणिसास लिहून पाठविलें होतें कीं, तुम्हीं सर्व कारखाने व दादासाहेबासुद्धां आमच्या कुटुंबांतील सर्व मनुष्यें सिंहगडावर पोंचतीं करावीं. त्याप्रमाणें नाना फडणीस व्यवस्था करूं लागतांच पुण्यांतील लोकांची पराकाष्ठेची घाबरगुंडी उडाली. अर्ध्या रात्रींत पुणें फुटलें. आपली बरतवानी घेऊन चोंहींकडे लोक सैरावैरा पळूं लागले. पुण्यांतून मावळांत जावयास दर बैलास पंचवीस रुपये भाडें पडूं लागलें! चार हिस्से लोक गेले होते. एक हिस्सा जावयाचे राहिले होते. इतक्यांत श्रीमंतांचें नानास पुनः पत्र आलें कीं, भोंसले पुण्यावर येत नाहींत. तुम्हीं शहरच्या लोकांस स्वस्थ करावें व किल्ल्यावर मंडळी व कारखाने पोंचविले असतील ते परत आणावे. मग हळूहळू लोक परत येऊं लागले व त्यांस धीर देण्याकरितां दाबडीस गोविंदराव गायकवाडाची तीन हजार फौज होती ती नानानें पुण्यास संगमावर आणून उतरविली तेव्हां शहरांत स्वस्थता झाली.

पुण्यावर येण्याच्या उद्देशानें जानोजी माहुरास येऊन तेथून उमरखेडापर्यंत आला तों त्याच्या पिछाडीस पंचवीस कोसांच्या अंतरावर गोपाळराव व रामचंद्र गणेश येऊन पोंचले. या दोघांबरोबर सर्व खडे घोडेस्वार होते यामुळें त्यांच्या जलदीविषयीं इतकें नवल वाटत नाहीं. परंतु तोफखाना व बुणगें वगैरे लटांबर बरोबर असतांही गोपाळराव व रामचंद्र गणेश

यांच्या पाठोपाठ पेशव्यांची स्वारी आली हें खरोखर आश्चर्याचें आहे. त्या दोन सैन्यांत आतां पंचवीस कोसांचें अंतर राहिलें होतें. मोंगलाच्या फौजेंत भोंसल्यानें फितुर उत्पन्न केला होता हें मागें सांगितलेंच आहे. पेशव्यांबरोबर आपल्याच्यानें इतक्या लांब मजली होत नाहींत या सबबीवर मोंगलाची फौज दरमजलीस दोन कोस चार कोस मागें राहतां राहतां, आतां बरीच मागें राहिली होती. तिचा इतउत्तर या स्वारींत पेशव्यांस कांहीं एक उपयोग झाला नाहीं.

आपल्या पिछाडीस पंचवीस कोसांवर रामचंद्र गणेश व गोपाळराव आले व त्यासमागमें पंचवीस कोसावर खुद्द पेशवेही येऊन पोंचले ही बातमी ऐकतांच पुण्यावर जाण्याची मसलत सोडून जानोजी पूर्वेकडे म्हणजे मोंगलाई राज्याकडे वळून निर्मळच्या रोखें चालला. पटवर्धन व रामचंद्र गणेश माहूरचा घांट चढून मुधाच्या मुकामीं आले तों त्यांस हें वर्तमान कळलें. मग तेही निर्मळाकडे चालले. तेव्हां तो तिकडचा रोख सोडून इंदूर व बामगल या परगण्यांच्या सरहद्दीवर आला. तों पाठलाग करणाऱ्या सरदारांनीं येऊन त्यास घेरिलें तेव्हां मुसांडी मारून तो दक्षिणेकडे मेदक परगण्यांत गेला, तेव्हां त्यांनीं मागून येऊन त्यास तेथेंही गांठिलें. मग तो मेदक सोडून पश्चिमेस बेदरपर्यंत गेला व तेथून आवसें परगण्यांत येऊन लुटालूट करूं लागला. हरप्रयत्न करून बाले घांटांतून जानोजीस परत नागपुराकडे हुसकून लावण्याचा पेशव्यांनीं आतां निश्चय केला होता व माहुरावरून पाथ्री येथें येऊन तेथें आपले बुणगें वगैरे जड सामान ठेवून पटवर्धन वगैरे सरदारांस मिळण्याकरितां ते सडे सामानानिशीं त्वरेनें येत होते. यामुळें आतां आपण इकडे राहूं तर खचित कोंडिलें जाऊं, असें वाटल्यामुळें जानोजी आतां थेट नागपुरचा रस्ता धरून परत चालला. त्याच्या सैन्यांतून बापू करंदा आडवाटेनें पेशव्यांच्या बुणग्यावर अकस्मात् येऊन पडला व थोडेसें बुणगें त्यानें लुटून नेलें. इतक्यांत पेशव्यांच्या फौजांनीं चोहोंकडून येऊन जानोजीस घेरिलें तेव्हां निरुपाय होऊन तो पेशव्यास शरण आला व तह करण्यास कबूल झाला. त्यावेळीं पेशव्यांची स्वारी निर्मळ येथें होती.

इकडे पुण्यांत शनवारवाड्यांत दादासाहेब कैदेंत होते; त्यांनीं भोसल्याच्या चिथावणीवरून पळून जाण्याची मसलत केली होती ती आयत्या वेळीं केवळ पेशव्यांच्या सुदैवानें उघडकीस आली. फाल्गुन वद्य एकादशीस बारा घटका रात्रीस ते पळून जात होते तों नाना फडनिसास ती बातमी कळून त्यानें तावडतोब बंदोबस्त केल्यामुळें ती मसलत फसली. चौकशी करितां करितां दादासाहेबांकडील सर्व महाळेकरी व गारद्यांचे जमादार व खिजमतगार वगैरे पन्नास साठ नोकर लोक व पांच सात ब्राह्मण कारकून व गुलाबराव म्हणून जनानखान्यांतील एक खोजा इतके लोक या फितुरांत सामील असल्याचें उघडकीस आल्यावरून नानानें त्या सर्वांस पकडून त्यांच्या पायांत बिड्या ठोकिल्या व दादासाहेबांवर रात्रंदिवस खडे पहारे ठेवून बंदोबस्त राखिला. आपला बेत उघडकीस आलाचें पाहून दादासाहेबांनीं प्राण देण्यासाठीं उपोषणें सुरू केलीं. भोजन करण्याविषयीं नानानें विनंति केली, तेव्हां त्यांनीं त्यास शिव्याशाप मात्र दिले. कांहीं उपोषणें झाल्यावर पेशवे परत येईपर्यंत जीव देण्याचा बेत तहकुबीवर ठेवून ते जेवूं लागले!

२१ मार्च,

मराठी साम्राज्याचा जेव्हां अत्युत्कर्ष झाला होता, तेव्हां देखील या देशांत चोहोंकडे अस्वस्थता व दंगेधोपे सुरू असल्यामुळें त्या साम्राज्याचा मुख्य अधिकार ज्यांकडे होता त्यांस कोणच्याही मसलतीचा शेवट लावण्यास फुरसत म्हणून कधीं मिळालीच नाहीं. आपलें पोट भरण्याचा मार्ग नेहमीं खुला असावा व पेशव्यांस आपली नेहमीं जरूर पडावी म्हणून सरदार लोक मुद्दाम कोणच्याही एखाद्या बंडाचा बीमोड करीत नसत असा कित्येकांचा तर्क आहे, पण तो खरा नाहीं. खरोखरच वस्तुस्थिति अशी होती कीं, एखाद्या शत्रूचा पूर्ण उच्छेद करण्यास लागावें, तर तसें करण्यास जो काळ लागेल त्या काळांत दुसरे अनेक शत्रू डोकें वर करीत. त्यामुळें जी मसलत करणें जरूर पडेल तिचा तूर्तापुरता बंदोबस्त करून दुसऱ्या कारस्थानांकडे वळणें पेशव्यांस नेहमीं भाग पडत असे, वर लिहिलेलें कारण प्रस्तुतच्या मोहिमेसही लागू होतें तें असें—लढाई सुरू होण्यापूर्वी भोसल्याचा कारभारी देवाजी-

पंत यांचीं पेशव्यांचें बोलणें वऱ्हाडांत गेल्यापासून सुरू होतें कीं. भोंसल्यानें वर्ध्रेअलीकडील सर्व मुलूख आपणास द्यावा व स्वारी खर्चाबद्दल मोठी रक्कम द्यावी व सांगूं त्या वेळीं चाकरीकरितां फौज घेऊन हजर असावें. त्यावर देवाजीपंत ह्मणे कीं, सन १७६३ सालीं आम्हांस सरकारांतून बत्तीस लक्षांची जहागीर मिळाली होती तीपैकीं चोवीस लक्षांची आम्ही परत दिलीच आहे. आठ लक्षांची राहिली आहे तीही परत देतों. शिवाय स्वारीखर्चाकारितां पंधरा लक्ष रुपये देतों. यापेक्षां अधिक गोष्ट आपल्याच्यानें कोणचीही कबूल करवत नाहीं. हें बोलणें पेशव्यांस अर्थातच न मानवल्यामुळें लढाई सुरू झाली ती तीन महिनेपर्यंत चालली. पेशव्यांनीं वऱ्हाडांत म्हटल्याप्रमाणें वर्धे अलीकडचा मुलूख ताब्यांत तर घेतलाच. शिवाय पलीकडीलही कित्येक ठाणीं व तालुके त्यांच्या ताब्यांत आले होते व कित्येक येण्याच्या लागांत होते. परंतु मुलूखगिरीचे दिवस संपत चालले. तेव्हां त्यांस अशी पंचाईत येऊन पडली कीं, इतक्यांत भोंसल्यानें तह करून घेतला व या मोहिमेचा शेवट झाला तर बरें; नाहीं तर पुढें पर्जन्यकाळीं चाळीस हजार फौज वऱ्हाड व नागपूरप्रांतीं छावणीस ठेवावी लागेल व आपणासही छावणीस रहावें लागेल. फौज सोडून परत पुण्यास आल्यास तिचा बंदोबस्त नीट रहाणार नाहीं. शिवाय मोंगलाची फौज परत जाण्यासाठीं निरोप मागत आहे ती गेल्यावर कदाचित् मोंगल व भोंसले एक होऊन मोठीच अडचण होईल. इतक्यांत भोंसल्याचा तह उरकला तर हिंदुस्थानची फौज आज वर्षभर तटून राहिली आहे तिचीही रवानगी करण्यास ठीक पडेल. याकरितां कांहीं आपल्या व कांहीं भोंसल्याच्या मनाप्रमाणें शर्ती ठरवून तह होतोसा पहावा. तसें न होईल तर मग सर्व कामें एकीकडे ठेवून भोंसल्याचें पुरतें पारिपत्य करणें आहेच. याप्रमाणें त्यांच्या मनांत विचार घोळत होते. जानोजी भोंसल्यांचीही तह करून घेण्याविषयीं उत्कट इच्छा होती. शत्रूशीं युद्धप्रसंग टाळून त्याच्या मुलखांत नासधूस करण्याची त्याची मसलत आतांपर्यंत तरी चांगलीच साधली होती व आपल्या पंधरा हजार फौजेच्या जोरावर पाठलाग करणाऱ्या शत्रूच्या पन्नास हजार फौजेस

मार्च.

धांवतां धांवतां बेजार केल्याचें यश त्यास प्राप्त झालें होतें हें खरें, तथापि पेशव्यांनीं वऱ्हाडांत अंमल बसविला व ते आतां नागपूर प्रांतही घेतल्याशिवाय सोडणार नाहींत. तसें झाल्यास सर्व राज्य शत्रूंच्या हातीं गेल्यामुळें आपणास देशांतर करावें लागेल, या गोष्टी जानोजीस समजत नव्हत्यासें नाहीं. त्यांतून त्यास विशेष भय वाटण्याचें कारण असें झालें होतें कीं, आपला भाऊ मुधोजी यास पेशव्यांनीं फितविल्याची पक्की बातमी त्यास नुकतीच कळली होती. त्यामुळें आतां तह करून घेण्याविषयीं तो फार आतुर होऊन देवाजीपंताच्या विद्यमानें त्याचा पेशव्यांशीं तह ठरला. त्यांतील मुख्य कलमें :—

१ जानोजीस पेशव्यांनीं सन १७६३ सालीं बत्तीस लक्षांची जहागीर दिली होती व तीपैकीं सन १७६६ च्या स्वारींत चौवीस लक्षांची परत घेतली होती. आतां आठ लक्षांची राहिली होती तीही त्यानें पेशव्यांस परत द्यावी.

२ अक्कलकोटकर भोंसले शहाजीराजे यांची कांहीं उत्पन्नें व हक्क वऱ्हाडप्रांतीं होते ते जानोजीनें जप्त केले आहेत त्यांवरची जप्ती उठवावी.

३ पेशवाई मुलखापैकीं औरंगाबाद सुभ्यांत भोंसले आजपर्यंत परभारें घांसदाण्याचा ऐवज घेत असत तो त्यांनीं आतां असा घेऊं नये. त्याचप्रमाणें इतर सुभ्यांत किंवा मोंगलाच्या राज्यांतदेखील फौज पाठवून घांसदाणा घेऊं नये. पेशव्यांचे त्या त्या तालुक्यांचे अंमलदार असतील त्यांस सरकारांतून वेळोवेळीं भोंसल्याचा ऐवज देण्याबद्दल ताकिदी होत जातील व त्याप्रमाणें ते ऐवज देतील. मोंगलांकडून याचप्रमाणें सामोपचारानें ऐवज मिळेल. तसा तो न मिळाल्यास मात्र मग भोंसल्यांनीं जबरदस्तीनें मोंगलाच्या मुलखांतून घ्यावा

४ पेशवे सरकारांतून बोलावणें येईल त्या त्या वेळीं भोंसल्यांनीं फौजेसह चाकरीस हजर व्हावें.

५ पेशव्यांच्या आज्ञेखेरीज भोंसल्यानीं आपली फौज वाढवूं नये व कमीही करूं नये.

६ पेशव्यांच्या राज्यापैकीं बखेडेखोर व फंदफितूर करणारे लोक अस-

तील त्यांस भोंसल्यांनीं आसरा देऊं नये.

७ दिल्लीचा बादशहा, औंधचा नबाब, रोहिले, इंग्रज व मोंगल यांपैकीं कोणाशींही पेशव्यांच्या परवानगीशिवाय भोंसल्यांनीं सख्य करूं नये.

८ भोंसले यानीं पेशव्यांस दरसाल पांच लक्ष रुपये खंडणी पांच हप्त्यांनीं देत जावी.

९ हिंदुस्थानप्रांतीं पेशवे सरकारची फौज जावयाची असेल तेव्हां ती मुद्दाम भोंसल्यांच्या मुलखांतून नवीन वाट पाडून जाणार नाहीं. जुन्या मार्गानें जात जाईल.

१० जानोजी आपल्या भाऊबंदांचें जेथपर्यंत यथास्थित चालवीत जाईल तेथपर्यंत पेशव्यांनीं त्याच्या घरखटल्यांत पडूं नये.

११ भोंसल्याच्या ओडीसा प्रांतात कलकत्तेकर इंग्रज उपद्रव देत असतात. त्यांजवर स्वारी करण्याकरितां भोंसल्यास फौज पाठवावयाची झाल्यास पेशव्यास विचारून त्यांस फौजेची जरूरी नसेल तेव्हां पाठवावी.

१२ भोंसल्यावर कांहीं परचक्र आल्यास पेशव्यांनीं त्यांच्या मदतीस फौज पाठवावी.

स. १७५३ सालीं मिळालेल्या जहागिरीपैकीं आठ लक्षांची जहागीर अजून आमच्या ताब्यांत आहे, ती तुमची तुम्हांस परत देतों, शिवाय पंधरा लक्ष रुपये स्वारी खर्च देतों, असें जानोजी स्वारीच्या प्रारंभीं म्हणत होता. परंतु तें त्याचें म्हणणें अमान्य करून पेशव्यांनीं त्याजवर ही प्रचंड मोहीम केली, परंतु शेवटीं तह ठरला त्यांत भोंसल्याकडून स्वारी खर्चाबद्दल फुटकी कवडीसुद्धां न मिळतां ,जहागीर परत मिळाली. एवढ्यावरच पेशव्यांस अखेरीस संतोष मानावा लागला! उत्तर हिंदुस्थानांत फौज पाठविण्याची अत्यंत निकड असल्यामुळेंच त्यांस हा तह निरुपायानें कबूल करावा लागला. असो. तहाचा ठराव झाल्यावर भोंसले व पेशवे यांच्या भेटी होण्याचें ठरलें. नंतर पेशव्यांची स्वारी आवढें नागनाथास जाऊन तेथें देवदर्शन करून वाशीम येथें गेली. त्याच मुक्कामीं हिंदुस्थानच्या फौजेची रवानगी झाली. त्या स्वारींत कांहीं फौज पेशव्यांची असून बाकी शिंदे, होळकर, विंचूरकर, नारो शंकर व वोढेकर या सरदारांच

एप्रिल–मे

होती. स्वारीवर मुख्य सरदारांच्या जागीं रामचंद्र गणेश याची योजना झाली व विसाजी कृष्ण बिनीवाले यास रामचंद्र गणेश याचा कारभारी नेमून स्वारीबरोबर श्रीमंतांनीं पाठविलें. भोसल्यास आणण्याकरितां देवाजीपंत गेलाच होता, म्हणून श्रीमंतांनीं आपणाकडून म्हणून गोविंद शिवराम खासगीवाले यास पाठविलें. नंतर भोसले येऊन भेटी झाल्या व उभयपक्षीं यथायोग्य मान सन्मान होऊन श्रीमंतांची स्वारी परत फिरली. पक्का तहनामा भीमातीरीं ब्रह्मेश्वरानजीक कनकापूर येथें झाला. वाटेनें फौजेस निरोप देत देत श्रीमंत ज्येष्ठ शुद्धांत पुण्यास आले.

दादासाहेबांचा फितूर उघडकीस येऊन नानाफडणिसानें फितुरी लोकांस कैद केलें व दादासाहेबांवर सक्त पहारे ठेविले, त्या योगानें ते रुष्ट होऊन उपास करूं लागले व कांहीं दिवसांनीं जेऊंही लागले हें मागें सांगितलेंच आहे. आतां पेशव्यांची स्वारी पुण्यास आल्यावर त्यांनीं पुनः उपवास सुरू केले. या खेपेस प्राण देण्याचा त्यांचा निश्चय बराच दृढ होतासें दिसतें. या रीतीनें त्रागा करण्याचें भय दाखवून पेशव्यांपासून त्यांस काय काय प्राप्त करून घ्यावयाचें होतें व त्यांस या कामीं कितपत यश आलें याची हकीकत मोरो बल्लाळानें एक दोन पत्रांत गोपाळरावास लिहून कळविली आहे तिचाच उतारा आम्हीं येथें देतों.—

"आम्हीं पुण्यास पोंचल्यावर पत्रें पाठविलींच आहेत. तीं पावोन सविस्तर मजकूर कळलाच असेल. अलीकडील वर्तमान तर श्रीमंत राजश्री दादासाहेब तसेच उपास करितात. आज दहा दिवस झाले. परवां जीव घाबरा झाला होता. तोड कोणे गोष्टीची निघत नाहीं. (पेशवे यांनीं) राजश्री बाबूजी नाईक यांस पत्रें पाठवून आणविलें. तेही येऊन चार दिवस झाले. नाईकही बहुत प्रकारें सांगत होते परंतु (दादासाहेबांनीं) मान्य केलें नाहीं. एखादे दिवशीं साखरपाणी व एखादी खारीक खातात. आज दोन दिवस फारच घोळ पडला आहे. शेवट दोन रदबदल्या मात्र आहेत जे, "मुलास (दत्तक घेतला आहे त्यास) पुण्यास आणावें, ही गोष्ट नाहीं तरी त्यास दोन लक्षांची जहागीर व एक किल्ला द्यावा. आपणास

पांच लक्ष रुपये द्यावे. त्या पैकीं गाडदी व राऊत वगैरे नेमणुकी खर्च तीन लक्ष रुपये कमकसर होईल तो होईल. राहील तो द्यावा. त्याचा दान धर्म करूं." असें [दादासाहेब] म्हणतात. श्रीमंतांकडूनही जाबसाल होतात जे, " आपणास किल्ले व जहागीर नेमून दिली होती ते वेळेस दानधर्म करीत होतां ते कागदपत्र आहेतच. त्या अन्वयें ऐवज नेमून देऊं. आम्ही कर्जदार आहों ! इतका ऐवज कोठून द्यावा ! " त्यास दादासाहेब म्हणतात जे, " ते समयीं आम्ही धर्म कसाही करीत होतों. त्याचा दाखला

जून. } आतां कशास पाहिजे ! ते समयीं आम्ही कैदेंत कोठें होतों ! आतां कैदेंत आहों ! तुमच्या कर्जवामाशी व दौलतीच्या ओढी तोडींशीं आम्हांस गरज काय ! नाहीं तरी आम्ही उपास करितां करितांच मरों ! " असें म्हणतात. श्रीमंतांनीं साफ उत्तर केलें कीं, मुलास तो आणावयास अनुकूळच पडत नाहीं व जहागीरही द्यावयास अनुकूळ पडत नाहीं. तो मूल दुसऱ्या गोलास लाविला. त्याचें बोलूंच नये. असें म्हणतात. शेवटीं ठरतां पांच लक्ष रुपये दरसाल राऊत गाडदी वगैरे चौकीचे खर्च वजा होऊन दीड लक्ष अथवा दोन लक्ष राहतील ते दानधर्मास द्यावे असें ठरोन गुंता उरकेसा दिसतो. "

" श्रीमंत राजश्री दादासाहेब काल सायंकाळीं जेवले. ' दोन लक्ष रुपये धर्मादाय करावा. मूल आणून वडगांवीं ठेवावा. परवां फितव्याचे वेळेस जे धरिले ते सोडावे. ' येणेंप्रमाणें करार ठरून गुंता उरकला. "

## प्रकरण आठवें.

### हैदरअल्लीवर तिसरी स्वारी.

[ स. १७७० जाने.— स. १७७२ जुलै पर्यंत. ]

कर्नाटकांत हैदर व मोंगल यांची इंग्रज व अर्काटकर यांशीं लढाई

१ ' हैदरअल्लीवर तिसरी स्वारी ' ही प्रस्तावना ऐ. ले. सं. भाग तिसरा पृ. १३७१–१४०४ आणि भाग चवथा पृ० १६२९–१६६२ यांवर दोन निरनिराळ्या भागांत छापविलेली आम्ही येथें एकत्र छापिली आहे.

चालली असतां, इंग्रजांनीं मोंगलास पैका देऊन त्याची समजूत करून त्यास परत आपल्या देशास लावून दिलें हें मागें सांगितलेंच आहे. मोंगल गेल्यावर इंग्रज व अर्काटकर यांशीं लढण्याचा सर्व बोजा एकट्या हैदराच्या शिरावर पडला. त्या प्रसंगीं इंग्रजांस साहजिकच वाटलें कीं, जेव्हां मोंगल व हैदर एक होते तेव्हां देखील आपण अनेक वेळां त्यांचा पराजय करून त्यांच्या फौजेची दाणादाण केली आहे. आतां तर हा एकटा सांपडला, त्या अर्थी याचें उत्तम रीतीनें पारिपत्य करून यापासून खूब पैका व मुलूख काढून घेण्याची ही खाशी संधी आपणास मिळाली आहे. पण अद्यापि हैदर हा कोणच्या तऱ्हेचा मनुष्य आहे हें त्यांस माहीत नव्हतें! तो इंग्रजास असा एकाएकीं हारीं जाणारा मनुष्य नव्हता! मोंगल फुटून गेल्यावर त्यानें इंग्रजांस सांगितलें कीं, मी तुम्हांस दहा लक्ष रुपये व बारा महाल हा प्रांत देतों. तेवढ्यावर संतुष्ट होऊन तुम्हीं परत जावें हें चांगलें परंतु त्यांस अतोनात पैका व मुलूख मिळविण्याची हांव सुटलेली असल्यामुळें त्यांनीं हें सामोपचाराचें बोलणें अर्थातच ऐकिलें नाहीं! मग उभयपक्षीं पुनः जारीनें लढाई सुरू झाली. हैदर हा विलक्षण अकलेचा सेनापति होता. त्याची लढण्याची तऱ्हा एकच होती असें नाहीं. पायदळ व तोफा या बाबतींत त्यापेक्षां इंग्रज किती तरी पटीनें श्रेष्ठ होते. त्यामुळें पूर्वच्या प्रसंगीं हीं दोन्हीं साधनें मागें ठेवून त्यानें गनिमी काव्यानें इंग्रजांस जेर करण्याची सुरवात केली. ही विद्या तो मराठ्यांपाशीं शिकला होता व त्यानें या मोहिमेंत मुद्दाम दहा बारा हजार मराठे स्वार चाकरीस ठेविले होते. यामुळें एकीकडून इंग्रजांनीं हैदराचे किल्ले घेत पुढें जावें तों दुसरीकडून त्यानें त्यांच्या व अर्काटवाल्याच्या मुलखांत शिरून लुटालूट व जाळपोळ करावी व इंग्रजांनीं घेतलेले किल्ले पुनः हिसकून घ्यावे असें होऊं लागलें. ही स्थिति पाहून हैदराचा घांटाखालीं मुलुख होता तो काबीज करण्याचा नाद सोडून इंग्रजांनीं त्याच्या राजधानीवर चालून जाण्याचा बेत केला व पुष्कळशी फौज गोळा करून ते चंद्रगिरीचा घांट चढून कर्नाटक बालेघांट प्रांतीं येऊन दाखल झाले व गुत्तीस मुरारराव घोरपडे रहात होता त्यास आपणास येऊन सामील होण्याविषयीं आग्रहानें निरोप पाठविला.

त्याचें व हैदराचें हाडवैर असल्यामुळें तो निवडक सहा हजार स्वार व कांहीं गारदी बरोबर घेऊन इंग्रजांकडे आला. इंग्रजांच्या पाठोपाठ हैदरही घांट चढून वर आला होता व त्याची फौज इंग्रजांच्या छावणीपासून दूर नव्हती. मुराररावें शत्रूकडे गेल्याचें वर्तमान ऐकून त्यास अत्यंत क्रोध आला व तो मुराररावावर छापा घालून त्याचा समूळ नाश करण्याची संधी पहात टपत बसला. ती संधी त्यास लवकरच मिळाली तो प्रकार असाः—

होसकोटें या ठाण्याच्या तटबंदीच्या आश्रयानें इंग्रजांनीं तळ दिला होता व तेथून कोसाच्या अंतरावर उघड्या मैदानांत मुरारराव उतरला होता. हैदर समीप आल्याची बातमी येतांच इंग्रजांनीं मुराररावास सांगून पाठविलें कीं, या काळोखी रात्री असून तुम्हीं दूर उतरलां आहां हें ठीक नाहीं. तुम्हीं आम्हांप्रमाणेंच तटबंदीच्या आसऱ्यास आम्हांशे-जारीं येऊन उतरावें. समजा कीं, हैदरानें काळोखांतून येऊन तुम्हांवर छापा घातला तर तुमची काय गत होईल! यावर त्यानें उलट निरोप धाडिला कीं, माझी काळजी तुम्हीं करूं नका. त्या नाइकाचा समाचार घेण्यास मी पुरा खबरदार आहे. येऊंद्या तर त्याचा छापा, म्हणजे पहा कशी मजा करितों ती! याप्रमाणें आपल्या मित्रांस बेपर्वाईचें उत्तर दिल्यासारखें सावधपणानें आपला बंदोबस्त राखून रहावें त्याप्रमाणें तो राहिला नाहीं आणि एका रात्रीं खरोखरच हैदराचा छापा आला. छापा घालणारी फौज सारी घोडेस्वारांचीच होती. घोरपड्याचें लष्कर इतकें बेसावध होतें कीं, शत्रू आंत शिरून दोन अडीचशें माणसें मारून खुद्द मुराररावाच्या तंबूंत शिरतपर्यंत कोणास छापा आल्याची बातमी देखील नाहीं! शत्रू आपल्या तंबूंत शिरलेले पाहून मुरारराव व त्याच्या घरची शिवराव व मालोजीराव-व खंडेराव वगैरे घोरपडे मंडळी व इतर कित्येक विश्वासू शिपाई तेथें होते त्यांनीं मारामार करून शत्रूंपैकीं पुष्कळांची कत्तल केली व बाकीच्यांस बाहेर पिटून लाविलें. या झटापटींत कित्येक वेळपर्यंत स्वतः तरवार चालवून निव्वळ अंगच्या शौर्यावर मुरार-रावानें आपला जीव बचाविला. तथापि त्यास दोन जखमा लागल्याच. याप्रमाणें जिवावर बेतलेलें अरिष्ट निवारल्यानंतर तो चौकशी करूं लागला

तेव्हां त्यास असें कळलें कीं, शत्रूचे घोडेस्वार आतां सर्व छावणीभर पसरले असून ते आपल्या लोकांची कत्तल करीत आहेत, आपले लोक पळून जाण्याच्या विचारानें घोड्यांवर सामान घालावयास लागले आहेत, व बहुतेक गोट शत्रूच्या हातीं लागल्यासारखाच झाला आहे. ही बातमी ऐकून इतर कोणी किती धैर्याचा मनुष्य असता तरी त्याची गाळण झाली असती. पण तो वृद्ध व शूर सेनापति मुरारराव बिलकुल डगमगला नाहीं. छापा घालणारी फौज फक्त घोडेस्वारांची आहे हें ऐकतांच त्यानें आपल्या लष्करांत जो एक सक्तीचा हुकूम फिरविला त्यावरून त्याची समयसूचकता उत्तम रीतीनें दिसून येत्ये. तो हुकूम असा होता कीं, 'आपल्या लोकांपैकीं कोणीही स्वार न होतां आपापल्या घोड्याआड उभें राहून जो जो कोणी घोड्यावर बसलेला दृष्टीस पडेल तो तो शत्रूचा मनुष्य असें समजून त्यास बेलाशक मारून टाकीत जावें! त्या काळोख्या रात्रीस आपला जीव बचावून शत्रूस बिनचूक मारितां यावें म्हणून योजिलेली ही युक्ति फारच पसंत होती, व ती अमलांत येऊं लागतांच छापा घालावयास आलेले स्वार पळून जाऊं लागले. पण ते त्या चक्रव्यूहांतून चटपणें बाहेर पडणार कसे! तें अव्यवस्थितपणानें उतरलेलें मराठी लष्कर. त्यांच्या तोफांचे गाडे, बैलांच्या माळा, उंटें, घोडीं, हत्ती, धान्याच्या गोण्या वगैरे सामान सर्व अव्यवस्थित रीतीनें पसरलेलें असून त्यांतूनच अरुंद व आडव्या तिडव्या गल्ल्या राखिलेल्या होत्या व त्याही काळोखांत लवकर सांपडेनात! त्यांतून बाहेर निघतां निघतां हजारों लोक मारिले गेले. गोटाबाहेर पडल्यावर सुद्धां मुराररावाचा पाठलाग कांहीं वेळ सुरूच होता, त्यामुळें आणखी लोक मेले. याप्रमाणें या छाप्याचा शेवट झाला.

यानंतर इंग्रजांच्या व हैदराच्या पुष्कळ लढाया झाल्या. कांहीं किल्ले एकमेकांचे एकमेकांनीं घेतले. हैदर इंग्रजांस आटपेना व तेही अभिमानास पडून त्याचा पिच्छा सोडीनात! शेवटीं लष्कराचें अवजड सामान, बुनगें, तोफा व पायदळ हैसूरच्या हद्दींत पाठवून व समोर लढत असलेल्या इंग्रजांस हुलकावणी देऊन निवडक सहा हजार स्वारां-

निशीं हैदर जो तेथून निघटला तो लांबलांब मजला मारून अकस्मात् मद्रासेजवळ येऊन ठेपला. त्याची स्वारी अशी अचानक आलेली पाहून तेथील गव्हर्नर व कौन्सिलर यांची लेघा उडाली व त्यांनीं लागलाच तह ठरविला. त्यात इतकेंच ठरलें कीं, कोणी कोणास कांहीं देऊं घेऊं नये. आपापला मुलूख सांभाळून सलोख्यानें रहावें व परचक्र येईल तेव्हां एकमेकांनीं एकमेकांस कुमक द्यावी.

यामप्रमाणें इंग्रजांच्या वेधांतून मुक्त झाल्याबरोबर हैदरानें आपलें राज्य वाढविण्याचा पुनः उपक्रम आरंभिला. गेल्या वर्षी मोंगलास अठरा लक्ष रुपये देऊन त्याचीं कडपें व कर्नूळ हीं संस्थानें आपल्या ताबेदारीत रहावींत असा मोंगलापाशून करार करून घेतला होता. यंदा त्यानें या संस्थानावर जबर खंडणी बसविली. गतवर्षी मोंगलाशीं तह करणें जेव्हां त्यास अत्यंत आवश्यक होतें, तेव्हां रामचंद्रराव जाधव व कर्नूळकर नबाब यांस मध्यस्थीस घातलें होतें. त्या मध्यस्थांनीं आपल्या कामगिरीबद्दल त्याजजवळ दोन लाख रुपये मागितले, तेही त्यानें प्रसंग जाणून दिले होते. परंतु 'मोंगलाशीं तुम्ही आमचा तह करून दिला त्याच्या शर्ती त्याजकडून पुऱ्या झाल्या नाहींत' असें निमित्त करून त्यानें बिचाऱ्या कर्नूळकर नबाबापासून यंदा ते रुपये सव्याज वसूल केलें !

'हैदरअल्लीवरच्या दुसऱ्या स्वारी'त मीररेझा पेशव्यांस शरण आल्यामुळें त्यास त्यांनीं आपल्या नोकरीस ठेवून घेऊन गुरमकोंडाप्रांत जहागीर दिला होता हें मागें सांगितलेंच आहे. अलीकडे तो मीर मराठ्यांस सोडून पुनः आपला मेहुणा हैदर यास मिळाला. त्यामुळें त्यास जहागीर दिलेला गुरमकोंडाप्रांत जप्त करण्यासाठीं बाळापूरचा सुभेदार महिमाजी शिंदे तिकडे गेला होता त्यावर मीररेझानें छापा घालून त्याची अर्धी फौज मारून त्यास पिटून लाविलें.

मुरारराववर हैदराचा पूर्वीपासून दंश होताच. यांत अलीकडे हैदराच्या प्रत्येक शत्रूस तो कुमक करीत असल्यामुळें त्याचा शेजार त्यास अगदीं असह्य झाला होता. सामोपचारानें बोलून एक त्यास आपला ताबेदार तरी करावें, तसें न होईल तर त्याचा समूळ नाश

स. १७६९ आक्टोबर.

करावा, असा त्यानें निश्चय करून त्याच्या मुलखावर स्वारी केली व त्याचीं बहुतेक ठाणीं घेऊन त्यास निरोप पाठविला कीं, तूं बऱ्या गोष्टीनें मला भेटावयास येऊन माझा तावा कबूल करिशील तर तुझें माझें सख्य होईल. भेटीस न येशील तर तुझें राज्य बुडविण्यासाठीं मी आलोंच आहे! मुराररावानें विचार पाहिला कीं, पेशवे राहिले पुण्यास. इंग्रज तर मद्रासेस निघून गेले. आपणास कुमक करणारे दूर आहेत, परंतु आपला कट्टा दुस्मान दाराशीं येऊन उभा राहिला आहे. गुत्तीचा किल्ला झुजून चार सहा महिने कालक्षेप करावा तर किल्ल्यांत पाण्याची कमताई. या सर्व अडचणी मनांत आणून त्यानें निश्चय केला कीं, शत्रूस भेटून बाह्यात्कारें त्याचा तावा पतकरून कशी तरी वेळ मारून न्यावी हा उत्तम पक्ष होय. मुराररावावर असा प्रसंग गुदरला असतां तो पुढें कसा काय वागतो इकडे पटवर्धनांचें लक्ष लागलें होतें. त्यांनीं त्यास गुत्तीस न राहण्याविषयीं बोध केला असूनही हट्टानें तो तेथें राहिला होता. आतां तो हैदराच्या भेटीस जाणार हें ऐकतांच त्याच्या सुरक्षितपणाविषयीं त्यांची निराशा झाली. भेटीच्या निमित्तानें बोलावून नेऊन त्यास कैद करण्याचा हैदराचा बेत असला पाहिजे असेंच सर्वांस वाटूं लागलें. गोपाळराव पटवर्धन एका पत्रांत लिहितो कीं, "मुरारराव भेटीस गेल्यावर हैदरखान त्यांस कैद करितो, अगर तूर्त न कैद करी तरी बराबर घेऊन जातो, यांत संदेह नाहीं. लक्ष वांस्यानीं कैद करील आणि त्यांची ठाणींठुणीं घेईल. कैद न करी तरी हैदराएवढा प्रामाणिक व मूर्ख कोणीच नाहीं! राजश्री मुरारराव यांस चारपांच पत्रीं लिहिलें कीं, गुत्तीस न राहणें. राहिले. आणि आतां भेटीस जातात! या एवढा मूर्ख त्रैलोक्यांत नाहीं! भेटीस जाऊन परत आले तरी याजसारिखा अदृष्टवान् कोणी नाहीं!" परंतु मुरारराव हैदराच्या भेटीस गेला तेव्हां त्यानें त्यास कैद केलें नाहीं इतकेंच नाहीं; तर उलट त्याचा मोठा सन्मान केला! मेजवानीबद्दल त्यानें मुराररावास पंचवीस हजार रुपये दिले, तीन हत्ती, शिरपेंच, मोत्यांची कंठी, व वस्त्रें देऊन दरसाल फक्त पन्नास हजार रुपये खंडणी त्यापासून घेण्याचा करार करून त्यास निरोप दिला. मुराररावानें आपला बक्षी हनिसखान व पुतण्या शिवराव घोरपडे यांजबरोबर कांहीं फौज आ-

पल्या स्वारीबरोबर पाठवावी असा प्रथम त्याचा आग्रह होता, तोही त्यानें सोडून देऊन मुराररावास सुखरूपपणें परत जाऊं दिलें.

इंग्रजांशीं जेथपर्यंत लढाई चालली होती तेथपर्यंत हैदरानें मराठ्यांच्या मुलुखास उपद्रव दिला नाहीं. तींतून मोकळीक झाल्याबरोबर त्याच्या मनांत आलें कीं, दोन वर्षांपूर्वी पेशव्यांनीं आपणापासून शिरें, मदागिरि, बाळापुर वगैरे जितका मुलूख घेतला आहे तितका सर्व परत हिसकून घ्यावा. भोंसल्यावरच्या दुसऱ्या स्वारींत त्यावेळीं पेशवे गुंतले होते. त्यांस जर तिकडे कांहीं अधिक दिवस लागते तर तो आपला मनोरथ सिद्धीस न्यावयास चुकताना. परंतु ती स्वारी संपवून ते परत पुण्यास आल्याचें ऐकून त्यानें तो नाद सोडिला. तथापि पेशव्यांस चीड येईल अशा तऱ्हेचें त्याचें वर्तन सुरूच होतें. कर्नाटकचीं संस्थानें पेशव्यांच्या ताब्यांत होतीं व त्यांस हैदरानें उपद्रव देऊं नये असें पूर्वीच्या तहांत ठरलें होतें. तथापि तें न जुमानतां यंदां त्यानें चित्रदुर्ग व हरपनहळ्ळी या व दुसऱ्या किरकोळ संस्थानांपासून जबरदस्तीनें खंडणी घेतली. नंतर प्रचंड सैन्य जमा करून तो हरिहर तालुक्यांत आला. तेथें पेशव्यांचा मामलेदार लक्ष्मण हरि लागू नांवाचा होता. त्यास त्यानें सांगून पाठविलें कीं, तूं बऱ्या बोलानें माझ्या भेटीस ये. नाहीं तर हरिहरास तोफा लावितों. तेव्हां निरुपायानें तो मामलेदार भेटीस गेला. त्याचा त्यानें चांगला सन्मान करून जवाहीर व पोशाख देऊन त्यास परत हरिहरास लावून दिलें. नंतर हैदराची स्वारी तुंगभद्रा उतरून अलीकडे सावनूरच्या नबाबाच्या मुलखांत येऊन उतरली.

वर सांगितल्याप्रमाणें त्याची धामधूम इकडे कर्नाटकांत सुरू होती व तिकडे पुण्यांत त्याचे वकील आपाजीराम व रेजा अलीखान तहाप्रकरणीं पेशव्यांच्या दरबारांत बोलतच होते! श्रीमंतांनीं त्यांस एकदांच सांगितलें कीं, सन १७६८।६९।७० या तीन सालांबद्दल चाळीस लाख रुपये खंडणी द्यावी, चित्रदुर्ग वगैरे संस्थानांपासून काय खंडणी घेतली असेल ती परत द्यावी, मीर रेजास आम्हीं गुरमकोंडा प्रांत जहागीर दिला असून हल्लीं तो तुम्ही ताब्यांत घेतला आहे तो आमचा आम्हांस परत द्यावा, व

आमचा चाकर मीर रेजा तुम्हांकडे पळून गेला आहे त्यास आणून हवालीं करावें. हीं चार कलमें श्रीमंतांच्या बोलण्यांत होतीं तीं योग्य होतीं हें कोणीही कबूल करील. पण यापैकीं पहिल्या म्हणजे खंडणीच्या रकमेखेरीज कोणचीच गोष्ट हैदर कबूल करीना, व खंडणीबद्दलही जाबसाल सांगूं लागला कीं, दहा लक्षांची सावकारी निशा तूर्त करून देतों. सोळा लक्षांच्या फेडीबद्दल रेजा अल्लीखानास ओलीस ठेवितों. बाकी चौदा लक्ष राहतात ते पेस्तर सालीं देऊं. मिळून सारें लबाडीचें व उडवाउडवीचें बोलणें ! असला प्रकार पेशव्यांच्या तापट स्वभावास बिलकुल खपणारा नव्हता. त्यांनीं तहाचें जमत नाहीं असें सांगून हैदराच्या वकिलास निरोप दिला व त्यावर ही ' तिसरी स्वारी ' करण्याच्या तयारीस ते लागले.

हैदराच्या हालचालीकडे पावसाळ्याच्या सुरवातीपासून श्रीमंतांचें विशेष लक्ष्य होतें व त्यानें तिकडे धामधूम करण्याची सुरवात केलेली पाहून त्यांनीं गोपाळरावास सूचना दिली कीं, मिरजेस फौज जमा करण्याचें तुम्हीं खूब अवडंबर माजवावें. पुण्यापेक्षां कर्नाटकास मिरज जवळ असल्यामुळें तेथें फौज जमत असल्याचें वर्तमान ऐकून हैदरास दहशत पडेल. परंतु यानंतर लवकरच तो जेव्हां तुंगभद्रेकडे येत असल्याचें वर्तमान आलें तेव्हां आतां नुसतें अवडंबर माजविण्यापेक्षां खरोखरीची तयारी करणें जरूर आहे हें श्रीमंतांस पक्कें कळलें व त्यांच्या हुकमावरून मिरज व अथणी येथें पटवर्धन व रास्ते यांची ताबडतोब सैन्याची सिद्धता झाली व पुण्यासही स्वारीची तयारी जारीनें होऊं लागली. गोपाळराव पटवर्धन व आनंदराव रास्ते आश्विनमासींच कूच करून दक्षिणेकडे चालले. हैदर हरिहरास आला तेव्हां हे दोघे सरदार नरगुंदाजवळ होते. तो तुंगभद्रा उतरून सावनुरापासून वीस कोसांवर येऊन उतरला तेव्हां हेही गदग परगण्यांत येऊन सावनुरच्या पूर्वेस दहा कोसांवर मुळगुंद येथें तळ देऊन राहिले. परंतु त्यांस न जुमानतां त्यानें सावनुरच्या नबाबास सांगून पाठविलें कीं, खंडणीचा जाबसाल ठरविण्याकरितां तुमचा दिवाण खंडेराव किंवा स्वतः तुम्हीं आमच्या लष्करांत येऊन हजर व्हावें. नाहीं तर ' मजा राहणार नाहीं ' ! इतक्यांत इकडून गोपाळरावाकडूनही निरोप गेला कीं, पूर्वी हैदरअल्लीनें तुमचें सर्व राज्य

काबीज केलें असतां श्रीमंतांनीं तें पराक्रमानें जिंकून पुनः तुमच्या हवालीं केलें. सांप्रतही तुमची कुमक करण्यासाठीं त्यांनीं आम्हांस पाठविलें आहे. तुम्ही हैदरास खंडणी द्याल किंवा त्याकडे आपला कोणी मनुष्य पाठवाल तर श्रीमंतांचा तुम्हांवर राग होईल. त्यांचें तुम्हांस भय वाटत असेल तर आम्हीं सावनुराजवळ येऊन उतरतों. एखादा परगणा त्यानें लुटिला तरी चिंता नाहीं. त्यानें कांहीं ठाणीं घेतलीं तरी तीं आम्हीं जिंकून पुनः तुम्हांस देऊं. परंतु तुम्हीं त्यांस खंडणी देतां कामा नये. याप्रमाणें दोहोंकडून दोन निरोप आल्यामुळें त्या नवाबास मोठी पंचाईत पडली. एकीकडे हैदरअली दहा हजार स्वार, पंधरा हजार गारदी दहा हजार प्यादे, चार हजार कामाठी, शंभर तोफा व सवाशें हत्तीं याप्रमाणें जबरदस्त सेना घेऊन आलेला होता व दुसरीकडे गोपाळराव दहा हजार स्वार घेऊन दहा कोसांवर आला होता व बाकीची मराठ्यांची फौज पुण्यास व अन्यत्र जमली असून स्वारीस निघण्याच्या तयारींत होती. एक सक्तीनें खंडणी मागतो तर दुसरा ती देऊं नको म्हणतो! दोघांचाही क्रोध कठिणच! परंतु तूर्तच्या प्रसंगीं त्यास हैदराचे बळ अधिक दिसल्यामुळें त्याचा क्रोध अधिक भयंकर वाटला व खंडेराव दिवाणास त्यानें त्याच्या लष्करास पाठवून दिलें व इकडे गोपाळरावास निरोप पाठविला कीं, हैदराचें आम्हांशीं सध्या खंडणीसंबंधें बोलणें नाहीं. तो इतकेंच म्हणत आहे कीं, 'तुम्हीं खंडेरावास माझ्या * भेटीस पाठवाल तर मी तुमच्या मुलखास बिलकुल उपद्रव न देतां माघारा जाईन.' असें जर तो म्हणत आहे तर उगीच लटका कलह वाढवून आपल्या मुलखाची नासाडी करून घ्यावी यांत काय हांशील आहे! असें समजून आम्हीं खंडेरावास तिकडे पाठविलें आहे. श्रीमंतांच्या इच्छेबाहेर आम्हांस वागावयाचें नाहीं. व आम्हीं हैदरास खंडणी देतही नाहीं. नवाबाचा हा निरोप लपंडावीचा होता. कारण कीं, खंडेरावाची सन्मानानें भेट झाल्यावर बलात्कारें तरी

नोव्हेंबर.

* भेटीस येणें हें कमीपणाचें व कांहीं अंशीं ताबेदारीचें लक्षण होय, व या करितांच वंदां मुरारराव घोरपडे, लक्ष्मणराव लगू व सावनूरकर नवाब यांस जबरदस्तीनें भेटीस आणून हैदरानें आंजकडून ताबेदारी कबूल करविली!

कांहीं एक अट न लावितां कबूल केल्याप्रमाणें हैदर तुंगभद्रा उतरून उड-गणी येथें गेला हें जरी खरें आहे, तथापि त्याच्या लष्करास सावनूरकरानीं गुप्तपणें चाळीस हजार होन पावते केल्याची पक्की बातमी मराठ्यांस थोड-केच दिवसांत कळली !

कर्नाटकच्या स्वारीस निघण्यापूर्वी पेशव्यांनीं दोन महत्वाच्या उलाढाली केल्या. त्यांत पहिली गायकवाडाची. मागें दोन वर्षांपूर्वी दमाजी गायक-वाड मरण पावला तेव्हां त्याची सरदारी गोविंदरावास दिली होती हें मागें लिहिलेंच आहे. हल्लीं गोविंदरावाचा दुसरा बंधु फत्तेसिंगराव हा पुण्यास येऊन सयाजीच्या तर्फे बोलूं लागला कीं, सरदारीचा हक्क दमाजीच्या थोरल्या बायकोचा पुत्र सयाजीराव यासच आहे. गोविंदराव हा सर्व बंधूंत थोरला खरा, पण तो धाकट्या बायकोचा असल्यामुळें त्यास हक्क नाहीं. याकरितां पूर्वी श्रीमंतांनीं गोविंदरावास सरदारीचीं वस्त्रें व जहागिरीची मालकी दिली आहे ती त्याजकडून काढून सयाजीस द्यावी. रामशास्त्री न्या-याधीश यांचेंही मत याप्रमाणेंच होतें असें सांगतात. सरदारीचीं वस्त्रें घेतांना नजराणा व मागील खंडणीची बाकी म्हणून जी रकम गोविंदरावानें देऊं केली होती तिचा फडशा अद्यापि त्यानें केला नव्हता. ही रकम भरण्यास फतेसिंग तयार होता. शिवाय पेशव्यांकडे चार हजार स्वारांसह नेहमीं चाकरी करण्याचा गोविंदरावानें करार केला होता; परंतु तीही गोष्ट त्याच्या हातून प्रस्तुतच्या स्वारींत होण्यासारखी नव्हती. सदरहू फौज रायाजी हर-फळे नांवाच्या सरदाराबरोबर कर्नाटकच्या स्वारीस पाठविण्यास फत्ते-सिंगाची तयारी होती. या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन पेशव्यांनीं गोविंदरावा-कडून सरदारी काढिली. तथापि आपण केलेली गोष्ट सर्वतोपरी आपणच मोडावी हें त्यांच्या मनास अयोग्य वाटून त्यांनीं व्यवस्था केली कीं, 'सेना खासखेल' हें पद व सरदारीसंबंधें वडीलकीचा मान त्यांनीं गोविंदरावा-कडेच कायम ठेविला, व सयाजीस 'सेनाकर्ते' असें नवीन पद देऊन सरदारीची व जहागिरीची वहिवाट त्यानें व फत्तेसिंगानें एकचित्तानें करीत जावी असा ठराव केला. पेशव्यांस खंडणीची रकम व नजराणा देणें व चाकरीस पाठविण्याची फौज वगैरे ज्या गोष्टी गोविंदरावानें कबूल

केल्या होत्या त्याप्रमाणें वागण्याचें फत्तेसिंगानें कबूल केलें. ही एक उलाढाल झाली. दुसरी आरमाराची. आजपर्यंत आरमार धुळपांच्या घराण्याकडे होतें. परंतु अलीकडे ते आरमाराचा बंदोबस्त नीट ठेवीत नाहींत व समुद्रांत परकी लोकांचीं, गलबतें लुटिलीं जातात त्याचा पैका सरकारांत न देतां आपणच खातात अशा कागाळ्या श्रीमंतांच्या कानावर वारंवार जाऊं लागल्या, तेव्हां रावसाहेबांनीं धुळप यांजकडून आरमाराचा सुभा काढून तो मोत्याजीराव विचारे याजकडे दिला.

या सुमारास रावसाहेबांच्या जिवावर एक अरिष्ट आलें होतें तें सुदैवानें टळलें. तें असें कीं, आश्विन शुद्ध एकादशीच्या दिवशीं ते पर्वतीस देवदर्शनाकरितां गेले होते, तिकडून परत येतांना बरोबर गारदी होते त्यापैकीं एकानें एकाएकीं तरवार उपसून त्यांवर वार केला! तोंच त्यांनीं चटकन घोडी चमकावून एकीकडे घेतली यामुळें वार लागू झाला नाहीं. बरोबरच्या लोकांनीं त्या गाऱ्यास तत्काळ जमिनीवर पाडिलें व आतां ठार मारणार इतक्यांत मोरोबादादा फडनीस यानीं त्या गाऱ्यास सोडवून कैदेंत ठेविलें. परंतु त्यानें हें कृत्य कोणाच्या सांगण्यावरून केलें किंवा मायेफिरूपणामुळें स्वतःच केलें याचा कोठें उल्लेख आढळत नाहीं.

११ आक्टोबर.

आश्विन वद्यांत रावसाहेब डेरेदाखल झाले ते फौज जमा करण्यासाठीं वाटेनें थांबत थांबत मार्गशीर्ष शुद्ध नवमीस पंढरपुरास आले. तेथपर्यंत साबाजी भोंसले नागपुरकर व गायकवाड थोडथोड्या फौजेनिशीं त्यांस मिळाले होते. थोडीशी हुजरातही जमली होती. या सर्वांची संख्या सात हजारांच्या आतबाहेर होती. रावसाहेब पुण्याहून निघण्यापूर्वीं त्यांचे बंधु नारायणराव हे बाहेर निघाले होते, ते सांप्रत करजगी तालुक्यांत उमदी येथें होते. त्यांजवळही पांच हजार फौज जमली होती. रावसाहेब पंढरपुराहून निघाले तेव्हांपासून दररोज हजार पांचशें स्वार जमतां जमतां करजगी तालुक्यांत स्वारी येईपर्यंत एकंदर फौज वीस हजार जमली. या स्वारींत किती फौज गुंतली होती याविषयीं कागदोपत्रीं उल्लेख आढळतात ते—

| | |
|---|---|
| ८००० | तिन्ही पथकें मिळून पटवर्धन. |
| १००० | घायगुडे. |
| २००० | हरी गोपाळ. |
| २५०० | रास्ते आनंदराव. |
| १००० | भोंसले अक्कलकोटकर. |
| ५००० | भोंसले नागपूरकर. |
| १००० | शहाजी भानकर. |
| ५०० | गजेंद्रगडकर व नरगुंदकर. |
| ४००० | गायकवाड. |
| १५००० | हुजरात पागा व किरकोळ पथकें. |
| ४०००० | |

| | |
|---|---|
| १५००० | गारदी व प्यादे. |
| ३००० | सावनूरकर. |
| १५०० | कडपे व कर्नूळ येथील नवाब. |
| १००० | धारवाडचा सुभेदार व कित्तूरकर मिळून. |
| २००० | सदाशिव रामचंद्र वगैरे मागून आलेले. किरकोळ पथकें. |
| ३००० | चित्रदुर्गकर. |
| ४००० | मुराराव घोरपडे. |
| ८००० | मोंगलाकडून तहवारजंगाबरोबर. साल अखेरीस कुमकेस आलेली. |
| ३७५०० | |

याप्रमाणें या स्वारींत एका वेळीं पाऊण लक्ष फौज गुंतली होती. शिवाय सुमारें पन्नास तोफा होत्या. पैकीं खुद्द पेशव्यांबरोबर चाळीस हजार फौज असे व हैदरावर नजर राखण्याकरितां गोपाळरावाची नेमणूक झाली होती त्याबरोबर सुमारें पंधरा हजार असे. बाकीची मराठी मुलूख संभाळण्याकरितां टोळ्याटोळ्यांनीं जागोजाग वांटून दिलेली होती. हैदराची फौजही पाऊण लक्षावर होती. पैकीं पंधरापासून वीस हजारपर्यंत त्याच्या निरनिराळ्या किल्ल्यांत असून मीररेजा, टिपु सुलतान, मखदुमअली, व्यंकटराव बार्की वगैरे सरदारांबरोबर पंचवीस हजार असे ती टोळ्याटोळ्यांनीं फिरतीवर असे. बाकीची पस्तीसपासून चाळीस हजारापर्यंत खुद्द हैदराबरोबर असे. त्याजवळ कवाइती पायदळाचा भरणा मोठा

होता व तोफखानाही उत्तम होता, व एकंदर स्वार वीसपासून पंचवीस हजारपर्यंत असून त्यांत काहीं मराठे होते.

शिरहट्टी येथें गोपाळरावाचा तळ असतां पेशवे तुंगभद्रेवर येऊन पोंचले व त्यांनीं त्यास पुढें मसलत कशी काय करावी हें ठरविण्याकरितां बोलावून नेलें. मग त्याचें व इतर सरदारांचें मत घेऊन पेशव्यांनीं असें ठरविलें कीं, पायदळ व तोफखाना घेऊन हैदरखान जडें अनवडी व उडगणी या रानांत जेथपर्यंत बसला आहे तेथपर्यंत गोपाळरावानें त्याजपासून वीस कोसांच्या अंतरानें रहावें व तो सावनुराकडे येऊं लागेल तर त्यास प्रतिबंध करावा. तेथून त्यानें तळ हालविला तरी तो जिकडे जिकडे जाईल तिकडे तिकडे गोपाळरावानें त्याच्या पिछाडीस पंधरा वीस कोसांचे अंतरानें राहत असावें. बाकीचें सैन्य घेऊन श्रीमंतांनीं श्रीरंगपट्टणाकडे जावें. याप्रमाणें ठरल्यावर गोपाळराव परत आला व आपल्या फौजेचा तळ हालवुन सावनुरानजीक जाऊन उतरला. व श्रीमंतही तुंगभद्रा उतरून श्रीरंगपट्टणच्या रोखें चालले. वाटेनें जातां जातां बुधेहाळास मुक्काम पडला व तेच दिवशीं तें ठाणें काबीज झालें. आंत बाराशें प्यादें व दोनशें पठाण होते, परंतु तोफांचे पांच सात बार होतांच त्यांची हिंमत खचून गेली व त्यांनीं निमूटपणें ठाणें हवालीं केलें. हागलवाडी, हंदिकेरें, चिकनायकनहळ्ळी हीं ठाणीं विशेष श्रम न पडतां ताब्यांत आलीं. कंदिकिऱ्याच्या लोकांनीं ठाणें झुजविण्याचा रोख दाखविल्यामुळें मराठ्यांनीं तोफा लावून तटबंदी पाडून हल्ला केला व तें ठाणें लुटून फस्त केलें. चिकनायकनहळ्ळीपासुन एक लक्ष पसतीस हजार रुपये खंडणी घेण्याचा श्रीमंतांनीं ठराव केला व हंदिकिऱ्यापासूनही थोडा बहुत पैका घेतला. पुढें तुरवाकिरें हें ठाणें लागलें, तेंही काबीज करण्यांत आलें. त्यानंतर ते श्रीरंगपट्टणच्या रोखानें नागमंगलापर्यंत गेले. वाटेनें जातां जातां त्यांनीं पुष्कळ ठाणीं घेतलीं आणि त्यांपैकीं कांहीं आपणाकडे ठेवून बाकीचीं पाडून जमीनदोस्त केलीं. असें करण्याचें कारण असें कीं, पट्टण प्रांतीं ठाणीं फार; तीं सर्व राखावयाचीं तर त्यांत ठेवण्याकरितां गारदी पाहिजेत. श्रीमंतांजवळ सुमारें पंधरा गारदी होते हें मागें सांगितलेंच

स. १७७० जाने.

आहे. त्यांपैकीं कोठें दोनशें, तीनशें, पांचशें असे प्रत्येक ठाण्यांत ठेवतां ठेवतां आतां त्यांजवळ थोडेच शिलके राहिले होते व त्यांची स्वारीबरोबर नेहमीं राहण्याची अवश्यकता होतीच. यामुळें त्यांनीं कोठें आपले लोक व कोठें चित्रदुर्गकराकडील लोक ठाण्यांतून ठेविले होते व कोठें तर त्याच ठाण्यांतली जुनी हैदराची शिबंदी होती तिचेच लोक आपल्या चाकरीस ठेवून फक्त त्यांजवर पैरवी करण्यासाठीं थोडीं थोडीं मराठी माणसें ठेविलीं होतीं! ज्या ठाण्यांपासून थोडीबहुत खंडणी मिळाली त्यांचा बंदोबस्त श्रीमंतानीं याप्रमाणें केला. परंतु ज्यांपासून कांहीं मिळालें नाहीं किंवा जीं अफाट असल्यामुळें थोडक्या लोकांनीं राखतां येण्याजोगीं नव्हतीं, तीं त्यांनीं पाडून टाकिलीं.

नागमंगळ व बेळूर हीं दोन्हीं ठाणीं पुढें लवकरच हातीं आलीं. त्यांपैकीं नागमंगळ पाडून टाकून श्रीमंतांनीं बेळूर आपणाकडे ठेविलें व त्यांत दारूगोळा व धान्यसामग्री भरून शिबंदीचीही व्यवस्था उत्तम केली. हैदर जो एकदां मासूरच्या बारींत जाऊन दडून बसला तो कांहीं केल्या तोंडच बाहेर काढीना! आपल्या राज्याची त्यानें आशा सोडिल्यासारखें दिसत होतें. श्रीरंगपट्टण व बेंगरूळ या दोन किल्ल्यांचा मात्र त्यानें खूब भक्कम बंदोबस्त केला होता, तो इतका कीं, शत्रूचा वेढा पडला तर बारसहा महिनेपर्यंत देखील त्या किल्ल्यांचा सहज बचाव व्हावा. इतर किल्ल्यांचा त्यानें बंदोबस्त केला नव्हता असें नाहीं. पण वेळोवेळीं त्या किल्ल्यास कुमक पोंचविण्यास जर तो आसपास हजर राहता, तर मराठी फौजेचा जो लवकरच सर्व मुलूखभर सुळसुळाट माजला तो माजला ना व रावसाहेब पेशव्यास जसा जिकडे तिकडे जय येत गेला तसा येता ना. पण मुलखाच्या संरक्षणार्थ आपण मैदानात यावें तर मराठे घोडेस्वारांच्या तावडींत आपलीं पलटणें सांपडून त्यांचा समूळ नाश होईल ही त्यास भीति होती. इ. स. १७६४ पासून रावसाहेबांविषयीं त्यानें जी एकदां दहशत खाल्ली होती ती त्याची अद्यापि गेली नव्हती. यामुळें मराठ्यांच्या थोरल्या लष्करापासून पंचवीस तीस 'कोसांच्या' घेऱ्यांत फिरकण्याची सुद्धां त्यास छाती झाली नाहीं. अशी स्थिति होती तरी तो नम्र

झाला होता असा मुळींच प्रकार नाहीं. पावसाळा येईपर्यंत काय होईल तें होवो, तिकडे डोळेझांक करावयाची. त्यावेळीं मराठ्यांस परत गेलेंच पाहिजे ते गेले ह्मणजे गेलेला मुलूख आपण सहज परत घेऊं असें त्यास वाटत होतें, व अगदीं प्राण जाईपर्यंत होतां होईल तों मराठ्यांचें जूं मानेवर घ्यावयाचें नाहीं हा त्याचा हट्ट कायमच होता, व ही गोष्ट पेशव्यांच्याही लवकरच प्रत्ययास आली. हैदर कांहीं तहाविषयीं अजून तरी बोलणें करील अशी त्यांस आशा होती व त्याप्रमाणें तहाचें बोलणें झालेंही. पण त्याचा, सन १७६७ च्या स्वारींत मधून मधून जीं तहाचीं बोलणीं निघत होतीं त्यांप्रमाणेंच फार्स झाला! हैदर ह्मणे कीं, मी फक्त बारा लक्ष रुपये देईन व पेशवे ह्मणत कीं मी तुजपासून एक कोट रुपये घेईन! दोघांचेंही बोलणें अद्वातद्वाच होतें. हैदराची चिकाटी मोठी. पेशव्यांनीं आपल्या रकमेंत दहा कमी करावे तेव्हां यानें एक चढवावा हा त्याचा शिरस्ता. यामुळें दोघेही आपापल्यापरी मर्यादेबाहेर मुद्दाम बोलत होते! हैदराची मनापासून इच्छा ही कीं, पेशव्यांस कांहीं एक न देतां वाटेस लावावें, आणि त्यांची इच्छा तर यापासून निघेल तितका पैका काढावा! याप्रमाणें तहाचा प्रकार बनून येईना, तेव्हां रावसाहेबांनीं विचार केला कीं, पट्टण किंवा बेंगरूळ हीं दोन्हीं स्थळें असाध्य. महिनोमहिने झोंबावें तेव्हां हातीं आलीं तर येणार. नुकती माघ महिन्यास सुरुवात झाली असून मुलूखगिरीचे अजून तीन महिने शिल्लक होते. एकच स्थळ घेण्याच्या भरीस पडून मुलूखगिरीचे इतके दिवस व्यर्थ घालवावे त्यापेक्षां त्या अवधींत शत्रूचा जितका मुलूख जिंकवेल तितका जिंकावा हें उत्तम. असा विचार करून ते कोल्हार व चिकबाळापूर परगण्याच्या रोखानें कूज करून चालले. या सुमारास सावनुरच्या नबाबाचा मुलगा व खंडेराव दिवाण हे दोन हजारपर्यंत फौज घेऊन आले. चित्रदुर्गकरही तीन हजार उत्तम पायदळ व कांहीं स्वार घेऊन आला. देशाहून सदाशिव रामचंद्र व चारो शंकर व बाजीपंत अण्णा हे सरदार व नागपुराहून मानसिंगराव बाघ व मजीदखान घोरपडे हे आले. त्यांबरोबर एकंदर आठ नऊ हजार स्वार होते. कडपें व कर्नूळ येथील नबावही येऊन मिळण्याच्या तयारीस लागले.

मुराररावघोरपड्यास हैदराचा निरोप गेला होता कीं, तुम्हीं आम्हांस येऊन मिळावें. तसें तुमच्यानें होत नसेल तर निदान शत्रूकडे तरी जाऊं नये. जर शत्रूस मिळावयाचें असेल तर पुढचा परिणाम लक्षांत आणून काय करणें तें करावें. पेशवे आज येथें आहेत उद्यां देशास जातील. मग तुह्मांस आम्हाशींच गांठ आहे. या निरोपास न जुमानतां मुराररावचार हजार फौज व दोन तोफा घेऊन आला तो पेशव्यांच्या लष्करास पुढें देवनहळ्ळीच्या मुक्कामीं येऊन मिळाला. एकंदरींत पेशव्यांच्या मनाप्रमाणें फौजेचा जम उत्तम रीतीनें पडत चालला होता.

हैदराचें पूर्वेकडील सर्व राज्य जिंकावें म्हणून श्रीमंत त्या प्रांतीं गेले तेव्हां गुरमकोंडा प्रांतांत लुटालूट करण्याकरितां तीन हजार फौज देऊन त्यांनीं महिमाजी शिंद्यास तिकडे पाठविलें. ती मीर रेझाची जहागीर असल्यामुळें तो हैदराच्या लष्करांतून फुटून पांच हजार सड्या फौजेसह लांब लांब मजली मारीत त्वेषानें धांवून आला. पूर्वी त्यानें शिंद्याची कशी दुर्दशा उडविली होती हें ध्यानांत आणून श्रीमंतांनीं शिंद्यास परत बोलावून त्याच्या जागीं राघो बापूजी व आनंदराव गोपाळ यांस पांच हजार फौजेसह पाठविलें व आणखी पांच हजार फौज मीररेझाचा पाठलाग करण्याकरितां पाठविली. इतका बंदोबस्त झालेला पाहून तो मीर परत गेला व राघो बापूजी व आनंदराव गोपाळ यांनीं सारा गुरमकोंडाप्रांत लुटून जाळून बेचिराख करून टाकिला.

चिकबाळापुराकडे आल्यावर श्रीमंतांनीं प्रथम भैरवदुर्गास वेढा घातला. तो मजबूत पहाडी किल्ला बेंगळुरापासून आठ कोसांवर आहे. हा इ. स. १६०९ सालीं शहाजीराजे भोंसले यांनीं बांधिला होता. तेथें भैरवाचें देवस्थान असून वस्तीही पुष्कळ होती. शिवाय भोंवतालच्या गांवांतले हजारों लोक आपली वस्तवानी घेऊन तेथें आश्रयाकरितां गोळा झालेले होते. श्रीमंतांनीं त्या किल्ल्यास मोर्चे देऊन तोफा सुरू केल्या, व चार दिवस झाले तरी किल्ला हातीं येईना तेव्हां माघ वद्य प्रतिपदेच्या दिवशीं पहांटेस हल्ला करून किल्ला घेतला. नंतर लूट सुरू झाली ती सर्व दिवसभर चाललीच होती व दींत

११ फेब्रुवारी.

रहिवासी व बाहेरून आलेले सर्व लोक वस्त्रपात्रासुद्धां सर्व जिनगीस नागवले जाऊन शिवाय त्यांस तशा निराश्रित स्थितींत बाहेर हुसकून लावून किल्ला मोकळा करण्यांत आला. अशा निराश्रित झालेल्या लोकांत पुष्कळ ब्राह्मणही होते. त्यांस श्रीमंतांनीं रात्रौ बोलावून आणून भोजन घालून एक एक वस्त्र देऊन लावून दिलें. हा किल्ला चांगला होता सबब येथें चारशें गारदी ठेवून बंदोबस्त करून श्रीमंत मागडीस गेले. तें ठाणें घेऊन त्यांनीं पाडून टाकिलें व पेठ लुटून फस्त केली. देवनहळ्ळीचीही तीच दशा झाली. त्या मुक्कामीं त्यास मुरारराव येऊन मिळाला. नंतर ते चिकबाळापुरास गेले.

श्रीमंत इतके लांब गेल्याचें वर्तमान ऐकून हैदरास धीर येऊन त्यानें हातपाय हालविण्याची सुरवात केली. तो तुंगभद्रेजवळ उडगणी येथें राहिला होता; तेथेंच आपलें बुनगें ठेवून तो सड्या फौजेनिशीं तेथून तरीकिऱ्यास आला. त्याची टेहाळणी करण्याची कामगिरी गोपाळरावावर श्रीमतांनीं सोंपविली होती. तरीकिऱ्यास हैदर जातांच गोपाळराव सावनुराहून निघून हरिहर येथें येऊन राहिला. तरीकिऱ्यापासून हरिहर तीस कोस मागें व चिकबाळापुर पन्नास कोस पुढें आहे, आपण तरीकिऱ्यास आहों तेथपर्यंत गोपाळराव आपल्या पिछाडीस असावयाचा हें हैदरास माहीत होतें. थोरली फौज चिकबाळापुरास पेशव्यांबरोबर होती, ती तिकडील मुलुख लुटण्यांत व किल्ले घेण्यांत गर्क होती. मधल्या पन्नास कोसांच्या पट्टयांत मराठ्यांची फौज कोठेंही नव्हती ही संधि साधून आपलीं गेलेलीं ठाणीं परत मिळवावीं, चित्रदुर्गकराचा मुलूख जाळून लुटून उध्वस्त करावा, शिरें मदगिरी वगैरे मराठी मुलखावर स्वाऱ्या कराव्या, असे त्यानें बेत केले त्यांत त्यास प्रारंभीं प्रारंभीं मात्र थोडेसें यश आलें. तें असें—

चिकनायकनहळ्ळींत अकराशें प्यादे होते; त्यांत सवाशेंपासून दीडशेंपर्यंत काय ते मराठे होते. चारशें लोक चित्रदुर्गकराकडचे होते आणि बाकीचे तर त्याच ठाण्याच्या रखवालीकरितां हैदराच्या वेळेस लोक होते त्यांपैकींच चाकरीस ठेविलेले होते. त्या जुन्या लोकांनीं चित्रदुर्गकराच्या लोकांस फितवून आपणाकडे वळवून घेतलें, आणि एका रात्रीं हैदरखानाचे तीन हजार शिपाई भिंतीस शिड्या लावून

फेब्रुवारी.

आंत घेतले. मग या सर्व लोकांचा मारा दौडशें मराठ्यांवर पडला. चार घटका मराठ्यांनीं खूब तारफेची लढाई केली. पण चार हजार लोकांपुढें दोडशें माणसांचा किती वेळ टिकाव लागणार? त्यांचा पराजय होऊन पंचवीस असामी ठार झाले. चाळीसपर्यंत असामी जखमी होऊन शिऱ्यास पळून आले. बाकी ऐशीं जणांस शत्रूच्या लोकांनीं धरून हैदरखानाकडे तरीकिऱ्यास नेलें. तेव्हां यानें त्यांचे नाककान कापून सोडून दिलें. ही खातमी ऐकतांच कंदिकिरें व हंदिकिरें या ठाण्यांतील लोकांनीं दहशत खाऊन पळ काढिला तेव्हां तीं ठाणीं अर्थातच शत्रूच्या हातीं गेलीं. नंतर लवकरच शत्रूनें तुरविकिऱ्याच्या ठाण्यावर छापा घालून तेंही काबीज केलें.

या बातम्या श्रीमंतांच्या कानीं जातांच त्यांनीं तीन हजार स्वार नरसिंगराव घायगुडे, शहाजी भोंसले अक्कलकोटकर व महिमाजी शिंदे यांजबरोबर चिकनायकनहळ्ळीच्या रोखें तावडतोब रवाना केले व गोपाळरावासही हुकूम पाठविला कीं, तुम्ही हरिहराहून निघून मतोड येथें येऊन रहावें, म्हणजे ठाण्यांतील लोकांस धीर येऊन ते ठाणीं सोडून पळणार नाहींत व शत्रूसही वचक बसेल. त्याप्रमाणें तो तेथें येऊन ठळ देऊन राहिला. थोरल्या लष्करांतून घायगुडे वगैरे सरदार आले व गोपाळरावही समीप आला हें पाहिल्यावर मग शत्रूचे लोक त्या नवीन घेतलेल्या ठाण्यांतून कशाला रहातात! त्यांनीं तत्काळ पलायन केलें. पुनः त्या ठाण्यांत लोक ठेवावे तर आपणास आसपास राहिलें पाहिजे. न रहावें तर पुनः मागल्याप्रमाणेंच शत्रु अकस्मात् येऊन दगा करणार; असा विचार करून गोपाळरावानें चिकनायकनहळ्ळी, कंदिकिरें, हंदिकिरें व तुरविकिरें हीं चार ठाणीं पाडून भुईस मिळविलीं व बाकीच्या ठाण्याचा चांगला बंदोबस्त करून तो तूर्त मतोड येथें राहिला.

या स्वारींत हैदराच्या सर्व सरदारांत मीर रेझाची चळवळ एकसारखी सुरू होती व तिजमुळें मराठ्यांस बराच त्रास भोगावा लागत होता. याच सुमारास तो तीन हजार स्वार बरोबर घेऊन शिऱ्यांची पेठ लुटण्याकरितां आला होता; पण तेथील किल्लेदार मुकुंदराव भोपत हा सावध असल्यामुळें त्याचा तेथें कांहीं यत्न चालला नाहीं. नंतर त्या ठाण्याजवळच बुकापट्टण

म्हणून दुसरें एक लहानसें ठाणें आहे त्यावर त्यानें हल्ला करून तें घेतलें व तें निर्धास्तपणें लुटण्याची सुरवात केली. इतक्यांत तेथलि ठाणेदार साजे। शामजी म्हणून ठाण्याच्या गढींत होता त्यानें त्याजवर बंदुकांचा असा जबर मारा केला कीं, त्यास तेथून पळ काढावा लागला. तेथून तो मीर निघाला तो आसपासचे दहा बारा गांव लुटून थोरल्या लष्करापासून अठरा कोसांच्या अंतरावर देवराजदुर्ग येथें जाऊन उतरला. ही बातमी श्रीमंतांस सायंकाळीं कळली व प्रहर रात्र झाली नाहीं तों त्यांच्या आज्ञेवरून आठ हजार स्वार घेऊन मीर रेजास गांठण्याकरितां मल्हारराव पानशे निघाले, पण याही खेपेस तो मराठ्यांच्या हातून निसटून पार झाला!

इकडे मुलूख जिंकण्याचा व किल्ले काबीज करण्याचा पेशव्यांचा क्रम निर्बाध चालू होता. ते फाल्गुन शुद्ध षष्ठीच्या (३ मार्च) दिवशीं चिकबाळापुरास पोंचले. तेथें हैदराची शिबंदी पुष्कळ व चांगली होती व किल्ला फार दिवस झुजेल असें वाटत होतें. परंतु मोर्चे लागल्यापासून सवयेच दिवशीं किल्लेकरी शरण येऊन त्यांनीं किल्ला दिला. चिकबाळापुराभोंवते सिघोट, गणेशगड व नंदिदुर्ग हे प्रख्यात व मजबूत पहाडी किल्ले आहेत व ते बेंगरुळास समीप आहेत. ते हातीं आल्याखेरीज चिकबाळापुरचे ठाणें टिकणार नाहीं असें समजून ते घेण्याचा पेशव्यांनीं उपक्रम केला. त्यांत सिघोट व गणेशगड हे दरडावणीच्या निरोपानेंच हातीं आले परंतु नंदिदुर्गास वेढा बसवावा लागला. तो किल्ला ज्या पहाडावर आहे तितका उंच पहाड त्या डोंगराळ प्रदेशांत सुद्धां दुसरा नाहीं. तो किल्ला फारच बळकट असून तेथें हैदरानें मुद्दाम उत्तम बंदोबस्त ठेविला होता. फाल्गुन शुद्ध नवमीच्या दिवशीं तेथें श्रीमंतांची स्वारी जाऊन मोर्चे सुरू झाले ते त्याचदिवशीं दरवाजापर्यंत जाऊन पोंचले. त्यामुळें किल्लेकऱ्यांस पराकाष्ठेची दहशत बसून त्यांनीं किल्ला हवाली केला! तेथें श्रीमंतांचे अकरा मुक्काम होते. किल्यांत चारशें लोक व एक हवालदार आपल्या विश्वासाचा ठेवून श्रीमंतांनीं तेथील बंदोबस्त केला. तेथूनच त्यांनीं चिकबाळापुरच्या सुभ्याखालीं जितके किल्ले व ठाणीं होतीं तीं टोळ्याटोळ्यांनीं फौज पाठवून ताब्यांत घेऊन पाडून टाकिलीं. पूर्वी आरमारावर जानराव

धुळप सुभेदार होता त्यास त्यांनीं आतां या सुभ्यावर नेमिलें. या स्वारींत श्रीमंतांनीं इतके बिकट किल्ले व ठाणीं घेतलीं पण त्यांस अपयश ह्मणून कोठेंच आलें नाहीं. जिकडे जावें तिकडे जयश्री हात जोडून पुढें उभी असे! याचें कारण या खेपेस त्यांजवळ पायदळ व तोफखाना चांगला होता हें तर आहेच. पण मुख्य कारण त्यांची जवामर्दी व दक्षता हें होय. कितीहि विकट प्रसंग असला तरी आपला जीव धोक्यांत घालण्यास त्यांनीं कधीं मागें पुढें पाहिलें नाहीं. किल्यांस मोर्चे बसले कीं त्याचा मुक्काम रात्रंदिवस मोर्च्यांत असावयाचा. हल्ला होऊं लागला तरी हे बरोबर असावयाचेच. सुरुंग खोदण्यावर सुद्धां यांची पैरवी असावयाची. सर्व तरतूद ते आपल्या नजरेनें पहात. कोणा सरदाराचें काम कसें चाललें आहे, कोण कसा पराक्रम करितो, कोणाची काय कसूर होत आहे, इकडे त्यांचें नेहमीं लक्ष असे. बक्षीस देण्यांत त्यांचे जसें औदार्य मोठें असल्याचें दिसून येई त्याचप्रमाणें अपराध्यास शिक्षा करण्यांतही त्यांच्या स्वभावाची उग्रता वारंवार दृष्टीस पडे.

हैदरखान तरीकिऱ्यास राहिला होता त्याच्या मनांत मराठयांनीं घेतलेलीं ठाणीं सोडवावीं व त्यांच्या व चित्रदुर्गकराच्या मुलुखांत शिरून धुमाकुळ उडवावी हें फार होतें. परंतु मराठी मुलुख पाठीशीं घालून भोंवतालचीं ठाणीं सांभाळण्याकरितां गोपाळराव त्यांच्या छावणीपुढें अठरा कोसांवर तळ देऊन राहिला होता यामुळें त्याचा कांहीं इलाज चालेनासा झाला. तो उडगणीस होता तेव्हां धारवाडचा सुभा व सावनूरकराचें राज्य लुटण्याचा त्याचा बेत गोपाळरावानें साधूं दिला नाहीं. यामुळें दोन तीन महिने तिकडे व्यर्थ गेल्यामुळें कंटाळून तो आतां तरीकिऱ्यास आला तरी गोपाळराव येथेही उभा आहेच! मैदानांत उतरून एखाद्या मातबर ठाण्यास वेढा घालावा तर एकीकडून गोपाळरावाचा उपद्रव व दुसरीकडून लांब लांब मजली करून पेशवे आरणावर येतील हा वचक त्यास फार होता. शिऱ्यांचा सुभा लुटण्याकरितां लहानसान टोळी पाठवावी तर गोपाळराव ती मारून टाकणार. स्वतः फौज घेऊन त्यावर चालून जावें तर तो घटकेंत पळून जाणार व घटकेंत अंगावर चालूनही येणार! तेव्हां असल्या शत्रूवर रात्रीं

छापा घालून त्याच्या सैन्याचा पूर्ण विध्वंस केल्याशिवाय आपल्या मागचें हें झेंगट सुटावयाचें नाहीं अशी त्याची खात्री झाली. पण छाप्याची मसलत साधणेंही दुरापास्तच होतें. गोपाळरावाची व त्याची जानपछान कांहीं आजकालची नव्हती. त्यावर छापा घालण्यासाठीं आज बारा वर्षे हैदरअल्ली यत्न करीत असतां एकदांदेखील जर त्यास आजपर्यंत यश आलें नाहीं, तर तें यंदा तरी कसें येणार ? कारण या स्वारींत सुद्धां गोपाळराव सावधपणामध्यें बिलकूल कसूर करीत नव्हता. त्याची छबिन्याची फौज गोटापासून कोस अर्ध कोसावर रात्रभर पहारा करीत हिंडत असे. तलाव्याची फौज तरीकिऱ्याच्या बाजूस रोज दहा बारा कोस जाऊन परत येई. गोटापासून पांच सहा कोसांवर शत्रूचे तरीकिरा व अजमपुर या तालुक्यांचे गांव लागत गेले होते. त्यापैकीं लष्करास दाणावैरण पुरविण्याकरितां दररोज एक दोन तरी लुटून उध्वस्त करण्यांत येत होते. पण त्या कामावरसुद्धां तीनचार हजार चांगली फौज व एखादा सरदार पाठविण्यांत येत असे. तलाव्याकरितां एक दिवस स्वतः गोपाळराव, एक दिवस त्याचे चुलतबंधु नीलकंठराव व परशुरामभाऊ, आणि एक दिवस आनंदराव रास्ते याप्रमाणें पाळीपाळीनें जात असत व पंचवीस कोसांची दौड करून परत येत असत. छबिन्यास सुद्धां पाळीपाळीनें स्वतः सरदार उभे असत. इतक्या तजविजी केलेल्या असल्यावर शत्रूनें रात्रीं आपणावर अकस्मात् येऊन गांठावें हें केवळ अशक्य आहे असें गोपाळरावास जर वाटत असलें तर त्यांत काय नवल आहे ! पण तो हैदरअल्ली महा कपटी व हरहुन्नरी होता. शूर, उद्योगी आणि दीर्घद्वेषीही तसाच. तो कानडा मुलूख. रयत व जमीनदार सर्व हैदराच्या बाजूचे. त्याची आपल्या लष्करांत कैद जरबेची. यामुळें त्याच्या हालचालीची बातमी मराठ्यांस चांगलीशी कळत नसे. यांची बातमी मात्र त्यास अगदीं खरीखरी कळत असे. मात्र वद्याच्या काळोख्या रात्रीं जवळ आल्या तेव्हां गोपाळरावास भूल पाडण्याकरितां त्यानें जिकडे तिकडे पुकारा केला कीं, आतां आपण थेट श्रीरंगपट्टणास जाणार. त्याप्रमाणें लष्करचें सामानही थोडथोडें दररोज पट्टणाकडे जाऊं लागलें. एके दिवशीं तो स्वतःच तरीकिऱ्याहून निघाला तो दक्षिणेकडे

सहा कोसांवर संकरापट्टणास जाऊन राहिला. मराठ्यांमध्यें व त्यामध्यें पूर्वी अठरा कोसांचें अंतर होतें तें आतां चोवीस कोसांचें झालें. संकरापट्टणाहून दरकूच तो श्रीरंगपट्टणाकडे गेल्याची अगदीं खात्री पटण्याजोगी बातमी गोपाळरावास वारंवार कळूं लागली व त्यामुळें त्याच्या बंदोबस्तांत कांहींसा शिथिलपणा व बेसावधपणा आला हें त्यानेंच कबूल केलें आहे. हैदर संकरापट्टणास तीन दिवस होता. तेथून माघ वद्य चतुर्थीच्या दिवशीं

२५ फेब्रु. } कडूर येथें आला. दुसरे दिवशीं दोनप्रहरीं बारा तेरा हजार गारदी, चार हजार स्वार, पंचवीस तोफा, व बाणांचे पन्नास उंट बरोबर घेऊन तो जो एका आडवाटेनें निघाला तो तो दिवसभर व रात्रभर चालून पहांटेस पांच घटका रात्र असतां छाविने चुकवीत चुकवीत मराठ्यांच्या लष्करासमीप येऊन ठेपला !

आदल्या दिवशीं नीलकंठराव व परशुरामभाऊ तरीकिऱ्याच्या बाजूसच बारा कोसपर्यंत तलाऱ्याकरितां गेले होते. वाटेंत गांवखेड्यांचीं माणसें भेटत, तींसुद्धां हैदर श्रीरंगपट्टणाकडे निघून गला असेंच सांगत. बहुधां तीं माणसें त्यांच्या मार्गांत घालण्याचें काम शत्रूचेंच असावें. ते बारा घटका रात्रीस लष्करांत परत आले. हैदरखानाच्या लष्करांतून फुटून एक मुसलमान गारदी पळत पळत मराठ्यांच्या लष्करांत येऊन सांगूं लागला कीं, तुह्मांवर छापा आला, सावध व्हा. पण तो शत्रूचा गारदी हें कळतांच त्याचें सांगणें कोणास खरें वाटेना ! जो तो त्याची टरच उडवूं लागला. त्यानें सांगितलेली बातमी गोपाळरावास कळवावी कीं न कळवावी याची भवति न भवति होण्यांतच चार घटका गेल्या. शेवटीं कोणी जाऊन गोपाळरावास जागें करून वर्तमान सांगितलें. तेव्हां तो पंचाइतींत पडला. एका अनोळखी व विशेषंकरून शत्रूच्या चाकरीस असलेल्या गारद्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवून जर आपण सबंध लष्कराचा तळ हालविला व ही बातमी खोटी ठरली तर जनांत आपलें हसें व बदलौकिक होईल. बरें, ही गारद्याची बातमी खरी असून आपण वेळेवर सावध झालों नाहीं तर शत्रूचा छापा पडून सर्वस्वीं नाश होणार ! याप्रमाणें त्याचें मन बुचकळ्यांत पडलें असतां त्यानें त्या गारद्यास विचारिलें कीं, तूं बोलून चालून शत्रूचा

नोकर. तुझें सांगणें आम्हीं खरें कशावरून धरावें? तेव्हां त्यानें उत्तर केलें कीं, मी पूर्वी नानासाहेब पेशव्यांजवळ चाकरीस होतों त्यांचें मीठ मी खाल्लेलें आहे. तुम्हीं लक्षावधि लोकांचे पालनवाले, तुम्हांस दगा न व्हावा, म्हणून हें वर्तमान तुम्हांस आगाऊ कळवीत आहें. हे खोटें ठरलें तर तुम्हीं माझे हातपाय तोडा, जीव घ्या, काय पाहिजे तें करा! पण या वेळीं स्वस्थ न बसतां आपला बचाव करण्याच्या तजविजीस आतांच्या आतां लागा. गारद्याचें हें बोलणें गोपाळरावास कांहींसें खरें वाटलें व त्यानें दोन तीन पथकास घोड्यांवर सामान घालून तयार होण्याची ताकीद दिली. इतकें होतें तों तोफांचे बारांवर बार व बाणांच्या सरबत्ती होऊं लागल्या. ती अशी भयंकर आणीबाणीची वेळ होती कीं, त्यावेळीं हजारों लोकांचे प्राण जाऊन सारें लष्कर शत्रूच्या हातीं लागावयाचें! परंतु गोपाळरावाचें या वेळचें वर्तन हाडाच्या खऱ्या सरदाराप्रमाणें होतें, यामुळें मोठा बचाव झाला व त्याची फार वाहवा झाली. तोफेचा पहिला बार ऐकल्याबरोबर तो घोड्यावर स्वार होऊन नौबत व निशाण घेऊन गोटाच्या आघाडीस हैदराच्या फौजेसमोर येऊन उभा राहिला. नौबत वाजूं लागली तेव्हां फौज व सरदार पटापट जमा होऊन आघाडीस आले. त्या काळोखांत नौबतीचा आवाज ऐकतांच हैदरानें ओळखिलें कीं, या ठिकाणीं फौज उभी आहे ती दूर हुसकून लाविल्याशिवाय मराठ्यांच्या गोटांत आपला प्रवेश होणार नाहीं हें जाणून त्यानें त्याच ठिकाणावर तोफांचा भयंकर मारा केला व बाणांचाही केवळ वर्षाव केला. तथापि मराठ्यांच्या नौबती वाजतच होत्या व फौजही खंबीरपणानें जागा धरून उभीच होती. गोळे लागून माणसें मरतच होतीं. गोपाळरावाजवळ त्याचा हुजऱ्या उभा होता त्याच्या डोक्यास गोळा लागून ठिकऱ्यांसारखे तुकडे झाले व त्याचें रक्त गोपाळरावावर उसळून त्यास रक्तस्नान झालें. त्याचा चुलत भाऊ माधवराव कृष्ण पटवर्धन मंगळवेढेकर याचा घोडा गोळा लागून ठार झाला. त्याच गोळ्यानें त्याच्या गुडघ्याच्या मासाच्या व कातडीच्या चिंधड्या उडाल्या. परशुरामभाऊची एक घोडी पडली म्हणून तो दुसरीवर बसला. तों दुसरीही पडली, तेव्हां तिसरीवर बसला. तों तिसरीही पडली! याप्रमाणें

शत्रूकडून गोळयांची वृष्टि होत होती. त्या पांच घटकांत पांचशें गोळा सुटला असेल. परंतु तसलाही मार सोसून फौज ठासून उभी राहिल्यामुळें, सबब लष्करचें लष्कर बचावलें. जामदारखाना व डेरे, राहुट्या व बाजार व लष्करचें हरएक सामान सर्व सुरक्षितपणें निघून मागें तीन कोस बुधेहाळच्या आसऱ्यास गेलें. दिशा प्रकाशित होतात तों सर्व तळ मोकळा झाला. कांहीं दोन तीन डेरे व थोडें सामान राहिलें होतें तें शत्रूच्या हातीं लागूं नये म्हणून जाळून टाकण्यांत आलें. नंतर मराठी फौज तळ सोडून जवळच एक ओढा होता त्याच्या आसऱ्यास जाऊन उभी राहिली. प्रहर दिवसपर्यंत तिनें हैदरास आपल्या तळावर येऊं दिलें नाहीं नंतर तो तळावर आला तेव्हां इतका वेळ मार खाऊन काऊन गेलेल्या कित्येक स्वारांनीं शत्रूवर घोडीं घातलीं. पण तो प्रसंग हैदरास जय येण्याचा असून तो त्यानें आपल्या अकलेच्या करामतीनें घडवून आणिलेला होता. मराठ्यांचा हल्ला येतांच त्यानें ' गारद्यांचे बुरूज ' बांधून बंदुकांचा जबर मारा करून त्यांस मागें हटविलें. दहावीस मनुष्यें ठार झालीं व जखमीही पुष्कळ झालीं ! तेव्हां शत्रूवर कोणीही घोडीं घालूं नये म्हणून गोपाळरावांनीं सक्त ताकीद केली. हैदर सायंकाळचा चार घटका दिवस राहीपर्यंत त्या तळावर राहिला होता व तेथपर्यंत मराठेही आपलें लष्कर ज्या वाटेनें गेलें होतें, ती वाट रोखून उभे होते. नंतर तो तेथून कडूर येथें परत जाण्याकरितां कूच करून निघाला. तो तीन कोस गेल्याची पक्की बातमी आल्यावर मराठेही बुधेहाळजवळ त्यांचें लष्कर उतरलें होतें, तेथें आले. नवल वाटण्याची गोष्ट ही कीं, वरील हकिगत वाचून मराठ्यांचें मनस्वी नुकसान झालें असावें असें वाचकांस वाटेल, पण तितकें नुकसान झालें नाहीं. पटवर्धनांच्या तिन्ही पथकांत मिळून पन्नास पंचावन घोडे ठार झाले व पंचवीस मनुष्यें ठार झालीं. जखमा लागलेलीं घोडीं व माणसें दीडशेंच्यावर नव्हतीं. यांपैकीं कांहीं मागाहून मेलीं. माधवराव पटवर्धनांस जखम लागली होती तिच्या योगानें तो मागून पंधरा दिवसांनीं मिरें येथें मरण पावला.

छाप्याचें वर्तमान ऐकतांच तेथून सोळा कोसांवर नरसिंगराव घायगुडे

व शहाजी भोंसले होते ते गोपाळरावास येऊन मिळाले नंतर त्यानें आपलें बुनगें शिऱ्यांस पाठवून दिलें, व बुधेहाळ, हल्याळ व कडब हीं ठाणी पाडून आंतील घरें जाळून व वस्ती मोडून मोकळीं केलीं व हागलवाडीच्या ठाण्याचा मात्र पक्का बदोबस्त करून तेथेंच फौजेचा तळ दिला. त्यापासून सोळा सत्रा कोसांवर गर्दनगडाखालीं हैदर येऊन राहिला. पुनः एकदां छापा घालावा असा हैदराचा हेतु होता, परंतु आतां गोपाळराव अति सावधपणानें वागत होता व त्याचें सर्व सामान सडें होतें. शिवाय घायगुडे व भोंसले येऊन मिळाल्यामुळें फौजही थोडीशी वाढली होती. शिवाय ठाणा संभाळण्याचें जोखीम आतां राहिलें नसल्यामुळें तो पाहिजे तिकडे हिंडण्यास मोकळा झाला होता. यामुळें हैदराचा लाग साधला नाहीं. या स्वारींत गोपाळरावाच्या फौजेचे पराकाष्ठेचे हाल झाले. भोंवतालचा मुलूख लुटून पोट भरावें तर एकीकडे चित्रदुर्गकराचा मुलूख, दुसरीकडे शिरें, मदगिरी वगैरे सरकारी मुलूख, तेव्हां त्या दोन्ही मुलखांतून त्यास लूट मिळावयाची नव्हती हें सांगावयासच नको. समोर मुलूख हैदरखानाचा होता; परंतु तो हैदरखान फौजेनिशीं इतका समीप असतां आधीं त्याच्या मुलखात लुटालूट करणें सुरक्षित नव्हतेंच! त्यांतून श्रीमंतांचें लष्कर यंदा तिकडून एकदां गेलेलें असल्यामुळें आतां तिकडे लूट करण्यासारखें फारसें कांहीं राहिलेंही नव्हतें! लष्करच्या वाण्यांनीं कोठून धान्याच्या खेपा आणाव्या तर त्या प्रांतीं कोठें धान्य मिळेना. एवंच लष्करचे लोकांस धान्य विकतही मिळेना व लुटींतही मिळेना! हीच दशा वैरणीचीही होती. पण सर्व अडचणींत मोठी अडचण पाण्याची पडली. माघ महिना संपतांच तिकडील नद्या व तळीं आटून कोरडीं झालीं. फौजेस तलाव्याची, कझाकीची व छबिन्याची चाकरी अतिशय पडत असे आणि विपत्ति तर या प्रकारची. यामुळें घोडीं व माणसें बेजार होऊन अगदीं थकून गेलीं.

---

१ तलावा=टेहळणी करणारी फौज. कझाकी=शत्रूच्या मुलखांत लुटालूट करून धान्य व वैरण मिळवून आणणारी फौज. छबिना=लष्कराभोंवती पहारा करणारी टोळी.

मीर रेझा सहा हजार स्वार बरोबर घेऊन मराठी मुलखांत धामधूम करण्याच्या इराद्यानें येऊन आणखी एकदां देवदुर्गासमीप उतरला. या खेपेस त्याबरोबर टिपू सुलतानही होता. त्यावेळीं श्रीमंतांचा मुक्काम नंदिदुर्ग येथें होता, तेथून त्यांचें पारिपत्य करण्याकरिता आपा बळवंताबरोबर

मार्च } त्यानीं पांच हजार फौज पाठविली व मदगिरीस बाळोजी पलांडे व सखाराम हरी तीन हजार फौजसह राहिले होते,

त्यांसही आपा बळवंतास मिळण्याची आज्ञा केली. या तिघां सरदारांस पेशव्यांची ताकीद अशी होती कीं, मीर व टिपू यांचा निकडीनें पाठलाग करून त्यांस आपल्या मुलखांतून हांकून लावावें. जर ते श्रीरंगपट्टणास गेले तर थोरल्या लष्करास परत यावें. जर ते मागडीच्या झाडींत शिरतील तर भैरवदुर्गाजवळ रहावें. आणि जर ते मर्दनगडास हैदराकडे गेले, तर यांनीं गोपाळरावास जाऊन मिळावें. त्याप्रमाणें हे तिघे सरदार मीर व टिपु यांचा पाठलाग करीत असतां, एकदां मदगिरीपासून आठ कोसांवर मुक्कामास उतरले होते. त्यांवर मीर व टिपु यानीं पहाटेच्या प्रहर रात्रीस छापा घातला. त्यांच्या आघाडीस सातशें करोल म्हणजे बंदुकवाले स्वार होते. त्यांनीं मराठ्यांच्या गोटावर एकएकदां बार काढिले. परंतु मराठे बेफाम नव्हते. त्यांनीं तत्काळ गोटाबाहेर पडून शत्रूचा पाठलाग केला, व पांच पंचवीस करोल ठार मारिले व कित्येकांचे घोडे हिसकून घेतले तेव्हां मीर व टिपू पळून गेले, ते हैदरास जाऊन मिळाले. तेव्हां हे त्रिवर्ग सरदारही गोपाळरावास मिळण्याकरितां निघाले होते, परंतु परत येण्याविषयीं पेशव्यांचा हुकूम आल्यावरून ते थोरल्या लष्करास परत गेले.

राघो बापूजी व आनंदराव गोपाळ गुरमकोंड्याकडे गेले, त्यानीं तिकडील तमाम प्रांत लुटिला व गुरेंसुद्धां वळवून आणिलीं. कांहीं मोठमोठ्या गढ्या व गुरमकोंड्याचा किल्ला एवढें मात्र त्यांच्या तावडींत सांपडलें नाहीं. बाकी सर्व प्रांत ओसाड होऊन गेला. ते परत आल्यावर त्यांस श्रीमंतांनीं गोपाळरावाकडे पाठविलें. त्यांबरोबर मुराररावाचा पुतण्या मालोजी घोरपडे याचीही तिकडेच रवानगी झाली. ही सहा हजार फौज गोपाळरावाकडे पाठविण्याचें कारण असें झालें कीं, मीर व टिपू हैदरास मिळाले होते

त्यामुळें त्याची फौज अधिक वाढली. त्या मानानें गोपाळरावाचीही वाढविणें जरूर पडलें. तसें न केलें असतें तर त्याचा हैदरापुढें टिकाव लागणें कठीण होतें.

आतां थोरल्या लष्कराचे या अवधींत काय उद्योग चालले होते हें पाहूं. तें लष्कर घेऊन श्रीमंत नंदिदुर्गाहून निघाले ते शिलगट्टयास आले. तो किल्ला पाडून व वाटेंत कैवारचा किल्ला लागला त्याचीही तीच दशा करून ते कोल्हाराकडे वळले. त्या पूर्वींच त्या लष्करांतून आठ हजार फौजेसह मल्हारराव पानशे पुढें आले होते, त्यांनीं कोल्हार परगण्यांतलीं तमाम ठाणीं हस्तगत करून घेतलीं होतीं. त्यायोगानें कोल्हार येथील किल्लेदार घाबरून पळून गेला व त्यामुळ तो किल्ला पेशव्याच्या सहज हातीं लागला. तेथील लोकांनां पन्नास हजार रुपये खंड भरल्यामुळें तेथें लूट झाली नाहीं. त्या किल्ल्यांत ठेवण्याजोगी शिबंदी जवळ नसल्यामुळें श्रीमंतांनीं सुरुंग लावून तो किल्ला जमीनदोस्त केला व त्या परगण्यांतल्या सर्व ठाण्यांची तीच दशा केली व गांवोगांव जबर खंडण्या घेऊन सर्वत्र आपला अंमल बसविला तेथून ते फाल्गुन वद्य द्वादशीस [ २४ मार्च. ] मुलबागलास आले. त्याच दिवशीं त्या किल्ल्यास तोफा लागू होऊन तट-बंदी ढांसळून पडली व सायंकाळच्या चार घटका दिवसास हल्ला झाला व किल्लेकरी बहुत शौर्यानें लढत असतांही त्यांचा कांहीं इलाज न चालतां मराठ्यांचा झेंडा किल्ल्यावर रोंवला गेला. तों रात्र पडली ही संधि पाहून किल्ल्यांत हैदराचे सातशें लोक होते ते पश्चिम दरवाजानें बाहेर पडून पळून गेले. कोल्हारचा किल्लेदार पळून गेला होता तो येथेंच होता. तो व मुल-बागलचा किल्लेदार व कांहीं गारदी व पठाण मिळून तीस बत्तीस मनुष्यें हल्ल्याच्या वेळीं सांपडलीं, तीं दुसरे दिवशीं श्रीमंतांनीं हत्तीच्या पायाखालीं देऊन मारून टाकविलीं. या लोकांनीं व्यंकाबाच्या गिरीस जाणारी यात्रा लुटली होती व मराठी लष्करचें एकटें दुकटें माणूस हातीं लागलें असतां हे त्यास मारून टाकीत. शिवाय हैदरानें चिकनायकनहळ्ळीच्या ठाण्यांतील लोकांस धरून नेऊन त्यांचें नाककान कापिले होते, हा दंशही श्रीमंतांच्या मनांत होताच. यामुळें या लोकांस हें उग्र शासन त्यांनीं केलें. या किल्ल्यांत

पांचचार चांगल्या तोफा व कांहीं दारूगोळा सांपडला. किल्यांतील लोकांची पेशव्यांनीं सरसकट कत्तल केली ह्मणून कर्नल विल्क यानें व त्याचा अनुवाद करणाऱ्या डफ् साहेबानेंही लिहिलें आहे, पण त्यांत तथ्यांश किती आहे हें वरील हकीकत वाचून ध्यानांत येईलच. किल्ल्यावर हल्ला चढवितांना घाटगे घराण्यांतील शिपायांनीं पराक्रम करून सर्वांआधीं निशाण चढविल्याचें डफ साहेबानें लिहिलें आहे त्याविषयीं आम्हांस उपलब्ध झालेल्या कागदोपत्रीं कोठें उल्लेख आढळला नाहीं. पण त्यावरून ती हकीकत खोटीच असली पाहिजे असें मानण्याचें कारण नाहीं.

पेशव्यांची स्वारी मुलबागलाहून निघाली ती बेंगरुळाकडे चालली. हैदरानें भिऊन आपल्या ह्मणण्याप्रमाणें खंडणीची रकम द्यावी, यासाठींच बहुधा ही त्यांची हुलकावणी असावी. कारण यंदां तरी बेंगरुळ त्यांच्या हातीं लागण्याचा संभव कमी होता. मोंगलाकडून तहवारजंग सहा हजार गारदी व आठ तोफा घेऊन याच सुमारास पेशव्यांच्या कुमकेस आला होता. तथापि बेंगरुळास वेढा घालण्यासारखी फौजेची तरतूद यावेळीं त्यांजवळ नव्हती. त्यांची फौज जागजागीं वांटली गेली असल्यामुळें स्वारी बरोबर फक्त तीस हजारपर्यंत होती. त्या किल्ल्यांत हैदराचे सात हजार उत्तम गारदी होते व धान्य, दारुगोळा व इतर हरएक जिनस यांचा भरपूर पुरवठा केलेला होता. पावसाळा सुरू होण्यास फक्त महिन्या दीड महिन्याचा अवकाश होता. त्या अवधींत बेंगरूळ हातीं येणार कसें! किल्ल्यास वेढा एकदां बसविला म्हणजे, फत्ते झाल्याखेरीज तेथून हालल्यानें लौकिक जावयाचा. किल्ल्यापासून पाणी तीन कोस दूर होतें. तेथें लष्कर उतरून तेथून किल्ल्यास मोर्चेबंदीकरितां सामान आणावयाचें. तीस हजार फौजेपैकीं सात हजार तलाव्याच्या कामावर नेमिली पाहिजे. चौकी व छबिना मिळून आणखी सहा सात हजार वांटली जाणार. जेथें लष्कर उतरणार तेथल्या रखवालीकरितां पांच हजार तरी निदान लागलीच असती; बाकी दहा हजार राहिली तेवढी मात्र वेढा घालण्याच्या उपयोगी होती; पण तिनें कार्य सिद्ध होण्याजोगें नव्हतें. या अडचणी हैदरास कळत नव्हत्याशा नाहीं. यामुळें पेशवे बेंगरूळ घेतील ही भीति त्यास नव्हती. त्याज-

कडून आपाजीराम व रेझा अलीखान पुन: तह करण्याकरितां पेशव्याकडे आले, परंतु हैदराचें पहिलें जें बोलणें होते त्यांत अद्यापि विशेषसा फरक दिसून आला नाहीं. याप्रमाणें आपली हुलकावणी फुकट गेलीसें पाहून श्रीमंत परत निघाले, ते मनीकोल्हारावरून देवरायदुर्गापासून दोन कोसांवर येऊन उतरले. तेथून जवळच भिजगलदुर्ग म्हणून किल्ला आहे, तो बाळकोबा तात्या नांवाच्या सरदारानें जाऊन घेतला व मुराराव घोरपडे साबाजी भोंसले नागपुरकर व चित्रदुर्गचा संस्थानिक यांनीं देवरायदुर्ग घेतला. पेशव्यांची फौज कांहींसा वायव्येचा रोख धरून येऊं लागली, तेव्हां हैदर बाणावर येथें होता. त्यानें तर्क केला कीं, मराठ्यांच्या मनांत यावेळीं आपणावर दौड करून यावयाचें आहे. हा तर्क होतांच तो घाईघाईनें श्रीरंगपट्टणास गेला. त्यानें तर्क केला तो खोटा नव्हता. पेशव्यांची मसलत खरोखरीच तशी होती. गोपाळरावाची फौज वाढविण्यांतही त्यांचा तोच हेतु होता. आपण किल्ले काबीज करण्यांत गर्क होऊन गेलों आहों असें दाखवून हैदर बाणावरास आहे तों अकस्मात् भली लांब मजल मारून त्यास जाऊन गांठावें. तिकडून गोपाळरावानें यावें. मग दोघांनीं मिळून त्याची फौज मैदानांत सांपडली आहे, तों हल्यांवर हल्ले करून मोडून तुडवून टाकावी, ही श्रीमंतांची मसलत होती. पण त्या धूर्तानें ती ओळखून तत्काळ पोबारा केला !

हैदर श्रीरंगपट्टणास गेल्यावर त्याच्या टेहाळणीवर निराळी फौज ठेवण्याचें प्रयोजन उरलें नाहीं. सबब पेशव्यानीं गोपाळरावास फौजेसह आपणाकडे बोलावून घेऊन त्यास निजगलच्या किल्यास वेढा बसविण्याकरितां पाठविलें. तें स्थळ मजबूत असून त्याच्या आसपास पाणी नव्हतें. आंत शिबंदी फार चांगली व पुष्कळ होती. तिनें निकरानें किल्ला झुजविण्याची सुरुवात केली. गोपाळरावानें शेजारच्या एका टेंकडीवर तोफा चढवून त्यांचा किल्ल्यावर मारा केला, परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. मागाहून श्रीमंतांची स्वारी तेथें येऊन त्यांच्या सर्व लष्कराचा गराडा पडला असतां किल्लेकरी हिंमत न सोडतां लढत होते. शेवटीं वैशाख शुद्ध पंचमीच्या दिवशीं मराठ्यांनीं हल्ला करून किल्ला घेतला. पेश-

त्यांच्या एवढ्या मोठ्या फौजेपुढें या किल्यानें बराच टिकाव धरिला हें
३० एप्रिल } खरें, परंतु कर्नल विल्क यानें जें लिहिलें आहे कीं, "निजगल हें ठाणें अगदीं क्षुद्र होतें. पण त्यांत लोक होते त्यांनीं पराकाष्ठेचें शौर्य करून पेशव्यांस कित्येक महिनेपर्यंत दाद दिली नाहीं. वेढा घालणाऱ्यांचे सर्व उपाय थकले. तेव्हां चित्रदुर्गकर पुढें होऊन पेशव्यांस बोलला कीं, आज मी किल्ला घेणार. ही माझी प्रतिज्ञा आहे. ही खोटी ठरल्यास माझा शिरच्छेद करावा. याप्रमाणें तो जिवावर उदार झालेला संस्थानिक आपल्या निवडक लोकांसह आवेशानें हल्ला करिता झाला व त्यानें तो किल्ला घेतला" इ० इ०. त्या लिहिण्यांत अतिशयोक्तीचा प्रकार दिसतो. "किल्ल्यांतील लोकांनीं पेशव्यांच्या लष्करास दाद दिली नाहीं" ही तर झूट बात आहे! चैत्र वद्य षष्ठीस गोपाळरावानें वेढा घातला. वैशाख शुद्ध पचमीस किल्ला हातीं आला. सारा चौदा दिवसांचा कारभार. यांत "कित्येक महिने" होतील कोठून? किल्ल्यावर हल्ला होत असतां पेशवे व त्यांचे बंधू नारायणराव हल्ला पहात उभे होते. त्या वेळीं नारायणरावास गोळीची हलकीशी जखम लागली होती. एवढ्या गोष्टीमुळेंच काय तें या किल्ल्याच्या वेढ्यास विल्क साहेबांनीं इतकें महत्व आणिलें आहे असें दिसतें! या नाटकाच्या मोहिमांसंबंधीं डफ साहेबानें स्वतंत्र शोध असा बिलकूल केलेला दिसत नाहीं. जेथें तेथें विल्कचें तुणतुणें वाजविलें म्हणजे आपलें काम संपलें असेंच या डफ साहेबास वाटत होतें!

या स्वारींत मराठ्यांनीं हैदराच्या राज्यापैकीं सुमारें एक कोट रुपये सालिना उत्पन्नाचा मुलूख लुटून फस्त केला. कित्येक प्रांतचे प्रांत ओसाड पाडिले. किल्ले घेतले व पाडिले. ठाणीं व शहरें खणून काढून भुईस मिळाविलीं. त्याची कोट्यवधि रयत नागविली जाऊन देशोधडीस लागली. लाखों लोक प्राणास मुकले. तथापि तो म्हणून कांहीं केल्या पेशव्यांस खंडणी ते मागत होते त्याप्रमाणें द्यावयास कबूल होईना! उलट तो आतां असें म्हणू लागला कीं, माझी नुकसान व्हावयाची ती होऊन गेली. आतां मी खंडणी कां म्हणून द्यावी? पावसाळ्यांत मरा-

त्यांची छावणी या देशांत होत नाहीं. त्यांस परत तर गेलेंच पाहिजे. दसरा झाल्यानंतर ते पुनः येतील तर त्या वेळचें त्या वेळेस पाहून घेऊं! हैदराचा तह न करण्याचा निग्रह पाहुन पेशव्यांस मोठी पंचाईत येऊन पडली. कोणी त्यास सुचविलें कीं, हैदर ज्याअर्थी इतका आडदांड-पणानें वागत आहे, त्याअर्थीं त्यास दादासाहेबांची फूस असावी व देशीं कांहीं बखेडा करण्याचा विचार दादासाहेबांचा घाटत असावा! वस्तुतः तसें होणें अशक्य होतें. नाना फडनिसानें दादासाहेबांस कडक बंदो-बस्तानें ठेविलें होतें व सखारामबापू देशीं राहिला होता, त्यास श्रीमंतांनीं मागाहून मुद्दाम लष्करास बोलावून आणिलें होतें. श्रीमंतांच्या मनांत एकदां विचार आला कीं, पावसाळ्यांत कर्नाटकप्रांतीच छावणी करून रहावें. त्याप्रमाणें आपला भाऊ व बायको यांस देशीं पाठविण्याचें ठरवून त्यांजकडून त्यांनीं प्रस्थानही करविलें होतें. परंतु पुनः त्यांस वाटूं लागलें कीं, आपण जर इकडे छावणीस राहिलों तर मनस्वी पैका खर्चावा लागेल तो आणावयाचा कोठून? शिवाय एकाच मसलतींत आपण येथें गुंतून पडलों आणि राज्यांत दुसरीकडे कांहीं विघ्न उत्पन्न झालें तर त्याचें निवारण होण्यास मोठी अडचण पडेल. अशा स्थितींत त्यांनीं सर्व सरदारांस बोलावून त्यांचा सल्ला घेतला. तेव्हां मुराररावानें सांगितलें कीं, कोणा तरी सरदाराच्या हवालीं फौज करून ती इकडे छावणीस ठेवावी व तुम्ही तूर्त देशास जावें. दसरा झाल्यावर आणखी फौज घेऊन पुनः इकडे यावें म्हणजे मोहिमेची तड लागेल. बाकी सरदारांचींही मतें अशींच पडलीं. त्यावरून त्याचप्रमाणें वागण्याचें श्रीमंतांनीं ठरवून त्रिंबकराव मामा पेठे यास कर्नाटकच्या फौजेवर मुख्य सरदार नेमिलें व मुराररराव घोरपडे, पटवर्धन, रास्ते, बाजीपंत अण्णा, गायकवाड, सखाराम हरि, आनंदराव गोपाळ इत्यादि सरदारांस त्रिंबकराव मामाच्या हुकुमाप्रमाणें वागण्याची ताकीद दिली. या सुमारास धारवाड व सावनूर येथून ओरड आली कीं,

मे } हैदराचा सरदार लालामियां यानें सावनूरकराच्या मुलखांत शिरून लुटालूट करून तिकडील प्रजेस अगदीं हैराण केलें आहे. त्यावरून त्या मियाचें पारिपत्य करण्याकरितां त्यांनीं नरसिंगराव घायगुडे व शहाजी

भोंसले यांस सावनूरप्रांतीं पाठविलें व आणखी त्यांच्या कुमकेस भापकर, कवडे, शितोळे व काळे हीं चार पथकें नेमिलीं. नंतर श्रीमंत कांहीं हुजरात व नारो शंकर, साबाजी भोंसले, मल्हारराव पानसे, आपा बळवंत व इतर कित्येक लहानसहान पथकें यांस बरोबर घेऊन देशीं यावयास कूच करून निघाले. वाटेंत सावनूरच्या नबाबाचा मुलगा, मोंगलाकडून कुमकेस आलेला तहवारजंग व चित्रदुर्गकर संस्थानिक यांस आपापल्या ठिकाणीं जाण्यास त्यांनीं निरोप दिला. वैशाख वद्य अमावास्येस सूर्यग्रहण होतें. याकरितां निवृत्तिसंगमीं कृष्णेच्या उत्तरतीरीं मुक्काम झाला. तेथें श्रीमंतांनीं सुवर्णतुला केली. नंतर ते रामतीर्थ, वाळेखिंडी, नाझरें, शंभु महादेव या रस्त्यानें ज्येष्ठ वद्य पंचमीच्या (१३ जून) दिवशीं पुण्यास येऊन दाखल झाले.

गोपाळराव पटवर्धन आतां स्वारी शिकारीच्या दगदगीस कंटाळला होता व ही सरदारी आतां आपणास नको असें तो वारंवार म्हणून दाखवीत असे. या स्वारींत त्यास किती त्रास पडला व कसे हाल झाले हें मागें वर्णिलेंच आहे. त्याचें नुकसानही पुष्कळ झालें होतें व कर्ज झाल्यामुळें सावकारांचा जाचही सोसावा लागत होता. या सर्व कारणांनीं व शरीरप्रकृति नीट नसल्यामुळें त्याच्या मनांत औदासिन्य प्राप्त झालें होतें. छावणीस राहण्याचें त्याच्या मनांत नव्हतेंच. तथापि खुद्द पेशवेच जर छावणीस राहिले तर त्यासही राहणें प्राप्तच होतें. गोपाळरावाएवढा कर्नाटकच्या मसलतींत अनुभवी सरदार पेशवाईंत दुसरा नव्हताच. त्यामुळें पेशवे देशीं गेले तर आपणास कर्नाटकचे फौजेवर मुख्य सरदार नेमितील व छावणीस ठेवितील असें त्यास वाटणें साहजिकच होतें. तसें झाल्यास ती गोष्ट निरुपायामुळें कबूल करावी परंतु कबूल करण्याआधीं आपल्या जहागिरीसंबंधानें कांहीं गैरसोई आहेत त्या श्रीमंतांनीं दूर कराव्या व नुकसान झालें आहे तें कांहीं पर्यायानें भरून द्यावें असें त्यांचें म्हणणें होतें. परंतु श्रीमंत स्वतः छावणीस राहिले नाहींत व गोपाळरावास त्यांनीं मुख्य सरदार नेमून त्याच्या हवालीं कर्नाटकची फौज करावी तेंही केलें नाहीं. त्यांनीं तिसरीच गोष्ट केली. ती गोष्ट म्हणजे त्रिंबकराव मामाची नेमणूक ही होय. आतां मामाच्या हाताखालीं वागून आपणास छावणीस राहणें भाग पडलें

ही गोष्ट गोपाळरावास परम असह्य वाटली. त्यानें कृतीनें वैषम्य दाखविलें नाहीं हें खरें, परंतु यापुढें पटवर्धनांच्या लेखांतून मामाविषयीं वक्रतेचे जे कोठें कोठें उद्गार आढळतात त्यावरून ही गोष्ट दिसून येते.

सावनूरकरांच्या मुलखांत व धारवाड प्रांतीं लुटालूट करावी व ठाणीं घ्यावीं या उद्देशानें हैदराकडून लालामिया आला होता व त्यास वेळ पडेल तर मदत करण्यासाठीं टिपू सुलतानही तुंगभद्रेच्या दक्षिणतीरीं येऊन उतरला होता. प्रथम प्रथम त्या मियानें ब्राह्मण बाटविणें, बायका भ्रष्ट करणें गांव जाळणें वगैरे अनर्थ केले, परंतु त्यास हुसकून लावण्याची तयारी जारीनें होऊं लागली. श्रीमंतांकडून घायगुडे व भोसले वगैरे सरदार चार हजार फौजेनिशीं धारवाडास आले. तेथील सुभेदार नारो बाबाजी यानेंही

स. १७७०। जून—जुलै } हजार बाराशे स्वार चाकरीस ठेवून हुबळी, मिश्रीकोट वगैरे ठाण्यांचा बंदोबस्त केला. शिवाय पटवर्धनांचे हजार स्वार लक्ष्मेश्वर वगैरे आपल्या जहागिरीचे परगणे संभाळण्याकरितां तयार होते. सावनूरचा नबाब व कित्तूरकर देसाई यांची फौजेची सिद्धता झाली. अशी चोंहोंकडे तयारी झालेली पाहून पावसाळ्यांत तुंगभद्रेस पूर आला म्हणजे आपण इकडे कोंडिले जाऊं असा विचार करून तो लालामिया परत गेला. त्याच्या लोकांनीं हलश्याळास वेढा घातला होता तो नारो बाबाजी व कित्तूरचा देसाई यांनीं यापूर्वींच उठविला होता. हनगलचें ठाणें टिपूनें घेतलें होतें तेंही घायगुडे वगैरे सरदारांनीं घेऊन पुनः सावनूरकरांच्या हवालीं केलें यानंतर या स्वारींत तुंगभद्रेच्या अलीकडील मुलखांत हैदराकडून पुनः उपद्रव झाला नाहीं.

श्रीमंत देशीं गेल्यावर इकडे कर्नाटकांत फौज होती तींतचे सरदार त्रिंबकरावमामा, मुरारराव, गोपाळराव, रास्ते, आनंदराव गोपाळ, बाजीपंत अण्णा, यांनीं पुढें काय करावयाचें याविषयीं साधक बाधक गोष्टी पाहून निश्चय ठरविला. तो असा कीं, सध्या दीड महिना दोन महिनेपर्यंत नीलगड, पावगड, रायदुर्ग या तालुक्यांत राहून गुजराण करावी. नंतर दाणा चाऱ्याची सोय पाहून पावसाळा संपेपर्यंत एकमेकांस जवळ जवळ अशीं स्थळें पाहून छावणीस रहावें. हा निश्चय ठरल्यावर

प्रथम त्यांनीं शिऱ्यांचा बंदोबस्त चांगला केला. कर्नाटकांतील मराठी मुलखाचें तें मुख्य शहर होतें. तेथें मुकुंदराव श्रीपत मुख्य अधिकारी आजपर्यंत होता त्यास काढून त्याच्या जाग्यावर श्रीमंतांनीं महिमाजी शिंद्यास नेमिलें होतें. महिमाजी हा शूर होता हें खरें, परंतु तो अधिकार संभाळण्याचें त्यास शहाणपण नव्हतें. यामुळें आठ पंधरा दिवसांच्या वाटेवर आपण दूर गेलों व मागें हैदरखानानें अकस्मात् येऊन दंगा केला तर प्रांत व ठाणीं संभाळण्याचें काम महिमाजीच्या हातून होईल हा भरंवसा मराठे सरदारांस पुरेना. यामुळें त्यांनीं सखाराम हरीजवळ बळवंतराव परभू म्हणून 'मर्द माणूस चांगला खटपट्या' होता त्यास महिमाजीचा जोडीदार नेमिलें व महमद इसफ म्हणून लष्करांत एक गारद्यांचा जमादार होता त्यास चारशें गारद्यांनिशीं तेथें ठेविलें. पुढें नारायणराव पेशव्यांचा खून करणाऱ्या सुमेरसिंग गारद्याचा जोडीदार म्हणून प्रसिद्धीस आलेला महमद इसफ तो हाच होय! इतकें झाल्यावर सारें लष्कर नीलगड, पावगडाकडे निघालें.

हैदरखान श्रीरंगपट्टणांत राहिला होता त्यानें प्यादे व गारदी यांची जमवाजमव करून व तोफखाना तयार करून बाहेर स्वारीस निघण्याचा आव घातला. आपण इकडे जाणार, तिकडे जाणार, हा किल्ला घेणार, तो तालुका लुटणार, याप्रमाणें कंड्या पिकविण्याची त्यानें सुरुवात केली. वस्तुतः या चातुर्मास्यांत मैदानांत येऊन मराठ्यांशीं गांठ घालण्याची त्याची इच्छा व शक्तिही नव्हती. कारण त्याची अर्धी अधिक फौज टिपूबरोबर होती व टिपू तर, तुंगभद्रेच्या दक्षिणतीरीं छावणी करून राहिला होता. तथापि हैदर अगदींच स्वस्थ बसला होता असें नाहीं. त्यानें लहान मोठ्या टोळ्या कोल्हार, होसकोटें, बाळापूर वगैरे मराठी मुलखांत लुटालूट करण्याकरितां पाठविल्या. या टोळ्यांचा बराच सुळसुळाट माजला होता त्यामुळें त्यांचें शासन करण्याचें काम मराठे सरदारांस आधीं करावें लागलें व सुदैवानें त्यांस तशी संधिही मिळाली. हैदरांची एक लहानशी फौज चिकबाळापुराकडे आली होती, ह्या फौजेंत एक हजार गारदी, दोन हजार कानडे प्यादे, सातशें स्वार व तीन

तोफा होत्या. तिनें चिकबाळापुराजवळ येऊन तळ दिला व त्या किल्ल्यावर तोफा मारण्यास सुरुवात केली. किल्ल्यांत जानराव धुळप सुभेदार होता त्याच्या व या फौजेच्या नित्य झटापटी होऊं लागल्या.
८ जून } याप्रमाणें आठ पंधरा दिवस लोटू देऊन धुळपानें हा सर्व प्रकार, गोपाळरावास लिहून पाठविला. ती बातमी येतांच पटवर्धन रास्ते व मुरारराव घोरपडे यानीं एका दिवसांत पंचवीस कोसांची मजल करून शत्रूच्या फौजेस गांठिलें. शत्रूचा तळ कोस दोन कोसांवर दिसूं लागतांच गोपाळराव सर्व फौज मागें टाकून निवडक चारशें स्वारांनिशीं शत्रूवर बेधडक तुटून पडला. गारदी पहिली रंजक झाडतात, तोफांचे पांच सात बार होतात तों गोपाळरावानें गारद्यांच्या रांगा फोडून तुडवून तोफा हिसकून घेतल्या. तों इतक्यांत मागून बाकीची फौज आली तिनें तोडातोडीस सुरुवात केली. शत्रूपैकीं जे लढाईस उभे राहिले ते जागच्या जागींच ठार मारिले गेले. कांहीं थोडे जखमी होऊन पडले. कांहीं थोडे पळून गेले. ज्यांनीं हत्यारें टाकून दांतीं तृण धरिलें त्यांवर मात्र कोणी वार केला नाहीं. शत्रूपैकीं ठार व जखमी झालेल्यांची संख्या एक हजारांवर होती. त्यांच्या तिनी तोफा, सर्व बंदुका, पांचशें घोडे व दारूगोळा वगैरे सर्व सामान मराठ्यांच्या हातीं लागलें. या फौजेची अशी दुर्दशा पाहिल्यावर शत्रूच्या बाकीच्या टोळ्या प्रांतांत लुटालूट करीत हिंडत होत्या त्यांनीं तत्काळ पळ काढिला.

पावसाळ्यांत कांहीं दिवस विश्रांति घेण्याचा पूर्वी निश्चय ठरला होता तो तहकूब होऊन त्रिंबकरावमामानें गुरमकोंडा प्रांत काबीज करण्याच्या उद्देशानें तिकडे स्वारी केली. आघाडीस गोपाळराव होता त्यानें गुरमकोंड्या भोंवतालचीं राचोटी, दुबळ, चांभारटेकडी, तळपूर, मदनपल्ली हीं ठाणीं घेतलीं व त्रिंबकरावमामानें खुद्द गुरमकोंड्यास वेढा घातला. मीररेजाचा पणजा गोंवळकोंड्याच्या बादशहाचा पाळींव मुलगा होता. असे मुलगे त्या बादशहानें अनेक पाळिले होते व मीररेजाचा पणजा हा त्यांपैकीं एक होता व त्यास त्या बादशहाकडून गुरमकोंडा जहागीर मिळाला होता. याप्रमाणें ही वंशपरंपरागत जहागीर मीररेजास प्राप्त झाली होती. हैदर-

नाईक उदयास येऊं लागला तेव्हां मीररेजानें तो प्याद्यांचा नाईक मूळचा होता किंवा त्याची जातकुळी कमी प्रतीची आहे इकडे लक्ष न देतां त्यास आपली बहीण दिली. पुढें हैदर अल्लीवर पेशव्यांनीं दुसरी स्वारी केली तेव्हां मीर हैदराचा पक्ष सोडून पेशव्यांच्या नोकरीस राहिला तेव्हां त्यांनीं त्याची गुरमकोंड्याची जहागीर त्याजकडे कायम ठेवून आणखी कांहीं जहागीर दिली. त्यानंतर मिरास पश्चाताप होऊन तो हैदराकडे पुनः मिळाला तेव्हां त्याची जहागीर जप्त करणें पेशव्यांस योग्य वाटलें. परंतु तो बेत तडीस नेण्यास त्यांस आजपर्यंत फुरसत मिळालीच नाहीं. मीररेजाचीं मुलेंमाणसें व सर्व चीजवस्त गुरमकोंड्याच्या किल्ल्यांत ठेविलेली होती व मराठी फौजेचा रोंख तिकडे फिरतांच त्यानें पुण्यास वकील पाठवून पेशव्यांशीं बोलणें लाविलें कीं, मला अभय मिळेल तर मी पुनः तुम्हांकडे येतों. पेशव्यांकडून त्यास जबाब मिळाला कीं, तुला अभय आहे इतकेंच नव्हे, तर तुला आम्हांकडून पूर्वीपेक्षां अधिक जहागीर मिळेल व तुझा दर्जा वाढविला जाईल. हा उत्तेजनाचा निरोप येतांच मीररेजाचें मन चलबिचल झालेंसें पाहून हैदरानें त्यास कैदेंत ठेविलें.

गुरमकोंड्यांत मीररेजाचा भाचा सैदुमिय्या म्हणून होता त्याजबळ तीन साडेतीन हजार उत्तम गारदी होते; व धान्य, दारूगोळा वगैरे सामानाचीही उणीव नव्हती. त्यानें निकरानें किल्ला झुजविण्याचा निश्चय केला. हैदरअल्लीकडून किल्ल्यास कुमक येण्याची भीति होती यास्तव तेथून दहा बारा कोसांवर श्रीरंगपट्टणच्या वाटेवर मामानें गोपाळरावास ठेविलें. वेढ्याचें काम जारीनें सुरू झालें. हुजरातीच्या फौजेचा एक मोर्चा स्वतंत्रच होता. त्याशिवाय रास्ते, आनंदराव गोपाळ, मुरारराव घोरपडे व हरपनहळ्ळीकर संस्थानिक यांचेही मोर्चे होते. किल्ल्याभोंवतीं खोल खंदक होता व तटबंदी मातीचीच परंतु रुंद व फार भक्कम होती. जागोजाग बुरूज होते त्यांवर तोफा ठेवून किल्लेकरी रात्रंदिवस मारा करीत होते.

आगष्ट—सपटें. } मराठ्यांच्या तोफा चांगल्या होत्या परंतु दारूचा परवठा कमी असल्यामुळें त्यांच्या तोफांचा विशेष यत्न चालला नाहीं. हुजरातीच्या लोकांनीं आपल्या मोर्चातून सुरुंग खणून तो खंद-

काखालून नेऊन तटबंदीच्या एका बुरजास लाविला व तेथें दारूचे बुधले ठेवून त्यांस बत्ती दिली. तत्क्षणीं तो सबंध बुरूजचा बुरूज उडून ढांसळून पडला व त्यावर आंतील पांच पन्नास माणूस उभें होतें तें जागच्या जागीं ठार झालें. त्याबरोबर हुजुरातवाले हिय्या करून त्या ढासळलेल्या बुरजाच्या शिखरावर चढले व तेथेंच त्यांनीं आपली जागा कायम केली. त्यांस तेथून हुसकून लावण्याकरितां सैदुमिय्यानें चार दिवस निकरानें झुंज केलें परंतु त्यांनीं आपली जागा सोडिली नाहीं. परंतु तितक्या अवकाशांत किल्लेकऱ्यांनीं बुरजापासून कांहीं अंतरावर आंतल्या बाजूनें तितक्यापुरती नवी भिंत उभी केली ! वेढा घालणारांचे आणखी पांच सुरुंग होत आले होते. आतां दारू मुबलक मिळाली असल्यामुळें त्यांच्या तोफा सुरू झाल्या व त्यायोगानें आंतील इमारती दररोज ढांसळत होत्या व शेंकडों माणसें मरत होतीं. किल्ल्यांत धान्य संपल्यामुळें लोक आतां गुरें व घोडीं खाऊन प्राण जगवीत होते. हैदराकडून कुमक येईल ही सैदूमिय्यास आशा होती; परंतु वेढा बसून अडीच महिने झाले तरी हैदराकडून कुमक पोंचली नाहीं. यामुळें निराश होऊन त्यानें मुराररावामार्फत मामाजवळ कौल मागितला. तेव्हां असें ठरलें कीं, किल्ल्यांतील लोकांनीं आपलीं कुटुंबें वरतवानी व हत्यारें यांसुद्धां किल्ल्याबाहेर यावें व ते सांगतील त्या स्थळीं मराठ्यांनीं त्यांस सुरक्षितपणें पोंचतें करावें. याप्रमाणें करार ठरून तो अमलांत आल्यावर कार्तिक शुद्ध प्रतिपदेस मराठ्यांचें निशाण गुरमकोंड्यावर चढलें. भोंवतालचीं सर्व ठाणीं व तालुकेही फारसा प्रयास न पडतां स्वाधीन झाले. या नवीन जिंकिलेल्या प्रांताचें उत्पन्न सालिना वीस लक्ष रुपयांचें होतें.

१८ आक्टोबर

गुरमकोंड्यास वेढा बसल्यावर हैदरखानाची कांहीं फौज माकलीदुर्गाजवळ येऊन उतरली होती; तिचा मुकाबला घेण्यासाठीं त्रिंबकरावमामानें सखाराम हरीस पाठविलें होतें व निंबाळकर व ढमढेरे हे सरदार त्याच्या मदतीस दिले होते. सखाराम हरीनें शत्रूच्या त्या फौजेस पिटून काविलें इतकेंच नाहीं, तर उलट शत्रूच्या मुलखांत शिरून बेंगरुळपर्यंत लुटालूट करण्याची पराकाष्ठा केली. त्याच्या स्वारीमुळें खुद्द बेंगरुळांतही कांहीं वेळपर्यंत

गडबड उडाली होती.

श्रीरंगपट्टणाहून गुरमकोंड्याच्या कुमकेस फौज येईल म्हणून गोपाळराव त्या वाटेवर तळ देऊन राहिला होता हें मागें सांगितलेंच आहे. तेथें तो राहिला असतां हैदरअलीचे चंद्रोजी जाधव, बाळाजीपंत व सैदमहमद नांवाचे तिघे सरदार सुमारें चार हजार स्वार, कांहीं गारदी, तोफा व जेजाला घेऊन आले व मराठी कर्नाटकांत शिरून लुटालूट करूं लागले. तें वर्तमान गोपाळरावास समजतांच त्यानें त्यांचा पाठलाग करून पुंगनुरापाशीं त्यांस गांठिलें. त्यांच्या पिछाडीस रान होतें व एका बाजूस तलाव होता. त्या ठिकाणीं ते लढाई देण्याच्या उद्देशानें उभे राहिले असतां गोपाळरावानें हल्ला करून ती फौज मोडून उधळून दिली. सैदमहंमद पळून गेला व चंद्रोजी व बाळाजीपंत पाडाव झाले. सात आठशेंपर्यंत गारदी व प्यादे ठार मारिले गेले. बाकीचे लोक रानोमाळ पळत सुटले. त्यांच्या सर्व तोफा व जेजाला, अडीच हजार बंदुका, तीनशें घोडे व आणखी पुष्कळ इतर सामान मराठ्यांच्या हातीं लागलें. चंद्रोजीच्या ताब्यांत कित्येक ठाणीं होतीं, तींही लवकरच मराठ्यांच्या हातीं आलीं.

पेशव्यांची शरीरप्रकृति उत्तम नव्हती व ते वारंवार आजारी पडत याविषयीं पूर्वी एक दोनदां उल्लेख आलाच आहे. गेल्या वर्षींच्या स्वारीस निघण्यापूर्वी त्यांची तब्येत बिघडली होती त्याचें कारण भोंसल्यावरच्या स्वारींत त्यांस फार श्रम सोसावे लागले होते हें होय. पर्जन्यकाळ संपतां संपतां त्यांस बरें वाटूं लागल्यामुळें ते ' या हैदरअलीवरच्या तिसऱ्या स्वारी ' स निघाले. याही स्वारींत अतिशय मेहनत पडून त्यांची प्रकृति पुनः बिघडली. त्यामुळें छावणीस न राहतां ते पावसाळ्याच्या प्रारंभीं पुण्यास आले. तेथें आल्यावरही त्यांच्या मनास स्वस्थपणा मिळाला नाहीं. हैदरअलीचें पारिपत्य कसें होईल हाच विचार त्यांच्या मनांत एकसारखा घोळत होता. दरबारी कामाच्या इतर भानगडीही पुष्कळच होत्या. गतवर्षी धुळपाकडून आरमाराचें काम काढून त्यांनीं तें मोत्याजीराव विचारे याजकडे दिलें होतें हा मोत्याजीराव व बाळाजीपंत पाटे गेल्या पौष महिन्यांत आरमारावर दोन महिन्यांची अडशेरी चढवून स्वारीस गेले होते

त्यांचें तीन महिनेपर्यंत कांहीं वर्तमान कळलें नव्हतें. आरमार रामेश्वरापलीकडे गेलें होतें व तेथें त्याची फ्रेंच व डच लोकांच्या आरमाराशीं गांठ पडली होती असें वर्तमान पुण्यांत उठलें होतें. परंतु पुढें काय झालें याविषयीं उल्लेख सांपडत नाहीं. पुढें लवकरच आरमाराच्या कामाची जी घालमेल झाली त्यावरून या स्वारीची व्यवस्था पेशव्यांस आवडली नसावी असा तर्क करण्यास जागा आहे. त्यांनीं विचारे याजकडून तें काम काढून पुनः धुळपाकडे दिलें. शिवाय चिकबाळापुरचा सुभा त्याजकडे गेल्या वर्षी देण्यांत आला होता तेंही काम त्याजकडेच राहिलें.

श्रावण महिन्यापासूनच मालबंदीची धडामोड सुरू होऊन शिलेदार लोकांच्या झुंडी चोंहोंकडून पुण्यास येऊं लागल्या. याचें कारण पेशव्यांच्या जिवास अमळ बरें वाटूं लागतांच यंदांही स्वतःच स्वारीस जाण्याचा त्यांनीं आपला इरादा असल्याचें जाहीर केलें होतें. यामुळें स्वारीची तयारी मोठ्या उत्साहानें व जलदीनें करण्यांत येत होती. पंधरा हजार नवीन गारदी चाकरीस ठेवण्याचा श्रीमंतांचा बेत होता व त्याप्रमाणें पठाण, आरब, हबशी, रोहिले वगैरें जातीचे गारदी चाकरीस ठेवण्यांत येत होते. तोफा ओतण्याचा कारखाना जारीनें सुरू होऊन कित्येक चाळीस चाळीस शेरी गोळ्यांच्या तोफा ओतविण्यांत येत होत्या. कित्येक युरोपियन गोलंदाज हुशार व कसबी असे पाहून चाकरीस ठेवण्यांत येत होते. यंदांच्या स्वारींत बिदनूर काबीज करण्याचा बेत असल्यामुळें त्या प्रांतांचें रान तोडून काढण्यासाठीं सरकारांतून दहा हजार कुऱ्हाडे तयार करवून रानतोडे लोकांच्या जमाती यंदां मुद्दाम नवीन चाकरीस ठेविल्या होत्या.

पुण्यांत चालू असलेल्या या चळवळीचा परिणाम अन्यत्रहि झाल्याशिवाय राहिला नाहीं. मावळे लोकांच्या पायदळावरचा त्रिंबक सूर्याजी या नांवाचा एक सरदार व वाडीकर सांवत यांनीं सोंध्यावर स्वारी केली. आरमारानें जाऊन होनावर व मलबार किनाऱ्यावरचीं कित्येक बंदरें घेतलीं. हरिहरचा मामलेदार लक्ष्मणराव बागू यानें बसवापट्टण तालुक्यापैकीं साठ गांव घेतले. गतवर्षाप्रमाणेंच यंदांही नागपुरकर भोंसले व निजामअली यांची फौज पेशव्यांस येऊन मिळण्याकरितां तयार होऊं लागली.

या सर्व चिन्हांवरून व पेशव्यांच्या फौजेच्या जय्यत तयारीवरून हैद-रानें ताडिलें कीं यंदां आपला पुरता नाश होण्याचा प्रसंग येणार आहे. हें भय त्याच्या पोटांत उत्पन्न होतांच, त्यानें आपाजीराम यास तह ठरविण्याकरितां तत्काळ पुण्यास रवाना केलें. आपाजीराम यास कसेंही करून पेशवे म्हणतील त्या शर्तींवरसुद्धां एकदांचा तह ठरवून टाकावा असें हैद-रानें सांगितलें होतें. तथापि तो वकील फार चाणक्ष होता. पुण्याहून श्रीमंतांची स्वारी निघण्यापूर्वीं जरी तो तेथें दाखल झाला होता तरी पहिल्या भेटींत त्यानें ज्या शर्तींवर आपण तह करण्यास कबूल आहों म्हणून सांगितलें त्या शर्ती गतवर्षाच्याच होत्या! स्वारीस निघण्याचे दिवस जवळ येऊं लागले तेव्हां आप्पाजीरामाच्या बोलण्यांत फरक पडूं लागला व श्रीमंतांस आशा उत्पन्न झाली कीं, यंदां कृष्णा उतरण्यापूर्वींच हैदराशीं आपल्या मनाप्रमाणें तह ठरून स्वारीची यातायात चुकेल.

विजयदशमीच्या मुहूर्तावर पेशवे डेरेदाखल होऊन गुल्टेकडीवर मुक्काम करून राहिले. तेथून निघून फौज जमा करीत करीत जेजुरीवरून वांईस आले, तों नागपुराहून बिंबाजी भोंसले चार हजार फौजेसह येऊन त्यांस मिळाला. परंतु त्यांस जें दुखणें जडलें होतें तें क्षयरोगाचें पूर्वस्वरूप होतें त्यामुळें मध्येंच कांहीं दिवस बरें वाटावें, पुनः तब्बेत बिघडावी याप्रमाणें होऊं लागलें. हल्लीं त्यांस ज्वर येऊं लागला व पोटांत तिडीक उठूं लागली. शक्तीचा ऱ्हास होऊं लागला. अन्नावर वासना नाहींशी झाली. तांदुळवाडीच्या मुक्कामीं तर त्यांचा इतका थाखा झाला होता कीं, आतां हे यांतून उठतील असें कोणासही वाटलें नाहीं. परंतु ती वेळ निभावली व ते आणखी कांहीं मजला पुढें आले. तथापि यंदाच्या स्वारीस जाण्याची आपल्या शरीरांत ताकद नाहीं हें त्यांस कळून चुकलें व त्यांचें मन फार विरस झालें. अशा स्थितींत हैदरअली जर पन्नास साठ लक्ष रुपये खंडणी देईल व गतवर्षीं व त्याच्या पूर्वीं आपण जिंकिलेला सर्व मुलूख आपणाकडे निर्वेधपणें रहात असेल तर एकदां पक्का तह ठरवून या मसलतींतून आपण मोकळें व्हावें असेंही त्यास

सपटें.—दिसें. } बाटूं लागलें. परंतु तहाची गोष्ट निघाली म्हणजे तो आपाजीराम कांहीं गुळमुळीत व घरसोडीचीं उत्तरें देई. त्यास पक्कें माहीत होतें कीं, जर पेशवे स्वतः कर्नाटकच्या स्वारीस आले नाहींत तर मराठ्यांची किती कां फौज असेना, आपल्या धन्यास कांहीं घाबरावयास नको! श्रीमंतांची स्वारी बांईहून निघून रहिमतपुरावरून मिरजेपासून आठ दहा कोसांवर रामापूर कमळापूरपर्यंत आली. तेथें आठ मुक्काम झाले. त्यांच्या शरीरीं दिवसेंदिवस अधिक अधिक क्षीणता भासूं लागली यामुळें पुढें जाण्यांत कांहीं उपयोग नाहींसें पाहून त्यांनीं आपले बंधु नारायणराव यांजबरोबर कर्नाटकांत फौज पाठवून देऊन आपण परत पुण्यास जावें असा बेत केला. पुढें तोही बेत रहित होऊन असें ठरलें कीं दोघांनींही परत जावें. श्रीमंत परत जातात असें पाहिल्याबरोबर आपाजीरामाच्या आजपर्यंतच्या बोलण्याचा एकदम रंग बदलला! तो ह्मणूं लागला कीं, सालाबादप्रमाणें आपण खंडणी देऊं, पण आमचा मुलूख आजपर्यंत श्रीमंतांनीं जितका घेतला आहे तितका सर्व परत द्यावा. तो परत दिल्याबद्दल आणखी चौदा लक्ष रुपये दरसाल देण्यास आपण तयार आहों! हें बोलणें श्रीमंतांनीं अर्थातच मान्य केलें नाहीं. त्यांनीं आज चार वर्षे जिवापाड मेहनत करून जिंकिलेला मुलूख आतां ते परत देतील हें घडणेंच शक्य नव्हतें. मग हैदरासारख्या दगाबाज मनुष्यानें दाखविलेल्या चौदा लक्ष रुपयांच्या लालचीवर ज्याचें उत्पन्न पाऊण कोट रुपये येण्याजोगें होतें असा मुलुख परत देण्याची गोष्ट कशाला पाहिजे! तह ठरत नाहींसें पाहून त्यांनीं आपा बळवंत व मल्हारराव घानशे यांबरोबर दहा हजार स्वार, पंधरा हजार गारदी व बहुतेक तोफा देऊन त्यांस कर्नाटकांत रवाना केलें व शिवाजी भोंसल्यास नागपुरास जाण्यास निरोप देऊन आपण हळू हळू दोन दोन कोसांच्या मजला करीत परत पुण्यास गेले. ( ख. १७७१ जाने. )

सन १७६३।६४ त पेशव्यांनीं कोल्हापूरकरांपासून चिकोडी व मनोळी हे दोन परगणे घेतले होते व ते पांच वर्षे आपणाकडे ठेवून पुनः कांहीं शर्तींवर परत दिले होते. त्या शर्तीप्रमाणें कोल्हापूरकर वागले नाहींत.

यामुळें पुनः ते परगणे ताब्यांत घेण्याचा त्यांनीं निश्चय केला व कार्तिकांत रामचंद्र नाईक परांजपे व भिवराव पानशे यांबरोबर सहा हजार फौज व कांहीं तोफा देऊन त्यांस या कामावर पाठविलें. धारवाडास नरसिंगराव धायगुडे व शहाजी भोंसले होते त्यांसही या फौजेस येऊन मिळण्याविषयीं श्रीमंतांचें पत्र गेल्यावरून ते येऊन येडूर मांजरीच्या मुक्कामीं मिळाले. नंतर त्या फौजेनें चिकोडी परगण्यांतील तमाम ठाणीं घेतलीं व एकसंबें, भोज व कागल हस्तगत करून कोल्हापुराजवळ येऊन तळ दिला. तेव्हां कोल्हापुरकरांनीं चिकोडी व मनोळी या परगण्यांच्या सोडचिठ्या देऊन व स्वारीखर्चाकरितां एक लक्ष दहा हजार रुपये देऊन तह केला. मग पानशे व परांजपे परत पुण्यास गेले आणि धायगुडे व भोंसले धारवाडास जाऊन पुढें तसेच कर्नाटकांत त्रिंबकराव मामाच्या फौजेस जाऊन मिळाले. कवडे भापकर व शितोळे यांचीं पथकें धारवाडास ठेविलेलीं होतीं तींही तिकडेच गेलीं.

गुरमकोंडा काबीज झाल्यावर त्रिंबकराव मामा कोल्हार व मुलबागलच्या सरहद्दीवर कांहीं दिवस मुक्काम करून राहिला. तितक्या अवधींत अर्काटचा नबाब व मद्रासकर इंग्रज यांची कुमक मिळविण्याकरितां त्यानें त्यांजकडे माधवराव जाधवराव यास वकिलीस पाठविलें. गतवर्षीं त्यांशीं पेशव्यांचें याचसंबंधें बोलणें होत होतें. परंतु कुमकेस येतों येतों म्हणून नाद लावण्यापलीकडे त्यांच्या हातून कांहीं एक झालें नाहीं. यंदांही याचप्रमाणें टाळाटाळ करण्याचा त्यांचा बेत होता. सन १७६१ त इंग्रजांचा हैदरांशीं तह झाला तेव्हां असें ठरलें होतें कीं, परचक्र आलें असतां एकमेकांनीं एकमेकांचें साहाय्य करावें. त्यानंतर मराठ्यांची स्वारी आपणावर होत आहेसें पाहून वरील ठरावाप्रमाणें हैदरानें इंग्रजांजवळ कुमक मागितली. परंतु मराठ्यांशीं वैरभाव उत्पन्न करून आपलें चालावयाचें नाहीं असें इंग्रजांस त्यावेळीं वाटत असल्यामुळें त्यांनीं हैदरास मदत दिली नाहीं. त्याचा परिणाम असा झाला कीं, हे इंग्रज लोक वचनाचे खोटे व कपटी आहेत असा हैदराचा जो एकदांचा ग्रह झाला तो कायमचा झाला व त्यापासून पुढें अनेक कलागती निर्माण होऊन दोहीं पक्षांस विपत्ति व हानि सोसावी

लागली. इंग्रजांची कुमक मिळत नाहीं व श्रीमंतही थंदां कर्नाटकांत येत नाहींत असें पाहून त्रिंबकराव निरुत्साह झाला होता असें मात्र नाहीं. कसेंहीकरून या हैदरास वठणीस आणीन हाच त्याचा निश्चय अद्यापि कायम होता. कुमकेविषयीं इंग्रजांशीं त्याचें बोलणें चालू होतें त्यावेळच्या एका पत्रांत तो लिहितो कीं, " इंग्रजांचें ( राजकारण ) ठीक झाल्यास फारच उत्तम. न झाल्यास खांद्यावर भाला टाकून तमाम मुलूख उलथा पालथा घालूं. घांटाखालीही फौज उतरून तोही मुलूख मारून ताराज करूं. तो [ हैदरअल्ली ] कोणीकडे म्हणून थांबेल ! "

त्रिंबकराव कोल्हार प्रांतीं असतां गोपाळराव आपली फौज घेऊन अदवानीकडे आला. तिकडे त्यास जाऊं देण्याचें त्रिंबकरावाच्या मनांत नव्हतें. परंतु गोपाळराव त्याचें न ऐकतां आला. अदवानीकडे येण्याचें कारण असें होतें कीं, सन १७६७ त तेथील नबाबाकडून जी खंडणी यावयाची होती ती पेशव्यांनीं गोपाळरावानें कांहीं अधिक फौज ठेविली होती तिच्या खर्चाकडे लावून दिली होती. परंतु त्या रकमेपैकीं गोपाळरावास आजपर्यंत कांहीं मिळालें नव्हतें व जबरदस्तीनें वसूल करण्यास फुरसतही सांपडली नव्हती. हल्लीं त्यांस पैक्याची फारच जरूर पडल्यामुळें तो मुलुखगिरीचीं सर्व कामें एकीकडे ठेऊन अदवानीस आला. तेथें येतांच त्यानें फौजेची जरब दाखवून नबाब बसालतजंग याजकडून एकंदर रक्कम वसूल केली. नंतर तो कनकगिरीस येऊन कांहीं दिवस मुक्काम करून राहिला. गेल्या दोन वर्षांत त्यास मुलूखगिरीचे अनेक हाल व संकटें सोसावीं लागलीं व त्यामुळें त्याचें शरीर फार क्षीण झालें. त्यांतच त्यास जलोदराची व्यथा निर्माण होऊन ती दिवसेंदिवस बळावत चालली. कनकगिरीच्या मुक्कामीं त्यांस आतां आपण या दुखण्यांतून वांचत नाहीं असें पक्कें कळलें. तेव्हां मिरजेस गोविंद हरीस त्यानें पत्र लिहून पाठविलें कीं, मरणापूर्वीं आपलें पायांचें दर्शन घ्यावें अशी फार इच्छा आहे. याकरितां बंधूंपैकीं कोणास तरी इकडे पाठवून द्याल तर त्याच्या हवालीं हें लष्कर करून मी घरीं येईन. गोपाळरावास वामनराव, पांडुरंगराव व गंगाधरराव असे तिघे बंधू होते. पैकीं शेवटचे दोघे लष्करी पेशाचे मनुष्य

कोल्हे.-दिसें.

नसल्यामुळें मुलुखगिरीच्या कामास निरुपयोगी होते. तेव्हां राहतां राहिला वामनराव. पण तोही दमेकरी असल्यामुळें एकदां जेवून व पथ्यपाण्यास फारफार जपून आपल्या शरीराचें रक्षण कसें होईल याच विवंचनेंत चूर असे. आतां आठ हजार स्वारांच्या सरदारीचें जोखीम शिरावर घेऊन उन्हातान्हांतून व थंडीवाऱ्यांतून परदेशीं भटक्या मारीत हिंडण्याचें व लढाईचे श्रम सोसण्याचें काम त्याजवर पडलें! पण तें न पतकरून

१७ जाने. १७७१ } काय करतो! तो मिरजेहून निघून लष्करांत जाऊन पोंचला तों गोपाळरावाचा वाग्या फारच झाला होता. तथापि त्यास त्यानें तशाच स्थितींत मिरजेस रवाना केलें. तेथें तो पौष वद्य चतुर्दशीस आला व तिसरे दिवशीं म्हणजे माघ शुद्ध द्वितोयेस मरण पावला.

गोपाळराव हा शरीरानें सडपातळ: व मध्यम उंचीचा मनुष्य होता. त्याचा स्वभाव आनंदी व उत्साही असे. हातखालच्या लोकांचें मनोधारण करण्यांत तो दक्ष असे व आप्तइष्टांविषयीं ममताळू असे. तो मानी, शूर व तल्लख सरदार होता. त्याइतकी कर्नाटक प्रकरणीं माहिती मराठी राज्यांत मुरारराव घोरपड्याखेरीज कोणाही सरदारास नव्हती. तिकडील सर्व संस्थानिकांवर त्याचें वजन व दरारा असे. हैदरही त्यास मानीत असे. अलीकडे पेशवेही कोणच्याही मोठ्या मसलतींत त्याचा सल्ला घेत. त्याशिवाय कांहीं करीत नसत. मरणसमयीं त्याचें वय पन्नासांच्या आंत बाहेर असावें. त्याच्या मृत्यूची पेशव्यांस बातमी समजली तेव्हां त्यांनीं चार दिवस चौघडे बंद करविले व त्या अवधींत दरबार भरण्याचें मना केलें.

वामनरावास त्रिंबकरावानें जलदीनें निघून येण्याविषयीं पत्र पाठविलें, तेव्हां तो कनकगिरीहून निघून थोरल्या लष्करास देवरायदुर्गाच्या मुक्कामीं मिळाला. मागच्या सालीं श्रीमंतांनीं जरी हा किल्ला घेऊन पाडून टाकिला होता, तरी अलीकडे हैदरानें त्याची दुरुस्ती करून व दुसरीं कित्येक ठाणीं व किल्ले पेशव्यांनीं पाडिले होते त्यांचीही डागडुजी करून त्यांत फौज ठेवून भोंवतालच्या मुलखास उपद्रव देण्याची सुरुवात केली होती. हल्लीं त्रिंबकरावानें पुनः वेढा घालून देवरायदुर्ग घेतला व त्याबरोबरच

मालकीदुर्ग व उत्तरदुर्गही घेतले. याप्रमाणें होतांच बाकीचे किल्ले व ठाणीं टाकून हैदराचे लोक पळून गेले.

हैदरखान जर नम्र होऊन तह करीत नाहीं तर यापुढें दरवर्षी त्यावर स्वारी पाठवून त्याचा मुलूख ताब्यांत घेत जावा म्हणजे तो आपोआप हीनबल होईल हा पेशव्यांनीं गतवर्षींच निश्चय केला होता. यंदा शरीरीं समाधान नसल्यामुळें त्यास जरी स्वतः स्वारीस येववलें नाहीं, तरी त्यावेळीं त्यांनीं त्रिंबकरावास पत्र लिहिलें होतें कीं, "ज्याअर्थी हैदरखान सरळपणानें वागत नाहीं त्याअर्थी त्याच्या पारिपत्याचा क्रम धरिला आहे कीं, दरसाल त्याचा मुलूख सोडवीत जावा. असें करितां मसलतीस दिवसगत लागली तरी काय चिंता आहे! चहूं महिन्यांत मसलत शेवटास जाणें ती आठा महिन्यांत जाईल. आठा महिन्यांत जाणें ती दीड वर्षानें जाईल. परंतु या शत्रूचें पारिपत्य केल्याविना चैन पडणार नाहीं!" या 'तिसऱ्या' स्वारींत हैदराचें अर्धें राज्य आजपर्यंत काबीज करण्यांत आलेंच होतें. बाकी राहिलें तेंही साधेल त्याप्रमाणें घ्यावें. या उद्देशानें श्रीमंतांनीं त्रिंबकरावास लिहून पाठविलें कीं, हल्लीं तुम्हांकडे फौज, गारदी व तोफखाना आपा बळवंताबरोबर पाठविला आहे यास मिळवून घेऊन तुह्मी बिदनुरावर स्वारी करावी. हा हुकूम येतांच त्रिंबकराव देशींहून फौज येत होती ती मिळवून घेण्याकरितां उत्तरेस तुमकूरच्या रोखें कूच करून चालला. महाराष्ट्रांतून फौज येत होती ती मिळण्यापूर्वीच त्रिंबकरावावर छापा घालावा म्हणून हैदर मागडीच्या आसपासच्या विकट रानांत येऊन राहिला. एक दोन वेळां रात्रीचा समय साधून त्यानें मराठ्यांच्या लष्करासमीप फौज आणिली होती परंतु तें लष्कर फार मोठें व सर्व प्रकारें सावध असल्यामुळें छापा घालण्याची त्याची मसलत साधली नाहीं. तुमकूर येथें दोन्ही फौजा एकत्र झाल्या. मग मराठ्यांचा हा सेनासमुद्र पश्चिमेस वळून जातां जातां बेलूरचा किल्ला घेऊन कडूर बाणावराकडे गेला. ती दोन्ही ठाणीं हातीं आल्यावर, बाणावरापासून तीन कोसांवर गर्दनगड किल्ला आहे तो घेण्याकरितां वामनराव पटवर्धन गेला. जातांच त्यानें

फेब्रुवारी } हल्ला केला, परंतु किल्लेकऱ्यांनीं त्याचे बरेच लोक ठार व जखमी करून हल्ला मारून काढला. दुसरे दिवशीं आपली फौज घेऊन त्रिंबकराव मामा आला, त्यानेंही हल्ला केला. परंतु याही खेपेस किल्लेकरी अशा शौर्यानें लढले कीं मराठ्यांस मागें हटावेंच लागलें. नंतर मामानें मोर्चेबंदी केली व तोफा सुरू केल्या तेव्हां यापुढें आपला निभाव लागत नाहींसें पाहून किल्लेकरी कौलास आले व हत्यारांसुद्धां बाहेर पडून त्यांनीं किल्ला मामाच्या हवालीं केला. यानंतर मराठी लष्कर चेनगिरीवरून शिमोग्याच्या रोखें कूच करून चालले.

मराठ्यांचा बिदनूर प्रांतावर फार दिवसांपासून डोळा आहे हें हैदरास माहीत होतें. आजपर्यंत त्यांचा उपद्रव तिकडे न लागल्यामुळें तेथील रयतेची स्थिति भरभराटीची होती. शिवाय तो हैदराचा आवडता प्रांत होता. तो हातीं आल्यापासून त्याचें एश्वर्य वाढतां वाढतां तो हल्लीच्या स्थितीला आला होता. बाकीचा मुलूख म्हैसूरच्या राजाचा आहे पण बिदनूर हें माझें ‘ स्वराज्य ’ आहे असें तो म्हणत असे. तेव्हां अशा त्या प्रांतावर मराठ्यांची स्वारी होत असलेली पाहून हैदराच्यानें स्वस्थ कसें बसवेल! मैदानांत तर त्यांच्याशीं लढून आपला निभाव लागणार नाहीं, पण ते बिदनूरच्या झाडींत शिरून टोळ्याटोळ्यांनीं चोंहोंकडे पसरले म्हणजे त्यांस त्या झाडींत कोंडून छापे घालघालून हैराण करावें असा त्यानें बेत केला. मग तो पंचवीस हजार गारदी, आठ हजार स्वार, पंचेचाळीस तोफा, शिवाय जेजाला व बाणांचे उंट इतकी सेना बरोबर घेऊन श्रीरंगपट्टणांतून बाहेर पडला तो पांच कोसांवर मेलकोटा येथें येऊन राहिला. मराठ्यांची फौज कांहीं तरीकेऱ्यास होती व कांहीं चेनगिरी वगैरे ठिकाणीं होती. हैदर बाहेर पडल्याची बातमी येतांच त्रिंबकरावानें सर्व फौज एकत्र गोळा केली. मग सरदार लोकांचें कौन्सिल भरून सर्वानुमतें मसलत ठरली कीं, आपण येथून आतां बिदनुराकडे न जातां एकदम मागें उलटून हैदर मेलकोट्यास आहे तोंच त्यास जाऊन गांठावें. याप्रमाणें बेत ठरल्यावर हैदर कोठें कसा उतरला आहे, त्याच्या हालचाली काय चालल्या आहेत ही बातमी काढण्याकरितां त्रिंबकरावमामानें हजार

दोन हजार स्वारांची टोळी पाठविली. त्या टोळींत सखाराम हरी मुख्य होता. या सखाराम हरीच्या धाडसास कांहीं मर्यादाच नव्हती. तो हजूव फक्त तीनशें स्वारांनिशीं शत्रूच्या लष्करासमीप गेला व त्या लष्करची कही मरून परत चालली होती तिजवर अकस्मात् पडून तीपैकीं कांहीं हत्ती उंट व पांच सात हजार बकरीं त्यानें लांबविलीं ! तेथून तो नाहींसा झाला तो तीन कोसांवर नागमंगल आहे तेथें उमटला. शत्रूचें जंगी लष्कर इतकें समीप आहे याविषयीं पर्वा न करितां तें शहर त्यानें स्वस्थपणानें लुटून फस्त केलें. प्रथम कही लुटली गेल्याची ओरड हैदराकडे गेलीच होती व नंतर नागमंगल लुटल्याचीही बातमी गेली, तेव्हां तेथून गडबडीनें फौज धांवून आली. तिचे नगारे ऐकूं येऊं लागले व तोफेचे एक दोन बारही झाले तेव्हां सखाराम हरी तेथून बेंळूरास गेला. तेथें त्याबरोबर आलेले बाकीचे दीड हजार स्वार होते. त्याच ठिकाणीं मुक्काम करून त्यानें त्रिंबकरावमामास अति त्वरेनें सर्व फौजेसह निघून येण्याविषयीं पत्र पाठविलें.

तें पत्र फाल्गुन वद्य द्वितीयेच्या दिवशीं सायंकाळीं त्रिंबकरावमामास पोंचलें. लागलीच कूच करून जाण्याची तयारी होऊं लागली. मध्यरात्रीस पटवर्धनांचीं तिन्ही पथकें, नरसिंगराव घाटगे, आनंदराव गोपाळ, गायकवाडांचें पथक, पांच सात हजार हुजरातीसह आपा बळवंत मिळून एकंदर वीस बेवीस हजार फौज निघाली ती वीस कोसांची मजल मारून दुसऱ्या दिवशीं तिसऱ्या प्रहराच्या सुमारास हैदरखानाच्या गोटासमीप पोंचली. अघाडीस पटवर्धन होते व कांहीं हुजरातीचे व गायकवाडाकडीलही लोक होते. त्यांनीं आल्याबरोबर हैदरअल्लीच्या गोटावर हल्ला केला. तो डोंगराचा व झाडीचा आसरा धरून मोठ्या बिकट जाग्यांत राहिला होता, तथापि त्यांनीं बेधडक त्याच्या गोटावर घोडीं घातलीं. तेव्हां तोही आपले स्वार, पायदळ, तोफा व जेजाला घेऊन तयार होऊन लढाईस आला. चार घटका तुंबळ युद्ध होऊन त्यांत मराठ्यांचे जरी बरेच लोक पडले तरी त्यांनीं शत्रूच्या फौजेंत शिरून कत्तल करून दोन तीनशें घोडे पाडाव करून आणिले. तों अस्तमा-

नाचा समय झाला म्हणून शत्रूचा गोट सोडून मराठे मागें हटले. इकडे तोफखान्यास जलदी जलदीनें मागून यावयास सांगून त्रिंबकरावमामा बाकीचें सैन्य घेऊन अरुणोदयीं निघाला होता तो याच वेळीं येऊन पोंचला. या खेपेस त्रिंबकरावाचा हल्ला होण्याची वाट न पहातां हैदरअल्ली स्वतःच पंधरा तोफा घेऊन गोटाबाहेर आला व या नवीन आलेल्या फौजेवर मारा करूं लागला. तेव्हां तीही हल्ला न करितां मागें सरून उभी राहिली. तो रात्रीं श्रीरंगपट्टणास पळून जाईल म्हणून त्या मार्गावर म्हणजे दक्षिणेस पटवर्धन व घायगुडे जाऊन राहिले. उत्तरेस व पूर्वेस अनुक्रमें आपा बळवंत व त्रिंबकराव यांनीं जागा धरिली. याप्रमाणें तीन बाजूंनीं हैदरअल्लीस मराठ्यांनीं जखडून धरिलें. पश्चिमेस दाट झाडी होती तेवढी बाजू मात्र त्याला मोकळी राहिली.

हैदरअल्लीजवळ आगीचें बळ मोठें असल्यामुळें जरी मराठ्यांनीं त्यास कोंडून धरिलें होतें तरी दोन दिवसपर्यंत त्यांनीं त्याजवर हल्ला केला नाहीं व त्यांच्या भीतीनें तोही गोटाबाहेर पडला नाहीं. तिसरे दिवशीं पश्चिमेकडे झाडी होती त्या वाटेनें त्यास रसद पोंचत होती ती बंद करावी व त्या वाटेनें तो बिदनुराकडे पळून जाईल तर त्यास अडवावें म्हणून फक्त पांच चारशें लोकांची टोळी दक्षिणच्या चौकीवर ठेवून पटवर्धन, घायगुडे, गायकवाड व आनंदराव गोपाळ पश्चिमेचा मार्ग रोखून उभे राहिले. त्यांबरोबर कांहीं हुजरातही होती. त्यांनीं त्या दिवशीं हैदराची रसद नित्याप्रमाणें त्या वाटेनें भरून आलीसें पाहून ती लुटून फस्त केली व तिजबरोबर हत्ती, घोडे, उंट होते ते पाडाव करून आणिले. रसद बंद झाल्याबरोबर त्याच्या लष्करांत नाचणीचें पीठ रुपयास तीन शेर विकूं लागलें! त्याच दिवशीं मराठ्यांचा तोफखाना मागें राहिला होता तोही येऊन दाखल झाला. तो येतांच त्रिंबकरावानें एका टेंकडीवर तोफा चढवून शत्रूच्या लष्करावर जबरदस्त मारा सुरू केल्यामुळें त्यास 'हे माय धरणीठाय' होऊन गेलें. असें झालें तेव्हां येथें मार खात उपाशीं मरण्यापेक्षां आतां वाटेनेंच काय होईल तें होवो, पण आज रात्रीं श्रीरंगपट्टणास जावयाचें असा त्यानें निश्चय केला. तें शहर तेथून पांच

कोस होतें. त्याच्या जाण्याची चाहूल मराठ्यांस जर वेळेवर न कळती तर कदाचित् फारसें नुकसान न होतां तो मुक्कामास जाऊन पोंचता. परंतु ज्याअर्थी रस्त बंद झाल्यामुळें तो उपाशीं मरूं लागला आहे, व आपल्या तोफाही त्याजवर चांगल्या लागू झाल्या आहेत, त्याअर्थी आतां तो श्रीरंगपट्टणास निसटून जाण्याचा यत्न करील हें मराठ्यांस कळून चुकलें होतें व ते त्याच्या पाळतीवर अगदीं टपून बसले होते.

फाल्गुन वद्य सप्तमीच्या दिवशीं अवशीची सहा घटका रात्र होतांच हैदरअल्ली मेलकोट्याहून निघाला तो तोंडासच बारी आहे तींत शिरून श्रीरंगपट्टणाकडे चालला. त्या वाटेस मराठ्यांची पांच चारशें लोकांची टोळी बातमीकरितां ठेविलेली होती तिला तो बाहेर निघाल्याची चाहूल लागतांच ती त्याच्या लष्करावर चालून आली व ती बातमी कळविण्यासाठीं त्रिंबकरावाकडे पूर्वेच्या बाजूस व वामनराव पटवर्धन वगैरे सरदारांकडे पश्चिमेच्या बाजूस त्या टोळींतल्या लोकांनीं सांडणीस्वार पिटाळिले. मराठ्यांचें लष्कर भोंवतीं पांच चार कोस पसरलें होतें. त्यांस आपण बाहेर पडल्याची बातमी एकाच क्षणांत सर्वत्र कळावी म्हणूनच जणू काय, हैदरानें यावळीं एक मोठीच चूक केली. अथवा चुक तरी कसली, अशा गडबडीच्या प्रसंगीं असल्या चुका माणूस कितीही शहाणा असला तरी त्याच्या हातून व्हावयाच्याच! तिचा परिणाम हैदरास यावेळीं फारच अनिष्ट झाला एवढें मात्र खरें. ती चूक अशी कीं, जरी त्याचें पन्नास हजार सैन्य गुपचुपपणानें व फारच बंदोबस्तानें बाहेर पडून मार्ग चालूं लागलें होतें. तरी ती मराठ्यांची पांच चारशें लोकांची टोळी त्याच्या अघाडीवर चालून आली तेव्हां अंधारामुळें ही वीस पंचवीस हजार सेना आपणास अडविण्यासाठीं आली आहे असा त्याचा समज झाला. तो कूच थांबवून या काल्पनिक सेनेवर तोफांचा मारा करूं लागला! मग काय विचारावें! तोफांचे बार ऐकतांच मराठ्यांच्या मोठमोठाल्या झुंडी तयार होऊन धांवून आल्या व त्याच्या लष्करावर चोंहोंकडून हुल्लड करूं लागल्या! असे झालें तेव्हां त्यास क्षणोक्षणीं लष्कराचें कूच थांबवून शत्रूवर तोफांचा व बंदुकांचा मारा करून त्यांस

७ मार्च १७७१

मागें सारणें भाग पडूं लागलें. तो चालूं लागला म्हणजे ते पुनः येऊन त्याच्या लष्करास बिलगत व तोडातोडा करूं लागत. मग तो त्यास पुनः मागें हुसकून लावी ! या तऱ्हेच्या झगडाझगडीमुळें तो अगदीं बेजार होऊन गेला. मेलकोट्याच्या बारींतून तो बाहेर पडे तों उजाडावयाचा सुमार आला. म्हणजे दोन कोस यावयास त्यास नऊ तास लागले ! त्यावेळीं मराठ्यांच्या फौजेचा त्यास चांगलाच घेरा बसला. इतका वेळपर्यंतचे हल्ले फुटकळ फुटकळ टोळ्यांचें अव्यवस्थित रीतीचे होते. परंतु आतां सर्व फौज व सरदार जमा झाले असल्यामुळें पद्धतवार व निकराचें युद्ध सुरू झालें. इतका वेळपर्यंतची लढाई त्यास फक्त अडविण्याकरितां होती. परंतु आतां त्यास मोडण्याची लढाई सुरू झाली. प्रथम उजवे बाजूकडे पटवर्धन, घाय गुडे, गायकवाड व आनंदराव गोपाळ जमले होते त्यांनीं हल्ल्यांवर हल्ले केले. परंतु आतां चांगलें दिसूं लागलें होतें व श्रीरंगपट्टणही सारें तीन कोस राहिलें होतें. यामुळें हैदरास धीर येऊन त्यानें तोफांचा मारा केला व त्याच्या गारद्यांनीं बुरूज बांधून बंदुकांच्या गोळ्यांचा केवळ पाऊस पाडिला; त्यायोगानें मराठ्यांस मागें हटावें लागलें. या युद्धांत हजर असणाऱ्या एका गृहस्थानें लिहिलें आहे कीं, " पंचवीस हजार गारद्यांची एकदांच शिलक होई तेव्हां गगन गर्जत असे ! " पटवर्धन वगैरे सरदार हल्ल्यांवर हल्ले करीत असतां दर खेपेस याप्रमाणें निकरानें लढून त्यांचे शेंकडों लोक मारून त्यांस मागें हटवीत होता, डावे बाजूनें त्रिंबकराव मामानेंही हल्ले करून पाहिले व तोफाही सुरू केल्या, परंतु हैदराची फौज त्याच्याही हातून मोडवली नाहीं. त्याचा प्रत्येक हल्ला हैदरानें मर्दुमीनें लढून मागें परतविला. याप्रमाणें युद्ध करीत करीत प्रहर दिवस येईतों हैदर आणखी एक कोस पुढें आला. आतां श्रीरंगपट्टण दोन कोस राहिलें, आतां हा हातचा निसटून जाणार, कांहीं केल्या हा आटपत नाहीं असें पाहून पश्चिमेस म्हणजे हैदराच्या उजव्या बाजूस वामनराव पटवर्धन होता त्यानें अकस्मात् आपलीं तिन्हीं पथकें दक्षिणेस हैदराच्या लष्कराच्या तांड्यावर नेलीं व जिवाची पर्वा न बाळगतां त्या लष्कराच्या अघाडीवर वेगानें चालून घेतलें. त्या ठिकाणीं गारद्यांचीं उत्तम चोखदीं पलटणें होतीं त्यांची गांठ पडून घोर

युद्ध झालें. गोपाळराव मरण पावला तरी त्याचा नांवलौकिक राखण्याची आपणांत धमक आहे हें दाखविण्याची त्यांस उमेद होती व तीच उमेद त्याचे चुलत बंधु नीलकंठराव व परशुरामभाऊ यांच्याही मनांत बाणली होती. यामुळें हे त्रिवर्ग आपपल्या पथकांस उत्तेजन देऊन व पुढारी होऊन स्वतः पराक्रम करून आवेशानें लढत होते. याप्रसंगीं नीलकंठराव छातींत गोळी लागून ठार झाला तथापि पटवर्धनांच्या फौजेनें तीं अघाडीचीं पलटणें मोडून हजारों गारदी जागच्या जागीं ठार केले. त्याचक्षणीं अघाडीचा मोहरा फिरला. तें पहातांच त्रिंबकरावानें पिछाडीवर व बाकीच्या सरदारांनीं दोहों बाजूंवर एकाच वेळीं हल्ला केला. तेव्हां हैदराच्या सैन्याचा धीर सुटून हें पळत सुटलें. त्यावेळीं जी कत्तल झाली तिचें वर्णन करितां येणें कठीण आहे. उजवे बाजूस एक डोंगर आहे तिकडे हैदर पळाला. पांच सात हजार गारदी बंदुका टाकून देऊन त्याच वाटेनें पळाले. टिपू सुलतान व मीरफौजुल्ला व दुसरे कोणी कोणी फकिराचा वेष घेऊन मराठ्यांच्याच लष्करांतून गेले. हे इतके लोक मात्र बांचले. बाकी दहा हजार स्वार, पंधरा हजार गारदी व कित्येक हजार कानडी प्यादे ठार मारिले गेले. तीन चार हजार लोक पाडाव झाले. सर्व फौज धुळीस मिळाली. पंचेचाळीस तोफा, आठ हजार घोडे, पंचवीस हजार बंदुका, सर्व दारूगोळा व इतर नानाप्रकारचीं हत्यारें, पालख्या, हत्ती, उंटें, जामदारखाना सर्व कांहीं होते नव्हतें तें मराठ्यांच्या हातीं लागलें! लढाईच्या ठिकाणापासून जवळच 'मोतीतलाव' या नांवाचा तलाव आहे त्यावरून मराठे लोक या लढाईस 'मोतितलावाची लढाई असें म्हणतात.

दुसरे दिवशीं मराठ्यांनीं मेलकोट्यावर हल्ला करून तें ठाणें घेतलें. त्यावेळीं तेथें लूट व जाळपोळ होण्याची पराकाष्ठा झाली. हें विशिष्टाद्वैत मताचें आदिस्थान असून त्या मताचे प्रवर्तक रामानुजाचार्य पूर्वी येथें रहात होते. अर्थात् त्या मताचे सर्व हिंदु लोक हें अत्यंत पवित्र क्षेत्र आहे असें मानितात. येथें विष्णूचें एक पुरातन देवस्थान आहे त्यास या प्रांतीं चिलपिल्लराय असें नांव आहे. कर्नल विल्क लिहितो कीं, मराठ्यांनीं याप्रसंगीं येथील मनुष्यांची निर्दयपणें कत्तल केली. ब्राह्मण असो कीं मुसल-

मान असो; लुटण्यांत किंवा प्राण घेण्यांत किंवा नासधूस करण्यांत मराठ्यांनीं धर्माचा किंवा जातीचा कांहीं एक भेद ठेविला नाहीं! देवाचे रथ मोठमोठे होते ते जाळून त्याचे खिळेमोळे देखील काढून लष्कराच्या लोकांनीं नेले. रथांस आग लागतांच ती भडकून चिलपिल्लरायाचें देवालयही जळून राखरांगोळी झाली! मराठ्यांच्या लष्करावरोवर अनिवार पेंढार व बाजारबुनगें असे त्याचाच हा पराक्रम होय!

यानंतर श्रीरंगपट्टण काबीज करण्याचा त्रिंबकरावमामानें मनसबा केला. हैदरासारखा हिय्येबाज शत्रू, मुलूखगिरीचे दिवस संपत आलेले, लाख फौजेनें चार सहा महिने वेढा घातला असतांही तें स्थळ हातीं येणें दुरापास्त, या गोष्टी मामानें लक्षांत घ्यावयास पाहिजे होत्या, पण घेतल्या नाहींत. त्यानें चैत्र शुद्ध प्रतिपदेच्या मुहूर्तानें त्या शहराजवळ येऊन तळ दिला व त्याच मुहूर्तावर तोफांचा मारा त्या शहरावर सुरू केला. पट्टणच्या दक्षिणेस हैसूर शहर आहे. तिकडील वाट बंद करण्यासाठीं कावेरीपलीकडे पटवर्धन व आनंदराव गोपाळ राहिले. घायगुडे, रास्ते व गायकवाड यांचा तळ पश्चिमेच्या बाजूस होता. पूर्वेस सर्व हुजरातीसह त्रिंबकरावमामा व मुरारराव घोरपडे होते. तोफखाना व बुनगें तेथेंच राहिलें होतें. त्रिंबकरावानें पट्टणाच्या उत्तरेस एक टेंकाड पाहून ठेविलें होतें. दररोज त्या टेंकाडावर तोफा चढवून शहरावर मारा करी व सायंकाळीं त्या तो गोटास परत आणी. हैदर लढाईतून पळून पट्टणांत आला तेव्हां प्रथम त्यानें दारुगोळ्याची तरतूद केली व पांच सात हजार गारदी घांचून आले होते त्यांस बंदुका देऊन त्यांस जागजागां चौक्या नेमून दिल्या. ठिकठिकाणीं बातेऱ्या बांधून व त्यांवर तोफा सज्ज करून तो मराठ्यांची वाट पहात बसला होता. ते आले त्या रात्रीं तो कांहीं तोफा, गारदी व बाण घेऊन बाहेर पडला व त्यांच्या गोटावर मारा करूं लागला; परंतु त्यांनीं त्यास पिटून लावून पुनः पट्टणांत नेऊन घातलें, वेढ्याचें काम रेंगाळत चाललें होतें. मराठ्यांनीं कोठें मोर्चे बांधावयाचा यत्न केला तर हैदर एकदम दोनशें तोफा एकत्र आणून त्यांचा मारा त्या ठिकाणावर धरी. त्यामुळें त्या माऱ्यांत मराठ्यांचें माणूस ठरत

नसे. मराठेही पट्टणावर दिवसांतून शें दोनशें गोळे मारीत. परंतु त्यांनीं शत्रूचें फारसें नुकसान होत नसे. चोंहोंकडून घेरा पडून रस्ता बंद झाल्या-मुळें त्या शहरांत दुष्काळ पडला होता तथापि निराश न होतां हैदर लढत होता. महिना पंधरा दिवसांत त्रिंबकरावास वेढा उठवून जाणें भाग पडेल असा त्यानें अंदाज केला होता तो अगदीं बरोबर होता. कारण कीं, जर श्रीरंगपट्टणांत दुष्काळ पडला होता तर मराठ्याच्या गोटांतसुद्धां दुष्काळा-सारखीच स्थिति होती. भोंवतालचा प्रदेश उध्वस्त झालेला असल्यामुळें धान्य व वैरण मिळविणें दिवसेंदिवस मुष्कील पडूं लागलें होतें. तांदूळ रुपयास चार शेर, गूळ सवाशेर, तूप अडीच रुपयांस एक शेर. असली धारण झाल्यामुळें गरीबगुरीबास हे "ऐश आरामीचे" जिन्नस कोठून मिळ-णार! त्यांच्या नशिबीं नाचण्या व त्यांच्या घोड्यांच्या नशिबीं कुळथ्या! पण त्याही पोटभर मिळेनात! वैरण तर वीस पंचवीस कोसांवरून मिळवून आणावी लागे. आणि ती तरी काय, तर घरांवरचा केंबळ! त्यांतूनही आणखी महिना पंधरा दिवस हट्टानें आपण येथें राहिलों व पाऊस पडूं लागून कावेरीस पूर आला म्हणजे इकडे तिकडे हालतांसुद्धां येणार नाहीं ही त्रिंबकरावास धास्ती होतीच. तह करण्याविषयीं हैदराकडून रास्ते यांचे विद्य-मानें सूत्र लागलें होतें. परंतु तो म्हणे कीं माझा जितका मुलूख तुम्ही घेतला आहे तितका सर्व सोडाल तर आपण पंचेचाळीस लक्ष रुपये तीन वर्षांची खंडणी म्हणून देतों. मुलूख परत देऊन तह करण्याविषयीं पेशव्यांच्या मनांत नव्हतें. त्यामुळें हैदराचें बोलणें त्रिंबकरावास मान्य करितां आलें नाहीं. तहाच्या या बोलण्यासंबंधानें एका पत्रांत पुढीलप्रमाणें मजकूर आहे "पांच सात रोज सलूखाची बोली लागली होती रास्ते यांचे विद्यमानें, 'पंचेचाळीस लक्ष रुपये तीन सालांची खंडणी देतों. त्यांतही दोन चार लाख सूट द्यावी. कां म्हणावें तर आपली सारी सल्तनत लुटली गेली. एका चोळ्यानिशीं आम्हीं व टिपुमियां मात्र पट्टणांत आलों. तोफा, फौज, दारूगोळी, जामदारखाना, हत्ती घागा झाडून दौलत बुडाली. आपणांत पैका द्यावयास ताकद राहिली नाहीं. गुरमकोंडा वगैरे वीस लक्षांचा तालुका तुम्हीं गुदस्तां घेतला. बालमजकुरीं निजगळ वगैरे कावेरीपासून

तालुका खराब झाला. असें असतां पंचेचाळीसांवर जाजती पैका कसा मिळेल! सालमजकुरीं खंडणीची रयात करावी ' अशी मा * * * * पणाचीं बोलणीं बोलत होता!" तहाचें बनत नाहीं व यापुढें वेढा कायम ठेवणेंही शक्य नाहीं असें पाहून त्रिंबकराव अक्षतृतीयेच्या दिवशीं वेढा उठवून सर्व सैन्यासह परत मोतीतलावानजीक येऊन राहिला.

शिऱ्यास महिमाजी शिंदे सुभेदार होता तो पायदळ व स्वार मिळून एकहजार लोक व दोन तोफा घेऊन शिऱ्यापासून सहा कोसांवर हैदरखानाचें एक ठाणें होतें तें घेण्यासाठीं गेला. तितक्यांत हैदराचे दोन तीन हजार लोक देवरायदुर्गाकडून त्याजवर चालून आले. त्यावेळीं त्या अविचारी महिमाजीनें आपले प्यादे व बहुतेक स्वार मागें टाकून फक्त दोनशें स्वारांनिशीं त्यांजवर हल्ला केला! त्या हल्ल्यांत तो मारला गेला किंवा शत्रूनें धरून नेला हें कळत नाहीं. त्याची बाकीची मागें राहिलेली फौज मात्र शिऱ्यांस सुखरूप परत आली.

वेढा उठविल्यानंतर त्रिंबकरावानें निश्चय केला कीं, कावेरीच्या कांठाकांठानें हैदराचीं जीं ठाणीं आहेत तीं घ्यावीं व तो तालुका लुटून खराब करावा. या पावसाळ्यांत श्रीरंगपट्टणाच्या आसपास छावणी करावी. दसरा झाल्यावर घांटाखालीं उतरून तिकडील मुलूख मारावा व पुनः वर घांटीं येऊन बिदनुरावर स्वारी करावी. या बेतास अनुसरून त्यानें चंद्रायपट्टण, चेनापट्टण व नरसीपूर हीं ठाणीं घेतलीं. पांच हजार फौजेसह नरसिंगराव धायगुडे यानें जाऊन मदुर घेतलें. फौजेच्या आणखी एका टोळीनें शिदगट्टे व चेनराजपट्टण हीं ठाणीं घेतलीं. आणखीही पुष्कळ ठाणीं यावेळीं काबीज करण्यांत आलीं. यासुमारास हैदरानें दोन फौजा तयार करून आपल्या मुलखाच्या रक्षणार्थ पाठविल्या. पहिली फौज तीन हजार स्वार व पांच पलटणें मिळून टिपूबरोबर बिदनुराकडे गेली. दुसरी यापेक्षां थोडीशी अधिक फौज महमदअली कुमदान याजबरोबर घांटाखालचा मुलूख संभाळण्याकरितां जात असतां त्रिंबकराव सर्व हुजरातेसह तिजवर चालून गेला. तेव्हां मोठी लढाई होऊन कुमदानाचा पराजय झाला. त्याचे पुष्कळ लोक

एप्रिल—मे.

ठार व जखमी झाले. तो आश्रयासाठीं एका ठाण्यांत शिरला असतां मराठ्यांनीं त्यास गराडा घातला. तेव्हां रात्रीच्या वेळीं आपलें तोफा वगैरे सर्व सामान व जखमी लोक तसेच मागें टाकून पळून जाण्याचा त्यानें बेत केला. आपणास आतां हा टाकून जाणार असें कळतांच जखमी लोक पुष्कळ होते ते रडूं ओरडूं लागले. तेव्हां त्या अधम व क्रूर सरदारानें त्यांचें तितक्यापुरतें सांत्वन केलें व आपण पळून जात नाहीं असें सांगून त्यांस गप बसविलें. परंतु कांहीं वेळानें त्यानें एकाच वेळीं त्या सर्वांवर मारेकरी घालून त्यांची कत्तल केली व मराठ्यांस चाहूल लागूं न देतां अंधारांतून आपण पळून गेला!

त्या प्रांतीं कोडग व ऐगूरकर म्हणून संस्थानिक होते त्यांस वश करून घेण्याचा त्रिंबकरावानें यत्न केला. त्यांत ऐगूरकर मात्र अनुकूळ झाला. कोडगकर यांस आणण्याकरितां पटवर्धन गेले होते; परंतु तो पळून गेला. यंदांच्या मोहिमेंत पांच हजार प्याद्यांनिशीं चित्रदुर्गकर, दोन हजार प्याद्यांनिशीं रायदुर्गकर व हजार बाराशें स्वारांसह कडप्याचा नबाब असे येऊन मराठ्यांस सामील झाले होते. त्यांस पावसाळा सुरू होतांच घरीं जाण्यास निरोप देऊन त्रिंबकराव बेळूर येथें छावणी करून राहिला.

आश्विनाचा महिना सुरू होतांच शत्रूचा मुलूख लुटून ओसाड करण्याचें व ठाणीं घेण्याचें काम पुनः झपाट्यानें सुरू झालें! मराठ्यांनीं अर्धवट घाईघाईनें पाडून टाकिलेले भैरवदुर्ग, देवरायदुर्ग, उत्तरदुर्ग हे किल्ले हैदरानें दुरुस्त करून पुनः बळाविले होते ते पुनः त्यांनीं घेतले. शिवाय नागमंगल, देवळापूर व किकेरी हीं ठाणीं घेतलीं. मेलकोट्याजवळ नारायणगड किल्ला होता तोही घेतला. हैदराचा वकील आपाजीराम हा पट्ट-

आक्टो-नोव्हें. } णाहून मराठ्यांच्या लष्करांत व तेथून पुनः पट्टणास याप्रमाणें सारखे हेलपाटे घालीतच होता. परंतु हैदरअल्लीची तऱ्हा अशी होती कीं, एकदां एक बोलावें, पुनः तें बोलणें फिरवून दुसरेंच कांहीं बोलावें, कधीं खंडणीची रकम कमी बोलावी, कधीं अमुक सालची खंडणी माफ करा म्हणावें, कधीं सर्व मुलूख परत देण्यासाठीं

आग्रह धरावा ! यामुळें तह होण्याचा रंग दिसेना. शेवटीं त्रिंबकरावानें हैदरच्या वकिलास सांगितलें कीं, तुम्हीं साठ लक्ष रुपये खंडणी द्यावी. शिवाय तुम्हीं आमच्या भेटीस यावें व घांटाखालीं उतरून आम्हीं अर्काटावर मोहीम केली तर आपल्या फौजेसह आमच्या स्वारीत हजर रहावें. मोंगलाची खंडणी तुम्हांकडून यावयाची तिची रकम अठ्ठावीस लक्ष रुपये मोंगलास देऊन त्याची पावती आम्हांस आणून द्यावी. इतकें होत असेल तर पट्टणाभोंवतालचा मुलूख व ठाणीं आम्हीं घेतलीं आहेत तीं मात्र तुम्हांस परत देऊं. चिकबाळापूर व नांदिगड हीं स्थळें व त्यांखालचे तालुके तुम्हीं परत द्या ह्मणतां, परंतु त्याबद्दल तुम्हीं श्रीमंतांस परभारें विनंति करावी. यापुढें तुमची वर्तणूक सरळपणाची राहिल व श्रीमंतांची मर्जी तुम्हीं संपादून घ्याल तर हाही मुलूख तुम्हांस पुढें कधीं तरी परत मिळेल. तुम्हांस आठ दिवसांची मुदत दिली आहे. या मुदतींत तुम्हीं आमच्या म्हणण्याप्रमाणें निकाल केला तर बरेंच आहे. नाहीं तर यापुढें तहाप्रकरणीं बोलणें करण्याकारितां येण्याचें कारण नाहीं. हा निरोप घेऊन आपाजीराम हैदराकडे गेला तो आठ दिवस झाले तरी परत आला नाहीं तेव्हां वर लिहिलेल्या शर्ती हैदरास कबूल नव्हत्या हें उघड दिसून आलेंच. त्रिंबकराव तह करून परत देशीं जाण्याविषयीं उत्सुक झाला होता, याचें कारण पेशव्यांचें दिवसेंदिवस बळावत जाणारें दुखणें हें होय. पण त्याच कारणामुळें हैदराच्या मनांत तूर्त तह करावयाचें नव्हतें. पुण्याच्या दरबारची त्यास खडाजुखडा माहिती होती. माधवराव पेशव्यांस जर या दुखण्यांत मृत्यु आला तर राज्यांत दुफळी माजून बखेडे होतील ही त्याची अटकळ होती. बरींच वर्षे आपण दादासाहेबांशीं मैत्री राखिली आहे त्यामुळें मराठी राज्यांत त्यांचा वरचष्मा झाला तर आपली पोळी पिकेल ही त्यास जबर आशा होती !

यानंतर त्रिंबकरावास तंजावरच्या राजानें पत्रें पाठविलीं कीं, अर्काटचा नबाब महमदअल्लीखान यानें येऊन आमच्या राजधानीस वेढा घातला आहे व आमचें राज्य घेण्याचा त्यानें संकल्प केला आहे. याकरितां तुम्हीं आमच्या कुमकेस यावें व आम्हांस या संकटांतून मुक्त करावें.

त्यावरून त्रिंबकरावानें त्या राजाची कुमक करण्याकरितां बहुतेक फौजे-सह घांटाखालीं जाण्याचा बेत केला. तिकडे जाण्यांत त्याचे आणखी दोन मुख्य हेतु होते. पहिला हेतु असा होता कीं, अर्काटवाला नबाब व त्याचे सोबती मद्रासकर इंग्रज यांशीं मैत्री करून किंवा जरब दाखवून त्यांस वश करून घ्यावें व त्यांजजवळ तोफा व पायदळ हें सामान उत्तम आहे तें आपणाबरोबर घांटावर घेऊन यावें व त्यांच्या मदतीनें बेंगरूळ व श्रीरंगपट्टण हीं स्थळें घ्यावीं. दुसरा हेतु असा होता कीं, घांटाखालीं हैदराचा मुलूख आहे तो जाळून लुटून फस्त करावा. याप्रमाणें मनसबा ठरवून त्यानें वामनरावाच्या तीनी पथकांस श्रीरंगपट्टणच्या आसपास नवीन मुलूख जिंकेलेला होता त्याच्या संरक्षणार्थ ठेविलें. धायगुडे, कवडे व भापकर हीं तीन पथकें व तीन तोफा त्यांच्या हवालीं केल्या. शिवाय चित्रदुर्गकर संस्थानिक वामनरावांच्याच मध्यस्थीवरून मराठ्यांस मिळण्या-

दिसेंबर. } करितां येत होता, त्याबरोबर सात हजार निवडक पाय-दळ, दोन हजार स्वार, कांहीं जेजाला व बाण असें सामान होतें. त्या संस्थानिकानें श्रीरंगपट्टणच्या आसपास रहावें व हैदरअली बाहेर पडेल तर त्यास लढाई देऊन पुनः पट्टणांत पिटवून लावावें याप्रमाणें ठरवून पसतीस हजार फौजेसह त्रिंबकरावानें तंजावराकडे कूच केलें. तो जवळ येतांच महमदअली वेढा उठवून अर्काटास निघून गेला. ही कुमक केल्याबद्दल तंजावरच्या राजापासून त्रिंबक-रावानें फौजेच्या खर्चाबद्दल म्हणून चार लक्ष रुपये घेतले व अर्काटच्या नबाबापासूनही कांहीं खंडणी घेतली. परंतु त्या प्रांतीं जाण्यांत ह्याचा मुख्य उद्देश इंग्रज व अर्काटकर यांस कुमकेस आणण्याचा होता तो साधला नाहीं. उलट त्रिंबकरावामागोमाग टिपूसुलतान घांटाखालीं आला होता त्यांचें अर्काटवाल्यांशीं व इंग्रजांशीं आतून सूत्र असावें आणि अघाडीस इंग्रजांनीं आपणावर चालून यावें व टिपूनें पिछाडीस घांट बंद करावेत अशी मसलत ठरलेली असावी, असा त्यास संशय आला व त्यानें वामनरावास तावडतोब घांटाच्या तोंडीं येऊन राहाण्या-विषयीं पत्र लिहिलें. त्याप्रमाणें वामनराव जाण्याची तयारी करूं

लागला तों त्यास वर्तमान कळलें कीं; हैदराच्या सात हजार फौजेनें येऊन नारायणगडास वेढा दिला आहे. त्या किल्ल्यांत पाणी नव्हतें. तें खालीं माची होती तेथून न्यावें लागें. तें पाणी शत्रूनें बंद केलें असल्यामुळें किल्ल्यांतील लोकांवर कठिण प्रसंग गुदरला होता. वामनरावानें तात्बडतोब जाऊन शत्रूची फौज पिटून लाविली व आपण दूर गेल्यावर पुनः या किल्ल्यास दगा होईल असें मनांत आणून त्यानें आंतील तोफा वगैरे सामान व शिबंदी काढून आणिली व किल्ला पाडून टाकिला. नंतर तो मामाच्या सांगण्याप्रमाणें घांटमाथ्यापासून कांहीं अंतरावर उत्तरदुर्ग येथें येऊन राहिला. तें पहातांच टिपू घांट बंद करण्याच्या वगैरे खटपटींत न पडतां घाईघाईनें श्रीरंगपट्टणास परत गेला.

त्रिंबकरावानें बारामहाल प्रांतांत शिरून अमर्याद जाळपोळ व लुटालूट केली व गांवोंगांव जबर खंडण्या घेतल्या. पूर्वीं तो प्रांत कडपेंकर नबाबाचा होता व त्यापासून हैदरानें जबरदस्तीनें घेतला होता. हल्लीं कडपेंकर मराठ्यांस मिळाला असल्यामुळें तो प्रांत जिंकून त्रिंबकरावानें कडपेंकराच्या हवालीं केला. मराठ्यांच्या फौजेचा एक भाग आप्पा बळवंताबरोबर कोइमत्तुराकडे गेला होता त्यानें तोही मुलूख लुटून व जाळून बेचिराख केला. याप्रमाणें आश्विन अखेरपासून फाल्गुन अखेरपर्यंत घांटाखालीं हैदराचें राज्य होतें त्याची अशी दुर्दशा केल्यानंतर त्रिंबकराव घांटावर आला. बेंगरूळच्या आसपास त्याचे दहा मुक्काम झाले तेथून तो थोरल्या बाळापुरास आला. तेथें त्यास वामनराव पटवर्धन येऊन मिळाला.

स. १७७२ जाने. फेब्रु.

हैदरअल्ली इतका जेरीस आला होता तरी आजपर्यंत तह करण्याचें कां टाळीत होता याचें कारण सांगितलेंच आहे. घांटाखालच्या मुलखाची दुर्दशा झालेली ऐकून या लढाईस आधींच कंटाळून गेलेल्या हैदरअल्लीचा आतां अगदीं धीर खचला. तो मनाशीं विचार करूं लागला कीं, पेशवे मरण पावल्यानंतर आपणास काय लाभ व्हावयाचे असतील ते असोत, परंतु तेथपर्यंत आपलें राज्य तरी राहतें असें कशावरून! आपली फौज धुळीस मिळाली. दौलत गेली. बहुतेक राज्यही शत्रूनें घेतलें. बेंगरूळ व

श्रीरंगपट्टण हीं दोन शहरें व बिदनूर प्रांत एवढें मात्र आतां राहिलें आहे. पण लढाई चार सहा महिने सुरू राहिली तर हेंही हातांतून जाईल. हे विचार मनांत आल्यामुळें तो तह करण्याविषयीं मुरारराव घोरपड्याच्या मार्फत त्रिंबकरावाच्या विनवण्या करूं लागला. परंतु त्रिंबकरावाचा हैदरावर फारच राग झाला होता त्यामुळें तो तहाची गोष्टसुद्धां बोलू देईना! तो म्हणें कीं या गुलामानें मला फार दमविलें आहे. माझ्या तावडींतून बिदनूर मात्र आजपर्यंत सुटलें आहे; पण आतां मी तिकडे स्वारी करीन. गांवें व शहरें लुटून जाळून टाकीन. गढ्या व किल्ले पाडून जमीनदोस्त

मे. जून. करीन. व तिकडला मुलूख असा ओसाड करीन कीं, पन्नास पन्नास कोसांत दिवासुद्धां लागूं नये! हा आपला भयंकर संकल्प सिद्धीस नेण्याचे तयारीसही तो लागला होता. परंतु बिदनूरच्या लोकांची पूर्व पुण्याई सबळ असल्यानें याही खेपेस त्यांजवरचें हें अरिष्ट टळलें! मामा बिदनुराकडे कूच करून जाणार तों त्यास पेशव्यांचीं पत्रें आलीं कीं, आतां आपण दुखण्यांतून पार पडूं अशी बिलकुल आशा राहिली नाहीं. याकरितां आतां बनेल तसा तह करून तुम्ही सर्व फौजेसह तावडतोब देशीं निघून यावें. यामुळें त्रिंबकरावास तह कबूल करणें भागच पडलें.

तह होण्याचें ठरलें तरी बाटाघाट होण्यांत दोन महिने गेले. हैदराची लपंडावी अजूनही थोडथोडी सुरू होतीच. शेवटीं लक्ष्मणराव रास्त्यांच्या विद्यमानें एकदांचा तह ठरला. कर्नाटकांत मराठ्यांचें 'स्वराज्य' म्हणून जितकें होतें व ज्यासाठीं आज सात वर्षें एवढी झगडाझगडी चालली होती तें त्यांजकडे कायम राहिलें. शिवाजी महाराजांच्या मरणसमयीं त्यांच्या ताब्यांत जितका मुलुख होता त्यास 'स्वराज्य' अशी संज्ञा पडली होती. असा कर्नाटकांतला मुलूख म्हटला म्हणजे त्यांच्या बापाची जहागीर शिरें, होसकोटें, थोरलें बाळापूर, कोल्हार हे परगणे मराठ्यांनीं हैदरापासून जिंकून घेतले होते ते आतां या तहानें त्यांजकडे कायम राहिले. पांचवा परगणा बेंगरूळचा मिळाला नाहीं पण त्याबद्दल मदगिरी मिळाला. शिवाय बीस लक्षांचा

मुलूख गुरमकोंड्याचा त्यांनीं घेतला होता तोही त्यांजकडे कायम राहिला. याखेरीज त्यांनीं हैदराचा जितका मुलूख घेतला होता तितका सर्व परत दिला. हैदरानें पेशव्यांस खंडणीबद्दल पन्नास लक्ष रुपये व त्रिंबकराव वगैरे सरदारांस 'दरबारखर्चा' बद्दल दहा लक्ष रुपये देण्याचें कबूल केलें. त्यांपैकीं चार लक्षांचें जवाहीर, एकंदर एक लक्ष किमतीचे वीस हत्ती, व सत्तावीस लक्ष रुपये रोख याप्रमाणें बत्तीस लक्षांची भरती करून दिली. बाकी अठ्ठावीस राहिले त्यांची सावकारी निशा पटवून दिली. हैदराकडील पैका हातीं येतांच ज्येष्ठ शुद्ध पौर्णिमेस फौजा परत निघाल्या, त्या तुमकुरावरून शिऱ्यांपर्यंत आल्या आणि तेथून निरनिराळ्या वाटांनीं आषाढ संपतां संपतां तुंगभद्रेवर येऊन महाराष्ट्रांत आपापल्या ठिकाणास गेल्या.

जुलै.

ही मोहीम सन १७७० च्या जानेवारींत सुरू झाली ती १७७२ च्या जुलईत संपली. म्हणजे मराठी फौज कर्नाटकांत सारखी अडीच वर्षे राहिली होती. या स्वारींत पटवर्धनांचें अतोनात नुकसान व हाल झाले. त्या घराण्यांतले गोपाळराव, नीलकंठराव व माधवराव हे तीन पुरुष या स्वारीच्या कामावर मरण पावले. त्यांत गोपाळरावाच्या मरणानें पेशवाईचें जें नुकसान झालें तें पुनः भरून आलेंच नाहीं. स्वारीच्या खर्चाबद्दल त्यांस दहा बारा लक्ष रुपये कर्ज झालें व संसाराचीही वाताहत होऊन गेली. गोविंद हरी, त्रिंबक हरी व कृष्णंभट हे तिघे वार्धक्यानें जर्जर झालेले व पुत्रशोकानें पोळलेले बंधु आशा करीत होते कीं, लवकर तह होऊन स्वारींतून आपलीं मुलें घरीं येतील व त्यांस आपण डोळे भरून पाहूं. पण ती त्यांची आशा सफल झाली नाहीं ! चातकाप्रमाणें वाट पहातां पहातां त्यांस मृत्यु आला. नीलकंठरावाच्या पथकावर आतां त्यांचा मुलगा रघुनाथराव नीलकंठ हा सरदार झाला होता. तो अल्पवयी असल्यामुळें त्याचा चुलता कोन्हेरराव हाच मुख्यत्वें सरदारीचें काम चालवीत होता. वामनराव प्रकृतीनें अशक्त असतांही वाडवडिलांच्या लौकिकाचा अभिमान धरून रात्रंदिवस मेहनत करून या स्वारींत पडेल ती कामगिरी रगडून नेत होता. या स्वारींत परशुरामभाऊ दोनदां अजारी पडला होता. त्यांत

गेल्या पौष महिन्यांत त्याचा इतका बाला झाला होता कीं, आतां हा खचित वांचत नाहीं असेंच सर्वांस वाटलें होतें. पटवर्धनाप्रमाणेंच इतर सरदारांचीही हलाखीची स्थिति होती. शिलेदार लोकांचे तर हाल पुसूच नये! पहिल्या वर्षाच्या छावणीस ते आपखुषीनें राहिले नव्हतेच त्यांची काय ती सारी ओढ घराकडे होती. तथापि तसेंच दिवस ढकलीत असतां दुसरा पावसाळा येऊन पुनः छावणीचा प्रसंग आला तेव्हां सरदारांनीं त्यांच्या हातापायां पडून त्यांस मोठ्या मिनतवारीनें राहविलें. पुनः तें वर्ष लोटून तिसरा पावसाळा आला तरी तह होत नाहीं असें कळल्यावर मात्र त्यांनीं अगदीं ताल टाकिला! सांगितलेलें काम ऐकूं नये, नेहमीं गवगवा करावा विचारल्यापुसल्याशिवाय शेंपन्नास स्वारांनीं एकदम लष्करांतून निघून देशीं यावें असें होऊं लागल्यामुळें सरदार लोक अगदीं मत्यास आले होते. कसेंही करून तह करावा म्हणून ते त्रिंबकरावाच्या नेहमीं विनवण्या करीत होते व आपणास देशीं परत बोलवावें म्हणून पेशव्यांच्या दरबारीं वशिले बांधित होते! परशुरामभाऊनें तर आपल्या चुलत्यास व आईस साफ लिहून पाठविलें होतें कीं, यंदा तह होवो अगर न होवो, आपण कांहीं छावणीस राहणार नाहीं. आपण घरीं येणार, त्याबद्दल श्रीमंतांनीं जहागीर जप्त केली तरी बेहत्तर!

या स्वारींत विजयी झालेल्या मराठ्यांची जर इतकी दुर्दशा झाली होती, तर पराजय पावलेल्या हैदराची दुर्दशा किती झाली असेल याचा वाचकांनींच विचार करावा.

# प्रकरण नववें.

## हिंदुस्थानप्रांतीं दुसरी स्वारी.

( सन १७७० जाने.–स. १७७२ जून )

माधवराव पेशव्यांच्या कारकीर्दीत हिंदुस्थान प्रांतीं पहिली स्वारी स. १७६६ सालीं दादासाहेबांनीं केली. त्या स्वारीचें वर्णन मागें या पुस्तकांत यथास्थित आलेंच आहे. तिजपासून विशेष फायदा न झाल्यामुळें स. १७६९ त भोसल्यावरची दुसरी स्वारी समाप्त झाल्यावर पेशव्यांनीं ही दुसरी स्वारी त्या प्रांतांत पाठविली. हिजवर रामचंद्र गणेश कानडे हा मुख्य सरदार व विसाजी कृष्ण बिनीवाले त्याचा कारभारी नेमण्यांत आला होता. तुकोजी होळकर व महादजी शिंदे हे स्वारींत हजर असून त्यांपैकीं प्रत्येकाबरोबर पंधरा पंधरा हजार फौज होती. रामचंद्र गणेश व विसाजीपंत यांच्या खास पथकाची पांच हजार व हुजरात पंधरा हजार फौज होती. एकंदर पन्नास हजार फौज जमा झाली होती. हे सर्व स्वार होते. याशिवाय पायदळ व तोफखानाही चांगला होता. या स्वारीची समग्र सुसंगत रीतीनें हकीगत देतां यावी म्हणून वायव्य प्रांतांतील जिल्ह्यांचें सरकारी ग्याझेटियर पाहून त्यांतीलही माहिती मधून मधून घतली आहे. ऐ. ले. संग्रह भाग तिसरा व चवथा यांतील पत्रांमधून या स्वारीसबंधें जे जागोजाग उल्लेख व तपशील आलेले आहेत त्यांचाही उपयोग हें प्रकरण तयार करतांना भरपूर करण्यांत आलेला आहेच.

नर्मदा उतरून मराठ्यांचें लष्कर प्रथम बुंदेलखंडांत गेलें. तेथें त्याचे तीन भाग झाले. एक भाग घेऊन रामचंद गणेश त्या प्रांतांतील बंडखोर संस्थानिकांस जरब देण्याकरितां पावसाळ्यांत छावणी करून येथेंच राहिला. दुसरा भाग घेऊन महादजी शिंदे उदेपुराकडे स्वारीस गेला. तिसरा भाग घेऊन तुकोजी होळकर बुंदी, कोटा व त्याच्या आसपासचीं इतर रजपूत

१ ही प्रस्तावना ऐ. ले. संग्रह भाग चवथा पृ. १८७५–१८९० यांवर छापलेली आहे.

संस्थानें यांपासून खंडणी वसूल करण्याकरितां तिकडे गेला. शिंद्यानें उदेपुरकरांच्या राज्यांत धुमाकूळ करून त्यास हैराण केलें व त्यांपासून साठ लक्ष रुपये खंडणी घेण्याचें ठरविलें. त्यांत पन्नास लक्ष सरकारचे व दहा लक्ष 'अंतःस्थ' होते! सदर रकमेपैकीं उदेपुरकरांनीं पांच लक्षांची सावकारी निशा ( जामीनगत ) दिली तेव्हां ते रोखच आले म्हणावयाचे. शिवाय त्यांनीं पंधरा लक्षांचें म्हणून जें जवाहीर दिलें त्याची किंमत मराठी लष्करांत सारी पांच लक्ष रुपये झाली। बाकी राहिलेल्या रकमेबद्दल त्यांनीं आपले राज्यांतील निरनिराळ्या प्रांतावर 'तनखे' करून दिले. हा वसूल सावकाशीनें होणारा होता. होळकरानेंही बुंदी व कोटा या संस्थानांपासून खंडणी घेतली. हें सर्व स. १७६९ च्या पावसाळ्यांत झालें. पावसाळा संपतांच रामचंद्र गणेश छावणी हालवून सागरापाशीं आले. तेथें त्यांस शिंदे, होळकर आपापलीं कामें आटपून येऊन मिळाले. नंतर हें लष्कर जाटांचा समाचार घेण्यास निघालें.

स. १७६५ त जवाहीरमल्ल जाटाचा जयपूरच्या राजानें पराभव केल्यावर पुढें तो लवकरच मरण पावला. त्याचा मुलगा केसरी हा गादीवर बसला होता. तो अल्पवयी असल्यामुळें त्याचा चुलता नवलसिंग हा राज्याचा कारभार पहात असे. मराठ्यांची यंदा आपणावर स्वारी होणार हें त्यास कळलें असल्यामुळें त्यानें खूब लढाईची तयारी केली होती. मराठे भरतपुरावर येऊं लागले तेव्हां तो आपली समग्र सेना घेऊन निर्धास्तपणें त्यांचा मुकाबला घेण्याकरितां आला. दोहों फौजांची भरतपुरापासून आठ कोसांवर गोवर्धन येथें गांठ पडून तीन प्रहरपर्यंत तुमुल युद्ध झालें. जाट जरी आवेशानें व शौर्यानें लढत होते तरी शेवटीं त्यांचा पूर्ण पराजय झाला. नवलसिंग दीडशे स्वारांनिशीं पळून गेला. हजारों जाट मारले गेले. व हजारों पाडाव सांपडले. तोफा, हत्ती, घोडे, हत्यारें, दारूगोळा, बाजारबुनगें हें सर्व मराठ्यांच्या हातीं लागलें. याप्रमाणें धूळधाण झाल्यानंतर मराठ्यांचें सैन्य जाटांच्या सर्व मुलूखभर पसरलें व तेथें त्यांनीं लुटण्या जाळण्याची कांहीं पराकाष्ठा केली. त्यामुळें नवलसिंग दीन होऊन शरण

स. १७७० एप्रिल

आला. त्याचा चुलता जवाहीरमल्ल यानें मराठयांचा आग्रा प्रांत व च किल्ला बळकाविला होता तो आतां नवलसिगानें त्यांचा त्यांस परत दिला व खंडणी पासष्ट लक्ष रुपये देण्याचें कबूल केलें. त्या रकमेच्या वसुलाची व्यवस्था मराठयांच्या मनाप्रमाणें झाल्यावर त्यांस आतां यापुढील मसलती करण्यास फुरसत सांपडली.

पानिपतच्या स्वारींतले मराठ्यांचे शत्रू अबदाली, रोहिले, पठाण व सुजाउद्दौला असे चौघे होते. पैकीं अबदाली काबूलचा राहाणारा असल्यामुळें त्याचा अपकार मराठ्यांच्या हातून आतां कांहींच होण्याजोगा नव्हता. बाकीच्या तिघांवर मात्र पुरता सूड उगविण्याची त्यांची इच्छा मनापासून होती. त्या तिघांत सुजाउद्दौल्याविषयीं त्यांच्या मनांत द्वेषबुद्धि कांहीं कमी होती. जरी त्यानें त्यांचे प्रांत बळकाविले होते तरी पानिपतानंतर मराठयांची निष्कारण कत्तल करणें वगैरे अनन्वित कृत्यांपासून तो अलिप्त राहिला होता. रोहिले व पठाण यांनीं मात्र प्रथम मराठयांशीं मैत्री केल्यासारखें दाखवून हळूच अबदालीशीं राजकारण करून त्यास आणून विश्वासघात केला. पानपतची लढाई संपल्यावर लाखों निःशस्त्र मराठयांची या पाषाणहृदयी लोकांनीं कत्तल केली, बायकापोरें धरून गुलाम करून नेलीं, हा द्वेष मराठ्यांच्या मनांत धुमसत होता. त्यांच्या फौजा दिल्लीकडे येत आहेतसें पाहून सुजाउद्दौल्यास काळजी पडली व रोहिले व पठाण तर चळचळां कांपूं लागले! मराठ्यांचा अत्यंत द्वेष करणारा नजीबखान रोहिला, पानिपतचा सारा व्यूह अथपासून इतिपर्यंत त्याच्याच हातें घडून आला होता. त्यास आतां वाटूं लागलें कीं, आपल्या पापाचे घडे खचित भरले! त्याचें व शिंद्याच्या घराण्याचें मुळापासून हाडवैर. दत्ताजी शिंद्यास व जनकोजी शिंद्यास त्यानेंच मारविलें होतें. त्याच दत्ताजीचा भाऊ व जनकोजीचा चुलता महादजी शिंदे या स्वारींत प्रमुख आहे. त्याअर्थी आतां कांहीं तो आपलीं पाळेंमुळें खणून काढल्याशिवाय रहात नाहीं हें पक्कें ओळखून त्यानें मराठ्यांशीं सलोख्याचें बोलणें लाविलें.

पूर्वी मराठ्यांनीं जेव्हां उत्तर हिंदुस्थान पादाक्रांत केलें तेव्हां प्रथम

त्यांनीं दिल्लीच्या बादशाहाशीं राजकारण करून त्यास आपल्या कह्यांत आणिलें. दिल्लीच्या दरबारांत त्यांजवांचून अगदीं पान हालेनासें झालें, तेव्हां त्याच बादशहाचें नांव पुढें करून व त्याच्याच फौजेची मदत घेऊन त्यांनीं रोहिलखंड, आग्रा, दुआब, पंजाब यापैकीं बहुतेक भागांत आपला अंमल बसविला होता. हल्लींच्या स्वारींतही त्यांस प्रथम तेंच राजकारण करावयाचें होतें. बादशाहीचा खरा वारस शहाआलम हा त्यावेळीं अलाहाबाद येथें इंग्रजांच्या आश्रयास जाऊन राहिला होता. कोणी तरी बलाढ्य राजानें त्यास नेऊन दिल्लीच्या तक्तावर बसवावें तेव्हांच तेथें त्याचा निभाव लागावा अशी स्थिति होती. कोणाची मदत न घेतां जर तो दिल्लीस जाता व राज्यांत अंमल बसवूं लागता तर जाट, रजपूत, रोहिले, पठाण यांनीं त्यांस मुळींच जुमानिलें नसतें! त्याचा मुलगा जवानबक्त हा दिल्लीस होता तो बापाच्याच नांवानें अधिकार चालवीत होता. या शहाजाद्याचा कारभारी नजीबउद्दौला होता. नजीबाच्या कर्तृत्वावर शहाजाद्याचा अम्मल राजधानींत व भोंवतालच्या थोड्याशा प्रदेशावर मात्र चालत असे. असली ही नामधारी बादशाही शहाअलमास नको होती. दिल्लीस जाईन तर सार्वभौम म्हणूनच जाईन हा त्याचा हेका होता. स. १७६६ सालीं दादासाहेबांनीं हिंदुस्थानावर स्वारी केली, त्यावेळीं माळवा व बुंदेलखंड या प्रांतींच त्यांचे बहुतेक दिवस गेले. चमेली उतरून पलीकडे जाण्यापर्यंत त्यांची मजलच गेली नाहीं. त्यावेळीं आपणांस आपल्या पूर्वजांच्या तक्तावर बसविण्याविषयीं शहाअलम यानें मराठ्यांशीं बोलणें लाविलें होतें; परंतु त्यांस तिकडे लक्ष देण्यास फुरसतच सांपडली नाहीं. सांप्रत रामचद्र गणेश व शिंदे होळकर आग्रा भरतपूर प्रांतीं आले तेव्हां शहाअलम याची स्थापना दिल्लीस नेऊन करण्याविषयीं पुनः चर्चा होऊं लागली. त्याजकडूनही हेंच बोलणें करण्याकरितां वकील आले होते. ही बातमी नजीबउद्दौल्यास कळतांच त्यानें मराठे सरदारांस सांगून पाठविलें कीं, माझे पूर्वीचे अपराध माफ करून मला पदरीं घ्यावें. मी तुमचें बादशहाशीं राजकारण जुळवून देतों.

नजीब शूर व मसलती मनुष्य होता. रोहिल्यांवर व पठाणांवर त्याचें

वचन चांगलेंच होतें. दिल्ली त्यांच्या ताब्यांत होती. मराठयांच्या मनांत रोहिल्यांचे व पठाणांचें चांगलेंच पारिपत्य करावयाचे होतें. पण तूर्त त्यांस प्रथम बादशहाची दिल्लीस स्थापना करावयाची होती. नजीबांशीं वैर कायम ठेवावें तर बादशहाची दिल्लीस स्थापना करणें मोठें प्रयासाचें काम होईल हें मराठे सरदारांस माहीत होते. पण त्याशीं मैत्री करणें हेंही त्यांस आवडण्याजोगें नव्हतेंच. अशा स्थितींत नजीबाशीं कसें वागावयाचें याविषयीं मराठे सरदारांचें एकमत होईनासें झालें. रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण या दोघांमध्यें माळव्यांत लष्कर आल्या वेळेपासूनच चुरस वाढत चालली होती. त्या दोघांची दररोज प्रत्येक गोष्टींत हमरी तुमरी चाले. शिंद्यांचें व रोहिल्यांचें हाडवैर तर होळकरांचें व रोहिल्याचें फार दिवसांपासूनचें सख्य ! होळकर व बिनीवाले यांचें ह्मणणें असें पडलें कीं, नजीबउद्दौल्याशीं तूर्त सख्य करावें. एकदां बादशहा हातीं आल्यावर त्याच्या पारिपत्याचा मजकूर पुढें पाहून घेतां येईल. शिंदे व रामचंद्र गणेश यांचा आग्रह कीं, या दुष्टाचा समूळ उच्छेद करावा. नजीबाच्या साह्याशिवायच आम्हांला दिल्लीची मसलत पार पाडतां येईल. दोन्हीं पक्षांनीं आपापल्यापरी साधक बाधक मजकुर लिहून पुण्यास श्रीमंतांकडे पाठविला. त्याचें उत्तर त्यांनीं या सरदारांस लिहिलें कीं, नजीबाचीं पूर्वकर्मे ध्यानांत आणिलीं तर त्याचा नाश करावा हेंच योग्य. परंतु दिल्लीच्या मसलतीस जर त्याचा उपयोग होण्यासारखा असेल तर तूर्त त्याशीं सख्य करून तो उपयोग करून घेण्यास काय हरकत आहे ? त्याशीं कायमची दोस्ती कधीं करूं नये म्हणजे झालें. याप्रमाणें श्रीमंतांची आज्ञा झाल्यावरून रामचंद्र गणेश वगैरे सरदारांनीं नजीबउद्दौल्यास निरोप पाठविला कीं, तूं आम्हांशीं इमानानें वागण्याचें व दिल्लीप्रकरणीं व इतर मसलतींत आम्हांस मनापासून मदत करण्याचें कबूल करीत असशील तर तुझें आमचें सख्य होईल. पण हें सख्य होण्याआधीं तूं एक गोष्ट केली पाहिजेस. पूर्वी दुआबाच्या मध्यभागाचा मुलूख आह्मांस बादशहाकडून जहागीर होता. पानपत झाल्यानंतर अबदालीनें त्या मुलखाच्या सनदा शहाजादा जवानबख्त यांजकडून तुला व इतर रोहिल्यांस

देवविल्या आहेत. शहाजाद्याकडून त्या मुलखाच्या सनदा तूं पुन: आमच्या नांवें करून दे. नजीबानें त्याप्रमाणें सनदा शहाजाद्याकडून करून घेऊन मराठे सरदारांकडे पाठवून दिल्या व आपण तुकोजी होळकराच्या विद्यमानें भेटीस आला व तेथून पुढें मराठ्यांच्याच लष्करांत राहूं लागला. तो मराठ्यांस सांगूं लागला कीं, पानिपतच्या लढाईपूर्वी माझी जेवढी जहागीर होती तेवढी मजकडे कायम ठेवा म्हणजे झालें. बाकी रोहिलखंड व दुआब यामध्यें तुह्मी काय पाहिजे तें करा. माझी त्यास पूर्ण संमति व मदत आहे! नजीबास बरोबर घेऊन मराठी लष्कर यानंतर दिल्लीस गेलें. तेथें त्याचा बरेच दिवस तळ पडला होता, परंतु त्यांजकडून त्या शहरास बिलकुल उपद्रव झाला नाहीं.

मराठ्यांनीं जाटांचा पराजय केला तेव्हांपासूनच रोहिले, पठाण, सुजाउद्दौला व इंग्रज यांस मोठी काळजी उत्पन्न झाली होती. आतां ही टोळधाड आपणांपैकीं कोणावर प्रथम येऊन पडते इकडे त्यांचें लक्ष वेधून गेलें होतें. मराठे दिल्लीस आज इतके दिवस राहिले असून ती राजधानी ते आपल्या ताब्यांत कां घेत नाहींत हें इंग्रजांच्या ध्यानांत येईना. शहाअलम जरी आपल्या आश्रयास सध्यां आहे तरी मराठ्यांशीं त्यानें राजकारण केलें आहे हें इंग्रजांस माहीतच नव्हतें! सुजाउद्दौलाही नजीबउद्दौल्याप्रमाणेंच मराठ्यांशीं सख्य करण्याचा प्रयत्न करूं लागला. या दोघांनीं जर मराठ्यांस न मिळतां रोहिल्यांचा व पठाणांचा बचाव करण्याची मनापासून खटपट केली असती तर पुढील मोहिमेंत मराठ्यांस यश जितक्या सुलभ रीतीनें मिळालें, तितक्या रीतीनें तें खचित मिळालें नसतें. पण नजीब व सुजा यांनीं असा बेत केला होता कीं, मराठ्यांशीं मैत्री करून आपापल्या दौलती बचावाव्या म्हणजे झालें. मग पानिपतच्या मोहिमेंतले आपले दुसरे सोबती रोहिले व पठाण सरदार आहेत ते मराठ्यांच्या तावडींत सांपडून मरोत कीं तरोत! तिकडे पहावयाचें म्हणून नाहीं! मराठ्यांनीं रोहिल्यांस पुरतें चित केल्यावर मराठ्यांस इंग्रजांच्या मदतीनें हुसकून लावून रोहिल्यांस कुमक करण्याच्या मिषानें रोहिलखंडांत शिरून तें सर्वच आपल्या राज्यास जोडावें हा सुजाउद्दौल्याचा पुढचा बेत होता!

दिल्लीस मराठ्यांचें लष्कर बरेच दिवस राहिलें होतें. त्या मुदतींत पठाणांवर मोहीम करण्याची मसलत पक्की ठरून तें लष्कर तेथून निघालें तें यमुना उतरून अंतर्वेदींत शिरून गंगेच्या तीरीं रामघांट येथें पावसा-

सन १७७० जून ते सपटेंबर } ळ्याकरितां छावणी करून राहिलें. पठाणांची राजधानी फरुक्काबाद तेथें त्यांचा मुख्य सरदार अहमदखान बंगस म्हणून रहात होता. ह्यावर स. १७५१ त सफदरजंग व मल्हारराव होळकर व गोविंदपंत बुंदेले यांनीं स्वारी करून जेर केलें. तेव्हां त्यानें आपल्या राज्याच्या तेतीस परगण्यापैकीं साडेसोळा परगणे मराठ्यास ताम्रपटावर सनदा करून दिले. ते परगणे स. १७६१ पर्यंत मराठ्यांकडे निर्वेधपणें चालत होते. त्या वर्षी पानिपत झालें. त्यानंतर या परगण्यापैकीं शिकोआबाद व इटावा हे रोहिल्यांनीं व बाकीचे या बंगसानें बळकाविले होते ते परत देण्याविषयीं यंदा मराठ्यांनीं मागणी केली ती बंगसानें साफ नाकारिली. त्यामुळें त्यावर स्वारी करण्याकरितां मराठ्यांची सेना वर सांगितल्याप्रमाणें अंतर्वेदींत शिरली. हें पाहतांच तो अहमदखान बंगसही फारकाबादेंतून बाहेर पडला व पन्नास हजार पठाण जमा करून मराठ्यांशीं गांठ घालण्याकरितां आला. तों पावसाळा सुरू झाल्यामुळें तो गंगेच्या पलीकडे कांहीं अंतरावर तळ देऊन राहिला. त्याच्या तोंडावर पंधरा हजार फौजेसह बाबूराव हरि यांस ठेवून बाकीचे मराठे सरदार रामघांटीं छावणी करून राहिले.

शके १६९२ च्या आषाढापासून कार्तिकापर्यंत मराठ्यांची छावणी रामघांटीं होती. त्यांच्या लष्करांत तो दगाबाज नजीबउद्दौला होताच. त्याच्या सांगण्याप्रमाणेंच या पठाणांच्या मोहिमेचीं सूत्रें चालविलीं जात होतीं. यद्यपि त्यावर मराठ्यांचा विश्वास बिलकूल नव्हता, तरी सावधपणानें वागतां वागतां शेवटीं मसलतीचें पर्यवसान असें झालें कीं, नजीबानें मराठ्यांस आणून खड्ड्यांत घातल्यासारखेंच केलें! कारण कीं, त्यांच्या पिच्छाडीस यमुना, पुढें गंगा व मध्यें इतर नद्यानाले पावसाळ्यामुळें अपरंपार भरले होते. भोंवतालचा मुलूख सर्व शत्रूचा होता. मराठ्यांस कोठें इकडे तिकडे हिंडतां येईना व मागेंही परततां येईना! याप्रमाणें ही फौज मोठ्या

अडचणींत सांपडली होती. तिला अजूनही नजीब गोड गोड थापा देतच होता. परंतु याचें व बंगसाचें आंतून सूत्र आहे ही गोष्ट आतां त्या फौजेंतील लोकांस कळली होती. मागें पानिपत होण्याच्या आदल्या वर्षी दत्ताजी शिंद्याची फौज अशीच पावसाळ्यांत यमुने पलीकडे अडकली होती. त्यावेळीं याच नजीबानें दत्ताजीशीं मैत्री दाखवून अबदालीस आणून व त्यास मिळून दगा केला, मराठी फौज बुडविली व दत्ताजीस जिवें मारिलें. आताही हुबेहूब तीच स्थिति प्राप्त झाली होती. पठाणांची प्रचंड सेना तयार होऊन पुढें तळ देऊन बसलीच होती. रोहिल्यांनींही लढाईची तयारी झपाट्यानें चालविली होती, सुजाउद्दौलाही तयार होत होता व इंग्रजांचाही तोच विचार होता. मराठे तर कोंडले गेल्यामुळें या गोष्टीचा त्यांच्या हातून कांहीं प्रतिकार होत नव्हता. आपल्या सरदारांनीं नजीबाच्या नादीं लागून अंतर्वेदींत छावणी केली हें पाहून पेशव्यांस राग आला व मोठी काळजी उत्पन्न झाली. त्या सरदारांस कुमक करण्याकरितां त्यांनीं पुण्यास दुसरी फौज तयार केली होती. त्या फौजेची रवानगी व्हावी इतक्यांत नजीबउद्दौला ता. ३१ आक्टोबर रोजीं एकाएकीं मृत्यु पावला व आश्विनाच्या प्रारंभींच नद्यांचें पाणी ओसरून कोंडलेल्या मराठी फौजेस चोंहोंकडे फैलावण्यास मोकळीक झाली. यामुळें तिकडील काळजी दूर होऊन पुण्याहून फौज पाठविण्याचा बेत श्रीमंतांनीं तहकूब केला.

नजीबखान मराठ्यांच्या लष्करांत आपला मुलगा जाबिताखान यास ठेवून नजीबगड येथें जात असतां वाटेंत मृत्यु पावला. तें वर्तमान येतांच रामचंद्र गणेश यानें जाबितखानास नजरकैदेंत ठेविलें. त्यापासून जबर खंड घ्यावा व त्याच्या जहागिरीचे एक दोन परगणे घ्यावे तेव्हांच त्यास सोडावें असा रामचंद्र गणेश व महादजी शिंदे यांचा बेत होता. पण होळकरापासुन आणभाक घेऊन त्याच्या विश्वासावर नजीब मराठ्यांच्या लष्करांत आला होता. यामुळें त्याच्या मुलास सुरक्षितपणें पार करून देण्याचें जोखीम होळकराच्या शिरावर होतें. त्याच्याच सहाय्यानें एका अंधाऱ्या रात्रीं जाबितखान पळून आपल्या जहागिरीकडे गेला. तिकडे

जातांच त्यानें मराठयांशीं लढाई करण्याची तयारी चालविली. त्यास दिल्लीच्या दरबारीं अमीर उल उमरा हें पद मिळालें होतें तें मराठयांनीं शहाजादा जवानबक्त यास सांगून त्याजकडून काढविलें म्हणून त्यांजविषयीं त्याच्या मनांत अधिकच वैरभाव उत्पन्न झाला. एवढाच एक रोहिला मराठयांस मिळाला होता, तोही आतां शत्रूपक्षास जाऊन मिळाला.

कार्तिकाचा महिना सुरू झाल्याबरोबर मराठे दुआबांत पसरून चोहोंकडे लुटालूट करूं लागले. पठाणांची फौजही तयार होतीच. ती तत्काळ त्यांजवर चालून आली. दोंही फौजांच्या गांठी पडून दररोज लढाया होऊं लागल्या. शिकोआबाद व इटावा हे परगणे आतां मराठे घेतलि हें रोहिल्यांस भय होतेंच. त्यामुळें रोहिले व पठाण यांचा एकमेकांस मदत करण्याचा ठराव यापूर्वींच झाला होता. त्यास अनुसरून रोहिल्यांची पंधरा हजार फौज फत्तरगडाजवळ गंगेस नावांचा पूल बांधून दुआबांत आली आणि फरकाबाद व फत्तेगड यांमध्यें येऊन उतरली. तिजवर मुख्य सरदार हाफिज रहिमत हा होता. रोहिले व पठाण यांची मिळून आतां सत्तर हजार फौज जमली. पण इतकें असूनही मराठयांपुढें त्याचें कांहींच चाललें नाहीं. दर युद्धांत त्यांचा पराजय होऊन त्यांच्या फौजांच्या टोळ्या अनेक वेळां मारिल्या गेल्या. एक फरकाबादेखेरीज सारा दुआबप्रांत मराठयांनीं लुटून फस्त केला. इटावा व दुसरे त्या प्रांतींचे मोठमोठे किल्ले होते ते सारे मराठयांनीं घेतले. शेवटीं इ. १७७१ च्या मे महिन्यांत हाफिज यानें वारंवार पराजय झाल्यामुळें निरुत्साह होऊन रोहिलखंडाकडे पलायन केलें; मग मराठयांचा सर्व मारा एकटया पठाणांवरच पडला. तेव्हां त्यांची चांगलीच रग जिरून अगदीं दुर्दशा होऊन गेली. शेवटीं आतां आपलें सारें राज्य जाणार असें पाहून अहंमदखान मराठयांस शरण आला. त्यांचा त्यानें जितका मुलुख बळकाविला होता तितका सर्व परत दिला व आपला बचाव करून घेतला. नंतर लवकरच म्हणजे या सालाच्या जुलई महिन्यांत अहंमदखान बंगश मरण पावला.

पठाणावरची मोहिम सुरू असतां बादशहास दिल्लीस आणण्याचें राजकारण सुरूं होतें तेंही आतां सिद्ध झालें. तें इंग्रजांच्या कानीं जातांच

त्यांनीं शहाअलम यास सांगितलें कीं, तुम्ही मराठयांच्या विश्वासावर दिल्लीस जाऊं नये. आम्हांस फुरसत मिळेल तेव्हां आम्हीच तुम्हांस दिल्लीस नेऊं व तक्तावर बसवूं. हें बादशहा मान्य करीत नाहींसें पाहून त्यानीं आग्रह सोडून दिला. त्याच्या जाण्यास अडथळा बिलकूल केला नाहीं. याचें कारण असें कीं, बंगालचें राज्य घशाखालीं उतरेपर्यंत बादशहा जवळ असल्यापासून त्यांचा फायदा होता. बादशहाचे दिवाण म्हणून त्यांनीं बंगाला हातीं घेतला होता व स्वामित्वाबद्दल दरसाल पन्नास लक्ष रुपये त्यास द्यावयाचा ठराव केला होता. शिवाय कोरा व अलाहाबाद हे परगणे दरसाल बारा लक्ष रुपये उत्पन्नाचे त्याच्या स्वाधीन केले होते. आतां बंगाल्यावर त्यांचा अंमल पूर्णपणें बसला होता व सुजाउद्दौल्याच्या राज्यांतही त्यांचें चांगलेंच बस्तान बसलें होतें. अर्थात् आतां बादशहास जवळ ठेवून घेण्यापासून त्यांस कांहींच फायदा होत नव्हता. तो आयता आपण होऊन दरसाल पन्नास लक्षांची नेमणूक व बारा लाखांचे परगणे यांवर पाणी सोडून जर मराठ्यांकडे जाऊं लागेल तर ते तरी त्यास कशास नको ह्मणतील ! मराठ्यांशीं त्याचा करार असा ठरला होता कीं, त्यानें त्यांस दहा लक्ष रुपये तूर्त खर्चास द्यावे. त्यांनीं त्यास नेऊन त्याच्या पूर्वजांच्या तक्तावर बसवावें. त्याचे पुढें जे जे बेत आहेत त्यांस त्यानें आपली संमति व मदत देत जावी. त्यांजकडे पानिपत होण्यापूर्वी ज्या ज्या जहागीरी चालत होत्या त्या त्यांजकडे पुनः सुरू कराव्या. महंमदशहाच्या कारकीर्दीपासून चौथाईची बाकी तुंवली होती ती द्यावी. त्याचे जे जे शत्रु असतील त्यांचें मराठ्यांनीं पारिपत्य करावें. पुढें मोहिमा दोघांनीं मिळून कराव्या व लूट सारखी वांटून घ्यावी. याप्रमाणें उभयपक्षीं करार ठरल्यानंतर बादशहा आपली फौज, सरदार, कारखाने, मुलेंमाणसें व सर्व लवाजम्यानिशीं प्रयागाहून निघाला. तेव्हां कोरा परगण्याच्या सरहद्दीपर्यंत इंग्रजांची फौज त्यांस पोचवावयास आली होती. तो दुआबांतून दिल्लीच्या रोखें चालला असतां त्यास वाटेंत अहंमदखान बंगस मेल्याची बातमी कळली. तेव्हां त्याचा दिवाण हिशामुद्दीनखान यानें सल्ला दिला कीं, अहमदखानाची जहागीर जप्त करण्यास ही खाशी संधि आहे. याप्रमाणें

आपली मर्जी असल्यास उत्तर दुआबांत महादजी शिंदे आहे त्यास बोलावून आणतों. हें बोलणें बादशहास पसंत पडून त्यानें फरकाबादेच्या रोखानें कूच केलें व शिंद्यासही जलदीनें येण्याविषयीं पत्र पाठविलें. ती बातमी अहमदखानाचा मुलगा व कारभारी यांस कळतांच त्यांनीं बादशहाचा बक्षी नजीबखान यास एक लक्ष रुपये दिले व त्याच्या द्वारें बादशहास सहा लक्ष रुपये नजराणा देऊन त्यांची समजूत काढिली. पत्र गेल्याप्रमाणें महादजी शिंदे जलदीनें आला पण पहातो तों, आपण येण्यापूर्वींच तंटा मिटलेला! पठाणांस जरब देऊन कांहीं पैका उकळण्याचा त्याचा बेत होता तो फसलासें पाहून त्यास राग आला. पण पुढें बादशहापासून आपणास पुष्कळ कामें करून घ्यावयाचीं आहेत, इतक्यांतच त्याशीं कट्टू होऊन उपयोगी नाहीं, असें मनांत आणून तो स्वस्थ बसला. बादशहाची स्वारी फरकाबादेहून निघून तीन महिनेपर्यंत नबीगंज येथें राहिली होती. समागमें महादजी शिंदे होता. तेथून दिल्लीस जाऊन बादशहा विसाजी कृष्ण व होळकर यांस मिळाला व स. १७७१ च्या दिसेंबर महिन्याच्या अखेरीस सिंहासनावर बसला.

नंतर रोहिल्यांवर मोहीम करण्याची मसलत मुकरर झाली. नजीबखानाच्या पोरावाळांवर सूड घेण्याविषयीं महादजी शिंद्याचा आग्रह फार होता बादशहाचा व जाबिताखानाचा खासगी द्वेष असल्यामुळें त्याजकडून शिंद्यास अधिकच उत्तेजन मिळालें. मराठ्यानीं रोहिल्यांस चिरडून अगदीं दीन करून टाकल्यावर मग आपण रोहिल्यास मदत करण्याचें ढोंग माजवून त्यांचें राज्य घ्यावें हा सुजाउद्दौल्याचा डाव होता त्यामुळें तो हल्लीं स्वस्थ बसून होता.

सन १७७२ च्या प्रारंभीं बादशहाची व मराठ्यांची फौज दिल्लीहून निघाली. मराठ्यांशीं लढण्याकरितां जाबिताखानानें फौज जमा केली होती व कांहीं रोहिले सरदारही कुमकेस आणिले होते. मराठ्यांपुढें मैदानांत आपला निभाव लागणार नाहींसें जाणून, तो शुक्रतालच्या किल्ल्याच्या आसन्यास जाऊन राहिला. त्याचा बाप नजीबउद्दौला यानें स. १७५९ त दत्ताजी शिंद्याची स्वारी आली तेव्हां याच शुक्रतालच्या छावणींत राहून

शिंद्याशीं कित्येक महिनेपर्यंत टक्कर मारिली. त्यावेळीं शिंद्याचें त्यापुढें कांहीं एक चाललें नाहीं. याकरितां आपणही तसेंच केलें म्हणजे मराठ्यांचें भय बाळगण्याचें कारण नाहीं असें समजून तो शुक्रतालच्या आश्रयास राहिला होता. पण बापाला जें साधलें तें म्हणजे मुलास साधेलच असा कांहीं नियम नाहीं. मराठ्यांनीं येऊन शुक्रतालास वेढा दिला. याखेपेस त्यांजबरोबर मोठमोठाल्या तोफा होत्या त्यांचा मारा सुरू होतांच जाबिताच्या फौजेंत कहर उसळला. रोज हजारों शिपाई मरूं लागले तेव्हां तेथें राहण्यास त्यास धीर पुरवेनासा होऊन तो एका काळोख्या रात्रीं तेथून निसटून पुनः गंगा उतरून बिजनार जिल्ह्यांत आला. तो पळाला हें कळतांच मराठेही तावडतोब गंगा उतरण्याकरितां चंडी घांटाच्या उतारास आले. पलीकडच्या तीरीं जाबितानें तोफांची बातेरी ठेविली होती

सन १७७२ } व दोन फौजा ठेविल्या होत्या. पण मराठ्यांनीं नदी
फेब्रु.-जून. } उतरून तोफा हस्तगत केल्या व दोन्ही फौजा गांठून

तुडवून धुळीस मिळविल्या. नंतर सर्व बिजनार जिल्हा त्यांनीं लुटून उध्वस्त केला. त्यांची फौज पाठीवर आलीसें पाहून नजीबगड येथें जाबिता राहिला होता तेथून पुनः पळाला. जातां जातां त्यानें मुलें माणसें व जामदारखाना फत्तरगडास ठेविला. पण त्या किल्ल्यावर अन्नपाण्याचा संग्रह करण्यास त्यास फुरसत मिळाली नाहीं. मराठे पाठलाग करीत आले, त्यांनीं नजीबाबाद हल्ला करून घेतली व लुटून जाळून तिचा विध्वंस केला. तेथें नजीबउद्दौल्याची कबर होती तीही फोडून त्यांनीं छिन्नविछिन्न करून टाकली! नंतर त्यानीं फत्तरगडास घेरा घालून तोही घेतला. तेथें नजीबउद्दौल्यानें पानिपतच्या वेळीं मराठ्यांपासून लुटून घेतलेली अपार संपत्ति भरून ठेविली होती ती सर्व आतां त्यांच्या हातीं लागली. जाबिताचीं बायकामुलेंही सांपडलीं. नंतर घोसगडचा किल्ला त्यांच्या हातीं आला. जाबिताच्या सर्व जहागिरीवर त्यांचा अंमल बसला. नंतर त्यांची फौज सर्व रोहिलखंडभर पसरली. यावेळीं कत्तल, लुटालूट, जाळपोळ करण्याची त्यानीं कांहीं शिकस्त करून सोडली. पानिपतच्या वेळचें उसनें फेडण्यांत त्यांनीं कांहीं आळस केला नाहीं! रोहिले लोक शूर खरे. परंतु आदल्या-

वर्षी दुआबांत त्यांस चांगलाच मार बसला असल्यामुळें यंदा मराठ्यांची फौज त्यांच्या मुलखावर येऊन पडली तेव्हां त्यांची गाळण उडाली. ते सैरावैरा पळत सुटले. कितीहि बळकट किल्ले असोत, त्यांच्या फौजेचे तळ कितीही बळकट व अडचणीच्या जाग्यांत असोत, पण मराठ्यांचा एखादा स्वार दृष्टीस पडला नाहीं तोंच रोहिल्यांनीं किल्ले व छावण्या सोडून धूम पळत सुटावें असें वारंवार होऊं लागलें. मराठी फौजेच्या टोळ्या साऱ्या रोहिलखंडभर स्वच्छंदपणें जिकडे तिकडे विध्वंस करीत फिरत होत्या. पण त्यांस आडवें येण्याची मगदूर कोणाचीच झाली नाहीं. हाफिज रहिमतखान, फत्तेखान सरदारखान, महीबुल्लाखान, फत्तेउल्लाखान व दुसरेही छोटे मोठे रोहिले सरदार उत्तरेस तिराईच्या रानांत पळून गेले. पावसाळा सुरू होण्याच्या सुमारास मराठ्यांचें लष्कर रोहिलखंडांतून परत गेलें तेव्हां रोहिले सरदार तिराईतून परत आले. पण तोंपर्यंत तेथील रोगट हवेनें त्यांचीं आठ हजार मनुष्यें प्राणास मुकलीं! रामचंद्र गणेश याचें इतर सरदारांशीं बनेनासें झाल्यामुळें रोहिल्यांवरची मोहिम सुरू होण्यापूर्वींच त्यास पेशव्यांनीं परत बोलावून स्वारीची मुख्य सरदारी विसाजीपंत बिनीवाले यास दिली होती. रोहिल्यांचा आणि मराठ्यांचा अद्यापि तह झाला नव्हता. पावसाळा संपल्यावर पुनः त्यांची स्वारी होईल ही रोहिल्यांस भीति होतीच. यामुळें ते सुजाउद्दौल्यास शरण गेले. तो या प्रसंगाची वाटच पहात बसला होता. रोहिल्यांनीं सुजास सांगितलें कीं, आतां इतःपर मराठ्यांची स्वारी आम्हांवर झाली असतां ती तूं परतून लावावीस. ह्या कामगिरीबद्दल आम्हीं तुला चाळीस लक्ष रुपये देऊं. तें सुजानें कबूल केलें. पठाणही त्यास अनुकूळ झाले. इंग्रजांचें त्यास पाठबळ चांगलें होतेंच. मराठ्यांशीं लढण्याकरितां जाटांसही तो उत्तेजन देत होता. याप्रमाणें सुजाच्या आश्रयाखालीं तिकडील राजेरजवाड्यांचा हा मराठ्यांविरुद्ध मोठाच कट तयार होत होता.

पावसाळ्यांत मराठ्यांची कांहीं फौज दुआबांत राहिली व कांहीं दिल्लीस परत गेली. जाबिताखानाकडे मीरबक्षी हें पद होतें तें त्याजकडून दूर करून महादजी शिंद्यानें बादशहाकडून पेशव्यांचे बंधु नारायणराव यास

देवविलें होतें. तें पद व आपली जहागीर आपणास परत मिळावी म्हणून जावितखानाची बादशहाकडे खटपट सुरू होती. त्या खटपटीस बिनीवाले व होळकर अनुकूल झालेले पाहून जाबिताचा हाडवैरी महादजी शिंदे यास फार राग आला व तो रजपूत राजांपासून खंडणी वसूल करण्याचा निमित्तानें दिल्लीहून कूच करून रजपुतान्याकडे आला. बादशहा व मराठे यांमध्यें फूट पाडावी म्हणून सुजाउद्दौला व इंग्रज यांचा प्रयत्न चालू होता. तो सफळ होऊन बादशहाच्या मनात मराठ्यांविषयीं इतका तिटकारा उत्पन्न झाला कीं, हे दाक्षिणचे गांवढळ व उर्मट लोक दिल्लींतून हांकून लावावे असा त्यानें आपला बक्षी नजीबखान यास हुकूम केला ! या हकीगती स. १७७२ च्या पावसाळ्यांत झाल्या. या स्वारीचा या पुढचा वृत्तांत पुढील प्रकरणांतून क्रमशः येणार आहे. याकरितां तो आतां येथें आम्हीं देत नाहीं.

---

## प्रकरण दहावें.

### पेशव्यांचें दुखणें व मृत्यु.

[ स. १७७२ जून–नोव्हेंबर. ]

स. १७७० सालीं पेशव्यांची स्वारी 'हैदरअल्लीवर तिसरी स्वारी' करण्याकरितां गेली होती ती पावसाळ्यांत परत आली. पुनः स. १७७१ त तिकडे मोहिमेस जावें असें त्यांच्या मनांत होतें. परंतु प्रकृतीच्या नादुरुस्तीमुळें त्यांस परत यावें लागलें. त्यांस क्षयरोगाची व्यथा जडली होती व औषधोपचार जरी ज्यारीनें सुरू होते तरी या दुखण्यांतून आपण वाचूं असा भरंवसा त्यांस फारसा नव्हता. कर्नाटकांत व हिंदुस्थानांत त्यांच्या फौजा मोहिमेवर गुंतल्या होत्या तिकडे त्यांचें सर्व लक्ष्य वेधलें होतें. सन १७७१ चा पावसाळा संपतांच ते पुण्याहून निघून नगरच्या रोखें गेले. तेथें कांहीं मुक्काम करून गोदावरीतीरीं गेले. तेथून पुनः नगरास येऊन सिद्धटेकास आले. तेथें पुष्कळ दिवस मुक्काम होता. एकंदरींत गेला पाव-

साळा सुरू झाल्यापासून त्यांची प्रकृती कांहीं बरी होती. परंतु स. १७७२ चा उन्हाळा सुरू होतांच त्यांची प्रकृती पुनः बिघडली व दिवसेंदिवस शक्तिपात होत चालला. त्या सालच्या फाल्गुनमासीं ते थेऊरास येऊन राहिले. आपल्या राज्याचें पुढें कसें होईल हीं त्यांस फार मोठी काळजी होती. आपल्या मागें दादासाहेबांचा बंदोबस्त आपल्या बंधूच्या हांतून होणार नाहीं असें वाटून त्यांनीं त्यांस कैदेंतून सोडण्याचा बेत केला. या सुमारास जानोजी भोंसले त्यांस भेटण्याकरितां येत होता, त्याची भेट झाल्यावर दादांस मोकळें करण्याचा त्यांनीं निश्चय केला.

जानोजीचीही प्रकृति बिघडून तो क्षीण होत चालला होता. त्यास मुधोजी, साबाजी आणि बिंबाजी असे तीन भाऊ होते. या चौघां भावांत फक्त मुधोजीस दोन पुत्र होते. त्यांत थोरल्या मुलांचें नाव रघोजी असें होतें व यासच आपल्यामागें जहागीर व सेनासाहेब सुभ्याचें पद मिळावें अशी जानोजीची इच्छा होती. आणि याकरितांच तो थेऊरास पेशव्यांच्या भेटीकरितां आला होता. त्या समयीं त्यांनीं त्याचा यथायोग्य सन्मान करून तुझ्यामागें जहागीर व सेनासाहेब सुभ्याचें पद रघोजीस चालविलें जाईल, असें त्यास वचन दिलें. नंतर त्यांचा निरोप घेऊन जानोजी पंढरपुरास जाऊन तेथून तुळजापुरास गेला. तेथून जोगाईच्या आंब्यास जात असतां आसपास मोंगलांचे सरदार तहवारजंग व इब्राईमखाम घौशा म्हणून होते त्यांनीं त्यांस भेटीस बोलाविलें. त्यांत घौशाची भेट घेऊन तो परत आला, तों एकाएकीं त्याच्या अंगाची अतिशय काहिली होऊन तो मरण पावला.[१६मे१७७२]

स. १७७२ एप्रिल

जानोजीच्या भेटीशीं दादासाहेबांच्या मुक्ततेचा कांहीं तरी संबंध असावा असें त्यावेळच्या पत्रव्यवहारावरून वाटतें. पण तो संबंध काय होता हें समजत नाहीं. नाना व मोरोबा फडणीस हेही दादांस कैदेंतून सोडावें असेंच यावेळीं पेशव्यांस सांगत होते. त्यांच्याही मनांत तें घोळत होतेंच. त्यांनीं पुण्याहून दादांस बोलावून नेलें व सात लक्षांची जहागीर व त्रिंबकचा किल्ला त्यांस देऊन त्यांचें समाधान केलें. आपण फक्त स्नानसंध्या करून राहूं, राज्यकारभारांत मन घालणार नाहीं व

कांहीं बंड फितूर इतःपर करणार नाहीं, असें दादांनीं कबूल केलें. याच वेळीं पेशव्यांनीं दुसरी एक महत्वाची गोष्ट केली ती ही कीं, मोरोबा-दादाकडून कारभार काढून तो त्यांनीं सखारामबापूस दिला. राज्यां-तले तंटेबखेडे मोडावे, आपल्यामागें आपल्या भावाचें राज्य निर्विघ्नपणें चालावें, उत्तरोत्तर आपल्या राष्ट्राचा उत्कर्ष होत जावा, हीच काय ती वरील गोष्ट करण्यांत पेशव्यांची इच्छा होती.

रोग्याच्या प्रकृतीविषयीं वैद्य निराश झाले, त्यांनीं हा रोग असाध्य असें सांगितलें, तरी रोग्याची व त्याच्या आप्तइष्टांची आशा सुटत नाहीं. त्यांचे दैवी मानवी उपाय शेवटपर्यंत चालूच असतात. त्या वेळचे प्रसिद्ध वैद्य गंगा विष्णु, रणछोड व रूपेश्वरबावा यांनीं पेशव्यांची प्रकृति असाध्य म्हणून जरी ठरविलें, तरी पेशव्यांचे व त्यांच्या आप्तइष्टांचे व जवळच्या लोकांचे आरोग्य होण्याविषयीं उपाय जारीनें सुरू होते. प्रथम दादासाहेब अनु-ष्ठान करीत होते व औषधही देत होते; परंतु उपयोग होत नाहींसें पाहून त्यांनीं दोन्हीं सोडून दिलीं. कोणी म्हणूं लागले कीं, दादांचा गुरु गौड जातीचा कोणी मांत्रिक आहे, तो नर्मदेच्या तीरीं गुप्तस्थळीं राहिला आहे, त्यानें श्रीमंतांस मूठ मारिली आहे. ही शंका निघतांच तीच मूठ त्या मांत्रिकावर उलटण्यासाठीं कोणी जादूगार वगैरे ढोंगी लोकांच्या भजनीं लागले. कोणी म्हणत कीं, हा भूतबाधेचा प्रकार असावा. तोही उपाय करून पहावा म्हणून नारायणरावसाहेब यांजवळ घोम येथें नृसिंहाचें जागृतस्थान आहे तेथें जाऊन देवास प्रार्थना करून व अनुष्ठानास ब्राह्मण बस-वून आले. याप्रमाणें भुताचा पक्का बंदोबस्त झाला तरी पेशव्यांची प्रकृति मात्र सुधारली नाहीं. ती दिवसेंदिवस अधिकच खचत चालली. ते ज्या दिवशीं थेऊरास आले त्या दिवशींच मोत्याचा तुरा दहा हजार रुपयांचा त्यांनीं देवास दिला. नवस सायासही बहुत प्रकारचे केले. गिरीच्या व्यंक-टेशास त्यांनीं दहा लक्ष रुपये देण्याचा नवस केला. देवानें "घोड्यावर बसते करावें. मग आपण नवस फेडावा. मग आपण कारभार करावा." असा संकल्प. कोणी ज्वरशांति व इतर नानाप्रकारचीं अनुष्ठानें केलीं. परंतु सर्व व्यर्थ! श्रावणापासून प्रकृति अगदीं बेताल झाली. दररोज अंगांत

ज्वर भरूं लागला व वायूचाही संचार ज्वरामध्यें होत असे. तो ज्वर भरला म्हणजे अंगाची इतकी भयंकर काहिली होई कीं, आरोळ्या व शंखवाद्य करण्यापर्यंत मजल येई! त्या यातना दुःसह झाल्यामुळें ते दादासाहेब व सखारामबापू यांची विनवणी करीत कीं, मला यातना सोसवत नाहींत. मला खंजीर आणून द्या म्हणजे तो छातींत खुपसून घेऊन मरून जातों!

पेशवे आतां जगत नाहींतसें पाहून ते मरण पावल्यानंतर नारायणरावास गादी न मिळतां ती आपणास मिळावी म्हणून दादा पुण्यांतून दसऱ्याच्या मुहूर्तानें बाहेर पडले. दोन हजार स्वार व कांहीं गारदी त्यांनीं चाकरीस ठेविले आणि निजाम भोसले व हैदर यांस आपली कुमक करण्याविषयीं पत्रें लिहिलीं. ही बातमी पेशव्यांस कळतांच त्यांनीं सर्व फितुराचा तत्काळ छडा लाविला, पत्रें धरलीं, स्वार व गाडदी जमले होते ते मोडून उधळून लाविले व या फंदांत दादांचे प्रमुख शागीर्द सात असामी होते त्यांस पकडून बिड्या घालून डोंगरी किल्ल्यावर कैदेंत पाठविलें व दादा तुळापुरापर्यंत गेले होते त्यांस धरून परत पुण्यास आणिलें. यावेळीं त्यांस पुनः कैदच व्हावयाची, परंतु पेशव्यांनीं त्याचा अन्याय माफ केल्यामुळें तो प्रसंग टळला. हें एक पेशव्यांस मरतां मरतां मोठें दुःख होण्यास कारण झालें.

स. १७७२ आक्टोबर.

या वेळीं पेशव्यांसमीप त्रिंबकराव मामा पेठे, नाना व मोरोबा फडणीस, सखारामबापू, त्रिवर्ग रास्ते बंधु, बाबूजी नाईक बारामतीकर, मोरोबा, वामनराव, परशुरामभाऊ, रघुनाथराव व श्रीपतराव हे पांच पटवर्धन, कृष्णराव काळे, पाटणकर, दरेकर व यांखेरीज अनेक मुत्सद्दी व सरदार व मामलेदार वगैरे राष्ट्रांतले प्रमुख लोक होते. ज्वर येऊन गेला म्हणजे पेशवे कांहीं वेळ ग्लानीनें निपचित पडत. त्यांतून सावध झाले म्हणजे नारायणराव व सखारामबापू यांस पुढें राज्यकारभार कसा चालवावा याविषयीं सांगत असत. दादांस कुटुंबांत कलह व राज्यांत फंदफितूर न करण्याविषयीं त्यांनीं अनेक प्रकारें बोध केला, व नारायणराव यांचा हात त्यांच्या हातीं देऊन त्यांचा सांभाळ करण्याविषयीं निरवणूक पुनः पुनः केली. नारायणराव यांचा स्वभाव तामसी व उतावळा होता. लहान वयामुळें पेंच

पांच व भारदस्तपणा त्यांच्या अंगीं बिलकुल नव्हता. यामुळें त्यांसही पुढें कोणाशीं कसें वागावें याविषयीं बहुत बहुत उपदेश त्यांनीं केला, व सखारामबापूकडून वचन घेतलें कीं, माझ्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत मी नारायणरावसाहेबांस अंतर देणार नाहीं. हरीपंत फडक्यावर पेशव्यांचा विश्वास व प्रेम बहुत असे. अलीकडे पांच सात वर्षें ते दर स्वारीस त्यांबरोबर नेहमीं असत. ते पूर्वीचे कारकुनी पेशाचे असतांही श्रीमंतांचा अष्टौप्रहर सहवास घडल्यामुळें त्यांच्या कारस्थानाचीं धोरणें व लष्करी कामाचा अनेक प्रकारचा अनुभव त्यांस सहजासहजीं प्राप्त झाला होता. त्यांनीं आजपर्यंत एकनिष्ठेनें सेवा केली व दुखण्यांतही नेहमीं जवळ राहून चाकरी फार चांगली केली, सबब श्रीमंतांनीं त्यांस आपलें श्रीवर्धनचें देशमुखीचें खासगत वतन इनाम करून दिलें. कोकणचे सुमेदार रामाजी महादेव हे नुकतेच वारले होते. यास्तव तो सुभाही त्यांनीं फडक्यासच सांगितला. दुसरे कित्येक कारकून व खिसमतगार विश्वासांतले होते त्यांपैकीं कोणास इनाम गांवें व कोणास नक्त बक्षीस पाहून पाहून दिलें. एके दिवशीं ज्वराचा दाह शांत होऊन गेल्यावर त्यांस कांहीं स्मरण झालें व त्यांनीं आपाजीराव पाटणकर व खंडेराव दरेकर सरलष्कर यांस बोलावून आणून विचारलें कीं, मागें एकदां पर्वतीस जातांना मी तुम्हांस तुमचें सर्व कर्ज फेडीन असें बोललों होतों. तर आतां सांगा कीं, तुम्हांस कर्ज किती आहे ? मागें सहज बोललेल्या गोष्टींचेंसुद्धां स्मरण धरून आसन्नमरण असतांही श्रीमंतांनीं हा प्रश्न केलेला ऐकून त्या सरदारांस गहिंवर आला. त्यांनीं उत्तर केलें कीं, आम्ही बहुत दिवसांचे चाकर. असल्या स्थितींत कर्जमुक्त होऊनही आम्हांस काय सुख लागावयाचें आहे ! परमेश्वर कृपेनें आपण बरे झालां तर द्याल तें घेऊं. आतां आम्हीं पैका साफ घेणार नाहीं !

श्रीमंतांनीं हिंदुस्थानच्या स्वारीच्या सरदारीवरून आपणांस दूर करून परत बोलाविलें म्हणून रामचंद्र गणेश यास वैताग येऊन त्यानें संन्यास घेण्याचा बेत केला व एक दोन दिवस गांवांतून "नारायणपात्र" ही फिरविलें. आतां शिखासूत्राचा त्याग करणार इतक्यांत सखारामबापूंस तें वर्तमान कळल्यावरून त्यांनीं त्याचा निषेध करून संन्यासापासून परावृत्त केलें.

हिंदुस्थानांत सुजाउद्दौल्यानें इंग्रज, रोहिले, पठाण व जाठ यांस मराठ्या-विरुद्ध उठविण्याची खटपट चालविली होती तिचा प्रतिकार तिकडील मुख्य सरदार विसाजीपंत बिनीवाले यानें कांहीं केला नाहीं व शिंद्याशीं भांडण केलें म्हणून बिनीवाल्यावर श्रीमंताचा रोष झाला होता. त्यांस सर-दारीवरून काढून रामचंद्र गणेश यास पुनः तिकडे पाठवावें असाही बेत पुण्याच्या दरबारीं घाटत होता, पण तो तूर्त तसाच राहिला.

कार्तिक शुद्ध द्वादशी ता. ७ नोव्हेंबर १७७२ रोजीं श्रीमंतांनीं सर्व-प्रायश्चित्त घेतलें. त्याची तयारी सर्व आपल्या नजरेखालीं कराविली. त्या प्रसंगीं त्यांनीं लाखो रुपये दानधर्म केला. पुण्यांत पांच हजार ब्राह्मणांस नित्य क्षीरभोजन घालण्याचा हुकूम करून त्रिंबकरावमामाची त्या कामावर नेमणूक केली. कंची कामाक्षीस पन्नास हजार रुपयांच्या मोहरा वांटण्या-करितां पाठविण्याचें श्रीमंतांनीं उदक सोडिलें व दुसरींही दानधर्माचीं उदकें सोडिलीं. ते इतकें दुखणेकरी होते तरी सर्वांवर त्यांचा वचक पहिल्या-प्रमाणेंच होता. त्यांस बोलण्याची देखील शक्ति उरली नव्हती तरी दर-बारी लोक त्यांस पाहतांच चळचळां कांपत असत ! रमाबाईस त्यांनीं सहगमन करण्याविषयीं बोध केला. पण हा बोध तिला करण्याची अवश्य-कताच नव्हती. अलीकडे कित्येक दिवस फक्त गोमूत्र व दूध यावरच त्या साध्वीनें शरीर धारण केलें होतें. सती जाण्याचा तिचा निश्चय पक्का ठरला होता. पेशव्यांचा आतां कधीं अकस्मात् अंत होईल याचा भरंवसा बिल-कुल राहिला नव्हता. एके दिवशीं श्रीमंताचा अतिशय वाखा होऊन ते मरण पावल्याची हूल उठली. त्यावेळीं रमाबाईनें सती जाण्याचा वेळचीं नेसावयाचीं पातळें आणण्याकरितां पुण्यास सांडणीस्वार पिटाळला. तो तेथें जातांच शहरांत जिकडे तिकडे हलकल्लोळ झाला. मग श्रीमंत जिवंत असल्याची खात्रीलायक बातमी गेल्यावर पुष्कळ वेळानें स्वस्थता झाली. हें वर्तमान श्रीमंतांच्या कानीं जातांच त्यांनीं त्या दुर्दैवी सांडणीस्वाराचा हात तोडण्याविषयीं हुकूम केला ! तो हुकूम रद्द होण्यास पुष्कळांची रद-बदल खर्ची पडली.

नाना फडनवीस व हरीपंत फडके नेहमीं श्रीमंतांजवळ असत. त्यास

ते बोलले कीं, माझे सरदार व मुत्सद्दी व रयत लोक मला पहावेसें वाटतात. याकरितां मजकडे येण्यास कोणास बंदी करूं नका. हा हुकूम सुटतांच हजारों लोक श्रीमंतांच्या दर्शनास धांवले. आपला अंतकाळ समीप आलासें पाहून त्यांनीं वैद्याची प्रार्थना केली कीं, मरणसमयीं मला कफ न व्हावा, अतिसार व्हावा, अशी योजना करा. कारण कीं, कफ झाल्यास वाचा बंद होऊन परमेश्वराचे नामोच्चरणास मी अंतरेन ! कार्तिक

१८ नोव्हे. १७७२ वद्य अष्टमीच्या दिवशीं सकाळच्या प्रहर दिवसास श्रीमंतांचें देहावसान झालें. मरणापूर्वीं दोन घटका सर्व मंडळी व मोठमोठे वैदिक तपस्वी ब्राह्मण बोलावून आणून त्यांस त्यांनीं नमस्कार केला, व 'महायात्रेस आम्ही जातों, आमच्या स्वारीची तयारी करा' असें सांगून स्मृतींत 'गजानन गजानन' असा नामघोष करीत असतां मोठ्या योग्याप्रमाणें त्यांचा नेत्रद्वारें प्राण गेला !

पूर्वसंकल्पाप्रमाणें रमाबाई सती गेली. जातांना तिनें आपलें जवाहीर व अलंकार गोरगरीबांस वांटून टाकिले व धर्मशिळेवर उभी राहून नारायणरावसाहेबांचा हात दादासाहेबांच्या हातीं देऊन त्यांस "सर्वांचें वडीलपणें यथास्थित चालवावें" असा बोध केला. मोठमोठे सरदार व मुत्सद्दी व इतर हजारों लोक तिच्या पायावर डोई ठेवण्यास आले त्यांस आपलें स्मरण रहावें म्हणून तिनें कोणास अंगठ्या, मोहरा, पुतळ्या, रुपये असे वांटले. व सर्वांचा निरोप घेऊन शांत वृत्तीनें चितारूढ होऊन अग्नीच्या ज्वाळांत ती साध्वी अदृश्य झाली !

# प्रकरण अकरावें

## नारायणराव पेशव्यांची कारकीर्द.

( स. १७७२ नोव्हें.—स. १७७३ आगष्टअखेर. )

प्रथम पेशव्यांचें उत्तरकार्य नारायणरावसाहेब यांनींच केलें. दहावे दिवशीं पिंडास कावळा स्पर्श करीना तेव्हां नाना फडनवीस वगैरे मुत्सद्यांनीं संकल्प केला कीं, नारायणराव यास पुत्र झाला तर त्याचें नांव माधवराव ठेवावें. नंतर पिंडास काकस्पर्श झाला. उत्तरकार्य आटपल्यावर नारायणराव व दादासाहेब व सर्व मुत्सद्दी व सरदार थेऊराहून पुण्यास आले. शहरांत प्रवेश करण्यापूर्वी नारायणरावसाहेब व दादासाहेब यांनीं संकेत ठरविला कीं, झाल्या गोष्टी त्या झाल्या. मागचें सर्व विसरून जाऊन यापुढें दोघांनीं मनमिळाऊपणानें रहावें. निद्रा मात्र दोघांनीं पृथक् स्थळीं करावी. स्नानसंध्या, भोजन, बसणें उठणें, राज्यकारभार हें सर्व दोघांनीं एका ठिकाणीं बसून करीत जावें. 'द्यावें'[2] नारायणरावसाहेबांनीं व 'देवावें' दादासाहेबांनीं करीत जावें. हे संकल्प कमलपत्रावरील बिंदूप्रमाणें होते. कारण कीं, ते तितकेच सुंदर पण नश्वरही होते. तें कसें हें आतां पुढें समजेलच.

मार्गशीर्ष शु. सप्तमीच्या ( १ दिसेंबर ) मुहूर्तानें श्रीमंत गारपिरावर डेरेदाखल झाले व छत्रपतींकडून पेशवाईचीं वस्त्रें घेण्याकरितां सातार्‍यास

---

१ ही प्रस्तावना ए. ले. संग्रह भाग चवथा पृ. १५४७—१५६६ यांवर छापिली आहे. २ सरकारांतून कोणास कांहीं द्यावयाचें असल्यास पूर्वी एक, कागद तयार केला जात असे. त्या कागदास 'देणें यादी' असें म्हणत. या देणेंयादीवर मालकानें म्हणजे पेशव्यानीं 'द्यावें' असा स्वदस्तुरचा शेरा पहिल्यानें करावा आणि नंतर त्यांच्या कारभार्‍यानें तीवर 'देवावें' असा शेरा करावा अशी वहिवाट असे. 'द्यावें' असा शेरा करण्याच्या अधिकाराला 'वडीलकी' असें म्हणत आणि 'देवावें' करण्याच्या अधिकाराला 'अखत्यारी' असें नांव 'द्यावें' हा मालकाचा शेरा असल्याशिवाय कोणत्याही देणेंयादीचा अंमल होऊं शकत नसे.

जावयास निघाले. समस्त मुत्सद्दी व पटवर्धन व रास्ते वगैरे सरदार स्वारींत हजर होते. दादांस बरोबर येण्याविषयीं श्रीमंतांनीं आग्रह केला तेव्हां ते अडून बसले. ते म्हणूं लागले कीं, आम्हांस पंचवीस लक्षांचा सरंजाम द्यावा. आम्ही फौज बाळगून चाकरी करूं. नारायणरावांस हें बोलणें अर्थातच रुचलें नाहीं. त्यांनीं सांगितलें कीं, सरंजाम देण्यास आम्हांस अनुकूळ पडत नाहीं. सर्व राज्यच तुमचें आहे. तुमच्या आज्ञेप्रमाणें वागण्यास मी सर्वथा सिद्ध आहे. आपण धनीपणा सोडून निराळा सरंजाम तोडून घेऊन चाकर होण्याची इच्छा कां करतां? याप्रमाणें बोलल्यावर व इतर पुष्कळ लोकांनीं समजूत घातल्यावर दादासाहेब येण्यास कबूल झाले. नंतर उभयतां श्रीमंत निघाले ते मार्ग. शु. द्वादशीच्या दिवशीं साताऱ्याहून एक कोसावर वेण्णेच्या दक्षिणतीरीं येऊन राहिले. तेथें श्रीमन्महाराज यांस आणून मेजवानी केली व मोत्याची कंठी, तुरा, जेगा, शिरपेच याप्रमाणें जवाहीर, खेरीज पांच उंची पोषाख व हत्ती व घोडा याप्रमाणें श्रीमंतांनीं महाराजांस दिलें. अर्काटच्या नबाबाकडून माजी पेशव्यांस नजराण्यांत पालखी आली होती, तीच या प्रसंगीं महाराजांस दिली. ते खूष होऊन परत किल्ल्यावर गेले. महाराजांच्या दोन स्त्रिया होत्या त्यांच्याही दर्शनास जाऊन श्रीमंतांनीं त्यास वस्त्रें व जवाहीर दिलें. मार्गशीर्ष व. चतुर्थी रविवार या दिवशीं महाराजांनीं श्रीमंत नारायणराव यांस पेशवाईचीं वस्त्रें व शिक्केकट्यार व जरीपटका दिला. दादांसही वस्त्रें व जवाहीर दिलें. मुतालिकीचीं वस्त्रें बजाबा पुरंदरे यास दिलीं. पूर्वी दादांनीं विठ्ठलराव विंचूरकर यांस न्यायाधीशाचें पद देवविलें होतें तें आतां त्यांच्या घराण्यांतून काढून पूर्वीच्या न्यायाधीशाच्या घराण्याकडे कायम करण्यांत आलें. खडराव दरेकर यांजकडे पुनः सरलष्करीचें पद कायम झालें. महाराजांस किल्ल्यावरून काढून खालीं शहरांत ठेवावें व त्यांस बाहेर हिंडण्यास फिरण्यास प्रतिबंध होता तोही दूर व्हावा असें यावेळीं ठरलें होतें; परंतु पुढें तसें घडून आल्याचें मात्र दिसून येत नाहीं. वस्त्रें मिळाल्यानंतर श्रीमंतांची स्वारी पुण्यास परत आली.

नाना फडणीस व हरीपंत फडके यांजवर श्रीमंतांचा प्रथम प्रथम

विश्वास बराच होता. पटवर्धन मंडळीवरही प्रेम चांगलें होतें. सखारामबापूवर त्यांची मर्जी मूळपासूनच नव्हती. श्रीमंतांचा स्वभाव उतावळा व वृत्ति क्षणभंगुर होती. त्यांचे कान हलके होते. नेहमींच्या वागणुकींतसुद्धां उग्रपणा फार असे. भारदस्तपणा बिलकुल नव्हता. त्यांच्या वयाकडे लक्ष दिलें म्हणजे त्यांच्या अवगुणांचें फारसें नवल वाटत नाहीं. जगाचा अनुभव अधिकाधिक जसा त्यांस मिळतां, तसतशी त्यांच्या स्वाभावांत कदाचित् सुधारणा झाली असती. पण तूर्त तरी त्यांस नवीन मिळालेल्या अधिकाराचा किती जपून उपयोग केला पाहिजे हें कळत नव्हतें. सेवक लोकांस जरबेंत वागविणे व कामकाजांत तडफ दाखविणें या दोन गोष्टींत ते आपल्या थोरल्या बंधूचें अनुकरण करीत होते हें खरें. परंतु त्यांच्याच वयामध्यें त्या थोरल्या बंधूनें आपल्या सद्गुणांच्या व सुस्वभावाच्या योगानें लोकांवर जी छाप पाडिली होती, ती त्यांजकडून पडण्यासारखी नव्हती. प्रथमच त्यांनीं कांहीं एका कामांत सखारामबापूची रदबदली न ऐकतां त्यांस दुरुक्ति बोलून त्याचें मन दुखविलें व आपलाच हेका शेवटास नेला, ही गोष्ट वाईट झाली. कारण कीं, तो वृद्ध, अनुभवी व कुटिल स्वभावाचा मुत्सद्दी उदासीन होऊन कारभाराचें काम होतां होईल तों अंगाबाहेर टाकूं लागला. श्रीमंताजवळ हलक्या लोकांची रीझ पडत चालली, त्यामुळें अब्रूदार मुत्सद्दी दरबारी कामांत फारसा पुढाकार घेईनासे झाले.

बाबूजी नाईक बारामतीकर यांचा मुलगा पांडुरंगराव यांशीं दादासाहेबांची कन्या दुर्गाबाई हिचें माघ महिन्यांत लग्न झालें. यापूर्वी भाऊसाहेबांस पानपतच्या युद्धांत मृत्यू येऊन पूर्ण बारा वर्षे झालीं होतीं. त्यांची स्त्री पार्वतीबाई ही अद्यापि सौभाग्यचिन्हें धारण करीत होती. तिला सोंवळी करून नंतर हें लग्न उरकावें असें दादासाहेब व दरबारी लोक यांचें मत

स. १७७३ जाने. } होतें. भाऊसाहेबांचे नांवानें कोणी तोतया प्रकट झाला होता त्याची लबाडी शाबीत होऊन त्यास नगरच्या किल्ल्यांत कैदेंतही ठेवण्यांत आलें होतें. परंतु तो खोटा असेल असें पार्वतीबाईस मुळींच वाटत नव्हतें. त्यामुळें सोंवळी होण्याची गोष्ट काढतांच तिनें सर्वांस सांगितलें कीं, तुह्मी कोण तोतया म्हणतां तो मज-

पुढें आणून उभा करा, तो खरा खोटा याची मी खात्री करून घेईन आणि नंतर सोंवळी होईन ! हें उत्तर ऐकतांच तिला सोंवळी करण्याचा नाद त्यांनीं सोडिला. असें करण्याचें बहुधां कारण असें दिसत कीं, यद्यपि यथास्थित चौकशी होऊन तोतया लबाड हें ठरलें आहे, तथापि हिनें तो खोटा असें साफ म्हटलें तर बरें, पण जर कां तसें म्हणण्यांत ती गोंधळली तर मोठीच अडचण येऊन पडणार !

पोर्तुगीज लोकांपासून मराठ्यांनीं तेवीस वर्षांपूर्वी साष्टी, वसई वगैरे उत्तरकोंकण सर केलें होतें. तो मुलूख परत हिसकून घेण्याचें त्यांच्या मनांत होतें, परंतु आजपर्यंत त्यांस संधि सांपडली नव्हती. आदल्या वर्षी त्यानीं कोंकणांत कांहीं गडबड केली होती, परंतु त्यांच्या यत्नास यश आलें नव्हतें. यंदा त्यांची तयारी जय्यत झाली होती. ते आपल्या आरमाराचीं मोठमोठीं पांच सहा जहाजें व इतर पुष्कळ लहान गलबतें घेऊन विजय-दुर्ग व रत्नागिरी या बंदरांच्या बाऱ्यांवर मार्गशीर्ष महिन्यांत येऊन उतरले. ही बातमी पुण्यास येतांच तेथें आरमारचे सरदार गेले होते, त्यांस तत्काळ श्रीमंतांनीं परत जाण्याविषयीं निरोप दिला. व त्यांच्या कुमकेस कांहीं स्वार व पायदळ मिळून फौजही पाठविली, परंतु ही फौज तिकडे जाण्या-पूर्वीच कृष्णाजी धुळप यानें पेशव्यांचें आरमार सज्ज करून शत्रूंच्या आर-मारासीं गांठ घातली व त्यांस हुसकून लावून त्यांचा मालवणापर्यंत पाठ-लाग केला.

दादासाहेब व आनंदीबाई व त्यांची शागीर्द मंडळी यांच्या फंदफितु-राच्या मसलती पुनः सुरू झाल्याचें कोणी पेशव्यांस कळविलें. त्यावरून क्रुद्ध होऊन पूर्ण चौकशी न करितां त्यांनीं दादा व त्यांचा परिवार यांस पुनः कैदेंत ठेविलें. ही गोष्ट नाना फडणीस वगैरे मुत्सद्यांच्या मनास आली नाहीं. परंतु कोणा अप्रबुद्ध माणसाच्या चिथावणीवरून त्यांनीं हें केलें. त्यांची आई गोपिकाबाई गंगापुरास रहात असे. तिला भेटावयास जावें व तिकडेच कांहीं महिने रहावें असें त्यांच्या मनांत होतें. परंतु आपण तिकडे गेलों व दादासाहेबांनीं इकडे कांहीं खेळ केले तर काय करावें या भीतीनें त्यांनीं याप्रमाणें फितुराचा आपल्या मतें बंदोबस्त केला !

उत्तर हिंदुस्थानांत श्रीमंतांच्या फौजा मुलुखगिरीवर होत्या त्यांचीही हालहवाल सांगितली पाहिजे. सुजाउद्दौला व इंग्रज यांच्या चिथावणीवरून बादशहानें आपला बक्षी नजीफखान यास मराठ्यांस दिल्लींतून हांकून लावण्याविषयीं हुकूम फर्माविल्याचें मागें लिहिलेंच आहे. मराठे सरदारांपैकीं महादजी शिंदे तर दिल्लीहून निघून राजपुतान्याकडे यापूर्वीच गेला होता. होळकर व बिनीवाले मात्र दिल्लीस होते. त्यांच्या मनांत बादशहाशीं बिघाड करावयाचें मुळींच नसल्यामुळें त्यांनीं त्याचा कोप शांत करण्याविषयीं पुष्कळ यत्न केला. परंतु सामोपचाराचीं बोलणीं यावेळीं तो मुळींच ऐकेना. नजीफखानाच्या मनांत लढाईची खुमखुम फार होती. त्यामुळें शेवटीं लढाईचीच मसलत मुकरर ठरली. बादशहाची फौज पंधरा हजार होती ती युद्धाच्या तयारीनें शहराबाहेर येऊन उभी राहिली. तेव्हां मराठ्यांनीं तिजवर हल्ला करून तिचा पूर्ण पराजय केला. इंग्रज अंमलदारांनीं तयार केलेलीं दोन तीन पलटणें बादशहाच्या नोकरींत होतीं, तेवढीं मात्र व्यवस्थेनें हटून परत बचावून गेलीं. बाकी सारी फौज मराठ्यांनीं लुटून टाकली. लढाईचा हा असा परिणाम झालेला पाहून बादशहाची त्रेधा उडाली. तो पळून किल्ल्यांत जातो तों मराठ्यांचा शहरास गराडा पडला. मग बादशहाकडून मध्यस्थ येऊन रदबदली होतां होतां, शेवटीं पुनः मैत्री होण्याचें ठरलें.

सन १७७२ दिसें.

मागच्या वर्षी रोहिल्यांचें मराठ्यांनीं पारिपत्य केलें तेव्हां रोहिल्यांनीं सुजाउद्दौल्याशीं ठराव केला होता कीं, यापुढें मराठ्यांची स्वारी होईल, तर ती सुजानें मागें फिरवावी व त्याबद्दल रोहिल्यांनीं त्यास चाळीस लक्ष रुपये द्यावे. याप्रमाणें ठराव होऊन आतां रोहिल्यांस सुजा व इंग्रज व पठाण यांची कुमक मिळाली होती. ही गोष्ट मराठ्यांस कळली असूनही त्यांनीं रोहिल्यावर पुनः पावसाळा संपतांच स्वारी करण्याचा बेत केला व त्यांस सांगून पाठविलें कीं, वीस वर्षांपूर्वीं तुम्हीं सफदरजंगाच्या मार्फत पन्नास लक्ष रुपयांचीं खतें लिहून दिलीं आहेत त्या रुपयांचा आतांच्या आतां फडशा करा! या मागणीस समर्पक जबाब न आल्यामुळें नदांचें

स० १७७३ जाने०--जून. } पाणी ओसरूं लागतांच रोहिलखंडावर स्वारी करण्याच्या उद्देशानें मराठी फौज गंगेकडे येऊं लागली. रोहिल्यांचा मुख्य सरदार हाफिज रहिमत यानें लढाईची तयारी केलीच होती. त्याचा तळ बिसोली येथें होता. मराठे रामघांटापाशीं गंगा उतरणार अशी बातमी कळल्यावरून त्यानें त्या उतारावर अहंमदखान नांवाच्या सरदाराबरोबर कांहीं फौज पाठविली. तो सरदार असदपूरच्या उतारापर्यंत जाऊन पोंचतो तों तुकोजी होळकर नदी उतरून शत्रूच्या फौजेवर तुटून पडला. होळकरानें रोहिल्यांची फौज मोडून लुटून फस्त केली व खुद्द अहंमदखानासच पकडून कैद केलें. नंतर होळकरानें सर्व मुरादाबाद जिल्हा लुटून व जाळून उध्वस्त केला. इतक्यांत पायदळ व तोफखाना घेऊन विसाजीपंत बिनीवाले मागून येत होता तोही गंगेवर येऊन पोंचला. तेव्हां हाफीज रहिमत यानें मराठ्यांशीं तहाचें बोलणें लाविलें. तहाचा प्रकार जुळून आला तर आपल्या मुलखाचा बचाव होईल व मराठयांस काय द्यावयाचें तें देऊन वाटेस लावल्यावर मग सुजाउद्दौल्यास चाळीस लाख रुपये देऊं केले आहेत ते द्यावयास नकोत, असें हाफीज यांस वाटत होतें. पण ही तहाची वाटाघाट ऐकतांच सुजा व इंग्रज लांबलांब मजली करून रोहिलखंडांत येऊन पोंचले. इंग्रजी फौजेवर सर राबर्ट बार्कर म्हणून मुख्य सरदार होता, त्यानें बिनीवाल्याची चार हजार फौज गंगा उतरून नुकतीच अलीकडे आली होती ती पुनः गंगापार हुसकून लाविली. इंग्रजी फौजेनें होळकर व बिनीवाले यांमधलें दळणवळण तोडण्यासाठीं गंगेच्या तीरीं असदपूर येथें तळ दिला. सुजा व रोहिले मिळून होळकरांचा पाठलाग करण्याच्या तजविजीस लागले. बिनीवाल्याची फौज पलीकडे होती तिला अलीकडे येऊं न देतां होळकर अलीकडे अडकला होता त्याचें सर्वांनीं मिळून पारिपत्य करावें हा यावेळीं सुजा, इंग्रज व रोहिले यांचा बेत होता.

याप्रमाणें या मोहिमेंत मराठ्यांवर जो हा घोक्याचा प्रसंग येऊन गुदरला त्यास मुख्य कारण म्हटलें तर माधवराव पेशवे यांचा मृत्यु हें होय. सर्व हिंदुस्थानच्या राजेरजवाड्यावर त्यांचा दरारा मोठा होता, व हिंदुस्थानच्या

फौजेच्या मसलती व हालचाली ज्या होत होत्या त्या सर्व त्यांच्याच हुकमानें होत होत्या. वेळ पडली तर लक्षावधि फौज हिंदुस्थाच्या फौजेच्या कुमकेस पाठविण्याचें सामर्थ्य त्यांमध्यें होतें. ते मरण पावल्याचें वर्तमान ऐकतांच मराठ्यांच्या शत्रूस धीर आला. शिंदे राजपुतान्याकडे व रामचंद्र गणेश स्वदेशीं गेल्यामुळें मराठी फौज निम्मे कमी झाली आहे, ज्यानीं ही मोहीम सुरू केली ते पेशवे मृत्यु पावल्यामुळें पुण्याहून आतां कुमक येण्याचा संभव नाहीं, या गोष्टी लक्षांत आणून सुजा व इंग्रज रोहिल्यांच्या कुमकेस आले होते. शत्रूंची फौज साठ सत्तर हजारपर्यंत जमली असून आपली त्यांच्या निम्यापेक्षां फारशी अधिक नाहीं, देशाहून कुमक येण्याची आशा नाहीं, इतकेंही असून ननिमी काध्यानें लढावें म्हटलें तर उन्हाळ्यास सुरवात झाली असल्यामुळें, मुलुखगिरीचे दिवस थोडे राहिले. पावसाळ्यापूर्वी यमुनेअलीकडे फौज काढून न नेली तर पूर्वी दत्ताजी शिंदे दुआबांत आडकला होता, त्याप्रमाणें आपण अडकले जाऊन आपली दुर्दशा होईल, हें सर्व मनांत आणून मराठ्यांनीं दिल्लीस परत जाण्याचा निश्चय केला. पलीकडून बिनीवाल्यानें इंग्रजांवर तोफेचा मारा केला. तो मारा त्यांवर लागू न होतां उलट त्यांच्या तोफांचा मारा आपणावर लागू पडण्याचा सुमार दिसल्यामुळें बिनीवाल्यानें आपला तळ हालविला व इंग्रजांची फौज गंगा उतरून अलीकडे येतांच त्याशीं लढाई न देतां त्यानें दिल्लीचा रस्ता सुधारला. मागून लवकरच होळकरही मुरादाबादेंतून निघून गंगा उतरून दिल्लीस आला.

जानोजी भोंसले हा मरण पावण्यापूर्वी मुधोजीचा मुलगा रघोजी यास दत्तक घेतलें होतें. ती गोष्ट माजी पेशव्यांच्या संमतीनेंच झाली असल्यामुळें, त्यानीं रघोजीस भोंसल्यांच्या जहागिरीचा मालक ठरवून त्याचा बाप मुधोजी यास त्याचा पालक नेमिलें होतें. भोंसल्यांच्या घरांत व त्याप्रमाणें खुद्द पेशव्यांच्या घरांत एकी नसल्यामुळें ही व्यवस्था फार दिवस टिकली नाहीं. नारायणरावसाहेब व दादासाहेब यांमध्यें वितुष्ट उत्पन्न झाल्यामुळें दादांस कैद प्राप्त झाली. त्यांचे अनुयायी व अभिमानी जे होते त्यांत मुधोजी भोंसले मुख्य होता. मुधोजीचें व त्याचा बंधु साबाजी

याचें चित्त शुद्ध नव्हतें. साबाजीच्या मनांत रघोजीचा पालक मुधोजी झाला आहे त्याचा तो अधिकार आपणास मिळावा असें होतें. तो नारायणराव यांच्या मर्जीतला सरदार होता. उभयतां फडणीस, हरीपंत फडके व त्रिंबकरावमामा यांच्याशीं त्याची मैत्री होती. ' हैदरावरच्या

स. १७७३ जाने. } तिसऱ्या स्वारींत ' स. १७७० या सालीं तो पेशव्यांबरोबर कर्नाटकांत होता व तिकडे त्यानें अनेक

चांगल्या कामगिऱ्या बजाविल्या होत्या. दादांस कैद झाली तेव्हां मुधोजीचें बळ कमी होऊन नारायणरावसाहेबांनीं रघोजीकडून जहागीर व सेनासाहेब सुभ्याचें पद काढून तीं दोन्हीं साबाजीस दिलीं. मग साबाजी व मुधोजी यांची झटपट सुरू झाली. साबाजीस पेशव्यांचें पाठबळ चांगलें होतें. तीन हजार फौजेनिशीं बाळोजी पलांडा पुण्याहून त्यांच्या कुमकेस आला होता. निजामाकडेही त्याचें बळण चांगलेंच होतें. मुधोजीस फक्त इलिचपुरच्या नबाबाची मदत होती. साबाजीचा जोर अधिक झाल्यापुढें मुधोजी टेंकीस येऊन त्यानें भावाशीं समेट करून घेतला. हा समेट होतो न होतो तोंच जनोजीची स्त्री दर्याबाई साबाजीकडे होती ती त्यास सोडून मुधोजीस मिळाली. मग मुधोजी पुनः बिथरून दंगा करूं लागला.

फाल्गुनमासीं नारायणराव आपल्या आईस भेटण्याकरितां पुण्याहून गंगापुरास गेले. ती संधि साधून दादासाहेबांनीं बंडावा करण्याचा प्रयत्न केला. त्यांनीं मागीलप्रमाणेंच गुप्तरूपें कांहीं फौज जागोजाग जमविली. मुधोजी भोसले तर त्यांच्या सुटकेची इच्छा करीत होता व त्याचे विश्वासू कारकून व पुण्यांतील कांहीं उपद्व्यापी लोक या खटपटींत होते. शिवाय

मार्च. } हैदराचा वकील आपाजीराम याच्या मार्फत दादासाहेबांनीं हैदरअल्लीकडे आपल्या कुमकेस फौज पाठविण्याविषयीं पत्रें लिहिलीं.

आतां वाड्याबाहेर निघून जावें इतक्यांत फितुराची बातमी फुटून शहरचा मुख्य अधिकारी नारो आपाजी तुळशीबागवाले यानें शहरची नाकेबंदी केली व वाड्याभोंवतीं खडे पहारे उभे केले. हे पहारे आम्हांवर काय म्हणून उभे केले आहेत ! आम्हीच निघून जावयाचें मनांत आणिल्यास आम्हांस कोण प्रतिबंध करणारा आहे ! याप्रमाणें दादा पुष्कळ

चरफडले व जाण्याचा आव दाखवून शहराबाहेर त्यांनीं आपले डेरेही देववले. परंतु कृष्णराव बल्लाळ काळे यांच्या खटपटीमुळें त्यांचा निघून जाण्याचा बेत तहकूब झाला.

या बातम्या गंगापुरास जातांच नारायणराव तांबडतोब निघून पुण्यास आले. येतांच त्यांनीं चौकशी करून फितुराचे कागदपत्र हैदराकडे गेले होते ते पकडले व आपाजीराम यांस बोलावून आणून त्याची निर्भर्त्सना करून बेडी घालून त्यास सिंहगडावर पाठविलें. इतर फितुरीहि पकडून कैदेंत घातले. दादांची फौज जागोजाग जमली होती तीपैकीं कांहीं पळाली व कांहीं पकडली गेली.

इकडे साबाजी व मुधोजी यांची लढाई जारीनें सुरू होती. साबाजीच्या कुमकेस पेशव्यांकडून पलांडे व मोंगलाकडून जाबितजंग आला होता. तें सर्व लष्कर वर्धा नदीवर उतरलें होतें. मुधोजी व दर्याबाई यांनीं नागपुपुरापर्यंत धामधूम करीत जाऊन तेथें देवाजीपंत कैदेंत होता त्यास मुक्त करून आपल्या दिवाणगिरीचा अधिकार त्यास दिला. तेथेंच साबाजीची बायको होती तिजपासून व शहरांतील शेट सावकार यांपासून बलात्कारानें द्रव्य हरण करून त्यांनीं चांद्याचा रस्ता सुधारला. मुधोजीचा पक्ष बळावलासें पाहून पेशव्यांनीं खंडेराव दरेकर व मोंगलानें आपला दिवाण रुकनु-

जून-जुलै. } द्दौला यास साबाजीच्या कुमकेस पाठविलें. मुधोजीस मुख्य आधार इलिचपूरचा नबाब इस्मायलखान याचा असल्यामुळें साबाजीनें मोंगलाकडून व पेशव्यांकडून आलेल्या फौजेसह जाऊन इलिचपुरास वेढा घातला.

याच सुमारास प्रभूप्रकरण उपस्थित झालें. प्रभू लोक आपण क्षत्रिय असून आपणास वेदोक्त कर्मांचा अधिकार आहे असें म्हणून त्याप्रमाणें वागणूक करीत असत. पूर्वीपासून या बाबतींत ब्राह्मणांची व त्यांची कलागत होत आली असून अनेक वेळां उभयपक्षांकडून सरकारांत फिर्यादीही गेल्या आहेत. परंतु त्या त्या वेळचे शास्त्रे सुज्ञपणानें या जातीजातींच्या कलहाचा निकाल कोणच्याही पक्षाचा अभिमान न धरतां

"पूर्वी चालत आलें आहे तसें चालवावें, नवें करूं नये, जुनें मोडूं नये" असा करून ती वेळ भागवून नेत असत. प्रस्तुत ब्राह्मणांकडून प्रभूंवर सरकारांत फिर्याद आल्यावरून नारायणरावसाहेबांनीं प्रभू क्षत्रिय नाहींत, त्यांस वेदोक्त कर्माचा अधिकार नाहीं, शूद्राप्रमाणें त्यांनीं वागावें, असा ठराव केला व त्या अर्थाचा प्रभूंपासून नऊ कलमांचा कतबा लिहून घेतला. प्रभूंचें म्हणणें असें आहे कीं, 'आम्हीं हा कतबा खुषीनें लिहून दिलेला नाहीं. आपल्या जातींतील प्रमुख लोकांस पेशव्यांनीं धरून नेऊन तीन दिवस उपाशी कोंडून ठेविलें व नानाप्रकारें जुलूम केला त्यामुळें निरुपायानें त्यांनीं याप्रमाणें लिहून दिलेलें आहे. तें आपणास बिलकुल मान्य नाहीं.' या पेशव्यांच्या कारकीर्दींतले जे कागदपत्र पटवर्धनी दप्तरांत आम्हांस पहावयास मिळाले आहेत त्यांवरून हे पेशवे अविवेकी, उतावळे, उग्र स्वभावाचे व हेकट असावे असा आमचा ग्रह झालेला आहे व प्रभू आपणांवर जुलूम झाल्याचें जें सांगतात त्यात बरेंच तथ्य असावें असें आम्हांसही वाटतें. हा प्रभूंपासून कतबा लिहून घेतल्यामुळें ती सारी जात खवळून गेली व इतउत्तर तिनें दादासाहेबांचा पक्ष धरिला. या पेशव्यांचें व तिचें हाडवैर पडलें. पेशव्यांनीं दादांस फितूर उघडकीस आल्यापासून कडक बंदोबस्तांत ठेविलें होतें हें खरें आहे, पण दादांचा व आनंदीबाईचा नानाप्रकारें अनन्वित छळ पेशव्यांनीं केल्याविषयीं प्रभूंनीं जे लेख लिहिलेले आहेत ते सर्व खरे आहेत असें आम्हांस वाटत नाहीं. सदर लेखांविषयीं आमचें मत ग्रांट डफसाहेबांच्या मताप्रमाणेंच आहे. तें हेंच कीं, या पेशव्यांच्या हातून मूलपणामुळें जे अल्पस्वल्प दोष घडले असतील त्यांचें पक्षाभिमानास प्रवृत्त झालेल्या लोकांनीं तिखटमीठ लावून वर्णन केलें आहे व त्यांस भयंकर पातकाचें स्वरूप आणलें आहे!

माधवराव पेशवे मरण पावल्याबरोबर हैदरखानाच्या मनावर जो मराठ्यांचा दरारा होता तो नाहींसा होऊन मागच्या स्वारींत झालेल्या नुकसानीचा बचपा काढण्यासाठीं लढाईची तयारी तो झपाट्यानें करूं लागला. तेव्हां दसरा झाल्याबरोबर त्यावर स्वारी करावयाचा बेत पेशव्यांसही

करावा लागला. त्यांत आपल्या चुलत्यानें हैदराची मदत मागितली होती हें लक्षांत आणून येत्या स्वारींत त्याचा समूळ नाश करण्याचा त्यांचा निश्चय ठरला होता. हा निश्चय तडीस नेण्यास फौजेची तयारी मोठ्या प्रमाणावर केली पाहिजे, सबब हिंदुस्थानच्या फौजेस दिल्लीहून निघून येण्याविषयीं पेशव्यांनीं सक्तीचीं पत्रें लिहिलीं. खरें म्हटलें तर होळकर व विनीवाले यांस चमेलीअलीकडे बोलावणें म्हणजे त्यांनीं आज तीन वर्षें केलेले श्रम व्यर्थ घालविणें होतें. बादशहा व त्याचा बक्षी नजीफखान जाठ, पठाण, रोहिले, सुजाउद्दौला, इंग्रज, रजपुतान्यांतले व बुंदेलखंडांतले राजे हे सर्व मराठ्यांवर उठले होते. त्यांस जरबेंत ठेवण्यासाठीं आणखी मोठ्या फौजेची रवानगी पुण्याहून व्हावयास पाहिजे होती, तसें न करितां तिकडे आहे तीच फौज परत आणिल्यानें अंतर्वेदी, रोहिलखंड, आग्रा, दिल्ली, मथुरा, कनोज हे सर्व प्रांत आपल्या हातचे जातात, काशी व प्रयाग या क्षेत्रांबद्दल बादशहापासून मिळविलेल्या सनदा व्यर्थ होतात, हें हल्लींच्या पेशव्यांनीं किंवा त्यांच्या कारभाऱ्यांनीं मनावरच घेतलें नाहीं! माधवराव पेशवे जिवंत असते तर ते कर्नाटकची मसलत संभाळून देखील हिंदुस्थानची मसलत सांभाळिते यांत संशय नाहीं. पण त्यांची सलाबत त्यांजबरोबर गेली व ते मरण पावले तेव्हांच हिंदुस्थानांत मराठ्यांची सार्वभौमसत्ता होण्याची आशा नष्ट झाली! परत येण्याविषयीं पुण्याहून वारंवार सक्तीचे हुकूम जाऊं लागल्यामुळें होळकर व विनीवाले दिल्ली सोडून परत आले.

साबाजीनें इलिचपुरास वेढा घातल्याचें मागें लिहिलेंच आहे. त्याबरोबर पंचवीस हजार फौज होती. तींतील सरदार खुद्द साबाजी, बाळोजी पलांडे, खंडेराव दरेकर व रुक्नुद्दौला यांस आपण लवकरच इलिचपूर घेऊं असें वाटत होतें. परंतु त्या शहरांत इस्माईलखान नबाब होता त्यानें मर्दुमीनें व कौशल्यानें लढाई केल्यामुळें इतक्याही फौजेचें काहीं चालेनासें झालें. इस्माइलखानाच्या कुमकेस मुधोजी भोंसले आला तो वेढा घालणाऱ्या लष्कराभोंवतीं घिरट्या घालून नेहमीं कहीचीं उंटें व तट्टें नेऊं लागला. तेव्हां अर्थातच ह्या लष्करांत दाणावैरणीचा तुटवडा पडून लोक

उपाशीं मरूं लागले. अशी स्थिति असतां एका दिवशीं इस्माइलखान पांच हजार पठाणांनिशीं शहराबाहेर येऊन मोगलांच्या बातेऱ्यांवर तुटून पडला. तेथें मोठी मारामारी होऊन मोंगलांचें पांचशें माणूस मारिलें गेलें. व त्यांच्या दहा तोफा इस्माइलखानानें गांवांत नेल्या. मग हा नबाब व मुधोजी आपणास आवरत नाहींतसें पाहून वेढा घालणारें लष्कर वेढा उठवून तेथून सहा कोसांवर जाऊन उतरलें. मग साबाजी व मुधोजी यांमध्यें सलोख्याचें बोलणें सुरूं होऊन या भावाभावांच्या भेटी व्हाव्या असें ठरलें. पेशव्यांकडून साबाजीस सेनासाहेब सुभ्याचें पद मिळालें होतें तें त्याजकडेच कायम राहून जहागिरीचा अंमल मात्र दोघांनीं सारखा करावा असें ठरण्याचें धोरण दिसत होतें. परंतु मुधोजीचें दैव बलवत्तर असल्यामुळें याचवेळीं अशी एक गोष्ट घडून आली कीं, जिच्या योगानें साबाजीचें सामर्थ्य अगदीं कमी होऊन जहागिरीची मालकी मुधोजीच्या हातीं आली. ती गोष्ट म्हणजे नारायणराव पेशवे यांचा खून ही होय.

पेशवे व त्यांच्या दरबारचे लोक यांस साबाजीचा अभिमान पडला होता. इलिचपुरचा वेढा त्यास उठवावा लागला व त्याचें बळ कमी पडून मुधोजीची सरशी झाली हें पाहून पेशव्यांस वाईट वाटलें व स्वतःच मुधोजीवर स्वारी करून त्याचें पारिपत्य करावें असेंही त्यांच्या मनांत आलें. इकडे मुधोजीचा जय झालेला पाहून दादा व तत्पक्षीय लोक यांस फार आनंद झाला. त्यांनीं पेशव्यांविरुद्ध कट पुण्यांतल्या पुण्यांतच उत्पन्न केला. प्रथम या कटाचें स्वरूप फारसें भयंकर नव्हतें. दादांस कैदेंतून सोडवून पुण्याबाहेर न्यावें व फौज ठेवण्यास त्यांस मदत करावी. त्यांनीं फौज जमवून धामधूम सुरूं केली म्हणजे पेशवे इकडेच अडकले जाऊन मुधोजीवर स्वारी करण्याचा बेत त्यांस सोडून द्यावा लागेल इतकेंच काय तें या मसलतीचें स्वरूप होतें. मुधोजीचे कारकून व्यंकटराव काशी व लक्ष्मणराव काशी व दादांच्या मर्जीतला सरदार सखाराम हरि हे तिघे प्रभू या कटाचे प्रथम उत्पादक होत. त्यांची उडी कांहीं फार मोठीशी नव्हती हें वर दाखविलेंच आहे. परंतु बडीं बडीं प्रस्थें जेव्हां या कटांत येऊन मिसळलीं तेव्हां पहिला रंग बदलून निराळीच मसलत ठरली. ती हीच कीं

दादांस कैदेंतून मुक्त करावयाचें इतकेंच नव्हे, तर नारायणरावसाहेबांस कैदेंत ठेवून दादासाहेबांस पेशवाईचे खावंद करावयाचें ! भवानराव प्रतिनिधि, सदाशिव रामचंद्र, विठ्ठल विश्राम, चिंतो विठ्ठल व या सर्वांहून वरिष्ठ सखारामबापू इतके या मंत्रांत होते. सर्व व्यवस्था दादांच्या संमतीनें चालली होती हें सांगावयास नकोच. येथें सखाराम बापूचें नाव आम्ही लिहिलें आहे खरें, तथापि या कटांत त्याचें अंग अगदीं निसटतेंच--फक्त कानाडोळा करण्यापुरतेंच--असावें असें वाटतें. यापूर्वी पुण्यांत पुष्कळदां फितूर झाले होते पण ते सर्व उघडकीस आले व या कटाचा मागमूस शेवटपर्यंत कोणास कळला नाहीं ही गोष्ट आश्चर्य करण्यासारखी आहे. सर्व गोष्टी फार जलद व अत्यंत गुप्तपणानें झाल्या असाव्या असें दिसतें. हा कट तयार होतो तों कांहीं दुष्ट लोकांनीं राज्यप्राप्तीसाठीं हपापलेल्या आनंदीबाईच्या संमतीनें किंवा कदाचित् आज्ञेनें या कटाच्या आंत आणखी एक कट उभा केला. तो असा कीं, नारायणरावांस कैद करण्याच्या भरीस न पडतां त्यांस ठार मारून टाकावें ! हा कटाच्या आंतला कट खुद्द दादासाहेब किंवा सखारामबापूंस किंवा वर ज्यांचीं नावें लिहिलीं आहेत त्यांपैकीं कोणासही माहीत असावा असें आम्हांस अगदीं वाटत नाहीं. नारायणरावांस धरण्याचें काम पेशव्यांच्या नोकरीस गारदी लोक असत त्यांच्या सुमेरसिंग, खरगसिंग व महंमद इसब या तीन जमातदारांवर सोंपविण्यांत आलें होतें. गारद्यांमध्यें मराठी माणूस कोणी नसावयाचेंच. रोहिले, हबशी, पुरभय्ये, आरब वगैरे परदेशी लोकांचा गारद्यांत भरणा असे. त्यांचें येथें घर ना दार. पैक्यासाठीं ते कोणाचीही मान कापावयास तयारच ! त्यांस दादांचा स्वदस्तुरचा हुकुम गेला त्यांत 'नारायणराव यांस धरावें' असें वाक्य होतें. परंतु पूर्वी ठरल्याप्रमाणें आनंदीबाईनें तो हुकूम मागून घेऊन दादांस न कळत त्यांतील 'ध' चा 'मा' केला !!! गारद्यांस धाडी, नगर व पुरंदर हे तीन किल्ले व पांच लक्ष रुपये देऊं केलेले होते ही गोष्ट मागून प्रसिद्धीस आली. पण ही बक्षिसी दादांनीं देऊं केली होती कीं आनंदीबाईनें ! ही पेशव्यांस धरण्याबद्दल कीं मारण्याबद्दल ! कीं अमुक केल्यास अमुक व अमुक

केल्यास अमुक असें पूर्वी ठरलें असून दोन्हीं बक्षिसें गारदी मागत होते हें कळत नाहीं. तर्कानें पाहतां भवानराव, चिंतो विठ्ठल व सखारामबापूसारखीं माणसें ज्या अर्थीं या मसलतींत होतीं त्या अर्थीं पेशव्यांस धरण्याबद्दल पांच लक्ष रुपये देऊं केलेले असावे हेंच खरें. साष्टी, नगर व पुरंदर हीं महाराष्ट्राचीं नाकीं. हीं देणें म्हणजे पर्यायानें गारद्यांस राज्यच देण्यासारखें होतें. ही गोष्ट कोणीही शहाण्या मुत्सद्यानें अथवा दादासाहेबांनीं देखील कबूल केली नसती. ही मसलत बायकांची व अत्याग्रहास पेटलेल्या मूर्ख लोकांची दिसते !

ही मसलत सिद्ध होण्यास इतर गोष्टीही दादासाहेबांस अनुकूळच होत्या. पावसाळ्यामुळें फौजेस घरीं जाण्यास निरोप मिळाला असल्यामुळें पुण्यास तीन चार हजारापेक्षां अधिक फौज नव्हती. आपणास कोणी कैद करील किंवा जिवें मारील हें भय स्वप्नींही नसल्यामुळें पेशव्यांचा सावधपणा या बाजूनें नव्हता. दादांची कैद कायम रहावी इतक्यापुरताच त्यांचा बंदोबस्त होता. दादा कांहीं फितूर करण्याच्या उद्योगांत आहेत अशी बातमी जरी लोकांस कळली असती तरीही कोणांस त्याचें कांहींच वाटलें नसतें. कारण असे फितूर त्यांनीं पूर्वी पुष्कळ वेळां केलेले होते. त्यांची मसलत पळून जाण्याची किंवा फार झालें तर फौज जमवून दंगा करण्याची ! ती त्यांनीं पूर्वी अनेकदां केलेली होती. तिचें काय इतकें विशेष आहे ? गारदी दंगा करणार आहेत किंवा पेशवे कैद होणार आहेत या गोष्टीसुद्धां अश्रुतपूर्व होत्या असें नाहीं. सर्व फौजेंत गारदी हे पराकाष्ठेचे माथेफिरू व कज्जेदलाल असल्यामुळें त्यांच्या कटकटी लष्करांत नेहमीं होत असत. खुद्द माधवराव पेशवे वर्षभर कैदेंत होते, व दादासाहेब तर आज पांच वर्षे कैदेंत होतेच. पण गारद्यांच्या हातें पेशव्यांचा खून करण्यासारखी अंगावर शहारे आणणारी भयंकर मसलत कोणाही मराठी मुत्सद्याच्यानें कबूल करविली नसती व ती बाहेर फुटल्यावांचूनही कधीं राहिली नसती ! यावरून बायकांच्या व अल्पबुद्धि दुष्ट लोकांच्या संमतीनें ही मसलत आयत्या वेळीं ठरली असावी हें निस्संशय होय.

भाद्रपद शुद्ध त्रयोदशी शके १६९५ ता. ३० आगष्ट स. १७७३ या

दिवशीं प्रातःकाळीं कुलाब्याहून नुकत्याच आलेल्या रघोजी आंग्र्यांची भेट घेऊन पेशवे पर्वतीस देवदर्शनास जाऊन वाड्यांत आले. त्या दिवशीं गारद्यांच्या मनांत कांहीं दंगा करावयाचा आहे ही बातमी पेशवे पर्वतीवर असताच कोणी त्यांस सांगितली होती व बरोबर हरीपंत फडके होते त्यांस त्यांनीं हुकूम केला होता कीं, गारद्यांचा बंदोबस्त करावा. पण हरीपंतानें तत्काळ बंदोबस्त करण्याचें सोडून त्या दिवशीं त्यास कोठें जेवावयास जावयाचें होतें तिकडे तो गेला. भोजनोत्तर बंदोबस्त करावयाचा त्याचा बेत होता. गारद्यांचे दंगे नेहमीं होत असत. आजच्या दंग्यांत कांहीं विशेष आहे असें न वाटल्यामुळें त्यानें हलगर्जीपणा केला!

त्या दिवशीं बारावर दोन वाजण्याच्या सुमारास सुमेरसिंग, खरगसिंग व महमद इसब यांनीं हजेरीच्या निमित्तानें सात आठशे गारदी शनवार वाड्याजवळ गोळा केले. गारद्यांस पुढें काय करावयाचें हें आगाऊच ठाऊक असल्यामुळें त्यांनीं एकदम दरवाजावरच चाल करून तेथें पहारेकरी होते त्यापैकीं कित्येकांस ठार मारिलें व कित्येकांस कैद केलें. तेव्हां बाकीचे पहारेकरी पळून गेले. आंतील चौक्यांचीही याचप्रमाणें गत होऊन ते गारदी हं हं म्हणतां सर्व वाडाभर पसरले. त्यांनीं एकसारखी लुटालूट व कत्तल करण्यास प्रारंभ केला. “ लूट फार जाली. देवघर झाडून गेलें. स्वयंपाकांतील भांडींदेखील गेलीं, देवतार्चनाचें सामान, जडिताचे दागिन व सोन्यारुप्याचें फार होतें तें लुटलें गेलें. पितांबर आदिकरून फाडून घेतलें. ब्राह्मण सात आठ असामी, दोन गाई, दोन कुणबिणी, यांखेरीज चौकीदार मारले गेले. ” सर्व वाडाभर गारद्यांचा अंमल बसला. त्यांची एक टोळी घेऊन सुमेरसिंग व महमद इसब पेशव्यांस शोधून काढून ठार मारण्याच्या इरादानें वाडा धुंडाळीत होते. श्रीमंत झोंपीं गेले होते ते गारद्यांचा दंगा ऐकून जागे होतात तों दुश्मान जवळ येऊन ठेपले. ज्यांचा हुकूम होतांच लक्षावधी मराठ्यांच्या तरवारी म्यानांतून उपसल्या जाव्या व दंग्याचे देश ओसाड पडावे त्या पेशव्यांच्या जिवावर हा प्रसंग येऊन बेतला तेव्हां जवळ कोण होते तर एक दोन पुरभय्ये!! ते तर गारदी दृष्टीस पडतांच पळून गेले. त्यावेळीं नारायणराव दादासाहेब कैदेंत होते त्या ठिकाणीं गेले

व आपला प्राण वांचविण्यासाठीं त्यांची बहुत काकलूत करूं लागले. मल पाहिजे तर किल्ल्यावर कैदेंत ठेवा. नाचण्याची भाकर घालून ठेवा. तुम्हींच राज्य करा. पण कसेंही करून माझा प्राण वांचवा यांप्रमाणें बोलून त्यांनीं चुलत्याच्या गळ्यास घट्ट मिठी मारली. तों सुमेरसिंग व महंमद इसब व दुसरे गारदी मागून धांवत आले. तुळाजी पवार म्हणून पेशव्यांचा एक खिजमतगार होता तो फितूर झालेला होता. दादासाहेब पुतण्यास न मारण्याविषयीं गारद्यांस सांगूं लागले. तेव्हां त्यांनीं उत्तर केलें कीं, आतां आम्हांस मागें सरतां येत नाहीं. पेशव्यांस तुम्ही सोडा. नाहीं तर दोघेही मरून जाल ! इतकेंच बोलून ते गारदी राहिले नाहींत. सुमेरसिंगानें तरवारीचा एक वारही केला. त्यानें दादासाहेबांच्या कपाळास व हातास जखम झाली. तेव्हां पेशव्यांस लोटून दिलें. तुळाजी पवारानें पेशव्यांचे पाय धरून त्यांस खालीं पाडिलें, तों चांपाजी टिळेकर म्हणून एक विश्वासू खिजमतगार होता तो पेशव्यांच्या अंगावर पडून त्यांचा जीव न घेण्यासाठीं गारद्यांची प्रार्थना करूं लागला. पण ते कसचे ऐकतात ! त्यांनीं पांच सात वार करून दोघांसही ठार केलें ! इच्छारामपंत ढेरेही तेथेंच मारिला गेला.

यांप्रमाणें गर्दी झाल्यावर वाड्यांत शहाजणें वाजूं लागलीं व गारद्यांनीं दादासाहेबांच्या नांवाची द्वाही फिरविली. दादासाहेब येऊन सदरेस बसले व चोपदारांकरवीं वाड्याचा बंदोबस्त करूं लागले. नारोबा नाईक म्हणून नारायणराव साहेबांच्या मर्जीतला कोणी मनुष्य होता त्यास सर्व गर्दी आटपून गेल्यावर दादासाहेबानीं गारद्यांकरवीं मारविलें व हरीपंत फडके सांपडल्यास त्याचीही दशा अशीच करीन असें बोलले. ती बातमी हरीपंतास कळतांच तो तत्काळ बारामतीस पळून गेला. नारायणराव साहेबांची स्त्री गंगाबाई सती जाण्याविषयीं आक्रोश करीत असतां आनंदीबाईनें तिला खोलींत कोंडून घातलें. वाड्यांत सर्वत्र नाकेबंदी गारद्यांची व दादासाहेब स्वतः गारद्यांच्या कैदेंतच होते. यांप्रमाणें फक्त देखावा दाखविण्यांत येत होता कीं, खरोखरच ते गारद्यांच्या ताब्यांत होते हें सांगतां येणें कठीण आहे.

वाड्यांत शिरून गारदी दंगा करीत असल्याची बातमी तत्काळ सर्व

शहरभर पसरली. लोक घाबरून गेले व चोहोंकडे पळापळ सुरू झाली. सखारामबापू, नाना फडनवीस, त्रिंबकरावमामा, मोरोबादादा, व इतर मुत्सद्दी कोतवाल चावडींत जमा झाले व त्यांनीं स्वार जमा करून शहरची नाकेबंदी केली हा बंदोबस्त झाला म्हणून बरें, नाहीं तर गारद्यांनीं त्या दिवशीं शहर खाचित लुटलें असतें. इतकें झालें तरी वाडा गारद्यांच्याच ताब्यांत होता व त्यांनीं दरवाजाचा पक्का बंदोबस्त केला असल्यामुळें आंत काय चाललें आहे याची बातमी बाहेर कांहींच फुटेना. वाड्यास तोफा लावून गारद्यांस जबरदस्तीनें बाहेर काढावें असेंही कोणी सुचविलें, पण विचाराअंतीं मुत्सद्यांस तोही बेत नापसंत वाटला. पेशवे अद्यापि जिवंत आहेत असें त्यांस वाटत होतें. यामुळें वाड्यांत दोन खासे, त्यांच्या बायका, व इतर आप्त इष्ट असतां गारद्यांबरोबर त्यांच्याही जिवास अपाय होईल हें त्यांस भय होतें. अशा पंचाइतींत ते पडले असतां आंतून दादासाहेबांची स्वदस्तुरची चिठी सखारामबापूस आली कीं, "आतां व्यर्थ खटपट कशास करतां? चिरंजीव राव गारद्यांच्या कटकटींत मारिले गेले. मीहि गारद्यांच्या कैदेंतच आहें. तुम्ही आंत येऊन भेटून जावें." ही चिठी आल्यावर बापू आंत गेला व त्याची व दादासाहेबांची भेट झाली. नारायणरावसाहेबांस धरून कैद करावें येथपर्यंत मसलतीस बापूची संमति होती. पण तिचा तो भयंकर परिणाम झालेला पाहून त्याचें मन विटून गेलें. गारदी लोकांच्या रक्तानें भरलेल्या नागव्या तरवारी चमकत आहेत, प्रेतांचे ढीग व रक्तांचा सडा जागोजाग पडला आहे, श्रीमंतांच्या पदरचे बहुत दिवसांचे विश्वासू सेवक नाहक मारिले गेले आहेत, खुद्द नारायणरावसाहेब यांच्या शरीराचे तुकडे तुकडे होऊन गेले आहेत, रडारडीचा हलकल्लोळ माजला आहे, त्यांतच दादासाहेबांच्या नांवाचा जयघोष होत आहे, आनंदीबाई व त्या मंडळींपैकीं कांहीं क्षुद्र लोक यांचा धन्यवाद सुरू आहे, इत्यादि प्रकार पाहून बापूस काय वाटलें असेल याची कल्पना करावी म्हणजे झालें! तो दादासाहेबांस बोलला कीं, "आमचे शरीरीं समाधान नाहीं. आम्ही घरास जातों. लेखणीचे धनी फडणीस. त्यांशिवाय आपलें चालावयाचें नाहीं. त्यांस बोलावून आणावें." इतकें बोलून

निरोप घेऊन घरीं गेला. नंतर नाना व मोरोबा फडणीस यांस बोलावून नेऊन पूर्वी तुम्ही कामें करीत होतां त्याप्रमाणें करीत जावीं अशी दादांनीं ताकीद केली व मोरोबाकडून शिंदे, होळकर, गायकवाड, पवार, पटवर्धन वगैरे सरदारांस व प्रांतोप्रांतींच्या मामलेदारांस पत्रें लिहविलीं कीं, ' चिरंजीव नारायणराव गारद्यांच्या गर्दीत मारिले गेले. ईश्वरी इच्छेस इलाज नाहीं. तुम्ही आपापल्या जागीं सावध असावें व मागून हुकूम येईल त्याप्रमाणें वर्तत जावें ' सायंकाळीं त्यांनीं त्रिंबकरावमामास बोलावून नेऊन नारायणरावसाहेबांच्या प्रेताची व्यवस्था करण्याची आज्ञा दिली. त्यावरून मामानें मध्यरात्रीस तें प्रेत नदीच्या कांठीं नेऊन दहन करविलें.

प्रेत नेण्यापूर्वी प्रभूंनीं नारायणरावाची पिठाची मूर्ति करून तिजवर तो आपणापासून लिहून घेतलेला कतबा जाळून टाकिला, असें एका प्रभू लेखकानें लिहिलें आहे तें बरोबर नाहीं. कारण स. १७८९ त प्रभू-प्रकरण पुनः उपस्थित झालें होतें त्यावेळीं हा कतबा अस्तित्वांत होता व त्याच्याच आधारानें त्यावेळीं सवाई माधवराव यांनीं ठराव केलेला आहे.

या दुर्दैवी व अल्लड पेशव्यांच्या खुनानतर मराठी मुत्सद्दी व सरदार यांमध्यें फितूर, विश्वासघात, वचनभंग, आप्पलपोटेपणा, अंगचोरपणा या राष्ट्रनाशाला कारणीभूत होणाऱ्या दुर्गुणांचा बेमुरवत संचार सुरू झाला आणि परकीयांच्या स्वाऱ्या व अंतःस्थ बडाळ्या, दंगे व धामधुमी यांच्या योगानें सर्व मराठी साम्राज्य खिळखिळें होऊन गेलें. ही सर्व हकीगत पुढील दुसऱ्या खंडांत क्रमशः आणि तपशीलवार देण्यांत यावयाची आहे. 'मराठी राज्याचा उत्तरार्ध. खंड पहिला' या पुस्तकाची आम्ही कल्पिलेली कालमर्यादा समाप्त झाल्यामुळें तूर्त येथेंच विराम करणें प्राप्त आहे.

---

१ निष्कारण गैरसमज टाळावा या हेतूनें या पुस्तकांत ज्या ज्या ठिकाणीं मुळांत ' परभू ' असें होतें त्या त्या ठिकाणीं आम्ही ' प्रभु ' असें छापिलें आहे. पंत प्रतिनिधीचे मुतालीक व पेशवे सरकार यांमध्यें ठरलेली एक कलमबंदीची यादी पे. द. संग्रह भाग बारा पृ० ६७५-७९१ वर छापिली आहे ती या ' प्रभु की परभू ' वादांत अत्यंत महत्वाची आहे व तीस अनुसरूनच आम्ही हा फरक केला आहे.

# महत्त्वाच्या व्यक्ति व स्थळें यांची सूची


अदवानीचा नबाब बसालत जंग (निजामाचा भाऊ) ७, १०६, ११४, १५०, २१४.
अनवडीची लढाई, ९४-९५
अबदाली २, ३, २३५.
अमृतराव पेशवे १५६, १७१-७२.
अर्काटकर नबाब महंमदअली-५३, १०९, १४९, १५५, १७३, २१३. २२७, २२८.
अहिल्याबाई होळकर १३९-४०.
अहंमदखान बंगश २३९-४०, मृ० २४१
आनंदराव रास्ते ८, ६६, १४२, १७९. १९२.
आनंदराव गोपाळ ६६, १६३, १८७ १९७, २०२.
आनंदवल्लीची स्वारी १४०-४१.
आनंदीबाई पेशवे २६२-६५.
आपाजीराव पाटणकर २४९-५०.
आपाजी राम गाडगीळ नि. भोसले ११६
आपाजी राम वकील नि. हैदर १७८ २०१, २१२, २२६ कैद २६०।६१
आपा बळवंत मेहेंदळे २२०-३०.
आबा चिटणीस नि० शिंदे १४६.
आबा पुरंदरे ८, १६, २५, ३६, ६२ ६६. १०३ मृ. १०७.
आळेगांवची लढाई ११.
इंग्रज मालवण घेतात १००, उत्तर सरकारें घेतात ११८, पेशव्यांस फसविण्याचा प्रयत्न ११९, मोंगल व हैदर यांचा पराजय करतात १४८, १५१, २११, २५८-५९.
इच्छारामपंत हरे २६८.
इब्राहीमखान जाबीतजंग घोरा नि०
निजाम २४७, २६०-६४.
उत्तर सरकारें ११७-१९.
उदाजी चव्हाण ४, ६४.
उदाजी पवार ३७-३८.
उदेपुरकर २३४.
कडप्पेकर नबाब ५२ मृ० ५३
कनकापूरचा तह १६९-७०.
कागलकर घाटगे २८, ६३.
कितूरकर देसाई १३, २०४.
केदारजी शिंदे १३६.
केरूरकर १२४.
कोन्हेर त्रिंबक पटवर्धन ८, १०, ६६.
कोल्हारचा वेढा १९८.
कृष्णराव पारसनीस ८.
कृष्णराव बल्लाळ काळे बारामतीकर ४६, ११५, १२२, १३१, २४९.
कृष्ण जोशी धुळप २५६.
कृष्णाबाई शिंदे मनोळकर ६३, ६५.
खंडेराव दरेकर सरलष्कर १५, २४९ २५०, २५४, २६३.
खंडेराव दिवाण नि० हैदर ५७-५८ कैद ६०.
खरगसिंग गारदी २६५-६७.
गणेश विठ्ठल वाघमारे १११.
गमाजी यमाजी मुतालिक नि. प्रतिनिधि १९, २१, २९, ४४.
गंगाबाई पेशवे २६८.
गंगोबातात्या चंद्रचूड नि० होळकर. ४६, १३९, १५२, १५६ कैद १५८
गर्दनगडचा वेढा २१६.
गुरमकोंड्याचा वेढा २०६-८.
गोपाळराव पटवर्धन १, २, दादांशी हाडवैर ७-२०, मोंगलाकडे जातो १६, पेशव्यांशी समेट ४४, सरंजाम

प्रासि ४९, कर्नाटकांत मुलुखगिरी ५४ –५९, ६३, ७९, ७५, बाबनूरचें रक्षण ८३, ८६, १२१–२८, १४१-४२, कर्नाटकांत मुलुखगिरी १४९–५३, १५४–५५, १६१–७०, १७९ –२१४.
हैदराचा छापा १९२–९४, मृत्यु २१५,
गोपाळराव बर्वे- २४, १११,
गोपिकाबाई पेशवे ७, १०, १२ २९, ६२.
गोवर्धनची लढाई २३४.
गोविंद हरी पटवर्धन ९ मिरज सुंजवितो १३–२०, मृ० २३१.
गोविंद शिवराम खासगीवाले ९८, ११५, १२२, १४१.
गोविंदराव गायकवाड १५१–५८, १५९–६५, १८१
गोवेकर फिरंगी ६८, २५६.
गोहदकर जाट १३६, १५३.
गोहदचा वेढा १३६–३८.
चांपाजी टिळेकर २६८.
चांदाचा वेढा १६३.
चिक्क कृष्णराज मैसूरचा राजा ५०, ५८, कैद ६०.
चिक्कनायकनहळ्ळीचा दंगा १८९.
चिक्कबाळापूर १३०. १९०.
चिकोडी मनोळी प्रकरण ६३, २९३.
चिंतो विठ्ठल रायरीकर. १२, ६२, १३७, १५६, २६५.
चित्रदुर्गकर १२५, १८६, २००, २०३, २२६.
चेनरायदुर्ग ११०.
छत्रपति सातारकर २५४.
जतकर डफळे ६४.
जवाहीरमल जाट भरतपूरकर १३७–३९, १५३–५४, मृ० २३४.
जानराव धुळप १८९, बागलकोटची सुभेदारी १९१, २०६, आरमाराची सुभेदारी २१०.
जानोजी भोसले हिंदुपद बादशाहीची हाव २१–२३, पेशव्यांशी समेट ४४ १५६, वर पेशव्यांची स्वारी १५९–७१, मृ० २४७.
जाबितारवान रोहिला २४०–४१, २४३–४५.
जिजाबाई राणी करवीरकर १३, ६३,
जोत्याजी घाटगे ३८.
टिपू सुलतान १८३, १९७, २०४, २२५, २२८.
तहव्वारजंग नि.निजाम–२०३, २४७.
तुकोजी होळकर १४०, १४४, १५४ १५७, २३३–४६, २५०–५९, २६३.
तुळ्या पवार २६८.
तोतया (भाऊ) १०२, पूर्ववृत्त १४५, दंगा १०६–४७, चौकशी व कैद १४८.
तोतया ( सवकोजी )–१४८.
त्रिंबकराव पेठे–५, पेशव्यांचे कारभारी ६–१०, कर्नाटकच्या स्वारीची मुख्य सरदारी १००–३१, २४९, २००.
त्रिंबक हरि पटवर्धन–१३ मृ. २३१.
दत्ताजी शिंदे–९.
दमाजी गायकवाड २४–३९, ९७, १५६, मृ. १५८.
दयाबाई भोसले २६०.

दिल्लीची मसलत २३६-३७, २४१-४२, २६३.
दिल्लीचा बादशहा २३६-३७, तख्तावर स्थापना २४३, २४६, २५७-५८.
देवराज मंत्री नि. म्हैसूरकर ५१ मृ. ५९.
देवाजीपंत चोरघोडे नि. भोंसले १६८ १७१, २६१.
दौलताबाद किल्ला १-२.
धारवाडचा वेढा ८७-९२.
धोडपची स्वारी १५०.
धोंडो भास्कर पटवर्धन ८, ६६.
नजीबखान रोहिला २३५-३९, मृ २४०.
नजीबखान बक्षी नि. दिल्ली बादशहा २४३, २४६, २५७-५८.
नबाब इस्माइलखान इलिचपूरकर २६१-६४.
नरसिंगराव घायगुडे ८, मोंगलाकडे जातो १८, पेशव्याशीं समेट ४४, ६६, १६३, १८९, १९५, २०२.
नरसापा गोसावी १०१,
नजीबाबादेचा विध्वंस २४४.
नवलसिंग जाट २३४.
नंदराज मंत्री नि. म्हैसूरकर ५१-५२, ५६-५८, कैद ६०.
नंदिदुर्गचा वेढा १९०.
नागो राम १११.
नाना ( बाळाजी जनार्दन ) फडणीस लोहगडावर छापा ३०, फडणिशीची वस्त्रें ४४, ६२, ९३, ११४, ११८, १४२, १६५, २४७-५१, २५४, २६९-७०
नारायणराव पेशवे १२, ९९, १२२, १८२, चुलत्याशीं समेट २५२, पेशवाईची वस्त्रें २५४, स्वभाव २५५, अव्यवस्थित कारभार २५७-६७, खून २६८-
नारायण कृष्ण पटवर्धन ८ ११, ६६.
नारो आप्पाजी तुळशीबागवाले २९-३०, ११४.
नारो कोन्हेर एकबोटे ( कोन्हेर फाकड्याचा मुलगा ? ) ९२.
नारो कोन्हेर कारकून १२५.
नारो शंकर राजबहाद्दर ८, ४८, ६४, ७७, ९४, १०३, ११८, १४०, १८६, २०३.
निजगलचा वेढा २०१.
निजामअल्ली पुण्यावर स्वारी व पराजय ४-५, ची पेशवाईवर स्वारी २१-५०, पुण्याची दैना ३०-३१, पराजय ३०, इंग्रजांशीं खटखट ११७-१८, समेट ११९, पेशव्यांस फसविण्याचा प्रयत्न १२०, इंग्रजांकडून पराजय १४८-५०, १५६.
नीळकंठ त्रिंबकराव पटवर्धन ३, ८, ११, ६६, १९३ मृ. २२२.
पठाणांवर स्वारी २३९-४०.
परशुराम भाऊ पटवर्धन ८, ६६, १९३-९४, २२२, २३०, २४९.
पानिपतचें युद्ध ३,
पार्वतीबाई पेशवे १२, ६२, १४४ ४७, वपनाची बाटाघाट २५५-५६.
पिराजी नाईक निंबाळकर ८. मोंगलाकडे जातो १८, पेशव्याशीं समेट ४४, ९७, १६१.
पुरंदर किल्ला ८२, १०७.

पुरुषोत्तम कृष्ण ( दाजी ) पटवर्धन १३, १६,
प्रभु प्रामण्य २६१-६२, २७०.
फत्तेसिंग गायकवाड १५८, १८१.
बजाबा ( महिपत त्रिंबक ) पुरंदरे १५२, २५४.
बळवंतराव मेहेंदळे ५२, ५४.
बाजीपंत अण्णा १८६, २०२.
बापु करांडा नि. भोसले १६३, १६६.
बाबुराव जंगी नि. निजाम ३८.
बखुजी नाईक बारामतीकर ५, ६, २५, २७, जहागीर प्रकरणी हपता ४९, पेशव्यांशी तंटा ११३. समेट १२२, २४९
बाबुराव राम फडणीस ७, पेशव्यांचे कारभारी ६-१०, मोंगलाकडे पलायन २६, पेशव्यांशी समेट ४४.
बाबुराव हरि गुप्ते २७, १०६, मुजुमदारी ११६, २३९.
बाळाजी बाजीराव पेशवे १-२, मृ. ३
बाळोजी पलांडे १३१, १९७, २६० -६४.
बिदनूरची लढाई ९६-९७.
बिंबाजी भोसले १६१, २१२, २४७.
भगवंतराव प्रतिनिधि १०८, ११२.
भवानराव प्रतिनिधि-दादांशी द्वेष १३, मोंगलाकडे जाता १९, पेशव्यांशी समेट ४४, भगवंतरावाशी तंटा १०८, पेशव्यांस शरण ११२, २६५.
भास्कर हरी पटवर्धन ११-१३.
भिवराव पानसे २१३.
भूकंप १०२.
भैरवदुर्गचा वेढा १८७.
मखदुमअली नि. हैदर ५८, ५९, ६५, १८३.
मजीदखान रोहिला नि. भोसले १८६.
मल्हारराव होळकर ७, १०, अडवणूक २६, समजुतीची शिष्टाई ३२, ३५, आगा ४८, इंग्रजांकडून पराजय १०८-९, मृ ११३.
मल्हार भिकाजी रास्ते २४.
मल्हारराव पानसे १९०, २०३, २१२.
मदोगरीचा किल्ला १२९.
महादजी शिंदे ३३ पेशव्यांची भेट ४७, १०८-९, १३६-४०, १५२-५७, २३२-४६.
महादजी शितोळे ४३.
महादाजी गोविंद काकडे मृ. १०८.
महादाजीपंत गुरुजी ११४, १२५.
महिपतराव चिटणीस ८, ७४, १२१.
महिपतराव कवडे ६६, ७४, १२१.
महिपतराव पानशे ९८.
महिपतराव प्रभु नि. भोसले १६३.
महिमाजी शिंदे १७६, १८७, १८९, २०५, २२५.
महंमदअली कुमदान नि. हैदर २२५ -२६. महंमद इसब गारदी २०५, २६५-६७.
माधव कृष्ण पटवर्धन १३, मृ. १९५.
माधवराव जाधवराव ११५.
माधवराव पेशवे-पेशवाईची वस्त्रे ३, माळंदी तेढ ४-९, तुळाजीची कैद १०-४४, हैदरावर स्वाऱ्या ६२-१०५ ११४-३१, १७३-२३२, पराक्रम९५, दरबारी कामें ११०-१११, नाग, भोसल्यावर स्वाऱ्या १११, १५८-७०, कमाची तडक ११५, इंग्रज व

मोंगल यांचा डाव फसविणात. १२०, गोठ गणती १२५, कारस्थानी पेंच १५९-६०, मोरकरी १८२, शेवटचे दिवस व क्षयाचा आजार २४६, शेवटची निरवणूक २४९, दारा २५१, सर्वप्रायश्चित्त २५१. मृत्यु २५२.
मानसिंगराव वाघ नि० भोसले १८६.
मानाजी फकडे शिंदे १३६.
मल्हारराव होळकर १३५ मृ० १३३.
माळोजी घोरपडे नि. निजाम ३८.
मिरजेचा वेढा १४-२०.
मीर फैजुल्ला नि० हैदर ५२, ६७-७०, ८८.
मीर मोंगल निजामाचा भाऊ २८.
मीर रेझा नि० हैदर ६७, १२९, गहजब १३१, १७६, १८१, १८७-८८, १९७, २०६-२०८.
मुधोजी भोसले ३३, ११२, १२५, १६१, १६९, २४७, साबाजीशी तंटा २५९-६४.
मुराद्खान नि० निजाम ३८, ४५, मृ० ११०.
मुरारराव घोरपडे ७, ५१, ६०, ७४, ७८, ९४-९५, ११३, १२९, १३१ हैदराचा छापा १०४, हैदराची भेट व सन्मान १०७, १८७, २००, २०३, २०६.
मुलबागलचा वेढा १९८.
मदकची स्वारी ३.
मेधश्याम कृष्ण पटवर्धन ४९.
मेलकोट्याची लूट २२२.
मोतीतलावाची लढाई २१८-२२
मोरो बल्लाळ (आबा) पटवर्धन ८, १०, ६६, ११५, १७१, २४९.
मोरोबा दादा व बुराव फडणीस-मोंगलाकडे जातो २६, पेशव्याशी समेट ४४, ११४, १२२, १४२, पेशव्यांचे कारभारी १६२-२४७, २६९-७०.
मोत्याजीराव विचारे-आरमाराची सुभेदारी १८२, २०९.
रघुनाथराव पेशवे, २, ३, कपटाचें वर्तन ४-६, पुतण्याशी तेढ ७-८, पुतण्याचा पाडाव व मुख्याधिकार १०-४३, विश्रांति ६१, कर्मठपणाचें ढोंग ९०, ९१, ९७-१०२, वांटणीची मागणी १०६, १४०, हिंदुस्थान प्रांतीं स्वारी १११-१२, १३५-४०, पुतण्याशीं तंटा व आनंदवल्लीची भेट १४१-४३, कैद १५७, फितूर १६७, त्रागा १७१-७२, मुक्तता २४८, पुनः फितूर २४९, नारायणरावाशीं समेट व सरंजामाची मागणी २५३-५४, पुनः कैद २५६, गुप्त कारस्थान २६५-६६, पेशवाईची प्राप्ति २६८-७०.
रघोजी भोसले २४७, २५९-६०.
रघोजी आंग्रे २६७.
रट्टेहळ्ळीची लढाई ७६ ७७.
रमाबाई पेशवे १२२, सती २५१-५२
राजे विनायकदास नि. निजाम २८-३०, मृ. ३८.
रामचंद्रराव जाधव नि. निजाम ४, ५, पेशव्याकडे येतो ५-६, फितूर व कैद २५, १५७, १६१.
रामचंद्र गणेश कानडे ८, २७, ६६, ७२, ११२, १५७, १६१-७०, हिंदुस्थानच्या स्वारीची मुख्य सरदारी २३३-४३, संन्यासाची तयारी २५०.

रामराव देशपांडे चंदूरकर १०१.
रामचंद्र नाईक परांजपे २११.
रामाजीपंत चिटणीस ११४.
रायाजी पवार ८.
राक्षसभुवनची लढाई ३७-४३.
रुक्नुद्दौला दिवाण नि० निजाम ११०
१५१, १६१.
रुद्राजी धुळप ६८.
रोहिल्यांवर स्वारी २४२-४३
रुस्तुमअली बेग नि० हैदर ५५.
लक्ष्मण कान्हेर मामलेदार ११५.
लक्ष्मणराव रास्ते ११, ८८.
लक्ष्मणराव काशी नि० भोसले २६४
लक्ष्मण हरी कागू १७८, २१०.
लाला भिवदास नि. निजाम ४.
लाला मिय्या नि० हैदर ८१, २०२-४.
वाडीकर सावंत १००, २१०.
वामन गोविंद पटवर्धन ८, २१५-३०
२४९.
वासुदेव अनंत मुतालीक १०८.
विठ्ठल सुंदर दिवाण नि. निजाम २९
मृ० ३८.
विठ्ठल शिवदेव विंचूरकर ८, न्यायाधिशी
१२, ३२, ४८, ६२, ७५, ८८,
कांठकपणा ९० मृ० १५१.
विठ्ठल विश्राम २६५.
विनायक भास्कर पट ८.
विशाळगडकर प्रतिनिधि १३
विश्वासराव पेशवे २, मृ० ३.
विश्वासराव राजेबहाद्दर १४६-४७.
विसाजीपंत बिनीवाले ८, ५८, ६६,
७९, १४२, १५७, हिंदुस्थानच्या
स्वारीचो मुख्य सरदारी २४३,
२५७-५९, २६३.
विसाजी आपाजी आठवले १५२.
वेंकटरावतात्या घोरपडे इचलकरंजी-
कर ८, ६६, दुर्व्यसन १०१.
वेंकटराव बार्को नि. हैदर ८८, १८३
वेंकटराव काशी नि० भोसले २६४.
शहाजादा जवानबख्त २३६-३८.
शहाजी भोसले अक्कलकोटकर ६६,
८८, ११६, १६९, १८९, १९६,
२०२.
शहाजी भास्कर ६६.
शिवाजी विठ्ठल विंचूरकर १५१, १५४.
शुकतालचा किल्ला २४३.
शेटीबा खराडे नि. होळकर ७.
शंकराचार्य संकेश्वरकर १०१.
श्रीरंगपट्टणचा वेढा २२३.
सखाराम हरी गुप्ते १९७, २०२,
२०५, २०८, शासन २१८, २६४.
सखारामबापू बोकील ४, अधिकाराची
हाव व परिणाम ५-५१, पेशव्यांचे
कारभारी ५२, अधिकारच्युती १६२,
पुनः अधिकारप्राप्ति २४८, २६५-
७०.
सदाशिवराव भाऊ पेशवे २, मृ. ३.
सदाशिव रामचंद्र शेणवी २५, १८१,
२६५.
सयाजी गायकवाड ९७, ९८, १५८.
सेनाकर्तें पद १८१.
साठ बाळिशींचा तह २१.
साबाजी भोसले १६१, २००, २०३.
सुभेजीशीं तंटा २५९-६४.
सालपेकर शिंदे ९९.
सावनूरकर नवाब ७३, ७८, १०९-
८१, २०४.
सु ाउद्दौला १०८, ११९, १३५-

४६, २५०-५८.
सुमेरसिंग गारदी २६५, २६७-६८.
सुरापूरकर संस्थानिक १२२.
सोंधेकर ६७-६८.
सोलापुरचा किल्ला ११३.
हवजी जांबिरेकर २९.
हरिपंत फडके ११४, १२२, १४२, २५०-५१, २५४, २६७-६८.
हाफिज रहिमत रोहिला २५८.
हावेरांची लढाई ८९.
हुबळी ७२.
हैदरअली—कर्नाटकांत दंगा ७, पूर्ववृत्त ५०-६१, मराठ्यांच्या स्वाऱ्या ६२-१०५, ११४-३५, १७३-२१३, [illegible] ५८, स्वभाव ६१, धोरण ११९, धूर्तपणा १६०, कावेबाजपणा १३३, इंग्रजांकडून पराजय १४८-५०, इंग्रजांची त्रेधा उड- १७३-७६.
होनहळ्ळीचें ठाणें ९८.

[illegible] मिळणारे [illegible]—ऐतिहासिक-लेख-संग्रहाचे पहिले तीन भाग ४८० पृष्ठांचे असून पुढील सर्व भाग सहाशें पृष्ठांचे आहेत. आतां [illegible] भाग प्रसिद्ध झाले असून त्यांत स. १७६१ ते स. १८०२ [illegible] सर्व मराठी [illegible] आणि सुमारें साडे सहा हजार ऐतिहासिक पत्रें छापून निघालीं आहेत. मुंबई [illegible] विद्याखात्यानें या संग्रहाच्या तेराव्या भागाच्या तीस प्रती [illegible] विकत घेतल्या आहेत आणि तें पुस्तक प्रायमरी व सेकंडरी [illegible] मंजूर केलें आहे. पहिले [illegible] भाग [illegible] विक्रीकरितां [illegible] नाहींत. भाग सहावा, सातवा, आठवा, नववा [illegible] तीन रुपये आणि भाग दहावा, [illegible], बारावा, [illegible], [illegible] चार रुपये पडेल. इतर ऐतिहासिक पुस्तकें व [illegible] वगैरे तपशील—

| | किंमत |
|---|---|
| मराठी राज्याचा उत्तरार्ध खंड पहिला | १८८ |
| नाना फडनवीसाचें चरित्र. ( सुधारलेली आ. [illegible] ) | १८८ |
| [illegible] ( [illegible] ) | ६४ |
| अधिकार-[illegible]. ( नानाविध राज्याधिकार [illegible] ) | ०१० |
| [illegible]. ( [illegible] ) | ०१० |
| [illegible]. ( [illegible], त्यानुत्ती सहावी. ) | ०१२ |
| [illegible]. ( [illegible], सचित्र, आ. तिसरी. ) | १ |
| [illegible] ( [illegible], सचित्र, आ. दुसरी. ) | १ |
| [illegible]. ( सगीत, सचित्र. ) | १ |
| [illegible]. ( संगीत, सचित्र, आ. दुसरी ) | १ |

मराठी इतिहासांत क्रांति घडवून [illegible] वसईच्या [illegible] पे. ले. द. ह्याचा चवदावा भाग तयार होत आला आहे. [illegible] लिहिलेलीं सर्व पुस्तकें [illegible] किंवा [illegible] परचुरे, [illegible] नं. ४ मुंबई यांजकडे विकत मिळतील.

यशवंत वासुदेव [illegible]. मिरज.

---

हें पुस्तक कोल्हापूर येथें वासुदेव नारायण टकार [illegible] 'श्री[illegible]' मध्यें छापिलें आणि यशवंत वासुदेव [illegible] यांनी मिरज येथें प्रसिद्ध केलें.